17829
17829

17829
17829

गांधी स्मृति पुस्तकालय

भावनगर

अनुक्रमांक 17829

वर्गांक P

ग्रंथांक 054
SHI-26

किंमत 17829

तारीख

भेट श्री गंगादास आई शाह तरफथी.

17829
17829

नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ वें : अंक १ ला

एप्रिल १९५८



महत्वाचें शिक्षण

माता-पित्यामधील विसंवादानें बालकांच्या मनोविकासाला सर्वांत अधिक नुकसान पोहोंचतें. या विसंवादानें घर आणि शेजार-पाजारचें वातावरण क्षुब्ध आणि कलुषित होतें. दुसरें कांहीं आपल्या हातून न झालें तरी आपल्या बाचकांसाठीं स्त्री-पुरुषाचे सूर संवादी करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. दुर्भाग्यानें कदाचित विसंवाद उत्पन्न झाला तर तो न वाढवतां शमवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

सुखी, शान्त, प्रसन्न आणि संवादी अशा घरांचें वातावरण यांतच बालकाचे महत्वाचे शिक्षण आहे.

: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक

संपादक

श्री. शेष नामले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई–१४.	३७ नये पैसे

कामिनिया शृंगार

प्रसाधनांमुळें

चमकणारा केशकलाप, अनुपम लावण्य आणि रेशमाप्रमाणें मुलायम त्वचा प्राप्त करून द्या.

कामिनिया प्रसाधनेंच उत्तम असतात हें मला माहीत आहे. माझ्या निवडीवद्दल मला अभिमान वाटतो आणि तो योग्यच आहे.

☆

वैजयंतिमाला—

भारत नाट्यमची ही प्रतिमा असें म्हणते पहा.





कामिनिया हेअर ऑईल
कामिनिया स्नो
कामिनिया टॉयलेट सोप
ऑल्सो दिलदहार

अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कंपनी, मुंबई २









"व्हीगोपाल" हा जे. आर. एकर्गी, एस ए, यांचा, सिक्षरलेड यांचा रजिस्टर्ड ट्रेड मार्क आहे.

"त्या जमावांत बाळू ओळखूं आल्याशिवाय राहात नाहीं. कारण व्हीगोपाल वापरल्यामुळें त्याचे कपडे नेहमीं अत्यंत झगझगीत पांढरेशुभ्र असतात."

कारखानदार सुहृद गायगी प्रायव्हेट लिमिटेड, वाडी वाडी, वडोदा.

एकमेव वितरक सुहृद गायगी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पो. ऑ. बॉक्स ९६५, मुंबई

थोड्याशा व्हीगोपालने स्वच्छ कपडे स्वच्छ जास्त चमकदार पांढरे शुभ्र होतात

SISTA S SG 45 MAR

रशींच्या बरोबर एक निश्चित अभिप्रायाचा ठराव परिषदेनें एकमुखानें केलेला आहे.

"प्रचलित सर्व प्रकारच्या पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांत लेखन, वाचन आणि गणितावर पालकांच्या आग्रहामुळें जो अवास्तविक भार देण्यांत येत आहे, तो बालकांच्या शारीरिक, मानसिक आणि व्यक्तित्वाच्या विकासाला हानिकारक आहे, हा भार कमी झाला पाहिजे असें या परिषदेचें स्पष्ट मत आहे. हें मत संघाशीं जोडलेल्या सर्व संस्थांकडे संघानें पाठवावें अशी या सभेची आग्रहपूर्वक शिफारस आहे."

नूतन बालशिक्षण संघाच्या बालशिक्षणाचें समग्र स्वरूप स्पष्ट करण्यासाठीं योजण्यांत आलेली ही दुसरी चर्चापरिषद होती. या प्रकारची पहिली चर्चापरिषद १९५५ च्या नोव्हेंबर महिन्यांत संघाच्या ग्राम–बालशिक्षण केंद्रांत भरविण्यांत आली होती. या पहिल्या परिषदेंत संघानें इंद्रियशिक्षणाचीं मॉटेसरी साधनें अनिवार्य आहेत असा जो आपला अभिप्राय प्रकट केला होता, त्याच्याऐवजीं इंद्रिय–शिक्षणाची नवीन योजना झाल्यास त्याचाहि संघानें विचार केला पाहिजे असें मत व्यक्त झालें. त्यामुळें बालशिक्षणाच्या स्वातंत्र्याची त्यांना नवीं क्षितिजें दिसूं लागलीं आहेत असें म्हटल्यास हरकत नाहीं.

बालकांच्या सर्वांगीण विकासाला मदतरूप ठरणाऱ्या शिक्षण-स्वातंत्र्याची कल्पना अनेक शिक्षणतज्ज्ञांनीं केली आहे. त्यांत प्रख्यात फ्रेंच शिक्षणतज्ज्ञ रुसोपासून सुरुवात झाल्याचें दिसतें. त्याच्या काळांत ख्रिस्ती धर्मगुरूंनीं शिक्षण विषयाचें जें अवडंबर माजविलें होतें, तें नाहींसें करण्यासाठीं चला परत निसर्गाकडे, असा त्यानें आदेश दिला होता. रुसोनंतर पेस्टॅलॉझी, प्रॉबेल, मॉटेसरी, डयूई आणि मॅक्मिलन या शिक्षणकारांनीं शैक्षणिक स्वातंत्र्याला व्यावहारिक स्वरूप देण्याचे प्रयत्न आपापल्यापरी केले आहेत आपल्या देशांत पूर्व–प्राथमिक शिक्षणांत सध्यां आपण मॉटेसरींच्या स्वातंत्र्याची कल्पना मान्य केल्याचें दिसतें. मॉटेसरींच्या या शिक्षण–स्वातंत्र्याच्या कल्पनेंत शिक्षणाचें कार्य मुख्यत्वें शिक्षकाचे द्वारा नव्हे, पण साधनसंपन्न वातावरणाच्याद्वारें करण्यांत यावें अशी कल्पना आहे. त्यासाठीं वातावरणांतील साधनांच्या रचनेंत 'एकाकीकरण' 'स्वयंसूचन' आणि 'शिक्षकसूचन' वगैरेंच्या उपयोगाचें विशेष तंत्र मॉटेसरींनीं रचलें आहे. या तंत्रामुळें बालकें स्वातंत्र्याचा उपयोग स्वयंविकासासाठीं करतील अशी मॉटेसरींची कल्पना आहे. परन्तु आधुनिक बाल-मानसशास्त्रानें याच्यापुढें जाऊन बालकांच्या बुद्धिजीवनाच्या प्रश्नापेक्षांहि त्यांच्या भावनात्मक जीवनाचे प्रश्न शिक्षकांनीं लक्षांत घेण्याची जरूर आहे या गोष्टीकडे लक्ष वेधलें आहे. मॉटेसरींच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेंत बालजीवनाची केवळ बौद्धिक बाजूच ध्यानांत घेण्यांत आली आहे. आधुनिक बाल मनोविज्ञान मानवांतील बुद्धितत्त्वापेक्षां भावनेचें तत्त्वच शेवटीं मानवी व्यवहारांत अधिक निर्णायक बनतें असें मानतें. त्यामुळें बालकांचें वातावरण जितकें सूचनामुक्त राहील आणि त्यांत बालकांच्या स्वाभाविक भावना प्रकट होण्यास अवकाश राहील याची विशेष काळजी घेण्यांत येते.

परिषदेनें योजलेल्या इन्द्रियशिक्षणाच्या मीमांसेवरील चर्चेंत हा प्रश्न मानसशास्त्राच्या दृष्टीनें जेव्हां चर्चेला गेला, तेव्हां संघांतील कित्येक कार्यकर्त्यांना त्यांत मानसशास्त्रीय गुंतागुंत वाटली. मनुष्याचें संवेदन तंत्र स्वतंत्र नाहीं, त्याचें कार्य सापेक्ष आहे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानीं आली नाहीं. उदा० एक विशेष प्रकारची कुंडी पाहून कांहींना वाटलें कीं हा तर देवमंदिरांतील एक पवित्र आकार आहे; पण दुसऱ्या कांहींना वाटलें कीं ही पायखान्यांत योजण्यांत येणारी कुंडी आहे. या कुंडीसंबंधींचीं संवेदनें सारखीं असतांना त्याचा भावनात्मक अर्थ प्रत्येकाच्या मनाच्या अनुभवाच्या पार्श्वभूमींत निरनिराळा होतो. संवेदनांचा अर्थ जसा अनुभवाच्या अनुसंधानांत बदलतो, तशी त्यांची तीव्रता-देखील मनाच्या हेतूच्या तीव्रतेप्रमाणें बदलते. मानवी संवेदन तंत्र स्वतंत्र आणि स्थिर आहे अशी कल्पना करून त्याच्या शिक्षणासाठीं जर कोणी साधनयोजना करील, तर तिला कांहीं अर्थ नाहीं ही गोष्ट कित्येकांच्या गळीं उतरली नाहीं. पण पुष्कळांना आधुनिक मानसशास्त्राच्या गोष्टींत तथ्य आहे असें वाटलें व त्यामुळें सभेनें प्रयोगशीलतेला प्रोत्साहन दिलें. आणि इन्द्रियशिक्षण योजनेचें मूल्यांकन करण्याचें कार्य निष्णातांकडे सोंपविण्यांत यावें असा आपला अभिप्राय व्यक्त केला.

आजच्या बालशिक्षण संस्थांत इन्द्रियशिक्षणाच्या नांवानें जें कांहीं चाललें आहे तें आणि त्यांत लेखन, वाचन गणितादि विषयांच्या अभ्यासाचा कोंवळ्या शरीर आणि मनाच्या बालकांवर जो भार वाहूं लागला आहे, त्याची परिषदेला चिन्ता वाटत आहे. नूतन बालशिक्षण संघानें या बाबतींत अधिक विचार करावा आणि आपल्या देशांत प्रचलित झालेल्या पूर्वप्राथमिक शिक्षणाला योग्य मार्गदर्शन करावें अशी परिषदेनें जी शिफारस केली आहे, तिचें आम्ही स्वागत करतों आणि परिषदेच्या यशाबद्दल त्यांचें अभिनन्दन करतों.

—शेष नामले

मॉंटेसोरी योजित—

इन्द्रिय शिक्षण मीमांसा

आपल्या देशांत बालकाबाबतच्या कल्याण कार्याचा जसजसा विस्तार होत आहे, तसतशीं बालमंदिरें आणि बालवाड्यांची संख्या वेगानें वाढूं लागली आहे. या संस्थांसाठीं लागणाऱ्या साधन-सामग्रीची जुळवाजुळव करतांना मॉन्टेसोरी साधनांवर होणाऱ्या खर्चाची जाणीव होत राहिल्यानें या संस्थांचा चालकवर्ग पुनः पुनः जो एकच एक प्रश्न आपल्याला विचारतात तो म्हणजे 'हीं मॉन्टेसोरी साधनें घेण्याची खरोखरच गरज आहे कां?' सध्यां हा प्रश्न वारंवार विचारण्यांत येत असला तरीं कांहीं पृच्छकांनीं या प्रकारचे प्रश्न या देशांत मॉन्टेसोरी पद्धतीच्या प्रचाराच्या सुरुवातीपासूनच विचारलेले आहेत. या सर्व प्रश्नांना आपण कित्येक वर्षें एक प्रकारचें उत्तर देत आलों आहोंत. बालकांच्या शिक्षणाच्या आणि विकासाच्या दृष्टीनें हीं साधनें आवश्यक आहेत, एवढेंच नव्हे तर जेथें शिक्षण मागासलेलें आहे, अशा विभागांतील बालकांसाठीं तर या प्रकारच्या साधनांची अधिकच गरज आहे. शहरी वातावरणांतील बालकांना हीं साधनें नसलीं तर चालवून घेतां येईल. परंतु सामाजिक आर्थिक दृष्टीनें जे प्रदेश मागासलेले आहेत, त्या प्रदेशांतील बालकांनाच या साधनांची खरी गरज आहे. आपल्या या मताचा प्रभाव सध्यां इतका पडलेला आढळतो कीं इंद्रियशिक्षण साधनाशिवाय बालवाडी किंवा बालमंदिर नीटपणें चालू शकणार नाहीं हा समज जवळजवळ रूढ झाला आहे. एका राज्यांत आपल्या पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त शंभर नवीन बालमंदिरें भेट देण्याचा निर्णय घेण्यांत आला, तेव्हां या साधनांची अनिवार्य गरज लक्षांत घेऊन तीं थोड्या वेळांत कशीं तयार करून घेतां येतील हा एक मोठा प्रश्न होऊन बसला होता. कल्याण योजनेंत जेथें जेथें बालवाड्या सुरू करण्यांत येतात, तेथें तेथें ग्रॅटमधील बरीचशी रक्कम सध्यां या साधनांवर खर्च करण्यांत येत असते. हें सर्व लक्षांत घेतल्यावर हा प्रश्न मॉन्टेसोरी पद्धतीच्या अध्ययनाच्या आणि अनुभवाच्या भूमिकेऐवजीं बालमानसशास्त्राच्या भूमिकेवरून तपासावा असें मला वाटलें.

मॅडम मॉन्टेसोरींनीं ज्या काळांत इंद्रिय-शिक्षण साधनांची योजना केली त्यावर आतां पन्नास वर्षांपेक्षां अधिक काळ गेला आहे. विशेषतः बालमानसशास्त्राच्या ज्ञानांत बहुमोलाची भरही पडली आहे. तेव्हां आधुनिक मानसशास्त्राच्या प्रकाशांत मॉन्टेसोरी साधनांचें मूल्यमापन करावें या उद्देशानें शिक्षण-पत्रिकेंत मी कांहीं लेख लिहिले. या लेखांमुळें या विषयाबाबत माझा अभिप्राय काय आहे याची शिक्षण-पत्रिकेच्या वाचकांना कल्पना आहे. आज या विषयाचीच आपल्याला सांगोपांग चर्चा करावयाची आहे म्हणून प्रथम या विषयासंबंधीं मॅडम मॉन्टेसोरीचें म्हणणें काय आहे तें पाहूं.

साधन-योजनेचा मॅ. मॉन्टेसोरींचा उद्देश

इंद्रिय-शिक्षण योजनेच्या उद्देशासंबंधी मॅडम मॉन्टेसोरींनीं आपल्या मॉन्टेसोरी मेथड या ग्रंथांत पुढील प्रमाणें विधान केलें आहे. 'This education therefore is physiological and prepares directly for intellectual education by perfecting the organs of the sense and the nerve paths of projection and association.' पुढें एके ठिकाणीं त्या म्हणतात, 'The education of senses makes man observers and not only accomplishes the great work of adaptation to present epoch of civilization but also prepares them directly for practical life.' याचा थोडक्यांत अर्थ हा कीं मॉंटेसोरी इन्द्रिय-शिक्षणाच्या साधनांवरील कसरतीमुळें बालकें संवेदनशील बनतात. या संवेदनशीलतेमुळें वातावरणांतील वस्तूंचा यथार्थ बोध होतो; त्यामुळें वातावरणाशीं संयोजन साधण्यांत हीं मुलें अधिक कार्यक्षम होतात. वातावरणाचा परिचय वाढून त्यांचें अवलोकन अधिकाधिक मार्मिक बनतें; त्यामुळें त्यांच्या इन्द्रियांची कार्यक्षमता वाढत राहून, त्यांच्या कल्पनाशक्तीच्या विकासास भरपूर यथार्थ साधन-सामग्री उपलब्ध होते व त्यामुळें त्यांची रचनात्मक कल्पना विकसते. इंद्रिय-शिक्षणाच्या समर्थनार्थ मॅडम मॉन्टेसोरींनीं जें कांहीं लिहिलें आहे त्याचा मथितार्थ हा आहे.

इंद्रिय शिक्षण योजनेच्या उपयुक्ततेसंबंधी आधुनिक मानसशास्त्राचें काय म्हणणें आहे, हें समजण्याच्या दृष्टीनें कांहीं मानसिक प्रक्रियांचा अर्थ आपण स्पष्ट करून घेतला पाहिजे. प्रथम मॅडम मॉन्टेसोरी कशाला इन्द्रियशिक्षण म्हणतात हें आपण आधुनिक मानसशास्त्रीय परीभाषेंत निश्चित अर्थानें समजून घेतलें पाहिजे. मॉन्टेसोरी पद्धतीबरोबरच आपण आपल्या भाषेंत जे कित्येक शब्द रूढ केले त्यापैकीं इन्द्रियशिक्षण हा एक शब्द आहे. आपल्या तत्त्वज्ञानाच्या परिभाषेंत ज्ञानेन्द्रियें आणि कर्मेन्द्रियें वगैरे शब्द रूढ होतेच. ज्यांच्याद्वारें ज्ञान प्राप्त होतें तीं ज्ञानेन्द्रियें आणि ज्यांच्याद्वारें क्रिया आणि प्रतिक्रिया होतात तीं कर्मेन्द्रियें अशी आपली इन्द्रियांच्या कार्या संबंधीचीं स्थूल कल्पना आहे. सामान्य व्यवहारांत या स्थूल कल्पनेमुळें

रशींच्या बरोबर एक निश्चित अभिप्रायाचा ठराव परिषदेनें एकमुखानें केलेला आहे.

"प्रचलित सर्व प्रकारच्या पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांत लेखन, वाचन आणि गणितावर पालकांच्या आग्रहामुळें जो अवास्तविक भार देण्यांत येत आहे, तो बालकांच्या शारीरिक, मानसिक आणि व्यक्तित्वाच्या विकासाला हानिकारक आहे, हा भार कमी झाला पाहिजे असें या परिषदेचें स्पष्ट मत आहे. हें मत संघाशीं जोडलेल्या सर्व संस्थांकडे संघानें पाठवावें अशी या सभेची आग्रहपूर्वक शिफारस आहे."

नूतन बालशिक्षण संघाच्या बालशिक्षणाचें समग्र स्वरूप स्पष्ट करण्यासाठीं योजण्यांत आलेली ही दुसरी चर्चापरिषद होती. या प्रकारची पहिली चर्चापरिषद १९५५ च्या नोव्हेंबर महिन्यांत संघाच्या ग्राम–बालशिक्षण केंद्रांत भरविण्यांत आली होती. या पहिल्या परिषदेंत संघानें इंद्रियशिक्षणाचीं मॉटेसरी साधनें अनिवार्य आहेत असा जो आपला अभिप्राय प्रकट केला होता, त्याच्याऐवजीं इंद्रिय–शिक्षणाची नवीन योजना झाल्यास त्याचाहि संघानें विचार केला पाहिजे असें मत व्यक्त झालें. त्यामुळें बालशिक्षणाच्या स्वातंत्र्याची त्यांना नवीं क्षितिजें दिसूं लागली आहेत असें म्हटल्यास हरकत नाहीं.

बालकांच्या सर्वांगीण विकासाला मदतरूप ठरणाऱ्या शिक्षण-स्वातंत्र्याची कल्पना अनेक शिक्षणतज्ज्ञांनीं केली आहे. त्यांत प्रख्यात फ्रेंच शिक्षणतज्ज्ञ रुसोपासून सुरुवात झाल्याचें दिसतें. त्याच्या काळांत खिस्ती धर्मगुरूंनीं शिक्षण विषयाचें जें अवडंबर माजविलें होतें, तें नाहींसें करण्यासाठीं चला परत निसर्गाकडे, असा त्यानें आदेश दिला होता. रुसोनंतर पेस्टॅलॉझी, प्रॉबेल, मॉटेसरी, डयूई आणि मॅक्मिलन या शिक्षणकारांनीं शैक्षणिक स्वातंत्र्याला व्यावहारिक स्वरूप देण्याचे प्रयत्न आपापल्यापरी केले आहेत आपल्या देशांत पूर्व–प्राथमिक शिक्षणांत सध्यां आपण मॉटेसरींच्या स्वातंत्र्याची कल्पना मान्य केल्याचें दिसतें. मॉटेसरींच्या या शिक्षण–स्वातंत्र्याच्या कल्पनेंत शिक्षणाचें कार्य मुख्यत्वें शिक्षकाचे द्वारा नव्हे, पण साधनसंपन्न वातावरणाच्याद्वारें करण्यांत यावें अशी कल्पना आहे, त्यासाठीं वातावरणांतील साधनांच्या रचनेंत 'एकाकीकरण' 'स्वयंसूचन' आणि 'शिक्षकसूचन' वगैरेंच्या उपयोगाचें विशेष तंत्र मॉटेसरींनीं रचलें आहे. या तंत्रामुळें बालकें स्वातंत्र्याचा उपयोग स्वयंविकासासाठीं करतील अशी मॉटेसरींची कल्पना आहे. परन्तु आधुनिक बाल-मानसशास्त्रानें याच्यापुढें जाऊन बालकांच्या बुद्धिजीवनाच्या प्रश्नापेक्षांहि त्यांच्या भावनात्मक जीवनाचे प्रश्न शिक्षकांनीं लक्षांत घेण्याची जरूर आहे या गोष्टीकडे लक्ष वेधलें आहे. मॉटेसरींच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेंत बालजीवनाची केवळ बौद्धिक बाजूच ध्यानांत घेण्यांत आली आहे. आधुनिक बाल मनोविज्ञान मानवांतील बुद्धितत्त्वापेक्षां भावनेचें तत्त्वच शेवटीं मानवी व्यवहारांत अधिक निर्णायक बनतें असें मानतें. त्यामुळें बालकांचें वातावरण जितकें सूचनामुक्त राहील आणि त्यांत बालकांच्या स्वाभाविक भावना प्रकट होण्यास अवकाश राहील याची विशेष काळजी घेण्यांत येते.

परिषदेनें योजलेल्या इन्द्रियशिक्षणाच्या मीमांसेवरील चर्चेंत हा प्रश्न मानसशास्त्राच्या दृष्टीनें जेव्हां चर्चेला गेला, तेव्हां संघांतील कित्येक कार्यकर्त्यांना त्यांत मानसशास्त्रीय गुंतागुंत वाटली. मनुष्याचें संवेदन तंत्र स्वतंत्र नाहीं, त्याचें कार्य सापेक्ष आहे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानीं आली नाहीं. उदा० एक विशेष प्रकारची कुंडी पाहून कांहींना वाटलें कीं हा तर देवमंदिरांतील एक पवित्र आकार आहे; पण दुसऱ्या कांहींना वाटलें कीं ही पायखान्यांत योजण्यांत येणारी कुंडी आहे. या कुंडीसंबंधींचीं संवेदनें सारखीं असतांना त्याचा भावनात्मक अर्थ प्रत्येकाच्या मनाच्या अनुभवाच्या पार्श्वभूमींत निरनिराळा होतो. संवेदनांचा अर्थ जसा अनुभवाच्या अनुसंधानांत बदलतो, तशी त्यांची तीव्रता-देखील मनाच्या हेतूच्या तीव्रतेप्रमाणें बदलते. मानवी संवेदन तंत्र स्वतंत्र आणि स्थिर आहे अशी कल्पना करून त्याच्या शिक्षणासाठीं जर कोणी साधनयोजना करील, तर तिला कांहीं अर्थ नाहीं ही गोष्ट कित्येकांच्या गळीं उतरली नाहीं. पण पुष्कळांना आधुनिक मानसशास्त्राच्या गोष्टींत तथ्य आहे असें वाटलें व त्यामुळें सभेनें प्रयोगशीलतेला प्रोत्साहन दिलें. आणि इन्द्रियशिक्षण योजनेचें मूल्यांकन करण्याचें कार्य निष्णातांकडे सोंपविण्यांत यावें असा आपला अभिप्राय व्यक्त केला.

आजच्या बालशिक्षण संस्थांत इन्द्रियशिक्षणाच्या नांवानें जें कांहीं चाललें आहे तें आणि त्यांत लेखन, वाचन गणितादि विषयांच्या अभ्यासाचा कोंवळ्या शरीर आणि मनाच्या बालकांवर जो भार वाढूं लागला आहे, त्याची परिषदेला चिन्ता वाटत आहे. नूतन बालशिक्षण संघानें या बाबतींत अधिक विचार करावा आणि आपल्या देशांत प्रचलित झालेल्या पूर्वप्राथमिक शिक्षणाला योग्य मार्गदर्शन करावें अशी परिषदेनें जी शिफारस केली आहे, तिचें आम्ही स्वागत करतों आणि परिषदेच्या यशाबद्दल त्यांचें अभिनन्दन करतों.

—शेष नामले

मॉंटेसोरी योजित—

इन्द्रिय शिक्षण मीमांसा

आपल्या देशांत बालकाबाबतच्या कल्याण कार्याचा जसजसा विस्तार होत आहे, तसतशीं बालमंदिरें आणि बालवाड्यांची संख्या वेगानें वाढूं लागली आहे. या संस्थांसाठीं लागणाऱ्या साधन-सामग्रीची जुळवाजुळव करतांना मॉन्टेसोरी साधनांवर होणाऱ्या खर्चाची जाणीव होत राहिल्यानें या संस्थांचा चालकवर्ग पुनः पुनः जो एकच एक प्रश्न आपल्याला विचारतात तो म्हणजे 'हीं मॉन्टेसोरी साधनें घेण्याची खरोखरच गरज आहे कां?' सध्यां हा प्रश्न वारंवार विचारण्यांत येत असला तरीं कांहीं पृच्छकांनीं या प्रकारचे प्रश्न या देशांत मॉन्टेसोरी पद्धतीच्या प्रचाराच्या सुरुवातीपासूनच विचारलेले आहेत. या सर्व प्रश्नांना आपण कित्येक वर्षें एक प्रकारचें उत्तर देत आलों आहोंत. बालकांच्या शिक्षणाच्या आणि विकासाच्या दृष्टीनें हीं साधनें आवश्यक आहेत, एवढेंच नव्हे तर जेथें शिक्षण मागासलेलें आहे, अशा विभागांतील बालकांसाठीं तर या प्रकारच्या साधनांची अधिकच गरज आहे. शहरी वातावरणांतील बालकांना हीं साधनें नसलीं तर चालवून घेतां येईल. परंतु सामाजिक आर्थिक दृष्टीनें जे प्रदेश मागासलेले आहेत, त्या प्रदेशांतील बालकांनाच या साधनांची खरी गरज आहे. आपल्या या मताचा प्रभाव सध्यां इतका पडलेला आढळतो कीं इंद्रियशिक्षण साधनाशिवाय बालवाडी किंवा बालमंदिर नीटपणें चालू शकणार नाहीं हा समज जवळजवळ रूढ झाला आहे. एका राज्यांत आपल्या पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त शंभर नवीन बालमंदिरें भेट देण्याचा निर्णय घेण्यांत आला, तेव्हां या साधनांची अनिवार्य गरज लक्षांत घेऊन तीं थोड्या वेळांत कशीं तयार करून घेतां येतील हा एक मोठा प्रश्न होऊन बसला होता. कल्याण योजनेंत जेथें जेथें बालवाड्या सुरू करण्यांत येतात, तेथें तेथें ग्रॅटमधील बरीचशी रक्कम सध्यां या साधनांवर खर्च करण्यांत येत असते. हें सर्व लक्षांत घेतल्यावर हा प्रश्न मॉन्टेसोरी पद्धतीच्या अध्ययनाच्या आणि अनुभवाच्या भूमिकेऐवजीं बालमानसशास्त्राच्या भूमिकेवरून तपासावा असें मला वाटलें.

मॅडम मॉन्टेसोरींनीं ज्या काळांत इंद्रिय-शिक्षण साधनांची योजना केली त्यावर आतां पन्नास वर्षांपेक्षां अधिक काळ गेला आहे. विशेषतः बालमानसशास्त्राच्या ज्ञानांत बहुमोलाची भरही पडली आहे. तेव्हां आधुनिक मानसशास्त्राच्या प्रकाशांत मॉन्टेसोरी साधनांचें मूल्यमापन करावें या उद्देशानें शिक्षण-पत्रिकेंत मी कांहीं लेख लिहिले. या लेखांमुळें या विषयाबाबत माझा अभिप्राय काय आहे याची शिक्षण-पत्रिकेच्या वाचकांना कल्पना आहे. आज या विषयाचीच आपल्याला सांगोपांग चर्चा करावयाची आहे म्हणून प्रथम या विषयासंबंधीं मॅडम मॉन्टेसोरीचें म्हणणें काय आहे तें पाहूं.

साधन-योजनेचा मॅ. मॉन्टेसोरींचा उद्देश

इंद्रिय-शिक्षण योजनेच्या उद्देशासंबंधी मॅडम मॉन्टेसोरींनीं आपल्या मॉन्टेसोरी मेथड या ग्रंथांत पुढील प्रमाणें विधान केलें आहे. 'This education therefore is physiological and prepares directly for intellectual education by perfecting the organs of the sense and the nerve paths of projection and association.' पुढें एके ठिकाणीं त्या म्हणतात, 'The education of senses makes man observers and not only accomplishes the great work of adaptation to present epoch of civilization but also prepares them directly for practical life.' याचा थोडक्यांत अर्थ हा कीं मॉंटेसोरी इन्द्रिय-शिक्षणाच्या साधनांवरील कसरतीमुळें बालकें संवेदनशील बनतात. या संवेदनशीलतेमुळें वातावरणांतील वस्तूंचा यथार्थ बोध होतो; त्यामुळें वातावरणाशीं संयोजन साधण्यांत हीं मुलें अधिक कार्यक्षम होतात. वातावरणाचा परिचय वाढून त्यांचें अवलोकन अधिकाधिक मार्मिक बनतें; त्यामुळें त्यांच्या इन्द्रियांची कार्यक्षमता वाढत राहून, त्यांच्या कल्पनाशक्तीच्या विकासास भरपूर यथार्थ साधन-सामग्री उपलब्ध होते व त्यामुळें त्यांची रचनात्मक कल्पना विकसते. इंद्रिय शिक्षणाच्या समर्थनार्थ मॅडम मॉन्टेसोरींनीं जें कांहीं लिहिलें आहे त्याचा मथितार्थ हा आहे.

इंद्रिय शिक्षण योजनेच्या उपयुक्ततेसंबंधी आधुनिक मानसशास्त्राचें काय म्हणणें आहे, हें समजण्याच्या दृष्टीनें कांहीं मानसिक प्रक्रियांचा अर्थ आपण स्पष्ट करून घेतला पाहिजे. प्रथम मॅडम मॉन्टेसोरी कशाला इन्द्रियशिक्षण म्हणतात हें आपण आधुनिक मानसशास्त्रीय परीभाषेंत निश्चित अर्थानें समजून घेतलें पाहिजे. मॉन्टेसोरी पद्धतीबरोबरच आपण आपल्या भाषेंत जे कित्येक शब्द रूढ केले त्यापैकीं इन्द्रियशिक्षण हा एक शब्द आहे. आपल्या तत्त्वज्ञानाच्या परिभाषेंत ज्ञानेन्द्रियें आणि कर्मेन्द्रियें वगैरे शब्द रूढ होतेच. ज्यांच्याद्वारें ज्ञान प्राप्त होतें तीं ज्ञानेन्द्रियें आणि ज्यांच्याद्वारें क्रिया आणि प्रतिक्रिया होतात तीं कर्मेन्द्रियें अशी आपली इन्द्रियांच्या कार्या संबंधीचीं स्थूल कल्पना आहे. सामान्य व्यवहारांत या स्थूल कल्पनेमुळें

कोणतीच अडचण उत्पन्न होत नाहीं. परंतु शास्त्रीय चर्चेंत असा ढोबळ अर्थ उपयोगी पडत नाहीं. ज्ञानाच्या कार्यांत मनाच्या संवेदन अवबोधन, धारण, स्मरण, संकलन, पृथक्करण, संसाक्तिकरण, अनुमान, निर्णय,कल्पन वगैरे प्रकारच्या अनेक प्रक्रियांच्या क्रिया प्रतिक्रियेमुळें मनुष्याच्या ज्ञानाचा विकास होतो. ह्या सर्व क्रिया इंद्रियांत होतात कां ? कीं त्यांच्यासाठीं मानवी शरीरांत कांहीं निरनिराळी योजना आहे ? ज्ञानेंद्रियांच्याद्वारें आपल्याला बाह्य वस्तूंच्या संवेदना होतात; बाह्य वस्तूंच्या या संवेदनासमुच्चयाचा आपण जेव्हां कांहीं अर्थ करून ती वस्तु ओळखतों तेव्हां त्या वस्तूंत आपल्याला दर्शन होतें. ती वस्तू कोणती आहे हें आपल्याला समजतें. हें दिसण्याचें कार्य डोळ्यांच्याद्वारें होतांना बाह्यतः दिसत असलें तरी हें कार्य मेंदूतील संवेदन क्षेत्रांत होत असतें हें आपल्याला माहीत आहे. ज्ञानाचें हें कार्य कोठें व कसें होतें आणि मॉन्टेसोरी साधनांवरील प्रतिक्रियांत मनाच्या कार्यांतील कोणत्या प्रक्रिया सुरू होतात, हें समजण्यासाठीं आपल्याला होत असलेल्या ज्ञान-प्रक्रियांचें आंपण अधिक सूक्ष्म ज्ञान करून घेतलें पाहिजे.

बाह्य वस्तूचा मनाला जो प्राथमिक संपर्क होतो, त्या पक्रियेला आपण संवेदन म्हणतो. इंग्रजींत याला Sensing किंवा sensation असे शब्द आहेत. जुन्या मानसशास्त्रांत या संवेदन प्रक्रियेचें ज्ञानाच्या विकासाच्या दृष्टीनें फार महत्व प्रतिपादन करीत असत. या बाबतींत ऑक्डेन म्हणतो 'The old psychology thought that all the higher knowledge grows out of the immediate cognitive contact with the outer world which we gain through the senses. यांतील immediate cognitive contact म्हणजेच संवदेन. या संवदेन प्रक्रियेला मॅडम मॉन्टेसोरींनींही अवास्तव महत्त्व दिलें आहे. ज्ञानाच्या आणि व्यक्तीच्या सर्वांगी विकासाचा सर्व आधार जणुं हा इन्द्रियांचा संवेदनानुभव असतो, या कल्पनेने मॉन्टेसोरींनीं इंद्रिय-शिक्षणाचें महत्त्व प्रतिपादन केलेलें आहे. या संवेदनीय अनुभवासंबंधीं प्रसिद्ध मानस शास्त्रज्ञ एलिझाबेथ हार्लॉक काय म्हणते तें पहा. Concepts are not direct sensory data but something resulting from elaboration and combination of such data They depend upon individual's previous experience. They are experiences which tie together or link discrete sensory experiences... Frequently concepts have an 'emotional weighting' They are complex affairs which are continonsly with the experience and with new knowledge on the part of the child. हार्लॉकच्या या अभिप्रायावरून केवळ संवेदनीय अनुभव हा कांहीं ज्ञानाचा प्रत्यक्ष पाया होऊं शकत नाहीं, ही गोष्ट स्पष्ट आहे. संवेदनेचें हें स्वरूप समजून घेतल्यानंतर मॉन्टेसोरी साधनांवर मनाच्या कोणकोणत्या प्रक्रियांना चालना मिळते हें पाहणें आगत्याचें आहे. हें पाहण्यासाठीं एक उदाहरण घेऊन या प्रक्रियांचा प्रथम अर्थ स्पष्ट करूं. दूर ठेवलेल्या एका वस्तूच्या नुसत्या आकृतींची आणि रंगाची प्राथमिक छाप माझ्या मनावर पडणें या गोष्टीला आपण संवेदन म्हटलें. परंतु ही छाप मनापुढें आल्यानंतर लगेच मन त्या वस्तूवर अधिक लक्ष घालून ती आकृति गोलाकार आहे आणि तो रंग नारंगी आहे असा निर्णय घेतें. या निर्णयामुळें आकार-संवेदन कोणत्या प्रकारचें आहे व त्याचप्रमाणें रंग-संवेदन कशा तऱ्हेचें आहे याचा मला बोध होतो. याला आपण संवेदनीय अवबोध असें नांव देऊंया. इंग्रजींत या प्रक्रियेला sensorial perception असें म्हणतात. इंद्रिय शिक्षणाच्या मॉन्टेसोरी साधनांवर नुसतें संवेदन मिळतें असें नसून त्यासंबंधीचे शब्द आपण मुलांना देत असल्यानें, प्रत्येक साधनांतून मुलांना संवेदनीय अवबोध मिळूं शकतात. या साधनांत **संवेदनाचे प्रकार त्यांचीं** मोजमापें निश्चित केल्यामुळें विशिष्ट **संवेदनांतील फेरफार** करण्याची ही सोय आहे. उदाहरणार्थ, **दट्टापेटींत** १० लहानमोठीं क्रमिक परिमाणें योजिलीं आहेत. त्याचप्रमाणें रंगसाधनांत रंगाचे प्रकार आणि छायांची योजना केलेली आहे या साधनांत संवेदनांचा सारखेपणा ओळखणें, संवेदनांचा क्रम लावणें वगैरेसाठीं अवकाश असल्यामुळें मनाचें कार्य संवेदन आणि अवबोधनाच्या पलीकडे जाऊन परिमाणांची तुलना करणें, त्यासंबंधीं क्रम शोधणें आणि त्याबाबतचे निर्णय घेणें हीं कार्येंही या साधनावर होतात. तेव्हां मॉटेसोरींचें इंद्रिय शिक्षण साधनांवरील प्रक्रियेंत सवेदनीय कक्षेवर बुद्धीचें कार्यही जोड्या करणें व क्रम लावणें या दोन क्रियेंत होत असतें. या सर्व गोष्टींना मॉन्टेसोरींनीं इंद्रिय-शिक्षण असें नांव दिलें आहे. मनाचें हें संवदन कक्षेवरील कार्य मनुष्याच्या सर्वांगी विकासाचा पाया आहे, असा दावा केला आहे. परंतु आधुनिक मानसशास्त्राच्या दृष्टीनें ज्ञानाचा पाया मर्यादित संवेदनीय अनुभव नसून ज्ञानाचा यापेक्षां अधिक व्यापक असतो असें प्रतिपादन केलें आहे. केवळ संवेदनीय अनुभव नव्हे पण मनाचा समग्र अनुभव म्हणजे समग्र मन अनुभव घेतें तो व्यापक अनुभव हाच ज्ञानाचा पाया असल्याचें मानसशास्त्राचें म्हणणें. मनुष्याची आकलन पात्रता केवळ संवेदनानें नव्हें पण समग्र अनुभवानें मनुष्याच्या ज्ञानांत आणि कौशल्यांत वाढ होत असते.

आधुनिक मासनशास्त्रानें ज्ञान आणि कौशल्याच्या विका-

सांत तीन महत्त्वाचे घटक असल्याचें सांगितलें आहे. एक अनुभवाचें ग्रहण करणाऱ्या मज्जीय यंत्रणेचें पक्कीभवन. दुसरी गोष्ट आंतरिक हेतूचें प्रबळ प्रेरण आणि तिसरी गोष्ट ज्ञान किंवा कौशल्य प्राप्त करण्यासाठीं मिळणारें शिक्षण. इंग्रजींत यास न्यूरोफिजिऑलॉजिकल डेव्हलपमेंट, मोटिव्हेशन आणि लर्निंग म्हणतात. अवधान, संवेदन, ग्रहण, धारण, संकलन, स्मरण, किंवा कल्पन ह्या मनाच्या स्वतंत्र शक्ति नसून तीं ज्ञानाचीं साधनें आहेत. या साधनांचा कमी अधिक प्रभावी उपयोग करणें हें समग्र मनाच्या हेतु-प्रेरणावर अथवा विकासाच्या गरजेच्या तीव्रतेवर अवलंबून असतें. मनाच्या या विविध प्रक्रियांचें स्वरूप समजावून सांगण्याच्या दृष्टीनें आपण सुटें पाडीत असलों तरी या प्रक्रिया सुट्या अथवा स्वतंत्रपणें कार्यप्रवण होऊं शकत नाहींत. एकादी आपल्या पुढें येते म्हणजे ती आपल्याला दिसतेच असें नव्हे. आपण अवधान केन्द्रित करून पाहिल्याशिवाय आपल्याला ती वस्तू आपल्या इंद्रियांचें कार्य चालू असूनही दिसत नाहीं. इंद्रियांच्या कार्यावर हेतु-प्रेरणेचा कसा प्रभाव पडतो त्याचें एक दुसरें मजेदार उदाहरण आहे. टेलिफोनची घंटा भर झोपेंत असतांना हळुवारपणें वाजली तरीं या गोष्टीला सरावलेला डॉक्टर आपल्या झोपेंतून चटकन् खडबडून जागा होतो. परंतु बाजूच्या बिछान्यांतील आपलेंच मूल मोठ्यानें रडलें तरी डॉक्टरांच्या झोपेंत कोणताही व्यत्यय येत नाहीं, याला काय म्हणावें ? संवेदनेच्या मागें असलेल्या हेतु-प्रेरणेचा हा प्रभाव आहे. जेथें गरज नाहीं तेथें मनाच्या प्रक्रिया प्रभावी बनत नाहींत. आणि संवेदनच प्रभावी न झालें तर त्यामुळें मनाच्या त्यापुढील कार्याचा विकास होणार नाहीं हें उघड आहे.

ज्ञानाच्या आणि क्रियाकौशल्याच्या विकासासंबंधीं मानसशास्त्रानें टाकलेल्या या प्रकाशाच्या अनुरोधानें मॉन्टेसोरी साधनांवरील खेळांत बालकाला पुरतें हेतु-प्रेरण मिळतें कां ? हा महत्त्वाचा प्रश्न तपासूंया. याबाबतींतही मॉन्टेसोरी स्वतः काय म्हणतात तें प्रथम पाहूं. त्यांचें म्हणणें असें, The development of the senses preceeds that of the superior intellectual activity.....Three to seven is the time for the formulating of the sense activities as related to intellect. The child in this age develops his senses.'

मज्जीय यंत्रणेच्या विकासासंबंधीं आधुनिक मानसशास्त्रज्ञ जरसिल्ड म्हणतो, 'संवेदनीय अनुभवासाठीं मज्जीय यंत्रणेचें पक्कीभवन जन्माच्या वेळींच झालेलें असतें. इतकेंच नव्हे तर श्रवणेन्द्रियाचें कार्य जन्माच्या आधीं देखील सूल करीत असतें. तेव्हां इन्द्रियांची घडण तीन ते सात या वयाच्या कालांतच होते हें म्हणणें बरोबर नाहीं. या कालांत इन्द्रियांच्या कार्याची विशेष वाढ होत असते म्हणून मुलें विशेष हालचाल करतात असें मॉन्टेसोरींचें म्हणणें स्वीकारलें तरी इन्द्रियांना कार्यक्षम बनविण्यासाठीं ज्ञानाच्या किंवा क्रियांच्या कार्याचा विकास व्हावा म्हणून मॉन्टेसोरी साधनांच्या द्वारें अनुभव फक्त संवेदनीय कक्षेवर मर्यादित करण्याची जरूर आहे कां ? मॉन्टेसोरी साधनांवरील खेळांत संवेदनांच्या एकाकीकरणानें बालकांना सूक्ष्म संवेदनांची तुलना त्यांतील क्रम व तत्संबंधित निर्णय करण्याला अवकाश मिळतो. या खेळांत संवेदनीय विशिष्ट अनुभवाचें पुनरावर्तन होतें. मॉंटेसोरीच्या दट्टापेटीकडे मुलें आकर्षित होतात. रंगतक्त्याच्या जोड्या लावणें किंवा मनोरा रचणें वगैरे कामें मुलांना आवडतात. कांहीं दिवस या साधनांचें मुलांना खूपखूप आकर्षण वाटतें ? व त्यावर मुलें पुनरावर्तनेंही करतात. याबाबत दोन प्रश्न आपण विचारले पाहिजेत. एकतर या साधनांचें मुलांना आकर्षण कां वाटतें. आणि दुसरें म्हणजे या साधनांवरील पुनरावर्तनानें मुलांच्या मनाचा कोणत्या प्रकारचा विकास होतो; या विकासाचें स्वरूप काय ? या बाबतींत मॉंटेसोरींचा दावा काय आहे तो वर स्पष्ट केला आहे. साधनांवरील खेळानें मुलें स्थिर होतात. त्यांच्या मनाला स्थिरता येते हें म्हणणें कितपत खरें आहे हेंही आपण तपासलें पाहिजे.

—शेष नामले

बर्फासारखें थंड
वनस्पतियुक्त
उमा



पांढरे केंस नुकसान न करतां काळे करणें, लांब व चमकदार बनवणें, उवा आणि लिखा काढून मेंदूला थंड ठेवण्यासाठीं

उमा वापरा

सर्वत्र विकत मिळतें—

बनविणार—

उमा प्रॉडक्टस् बोरीस चाळ, नॉवेल्टी सिनेमाजिक, ग्रांट रोड, मुं. ७

स्टॉकिस्ट : विठ्ठलदास नारायणदास, जुम्मा मशीद, मुंबई

सर्जनात्मक कल्पकतेचा विकास

मनुष्याच्या अनादि कालापासून चालत आलेल्या उत्क्रांतीच्या मुळाशीं मनुष्यांतील कल्पकता आहे हें पाहिलें म्हणजे या विषयाचें किती महत्त्व आहे हें कळून येण्यासारखें आहे. शिक्षणाला हा विषय इतका जिव्हाळ्याचा आहे कीं, ज्या शिक्षण-योजनेंत मनुष्यांतील कल्पकतेच्या विकासाचा विचार नाहीं, ती शिक्षण-योजना निरर्थक समजण्यांत येते. मनुष्यांतील कल्पकतेचा विकास हें शिक्षणाच्या उद्देशाचें एक महत्त्वाचें अंग आहे.

मॅडम मॉंटेसोरींनीं आपल्या 'ॲडव्हान्सड् मॉंटेसोरी' नामक पुस्तकाच्या पहिल्या खंडांत कल्पन-प्रक्रियेच्या विकासाबाबत आपले विचार अत्यन्त विस्तारपूर्वक मांडले आहेत. आपल्या येथील पूर्वप्राथमिक शिक्षणाचें स्वरूप मुख्यत्वें त्यांच्याच विचारांना अनुसरून घडलें गेल्यामुळें मॉंटेसोरींचे याबाबतचे विचार काय आहेत हें पहाणें जरुरीचें आहे.

मॉंटेसोरींच्या मतें कल्पन-प्रक्रियेला लागणारी साधन-सामग्री ही केवळ इंद्रियांच्याच अनुभवांतून प्राप्त झालेली असते. म्हणून या प्रक्रियेच्या विकासाची तयारी इंद्रिय शिक्षणानें झाली पाहिजे. त्या म्हणतात—

Imagination can have only sensorial basis. The sensory education which prepares for the accurate perception of all the differential details in the qualities of the things is therfore the foundation of the observation of the things and of phenomena which present themselves to our senses.'

या त्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं,


(१) कल्पन-प्रक्रियेला संवेदनेचाच एकमेव आधार असूं शकतो.


(२) म्हणून ज्या इन्द्रिय शिक्षणानें संवेदनीय सूक्ष्म फरक कळण्याबाबतची तयारी होते, तेंच अवलोकनाचा आणि अनुभवाचा पाया समजलें पाहिजे.

महान् वैज्ञानिक आणि महान् कलाकार या दोहोंत सूक्ष्म अवलोकनाची पात्रता असते. त्यामुळें त्यांच्या कृति मौलिक ठरतात. म्हणून रचनात्मक कल्पन-प्रक्रियेचा विकास साधावयाचा असेल तर मॉंटेसोरी योजनेच्या इन्द्रिय शिक्षणावर भर दिला पाहिजे.

कल्पन-प्रक्रियेचा सामान्य विकास होतो, यासंबंधीच्या विवरणाबरोबर मॉंटेसोरींनीं बालकांतील कल्पनाविलासासंबंधीं आपले विचार मांडले आहेत. बालकांतील Fantasy अथवा कल्पनाविलास हा त्यांच्या अपरिपक्वतेचा परिणाम आहे, असें त्या समजतात. जीवनांतील व्यवहारांत जेव्हां अपयश प्राप्त होतें तेव्हां प्रौढ व्यक्ति त्या गोष्टींचा नाद सोडून देतात, परंतु मुलें तें न करतां त्या गोष्टीबाबत भ्रम निर्माण करतात. अशा प्रकारची भ्रान्ति ही त्यांच्या अतृप्त इच्छांनीं घेतलेलें सोंग असतें. असा तरंगीपणा म्हणजे रचनात्मक कल्पकता नव्हे. ती प्राथमिक रानटी अवस्थेंतील मनाची अविकसित स्थिति आहे असें समजलें पाहिजे. शिक्षणांत या गोष्टीला कितपत स्थान द्यावें यासंबंधीं त्या म्हणतात, 'This savage stage is transient and must be superseeded; education should help the child to overcome it.

स्वदेशीची भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





नाटुकलं

पात्रें : (राधिका, दोन गोपी व कृष्ण)

(राधिका विचारमग्न उभी आहे. येवढ्यांत दोन गोपी घाईनें येतात.)

दोघी गोपी एकदम : अग अग राधिके, कळलं का तुला ?

राधिका : काय ग गोपिके, सांग तरी मला.

१ ली गोपी : वडाच्या झाडाखालीं गोपाळांचा मेळा.

२ री गोपी : मध्येंच उभा आहे कृष्ण सांवळा

राधिका : हो कां ग बाई, मला माहीतच नाहीं. पण मी म्हणतें हें आह तरी काय ? सर्वजण मिळून तिथें करतात काय ?

१ ली गोपी : रात्रींच्या वेळीं करतात चोरी.

२ री गोपी : मग चट्टामट्टा आणि मारामारी.

राधिका : अग पण गोपिके, ते खातात तरी काय ?

१ ली गोपी : वेडी ग वेडी, विचारतेस काय ? दहीं दूध लोणी आणि दुधावरची साय.

२ री गोपी : सगळं घेऊन जातांत अन् सोडतात काय !

राधिका : असं आहे काय ! (दुसऱ्या बाजूनें हळूच कृष्ण येतो.) येऊं दे तो कान्हा त्याचा मोडतेंच पाय (हें ऐकल्याबरोबर कृष्ण रागावून मान फिरवतो. राधिका पहाते, झटकन् त्याच्याजवळ जाऊन) कन्हैया कन्हैय्या (कृष्ण बोलत नाही) अगबाई कान्हा माझा बोलेचना.

राधिका : काय करूं गोपिके मला सुचेचना.

कृष्ण : (हात ओवाळीत) ऐ हे हे हे, मोडतेच पाय म्हणून म्हणतेस ना ? तुझ्याशीं कान्हा बोलचना.

राधिका : नव्हे रे कान्हा चुकलंच तें. उगीचच बोलणं, खरं नव्हें तें. चला ग सख्यांनो फेर धरूं या. कृष्णाभोवतीं रास रचूंया.

(आणखी कांहीं गोपी येतात. फेर धरतात व गाणें म्हणतात. कृष्ण अर्थातच मध्यें असतो.)

गौळणी होऊं या, या या गौळणी होऊं या.
श्रीकृष्णाला मध्यें करूनी रासहि नाचूं या
डेऱ्यामध्यें दहीं घुसळुनी लोणी काढूं या–
दहिदुध लोणी श्रीकृष्णाला प्रेमें
देऊं या–॥१॥

जाई जुई अन् तसा मोगरा हारहि गुंफूं या
हार करोनी श्रीकृष्णाला प्रेमें अर्पूं या ॥२॥
मुरलीचा हा सूर धरोनी गाणें गाऊ या
गानाच्या त्या तालामध्यें नाचहि
नाचूं या ॥३॥

—विमल राव, सांगली.

खेळाया येई

चांदोबा, आई । अंबरीं । खेळाया येई ॥धृ०॥
पूर्व दिशा गालांत हांसली
नवयुवती लाजुनी बैसली
शुभ्र पांढरीं फुलें उमललीं
वेंचाया येई । अंबरीं । चांदोबा आई ॥१॥
अंगरखा पांढरा घातला,
मोती पवळें लावुन त्याला
दिला आइनें घालायाला
नटुनी हा आई । अंबरीं । चांदोबा येई ॥२॥
चांद चिमुकला राजदुलारा
कसा शोभतो बाळ गोजिरा
किंचित झाला गोरामोरा
नकळे कां आई । अंबरीं । चांदोबा येई ॥३॥

खट्याळ कुठला मावळतीला ।
तेजस्वी तो शुक्र हासला
पळतां पळतां म्हणुनी पडला
ठेंचाळुन आई । अंबरीं । चांदोबा येई ॥४॥
शिलेदार ते छोटे छोटे
खेळगडी गमतीचे मोठे
लपुनी बसले, नभांत कोठें
शोधित हा आई । तयांना । चांदोबा येई ॥५॥
नभांगणीं हा धावे रात्रीं
पाहुन त्याला लोचन दिपती
तेजभरें हर्षांत संगती ।
नटवर, हा आई । अंबरीं । चांदोबा येई ॥ ६ ॥

—बा. मा. हराळे, साहित्यप्राज्ञ

गजराज

अबबब अबबब, कोणता हो हा प्राणी ?
डुलत डुलत येतोय् हत्ती तर नाहीं ?
हत्तीच रे हत्तीच, पहा तर याचें धूड
उंचें पुरें जाडें जुडें, दिसतें आहे खूप
इवलिशीशी शेपूट, एवढी मोठी सोंड,
इवलेसेसे डोळे, एवढे मोठे कान
दिसतें आहे जरा सारें विचित्रच काम !
थांबा तर जरा—
घाला पाठीवर झूल, चढवा वर अंबारी
आंतमध्यें बसवा, राजाची स्वारी
रेखा आतां वेलबुट्टी, गंडस्थळावरती
घंटा आणि सांखळ्या गुंफा गळ्याभोंवतीं
नाहीं बरं आतां हें विचित्र काम
नटले आहेत 'गजराज' ठोका त्यांना सलाम।

—शकुंतला गुप्ते, नाशिक

'अण्णा आजोबा'

माझ्या बालमित्रांनो येतां कां माझ्याबरोबर आमच्या आजोबांच्या घरीं ? त्यांचं घर ना ! पुण्यांत एरंडवण्याला आहे. पुण्यांतल्या कोणालाहि विचारा आजोबांचं घर ! तो तुम्हांला आजोबांचं घर दाखवील. पुण्यांतच काय पण साऱ्या भारतांतील लोकांना माहीत आहेत हे आजोबा. या आजोबांचें सबंध नांव आहे धोंडो केशव कर्वे. पण सर्व लोक त्यांना अण्णाच म्हणतात. तुमच्यासारखी छोटी छोटी मुलं म्हणतात 'अण्णाआजोबा'. तुमचेहि आजोबा आहेत घरीं, खरं ना ! हो, पण हे त्यांच्यापेक्षांहि मोठे —शंभर वर्षांचे आजोबा आहेत. तुमचा वाढदिवस असतो ना दरवर्षी—आई काय काय गंमत करते तेव्हां ! हां तसाच या आजोबांचा शंभरावा वाढदिवस अठरा एप्रिलला आहे. त्या दिवशीं त्यांना एकशें एकावें वर्ष लागणार आहे

या अण्णा आजोबांना महर्षि म्हणतात. महर्षि म्हणजे मोठे ऋषि. हो तर ! ऋषींसारखी त्यांना दाढी आहे. आणि त्यांच्यासारखाच शिक्षणाचें कार्य करण्यासाठीं त्यांनीं आश्रम पण काढला होता. तुमच्या आजोबांना विचारा जरा तें शाळेंत जात होते तेव्हां आतांसारख्या मुलींना कोणी शाळेंत घालीत नसत. पण मुलींना नको का शिकायला ? अण्णा आजोबांनीं फक्त मुलींना शिकविण्याचीच शाळा काढली. ती चालवायला त्यांना फार श्रम करावे लागले. मग लोकांना जेव्हां त्यांचं काम आवडलं तेव्हां लोक त्यांना महर्षि म्हणूं लागले. या ऋषींना दाढी असली तरी घाबरूं नका हं ! हे आजोबा मुळींच रागवत नाहींत बरं का ! त्यांचीसुद्धां नातवंडं—पणतवंडं आहेत घरीं. त्यांना चालतो दंगा केला तरी. तुमच्याबरोबर पत्तेसुद्धां खेळतील ते.

तुम्हांला माहीत आहे का ? आपल्या भारत सरकारनें 'भारतरत्न' ही सर्वांत बहुमानाची पदवी देऊन त्यांचा गौरव केला आहे. सर्व ठिकाणीं त्यांचा वाढदिवस थाटामाटांत साजरा होत आहे. आणि तुम्हीं पाहिलीत कां नवीन पोस्टाचीं तिकीटं ? हो त्यांचाच फोटो आहे त्यांच्यावर ! असा मान फारच थोड्यांना मिळतो बरं का ? मुंबईच्या बालमित्रांनो जरूर जा हं त्यांचा वाढदिवसाचा समारंभ बघायला.

आणखी एक गंमत सांगूं कां ? हे आजोबा शंभर वर्षांचे झाले तरी त्यांना कसलें औषध लागत नाहीं कीं कोणाची मदत लागत नाहीं. ठणठणीत प्रकृति आहे त्यांची. अजून पुष्कळ वाचतात. त्यांची कधीं कसली तक्रार नसते कीं ते कोणाला बोलत नाहींत. घरांत आहेत कीं नाहींत तें समजतसुद्धां नाहीं. अजून सगळं चावून खातात. हो अगदीं चकलीं कडबोळंसुद्धां. कडव्याची उसळ फार आवडते त्यांना. पण सगळं कसं नियमित. झोंप, काम नी खाणं सारं वेळेवर आणि मोजकं. गाणं नी फुलं फार आवडतात त्यांना. गाणं कसलंहि चालतं. संध्याकाळीं बराच वेळ रेडिओ ऐकत असतात.

फुलं सगळींच आवडतात. पण त्यांतल्यांत्यांत बकुळीचीं जास्त आवडतात.

एवढा मोठा प्रसिद्ध माणूस. पण अगदी साधे आहेत आमचे आजोबा. वाटेल त्याला भेटतात हो, लहान मुलांनासुद्धां. तुम्हांलाहि पहावेसे वाटतात ना हे शंभर वर्षांचे आजोबा. मग या कीं हो, केव्हांहि या. अगोदर कळवून ठेवा म्हणजे झालं !

—शांता आठवले, पुणें.

शेतकरणींचें गाणें

शेताला ऽ ऽ जाऊं चला ग
शेताला ऽ ऽ जाऊं चला ।
जातां जातां कांदा भाकर
डोक्यावरती नेऊं चला ॥धृ०॥

झर झर झर झर पाऊल उचला ।
रवि तापला डोई वरला ।
धन्यासी आपुल्या भूक लागली ।
म्हणूनि जाऊं शेताला ॥१॥

बरसातीचें दिवसहि आले ।
चला करुं या पेरणी सारे ।
शेतें पिकुनि पिवळीं होतां ।
म्हणाल सोनें हातीं आलें ॥२॥

कुरु कुरु कुरु कुरु मोट चालते ।
मळ्यासी आपुल्या जीवन देते ।
फळां फुलांनीं बहरुनी येतां ।
वनदेवी ही हो हंसते ॥३॥

—सौ. मालती गोडबोले, पुणें.

—*—

उड रे उड रे चिऊ

उड रे उड रे चिऊ । उड रे उड रे काऊ ॥धृ०॥
सकाळ झाली उजाडलं बघ
फिरूं लागले नभांतुनी ढग
झोपलास तूं अजुन कसा मग ?
जरी वाजले आठ नऊ । उड रे उड रे
चिऊ काऊ ॥१॥

हंबरती गोठ्यांत वासरं
किलबिलती घरट्यांत पांखरं
फुलांफुलांशीं हसतें वारं
पाहतात मध भृंग पिऊं । उड रे उड रे
चिऊ काऊ ॥२॥

क्षितिजावरती लाललाल तें
येउनिया रविबिंब हांसते
उठावयातें तुला सांगतें
रानतृणें डुलतात मऊ । उड रे उड रे
चिऊ काऊ ॥३॥

घाटावती नदी किनारीं
ब्रह्मवृंद जन मंत्रोच्चारी
ओम् नमो भगवते, जप करी
घरीं पाहती ते जाऊं । उड रे उड रे
चिऊ काऊ ॥४॥

आकाशीं जे तेवत होते
देवाघरचे रत्नदीप ते
कधींच मालवले ना बघ ते
ऊन वाढते गहूं गहूं । उड रे उड रे
चिऊ काऊ ॥५॥

—श्री. बा. मा. हराळे, भवानीनगर.

It should not develop the savage stage nor keep the child therein.'

बालकांच्या तरंगी कल्पनाविलासाच्या स्वरूपाबाबत त्यांची समजूत वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें असल्यामुळें त्यांनीं ला काळीं कींडरगार्टन पद्धतीच्या पूर्वप्राथमिक संस्थांत प्रचलित असलेल्या बाहुलीघराचाहि कडक निषेध केला आहे. त्याचप्रमाणें बालः साहित्यांत अद्‌भुतरम्य पुराणकथा आणि परीकथा यांचाहि शिक्षणाचें साधन म्हणून निषेध केलेला आहे.

मॉन्टेसोरींच्या कल्पन-प्रक्रियेच्या विकासासंबंधीं आतांपर्यंत अनेक तज्ञांनीं आपापले अभिप्राय सकारण व्यक्त केले आहेत; त्यांचा येथें उल्लेख विस्तारभयास्तव करीत नाहीं.

कल्पन-प्रक्रियेचा विकास स्वतंत्र आणि आपुलकीच्या वातावरणांतच होऊं शकतो, या त्यांच्या म्हणण्याला कोणीहि विरोध करूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें कल्पन-प्रक्रियेसाठीं आवश्यक साधन-सामग्री सूक्ष्म प्रकारच्या अवलोकनांतूनच उपलब्ध होऊं शकते हें त्यांचें म्हणणें कोणालाहि पटेल, असेंच आहे. परन्तु हें सूक्ष्म अवलोकन करण्याची पात्रता मॉंटेसोरी इन्द्रिय-शिक्षण योजनेच्या साधनांवर कसरत झाल्यानें येते हें म्हणणें कोणालाच पटलेलें नाहीं. ऑक्डेन काय म्हणतो तें पहाः-' Sense training may not assist but it cannot produce that much more valuable thing **observation.** For observation we need not only to experience the sensation but to make it a part of our general body of knowledge. We do it by reflecting on it. It is study and experience, rather than the refined sense that produces observation.' ऑक्डेननें मॉंटेसोरी साधनांमुळें sense refinement होते ही गोष्ट गृहीत धरली आहे आणि ही sense refinement होते असें धरून चाललें तरी त्यामुळें अवलोकनपात्रता नुसत्या संवेदनीय अनुभवांमुळें येत नाहीं, असें त्याचें स्पष्ट म्हणणें आहे. ऑक्डेनप्रमाणें इतर कित्येक मानसशास्त्रज्ञांच्या अभिप्रायाचा पुरावा येथें देतां येईल; पण या बाबतींत आधुनिक मानसशास्त्राचा निष्कर्ष मांडून हा मुद्दा आटोपता घेतों. कल्पना-प्रक्रिया, मॉंटेसोरी म्हणतात त्याप्रमाणें, केवळ संवेदनीय अनुभवावर आधारलेली प्रक्रिया नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे इंद्रिय शिक्षण योजनेंतील साधनांवरील कसरतीनें अवलोकनाचा किंवा संवेदनीय अनुभवाचा पायाहि घातला जात नाहीं. मग प्रश्न पुढें येतो तो हा कीं कल्पन-प्रक्रियेचा पाया कोणता ? कशानें रचनात्मक कल्पकतेचा विकास घडून येतो ? या प्रश्नाचें उत्तर शोधण्यापूर्वी बालकांत प्रकर्षानें आढळणाऱ्या कल्पनाविलासाबाबत मॉंटेसरींचा जो अभिप्राय आहे, त्याबद्दल चर्चा करणें जरुरीचें वाटतें.

मनाच्या विकासांत तरंगी कल्पनपक्रियेचें काय महत्त्व आहे हें मनोविश्लेषणवाद्यांना विचारलें पाहिजे. पण त्यांना विचारण्याआधीं मॉंटेसोरींची यासंबंधींची बाजू जरा तरी विशद करून समजून घेण्याचा प्रयत्न करूं. मॉंटेसोरींचें म्हणणें असें कीं बालकांना आपण त्यांचें स्वतःचें असें वास्तविक वातावरण देत नसल्यामुळें मुलें कल्पनेचा भ्रम निर्माण करतात. एक मॉंटेसोरियन म्हणतो, " The fantasy of the game was a wrapping, an excuse which can now be dispensed with. Thus imaginative games of 'House' involve 'House work' and when the house work was provided per se the pretence house vanisahed and the real work about the real house takes its place' बालकांच्या लुटुपुटीच्या खेळांत अतृप्त इच्छांची तृप्ति तद्‌विषयक तरंग रचून पूर्ण करण्याचा प्रयत्न असतो हें कोणालाहि कबूल करावें लागेल. मोठ्यांच्याप्रमाणें कामाचीं खरीखुरीं साधनें व खरीखुरीं कामें



दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.
फॅक्टरी व हेडऑफिस :— चेंबूर, मुंबई नं. ३८.
—: स्थानिक शाखा :—
ठाकुरद्वार, काळबादेवी, परेल व दादर

आवडतात हेंहि खरें आहे. परंतु खरीखुरीं साधनें आणि खरीखुरीं काम बालकांना दिल्यामुळें लुटपुटुचीं साधनें व लुटुपुटीचीं नाटकें मुलांना आवडणार नाहींत किंवा त्यांच्या जीवनांत त्यांची मुळींच आवश्यकता रहणार नाहीं हें म्हणणें बरोबर नाहीं. 'वास्तविक' घर मिळालें म्हणजे 'भ्रामक' घर गेलेंच पाहिजे हें खरें नाहीं. कदाचित् भ्रामक घर गेलेंहि असेल, पण तें 'खरें' आल्यानें गेलें हा तर्क बरोबर नाहीं. कारण बालमनाचा जसजसा विकास होतो, जसजशी मनापुढील अडचणी सोडविण्याची त्याची धमक वाढतें, तसतशीं त्याचीं लुटुपुटीचीं नाटकें आपोआप जातात. तीं रहाण्याचीं कारणें नाहींशीं झालीं नाहींत तर 'खऱ्या' घरांतहि 'लुटुपुटीचीं नाटकें' मूल सुरू करणार नाहीं याची खात्री काय?

प्रसिद्ध लेखिका एथिल मेनिन म्हणते, 'The chief need of childhood is freedom to live out its fantasy life.'

'The Montessiori apparatus is bad psychologically because being pedagogic it curbs fantasy...All childhood is playhood and all schools that believe otherwise are suppressors of the child. And because our schools in the past have been such suppressors we adults remain children at heart.'

बालकांत केव्हां केव्हां प्रकर्षानें आढळणारा कल्पनाविलास वास्तविक जगाच्या धकाधकींत मनाचा समतोलपणा टिकविण्याचें एक प्रभावी स्वयंनिर्भर असें साधन आहे, अशी आजच्या मानसशास्त्राची त्यासंबंधीं कल्पना आहे. जीवनपरिस्थिति कितीहि वास्तविक आणि परिपूर्ण असली तरी मनाची धांव पुढेंच असते व त्यासाठीं पुन्हां कल्पनेचा तें आश्रय घेतें. कल्पनाविलास हें विफलतेच्या परिस्थितींत मनाचा तोल टिकविण्यासाठीं निसर्गाचें स्वयंगतिक साधन आहे. तिचें स्थान मॉटेसोरींनीं शाळेंतून काढून टाकलें, तरी घरोघर मुलें लुटुपुटीचे खेळ व नाटकें खेळतातच. शाळेंतहि तीं खेळतातच. त्याकडे शिक्षकानें दुर्लक्ष केल्यानें मुलांचें कांहीं बिघडत नाहीं; परन्तु शिक्षकाने बालजीवनाचें रहस्य समजण्याचें एक प्रभावी साधन हातचें गमावल्यासारखें होईल. बालकांच्या जीवनांत अनेक प्रकारचे भावनात्मक प्रश्न त्यांच्या रोजच्या व्यवहारांत निर्माण होतात. या त्यांच्या प्रश्नांचा त्यांच्या मनावर कधीं कधीं इतका ताण असतो कीं त्यामुळें मूल अस्वस्थ असतें. त्यांच्या या अस्वस्थतेंतून तीं स्वःतच आपला मार्ग या लुटुपुटीच्या आणि भातुकलीच्या खेळांचा आश्रय घेऊन काढीत असतात. या त्यांच्या भावनांना वाट करून न देण्यानें शिक्षणाचें कार्यच नीटपणें होऊं शकणार नाहीं. म्हणून बालकांचें भावनात्मक जीवन समजण्यासाठीं त्यांच्या जीवनांतील गरजांचा परिचय करून घेण्यासाठीं व त्याचप्रमाणें त्यांना त्यांच्या जीवनाचें समाधान मिळण्याचा अवकाश करून देण्यासाठीं आपण बाहुलीघराच्या खेळाला यथायोग्य स्थान देणें जरुरीचें समजतों.

बाहुलीच्या खेळासंबंधीं जें कांहीं खरें आहे तीच गोष्ट पुराण आणि परीकथांसंबंधीं आहे. बालकांना स्वतंत्रता दिली तर त्यांना पुराण किंवा परीकथा नेहमींच आवडतात असें नव्हे. परीकथा तीं ज्या तन्मयतेनें ऐकतात, त्याच तन्मयतेनें तीं विज्ञानकथाहि ऐकतात. बाहुलीच्या घराचा खेळ त्यांना जसा हवा तेव्हां खेळतां येतो तशी गोष्टींची स्थिति नाहीं. गोष्टी ऐकण्यासाठीं त्यांना शिक्षकाची अनुकूलता पहावी लागते. निरनिराळ्या बालकांच्या गोष्टीबाबतची आवड निरनिराळी असते. आपल्या आवडीच्या गोष्टींपासून त्यांना दूर ठेवावें किंवा काय या प्रश्नाचें उत्तर निर्णायक रीतीनें सर्व बालकांसाठीं सारखेंच देतां येणार नाहीं. परंतु अशा तऱ्हेच्या गोष्टी सर्व दृष्टीनें निरर्थक असतात असें म्हणणें बरोबर नाहीं. याबाबतींत मॉटेसोरींचें म्हणणें ऐकलें तर रॉसनें म्टल्याप्रमाणें जगांतील अत्युत्तम लोकसाहित्यापासून व बालसाहित्यापासून बालकाला वंचित ठेवण्याचा प्रसंग येईल.

आतांपर्यंतच्या सर्व विवेचनावरून कल्पन–प्रक्रियेच्या बाबतींत मॉटेसोरीचीं मतें आपल्याला फारशीं उपयोगी पडण्याची शक्यता नाहीं. तेव्हां या बाबतींत बालमानसशास्त्र, जगांतील विविध देशांचा अनुभव आणि आपली स्वतःची प्रतिभाशक्ति यांचा आपल्याला उपयोग करावा लागेल. त्या दृष्टीनें पूर्वप्राथमिक संस्थेच्या आपल्या सध्यांच्या कार्यक्रमांत फेरफार व्हावेत यासंबंधीं मला ज्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात त्यांची कल्पना पुढील अंकीं देईन.

(अपूर्ण)

ना.

नूतन बालशिक्षण संघाची वैचारिक प्रणालिका

१९२६ सालीं जेव्हां नूतन बालशिक्षण संघ स्थापन झाला तेव्हां संघाच्या बालशिक्षणाचें स्वरूप शुद्ध मॉंटेसरी पद्धतीचें होतें. तें तसेंच असलें पाहिजे असा संघ संस्थापक स्व.गिजुभाईंचा कटाक्ष होता व संघाची सुरवातहि त्यांनीं मॉंटेसरी संघ असे नांव देऊनच केली होती. स्व. गिजुभाईंच्या निधनानंतर मॅडम मॉंटेसरी जेव्हां आपल्या देशांत आल्या तेव्हां त्यांचेकडून या नांवाला प्रोत्साहन मिळण्याची शक्यता दिसल्यामुळें संघानें **'नूतन बालशिक्षण संघ'** हें नांव धारण केलें. नामकरण झाल्यानंतर लगेच संघाची घटना बनवण्यांत आली व तींत आपल्या देशांतील बालकांच्या सर्वांगी विकासाला पोषक होईल अशा प्रकारचें स्वरूप देणें असा संघाचा व्यापक उद्देश निश्चित करण्यांत आला. संघाला घटना मिळाल्यापासून बालशिक्षणाच्या बाबतींत स्वतंत्र विचाराच्या दिशेनें संघानें पाऊलें टाकण्यास सुरवात झाली.

१९४० मध्यें भावनगर येथें गिजुभाईंच्या निधनानंतर श्री. जुगतरामभाई दवे यांच्या अध्यक्षतेखालीं जें पहिलें संमेलन भरलें त्यांत संघानें ग्रामीण प्रदेशांत बालशिक्षणाचा प्रचार करण्याचा एक नवीन उद्देश जाहीर केला. १९३६ मध्यें बेसिक शिक्षणविषयक आपले विचार गांधीजींनीं प्रकट केले. त्या विचारांचें एक आंदोलन त्यावेळीं सुरू झालें. त्याचा प्रभावही संघाच्या शिक्षणविषयक विचारावर पडत होता. यामुळें संघाच्या वैचारिक भूमिकेंत गांधीजींच्या विचारांची निष्ठा वाढत गेली. १९४५ मध्यें जेव्हां स्व. गिजुभाईंच्या सहकारी श्रीमती ताराबाईंनीं ठाणें जिल्ह्यांतील बोर्डी या गांवीं जाऊन ग्रामबालशिक्षा केंद्राची स्थापना केली; त्याच्यामागें गांधीजींची प्रत्यक्ष प्रेरणा श्रीमती ताराबाईंना मिळाली होती. या ग्रामीण बालकांच्या शिक्षणाचा विचार आणि विस्तार करीत असतां गिजुभाईंनंतर संघाच्या मंत्रिपदावर आलेल्या श्रीमंती ताराबाईंनीं मॉन्टेसोरी आणि गांधीजींच्या विचारांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. संघाच्या माजी कार्याध्यक्ष श्रीमती सरलादेवी यांच्या विचारांतहि मॉन्टेसोरी आणि गांधीनिष्ठा सुरवातीपासूनच होती. संघाचा एक क्रियाशील कार्यकर म्हणून माझें सर्व बालशिक्षणासंबंधींचें शिक्षण मॉन्टेसरी पद्धतीच्या आधारानें स्व. गिजुभाईजवळ आणि नंतर प्रत्यक्ष मॅडम मॉन्टेसरींजवळ झालें. गांधीयुगाचा प्रभाव माझ्यावरही पडत होता. त्यामुळें श्रीमती ताराबाई किंवा श्रीमती सरलादेवीप्रमाणेंच मझ्या मनांत मॅडम मॉन्टेसरी आणि गांधींजींची अशा दोन निष्ठा उत्पन्न झाल्या. सुरवातीला मला ह्या दोन थोर व्यक्तींच्या विचारांत फार साम्य आहे असें वाटलें; परंतु यासंबंधीं मी जसजसा अधिक विचार करूं लागलों तसतशा मॉन्टेसरी पद्धतींतील कांहीं गोष्टी मला बालमानसशास्त्राशीं विसंगत असल्याचें आढळून येऊं लागलें.

गेल्या तीन चार वर्षांत यासंबंधीं मी माझे विचार शिक्षण पत्रिकेंत व्यक्त केले आहेत. संघांतील कित्येक मित्रांना माझें वळण बरोबर वाटलें नाहीं. याचा एक परिणाम हा झाला कीं संघाच्या चालू विचारांपासून ज्यांचे विचार निराळे झाले आहेत ते एकमेकांना कळावे म्हणून संघानें १९५७ पासून चर्चापरिषद योजायला सुरूवात केली आहे. पहिली चर्चापरिषद ग्राम बाल-शिक्षा केंद्र बोर्डी येथें १९५५ च्या नोव्हेंबर महिन्यांत योजण्यांत आली होती; परंतु संघाचे निवडक कार्यकर्ते एकत्र येऊन त्यांनीं तीनचार दिवव एकत्र राहून शांतपणें विचार विनिमय करावा ही कल्पना संघाच्या वैचारिक विकासाच्या दृष्टीनें सर्वांनाच चांगली वाटली. गेल्या संमेलनांत ज्या कांहीं मुख्य मुद्यांचा जो विचार झाला त्याचा सारांश श्री. ताराबाई मोडक यांच्यांच शब्दांत येथें थोडक्यांत मांडतो. या परिषदेच्या अध्यक्ष श्रीमती ताराबाईच होत्या.

या परिषदेंत मॅडम मॉन्टेसरींचें संघांत स्थान कोणतें असावें हा प्रश्न प्रथम चर्चेसाठीं निघाला. यासंबंधीं सर्व कार्यकर्त्यांनीं एकमतानें पुढील अभिप्राय व्यक्त केला.

'संघाच्या आद्यसंस्थापकांना प्रेरणा देणार म्हणून मॅडम मॉन्टेसरींचें स्थान असलें पाहिजे, तरी देखील स्वतंत्र विचार, प्रयोग आणि फेरफारांना संपूर्ण अवकाश ठेवला पाहिजे.'

(२) संघाच्या बालमंदिरांचें शैक्षणिक धोरण

संघाशीं संलग्न असलेल्या बालमंदिरांत मॉन्टेसरी पद्धतीचें चार सिद्धांत (१) स्वातंत्र्य (२) स्वयंस्फूर्ति (३) व्यक्तिगत शिक्षण (४) त्याचप्रमाणें या पद्धतीचें इंन्द्रियशिक्षण, भाषा, गणिताचीं सर्व साधनें मान्य करीत आहोंत; यामुळें संघाचीं बालमंदिरें हीं मॉन्टेसरी पद्धतीच्या धोरणानें चाल-णारीं on the montessori lines आहेत असें समजावें. परंतु त्यांना मॉन्टेसरी बालमंदिरें म्हणूं नयेत. त्याचप्रमाणें आपण देत असलेल्या प्रमाणपत्रांत शिक्षकांना मॉन्टेसरी शिक्षक असें संबोधूं नये. हा फरक दर्शवण्याचा हेतु हा कीं मॉन्टेसरी पद्धतीचा संपूर्णपणें अवलंब करणें अशास्त्रीय आणि वैचारिक प्रगतीला हानिकारक आहे. ए. एम्,

आय. आणि आपल्या संस्थांचा घोटाळा होऊं नये म्हणून नांवाच्या बाबतींत आपण निश्चित राहिलें पाहिजे.

(३) मॉंटेसरी साधनांचा उपयोग

आपण जर इंद्रियशिक्षण, भाषा आणि गणिताचीं साधनें वापरतो तर ती मॅडम मॉंटेसरींनीं दर्शविल्याप्रमाणें पद्धतशीर वापरलीं जाण्याचा आग्रह बाळगला पाहिजे. या साधनांत कांहीं फेरफार करावयाचे असतील तर ते फेरफार बालअध्यापन नियंत्रण मंडळाची मान्यता घेऊनच केले पाहिजेत. मान्यता मिळालेल्या फेरफारांना शिक्षण-पत्रिकेंत प्रसिद्धि दिली पाहिजे. त्याचप्रमाणें संघाशीं संलग्न अशा अध्यापन मंदिरांना वेळेवर कळविलें गेलें पाहिजे.

(४) ग्रामीण विभागांतील बालवाड्यांच्या साधनांबाबत

(अ) इंद्रियशिक्षण, भाषा, गणिताचीं साधनें वापरावयाची असतील तर ती शास्त्रीय पद्धतीनें वापरलीं पाहिजेत.

(आ) ग्रामीण विभागांतील साधनांच्या बाबतींत आपण गांधीजीनीं घालून दिलेले तीन नियम बंधनकारक मानले पाहिजेत.

(इ) शिक्षकांनीं स्वतः साधनें बनवावीत. शिक्षकाला तीं बनवितां न आलीं तर स्थानिक कारागिरांची मदत घ्यावी. हीं साधनें स्थानिक मिळणाऱ्या वस्तूंचीच बनवावींत. ग्रामीण बालवाड्यांत आपल्या अज्ञानामुळें किंवा आर्थिक अडचणीमुळें आपण साधनें घेऊं न शकलों तर ते आपल्या देशाच्या आर्थिक स्थितीमुळें चालवून घेतो असें समजावें. पण साधनांची जरूर नाहीं असें समजूं नये. उलट गरीब आणि मागासलेल्या भागांतील बालकांची बुद्धि कसली जावी आणि अनुभवाची सूचना मिळावी म्हणून साधनांची जरूर अधिक आहे ही हकीकत आहे हें विसरूं नये.

(५) जेथें पद्धतशीर इंद्रियशिक्षणाचीं साधनें नसतील

तेथें प्रसंगविशेषीं शिक्षकांनीं त्या त्या गोष्टींकडे बालकाचें लक्ष वेधावें...परंतु या प्रकारें उपयोगांत आणलेल्या, वस्तूंना इंद्रिय शिक्षणाचीं साधनें समजूं नयेत. त्यांचा कांहीं अंशीं उपयोग करावा इतकेंच.

(६) लेखन-वाचन गणित शिक्षण

जेव्हां मूल इंद्रियशिक्षण होऊन स्नायुगत हालचालींचें नियमन शिकल्यानंतर लेखनवाचनबाबतचें बालकांचें वळण दिसल्यास अक्षरें आणि अंक जरूर द्यावें. परंतु हें शिक्षण स्वेच्छेनें स्वानुभवानें व कोणत्याहि प्रकारची घाई न करतां झालें पाहिजे.

नेल्या वेळच्या चर्चापरिषदेचे हे सर्वच्या सर्व निष्कर्ष जर संघाच्या शैक्षणिक धोरणासंबंधींचे नियम बनविले तर त्यामुळें संघाच्या सभासदांच्या विचार आणि आचार स्वातंत्र्याची किती गळचेपी होईल याची मला कल्पना करतां येत नाहीं. गेल्या वेळच्या परिषदेनें ठरावाच्या रूपानें केलेल्या निष्कर्षांशीं मी सहमत होऊं शकत नाहीं. परिषदेंतहि माझा या प्रकारच्या निष्कर्षांला विरोध होताच; परंतु केवळ बहुसंख्येच्या मतावर जर हे निष्कर्ष काढले गेले म्हणून ते संघाच्या कार्यकर्त्यांना बंधनकारक असतील तर संघांत अल्प संख्यांकांच्या विचाराला कांहीं स्थानच राहणार नाहीं.

शिक्षणासंबंधींच्या निर्णयाला राजकीय निर्णयाप्रमाणें स्वरूप देणेंच मला चुकीचें वाटतें. माझीं स्वतःची संघांत सोय करून घेण्याच्या दृष्टीनें मी बोलत नसून कोणत्याहि नवविचार-काला यामुळें संघाचें द्वार बंद होईल. त्यामुळें संघाचा विकास होईल असें मला प्रामाणिकपणें वाटत नाहीं. चर्चापरिषदेंत कोणीहि आपले विचार दुसऱ्यावर लादण्यासाठीं येत नाहीं. आपले विचार विषद करण्यासाठीं, त्यासंबंधीं दुसऱ्याची प्रतिक्रिया समजून घेण्यासाठीं चर्चापरिषद असली पाहिजे. येथें प्रत्येकाच्या विचाराला अवकाश मिळाला पाहिजे. मग तो विचार बहुसंख्यांकांचा असो की अल्पसंख्यां-कांचा असो. जो कांहीं विचार येथें व्यक्त होत असेल त्याच्या मुळाशीं बालकनिष्ठा आहे किंवा नाहीं एवढेंच संघानें पाहिलें पाहिजे.

चर्चापरिषद ही चर्चेसाठीं आहे. त्यांतून प्रत्येकानें आपल्या उपयोगी पडेल तेवढें घ्यावें व आपल्या स्वतःच्या निष्ठेप्रमाणें बालशिक्षणाचें कार्य करावें अशी स्वतंत्रता संघाच्या प्रत्येक व्यक्तीला मिळणें जरूरीचें आहे. चर्चेंत काढण्यांत आलेले निष्कर्ष असेच असावेत कीं त्यामुळें व्यक्तीच्या विचारस्वातंत्र्याला बाध येऊं नये. या बाबतींत आपण दूरदृष्टीनें विचार करावा अशी माझी परिषदेला विनंति आहे.

पहिल्या चर्चा-परिषदेनें काढलेल्या कित्येक निष्कर्षांशीं मी सहमत होऊं शकत नाहीं हें आपल्या लक्षांत आलेंच आहे. तथापि त्याची पुनः स्पष्टता करतो.

संघ संस्थापकांच्या प्रणेत्या म्हणून संघांच्या कार्यकर्त्यांनीं मॉंटेसरीना जें सन्मानाचें स्थान दिलें आहे आणि त्याबरोबर विचार-स्वातंत्र्याला संपूर्ण अवकाश रहावा म्हणून जी अपेक्षा

व्यक्त केली आहे ती संघाच्या प्रगतीला उपकारकच आहे. या पहिल्या निष्कार्षांशिवायचे बाकीचे निष्कर्ष बारकाईनें तपासले तर त्यांत संघ-मनाची एक प्रकारची अनुकंपनीय अशी स्थिति आढळते. संघाला शंभर टक्के मॉंटेसरीचा अवलंब करण्यांत अशास्त्रीयता आणि वैचारिक दृष्टीनें हानिकारक वाटतें. परंतु मॉंटेसरीपद्धतींतील कोणत्या गोष्टी नकोत यासंबंधीं संघ-मनाची स्पष्टता दिसत नाहीं. मॉंटेसरी पद्धतीचीं इंद्रियशिक्षण, भाषा, गणितादि साधनें शास्त्रीय आहेत म्हणून त्यांचा उपयोगहि मॉंटेसरींनीं सुचविलेल्या तंत्राप्रमाणेंच झाला पाहिजे असा संघाचा आग्रह आहे. ग्रामीण भागांत ही साधनें आर्थिक अडचणीमुळें घेतां न येणें किंवा ग्रामशिक्षकांना त्यांच्या अज्ञानामुळें उपयोग न करतां येणें या परिस्थितीचा फायदा घेऊन या साधनांची जरूरी नाकारणें योग्य नाहीं, असें संघानें बजावून हीं साधनें ग्रामीण प्रदेशांच्या मागासलेल्या परिस्थितींत अधिकच अनिवार्य आहेत असा निष्कर्ष एकीकडे काढला आहे. शिक्षकानें ग्रामीण प्रदेशांतील स्वाभाविक परिस्थितीचा उपयोग करून घेतला तर तें इंन्द्रियशिक्षण शास्त्रीय नव्हे असें सांगून टाकलें आहे. त्याचप्रमाणें गणित, भाषा वगैरे विषयांचा अनुबंध शिक्षकांनीं मूलोद्योगाशीं घातला तर तें बरोबर होणार नाहीं. कां ? तर संघानें भाषा व गणिताचें शिक्षण Sensorial Experience मार्फत करणाऱ्या मॉन्टेसरी पद्धतीचा स्वीकार केला आहे म्हणे. लेखनवाचनादि विषयांत मॉन्टेसरी इंद्रियशिक्षण आणि पुरता स्नायुविकास होऊन मुलांचें वळण दिसल्यास अक्षरें व अंक मुलांना जरूर द्यावेत असें संघानें सुचविलें आहे. सारांश—

(१) इंद्रिय शिक्षणासाठीं मॉंटेसरी साधनें अनिवार्य आहेत.

(२) लेखन, वाचन, गणित यांचा अंतर्भाव पूर्वप्राथमिक शिक्षणांत करावा.

हे दोन निर्णय गेल्या वेळच्या चर्चा परिषदेनें घेतले आहेत. या दोनहि निष्कर्षांशीं मी सहमत होऊं शकत नाहीं.

प्रचलित पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांतून इंद्रिय-शिक्षणासाठीं चालू असलेल्या मॉंटेसरी साधन योजनेच्याद्वारें इंद्रिय शिक्षण तर होत नाहींच, परंतु या साधनाबाबतच्या निदर्शन तंत्राबाबतच्या विधिनिषेधामुळें बालकांच्या आणि बालशिक्षकांच्या सर्जन शक्तीला धोका उत्पन्न झाला आहे असें मला वाटतें. म्हणून ह्या साधनांना सामान्य खेळाच्या साधनापलीकडे महत्त्व देऊं नये. त्याच प्रमाणें लेखन-वाचन आणि गणित विषय शक्यतों लवकर करणें हा जो या पद्धतीचा विशेष सांगण्यांत येतो तो बालकांच्या विकासाला अपकारक असल्यानें या विषयाचें शिक्षण पूर्वप्राथमिक संस्थेंत प्रत्यक्षपणें सामान्यतः होऊं नये. या प्रकारें मॉंटेसरी पद्धतीवर चाललेल्या आपल्या बालमंदिरांतून मॉंटेसरी पद्धतीचें इंद्रिय शिक्षण, भाषा आणि गणित विषयांचीं साधनें गेल्यावर मॉंटेसरी पद्धतीचा कोणता भाग शिल्लक रहातो असा प्रश्न पुढें येतो. संघाच्या शिक्षणविषयक मूलभूत निष्ठेवरच हा प्रहार आहे असें कित्येकांना वाटेल. परंतु वस्तुस्थिति तशी नसून मॉंटेसरी पद्धतीच्या अनेक गोष्टींना संघाच्या शिक्षणविषयक विचारांत स्थान रहावें असें मला वाटतें.

जगाच्या शिक्षणशास्त्राच्या इतिहासांत मानवाच्या ठिकाणीं असलेल्या आत्मोद्धारक प्रेरणेचें अस्तित्त्व भारतीय आणि ग्रीक तत्त्वज्ञानांना समजलें होतें. युरोपियन शिक्षणेतिहासांत रूसोनें या आत्मोद्धाराच्या प्रेरणेच्या रक्षणासाठीं शैक्षणिक स्वातंत्र्याच्या सिद्धांताचा अत्यंत अभिनिवेशानें पुरस्कार केला. परंतु रूसोच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेंत विधायक विचार नव्हता. त्यांच्या वेळेला धर्मगुरुंनी शिक्षणतंत्राचें जें अवडंबर माजविलें होतें तें नाहींसें करा, बालकाचें दहाबारा वर्षांपर्यंतचें शिक्षण निसर्गावर सोंपवा, निसर्गाच्या सान्निध्यांत जे कांहीं स्वाभाविकपणें होईल, तें करा, अशी रूसोची शिकवण होती. रूसोनंतर त्याच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेला विधायक अर्थ देण्याचें कार्य



सुगंधित झरणपासून बनणारें तेल

आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.



१. गळणारे केंस थांबविते व केसांना तुकतुकीत बनविते.

२ मेंदूला पोषक तत्त्व पुरविते.

३. श्रम, वेळ व पैसा वांचविते.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M. P. S 9

करून बालकाच्या अभ्यासासाठी शिक्षणसंस्थेला प्रयोगशाळा बनविण्याचें, या प्रयोगशाळेंत बालकाच्या विकासाला अनुकूल अशा स्वातंत्र्याच्या कल्पनेला मूर्तस्वरूप देण्याचें आणि शिक्षणांत विद्यार्थ्यांच्या मनाच्या अभ्यासाचें महत्त्व पटवून शिक्षकाला जो मानसशास्त्र दृष्टिकोण मॅडम मॉंटेसरींनीं दिला त्यामुळें जगांतील थोर शिक्षकांत त्यांना स्थान निर्माण झालें आहे. मानवी बालकाचें शिक्षण त्याच्यासाठीं तयार केलेल्या आदर्श प्रयोग शाळेच्याद्वारें किती होऊं शकतें या संबंधींच्या जितक्या विविध साधनयोजना मॉंटेसरींनीं मांडल्या तितक्या विगतवार योजना क्वचितच एखाद्या शिक्षणतज्ञानें जगापुढें मांडल्या असतील.

इंद्रियशिक्षण साधनांच्या योजनांत त्याच्या साधनांमुळें इंद्रियशिक्षण होतें हा त्यांचा दावा जरी कोणी स्वीकारूं शकत नसलें तरी संवेदनीय कक्षेवर तुलना करण्यासाठीं, क्रम लावण्यासाठीं किंवा संवेदनाविषयक सूक्ष्म निर्णय करण्यासाठीं बालकाला कसा अवकाश करून देतां येतो, याचें जें मॉंटेसरींनीं तंत्र विकसविलें आहे त्याचा बालशिक्षणांत नेहमींच उपयोग केला जाईल असें मला वाटतें.

मॉंटेसरी पद्धतींत प्रथम साधन आणि नंतर जीवनानुभव असा जो क्रम येतो तो नवीन मानसशास्त्राला उलटा वाटतो. गांधीजींच्या विचारांत प्रथम जीवनानुभवावर जो भर देण्यांत आला आहे त्यामुळें ज्ञानाच्या विकासाला उत्तम हेतुप्रेरण मिळतें; एवढेंच नव्हे तर ज्ञानाच्या प्रक्रियेंतील अत्यंत महत्वाची गणली गेलेली अमूर्तकरणाची abstraction ची प्रक्रिया स्वाभाविकपणें होऊं शकते. मॉंटेसरी पद्धतींत साधनांच्याद्वारें बालमनाची पूर्वतयारी करण्यावर जो भर देण्यांत आला आहे तो अस्वाभाविक वाटतो.

गेल्या वेळच्या चर्चा-परिषदेंत बालशिक्षकानें परिस्थितीच्या द्वारे इंद्रियशिक्षण करून घेतल्यास तें इद्रियाशिक्षण होणार नाहीं असा जो अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे त्याला शास्त्रीय आधार सांपडावयाचा नाहीं. खरें इंद्रियशिक्षण हें व्यक्तीच्या व्यापक अनुभवांतूनच होऊं शकतें याचा आपल्याला विसर पडूं नये. ग्रामीण किंवा नागरिक शिक्षक आपापल्या परिस्थितींतून मॉन्टेसरी तंत्राचीं साधनें सहज निर्माण करूं क्षकतो. तशीं साधनें बोर्डीं शिशु-विहार व इतर ठिकाणीं शिक्षकांनीं निर्माणहि केली आहे. त्यावर अशास्त्रीयतेचा शिक्का आपण कशाच्या आधारें मारायचा हें मला समजत नाहीं.

मॉंटेसरींनीं बालशिक्षणाचा जसा मानसशास्त्रीय दृष्टिकोन दिला त्याप्रमाणेंच त्यांनीं बालशाळेंत जीवनव्यवहाराचीं साधनें योजून बालशाळेला खरोखरच्या बालघराचें स्वरूप दिलें. शिक्षणांत खऱ्याखुऱ्या जीवनव्यवसायाला स्थान देण्याचें त्यांनीं जें कार्य केलें आहे, त्याचा शिक्षणांत उत्तरोत्तर विकास होत राहील असेंच तें आहे. या जीवनव्यवसायाबरोबरच व्यक्तिगत स्वयंसूचक साधनांचें तंत्र जें मॉंटेसरींनीं विकसविलें आहे त्यामुळें शालेय शिक्षणांत स्वयंस्फूर्त व्यक्तिगत शिक्षणाला महत्त्वाचें स्थान मिळेल यांत शंका नाहीं. बालमंदिरांतील बालकांच्या आविर्भावाचें रक्षण व्हावें म्हणून त्यांनीं शिक्षकाच्या भूमिकेंत जो बदल सुचविला त्याचप्रमाणें शालेय शासनांत आणि अभ्यासासाठीं शिक्षाबक्षिसाचा जो निषेध त्यांनीं सुचविला आहे, तो सामान्यतः शिक्षणाला स्वीकारावाच लागेल असा आहे. बालभोग्य साधनांचें त्यांनीं जें तंत्र दिलें त्यांतील कांहीं गोष्टी शिक्षणांत कायमचें स्थान प्राप्त करतील अशा आहेत. उदा० व्यक्तिगत शिक्षण कसें करतां येतें त्यासंबंधींचें त्यांनीं जें तंत्र विकसविलें आहे तें शिक्षणसंस्थांना नेहमीं अनुकरणीय राहिल असें आहे.

मॉंटेसरी पद्धतींतील हीं सर्वमान्य होणारीं तत्वें संघाच्या कार्यपद्धतींतहि कायमचीं रहाण्यासारखीं आहेत असें मला वाटतें. परंतु त्यांचा अवलंब करतांना शिक्षणसंस्थांनीं मॉंटेसरी तंत्राच्या मर्यादाहि नीटपणें समजून घेणें आवश्यक आहे. स्वातंत्र्य आणि स्वावलंबनासारख्या गोष्टींतदेखील संघानें त्यांचा स्वीकार केला आहे असें म्हणणें वस्तुस्थितीला धरून होणार नाहीं. स्वातंत्र्याचा सिद्धांत सनातन आहे त्याचा कोणालाहि अस्वीकार करतां येणार नाहीं; परंतु या स्वातंत्र्याला किंवा स्वावलंबनाला मॉंटेसरींनीं जो व्यावहारिक अर्थ दिला आहे तो सर्वांना मान्य होण्यासारखा नाहीं. स्वातंत्र्य सार्थ करण्यासाठीं मॉंटेसरींनीं जो साधनासंबंधींचा तंत्रवाद वाढविला तो अनिष्ट आहे. रचनात्मक कल्पना विकासाच्या हव्यासांत मॉन्टेसोरी तंत्रांत बालकांच्या भावनात्मक जीवनाकडे दुर्लक्ष झालें आहे. याप्रकारचें मॉंटेसोरीचें एकांगी स्वातंत्र्य स्वीकारणार आहोंत का हा बालकाच्या विकासाच्या दृष्टीनें महत्वाचा प्रश्न आहे. जी गोष्ट स्वातंत्र्याची तीच गोष्ट स्वावलंबनाची. स्वावलंबनाचा सिद्धांत सनातन आहे. पण त्याच्या शैक्षणिक प्रमेय परिस्थितींत काय मर्यादा आहे याची सूक्ष्म चर्चा झाली पाहिजे. व्यक्तिगत शिक्षण, व्यक्तिगत साधनें, शिक्षा, बक्षिसें यासंबंधींच्या सर्व विचारांबाबत प्रगतजगांत अधिक सूक्ष्म विचार झाला आहे, तो आपण ध्यानांत घेतला पाहिजे. यांत्रिकपणें हे सिद्धांत स्वीकारले आहेत अशी मान्यता देण्यांत काय अर्थ आहे?

मॉंटेसरी पद्धतींतून कोणतें कसें ग्राह्य समजावें याबाबतींत थोडीशी चर्चा केल्यानंतर आपण बेसिक शिक्षणासंबंधीच्या विचारांतून संघानें काय घेण्यासारखें आहे यासंबंधींचा थोड्क्यांत विचार करूं या.

(पान १६ वर पहा)

नूतन बाल शिक्षण आणि संघ समाचार

मुंबई : दिनांक २ एप्रिल रोजीं नू. बा. शि. संघाच्या निवडून आलेल्या नवीन नियंत्रण मंडळाची पहिली सभा मुंबईला झाली. मंडळाच्या एकूण ५३ सभासदांपैकीं २३ सभासदांची उपस्थिति होती. उपस्थित सभासदांनीं सर्वानुमतें पुढील पदाधिकाऱ्यांची निवड केली. संघप्रमुख–श्री. मोरारजी देसाई–दिल्ली, उपप्रमुख श्रीमती ताराबाई मोडक,कार्याध्यक्षः श्री. जादवजीभाई मोदी भावनगर, कोषाध्यक्षः श्रीमती सौ. मालतीबाई पराजपे पुणें, मुख्यमंत्रीः श्री. शे. ना. नामले, उपमंत्रीः श्रीमति यशस्वति भट्ट अमदाबाद. व्यवस्थापक मंडळांतील आठ जागांसाठीं एकूण १२ उमेदवारांची नावें सुचविल्यामुळें गुप्तमतदान पद्धतीनें निवडणुक करण्यांत आली. तींत पुढील सभासद सर्वांत अधिक मतें मिळून निवडून आले. (१) डॉ. भी. नानुभाई देसाई, अमदाबाद (२) डॉ. श्रीमती लीलाबेन शाह, अमदाबाद (३) श्री. माणेकलाल ठाकर, अमदाबाद. (४) श्रीमती सौ. सरोजबेन योध, मुंबई (५) श्रीमती सौ. सरलाताई देवघर, मुंबई (६) श्री. प्रभुभाई उपाध्याय, मुंबई (७) श्रीमती सौ. कुसुमबेन शाह, सुरत (८) श्री. इश्वराचार्य, विसनगर.

मुंबई : नूतन बालशिक्षण संघाच्या नियंत्रण मंडळाची दुसरी बैठक अमदाबाद येथें जून दिनांक २१,२२ रोजीं होईल व तींत संघाचें नव्या वर्षाचें पक्कें अंदाज पत्रक सादर केलें जाईल. १९५७-५८ ऑडिटेड हिशोब सादर करण्यांत येतील असें कळतें.

बालविकास मंदिर, रेल्वे लाईन्स सोलापूर : १० जूनपासून ट्रेंड शिक्षिका नेमावयाच्या आहेत. कायम राहूं शकणारांना व मॅट्रिक ट्रेंडना विशेष पसंती. गरजूंनीं स्वत:ची पूर्ण-माहिती आणि पगाराची अपेक्षा कळवावी.

सोलापूर : येथील नूतन बालशिक्षण संघाच्या जिल्हा प्रादेशिकची सभा होऊन तींत कार्यकारिणी व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यांत आली. जिल्ह्यांत एकूण २२ सहायक सभासद नोंदले गेले असून पंढरपूर व अक्कलकोट आणि बारामती येथें संघाच्या स्थानिक शाखा करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

जिल्हा शाखेच्या कार्यकारी मंडळांत पुढील सभासदांची निवड करण्यांत आली आहे. (१) अध्यक्ष : शेठ रावजी देवचंद शाह (२) उपाध्यक्ष : मिस एम. हॅमॅकर एम्. बी.एच. किंडरगार्टन ट्रे. कॉलेज सोलापूर व श्रीमती सौ. सुमित्राबाई दातार M. A. (३) चिटणीस : श्री. ज. वा. केळकर. सभासद; (४) कु. कुसुम आराध्ये : शिशुविहार, पंढरपूर (५) श्रीमती सौ. मैनाबाई महेता शिशुविकास, अक्कलकोट (६) श्री. गणेश एन. वर्तक, सोलापूर (६) श्री. मुरलीधर जे. लोनकर, सोलापूर. आणखी तीन सभासद को–ऑप्ट करून घेण्याचें शाखेनें ठरविलें आहे.

बालविकास मंदिर विलेपार्ले : या संस्थेचा वार्षिकोत्सव दिनांक १२–४–५८ रोजीं डॉ. मोरेश्वर अनंत करंदीकर एम्. ए. पी. एच. डी. यांचें अध्यक्षतेखालीं साजरा झाला. या प्रसंगीं संघाचे मुख्य मंत्री श्री. शेष नामले यांचें बालशिक्षण व आजचें प्राथमिक शिक्षण या विषयावर लहानसें प्रवचनही योजण्यांत आलें होतें. संस्थेतील बालकांनीं आपले मनोरंजक कार्यक्रम अत्यंत उत्साहानें पार पाडले.

बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट पिलानी, राजस्थान : तीन स्त्री शिक्षिका पाहिजेत. मॅट्रिक ट्रेंड आणि हिंदीचें ज्ञान आवश्यक. पगार ६०–४–८०–५ E B १३० महागाई २० व ३०. ट्रेंड इंटरना पगार ७०-४–९०–५–१४० या शिवाय रहाण्यास कॉर्टर्सची सोय. योग्य उमेदवारास अधिक पगारही मिळूं शकेल. वरील संस्थेच्या सेक्रेटरींना लिहावें.

महिला विकास मंडळ : पो. पुरुलिया पश्चिम बंगाल सा. ई. रेल्वे; ट्रेंड शिक्षिका पाहिजे. कमींतकमी मॅट्रिक शिक्षण हिंदीचें ज्ञान आवश्यक. गरजूंनी कमलादेवी राठी यांस लिहावें.

बाल अध्यापन मंदिराचा नवीन अभ्यासक्रम : श्रीमती पाणंदीकर यांच्या अध्यक्षपदीं गेल्या वर्षी जी पूर्व-प्राथमिक शिक्षण–प्रशिक्षण अभ्यासक्रम समिति नेमण्यांत आली होती तिनें तयार केलेल्या बाल–अध्यापन मंदिरांच्या अभ्यासक्रमाला सरकारी मंजुरी मिळून तो जून १९५८ पासून मुंबई राज्यांतील सर्व बाल–अध्यापन संस्थांत सुरू करण्यांत येईल.

अभिप्राय व पोंच

'हा घोडा गाडीवाला' हा बालभोग्य गीतांचा संग्रह श्री. स. आ. केळकर यांच्या पूर्वप्राथमिक प्रकाशन लक्ष्मीबाग जोगळेकर वाडी शीव मुंबई २२ या संस्थेनें प्रकाशित केला असून त्याची किंमत ६५ नये पैसे आहे. या संग्रहांत शिशुविहार दादरच्या श्रीमती सौ. सरलाताई देवघर यांचीं निवडक वीस बालगीतें सचित्र करण्यांत आलीं आहेत. संग्रहाला प्रसिद्ध बालशिक्षणतज्ञ श्रीमती ताराबाई मोडक यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. त्यांत त्या लिहितात 'मुलांची सर्वपरीची भूक भागेल असे हें ताट श्रीमती सौ. सरलाताईंनीं आपल्या अठरा वर्षांच्या बाल सेवेनंतर तयार केलें आहे. त्यामुळें गीतांच्या मागें अनुभवाचें बळ आहे. ताल-प्राधान्य, बाल-भोग्य विषय आणि शब्द, गेयतत्त्व, नादमाधुर्य व सुबोधपणा हे सर्व गाण्यांचे विशेष आहेत.' सर्व बालमंदिरांकडून आणि बालगीत रसिकांकडून या संग्रहाचें स्वागत होईल व त्याबद्दल श्रीमती सरलाताईंना धन्यवाद देतील. किंमत, छपाई आणि साहित्य या सर्व दृष्टीनें विचार करतां हा संग्रह सर्वांना संग्राह्य वाटेल यांत शंका नाहीं.

—नामले

संघ आणि शिक्षण-पत्रिकेचे अधिकृत प्रचारक

श्री.स.आ.केळकर एम् एड्.प्रकाशक,पूर्वप्राथमिक प्रकाशन लक्ष्मीबाग, जोगळेकर वाडी शीव मुंबई २२ हे संघ आणि शिक्षण-पत्रिकेचे अधिकृत प्रचारक आहेत. शिक्षण पत्रिकेची वर्गणी त्यांचेकडे ग्राहकांस भरतां येईल. संघाच्या सभासदांची वर्गणी मात्र ज्यानें त्यानें आपल्या शाखेतच भरली पाहिजे. शे. ना. नामले

व्यवस्थापक : शिक्षण-पत्रिका

नूतन बालशिक्षक संघाची वै. प्रणालिका


(पान १४ वरून चालू)

मॉंटेसरी पद्धतींतून स्वातंत्र्याच्या शाळेला योग्य यंत्रणेची कल्पना आणि कांहीं सिद्धांत आणि साधनें संघाला मिळालीं; परंतु शिक्षण प्रणालिकेला नुसत्या तंत्राच्या उपयोगानें पूर्णता येऊं शकत नाहीं. शिक्षणाचा आधार ज्याप्रमाणें एका बाजूनें मानस शास्त्राचें अद्यावत् ज्ञान असतें, त्याचप्रमाणें दुसऱ्या बाजूनें त्याला प्रचलित समाजजीवनाच्या आदर्शांचाहि आधार मिळाला पाहिजे. बेसिक शिक्षण पद्धतीनें आपल्याला सामाजिक जीवनाची कांहीं मूल्यें मिळालीं आहेत. आपल्या देशांतील नवसमाज रचनेंतील दिशा ही बेसिक विचारांतील महत्त्वाची गोष्ट आहे. बेसिक पद्धतीच्याद्वारें जीं सामाजिक जीवनाचीं मूल्यें आपल्याला प्राप्त झालीं आहेत त्यांची चर्चा करण्याचें येथें कारण नाहीं. अहिंसा, सत्य, अस्तेयादि गुणाचा जो सामाजिक आदर्श गांधीजीनीं या देशाला घालून दिला आहे त्याच्या आसपास समाजाची उद्यांची नवरचना व्हावयाची आहे. बालशिक्षणाच्या कार्यपद्धतीसाठीं आणि दैनंदिन व्यवहारासाठीं ही गोष्ट किती मार्गदर्शक होऊं शकेल हें विशद करून सांगण्याची गरज नाहीं.

बेसिक पद्धतीबाबतचा दुसरा महत्त्वाचा विचार म्हणजे या पद्धतीनें जीवनाच्या तात्त्विक अभ्यासापेक्षां जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवाला जें स्थान दिलें आहे तें बालशिक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. इंद्रियशिक्षण, भाषा, गणित, भूगोल, विज्ञानादि विषयांच्या केंद्रस्थानीं प्रत्यक्ष जीवनानुभव असल्याशिवाय अनुबंधित न केलेल्या विस्कळित ज्ञानभांडाराला कांहीं महत्त्व नाहीं. पुस्तकें किंवा क्रियाशील साधनें याच्याद्वारें मिळणाऱ्या अनुभवापेक्षां सरळसरळ जीवनप्रवृत्तींचाच अनुभव बालकांस देऊन त्यांना पुस्तकें व साधनें यांची पूरक मदत चांगली होऊं शकते. शाळेच्या भौतिक व सामाजिक वातावरणाशीं सतत संपर्क ठेवून, समाजाच्या प्रश्नांच्या अनुसंधानांत ज्ञानाचें व क्रियांचे अनुबंध योजल्यास बालकाच्या ज्ञानाचा आणि क्रियाकौशल्याचा सर्वोत्तम विकास होऊं शकतो हें आपल्याला बेसिक पद्धतीनें कळलें आहे बेसिक पद्धतीच्या या तंत्राचें मानसशास्त्र व समानशास्त्र या दोन्हीं शास्त्रांनीं समर्थन केलें आहे.

मॉन्टेसरी आणि बेसिक पद्धतींतील ग्राह्य गोष्टी घेऊन जगांतील अन्य देशांत चाललेल्या अनुभवाचा आणि प्रयोगाचा लाभ घेऊन त्याचप्रमाणें आपली परिस्थिति लक्षांत घेऊन आपल्या पूर्वप्राथमिक शिक्षणाला संघानें स्वरूप द्यावें असें मला वाटतें.

—नामले


For Greatness & Grandeur
U S E
ASHOK
UNIQUE RAYON FABRICS
Sukhmills
V. CHATRABHUJ & CO. PRIVATE LIMITED


कॉलरा, झाडा, हगवण,
आंव, मुरडा, संग्रहणी
आंतड्याचे सर्व
प्रकारचे ताप
यावर अचूक गुणकारी
एकच
जालीम औषध
जीवन
मे. जीवन केमिकल वर्क्स
सर्व ठिकाणी मिळेल


प्लास्टिक
कटेनरतही
मिळतो


जीवन
DAIGAUM LABORATORIES
QUALITY
RELIABILITY
धनिकेश लेबोरेटरीज, ठाणे २६



सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी


रेमी

रेनॉ
व पाउडर



— सोल डिस्ट्रीब्युटर्स —
ए. व्ही. आर. ए ॲन्ड कं, मुंबई २

निराश का होता?



सफेद केसांमुळें चेहऱ्याला विद्रुपता येणें स्वाभाविक आहे पण तेवढ्यानें निराश होण्याचे मुळीच कारण नाहीं. लाखो लोकाप्रमाणें तुम्हीही लोमा वापरा व चेहऱ्याचे सौंदर्य कायम राखा.

लोमा

केसांना नैसर्गिकरीत्या काळेभोर करण्यासाठी जगभर मान्यता पावलेले.



सोल एजटस्
एम्. एम्. खंभातवाला. अमदावाद १.
एजंटस्. सी नरोतम ॲण्ड कं., मुंबई २ फो. ३०५७५

सुलेखा
पेन

संतोष कारक
कामासाठी



सोल डिस्ट्रीब्युटर्स —
पेनमेन्स ईंडस्ट्रीयल सर्व्हीसीझ
कांदीवली (मुंबई अेरिया डी)
लोकल सेल १०, शामसेट स्ट्रीट, मुंबई २.

मुद्रक व प्रकाशक:—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर—मुंबई १४.
मुद्रणस्थान:—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, कर्दळणी-निवास, पोरनाग रोड, दादर, मुंबई १४

नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ वें : अंक २ रा

मे १९५८



आचार आणि विचार

उंच चढल्याशिवाय दर्शन होत. नाहीं. आचार कांड बनलें तर दर्शन होत नाहीं म्हणून नेहमी ज्ञानचर्चा होत राहिली पाहिजे. तेव्हां चारी बाजूला विचार फांकतो. अगदींच कांहीं आचार नसला तर मग मनुष्याला दिशाच राहात नाहीं. म्हणून कर्मयोग पाहिजे. कर्मयोगानें दिशा लाभते. कर्मयोग नसेल तर वृत्ति स्वैर राहील. चित्त वावरून जाईल. म्हणून आपले विचार पुनः पुनः तपासायला पाहिजेत आणि विचारांची उंची वाढवायला पाहिजे.

विनोबाजी

: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक

संपादक

श्री. शेषं नाशले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई–१४.	३७ नये पैसे



सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी






— सोल डिस्ट्रीब्युटर्स —
ए. व्ही. आर. ए. अँन्ड कं., मुंबई २




सोल डिस्ट्रीब्युटर्स —
जेनसेन्स ईडस्ट्रीयल सर्व्हिसीझ
कांदीवली (मुंबई ऑस डी.)
रजिस्टर्ड सेल. 10, शामलेट स्ट्रीट, मुंबई २.

निराश वर्गा कोंता ?



सफेद केसांमुळें चेहऱ्याला विद्रुपता येणें स्वाभाविक आहे पण तेवढ्यानें निराश होण्याचे मुळीच कारण नाहीं. लांखो लोकाप्रमाणें तुम्हीही लोमा वापरा व चेहऱ्याचे सौंदर्य कायम राखा.




केसांना नैसर्गिकरीत्या काळेभोर
करण्यांसाठीं जगभर मान्यता पावलेले.




सोल एजंटस्
एम्. एम्. खंभातवाला. अमदावाद १.
एजंटस्: सी नरोत्तम ॲण्ड कं., मुंबई २ फो. ३०५७५

P PS-MAR.



"कान्ता, तुझ्या अभ्यासावद्दल कांहीं फारसें
बोलण्यासारखें नाहीं, परंतु तुझा युनिफॉर्म मात्र
टिनोपाल वापरल्यामुळें नेहमीं अतिशय
चमकदार पांढराशुभ्र असतो म्हणूनच
मी तुला वरच्या वर्गात घालतें."



"टिनोपाल" हा जे. आर. गायगी, एस. ए., बाल, स्वित्झरलंड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे

कारखानदार : सुहृद गायगी प्रायव्हेट लिमिटेड, वाडी वाडी, वडोदा

एकमेव वितरक : सुहृद गायगी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पो. ऑ. बॉक्स ९६५, मुंबई

थोड्याशा टिनोपालने स्वच्छ कपडे सर्वांना जास्त चमकदार पांढरे शुभ्र मिळतात

SISTA S-SG 44 MAR

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई
उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक
कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी
कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे
चिटणीस : श्री. शेष नामले
उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण संस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपांत पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गांतून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठीं संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, **नूतन बाल-शिक्षण संघ,**
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे
श्री. अनुताई वाघ
सौ. सरलाताई देवधर
श्री. भा. धों. कर्वे
सौ. मालिनीबाई परांजपे

पाहिजे

महिला मंडळ औरंगाबादच्या शिशु-विहार या संस्थेस अनुभवी "मॅट्रिक मॉटेसरी ट्रेन्ड" मुख्याध्यापिकेची आवश्यकता आहे. सर्व अलाऊन्स मिळून मासिक वेतन रु. ९०/- विशेष अनुभव, गायन व हस्तव्यवसायचा डिप्लोमा असल्यास त्याचा वेगळा अलाऊन्स दिला जाईल. अर्ज ३१ मे १९५८ चे आंत करावा.

—सौ. राजकुंवर काबरा, चिटणीस
महिला मंडळ, औरंगाबाद

महत्वाच्या सूचना :

ग्राहकांस—

(१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.
'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन-विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल-शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

(२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नांवावर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारां-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

(३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नांवाचें एक सदर चाल-विण्यांत येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्यांना स्थान देण्यांत येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यांनीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे-पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

लेखकांस—

(१) 'शिक्षण-पत्रिकें'त लेख लिहूं इच्छिणारांनीं आपलें लेखन कागदाच्या एकाच बाजूवर करावें. तें दर महिन्याच्या ता. १ च्या आंत संपादन कार्यालयाकडे पाठवावें. पसत नसलेल्या लेखांबरोबर पुरेसें पोस्टेज असल्यास लेख परत फरण्यांत येतील.

(२) 'शिक्षण-पत्रिका' कोणत्याहि महिन्यापासून सुरू करतां येते.

(३) 'शिक्षण-पत्रिका' प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस पोस्टांत पडते. सामान्यतः ता. २५ पर्यंत ती सर्वांना मिळते. तशी न मिळाल्यास ग्राहकांनीं ता. ३० च्या आंत खालीं दिलेल्या पत्त्यावर कळवावें.

(४) 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रत्येक ग्राहकाचा नंबर पत्रिकेच्या वेष्टनावर लिहिलेला असतो. व्यवस्थापक-कार्यालयाशीं पत्रव्यवहार करतांना हा नंबर ग्राहकानें अवश्य कळवावा.

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका'
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक २] मुंबई [मे १९५८

संपादकीय

पूर्व प्राथमिक प्रशिक्षणाचा नवा शिक्षण व अभ्यासक्रम

जून १९५७ मधें मुंबई राज्यानें पूर्वप्राथमिक शिक्षण आणि प्रशिक्षणाचे शिक्षण व अभ्यासक्रम तयार करण्यासाठीं कुमारी सुलभाबाई पाणंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं जी समिति नेमली होती तिनें सादर केलेल्या अभ्यासक्रमांपैकीं प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाला सरकारी मान्यता मिळून त्याच्या प्रती पूर्वप्राथमिक प्रशिक्षण संस्थांना नुकत्याच मिळाल्या आहेत. सध्यां चालू असलेला अभ्यासक्रम रद्द करून १९५९ मधें व्हावयाच्या परीक्षा या नवीन अभ्यासक्रमानुसार मुंबई राज्याच्या सर्व प्रदेशांत व्हावयाच्या आहेत. त्यामुळें येत्या जूनपासूनच या राज्यांतील सर्व सरकारमान्य प्रशिक्षण संस्थांत हा अभ्यास दाखल व्हावयाचा आहे.

या अभ्यासक्रमांतील वैगुण्य

गेल्या वर्षीं जेव्हां अभ्यासक्रम समितीची योजना झाली तेव्हांपासून हा अभ्यासक्रम कसा असावा, त्यांत काय असावें व नसावें व त्याची पुनर्रचना कशा प्रकारें व्हावी या संबंधीं शिक्षण पत्रिकेचा खास पूर्वप्राथमिक शिक्षण पुनर्रचना अंक काढून आम्ही आमच्या तपशिलवार सूचना सरकारला आणि या समितीला केल्या होत्या. अखिल भारतांत मुंबई राज्य पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत आघाडीवर असल्यानें या समितीच्या कार्याला अखिल भारतीय महत्त्व कसें प्राप्त होत आहे हेंही आम्ही त्यावेळीं नमूद केलें होतें. कळविण्यास अत्यंत आनंद होतो कीं समितीनें आम्ही त्यावेळीं केलेल्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या सूचनांचा स्वीकार केलेला आहे. आम्ही केलेल्या सूचनांपैकीं दोन महत्त्वाच्या सूचनांचा विचार समितीला करतां आला नाहीं असें दिसतें त्यांपैकीं एक सूचना हणजे पूर्वप्राथमिक शिक्षणक्रम प्राथमिक शिक्षणाप्रमाणें दोन वर्षांचा असावा. आणि शालान्त परीक्षा पास झालेल्या किंवा मॅट्रिकपेक्षां कमी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना या शिक्षणक्रमांत प्रवेश नसावा ही दुसरी सूचना. या अभ्यासक्रमाचें नवीन स्वरूप लक्षांत घेतल्यानंतर वरील दोन्ही सूचनांचा स्वीकार करण्याची किती तरी जरूर होती हें तज्ञांच्या लक्षांत यायला फारसें कठीण जाणार नाहीं. मॅट्रिक पास झालेल्या मंडळींकडून एका वर्षांत हा एवढा अभ्यासक्रम करून घेणें कठीण आहे हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. शाळान्त परीक्षा पास झालेल्यांना हा शिक्षण क्रम पूर्वी प्रमाणेंच दोन वर्षांत करावयाचा आहे. परंतु त्यांना या शिक्षणक्रमातील सर्व विषयांबरोबर आणखी पांच पेपर्स अधिक ठेवण्यांत आले आहेत. या कक्षेच्या मंडळींना दोन वर्षांतदेखील हा शिक्षणक्रम झेपण्यासारखा नाहीं,असें सरळ सरळ दिसतें आहे. तथापि समितिनें जो कांहीं निर्णय या बाबतींत घेतला तो सरकारनेंही स्वीकारला असल्यानें प्रशिक्षण संस्थांना हा शिक्षणक्रम ठरविलेल्या मुदतींत आणि विद्यार्थ्यांची कक्षा लक्षांत घेऊन करून घ्यावा लागणार आहे. याचे दोन संभाव्य परिणाम आम्हाला दिसतात. एक तर अभ्यासक्रमांत जो कांहीं तपशील दिला आहे त्याप्रमाणें सर्व शिक्षणक्रम एका वर्षांत करायचा म्हणजे वरवरचाच (Serapy) अभ्यास होऊन त्यामुळें शिक्षणक्रमांतून पसार होणाऱ्या शिक्षकाबाबतच्या अपेक्षा खालीं येतील. नाहीं तर प्रशिक्षण संस्थांनीं ओढून ताणून शिक्षणाची कक्षा वरची ठेविल्यास त्यांत बरेच विद्यार्थि गळू लागतील. शाळान्त परीक्षेचें शिक्षण झालेल्यांना दोन वर्षांचा शिक्षणक्रम करणें जसें जड जाणार तसें तें प्रशिक्षण संस्थांनाहीं आर्थिक दृष्टीनें आणि सर्व विषय वेळापत्रकांत बसवण्याच्या दृष्टीनें जड जाणार आहे. त्यामुळें दोन वर्षांचे अभ्यासक्रम चालवणें त्यांस त्रासाचें वाटून ते चालवण्यास कोणी फारसें उत्सुक राहणार नाहींत असें

आम्हाला वाटतें. अनुभवान्ती आमच्या सूचनांचा सरकारला विचार करावाच लागेल.

अभ्यासक्रमांतील नाविन्य

अभ्यासक्रमाबाबतच्या वर उल्लेखिलेल्या दोन गोष्टींखेरीज या शिक्षणक्रमानें पूर्वप्राथमिक शिक्षण अधिक व्यापक आणि शास्त्रशुद्ध बनण्यास मदत होईल असाच आहे असें आम्हाला वाटते. विशेषतः शैक्षणिक उपपत्ति आणि कार्यपद्धतीच्या बाबतींत कोणत्याही विशिष्ट पूर्वप्राथमिक शिक्षणपद्धतीशीं जखडून न टाकण्याचें जें धोरण कटाक्षानें दिसतें आहे त्यामुळें प्रशिक्षण संस्थांचें शिक्षण अद्ययावत आणि जिवंत राहील असा आम्हाला विश्वास वाटतो. यामुळें प्रशिक्षण संस्थांत नवीन नवीन प्रयोगांना फार मोठा अवकाश मिळणार आहे. त्यामुळें पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या विकासाला फार मदत होईल.

या शिक्षणक्रमाचा दुसरा महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांत बालमानसशास्त्राच्या अभ्यासाला मिळालेलें स्वाभाविक महत्त्व हा आहे. बाल मानसशास्त्रावर एक स्वतंत्र पेपर योजण्यांत आला आहे आणि बालावलोकनें, वर्गावलोकनें, साधनांवरील प्रतिक्रियाचीं अवलोकनें हें सर्व लक्षांत घेतल्यास पूर्वप्राथमिक शिक्षणाचा विकास बालकांच्या गरजा लक्षात घेऊनच होण्यास या शिक्षणक्रमानें चांगलें उत्तेजन मिळणार आहे.

शिक्षणक्रमासंबंधीची तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या इतिहासाला दिलेलें स्थान. शिक्षणविषयक प्रयोगांत तुलनात्मक मूल्यमापन होण्याच्या दृष्टीनें या विषयाच्या अभ्यासाचें महत्त्व अपार आहे. एकाच पद्धतीचा अभ्यास केल्यानें जो संकुचितपणा, विशिष्ट पद्धतिबाबतचा आग्रह आणि सांप्रदायिक वेडेपणा बोकाळतो त्यानें शिक्षकाच्या व्यक्तित्वाला फार नुकसान पोहोंचतें. त्याचा दृष्टीकोन व्यापक न बनता त्याला आपल्या कार्याचें मूल्य मापन करतां येत नाहीं. विशेषतः पूर्वप्राथमिक शिक्षणांत या भिन्नभिन्न संप्रदायांना जें अनिष्ट वळण मिळालें आहे तें या ऐतिहासिक अभ्यासामुळें नष्ट होईल. प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षणांत असे पद्धतिविषयक मतभेद अथवा हेवेदावे दिसून येत नाहींत; परंतु पूर्वप्राथमिक शिक्षणांत या गोष्टींनीं कित्येक वर्षें येथें थैमान माजविलें आहे, ही येथील पूर्वप्राथमिक शिक्षणाची पार्श्वभूमी लक्षांत घेतां समितीनें या नेमक्या रोगावर योग्य 'इलाज' केल्याचें दिसते.

शेवटीं शिक्षणक्रमाचें यश प्रशिक्षण संस्थावरच अवलंबून

नवीन शिक्षणक्रमांत अनेक गोष्टी चांगल्या आहेत. वर आम्ही काहीं ठळक गोष्टींचाच निर्देश केला आहे. परंतु शिक्षणक्रम उत्तम असला तरी प्रत्यक्ष प्रशिक्षण संस्थांत त्यास कशा प्रकारचें स्वरूप मिळतें या गोष्टीवरच या शिक्षणक्रमाचें यश अवलंबून आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थांना सरकारी मार्गदर्शन यथार्थ व्हावें यासाठीं अजून योग्य अशी सोय झालेली नाहीं. जे शिक्षणाधिकारी पूर्व प्राथमिक शिक्षण किंवा प्रशिक्षण संस्थांचें निरीक्षण-परीक्षण करण्यास येतात त्यांना याबाबतींत अशा संस्थांचें निरीक्षण करण्याखेरीज प्रत्यक्ष अनुभव कांहींच नसतो. त्यामुळें त्यांचें मार्गदर्शन शैक्षणिक प्रगतीला फारसें पोषक होऊं शकत नाहीं. अशा परिस्थितींत सर्व प्रशिक्षण संस्थानीं एकत्र येऊन या चांगल्या शिक्षणक्रमाला कसें स्वरूप द्यायचें तें निश्चित केलें पाहिजे. सरकारी मार्गदर्शन असलें तरी माध्यमिक शिक्षणांत ज्याप्रमाणें हेडमास्टर्स असोसिएशन एक प्रकारचें कार्य करीत आहे त्याप्रमाणें येथें नूतन बालशिक्षण संघाच्या प्रेरणेनें या क्षेत्रांतील प्रशिक्षण संस्थांची संघटना गेलीं कित्येक वर्षें कार्य करीत आहे. या संघटनेच्या द्वारें जूनच्या अखेरीस या शिक्षणक्रमासंबंधीच्या प्रश्नावरच एक चर्चा परिषद घेण्यांचें योजण्यांत येत आहे.

अध्यापन चर्चा परिषद

या चर्चा परिषदेंत नूतन बालशिक्षण संघाशीं संलग्न अशा सर्व प्रशिक्षण संस्थाच्या मुख्याध्यापकांना व अध्यापकांना निमंत्रणें करण्यांत येतील. परंतु ज्या प्रशिक्षण संस्था संघाशीं संलग्न नाहींत अशा संस्थांतील अध्यापक वर्गासही निमंत्रणें ऑब्झर्वर्स म्हणून द्यावींत असें सुचविलें जात आहे. या परिषदेंत पुढील कांहीं गोष्टींवर विचार होणें जरूरीचें वाटतें, (१) शिक्षण क्रमांतील विषयावरील संदर्भ ग्रंथांची यादी व ओळख (२) पाठ आणि निदर्शनें यांचें स्वरूप व प्रकार (३) अवलोकनांचे प्रकार व त्यासंबंधीचें शिक्षण (४) पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या कार्यपद्धतीची मीमांसा विशेषतः संवेदनाववोधन विकासाच्या दृष्टीनें योजावयाच्या साधनांची कल्पना (५) नवी साधनें पोथी कशी असावी. बालकाचे व्यक्तिगत अवलोकनाचें तंत्र. (६) प्रशिक्षण संस्थेंत सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या मर्यादा (७) कार्यालय रेकॉर्डसंबंधीं विचारणा. (९) चर्चा परिषदांचा शालेय शिक्षणक्रमांत उपयोग करतां येईल कां ? (९) हस्तव्यवसाय शारीरिक व्यायाम आणि संगीत विषयांचें स्वरूप, मर्यादा. (१०) परीक्षण आणि निरनिराळ्या विषयांचें मूल्यमापन. (११) प्रशिक्षण संस्थेचें वेळापत्रक.

या सर्व विषयांवर चर्चा होणें हें अध्यापकाच्या कार्यांत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीनें त्याचप्रमाणें परीक्षांना बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सारखा न्याय देण्याच्या दृष्टीनें व प्रशिक्षण अभ्यासक्रम यशस्वी करून दाखवण्याच्या दृष्टीनें आम्हाला अत्यंत इष्ट वाटतें. संघानें याबाबतींत पुढाकार घेतला आहे तें योग्यच आहे. त्याला सर्व शाखाचा सहकार मिळेल अशी आम्ही आशा प्रकट करतो व शिक्षणक्रम योग्य दिशेनें आंखणी केल्याबद्दल पूर्वप्राथमिक समितीचें व मुंबई राज्याचें मनःपूर्वक अभिनंदन करतो.

पूर्वप्राथमिक शिक्षणांत लेखन-वाचन आणि गणित या विषयांचें स्थान

लेखन-वाचन आणि गणित या विषयांचें स्थान कशा प्रकारचें असावें हें निश्चित करण्याच्या दृष्टीनें आपण पूर्वप्राथमिक वय कोणतें समजतों याची स्पष्टता करणें जरूरीचें आहे. भारतीय घटनेप्रमाणें सात अधिक ही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची कमाल मर्यादा मानलेली आहे. सातापुढील चौदापर्यंतच्या शिक्षणाला भारतीय घटनेप्रमाणें प्राथमिक शिक्षण म्हटलें आहे. तथापि प्राथमिक शाळेंत प्रवेश वय सातानंतरचें ठेवल्याचें दिसून येत नाहीं. मुंबई राज्यांत प्राथमिक शालेय प्रवेशाचें वय सहा अधिक ठेवण्यांत आलें आहे तर मुंबई राज्यांतील मुंबई शहरांत हें प्राथमिक शालेय प्रवेश वय पांच अधिक ठेवण्यांत आलें आहे. प्राथमिक शिक्षणाचें हें प्रवेश वय ज्या दृष्टीनें निश्चित करण्यांत आलें आहे त्या संबंधीचा सर्वांचा विचार एक दिसत नाहीं. त्यांत बालकाच्या विकासासंबंधीची एकमेव दृष्टी असती तर असा निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळा विचार दृष्टीस पडला नसता.

लेखन-वाचन गणित या विषयांचें स्थान ठरवितांना प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम काय आहे तेंही लक्षांत घेणें ज़रूरीचें आहे आपल्या येथें प्राथमिक शिक्षण सक्तीचे होत आहे त्या प्रमाणें पूर्व प्राथमिक शिक्षण सक्तीचें नाहीं. पूर्व प्राथमिक शाळेचा काय कार्यक्रम असावा या संबंधी सरकारी कक्षेवर कोणत्याही प्रकारचें मार्गदर्शन नाहीं. परंतु तो काय असावा हें जरी सरकारकडून सूचित केलेलें नाहीं तरी प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमाची स्पष्ट कल्पना सरकारनें दिलेली आहे. प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमांत लेखन-वाचन-गणितादि विषय क्रमशः कसे घ्यावेत या संबंधीचा तपशील स्पष्ट आहे. तो लक्षांत घेतला तर पूर्वप्राथमिक शाळांनीं लेखन-वाचन-गणितादि विषयांचा समावेश आपल्या कार्यक्रमांत दाखल करून घेण्याची जबाबदारी पूर्वप्राथमिक शाळांवर नाहीं असें दिसतें.

वर उल्लेखिलेल्या दोन मुद्यांवरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं पूर्वप्रायमिक शिक्षणाची अंतीम मर्यादा पांच वर्षांची असो सहा वर्षांची असो कीं सात वर्षापर्यंतची असो लेखन-वाचन गणितादि विषयांचा कार्यक्रम पूर्वप्राथमिक शालेय कार्यक्रमांत असला पाहिजे अशी सरकारी शिक्षण तज्ञांची अपेक्षा नाहीं. आणि तरी देखील आपल्या येथील बालवाड्या आणि बालमंदिरांत या विषयांना स्थान देण्यांत आलें आहे एवढेंच नव्हे तर या विषयास दिवसेंदिवस अधिक महत्व प्राप्त होत आहे. असें महत्त्व इतर देशांतील पूर्वप्राथमिक शाळांच्या कार्यक्रमांत या विषयांना दिलेलें दिसत नाहीं. इंग्लंडचीच गोष्ट पहा.

इंग्लंडमध्यें पूर्वप्राथमिक शालेय अवस्थेंत दोन प्रकारच्या संस्थांचा समावेश होतो. त्यापैकीं दोन ते पांच या वयाच्या बालकांसाठीं चाललेल्या शाळांना नर्सरी स्कूल म्हणतात. नर्सरी स्कूलनंतर बालक इन्फंट स्कूलमध्यें जातें. सामान्यतः या शाळा पांच ते सात या वयाच्या बालकांसाठीं असतात. सात अधिक वयाच्या इंग्लंडमधील बालकांना प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गांत प्रवेश मिळतो. इंग्लंडमधील इन्फंट शाळांच्या कार्यक्रमांत लेखन-वाचन-गणितादि विषयाला पद्धतशीर स्थान नाहीं. परंतु लेखन-वाचन गणिताची पूर्व तयारी करून देण्याच्या दृष्टीनें कांहीं कार्यक्रम योजलेले असतात.

आपल्या येथें अडीच वर्षांच्या वयाची मुलें पूर्वप्राथमिक शाळेंत दाखल होतात. परंतु पूर्वप्राथमिक शाळेंत दाखल झालेल्या मुलाला पूर्वप्राथमिक शाळेंत कोणत्या प्रकारचें व कशासाठीं शिक्षण द्यावें याची फारशी स्पष्टता आपल्याला झालेली नाहीं. या शाळेंत दुसरे कांहीं: कार्यक्रम असोत कीं नसोत पण लेखन-वाचन-गणित या विषयांस आपण स्थान दिलेलें आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांत या विषयांना स्थान मिळण्याची दोन कारणें प्रमुख आहेत. एक पालकांची शिक्षणाबद्दलची

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.
फॅक्टरी व हेडऑफिस :— चेंबूर, मुंबई नं. ३८.

—:स्थानिक शाखा:—
ठाकुरद्वार, काळबादेवी, परेल व दादर

अपेक्षा आणि दुसरी गोष्ट म्हणजे मॅडम मॉन्टेसोरीनी या विषयांना आपल्या पद्धतींत दिलेलें आकर्षक स्थान. लहान मुलांच्या शिक्षणांत कोणत्या गोष्टींचा समावेश होणें बालकांच्या विकासाच्या दृष्टीनें योग्य आहे याची कल्पना सामान्य पालकाला नाहीं. त्याचबरोबर लेखन-वाचन-गणित वगैरे अभ्यासालाच शिक्षण म्हणतात अशीहि त्यांची प्रामाणिक समजुत आहे. बालमंदिरें प्राथमिक संस्थापेक्षां अधिक फी घेतात तेव्हां तेथें लेखन-वाचन गणिताचेंच शिक्षण झालें पाहिजे असें त्यांना वाटतें. आपल्या फी देण्यावर या पूर्वप्राथमिक संस्थांचा निर्वाह चाललेला असतो म्हणून ही पालक मंडळी बालमंदिराच्या शिक्षकामागें किंवा संचालकामागें लागून बालमंदिरांत लेखन-वाचन-गणित झालेंच पाहिजे असा आग्रह धरतात. पालकांवरच सर्वस्वी ज्या पूर्वप्राथमिक संस्थांचा निर्वाह आहे अशा पुष्कळशा संस्थांवर पालकांच्या या मागणीचा परिणाम होत आहे.

पालकांच्या या मागणीच्या मागें काय विचार असेल हें समजणें फारसें कठीण नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्या शिक्षण विषयक कल्पना मर्यादित आहेत असें म्हणतां येईल. त्याचप्रमाणें आपलीं मुलें शक्य तो लवकर शिक्षणांत पुढें पडावीं अशी ही त्यांची इच्छा असल्याचें दिसतें. परंतु पालकांच्या या मागणी मागें कांहीं दूरवरचा शास्त्रीय विचार आहे असें नाहीं म्हणून त्यांच्या मागणीचा विचार एकवेळ न केला तरी चालेल; परंतु लेखन-वाचन-गणित या विषयाला मॉन्टेसोरींनीं आपल्या पद्धतींत विशेष आकर्षक स्थान दिलें आहे त्याचा गंभीरपणें आपल्याला विचार करावा लागेल. त्यांच्या शाळेंत लेखन-वाचन-गणित विशिष्ट प्रकारच्या पद्धतीनें घेतलें जात असल्यानें मुलींची एकाद दुसऱ्या वर्षाची बचत होते असें मॉन्टेसोरींनीं आपल्या मॉन्टेसोरी-पद्धति या नावाच्या ग्रंथांत लिहून ठेविलें आहे या. पुस्तकांतील २९५ पानावरील हा उतारा पहा.

'In general all children of four are intensely interested in writing and some of our children have begun to write at the age of three and a half. We find the children particularlyenthusiastic about tracing sand paper letters. दुसऱ्या एके ठिकाणीं वाचनासंबधींचा उल्लेख करून त्या म्हणतात, 'In any case almost all the normal children treated with any method begin to write at four and at five they know to read and write.....children of four years after they have been in school for two months and a half can wtite any word from dictation and can pass to writing with ink in a note book.' लेखन-वाचनासंबंधीच्या या विधानाबरोबरच गणित विषयाच्या विकासासंबंधीं त्यांचें काय विचार आहेत ते पाहूं. अडयार येथें त्यांचा जो पहिला भारतीय शिक्षणक्रम झाला त्यांत मीहि त्यांचा विद्यार्थी होतो. त्यांतील एका प्रवचनाच्या सुरुवातीला मॅडमनी एक पत्र आम्हांला वाचून दाखवलें. त्या पत्रांत एका चार वर्षांच्या बालकाची भूगोल, प्राणी, वनस्पति, विज्ञान गणित आणि भूमिति या विषयांत त्या बालकाची किती प्रगति झाली होती याचें त्याच्या शिक्षकानें जें वर्णन केलें होतें तें मॅडमनी आम्हाला वाचून दाखविलें होतें. त्या पत्रांतील बालकाचें वय फक्त साडे चार वर्षांचें होतें तरी त्याला हजारपर्यंतची मूलकृत्यें येत होतीं. चार अंकी रकमा वाचतां येत होत्या. मॉटेसोरीचें बालकांच्या व्यक्तित्वाविषयींचें मत हें कीं त्यांच्या अंगीं अमर्याद सुप्त शक्ति असतात. या शक्तींची अजून मनुष्याला ओळख पटलेली नाहीं. बालकांच्या विकासाला अनुकूल अशा साधन योजनेचें समृद्ध वातावरण दिलें तर बालकांची आश्चर्यजनक प्रगति होणें शक्य आहे. लेखन-वाचन-गणित या विषयांना जीवनाच्या सुरुवातीला जितकें लवकर स्थान देतां येईल तितकें तें द्यावें असें त्यांचें स्पष्ट मत आहे. या वयांत मुलें ज्या रीतीनें समाजाची भाषा, कल्पना, हालचाली व संस्कार आत्मसात करतात त्याचप्रमाणें लेखन वाचन गणितादि विषयदेखील तितक्याच सहजपणें ती नकळत आत्मसात करतात. अजाग्रतपणें या प्रकारें तीं जें कांहीं मिळवतात त्याचा त्यांच्या मनावर जराही ताण पडत नाहीं. लेखन-वाचन-गणिताला या प्रकारें जीवनाच्या सुरुवातीपासूनच स्थान दिल्यास आजूबाजूचें वातावरण समजण्याच्या दृष्टीनें, दुसऱ्यांचे विचार समजून घेण्याच्या दृष्टीनें आणि आपले विचार व्यक्त करण्याच्या दृष्टीनें बालकाला खरीखुरी मदत मिळते. त्यांच्या मतें Education is help to life त्याच्या मनाच्या विकास कार्याला मदत करणें हेंच शिक्षण. यामुळें त्याचें ज्ञान व कौशल्य वाढते व त्याच्या व्यक्तित्वाचा सर्वांगी विकास होतो असा मॉन्टेसोरींच्या विचारांचा थोडक्यांत मतितार्थ आहे. मॉन्टेसोरींच्या या विचारांचा आपल्या पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांच्या स्वरूपावर त्याचप्रमाणें प्राशिक्षण संस्थांच्या शिक्षणक्रमावर चांगला प्रभाव पडला आहे ही गोष्ट आपणा सर्वांस माहीत आहे.

मॉन्टेसोरींच्या या विचार प्रणालीबद्दल आधुनिक मनोविज्ञानाची काय भूमिका आहे ती आपण पाहूं या. बालक म्हणजे अशोधित अव्यक्त आणि अद्भुत शक्तींचा खजीना अशी जी त्यांची कल्पना आहे ती आजच्या विज्ञानाला मान्य नाहीं विज्ञा-

नाच्या परिभाषेंत अशा प्रकारच्या मान्यतांना Romanticism म्हणतात. मानवी विकासाकडे बघण्याची त्यांत वास्तविकता नाहीं. बालकांतील सुप्त अथवा अज्ञान शक्ति केवळ आदर्श वातावरणांतच प्रकट होण्यासाठीं वाट पहात असतात व तें वातावरण न मिळालें तर व्यर्थ जातात. अशी विज्ञानाची कल्पना नाहीं. उलट जीवनाच्या प्रत्येक क्षणीं त्याचें ठिकाणीं असतील त्या सर्व शक्तींचा उपयोग करून तें आजूबाजूच्या वातावरणाशीं संयोजन साधीत असतें. बालकाचें जीवन आणि त्याचें वातावरण यांच्या परस्पर प्रतिक्रियांतूनच त्यांचें व्यक्तित्व घडलें जातें. व्यक्तित्वाच्या विकासाला आदर्श वातावरणाचीच गरज असते हें म्हणणेंहि पृथ्वीवरील थोर मानवांची जीवन चरित्रें लक्षांत घेतलीं तर यथार्थ वाटत नाहीं. जीवनाच्या सुरुवातीला इंद्रिय शिक्षण योजनेचीं साधनें लेखन-वाचन-गणित विज्ञान वगैरे विषयांची औपचारिक साधनें योजल्यानें बालकाच्या अव्यक्त शक्ति प्रकट होऊन शाळेच्या बाहेरच्या वास्तविक जगांत बालक अधिक कार्यक्षम बनून जीवनाचा आस्वाद घेऊं शकेल वगैरे मॉन्टेसोरींच्या कल्पना म्हणजे शिक्षणांतील अद्भुतरम्यवादाचेंच एक इतिहासजमा झालेलें प्रकरण ठरणार आहे. बालकाच्या विकासाला त्याच्या स्वतःच्याही कांहीं मर्यादा असतात. वातावरणांतील साधनांच्या योजनेनें ह्या मर्यादा नाहींशा करतां येतील असें म्हणणें म्हणजे अनुवंशिकताच नाकारण्यासारखें आहे.

कालकाच्या ज्ञानाच्या कौशल्याच्या आणि व्यक्तित्वाच्या विकासांत बालकाला लाभलेली परिस्थिति हा जसा एक घटक आहे त्याचप्रमाणें त्याची अनुवंशिकता, मज्जायंत्रणेचें पक्कीभवन, त्याच्या जीवनांतील अंतर्बाह्य हेतुप्रेरण वगैरे महत्वाच्या घटकांचाही परिणाम होत असतो. बालकाला लाभणाऱ्या परिस्थितींतही मॉन्टेसोरीनी बालकाच्या सभोवती योजावयाच्या शालेय परिस्थितीचाच विचार केलेला आहे. त्यांत बालकाचें कुटुंब त्यांतील भावनात्मक जीवन, त्यांतील विचार प्रवाह, आचार, कुटुंबाच्या बाहेरच्या परिसरांतील जीवन या सर्व गोष्टींचा विचार केलेला नाहीं. इंद्रिय शिक्षणाच्या साधन योजनेनें ज्याप्रमाणें बालकाच्या इंद्रियांची कार्यक्षमता विकसतें हें जसें त्यांचें विधान वास्तविकतेला सोडून आहे त्याचप्रमाणें लेखन विज्ञान गणितादि विषयांच्या औपचारिक संस्कारांमुळें व्यक्तीची कार्यक्षमता वाढते हें त्यांचे म्हणणें आपल्या आजूबाजूला विकसणाऱ्या मानवांचा जो प्रत्यही अनुभव येतो तो लक्षांत घेतां पटत नाहीं. जीवन विकासाचा आधार प्रत्यक्ष जीवनानुभव आहे. ही हकीकत आपल्याला लक्षांत घ्यावीच लागेल. बालकाच्या जीवन विकासांत सर्व गोष्टी एकाच वेळीं साध्य होत नसून त्यांत क्रम आहे. बालकाच्या हालचालीच्या कौशल्यांत, भाषेच्या विकासांत, क्रियांच्या आणि ज्ञानाच्या विकासांत प्रत्येक बालकाचा स्वतःचा असा क्रम असतो. या दृष्टीनें वाचन केव्हां देण्यांत यावें, लेखन स्वाभाविक पणें केव्हां दिलें तर स्नायु मज्जीय यंत्रणा तें काम पेलूं शकते, गणित-विज्ञानादि विषयांतील सामान्य बोधांचा विकास कसा होतो, कोणत्या वयांत होतो, कोणत्या परिस्थितींत होतो यासंबंधीं निरनिराळ्या देशांत यासंबंधीचें प्रयोग होत आहेत. त्यावरून बालमनाच्या भिन्न क्रियाप्रक्रियाविषयीं विज्ञानाला अधिकाधिक माहिती उपलब्ध होत आहे.

लेखनासंबंधीं एलिझाबेथ हरलॉकच्या child development या पुस्तकांत Havighurst च्या संशोधनाच्या आधारें पुढीलप्रमाणें अभिप्राय व्यक्त केला आहे. Studies of writing have revealed a fairly definite pattern in which there is clear cut gradient in the age changing behaviourl. The body is not biologically ready for hand-writing before the child is six year old. Up until that age the nerves and muscles of fingers wrist and arm, are not developed enough to make the fine co-ordinations needed in writing. मॉन्टेसोरींनीं ज्या वेळीं लेखनविषयक आपले विचार व्यक्त केलें त्या वेळीं बालमानस शास्त्राचा उदय नुकताच होत होता. बाल मनाच्या अभ्यासाला शास्त्रीयपणा, स्थिरता प्राप्त झाली ती १९३० आणि ३५ या कालखंडांत. जन्मपूर्वकालापासून मानवी विकासाचें निरनिराळ्या दृष्टिकोनांतून पुढारलेलीं राष्ट्रें व्यापक प्रमाणावर संशोधन करीत आहेत या ज्ञानाचा फायदा आपण घेतला पाहिजे.

वाचनाच्या बाबतींत १९२८ ते ३०-३१ च्या सुमारास अमेरिकेंतील विनेका कौन्सिलनेंही फार मोठ्या प्रमाणांत प्रयोग केले. या कौन्सिलच्या ताब्यांत असलेल्या शाळेंतील प्राथमिक आणि माध्यमिक शाळेंतील मुलांमध्यें अनेक प्रकारचे वाचनदोष, वाचनाबाबत विरोधी वळण आढळल्यामुळें प्राथमिक वर्गाच्या पहिल्या वर्गांतील बालकांचीं मानसिक वयें निरनिराळ्या बौधिक कसोट्यांचा उपयोग करून त्यांनीं १४१ बालकांचे रेकॉर्ड ठेविलें. वाचन शिक्षणाची पद्धति निश्चित करून वाचनाची प्रगती दाखवणाऱ्या २१ पायऱ्या त्यांनीं योजल्या. त्यावर अनुभवी आठ शिक्षकांची योजना केली. वाचन शिक्षण येथें मुख्यत्वें व्यक्तिगत पद्धतीनें देण्यांत येत असे. हा प्रयोग दोनवेळां निरनिराळ्या शिक्षकांचे आणि बालकांचे संच यांचा उपयोग करून करण्यांत आला. त्याचा थोडक्यांत निष्कर्ष असा कीं ज्या बालकांचीं मानसिक वयें ६॥ वर्षपेक्षां कमी होतीं, त्या मुलांची वाचन-प्रगति ६॥ वर्ष मानसिक वयाला ज्या मुलांच्या वाचन शिक्षणाला सुरूवात करण्यांत आली होती त्यांच्या पेक्षां कमी प्रतीची आढळली. कमी मानसिक वयाला वाचन शिक्षण सुरू केलेल्या बालकांत नुसतें वाचन दोषांचें अधिक आढळले येवढेंच नव्हें तर त्यांच्यात एक प्रकारचें वाचनाविरोधी वळण उत्पन्न होऊन

अपेक्षा आणि दुसरी गोष्ट म्हणजे मॅडम मॉन्टेसोरीनी या विषयांना आपल्या पद्धतीत दिलेलें आकर्षक स्थान. लहान मुलांच्या शिक्षणांत कोणत्या गोष्टींचा समावेश होणें बालकांच्या विकासाच्या दृष्टीनें योग्य आहे याची कल्पना सामान्य पालकाला नाहीं. त्याचबरोबर लेखन-वाचन-गणित वगैरे अभ्यासालाच शिक्षण म्हणतात अशीहि त्यांची प्रामाणिक समजुत आहे. बालमंदिरें प्राथमिक संस्थांपेक्षां अधिक फी घेतात तेव्हा तेथें लेखन-वाचन गणिताचेंच शिक्षण झालें पाहिजे असें त्यांना वाटतें. आपल्या फी देण्यावर या पूर्वप्राथमिक संस्थांचा निर्वाह चाललेला असतो म्हणून ही पालक मंडळी बालमंदिराच्या शिक्षकामागें किंवा संचालकामागें लागून बालमंदिरांत लेखन-वाचन-गणित झालेंच पाहिजे असा आग्रह धरतात. पालकांवरच सर्वस्वी ज्या पूर्वप्राथमिक संस्थांचा निर्वाह आहे अशा पुष्कळशा संस्थांवर पालकांच्या या मागणीचा परिणाम होत आहे.

पालकांच्या या मागणीच्या मागें काय विचार असेल हें समजणें फारसें कठीण नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्या शिक्षण विषयक कल्पना मर्यादित आहेत असें म्हणतां येईल. त्याचप्रमाणें आपलीं मुलें शक्य तो लवकर शिक्षणांत पुढें पडावीं अशी ही त्यांची इच्छा असल्याचें दिसतें. परंतु पालकांच्या या मागणी मागें कांहीं दूरवरचा शास्त्रीय विचार आहे असें नाहीं म्हणून त्यांच्या मागणीचा विचार एकवेळ न केला तरी चालेल; परंतु लेखन-वाचन-गणित या विषयाला मॉन्टेसोरींनीं आपल्या पद्धतींत विशेष आकर्षक स्थान दिलें आहे त्याचा गंभीरपणें आपल्याला विचार करावा लागेल. त्यांच्या शाळेंत लेखन-वाचन-गणित विशिष्ट प्रकारच्या पद्धतीनें घेतलें जात असल्यानें मुलींची एकाद दुसऱ्या वर्षाची बचत होते असें मॉन्टेसोरींनीं आपल्या मॉन्टेसोरी-पद्धति या नावाच्या ग्रंथांत लिहून ठेविलें आहे या. पुस्तकांतील २९५ पानावरील हा उतारा पहा.

'In general all children of four are intensely interested in writing and some of our children have begun to write at the age of three and a half. We find the children particularlyenthusiastic about tracing sand paper letters. दुसऱ्या एके ठिकाणीं वाचनासंबधींचा उल्लेख करून त्या म्हणतात, 'In any case almost all the normal children treated with any method begin to write at four and at five they know to read and write.....children of four years after they have been in school for two months and a half can wtite any word from dictation and can pass to writing with ink in a note book. लेखन-वाचनासंबंधीच्या या विधानाबरोबरच गणित विषयाच्या विकासासंबंधीं त्यांचें काय विचार आहेत ते पाहूं. अडयार येथें त्यांचा जो पहिला भारतीय शिक्षणक्रम झाला त्यांत मीहि त्यांचा विद्यार्थी होतो. त्यांतील एका प्रवचनाच्या सुरुवातील मॅडमनी एक पत्र आम्हांला वाचून दाखवलें. त्या पत्रांत एक चार वर्षांच्या बालकाची भूगोल, प्राणी, वनस्पति, विज्ञान गणित आणि भूमिति या विषयांत त्या बालकाची किती प्रगति झाली होती याचें त्याच्या शिक्षकानें जें वर्णन केलें होतें तें मॅडमनी आम्हाला वाचून दाखविलें होतें. त्या पत्रांतील बालकाचें वय फक्त साडे चार वर्षांचें होतें तरी त्याला हजारपर्यंतची मूलकृत्यें येत होतीं. चार अंकी रकमा वाचतां येत होत्या. मॉटेसोरींचें बालकांच्या व्यक्तित्वाविषयींचें मत हें कीं त्यांच्या अंगीं अमर्याद सुप्त शक्ति असतात. या शक्तींची अजून मनुष्याल ओळख पटलेली नाहीं. बालकांच्या विकासाला अनुकूल अशा साधन योजनेचें समृद्ध वातावरण दिलें तर बालकांची आश्चर्यजनक प्रगति होणें शक्य आहे. लेचन-वाचन-गणित या विषयांना जीवनाच्या सुरुवातीला जितकें लवकर स्थान देतां येईल तितकें तें द्यावें असें त्यांचें स्पष्ट मत आहे. या वयांत मुलें ज्या रीतीनें समाजाची भाषा, कल्पना, हालचाली व संस्कार आत्मसात करतात त्याचप्रमाणें लेखन वाचन गणितादि विषयदेखील तितक्याच सहजपणें ती नकळत आत्मसात करतात. अजाग्रतपणें या प्रकारें तीं जें कांहीं मिळवतात त्याचा त्यांच्या मनावर जराही ताण पडत नाहीं. लेखन-वाचन-गणिताला या प्रकारें जीवनाच्या सुरुवातीपासूनच स्थान दिल्यास आजूबाजूचें वातावरण समजण्याच्या दृष्टीनें, दुसऱ्यांचे विचार समजून घेण्याच्या दृष्टीनें आणि आपले विचार व्यक्त करण्याच्या दृष्टीनें बालकाला खरीखुरी मदत मिळते. त्यांच्या मतें Education is help to life त्याच्या मनाच्या विकास कार्याला मदत करणें हेंच शिक्षण. यामुळें त्याचें ज्ञान व कौशल्य वाढते व त्याच्या व्यक्तित्वाचा सर्वांगी विकास होतो असा मॉन्टेसोरींच्या विचारांचा थोडक्यांत मतितार्थ आहे. मॉन्टेसोरींच्या या विचारांचा आपल्या पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांच्या स्वरूपावर त्याचप्रमाणें प्रशिक्षण संस्थांच्या शिक्षणक्रमावर चांगला प्रभाव पडला आहे ही गोष्ट आपणा सर्वांस माहीत आहे.

मॉन्टेसोरींच्या या विचार प्रणालीबद्दल आधुनिक मनोविज्ञानाची काय भूमिका आहे ती आपण पाहूं या. बालक म्हणजे अशोधित अव्यक्त आणि अद्भुत शक्तींचा खजीना अशी जी त्यांची कल्पना आहे ती आजच्या विज्ञानाला मान्य नाहीं विज्ञा-

नाच्या परिभाषेंत अशा प्रकारच्या मान्यतांना Romanticism म्हणतात. मानवी विकासाकडे बघण्याची त्यांत वास्तविकता नाहीं. बालकांतील सुप्त अथवा अज्ञान शक्ति केवळ आदर्श वातावरणांतच प्रकट होण्यासाठीं वाट पहात असतात व तें वातावरण न मिळालें तर व्यर्थ जातात. अशी विज्ञानाची कल्पना नाहीं. उलट जीवनाच्या प्रत्येक क्षणीं त्याचें ठिकाणीं असतील त्या सर्व शक्तींचा उपयोग करून तें आजूबाजूच्या वातावरणाशीं संयोजन साधीत असतें. बालकाचें जीवन आणि त्याचें वातावरण यांच्या परस्पर प्रतिक्रियांतूनच त्यांचें व्यक्तित्व घडलें जातें. व्यक्तित्वाच्या विकासाला आदर्श वातावरणाचीच गरज असते हें म्हणणेंहि पृथ्वीवरील थोर मानवांची जीवन चरित्रें लक्षांत घेतलीं तर यथार्थ वाटत नाहीं. जीवनाच्या सुरुवातीला इंद्रिय शिक्षण योजनेचीं साधनें लेखन-वाचन-गणित विज्ञान वगैरे विषयांची औपचारिक साधनें योजल्यानें बालकाच्या अव्यक्त शक्ति प्रकट होऊन शाळेच्या बाहेरच्या वास्तविक जगांत बालक अधिक कार्यक्षम बनून जीवनाचा आस्वाद घेऊं शकेल वगैरे मॉन्टेसोरींच्या कल्पना म्हणजे शिक्षणांतील अद्भुतरम्यवादाचेंच एक इतिहासजमा झालेलें प्रकरण ठरणार आहे. बालकाच्या विकासाला त्याच्या स्वतःच्याही कांहीं मर्यादा असतात. वातावरणांतील साधनांच्या योजनेनें ह्या मर्यादा नाहींशा करतां येतील असें म्हणणें म्हणजे अनुवंशिकताच नाकारण्यासारखें आहे.

कालकाच्या ज्ञानाच्या कौशल्याच्या आणि व्यक्तित्वाच्या विकासांत बालकाला लाभलेली परिस्थिति हा जसा एक घटक आहे त्याचप्रमाणें त्याची अनुवंशिकता, मज्जायंत्रणेचें पक्कीभवन, त्याच्या जीवनांतील अंतर्बाह्य हेतुप्रेरण वगैरे महत्वाच्या घटकांचाही परिणाम होत असतो. बालकाला लाभणाऱ्या परिस्थितींतही मॉन्टेसोरीनी बालकाच्या सभोवती योजावयाच्या शालेय परिस्थितीचाच विचार केलेला आहे. त्यांत बालकाचें कुटुंब त्यांतील भावनात्मक जीवन, त्यांतील विचार प्रवाह, आचार, कुटुंबाच्या बाहेरच्या परिसरांतील जीवन या सर्व गोष्टींचा विचार केलेला नाहीं. इंद्रिय शिक्षणाच्या साधन योजनेनें ज्याप्रमाणें बालकाच्या इंद्रियांची कार्यक्षमता विकसतें हें जसें त्यांचें विधान वास्तविकतेला सोडून आहे त्याचप्रमाणें लेखन विज्ञान गणितादि विषयांच्या औपचारिक संस्कारांमुळें व्यक्तीची कार्यक्षमता वाढते हें त्यांचे म्हणणें आपल्या आजूबाजूला विकसणाऱ्या मानवांचा जो प्रत्यही अनुभव येतो तो लक्षांत घेतां पटत नाहीं. जीवन विकासाचा आधार प्रत्यक्ष जीवनानुभव आहे. ही हकीकत आपल्याला लक्षांत घ्यावीच लागेल. बालकाच्या जीवन विकासांत सर्व गोष्टी एकाच वेळीं साध्य होत नसून त्यांत क्रम आहे. बालकाच्या हालचालीच्या कौशल्यांत, भाषेच्या विकासांत, क्रियांच्या आणि ज्ञानाच्या विकासांत प्रत्येक बालकाचा स्वतःचा असा क्रम असतो. या दृष्टीनें वाचन केव्हां देण्यांत यावें, लेखन स्वाभाविक पणें केव्हां दिलें तर स्नायु मज्जीय यंत्रणा तें काम पेलूं शकते, गणित-विज्ञानादि विषयांतील सामान्य बोधांचा विकास कसा होतो, कोणत्या वयांत होतो, कोणत्या परिस्थितींत होतो यासंबंधीं निरनिराळ्या देशांत यासंबंधीचें प्रयोग होत आहेत. त्यावरून बालमनाच्या भिन्न क्रियाप्रक्रियाविषयीं विज्ञानाला अधिकाधिक माहिती उपलब्ध होत आहे.

लेखनासंबंधीं एलिझाबेथ हरलॉकच्या child development या पुस्तकांत Havighurst च्या संशोधनाच्या आधारें पुढीलप्रमाणें अभिप्राय व्यक्त केला आहे. Studies of writing have revealed a fairly definite pattern in which there is clear cut gradient in the age changing behaviourl. The body is not biologically ready for hand-writing before the child is six year old. Up until that age the nerves and muscles of fingers wrist and arm, are not developed enough to make the fine co-ordinations needed in writing. मॉन्टेसोरींनीं ज्या वेळीं लेखनाविषयक आपले विचार व्यक्त केलें त्या वेळीं बालमानस शास्त्राचा उदय नुकताच होत होता. बाल मनाच्या अभ्यासाला शास्त्रीयपणा, स्थिरता प्राप्त झाली ती १९३० आणि ३५ या कालखंडांत. जन्मपूर्वकालापासून मानवी विकासाचें निरनिराळ्या दृष्टिकोनांतून पुढारलेलीं राष्ट्रें व्यापक प्रमाणावर संशोधन करीत आहेत या ज्ञानाचा फायदा आपण घेतला पाहिजे.

वाचनाच्या बाबतींत १९२८ ते ३०-३१ च्या सुमारास अमेरिकेतील विनेका कौन्सिलनेंही फार मोठ्या प्रमाणांत प्रयोग केले. या कौन्सिलच्या ताब्यांत असलेल्या शाळेंतील प्राथमिक आणि माध्यमिक शाळेंतील मुलांमध्यें अनेक प्रकारचे वाचनदोषं, वाचनाबाबत विरोधी वळण आढळल्यामुळें प्राथमिक वर्गाच्या पहिल्या वर्गातील बालकांचीं मानसिक वयें निरनिराळ्या बौधिक कसोट्यांचा उपयोग करून त्यांनीं १४१ बालकांचे रेकॉर्ड ठेविलें. वाचन शिक्षणाची पद्धति निश्चित करून वाचनाची प्रगती दाखवणाऱ्या २१ पायऱ्या त्यांनीं योजल्या. त्यावर अनुभवी आठ शिक्षकांची योजना केली. वाचन शिक्षण येथें मुख्यत्वें व्यक्तिगत पद्धतीनें देण्यांत येत असे. हा प्रयोग दोनवेळां निरनिराळ्या शिक्षकांचे आणि बालकांचे संच यांचा उपयोग करून करण्यांत आला. त्याचा थोडक्यांत निष्कर्ष असा कीं ज्या बालकांचीं मानसिक वयें ६॥ वर्षपेक्षां कमी होतीं, त्या मुलांची वाचन-प्रगति ६॥ वर्ष मानसिक वयाला ज्या मुलांच्या वाचन शिक्षणाला सुरूवात करण्यांत आली होती त्यांच्या पेक्षां कमी प्रतीची आढळली. कमी मानसिक वयाला वाचन शिक्षण सुरू केलेल्या बालकांत नुसतें वाचन दोषांचें अधिक आढळले येवढेंच नव्हे तर त्यांच्यात एक प्रकारचें वाचनाविरोधी वळण उत्पन्न होऊन

त्याचा परिणाम त्यांच्या शाळेंतील सर्व सामान्य प्रगतीवरही दिसून आलेला दिसला.

आधुनिक बालमानसशास्त्राच्या कोणत्याही पुस्तकांत लेखन वाचनाच्या वयासंबंधी मॉन्टेसोरींच्या विचारांना पोषक असा अभिप्राय मला आढळला नाहीं.


वाचनाच्या बाबतींत G. G. Thompson च्या Child Psychology नामक पुस्तकांत Reading Readiness संबंधीं जी नोंद आहे तिचा मतितार्थ थोडक्यांत असा. बालकाच्या वाचन-पात्रतेचा संबंध त्याच्या शारीरिक आणि मानसिक पक्वीभवनाशीं असतो. वाचनाची प्रगति शरीर आणि मनाच्या विविध प्रक्रियांच्या विकासावर अवलंबून असते. (१) वाचनासाठीं दृष्टि, श्रवण आणि स्नायूंचा इष्ट विकास होणें जरुरीचें असतें. (२) इंद्रियांतील या संवेदन पात्रतेबरोबरच शब्द व अक्षरें यांतील फरक लक्षांत येण्याच्या दृष्टीनें योग्य अवबोधन व्हावयाला पाहिजे. (३) वाचन वस्तूचा मतितार्थ करण्या इतपत सामान्य बोधांचा विकास झालेला असला पाहिजे. (४) वाचन तंत्रांतील आवश्यक शारीरिक हालचालीसाठीं स्नायुमज्जीय विकासही पुरता झालेला पाहिजे. (५) हा सर्व मनाचा शरीराचा विकास झालेला असला तरी वाचन शिकण्याची गरज वाटणें किंवा प्रबळ इच्छा उत्पन्न होणें म्हणजे हेतुप्रेरण चांगलें पाहिजे. (६) जोपर्यंत वाचनांत प्रगति होत राहून यश मिळत नाहीं तोंपर्यंत येणारी निष्फलता सहन करण्याची मनाची तयारी असावी लागते; (७) वाचन वाचतां आलें तरी त्याचा उपयोग कळण्याइतपत मनाचा सामान्य विकासही जरूरीचा असतो. वरील गोष्टींपैकीं एकादी गोष्ट जरी कमी असली तरी वाचनांत दोष उत्पन्न होतात.


लेखन-वाचनाबरोबर गणित विषयाला केव्हां सुरुवात करावी, कशातऱ्हेनें करावी हाही महत्वाचा प्रश्न आपण चर्चिला पाहिजे. लेखन-वाचनाप्रमाणें गणित विषयाचें शिक्षणही शक्य तो लवकर सुरू केलें पाहिजे असा मॉन्टेसोरींचा स्पष्ट अभिप्राय आहे. गणित विषयाची मॉन्टेसोरी साधनें मॉंटेसोरींच्या प्रतिभा शक्तीचें प्रतीक समजली जातील इतकीं तीं तर्कशुद्ध आहेत. साधनांच्या रचनेंत दोष नाहीं. परंतु या साधनांचा उपयोग केव्हां करावा आणि कशारीतीनें करावा यासंबंधीं अधिक विचार झाला पाहिजे.

मॉन्टेसोरींच्या शिक्षण तंत्रांत प्रथम साधन येतें व त्यांतून अनुभव घेतल्यावर बालकानें शाळेच्या बाहेरच्या जगांत हा अनुभव व्यापक बनवावा अशी त्यांची अपेक्षा आहे. हा त्यांचा उपक्रम नेमका उलट वाटतो. ज्ञानाच्या विकासांत प्रथम सरळ अनुभव दिला म्हणजे मनाच्या प्राक्रियांना योग्य असें हेतु प्रेरण मिळतें. त्यामुळें मनाच्या विविध प्रक्रियांना तेज चढतें. शेवटीं अनुभवाच्या वैविध्यांतून मन ज्ञानाचें abstraction करतें. abstraction या प्रकारें होऊन ज्ञान झालें म्हणजे या ज्ञानाचें Generalisation ही चांगलें होण्याला मदत होते. मॉन्टेसोरी पद्धतींत जीवनानुभवाच्या आधींच साधन द्वारा abstraction प्राक्रियेला मदत देण्यांत देते. abstraction प्राक्रियेला मदत करणारीं हीं साधनें एक तर कृत्रीम असतात. त्यांच्यांत परिस्थितींतील चेतकासारखा जिवंतपणा नसतो त्याच प्रमाणें त्यांतिल हेतु प्रेरणही अप्रत्यक्ष असतें. त्यामुळें साधनांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. उदा. अंकाच्या कल्पनेबाबतची त्यांचीं साधनें पहा. कांठ्याचें युनिट प्रथम पुढें करून त्या अंक बोध देऊ इच्छितात' अंकबोधाची बालकाला उत्कट गरज जीवनाच्या व्यवहारांतून निर्माण झाली पाहिजे. प्रथम व्यवसाय मुलांच्या पुढें आला पाहिजे व त्यांतून अंक विषयक कल्पनांचें abstraction होण्याला शिक्षकानें मदत देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बेसिक पद्धतींत हीं गोष्ट सुधारण्याची शक्यता आहे. बेसिक पद्धतीला या साधनांची जोड दिल्यास गणित विषयाची हीं साधनें बालकांना उपकारक ठरतील असें मला वाटतें.

———

स्वदेशीचीं भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





बाल-विभाग

वर्ष २६ वें : अंक १ ला : मे १९५८

चिमुताईचीं चतुर पिलें

एक होती चिमुताई. तिचीं होतीं दोन पिलें. एक होतें गोरें आणि दुसरें होतें काळें.

गोरें पिलूं म्हणालें, 'आई, मला भूक लागली.'

काळें पिलूं म्हणालें, 'आई, मला भूक लागली.'

चिमुताई म्हणाली, 'मी आतां बाहेर जाते, आणि दाणे घेऊन येते. तुम्हीं घरांत बसा. दार लावून घ्या, कोणी लबाड येईल, हांक मारील तरी दार उघडूं नका.'

पिलें म्हणालीं–'बरें. आम्ही नीट आंत बसतों'

मग चिमुताई बाहेर गेली. एका कावळ्यानें तिला बाहेर जातांना पाहिलें. थोड्या वेळानें तो दाराजवळ आला आणि पिलांना म्हणाला–

'चला पिलांनो उघडा दार
खाऊ आणला मजेदार'

पिलें आंतून म्हणालीं—

'काय तुझें नांव ?
कोण तुझें गांव ?
आमची आई नसेल
तर चले जाव !'

कावळा बारीक आवाज काढून म्हणाला, 'मी तुमची आईच आहे. लवकर दार उघडा'

गोरें पिलूं हळूंच म्हणालें, 'हा कांहीं आईचा आवाज नाहीं.'

काळें पिलूं पण हळूंच म्हणालें, 'हा कांहीं आईचा आवाज नाहीं.'

मग दोघांनींहि फटींतून डोकावून पाहिलें.

काळें पिलूं म्हणालें, 'लबाड कावळा आपल्याला खायला आला आहे.' गोरें पिलूं म्हणालें–'लबाड कावळ्याची आपण खोड मोडूं.'

मग त्यांनीं घेतला एक आकडा. त्याला होतें टोंक. त्यांनीं टोंकाला गुंडाळला कागद. आकड्याला बांधली दोरी. दारावरून त्यांनीं आकडा खालीं सोडला आणि म्हणालीं–'आई, घे किल्ली आणि उघड दार'

कावळ्याला वाटलें, पिलें फसलीं, घाईघाईने त्यानें आकडा चोंचींत धरला. आकडा होता वांकडा आणि होता चांगला अणकुचीदार. तो

त्याचा परिणाम त्यांच्या शाळेंतील सर्व सामान्य प्रगतीवरही दिसून आलेला दिसला.

आधुनिक बालमानसशास्त्राच्या कोणत्याही पुस्तकांत लेखन वाचनाच्या वयासंबंधी मॉन्टेसोरींच्या विचारांना पोषक असा अभिप्राय मला आढळला नाहीं.

वाचनाच्या बाबतींत G. G. Thompson च्या Child Psychology नामक पुस्तकांत Reading Readiness संबंधीं जी नोंद आहे तिचा मतितार्थ थोडक्यांत असा. बालकाच्या वाचन-पात्रतेचा संबंध त्याच्या शारीरिक आणि मानसिक पक्वीभवनाशीं असतो. वाचनाची प्रगति शरीर आणि मनाच्या विविध प्रक्रियांच्या विकासावर अवलंबून असते. (१) वाचनासाठीं दृष्टि, श्रवण आणि स्नायूंचा इष्ट विकास होणें जरुरीचें असतें. (२) इंद्रियांतील या संवेदन पात्रतेबरोबरच शब्द व अक्षरें यांतील फरक लक्षांत येण्याच्या दृष्टीनें योग्य अवबोधन व्हावयाला पाहिजे. (३) वाचन वस्तूचा मतितार्थ करण्या इतपत सामान्य बोधांचा विकास झालेला असला पाहिजे. (४) वाचन तंत्रांतील आवश्यक शारीरिक हालचालीसाठीं स्नायुमज्जीय विकासही पुरता झालेला पाहिजे. (५) हा सर्व मनाचा शरीराचा विकास झालेला असला तरी वाचन शिकण्याची गरज वाटणें किंवा प्रबळ इच्छा उत्पन्न होणें म्हणजे हेतुप्रेरण चांगलें पाहिजे. (६) जोपर्यंत वाचनांत प्रगति होत राहून यश मिळत नाहीं तोंपर्यंत येणारी निष्फलता सहन करण्याची मनाची तयारी असावी लागते; (७) वाचन वाचतां आलें तरी त्याचा उपयोग कळण्याइतपत मनाचा सामान्य विकासही जरूरीचा असतो. वरील गोष्टींपैकीं एकादी गोष्ट जरी कमी असली तरी वाचनांत दोष उत्पन्न होतात.


लेखन-वाचनाबरोबर गणित विषयाला केव्हां सुरुवात करावी, कशातऱ्हेनें करावी हाही महत्वाचा प्रश्न आपण चर्चिला पाहिजे. लेखन-वाचनाप्रमाणें गणित विषयाचें शिक्षणही शक्य तो लवकर सुरू केलें पाहिजे असा मॉन्टेसोरींचा स्पष्ट अभिप्राय आहे. गणित विषयाची मॉन्टेसोरी साधनें मॉंटेसोरींच्या प्रतिभा शक्तीचें प्रतीक समजली जातील इतकीं तीं तर्कशुद्ध आहेत. साधनांच्या रचनेंत दोष नाहीं. परंतु या साधनांचा उपयोग केव्हां करावा आणि कशारीतीनें करावा यासंबंधीं अधिक विचार झाला पाहिजे.

मॉन्टेसोरींच्या शिक्षण तंत्रांत प्रथम साधन येतें व त्यांतून अनुभव घेतल्यावर बालकानें शाळेच्या बाहेरच्या जगांत हा अनुभव व्यापक बनवावा अशी त्यांची अपेक्षा आहे. हा त्यांचा उपक्रम नेमका उलट वाटतो. ज्ञानाच्या विकासांत प्रथम सरळ अनुभव दिला म्हणजे मनाच्या प्राक्रियांना योग्य असें हेतु प्रेरण मिळतें. त्यामुळें मनाच्या विविध प्राक्रियांना तेज चढतें. शेवटीं अनुभवाच्या वैविध्यांतून मन ज्ञानाचें abstraction करतें. abstraction या प्रकारें होऊन ज्ञान झालें म्हणजे या ज्ञानाचें Generalisation ही चांगलें होण्याला मदत होते. मॉन्टेसोरी पद्धतींत जीवनानुभवाच्या आधींच साधन द्वारा abstraction प्राक्रियेला मदत देण्यांत देते. abstraction प्राक्रियेला मदत करणारीं हीं साधनें एक तर कृत्रीम असतात. त्यांच्यांत परिस्थितींतील चेतकासारखा जिवंतपणा नसतो त्याच प्रमाणें त्यांतील हेतु प्रेरणही अप्रत्यक्ष असतें. त्यामुळें साधनांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. उदा. अंकाच्या कल्पनेबाबतची त्यांचीं साधनें पहा. कांठ्यांचें युनिट प्रथम पुढें करून त्या अंक बोध देऊ इच्छितात' अंकबोधाची बालकाला उत्कट गरज जीवनाच्या व्यवहारांतून निर्माण झाली पाहिजे. प्रथम व्यवसाय मुलांच्या पुढें आला पाहिजे व त्यांतून अंक विषयक कल्पनांचें abstraction होण्याला शिक्षकानें मदत देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बेसिक पद्धतींत हीं गोष्ट सुधारण्याची शक्यता आहे. बेसिक पद्धतीला या साधनांची जोड दिल्यास गणित विषयाची हीं साधनें बालकांना उपकारक ठरतील असें मला वाटतें.

———

स्वदेशीचा भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





चिमुताईचीं चतुर पिलें

एक होती चिमुताई. तिचीं होतीं दोन पिलें. एक होतें गोरें आणि दुसरें होतें काळें.

गोरें पिलूं म्हणालें, 'आई, मला भूक लागली.'

काळें पिलूं म्हणालें, 'आई, मला भूक लागली.'

चिमुताई म्हणाली, 'मी आतां बाहेर जाते, आणि दाणे घेऊन येते. तुम्हीं घरांत बसा. दार लावून घ्या, कोणी लबाड येईल, हांक मारील तरी दार उघडूं नका.'

पिलें म्हणालीं–'बरें. आम्ही नीट आंत बसतों'

मग चिंमुताई बाहेर गेली. एका कावळ्यानें तिला बाहेर जातांना पाहिलें. थोड्या वेळानें तो दाराजवळ आला आणि पिलांना म्हणाला–

'चला पिलांनो उघडा दार
खाऊ आणला मजेदार'

पिलें आंतून म्हणालीं—

'काय तुझें नांव ?
कोण तुझें गांव ?
आमची आई नसेल
तर चले जाव !'

कावळा बारीक आवाज काढून म्हणाला, 'मी तुमची आईच आहे. लवकर दार उघडा'

गोरें पिलूं हळूंच म्हणालें, 'हा कांहीं आईचा आवाज नाहीं.'

काळें पिलूं पण हळूंच म्हणालें, 'हा कांहीं आईचा आवाज नाहीं.'

मग दोघांनींहि फटींतून डोकावून पाहिलें.

काळें पिलूं म्हणालें, 'लबाड कावळा आपल्याला खायला आला आहे.' गोरें पिलूं म्हणालें–'लबाड कावळ्याची आपण खोड मोडूं.'

मग त्यांनीं घेतला एक आकडा. त्याला होतें टोंक. त्यांनीं टोंकाला गुंडाळला कागद. आकड्याला बांधली दोरी. दारावरून त्यांनीं आकडा खालीं सोडला आणि म्हणालीं–'आई, घे किल्ली आणि उघड दार'

कावळ्याला वाटलें, पिलें फसलीं, घाईघाईने त्यानें आकडा चोंचींत धरला. आकडा होता वांकडा आणि होता चांगला अणकुचीदार. तो

कावळ्याच्या तोंडांत अडकला. मग तो धडपड करूं लागला—

'काव काँव काव
कोणीतरी मदतीला
आव आव आव'

पिलें आंत आनंदाने नाचूं लागलीं.

थोड्या वेळाने दाणें घेऊन चिमुताई आली. ती कावळ्याला दरडावून म्हणाली, 'तूं काय करतोस रे इथें? कशाला आलास माझ्या घराजवळ?'

कावळा धडपड करीत म्हणाला, '—मी—मी मी....चूक झाली चिमुताई मला क्षमा करा'

पिलांनीं आईचा आवाज ओळखला. त्यांनीं फटींतून पाहिलें. काळें पिलूं म्हणालें, 'आई आली! दार उघडा.'

गोरें पिलूं म्हणालें, 'आई आली! दार उघडा.'

मग त्यांनीं पटकन् दार उघडलें. त्यांनीं चिमुताईला कावळ्याची सगळी लबाडी सांगितली. चिमुताईनें कावळ्याला चार चोंची मारल्या आणि हाकलून दिलें.

चिमुताईनें पिलांना शाबासकी दिली आणि चांगला चांगला खाऊ दिला.

— प्रभाकर शांडिल्य

—*—

कांतुया सूत

चरखा घेउन करीं
कांतुया सूत आतां सत्वरीं ॥ धृ० ॥
कापुस घेउन पेळू करुंया
पेळू पाटावरी ॥१॥
सुंदर पेळू तयार होतां
सूत निघे सत्वरीं ॥२॥
सूत नेउनी मागावरती
खादी विणुं गोजिरी ॥३॥
खादीचा मग शिवून सदरा
घालूं अंगावरी ॥४॥
खादि स्वदेशी सुन्दर अपुली
मोद देई अन्तरीं ॥५॥
पाळूं आपण गांधीजींच्या
संदेशा झडकरी ॥६॥

ना. गं. ढेकणे, पुणें.

—*—

पहांट

पहांट समयीं.पक्षीगण हे, आनंदे गाती,
आनंदानें लहरत विहरत, झाडावरी उडती,
पहांट समयीं पक्षीगण हे, आनंदे डुलती,
आनंदानें हर्षभरानें, स्वागत ते करिती,
झाडावरती कोकिळाही, कुहुकूहू गाते,
मनास माझ्या रम्य वाटतें, कानीं गाणें तें,
गोठ्यांमधलीं गाई गुरें तीं, गोड हंबरती,
गळ्यांत त्यांच्या घुंगुरमाळा, मंजुळ रव करिती,
पहांट समयीं जात्यावरती, दळण्याला बसते,
ओवी गाउनी ज्ञानेशाची, वैरण सारीते
पहांट समयीं नित्यक्रमानी, कामासी उठते,
भगवंताचे गाणें गाउनी, स्वागत हो करीते,

—सौ. उषा रामचंद्र जोशी

—*—

नवें युग

(छंदः—अभंग)

आलें नवे युग । तुझें आज बाळा ।
वंदी तूं त्याजला । प्रेमानें रे ॥१॥
हेंच नवें युग । तुला उद्धरील ।
तुला भुषविल । खरोखरी ॥२॥
नव्या या युगांत । दिवस भाग्याचें ।
तुझ्या जीवनाचें । येतील रे ॥३॥
नव्या या युगाचें । हर्ष भरें फार ।
स्वागत तूं कर । लवलाही ॥४॥

नव्या या युगाची । घडी एक वाया ।
नको देऊं जाया । रीकामी तूं ॥५॥
नव्या या युगाचा । तूंचि बाळा स्वामी ।
नित्य त्याच्या कामीं । येई वा रे ॥६॥
तनानें, मनानें । भुषव युगाला ।
भुषविल तुला । नवें युग ॥७॥
नव्या रे युगाचें । रंगवुं नको चित्र
होई त्याचा मित्र । झडकरी ॥८॥

—दत्ताराम. आ. वारस्कर

—*—

बड़वड गीत

— हिन्दी —

बंदर मामा हमें ना सताना

बंदर मामा हमे ना सताना
हमको है स्कूल जाना
एक, दो, तीन है सीखना
ताई से है कहानी सुनना
रोज रोज स्कूल जाकर
बनेंगे हम एंजिन मास्तर

लम्बी सफर करेंगे भाई
लेजावेंगे तुमकोभी बंबई
वहाँ खिलायेंगे खुब मिठाई
दिखायेंगे सबको मित्र पुराना
बंदर मामा हमें ना सताना

—लीला पिसोळकर

—*—

जाईच्या फुला,—कळलं कां तुला ?

जाईच्या फुला कळलं कां तुला ?
हळुंच कुणी उठवलं तुला ।
डोईवर तुरा पायांत वाळा
अंगणीं मोर नाचायला आला
थांब रे मोरा नाचूं नको
बाळाची गाई मोडूं नको—

रागाला आला मोर रागाला आला,
थय् थय् थय् थय् नाचून गेला
जाईच्या फुला कळलं कां तुला,
अंगणीं मोर नाचून गेला ॥१॥
बाळाशीं खेळायला चिउताई आली,
झाडावर बसून चिंवचिंवली

थांब ग चिउताई ओरडूं नको,
बाळाची गाई मोडूं नको
अंगणीं माझ्या उतरून जा,
दाणापाणी खाउन जा
चिउताई खालीं येईच ना,
चारापाणी खाइच ना
रागाला आली चिउ रागाला आली,
भुरकन् भुरकन् उडून गेली ॥२॥
बाळाचं दुदु घेऊन हम्मा आली,
अंगणीं येऊन हंबरली
थांब ग हम्मा हंबरूं नको,
बाळाची गाई मोडूं नको
चारा-पाणी खाऊन जा,
बाळाचं दुदु ठेवुन जा—
हम्मा चारा खाउन गेली,
बाळाला दुदु देऊन गेली— ॥३॥

बाळाशी खेळायला वारा आला,
पाळण्याभोंवतीं घुमघुमला
थांबरे वाऱ्या वाहूं नको,
बाळाची गाई मोडूं नको
खट्याळ वारा ऐकेचना,
आपली घूं घूं थांबविचना
हळूंच पाळण्यांत डोकावला,
बाळाच्या गालावर विसावला
मउ मउ ओठ, मउ मउ गाल,
वारेदादाला आवडे फार
वाऱ्यानें गालाशी मस्ती केली,
बाळाची गाई मोडून गेली
खुदकन् हंसवुन बाळाला,
खट्याळ वारा निघून गेला—
जाईच्या फुला कळलं कां तुला,
वारेदादानीं उठवलं तुला

आजोबा हो आजोबा

आजोबा हो आजोबा
खेळूं या चला
नको बिको म्हणूं नका
कोण ? खेळायला ?
आजोबा हो आजोबा
तुम्हीं करा घोडा
घोडेस्वार होईन मी
पळा भरा भरा
चाबूक हा फिरवीन
हवेंतच वर
मारणार नाहीं तुम्हां
भिऊं नका वरं..... १
आजोबा हें गाठोडें घ्या
ठेवा खांद्यावरी
ओरडीन 'घ्या हो साडी'
जाऊं रस्त्यावरी
गठ्ठा आहे साड्यांचा हा
रेशमी भरजरी
उचलाया भिऊं नका
जड नाहीं भारी..... २
आजोबा या खेळायला
ओढा हात गाडी
फळें विकया होईन मी
तुम्हीं हांका गाडी
फळें विकण्या दूरवर
नाहीं जाणार
फळें खाण्या तुम्हांला मी
खूप देणार..... ३

—स. देवघर, मुंबई.

इंद्रिय शिक्षण मीमांसा

[मागील अंकावरून]

इंद्रिय–शिक्षण योजनेंतील कांहीं साधनांवर पुनरावर्तनें होतात. मुलांचें मन त्यांत रमतें ही गोष्ट खरी आहे. विशेषतः ज्या साधनांत यांत्रिक नियमन आहे त्या साधनांत अशी साधनें म्हणजे दट्टा पेटी, भौमितिक आकृतीची पेटी या दोन्ही साधनांत साधर्म्य शोधण्याचें काम बुद्धीला मिळते. साधनांवरील प्रमेय उत्पन्न होतें व थोड्याशा ट्रायल आणि एररनें हें साधर्म्य शोधल्याचें समाधान मिळतें. त्यामुळें मुलें या साधनांवर रमतात. रंगाच्या जोड्या लावणें किंवा मनोऱ्याचे घन रचणें यांतहि कांहीं वेळ मुलांना मौज वाटते. यावरून या साधनांचें द्वारें इंद्रिय ज्ञानाचा किंवा आकलनाचा मोठा आधारभूत पाया घातला असें होत नाहीं. कारण संवेदनीय आकलन म्हणजे वस्तूंचा सामान्य बोध होणें नव्हे. ज्ञानाचा विकास होण्यासाठीं संवेदनाबरोबरच सामान्य बोध होणें आवश्यक असतें. हें सामान्य बोध वस्तूंबाबत विविध अनुभवांतून घडले जातात. केवळ संवेदनीय अनुभवावर भर दिल्यानें सामान्य अनुभवाची घडण होत नाहीं. शुद्ध संवेदनीय अनुभव हा ज्ञानाच्या विकासास अप्रत्यक्षपणें पूरक होऊं शकतो. प्रत्यक्ष सरळ अनुभवच ज्ञान आणि क्रियांच्या विकासाला पूरक होऊ शकतो हा मुद्दा आपण पुढें विचारांत घेऊं. सध्यां मॉन्टेसोरी साधनांवरील पुनरावर्तनानें काय होण्याची शक्यता आहे ती पाहूं.

पुनरावर्तनानें प्रतिक्रिया अन्वित होतात हा सर्वत्र अनुभव आहे. या अन्वित प्रतिक्रियाविषयी थोडासा अधिक खुलासा करतो. इंग्रजींत या प्रकाराला Conditioned Reflex म्हणतात. अर्भकाच्या पायाला चिमटा घेतला म्हणजे तें पाय झाडतें. परंतु चिमटा घेणाच्या प्रत्येक वेळीं जर विजेच्या दिव्याचे स्विच ऑन करीत राहिलें तर या प्रकारच्या पुनरावर्तनांनीं एकप्रकारचें साहचर्य मनांत निर्माण होऊन पुढें चिमटा न घेतां नुसता दिवा जरी ऑन केला तरी बालक पाय



*

कामिनिया हेअर ऑईल
कामिनिया स्नो
कामिनिया टॉयलेट सोप
ऑटो दिलबहार

कामिनिया शृंगार

प्रसाधनांमुळें

चमकणारा केशकलाप, अनुपम लावण्य आणि रेशमाप्रमाणें मुलायम त्वचा प्राप्त करून घ्या.

कामिनिया प्रसाधनेंच उत्तम असतात हें मला माहीत आहे. माझ्या निवडीबद्दल मला अभिमान वाटतो आणि तो योग्यच आहे.

☆

वैजयंतिमाला—

भारत नाट्यमची ही प्रतिमा असें म्हणते पहा.

अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कंपनी, मुंबई २

झाडण्याची पतिक्रिया दर्शवतें. मान्टेसोरी साधनांवर संवेदनांचीं नांवें सांगतात किंवा पुढें दशमान परिमाणें मुलें ओळखतात असें जें आपणास वाटतें तो प्रकार अन्वित प्रतिक्रियेसारखा असतो. या प्रकारें अन्वित प्रतिकारांच्या स्वरूपाचें जें शिक्षण होतें त्याचा परिणाम चेतक बदलला कीं फार दिवस राहत नाहीं या प्रकारच्या ज्ञानाचें संक्रमण म्हणजे ट्रॅन्सफर होते किंवा नाहीं या बाबतींत शंका घ्यायला पुष्कळ जागा आहे. यासंबंधीं Ross काय म्हणतो पहा: २१३ पान: It is extremely doubtful how much of the traning obtained in so limited a field is transferred to the seeing and of hearing of things. कारण हे 'seeing and hearing of things.' वस्तू-विषयाच्या सामान्य बोधनावर अवलंबून असतें.

कोणी म्हणेल सामान्य बोधाच्या विकासासाठीं या साधनांच्या उपयोगामुळें पूर्व तयारी चांगली होते येवढें तरी कबूल करावें लागेल. बालकांना यांत विविध शुद्ध संवेदनांचा अनुभव मिळतो आणि त्यांचीं नांवें अन्वित प्रतिक्रीया रूपानें कां होईना पण मिळतात ना ? याबाबतींत हें ध्यानांत घ्यायला पाहिजे कीं शुद्ध संवेदनांचा अनुभव मिळतो पण या अनुभवानें संवेदनशील विकसत नाहीं. ही जर गोष्ट खरी असेल तर शुद्ध संवेदनांचा अनुभव मिळाला काय किंवा न मिळाला काय याचें महत्व कांहीं नाहीं. दुसरी गोष्ट वस्तूंच्या गुणधर्म-संबंधीचें सामान्य बोध या साधनांच्या खेळांतून विकासण्याची कितपत शक्यता आहे तें पाहूं.

कोणत्याही सामान्य बोधाच्या प्राक्रिया दोन प्रकारच्या क्रिया आढळून येतात. पहिल्या क्रियेला इंग्रजींत abstraction असें म्हणतात. Abstraction म्हणजे वस्तूपासून वस्तूची कल्पना सुटी करण्याची क्रिया. उदा. अनेक प्रकारचीं झाडें पाहिल्यानंतर त्यांत विविधता असली तरी त्यांतील सर्वसामान्य गुण समुच्चय सुटा पाडून आपण नाशाविषयींची अमूर्त कल्पना घडवतो. सामान्य बोधांत या प्रकारचें अमूर्त कल्पन आवश्यक असतें तसेंच सामान्य बोधांतील दुसरी क्रिया म्हणजे Generalisation ची. या क्रियेला आपण सामान्यीकरण म्हणूं या. झाडाच्या कल्पनेचें अमूर्तीकरण झाल्यानंतर एखाद्या नवीन झाडांत हा अमूर्त गुणसमुच्चय पाहून तें झाड आहे असें ठरवतो. इंद्रिय शिशणाच्या साधनांवर abstraction ला वाव मिळत नाहीं. वस्तूंच्या विविध अनुभवांतून येथें abstraction करण्याला अवसर मिळत नाहीं. कारण हीं साधनें स्वतःच पदार्थांच्या गुणधर्माचीं abstractions आहेत. त्यांना मॉंटेसोरींनी Materialised adstraction म्हटलें आहे. त्याच अनुभवाचें त्यांत फक्त पुनरावर्तन होतें. त्यामुळें अन्वीकरण होते या अनुभवाचें Generalisation होण्याची शक्यता. परंतु ज्ञानाच्या विकासांत या दोनही प्रक्रियाचें सारखेंच महत्त्व असतें.

उलट या साधनांवरील पुनरावर्तनांत प्रतिक्रियांना निष्कारण निर्बंध आणि अवरोध उत्पन्न होतात. या साधनांचे द्वारें संवेदनशीलता वाढते या कल्पनेनें या साधनांवरील खेळांचें मॉन्टेसोरींनी तंत्र बनविलें आहे. त्या तंत्राप्रमाणें बुद्धीच्या कार्याला मर्यादा उत्पन्न होतात.

हीं साधनें जीवनाच्या स्वभाविक क्रियांशीं संबंधीत नसल्यानें त्यांतील हेतु प्रेरण वाढवतां येत नाहीं. जीवन संबधीत क्रियेमध्यें हेतु प्रेरण स्वाभाविक असतें. त्यांत शिक्षक आपल्या कलेनें व चातुर्यानें ते कमी अधिक करूं शकतों. त्यामुळें संवेदन अवबोधन आदि कल्पनापर्यंतच्या सर्व प्रक्रिया प्रभावी किंवा तेजस्वी बनवितां येतात. या साधनांच्या उपयोगांत जीवन व्यवसायांतील हेतू प्रेरणांचें सातत्य नसल्यानें मुलांना या साधनांचा लवकरच कंटाळा येतो. साधनावर परिपाठ करतांना त्यांत आनंद मिळत नसल्यानें त्यांच्या प्रतिक्रिया यांत्रिक बनतात. या साधनावर मूल आपल्या समग्र मनानें खेळू शकत नाहीं.

बालक आपल्या मनाप्रमाणें खेळूं शकत नाहीं. मॉन्टेसोरींना या साधनांना खेळणीं म्हटलेलें आवडत नसे; परंतु सध्या खेळ किंवा खेळणीं यांतूनही बालकाच्या विविध शक्तींना पोषण मिळतें हें दिसून आल्यानें या खेळण्याचें एक मानस-शास्त्रानें वर्गीकरण केलें आहे. त्यानें Pattern toys, Raw Materials, locomotor toys, small mechanical toys असे वर्ग पाडून मुलांना कोणती खेळणीं विशेष आवडतात या संबंधी संशोधन करून ठेविलें आहे. Pattern ची व्याख्या करतांना तो म्हणतो 'Pattern toys are those whose Physical Construction more or less definitely conditions the manner of this use to whatever degree of complexity this be carried' त्याची ही व्याख्या मॉटेसोरी साधनांना लावल्यास तो एक प्रकारचीं Pattern toys आहेत असें दिसून येईल. अशा खेळण्यांत मुलाला खेळण्यांतील योजनेप्रमाणें खेळावें लागतें. मॉन्टेसोरी साधनावरील बालकांच्या प्रतिक्रिया जोड्या लावण्यापुरत्या किंवा क्रम दर्शवण्यापुरत्याच मर्यादित केल्यानें बालकाच्या मनाला त्यांत रचनात्मक अथवा कल्पनेच्या उपयोगाला अवकाश मिळत नाहीं. दट्टा पेटीचें एंजिन बनवण्याचा किंवा रंग तक्त्याचा बंगला बनवण्याचें त्यांचें स्वयंस्फूर्त प्रयत्न आपल्याला जे पहायला मिळतात त्याचें कारण आपल्या कल्पनेप्रमाणें साधनांचा उपयोग करण्याची प्रबळ इच्छा हें आहे.

क्षोभ-प्रक्षोभ 'कल्पना आणि तरंग'

या कल्पना आणि तरंगांच्या बाबतींत चांगलाच वाद माजला आहे!

कांहीं दिवसापूर्वी श्री. हरभाईंचें एक पत्र होतें. त्यांनीं माझ्या एका लेखांत मी तरंग अथवा कल्पनाविकासाला फार महत्व देत असल्याचें आणि त्यामुळें कांहीं गैरसमजूत उभी करीत असल्याचें लिहून मला त्यासंबंधीं खुलासा विचारला होता.

तसेंच एकदां मागें मी शिक्षण-पत्रिकेच्या दिवाळी अंकांत 'मूळजीभाईंचा मुळा' या नांवाची एक गोष्ट लिहिली, त्यामुळें अनेक शिक्षक मित्रांनीं ती एक तरंग-कथा आहे म्हणून आपला विरोध दर्शविला होता.

कल्पना आणि कल्पना विलासांत मर्यादा रेखा कोठें आहे तें पहातांना माझाहि पुष्कळ वेळां गोंधळ उडतो. कारण या बाबतींत आजपर्यंत जी मर्यादा मानण्यांत आली आहे ती मला पटत नाहीं.

कल्पनेच्या बाबतींत तर अगदीं स्पष्ट समजूत अशी की जिचा आधार वास्तविकतेवर असेल आणि नंतर विमाना प्रमाणें वैज्ञानिक रीतीनें जी आकाशांत उड्डाण करते ती कल्पना.

पण बाकींचें सारेंच तरंग विभागांत-ही गोष्ट मला कांहीं पटत नाहीं. असें केलें तर आपल्या रुपक साहित्याची काय वाट लावावी?

गजकाय गणपतीला लहानशा उंदरावर बसवायचें कसें आणि गरुडावर स्वार होऊन गिरिधर गोपाळ द्रापदीच्या मदतीला जाणार कसे आणि ब्रह्माच्या नाकांतून डुकर कसा निघणार?

अंजिठा-वेरूळला जे अवास्तविक कल्पनासृष्टीतील पशुपक्षी आणि गंधर्व दिसतात. त्यांचें काय करावयाचें? अशा सगळ्याच प्रतिकात्मक कृतींची काय वासलात लावणार!

अशी ही गोंधळांत पाडणारी गोष्ट आहे.

आज आपण ज्याला वास्तविक म्हणतो तें एके दिवशी अवास्तविक होतें त्याचें काय?

याचा अर्थ, जर आपण आपल्या मर्यादित सीमेंत कल्पनेला बांधण्याचा प्रयत्न केला आणि त्याशिवायच्या गोष्टी निकालांत काढल्या तर किती साहित्याचा आणि कालाचा आपल्याला नाश करावा लागेल.

आणि जी अवास्तविक कल्पना आहे तों तरंग आहे आणि जे तरंग आहेत ते सर्व मुलांना हानिकारक आहेत असें कां मानण्यांत यावें?

'मूळजीभाईच्या मुळांत' मनुष्य आपल्या अहंला फुलवीत फुलवीत किती फुलवतो आणि शेवटीं या अहंचा फुगा फुटून खराच्या चिंध्याच कशा हातांत येतात, या मनाच्या स्वभावा संबंधींचें मी रूपक बनविलें होतें.

आतां ह्यांतील जी कल्पना आहे ती वास्तविक आहे की नाहीं हा पहिला प्रश्न आणि दुसरा प्रश्न, ती जर अवास्तविक असेल तर तिच्यापासून नुकसान होते कीं नाहीं हा दुसरा प्रश्न.

पहिली गोष्ट तर ही एक अवास्तविक मुळा पृथ्वीच्या आरपार गेलेला आहे. या कल्पनेखेरीज दुसरी कोणतीच अवास्तविकता नाहीं. हा मुळा अवास्तविक आहे म्हणून त्यापासून मुलांचें काय नुकसान आहे तें मला समजत नाहीं. काय तीं असे मुळे रोपायला लागतील आणि असे मुळे त्यांनीं लावले तर त्यांत नुकसान कसलें! समजा त्यांना कळलें कीं मुळें होतात पण ते कांहीं प्रचंड रूप धारण करीत नाहींत तर हरकत कुठली!

म्हणून मला वाटतें, कल्पनेचें क्षेत्र आपण संकुचित करतां कामां नये. असें संकुचित करण्यानेंच नुकसान पोहोंचण्याचा संभव आहे.

इंग्रजींत तरंगाला Fancy म्हणतात. पण दुसरा एक शब्द आहे phantacy त्याला देखील आपण तरंगच म्हणतो. या तरंगाच्या बाबतींत आपण आणखी विचार केला पाहिजे. परिकथेंतील अवास्तव तरंगांना आपण निष्क्रिय तरंग म्हणूं या तर दुसरे कांहीं क्रियाशील तरंगदेखील असूं शकतात. आमचा एक सुतार आहे. त्याच्या आसपास मुलें जमतात आणि त्याला अनेक रीतीनें त्रास देत असतात. हा सुतार आतां जुना झाला आहे. त्याला बालगृहाची रीतभात कळली आहे म्हणून तो आतां चिडत नाहीं. मुलें दिवसभर मिळेल तें हत्यार घेऊन तोडफोड करित असतात. तीं काय करतात हें जर आपण पाहिलें तर तरंगाची दुनिया दिसल्यासारखें वाटेल. एखादा मुलगा धनुष्यबाण बनवतो आहे तर दुसरा खंजर किंवा बंदूक बनवतो. या सर्वच गोष्टी अगदीं ओबडधोबड असतात.

अशा कामाला कोणी हस्तोद्योग म्हणेल, कोणी नवसर्जन म्हणेल. मला वाटतें तो तरंगी खेळच आहे यांतील कोणी मूल पेटीं अथवा स्टूल बनवीत नाहींत. आपल्या मनांतील रॉबिन हुडला ती संतोषवित असतात. त्यांना हवें असतें धनुष्य किंवा सुरी. किंवा बंदुक खांद्यावर घेऊन फौजदार व्हावेंसें वाटते; म्हणून या प्रकारचीं साधनें मिळविण्याकरितां तीं धडपडतात. अशा वस्तु सुंदरच झाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह नसतो. कारण त्यांना घीस्च नसतो. लगेचच्या लगेच त्यांना रॉबिनहूड व्हावयास हवें असतें.

आणि दुसरेंहि पण एक कारण आहे: आपण मोठीं माणसें कल्पना करतो तशी स्थूल कल्पना मुलांची नसते. वस्तु प्रतिकात्मक रूपांतच ती पहातात, त्यामुळें लांबट त्रिकोणी आकाराची पाटी मिळाली की लगेच ती त्यांची सुरी बनते व खांचा असलेली काठी मिळाली की त्याला तीं बंदूक समजतात. यांत आपण हस्तोद्योगाचा आग्रह ठेवून ती वस्तु पूर्ण करण्यासाठीं त्यांच्यावर दडपण आणलें आणि वस्तुनिर्मितीचें ध्येय समोर ठेवून स्थूलसर्जनाबाबतचा आग्रह चालूं ठेवला तर आंतरिक कल्पनेचा खूनच नाहीं का होणार !

मुलांच्या ह्या तरंगी वर्तनामुळें त्यांचें काय नुकसान होतें हें मला समजत नाहीं उलट ह्या प्रकारच्या अनुभवांतून त्यांचें किती समाधान होत असतें हा आपला नेहमींचा अनुभव आहे.

हा शिवप्रसाद नुकतीच सुट्टी घरीं घालवून परत आला आहे. त्यांनीं काय बरोबर आणलें आहे माहिती आहे, एक छोट्या छोट्या काडतुसाचें रिवॉल्व्हर आणि एक स्प्रिंगवाली सुरी.

शिवप्रसादला सर्व मुलांत सर्वांत जास्त नाटकांची गोडी आहे. वेषभुषेची कला त्याला जात्याच अवगत आहे, म्हणून त्याला पेपरमींट किंवा चॉकोलेट घ्यावयाचें सुचत नाहीं. पण आपल्या तरंगी कल्पनांना पोषक अशा वस्तु विकत घ्यावयाचें सुचलें.

दुसरी गोष्ट.

काल सकाळीं झोंपावयाच्या खोलींत गेलों तेव्हां पलंगावर महेश, आश्वीन व प्रवीण नव्हते. मला आश्चर्यच वाटलें. एवढ्या सकाळीं पांच वाजतां ही तिन्हीं मुलें कशीं उठलीं असतील आणि फिरावयास गेलीं असतील.

नंतर सारें कांहीं कळलें.

परवां मुलें जेव्हां फिरून आलीं तेव्हां बंगल्याच्यामागें त्यांना माळी भेटला.

त्यानें फिर्याद केली.

'तुमची कुत्री आमच्या कंपांऊंडमध्यें घुसून आमच्या कोंबड्यांच्यामागें धावते तिचा कांहींतरी बंदोबस्त करा.'

मी आज्ञा दिली.

'बस्स, आजपासून लेसीला फिरावयाला न्यावयाचें नाहीं. तिला पिंजऱ्यांतच कोंडून ठेवावयाचें आहे.'

झालें. आज्ञा अमलांत आली.

लेसीला पिंजऱ्यांत कोंडावयाचें आहे. पण पिंजरा तर तुटला आहे. आतां !

बस्स, सर्व कारागीर कामास लागले. महेश, आश्वीन, प्रवीण आणि कंपनीचें काम सुरूं झालें. थोड्याच वेळांत पिंजरा दुरूस्त झाला. तो बंद ठेवण्यासाठीं आडवा अडसर पण तयार झाला; अगदीं सायंकाळपर्यंत काम चाललें होतें. अर्थात् पिंजरा दुरुस्त करण्यापेक्षां विशेष म्हणजे तोडणें, मोडणें, पुनः दुरुस्त करणें हेंच त्यांचें सुतारी काम होतें. पण दुसरें दिवशीं लेसीला पिंजऱ्यांत घालावयाचें होतें आणि ते आपण तयार केलेल्या पिंजऱ्यांत घालावयाचें होतें म्हणून हे कारागीर लवकर उठले आणि लेसीला त्यांनीं पिंजऱ्यांत कोंडून टाकलें.

पण ही क्रिया येथेंच आटोपली नाहीं.

नंतर ते फिरावयास गेले. जायलाच पाहिजे ना ! तरच सर्व क्रिया पूर्ण होणार.

कधींच फिरावयास न जाणारी मंडळी त्यादिवशीं या कारणामुळें फिरावयास गेली. ह्या प्रकारें मुलें तरंगी घोड्यावर बसण्यांत खूप गोडी दर्शवितात.

यांत काय नुकसान आहे तें मला अजूनहि कळत नाहीं. पण फायदा मात्र स्पष्ट दिसतो.

तेव्हां आपल्या तरंगाच्या क्रियाशील भागाकडे आपलें दुर्लक्ष होऊं नये असें मला वाटतें. उलट त्याला पोषण मिळालें पाहिजे असें मला वाटतें.

अजूनही ही गोष्ट संपली नाहीं.

आज सकाळीं मी जेव्हां गेलों तेव्हां हीं त्रिपुटी घोरत होतीं.

मी त्यांना उठतांना म्हणालों, 'कां आज नाहीं वाटतं फिरावयास जायचें ?'

उत्तरांत डोळे मिटलेलीं डोकीं हललेलीं दिसलीं. फिरायला जायचें नाहीं, कारण पिंजरा पुनः तुटला आहे. आणि म्हणून लेसीला हौदांत टाकून फिरायला जायचें आहे. पण त्यांत कांहीं मजा नाही.

मुलांना क्रियेकरतां क्रियेंत गोडी लागते असें नव्हे. पण क्रियेच्या मागें एखाद्या क्रियाशील तरंगाचा जोर पाहिजे असें वाटतें, म्हणूनच श्री. जुगतरामभाईंचा सिद्धांत मुलांना खेळ आवडत नाहीं, त्यांना काम हवें असतें हा चुकीचा वाटतो. मला वाटतें आपण अनेक वर्षें तरंगांना अस्पृश्य समजून. दूर भिरकावून दिलें आहे. आतां ह्या अस्पृश्य तरंगांचा उद्धार करण्याची वेळ आली आहे.

अर्थात् या बाबतींत आपण वैज्ञानिकदृष्ट्या विचार केला पाहिजे आणि त्याला आपल्या अनुभवाचेंहि अनुमोदन मिळालें पाहिजे. केवळ 'पुस्तकं वाक्य प्रमाणं' म्हणतां यणार नाहीं. मला तर वाटतें, सर्व प्रकारचे तरंग अयोग्य आहेत असें मानणें यांत आपली कोठेतरी चूक होत आहे असें वाटतें. अमेरिकेच्या वॉल्ट डिझ्नेची कार्टुन्स ज्यामुळें तरंगी दुनियेचें अद्भुत दर्शन आपल्याला घडतें तें लहानमोठ्या मंडळींना सारखेंच आकर्षक वाटतें. तें पहाण्यानें कांहीं नुकसान होतें असें मला वाटत नाहीं. उलट त्यामुळें अद्भुत रंगाचे प्रदेश खुले होऊन मुलांच्या अनुभवांत भरच पडते असे मला वाटतें. त्यांत कांहीं माझी चूक होत असेल तर एखाद्या अधिकारी व्यक्तीकडे जाऊन मला समजून घ्यावें लागेल.

शरदलाही शिकायचंय

'शरद-ऊठ-आपल्याला आतां निघायचंय' साधुबोवा शरदला उठवीत होते. तो डोळे चोळीत उठून बसला. आपण कोठें आहोंत-काय करीत आहोंत-याची कसलीच त्याला आठवण नव्हती. बाहेर अजून पुरता अंधार होता-मग एवढ्या लवकर कशाला उठायचं. पण साधुबोवांनीं पुनः त्याच्या पाठीवर हात फिरविला 'शरद-बाळ ऊठ-आपल्याला दुसऱ्या गांवाला जायचंय आतांच्या गाडीनें—'

'पण कुठें जायचें ?

'तुला शाळेंत शिकायचंय ना ? एका चांगल्या मोठ्या शाळेंत तुला घेऊन जातो—'

'पण ती शाळा कुठें आहे.'

'खूप दूर आहे.'

'मग मला माझ्या चर्यी कळविलें पाहिजे. ताई-दादांना भेटलें पाहिजे—'

'कोण हे ताई दादा-तुला तर आईबाप नाहींत'

'पण ते माझे मानलेले आई-बाप आहेत.'

'हो, मग कळवूं त्यांना. चल ऊठ. आतां उशीर होतोय.' जरा करडया स्वरांतच साधुबोवा बोलले. तेव्हां नाइलाजानें शरद उठला. हातपाय तोंड धुऊन तयार झाला. आणि सगळी मंडळी गाडीमध्यें बसली. अजून पहांटच होती. गार वारा वहात होता. शरदला पुन्हां डुलकी लागली—

अंगांवर उन्हाचें चटके बसूं लागले तसा शरद जागा झाला व उठून बसला. गाडी भर वेगानें धांवत होती. झाडें, डोंगर पळत होते. हिरवींगार रानें डुलत होतीं. स्टेशनावर स्टेशनें मागें पडत होतीं. आपण कोणीकडे चाललों आहोंत याची शरदला कल्पना होईना. पण दूर-बरेच दूर आलों असलों पाहिजे याची त्याला खात्री झाली.


आतां त्यानें डब्यांत न्याहाळून पहायला सुरुवात केली. त्याच्या शेजारी त्याच्या ओळखीचें साधुबोवा बसले होते. त्यांच्या जटा व्यवस्थित बांधलेल्या होत्या. भगवी कफनी अंगांत त्यांनीं घातली होती. रुद्राक्षाच्या माळा गळ्यांत होत्या. भस्माचे पट्टे ओढलेले होते. चिलीम फुंकण्यामध्यें ते गर्क झाले होते.

त्यांच्या शेजारी आणखी दोघेतिघें असेंच साधु बसले होते. पण त्यांच्या पांढऱ्या मळकट कफन्या होत्या. जरा अव्यवस्थित होत्या-नी ते अगदीं ओंगळ वाटत होते.

शरदला आतां भूक लागली. तें साधुबोवांनीं ओळखलें. 'बेटा-ले-ही पुरी खा—! म्हणून त्यांनीं थोड्या पुऱ्या भाजी शरदला काढून दिली. एकूण साधुबोवा मोठे प्रेमळ आहेत. ते आपल्याला चांगल्या शाळेंत घालणार आहेत. याबद्दल शरदला विश्वास वाटला. खाणें झाल्यावर खिडकीशीं जागा मिळवून तो शांत चित्तानें बाहेरचा देखावा पहात बसला—

बरोबर ३६ तास मंडळी गाडींत बसलीं होतीं. उत्तर हिंदुस्थानांतील एका लहानशा तीर्थस्थानीं ते सगळे उतरले. तेथें बुवांचा मठ होता. तेथें आणखी साधु होते-व कांहीं मुलेंही होतीं शरदपेक्षां लहान आणि मोठी-पण भारींच विचित्र-कोणी आंधळे, कोणी लंगडे, कोणी थोटे, कोणाच्या पाठीचा पोक निघालेला. तें दृश्य पाहून शरदला फारच वाईट वाटलें. अरेरे दुर्दैवी प्राणीं बिचारे. या सगळ्यांचा संभाळ आपले साधुबोवाच करतात कां ? किती चांगले ! त्याच्या मनांत साधुबोवांविषयीं एकदम आदर निर्माण झाला.

शरदला एक खोली रहायला दिली. तेथें आणखी ३/४ चांगलीं मुलें होतीं. त्यांतला एक तर गोरा गोरा सुंदर असा होता. शरदपेक्षां थोडी लहानमोठीं असतील तीं-त्यांना व्यवस्थित अंथरूण, पांघरूण, कपडे, चित्रांचीं पुस्तकें, खाऊचे डबे वगैरे सर्व होतें. शरदनें लवकरच सर्वांची दोस्ती करून घेतली. 'तुम्ही येथें कशाला आलांत' म्हणून विचारलें. तेव्हां सगळ्यांनीं सांगितलें, 'एका छान शाळेंत शिकायला जायचंय्' ही सगळीं मुलें आपल्या साधुबोवांबरोबर आलेली होतीं.



त्या गोऱ्यागोमट्या मुलाला सावत्र आई होती. एक दिवस ती त्याला बांधून खूप मारीत होती. 'अल्लक' म्हणून साधुबोवा दाराशीं उभे राहिले.

'बाई, कां मारतां पोराला ?'

'हो, मी मारतें तें दिसतय-या पोराचे गुण दिसतात कां ?' बाई खेंकसली-'जा घेऊन या काट्यांला, छळवाद मेला-' आई बडबडत होती-'जातो घेऊन' बोवा पुढें झाले. त्यांनीं मुलाला सोडलें. मुलगा घरांत निघून गेला-पण त्या रात्रीं तो अंगणांत उभा होता. तेथें पुनः साधुबोवा दिसले. त्यांनीं खूण केली-मुलगा गुपचूप बोवांबरोबर पळून आला. आतां त्याला बोवा चांगल्या शाळेंत घालणार आहेत. येथें तो मजेंत आहे—

एकाला आई-बाप नव्हते-एकाला काका-काकू त्रास देत होते-एक ना दोन-कांहीं ना कांहीं त्रासांत सांपडलेलीं हीं पोरें-यांना साधुबोवा येथें प्रेमानें संभाळीत होते-

शरदही मजेंत होता. पण त्याला रोज दिनकरराव, रमाबाई आणि सुधेची आठवण येत असे. तो साधुबोवांना विचारी-'या गांवाचें नांव काय ? पत्ता सांगा-मला घरीं पत्र पाठवायचयं !' 'अरे हें खेडेगांव-येथें कुठून टपाल-दे तुझें पत्र मी टाकतों-!' म्हणून त्यांनीं एक कार्ड शरदला दिलें. शरदनें थोडक्यांत सर्व लिहून आपण बुवांकडे मजेंत असल्याचें कळविलें. मात्र बुवांचें नांव माहीत नाहीं. गांवाचें नांव माहीत नाहीं. दुसऱ्या मुलांनाहि तें माहीत नव्हतें. मुंबईचा पत्ता लिहून त्यानें पत्र बुवांजवळ दिलें.

बुवांचा मठ गांवापासून लांब. तेथें या मंडळींशिवाय दुसरें कोणीच येत नसे. तेवढीच एक अडचण या मुलांना वाटायची. दुसरी अडचण म्हणजे आंधळीं पांगळीं मुलें एका बाजूला आणि हीं चांगलीं एका बाजूला. त्यांना बहुतेक एकत्र होऊं देत नसत.

असें आणखी ७/८ दिवस गेले. संधि साधून चांगलीं मुलें बिचाऱ्या पंगु मुलांकडे जायचीच. आजूबाजूला कोणी नाहीं असें पाहून एका पांगळ्या मुलानें एके दिवशीं शरदला विचारलें, 'येथें कशाला आलास ?' 'मला चांगल्या शाळेंत जायचंय्' 'कोण घालणार ?' 'साधुबोवा' 'हंऽहंऽहं' करून तो मुलगा मोठ्यानें हंसला. पण तेवढ्यांत साधुबोवा तेथें आलें. 'कां हंसतोस रे ?' 'नाहीं, ही ही मंडळी गाढवाची मजा सांगत होतीं, म्हणून मला हंसूं आलें-' त्यानें संपादणी केली. पण शरदच्या मनाला तें लागून राहिलें-येथें कांहीं तरी पाणी मुरतंय ! मग त्यानें पुनः संधि साधून त्या पांगळ्याची गाठ घेतली. तेव्हां त्यानें जें सांगितलें तें ऐकून शरदच्या मनाला धक्काच बसला-सारांश असा-हीं सगळीं मुलें चांगलीं धडधाकट होतीं. त्यांना असच फसवून येथें आणतात-मग कोणाचा डोळा फोडतात कोणाचे हात तोडतात. कोणाचे पाय तोडतात-कोणाची जीभ कापतात. अशा रीतीनें त्यांना पंगु करतात-व मग भीक मागायला घेऊन जातात-'आतां तुझे डोळे फोडतील बहुतेक-'शरदच्या अंगावर कांटा आला. भीतीनें त्याची तेथेंच बोबडी वळली-तो खोलींत परत आला. येथून सुटका कशी करून घ्यावी-समजेना-तो अगदीं तुरुंगच होता. सगळ्या बैराग्यांचा त्यांच्या भोवतीं रात्रीं दिवसा कडेकोट पहारा असे हें आतां शरदच्या लक्षांत आलें. शरदला कांहीं समजलें आहे व तें पोर हुषार आहे हें साधुबोवांच्या पण लक्षांत आलें. त्याबरोबर शरदचा लवकरच निकाल लावायचें त्यांनीं ठरविलें.

शरदचें डोकें काम करीतच होतें. पुढच्या व्हरांड्यांत बैराग्यांचा पहारा असे. मागून खिडकी नव्हती. पण कौलांवरून निघून जावयाचें त्यानें नक्की केलें. रात्रीं बारा वाजले होते. सर्व डाराडूर झोंपले होते. तो संधि साधून शरदनें पळून जाण्याचें ठरविलें. त्याला झाडावर चढण्याची संवय होती. पण बाकीच्यांना नव्हती. म्हणून स्वतःच्या चादरींच्या गांठी मारून त्यांनीं दोर बनविला. त्याचें एक टोंक हातांत घेऊन शरद वर



सुगंधित झरणपासून बनणारें तेल

आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.



१. गळणारे केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२. मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M. P. S

चढला. त्यानें हळूच कौलें दूर केलीं. तो छपरावर बसला. चादरीचें टोंक वाशाला बांधून टाकलें. मग एकेकानें त्याच्या दुसऱ्या टोंकाला लोंबकळायचें व त्यानें वर ओढायचें असें करून सर्वांना छपरावर ओढलें. त्याच दोरीच्या सहाय्यानें मागच्या बाजूनें सर्वांना खालीं उतरविलें. तो उतरला आणि पळणार तोंच 'अरे पोरें पळालीं' म्हणून हाकाटी झाली. बऱ्या-काट्या घेऊन बैरागी पाठीमागें लागलें—पण पोरें धूम पळतच सुटलीं—त्या गोऱ्या मुलाला पळवेना तर शरदनें त्याला पाठकुळीला घेतला आणि अगदीं धूम-धूम-धूम-पळत सुटला. त्याच्या वेगानें बैराग्यांना पळतां येत नव्हतें. शिवाय थोडथोडं उजाडूं लागलें मुलाच्या मागें पळणेंहि त्यांना बरें वाटलें नाहीं. यामुळें बैरागी मागें वळलें, तरीही पोरें पळत होतीं. एका स्टेशनावर आल्यावर सगळीं एका झाडाखाली थांबलीं. हाश म्हणून श्वास टाकला. जवळच्या विहीरीचे पाणी पिऊन आलीं.

शरदनें स्टेशन मास्तरला सांगितलें 'साहेब, आम्हांला आई बाप नाहींत. पोरकीं पोरें आहोंत. मामाकडे जायचंय, पैसा नाहीं हमाली करूं द्या, करूं द्या. तिकीटापुरते पैसे मिळाले कीं आम्हीं येथून जाऊं—' स्टेशनमास्तराला दया आली. 'कोठें जायचंय तुम्हांला ?' तें शरदलाच माहीत नव्हतें. तोंडाला येईल तें त्यानें सांगितलें 'नाशिक' 'बरं मी तुम्हांला नाशिकचं तिकीट काढून देतों' त्यानें सांगितलें. थोड्या वेळानें पोरें नाशिकच्या गाडींत बसलीं. पण भूक खवखव करूं लागली. तेव्हां आतां काय करावं असा प्रश्न निघतांच एका पोरानें सांगितलें. 'अरे माझ्यापाशीं एक रुपया आहे.' 'आणि माझ्यापाशीं दोन आणे.' असें कोणाजवळ कांहींतरी होतें तें एकत्र केलें. नी चणे फुटाणें खाऊन मंडळी राहिली. ३० तासानंतर नाशिक आलें. मुलें उतरलीं. आतां जायचं कुठें त्यांनाच माहित नव्हतें, पण त्यांच्या डब्यांत नाटककंपनीची मंडळी बसली होती. त्यांचें या गोऱ्या मुलाकडे खूप लक्ष होतं.

स्टेशनवर उतरल्यावर तो शरदकडे आला. 'कोठें जायचें रे तुम्हांला !' 'आम्ही गांवांत जाणार आहोत' 'तेथें कोण आहे तुमचें ?' 'ओळखीचें कोणी नाहीं. पण मजुरी करून पोट भरणार आहोत' 'होय ना ? मग चला तर आमच्याच बरोबर आम्ही तुम्हांला काम देऊं' 'पण तुम्ही कोठें नेणार, आम्हांला—आम्हांला शाळेंत जायचंय, आम्ही काम करून शिकणार आहोंत.' 'हो फार शहाणी मुलें—शाब्बास, अरे, आम्ही तर आतां शहरांत जातों. तेथें ६ महिने रहाणार, तुम्हांला रात्रीचें काम देऊं दिवसा तुम्ही शाळेंत जा. आमच्या जायच्या वेळेपर्यंत तुम्हांला आणखी काम मिळेल.' 'देवानेंच गाऱ्हाणें ऐकलं म्हणून शरदला वाटलं. तो आपल्या त्या भावंडांसह नाटक कंपनीबरोबर नाशिकला गेला. त्या सर्व मुलांनीं आतां आपलें सख्ख्या भावाचें नातें ठरवून टाकलें. शरद त्यांचा दादा. एक अण्णा, एक भाऊ, एक नाना आणि एक तात्या. हीं त्यांचीं टोपण नांवें. सर्वांनाच शाळेंत जायचं होतं. नी शिकायचं होतं—

नूतन बालशिक्षण आणि संघ समाचार

पनवेल कुलाबा : येथील राजस्थान युवक मंडळानें चालविलेल्या बाल विकास मंदिराचा पांचवा वार्षिकोत्सव दिनांक २७ एप्रिल रोजीं डॉ. श्रीमती शांताबाई कोटेचा यांच्या अध्यक्षते खाली थाटानें साजरा झाला. या प्रसंगीं मुंबईच्या श्रीमती लीलाबाई रेळे, श्रीमती सरलाताई देवधर आणि श्रीमती मंजुळाबाई कोलवालकर उपस्थित होत्या.


मुंबई : संघाशीं संबंध असलेल्या अध्यापन मंदिरांच्या अध्यापकांनीं एकत्र येऊन जून पासून बाल अध्यापन मंदिरांतें जो नवीन पूर्व प्राथमिक प्रशिक्षण क्रम सुरु व्हावयाचा आहे त्याला एकसूत्रित स्वरूप देण्यासाठीं एक चर्चा परिषद जून अखेर योजण्यांत येणार असल्याचें कळतें. नवीन प्रशिक्षक्रणमानें उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा विचार प्रत्येक बाल अध्यापन संस्थेच्या मुख्य अध्यापक व अध्यापकांनीं करून ठेवावा व आपले विचार चर्चा परिषदेपुढें ठेवावें अशी विनंति करण्यात आली आहे.

बाल अध्यापन मंदिर दादर मुंबई १४ : या संस्थेतींल मराठी व गुजराती पूर्वप्राथमिक शिक्षणाचे दोन वर्षांचे शिक्षणक्रम बंद केलें आहेत. त्यामुळें यापुढें ज्यांचें शिक्षण मॅट्रिक पास (इंग्रजी सोडून) इतपत झालें आहे अशांनाच संस्थेंत प्रवेश मिळेल.

नू. बा. शि. संघाचें ग्राम बाल शिक्षाकेन्द्र कासवाड : जून अखेरीस संस्थेला श्री. चिंत्तामणराव देशमुख व सौ. देशमुख भेट देणार असल्याचें कळतें. या संस्थेंत सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्डातर्फे ग्राम-सेविका प्रशिक्षणार्थ १९५८-५९ या वर्षांसाठीं पाठविण्यांत येणार असल्याचें कळतें.

समाज-कल्याण बोर्ड मुंबई : यांचे विद्यमानें समाज कल्याणाच्या प्रश्नाला वाहिलेली मराठी व गुजराती मासिकें प्रकाशित करण्याची योजना तयार झाली असून लवकरच मासिकांचें प्रकाशन सुरु होणार असल्याचें कळतें.

अखिल भारतीय बाल शिक्षण परिषद : गेल्या वर्षी परिषदेचें दुसरें अधिवेशन नू. बा. शि. संघाच्या मदतीनें कोसबाड येथें भरविण्यांत आले होते. याच परिषदेचें तिसरें अधिवेशन पाटणा बिहार येथें भरविण्याचा तेथील किशोर दलाचें कार्यकर्ते विचार करीत आहेत.



चंद्रावर स्वारी

(एक प्राचीन लोककथा)

वानरांची पोरं एका अरण्यांत जमून खल करीत होतीं. सर्वांची तक्रार एकच: तुम्ही लहान, तुम्हांला कांहीं कळत नाहीं, असं हीं वडील माणसं म्हणत असतात. नी मग सर्वांनीं एकच गजर केला, "छे: छे: आम्ही मुळींच लहान नाहीं, आम्हांला सारं कांहीं कळूं लागलंय!" "नी वाटलं तर आम्ही हें सिद्धहि करून देऊं!" त्यांचा म्होरक्या गरजला, "चला रे, आपण आपली एक वानर-सेनाच बनवूंया, कीं मग आपल्याला काय हवं तें करतां येईल!"

ही सभा आटोपतांच सारे वानरवचे घरोघर गेले. पण त्या रात्रीं आईबापांच्या कुशींत कुणीहि झोपला नाहीं. एका तलावाकांठच्या झाडाच्या शेंड्यावर एकेक गट करून ते झोपले.

मध्यरात्रीच्या सुमारास एका वानरबालाला जाग आली. झाडाच्या त्या शेंड्यावरून त्याची नजर खालीं गेली. खालीं तलावांत चंद्राचं चकचकीत प्रतिबिंब त्याच्या दृष्टीस पडलं. लगेंच त्यानं आरोळी ठोकली, "अरे, उठा! उठा! चांदोबा तळ्यांत पडला आहे! चला, चला, दुसरं कुणी येऊन त्याला बाहेर काढायच्या पूर्वी आपणच काढूंया त्याला बाहेर!"

"वा वा, छान आहे कल्पना!" दोस्त मंडळी त्याला साथ देत उद्गारली, "एवढं करतां आलं तर आपला केवढा प्रचंड बोलबाला होईल!"

लगेंच त्यांचा म्होरक्या पुढं सरला नी म्हणाला, "त्या चंद्रापर्यंत पोंचायचं तर एकच मार्ग आहे. आपण सर्वांनीं मिळून आपली एक सांखळी बनविली पाहिजे!"


तावडतोब त्या वानरबालांनीं एकेकाची शेपटी घट्ट पकडून एक लांब सांखळी बनविली. म्होरक्या सर्वांत पुढें राहिला. आणि मग त्या साऱ्या टोळक्यानं धाडकन् खालच्या पाण्यांत उडी घेतली. उसळलेल्या पाण्याचा जंगी नाद अरण्यभर घुमदुमला — आणि शांत झाला! — सारे वानरबचे मरून गेले होते!!

तात्पर्य: आपल्याला कळतं असं ज्यांना केवळ वाटतं त्यांचा सल्ला घेतांना सावध रहा; ज्यांना खरोखरींच कांहीं कळतं त्यांचाच सल्ला ऐका. वनस्पतीचंच उदाहरण घ्या. वनस्पति हें हितकर अन्न असून भारतीयांच्या आहारांत त्याचं मोलाची भर पडली आहे, असंच मत आरोग्य नी शरीरपोषण या विषयांतील प्रमुख अधिकारी मंडळी एकमुखानं प्रकट करीत आहे. डालडा वनस्पति — जी लाखों गृहिणी पूर्ण विश्वासानं वापरीत आहेत — शुद्ध वनस्पति तेलांपासून सक्त सरकारी नियमानुसार बनविली आहे. सर्व स्वयंपाक प्रकारासाठीं ती वापरतां येते. शक्तिदायक स्निग्ध पदार्थ तींत भरपूर प्रमाणांत तर आहेतच, पण शिवाय ती जादा पुष्टिदायक आहे. 'डालडा'च्या प्रत्येक औंसांत ७०० आंतरराष्ट्रीय युनिट्स् — म्हणजे उत्तम तुपांत असतं तितकंच — अ जीवनसत्त्व घातलेलं असून, त्याशेरीज ५६ आंतरराष्ट्रीय युनिट्स् ड जीवनसत्त्वहि घातलं आहे. याप्रमाणें 'डालडा' स्वयंपाकासाठीं उत्तम तर आहेच, पण अन्न म्हणूनहि उपयुक्त आहे.

हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड, मुंबई

DL. 440-X52 MA

मुद्रक व प्रकाशक:—श्री. दोष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर—मुंबई १४.
मुद्रणस्थान:—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, मोरयाग रोड, दादर, मुंबई १४.




इब्राहीम कलीम ॲन्ड ब्रदर्स
प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई. खारघर - मद्रास आणि कॅलिकट





मोदी फार्मसी
पी. मोदी केमिकल्स लि., मुंबई, ४



युनिकेम लेबोरेटरीज, बम्बई, २६.

नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ वें : अंक ३ रा [आदिवासी बालशिक्षण विशेषांक] जून १९५८



आदिवासी बालशिक्षणाचा प्रश्न

मुकेच्या प्रश्नानें चिंताग्रस्त असलेल्या आदिवासी जनतेचीं मुलें आश्रमशाळांनीं योजलेल्या विनामूल्य वसतिगृहांत भरती होतील. तेथें त्यांना खावें—पिणें, कपडे आणि पांढरपेशी संस्कृतीचे संस्कार मिळतील. मूलोद्योगी शिक्षणानें या मुलांना औद्योगिक अर्थोत्पादन सहाय्यक शिक्षणही मिळेल; परंतु सध्यां मूलोद्योग शाळांच्या नांवानें जें कांहीं चाललें आहे, त्यांतून आदिवासी समाजाशीं संघटित आणि त्या समाजाबद्दल आत्मीयता वाटणारे असें समतोल व्यक्तिमत्व निर्माण होऊं शकेल कां ?

: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक


संपादक

श्री. शेष नामले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई—१४.	३७ नये पैसे




सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी



— सोल डिस्ट्रीब्यूटर्स —
ए. व्ही. जार. ए. जॅन्ड कं., मुंबई २



सोल डिस्ट्रीब्यूटर्स —
पेनसेन्स इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस
कंपनी (मुंबई ॐ एस डी)
लोकल ऑफिस : ७ माल्वेर स्ट्रीट, मुंबई २.



सर्वोत्तम केसांतुल्ले सौंदर्यात्मक
विशुद्धता यांमें स्वाभाविक आहे.
एज सेवकजांनें मिराश होण्याचें
मुकीच कारण नाहीं. लाखो
लोकांप्रमाणें तुम्हीसी लोंबा
पावरा व सौंदर्याचें औंदर्य
कायम राखा.



केसांना नैसर्गिकरीत्या काळेभोर
व लांब करण्यासाठीं जगभर मान्यता पावलेले.


सोल एजंटस्
एम. एम. संभातवाला, अमदाबाद १.
एजंटस् : डी मरोलस अॅण्ड कं., मुंबई २ को. ३०७७५



PS-11AR



"मिस झुलेखा सेटवर येण्याचें नाकारते.
ती म्हणते कीं टिनोपाल नें सफेद
केलेली साडी नेसलेल्या त्या "एक्स्ट्रा" पुढें
ती फिक्की पडेल अशी तिला भीति वाटते."



"टिनोपाल" हा जे आर गायगी, एस ए, बाल, स्वित्झरलॅन्ड यांचा रजिस्टर्ड ट्रेड मार्क आहे.

कारखानदार सुहृद गायगी प्रायव्हेट लिमिटेड, वाडी वाडी, वडोदा
एकमेव वितरक: सुहृद गायगी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पो. ऑ. बॉक्स ९६५, मुंबई

शोभायमान टिनोपालने सुशोभित कपडे मनाला आनंद चमचमदार पांढरे शुभ्र होतात

SISTA S SG 43 MAR

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई — उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक

कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी — कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे

चिटणीस : श्री. शेष नामले — उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण संस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपांत पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गांतून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठीं संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, **नूतन बाल-शिक्षण संघ,**
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे — श्री. अनुताई वाघ

सौ. सरलाताई देवधर — श्री. भा. धों. कर्वे

सौ. मालिनीबाई परांजपे

पूर्व प्राथमिक शिक्षण प्रमाणपत्र परीक्षांच्या परिणामांचा सारांश.

बसल्या	पहिला वर्ग	दुसरा वर्ग	पासवर्ग
अमदाबाद केन्द्र	७९	२	२५	३०
कोसबाड	१८	१	८	५
नागपूर	२२	८	१०	२
सोलापूर	३८	०	९	२४
पुणें	४८	७	२४	१७
मुंबई	२१०	२९	७२	६८

महत्वाच्या सूचना :

ग्राहकांस—

(१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.
'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन-विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल-शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

(२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नांवावर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारां-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

(३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नांवाचें एक सदर चाल-विण्यांत येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्यांना स्थान देण्यांत येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यांनीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे-पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

लेखकांस—

(१) 'शिक्षण-पत्रिकें'त लेख लिहूं इच्छिणारांनीं आपलें लेखन कागदाच्या एकाच बाजूवर करावें. तें दर महिन्याच्या ता. १ च्या आंत संपादन कार्यालयाकडे पाठवावें. पसंत नसलेल्या लेखांबरोबर पुरेसें पोस्टेज असल्यास लेख परत करण्यांत येतील.

(२) 'शिक्षण-पत्रिका' कोणत्याहि महिन्यापासून सुरू करतां येते.

(३) 'शिक्षण-पत्रिका' प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस पोस्टांत पडते. सामान्यतः ता. २५ पर्यंत ती सर्वांना मिळते. तशी न मिळाल्यास ग्राहकांनीं ता. ३० च्या आंत खालीं दिलेल्या पत्त्यावर कळवावें.

(४) 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रत्येक ग्राहकाचा नंबर पत्रिकेच्या वेष्टनावर लिहिलेला असतो. व्यवस्थापक-कार्यालयाशीं पत्रव्यवहार करतांना हा नंबर ग्राहकानें अवश्य कळवावा.

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका'
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ३] मुंबई [जून १९५८

संपादकीय

विकासवाडीचा वाढदिवस

गेल्या तेरा जूनला कोसबाडच्या आनंदवनांतील नव्या इमारतींत विकासवाडीच्या विविध संस्था स्थानापन्न झाल्याला एक वर्ष झालें असलें तरी गेल्या चार पांच वर्षांपासून या योजनेबाबत श्रीमती ताराबाईंचें विचारमंथन आणि प्रयोग सुरू आहेत. बोर्डीच्या परिसरांत त्यांनीं या योजनेसंबंधींचे सुरूवातीचे प्रयोग केलें. नंतर प्रत्यक्ष आनंदवनांतही नवीन इमारती सुरू करण्याचे आधीं एक वर्ष त्यांनीं श्री. अनुताई वाघ यांस अघाडीवर पाठवून आपल्या भावी योजनेसाठीं या वनाच्या आसपास वसलेल्या आदिवासी जनतेचा प्रतिसाद कसा मिळतो हें अजमावलें होतें. नंतर आनंदवनांत विकासवाडीच्या इमारती उभारल्या गेल्या आणि उत्साहमूर्ति श्रीमती खोरशेत बानुंच्या शुभ हस्ते विकासवाडीच्या कार्याला सुरुवात झाली. त्यामुळें तेरा जूनचा दिवस हा विकासवाडी योजनेचा पहिला वाढदिवस आहे असें मानायला हरकत नाहीं. या कार्याच्या वाढदिवसांत सहभागी होण्यासाठीं शिक्षण पात्रिकेनें या वेळीं विशेष रूप धारण करून ही विकासवाडी ज्या आदिवासी जीवनाच्या उत्थानासाठीं सुरु करण्यांत आली त्या आदिवासी जीवनाचा आणि त्यांच्या जीवन प्रश्नांचा अल्प परिचय आपल्या रसिक वाचकवृंदास करून देण्याचें योजिलें आहे. अर्थात् या सर्व मजकुराला नेहमींचीच पानांची मर्यादा असल्यानें आदिवासी बालशिक्षणाच्या दृष्टीनें महत्वाच्या अशा कित्येक गोष्टींना या अंकांत आम्ही स्थान देऊं शकलों नाहीं याची आम्हांला जाणीव आहे. परंतु या प्रश्नाविषयीं प्रेम असणारे वाचक ही आमची मर्यादा लक्षांत घेऊन आम्हाला क्षमा करतील अशी अपेक्षा करतों.

आदिवासी बालशिक्षणाचा कूट प्रश्न

विकासवाडी योजनेच्याद्वारें श्रीमती ताराबाई आदिवासी बालशिक्षणाचा राष्ट्रीय कूट प्रश्न सोडवूं पहात आहेत. बालवर्ग हें कोणत्याही प्रकारच्या जनतेच्या जीवनाच्या पुनर्रचनेचें अमोघ साधन आहे असा त्यांचा विश्वास असल्यामुळें आदिवासींच्या भूमींत या बालवाडीला कसें यशस्वी करून दाखवावें हा त्यांचेपुढें प्रश्न आहे. बालवाडींत आदिवासी मुलें यावीत म्हणून त्यांनीं बालवाडीला पाळणाघराची जोड दिली. आदिवाशी कुटुंबांत बालवाडीच्या वयाच्या बालकांना आपलीं धाकटीं भावंडें संभाळण्याची जबाबदारी त्यांच्या विशिष्ट आर्थिक परिस्थितीमुळें संभाळावी लागतें. पाळणाघरांत या धाकट्या भावंडांची सोय झाल्यानें बालवाडीच्या मुलांच्या संख्येंत अल्प काळ सुधारणा दिसली, परंतु लवकरच त्यांच्या लक्षांत आलें कीं आदिवासी मूल हें केवळ आपल्या धाकट्या भावंडांना संभाळीत स्वस्थ बसूं शकत नाहीं. अर्थोत्पादन करणें ही त्याची व त्याच्या कुटुंबाची आणि समाजाची अत्यंत अगत्याची प्राथमिक गरज आहे. या अर्थोत्पादनासाठीं या मुलांना आपण जोपर्यंत अर्थोत्पादक व्यवसाय पुरवीत नाहीं तोपर्यंत या आदिवासी बालकांचा मानसिक, आंतरिक सहकार आपणास मिळावयाचा नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेऊन पाळणा घरावरोबरच दुसऱ्या बाजूनें मूलोद्योगी प्राथमिक शाळेलाही त्यांनीं विकासवाडींत स्थान दिलें.

मूलोद्योगाला स्थान दिल्यानें प्रश्न सुटेल कां?

बालशिक्षणाचा प्रश्न नुसता आर्थिक नाहीं. हीं मुलें ज्याप्रकारच्या कुटुंबांतून येतात त्या आदिवासी कुटुंबांचा एक समाज आहे. त्या समाजाच्या स्वतःच्या अशा कांहीं चांगल्या आणि वाईट चालीरीती व समजुती आहेत. त्यांच्यांत विशिष्ट प्रकारचे धर्म संकेत आणि समाज संकेत प्रचलित आहेत. मर्यादित शब्दांचीं कां होईना पण त्यांची स्वतःची अशी एक बोली आहे. खाणें – पिणें व वेषभूषा आणि वागणूक

परिणामीं ज्या कित्येक अनिष्ट गोष्टी शिरल्या आहेत त्या जशाच्या तशा या लोकांत पसरूं नयेत याची काळजी व्यावयास हवी.

पहिली गोष्ट ही दिसते कीं शिक्षणामुळें बेकारी वाढते. कारण पाऊणशें टक्के लोक शिकून तयार झाले कीं नोकरीच्या शोधांत निघतात. एका नोकरीसाठीं हजारो अर्ज हा आजच्या शिक्षणाचा एक सरळ परिणाम पाश्चात्य देशांत दिसतो व आपल्या येथेंही तो चांगलाच दिसून येतो. तेव्हां पहिली गोष्ट म्हणजे उद्पादक, स्वतंत्र, आपल्या घरीं बसून करण्यासारख्या धंद्याची जोड यांच्या शिक्षणांत प्रथमपासून हवी.

दुसरें म्हणजे आज त्यांचीं शरीरें श्रमानें कसलीं जात आहेत. व त्यांचीं मनें जीवनाच्या अनुभवांतून कसलीं जात आहेत व त्यामुळें एक प्रकारची शक्ति मिळवीत आहेत. शिक्षणानें शरीरें श्रमास अक्षम व मनें दुसऱ्या शहाण्यांनीं काय सांगितलें तें समजून घेण्याच्याच मागें लागून दुर्बळ होऊं नयेत हेंही पहावयास हवें.


संस्कारांची देवघेव—

आदिवासी स्त्री-पुरुष मंडळी खांद्याला खांदा लावून उन्हातान्हांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत श्रमिक जीवन जगत असतात. या जीवनाच्या खडतरपणाचा अनुभव दोघांनाही सारखाच असतो. काम करतांना व संपल्यावर जीवनाची मौजही एकमेकांच्या कंबरेला धरून रात्रभर नाचण्यांत हीं सर्व बरोबरच लुटत असतात. तरुण मुलें मुलीही या प्रमाणें एकत्रच वाढत असतात. असें असूनही अथवा असें असल्यामुळेंच असेल कदाचित या मंडळींत आपल्या पांढरपेशांमधील एकमेकांकडे पहाण्याची लैंगिक अशुद्ध दृष्टि मुळींच दिसून येत नाहीं. आपल्यासारख्या लैंगिक भावनांच्या गुंतागुंती व चुथडाही फारसा दिसत नाहीं. एकंदरींत लैंगिक नीतिमत्तेची ह्यांची पातळी बरीच श्रेष्ठ प्रतीची दिससे. आपल्या बरोबर एखाद्या तरुण मुलीला घेऊन मुंबईमध्यें ट्राम, बस, अथवा आगगाडींतून जावें अथवा एखाद्या दुकानांत जावें अशी सर्वसाधारण मंडळींची स्त्रियांकडे पहाण्याची दृष्टि असते व आपल्या मुलीही लगेच पदर सावरतात, केसांवरून हात फिरवतात व थोड्याफार मुरकूं लागतात. या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर आपण आदिवासी मंडळींत हिंडू फिरूं लागलो म्हणजे मोठें समाधान वाटतें. पोरांच्या डोळ्यांत आक्रमकपणा दिसत नाहीं व पोरी लाजत मुरडत नाहींत. यांच्यांत लग्न होईपर्यंत मुली अंगावर पदर घेत नाहींत, खाली लुगडें नेसतात व वर चोळी अथवा पोलकीं घालून हिंडत असतात. बाजारांत जातात व कामावर जातात. पुरुषांच्या बरोबरीनें कामें करितात. मिजाजानें मस्त असतात. कोणी कोणाच्या वाटेला जायचें मनांतही आणीत नाहीं.

त्याचप्रमाणें आपल्यामध्यें संग्रहाचा जो हव्यास दिसून येतो तो यांच्यांत मुळींच नाहीं. गरजे इतकेंही विकत घेणें शक्यच नसतें तेव्हां गरजेपेक्षां अधिक घेऊन संग्रह करून ठेवण्याची लालसा कोठून असणार? पैशाचा अभाव हें जरी कारण असलें तरी त्यांचें समाधान पाहून खरोखरच बरें वाटतें. आणखी लुगडीं हवींत, आणखी भांडीं हवींत, आणखी फर्निचर हवें ही आपल्या सामान्य गरीब स्थितींतील मंडळींची इच्छा असते. मग श्रीमतांच्या हव्यासाच्या रोगी अवस्थेचें तर काय वर्णन करायचें! त्या ऐवजी एक लुगडें चोळी नवी आणली कीं बस झाली तृप्ति! तें नेसून केवढ्या समाधानानें त्या हिंडत असतात! तें पाहून आपल्या मनाला आनंद वाटतो व आपल्या संग्रहाची लाज वाटूं लागते. त्यांच्यांत अशा अनेक गोष्टी आहेत कीं ज्या आपल्या सहवासांत आल्यामुळें त्यांच्यांतून नाहींशा होतील कीं काय अशी आपल्याला भीति वाटतें.

कार्यकर्त्यांची दृष्टि नेहमीं आपल्या व त्यांच्यांतील चांगल्या संस्कारांची देवाण घेवाण करण्याची असायला हवी.

ना. मोडक



सुगंधित झरणपासून बनणारें तेल

आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.



१. गळणारें केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२. मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M, P. S

वारली लोकगीतें

साहित्यामध्यें लोकसाहित्याला एक विशेष स्थान मिळालें आहे. हा अभ्यास खूप मनोरंजक असतो. या साध्या गोष्टी व गाणीं वगैरे मध्यें पुष्कळ काव्य असतें. व तें सर्व जीवनस्पर्शी असतें.

कोसबाड येथें वारली लोकांची वस्ती आहे. त्यांच्या मुलांकडून कांहीं गीतें व कांहीं नाटकें आम्हाला मिळालीं आहेत. तीं पुढें देत आहोंत.

कोणताही कार्यक्राम सुरू करावयाच्या आधीं नमन हें प्रथम असायचेंच. बहुतेक इतरत्र गणेशाच्या नमनापासून सुरुवात होत असते. परंतु या लोकांचें नमन लक्षांत घेण्यासारखें आहे. सुख देणारा ईश्वर व निसर्गांतील चंद्र, सूर्य, ढग, वीज, पाऊस इत्यादि देवांना त्यांचें नमन असतें.

नमन

पायीं लागून आम्ही नमूं कोणेरी देवाला—कोणेरी देवाला
नमूं नमूं सुखेश्वराला—कोणेरी देवाला. ॥ ध्रु ॥
पायीं लागून आम्ही नमूं कोणेरी देवाला
नमूं नमूं चंद्र सूर्याला—घणूं नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं ढगेश्वराला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं वीजेश्वराला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं पाऊस देवाला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं धरतरी मातेला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं चेडी वेडीला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं गांवच्या पाटलाला—नमूं कोणेरी देवाला
पायीं लागून आम्ही नमूं कोणाला.

आपल्या इकडे तमाशे होतात तसेच या लोकांचे राघेय होतात. त्यांत एक सोंगाड्या असतो, एक राघा असते व बाकी वाद्यें असतात, त्यांत सोंगाड्या गाणें म्हणतो व बाकीचीं त्यांच्या मागून तीच ओळ म्हणतात. राघेयाच्या तयारीचें गाणें पुढीलप्रमाणें—

ढोलकेवाल्याला तयार करा—तुम्ही ढोलकेवाल्याला तयार करा
डफवाल्याला तयार करा—तुम्ही डफवाल्याला तयार करा
तुणतुणवाल्याला तयार करा—तुम्ही तुणतुणवाल्याला तयार करा
टाळवाल्याला तयार करा—तुम्ही टाळवाल्याला तयार करा
चिपळयावाल्याला तयार करा—तुम्ही चिपळयावाल्याला तयार करा
राघाबाईला तयार करा—तुम्ही राघाबाईला तयार करा
सोंगाड्यादादाला तयार करा—तुम्ही सोंगाड्यादादाला तयार करा

कोणा बागवानाची मुलगी लग्न करून सासरीं जात असेल तेव्हां तिच्या मनांत शंका येणें साहजिक आहे कीं येथें एवढी बाग आहे ही सोडून आतां जावें लागणार—तेथें मला कसें करमेल—तर सासरची न्यायला आलेली मंडळी तिला गाणीं म्हणून आश्वासन देतात कीं, आमचें गांव तुला करमेल असेंच आहे. गाण्याच्या कडव्यांत मुख्य ओळी त्याच त्याच येत असल्यामुळें निरनिराळ्या झाडांची नांवें घालून तें वाटेल तितकें वाढवतां येतें व आपल्या प्रदेशाचे चित्र उभें करतां येतें.

वाटेवरलीं चिंचेचीं झाडें.
चिंचे लागले किती
एकशें साठ—आठ—पाट
अग माळीणबाई, तुला करमेल चांदणी रात ॥ १ ॥
वाटेवरल्या आंब्याचीं झाडें
आंबे लागले किती
एकशें साठ—आठ—पाट
अग माळीणबाई, तुला करमेल चांदणी रात ॥ २ ॥
वाटेवरलीं नारळीचीं झाडें
नारळीला नारळ लागलें किती
एकशें साठ—आठ—पाट
अग माळीणबाई, तुला करमेल चांदणी रात ॥ ३ ॥



वारली स्त्री

परिणामीं ज्या कित्येक अनिष्ट गोष्टी शिरल्या आहेत त्या जशाच्या तशा या लोकांत पसरूं नयेत याची काळजी ध्यावयास हवी.

पहिली गोष्ट ही दिसते कीं शिक्षणामुळें बेकारी वाढते. कारण पाऊणशें टक्के लोक शिकून तयार झाले कीं नोकरीच्या शोधांत निघतात. एका नोकरीसाठीं हजारो अर्ज हा आजच्या शिक्षणाचा एक सरळ परिणाम पाश्चात्य देशांत दिसतो व आपल्या येथेंही तो चांगलाच दिसून येतो. तेव्हां पहिली गोष्ट म्हणजे उद्पादक, स्वतंत्र, आपल्या घरीं बसून करण्यासारख्या धंद्याची जोड यांच्या शिक्षणांत प्रथमपासून हवी.

दुसरें म्हणजे आज त्यांचीं शरीरें श्रमानें कसलीं जात आहेत. व त्यांचीं मनें जीवनाच्या अनुभवांतून कसलीं जात आहेत व त्यामुळें एक प्रकारची शक्ति मिळवीत आहेत. शिक्षणानें शरीरें श्रमास अक्षम व मनें दुसऱ्या शहाण्यांनीं काय सांगितलें तें समजून घेण्याच्याच मागें लागून दुर्बळ होऊं नयेत हेंही पहावयास हवें.


संस्कारांची देवघेव—

आदिवासी स्त्री-पुरुष मंडळी खांद्याला खांदा लावून उन्हातान्हांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत श्रमिक जीवन जगत असतात. या जीवनाच्या खडतरपणाचा अनुभव दोघांनाही सारखाच असतो. काम करतांना व संपल्यावर जीवनाची मौजही एकमेकांच्या कंबरेला धरून रात्रभर नाचण्यांत ही सर्व बरोबरच लुटत असतात. तरुण मुलें मुलीही या प्रमाणें एकत्रच वाढत असतात. असें असूनही अथवा असें असल्यामुळेंच असेल कदाचित या मंडळींत आपल्या पांढरपेशांमधील एकमेकांकडे पहाण्याची लैंगिक अशुद्ध दृष्टि मुळींच दिसून येत नाहीं. आपल्यासारख्या लैंगिक भावनांच्या गुंतागुंती व चुथडाही फारसा दिसत नाहीं. एकंदरींत लैंगिक नीतिमत्तेची ह्यांची पातळी बरींच श्रेष्ठ प्रतीची दिसते. आपल्या बरोबर एखाद्या तरुण मुलीला घेऊन मुंबईमध्यें ट्राम, बस, अथवा आगगाडींतून जावें अथवा एखाद्या दुकानांत जावें अशी सर्वसाधारण मंडळींची स्त्रियांकडे पहाण्याची दृष्टि असते व आपल्या मुलीही लगेच पदर सावरतात, केसांवरून हात फिरवतात व थोड्याफार मुरकूं लागतात. या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर आपण आदिवासी मंडळींत हिंडू फिरूं लागलो म्हणजे मोठें समाधान वाटतें. पोरांच्या डोळ्यांत आक्रमकपणा दिसत नाहीं व पोरी लाजत मुरडत नाहींत. यांच्यांत लग्न होईपर्यंत मुली अंगावर पदर घेत नाहींत, खाली लुगडें नेसतात व वर चोळी अथवा पोलकीं घालून हिंडत असतात. बाजारांत जातात व कामावर जातात. पुरुषांच्या बरोबरीनें कामें करितात. मिजाजानें मस्त असतात. कोणी कोणाच्या वाटेला जायचें मनांतही आणीत नाहीं.

त्याचप्रमाणें आपल्यामध्यें संग्रहाचा जो हव्यास दिसून येतो तो यांच्यांत मुळींच नाहीं. गरजे इतकेंही विकत घेणें शक्यच नसतें तेव्हां गरजेपेक्षां अधिक घेऊन संग्रह करून ठेवण्याची लालसा कोठून असणार? पैशाचा अभाव हें जरी कारण असलें तरी त्यांचें समाधान पाहून खरोखरच बरें वाटतें. आणखी लुगडीं हवींत, आणखी भांडीं हवींत, आणखी फर्निचर हवें ही आपल्या सामान्य गरीब स्थितींतील मंडळींची इच्छा असते. मग श्रीमतांच्या हव्यासाच्या रोगी अवस्थेचें तर काय वर्णन करायचें! त्या ऐवजी एक लुगडें चोळी नवी आणली कीं बस झाली तृप्ति! तें नेसून केवढ्या समाधानानें त्या हिंडत असतात! तें पाहून आपल्या मनाला आनंद वाटतो व आपल्या संग्रहाची लाज वाटूं लागते. त्यांच्यांत अशा अनेक गोष्टी आहेत कीं ज्या आपल्या सहवासांत आल्यामुळें त्यांच्यांतून नाहींशा होतील कीं काय अशी आपल्याला भीति वाटतें.

कार्यकर्त्यांची दृष्टि नेहमीं आपल्या व त्यांच्यांतील चांगल्या संस्कारांची देवाण घेवाण करण्याची असायला हवी.

ना. मोडक



सुगंधित झरणपासून बनणारें तेल

आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.



१. गळणारें केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२. मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M. P. S 9

वारली लोकगीतें

साहित्यामध्यें लोकसाहित्याला एक विशेष स्थान मिळालें आहे. हा अभ्यास खूप मनोरंजक असतो. या साध्या गोष्टी व गाणीं वगैरे मध्यें पुष्कळ काव्य असतें. व तें सर्व जीवनस्पर्शी असतें.

कोसबाड येथें वारली लोकांची वस्ती आहे. त्यांच्या मुलांकडून कांहीं गीतें व कांहीं नाटकें आम्हाला मिळालीं आहेत. तीं पुढें देत आहोंत.

कोणताही कार्यक्राम सुरू करावयाच्या आधीं नमन हें प्रथम असायचेंच. बहुतेक इतरत्र गणेशाच्या नमनापासून सुरुवात होत असते. परंतु या लोकांचें नमन लक्षांत घेण्यासारखें आहे. सुख देणारा ईश्वर व निसर्गांतील चंद्र, सूर्य, ढग, वीज, पाऊस इत्यादि देवांना त्यांचें नमन असतें.

नमन


पायीं लागून आम्ही नमूं कोणेरी देवाला—कोणेरी देवाला
नमूं नमूं सुखेश्वराला—कोणेरी देवाला. ॥ ध्रु ॥
पायीं लागून आम्ही नमूं कोणेरी देवाला
नमूं नमूं चंद्र सूर्याला—घणूं नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं ढगेश्वराला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं वीजेश्वराला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं पाऊस देवाला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं घरतरी मातेला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं चेडी वेडीला—नमूं कोणेरी देवाला
घणूं नमूं गांवच्या पाटलाला—नमूं कोणेरी देवाला
पायीं लागून आम्ही नमूं कोणाला.

आपल्या इकडे तमाशे होतात तसेच या लोकांचे राघेय होतात. त्यांत एक सोंगाड्या असतो, एक राघा असते व बाकी वाद्यें असतात, त्यांत सोंगाड्या गाणें म्हणतो व बाकीचीं त्यांच्या मागून तीच ओळ म्हणतात. राघेयाच्या तयारीचें गाणें पुढीलप्रमाणें—

ढोलकेवाल्याला तयार करा—तुम्ही ढोलकेवाल्याला तयार करा
डफवाल्याला तयार करा—तुम्ही डफवाल्याला तयार करा
तुणतुणवाल्याला तयार करा—तुम्ही तुणतुणवाल्याला तयार करा
टाळवाल्याला तयार करा—तुम्ही टाळवाल्याला तयार करा
चिपळयावाल्याला तयार करा—तुम्ही चिपळयावाल्याला तयार करा
राघाबाईला तयार करा—तुम्ही राघाबाईला तयार करा
सोंगाड्यादादाला तयार करा—तुम्ही सोंगाड्यादादाला तयार करा

कोणा बागवानाची मुलगी लग्न करून सासरीं जात असेल तेव्हां तिच्या मनांत शंका येणें साहजिक आहे कीं येथें एवढी बाग आहे ही सोडून आतां जावें लागणार—तेथें मला कसें करमेल—तर सासरची न्यायला आलेली मंडळी तिला गाणीं म्हणून आश्वासन देतात कीं, आमचें गांव तुला करमेल असेंच आहे. गाण्याच्या कडव्यांत मुख्य ओळी त्याच त्याच येत असल्यामुळें निरनिराळ्या झाडांची नांवें घालून तें वाटेल तितकें वाढवतां येतें व आपल्या प्रदेशाचे चित्र उभें करतां येतें.

वाटेवरलीं चिंचेचीं झाडें.
चिंचे लागले किती
एकशें साठ—आठ—पाट
अग माळीणबाई, तुला करमेल चांदणी रात ॥ १ ॥
वाटेवरल्या आंब्याचीं झाडें
आंबे लागले किती
एकशें साठ—आठ—पाट
अग माळीणबाई, तुला करमेल चांदणी रात ॥ २ ॥
वाटेवरलीं नारळीचीं झाडें
नारळीला नारळ लागलें किती
एकशें साठ—आठ—पाट
अग माळीणबाई, तुला करमेल चांदणी रात ॥ ३ ॥



वारली स्त्री

मुलीला लग्नाकरितां किंवा सासरीं धाडण्याकरितां तयार करायची तेव्हां वडिल मंडळीचे लाडके भाव खालील गीतामध्यें दिसतात.

धीरे धीरे चाल ग मैना—धीरे धीरे चाल ।
धीरे धीरे बोल ग मैना—धीरे धीरे बोल ।
मोठीं जोडवीं भर ग मैना—धीरे धीरे भर ।
मोरी झांजरा लाव ग मैना—धीरे धीरे लाव ।
कंबरे साडी लाव ग मैना—धीरे धीरे लाव ।

मुलीला सासरीं पाठविण्याची तयारी बघा । पोरीचा नवरा येईल ग कवा ॥ आतां दर्जी चालला ग बाई । पोरीचा नवरा येईल कवा ॥

पोरीचा नवरा येईल कवा । आतां सोनार चालला ग बाई ॥ पोरीचा नवरा येईल कवा ।

मुलगी सासरीं जायला निघाली. आईचा जीव कळवळून आला. आपल्या लाडाने वाढविलेल्या नाजुक मुलीला सासरीं कोण जाणें किति कष्ट करावे लागतील ? ती सासरच्या मंडळीनां विनवूं लागली.

माझी सोन्याची पावली ना मोती ना वावला । आमची नवरीला हो, दूरच्या कुई धाडूं नको हो धाडूं नको ।

सासरची मंडळी म्हणतात
तेची माईचे लाड ।

हें आईचे लाड सासरी कसे चालणार ? दूरच्या विहिरीवरही जावेंच लागणार असा त्याचा भावार्थ.

बापाला वाटतें आपण तरी सांगून पहावें. तो म्हणतो सोन्याची पावली नी मोती ना वावला ।


आमच्या नवरीला दूरच्या डोंगरा धाडूं नको धाडूं नको ।
जबाब मिळतो ते तर बापाचे लाड.
मुलीचा भाऊ पुन्हा सांगून पाहतो.
आमची सोन्याची पावली मोती ना वावला ।
आमच्या नवरीला दूरच्या वाड्यांत धाडूं नको धाडूं नको ।
पुन्हा तोच जबाब ते तर भावाचे लाड.


काय करणार बिचारी ? मुलीला सासरीं पाठवल्यावर माहेरच्या मंडळीचा काय हक्क चालणार ?

जांवई सासुरवाडीच्या गांवीं येतात; पण एकदम घरीं जाण्याचा संकोच वांटतो. मघें झाडावर चढून बसतात. मग सासरची मंडळी सासूसासरे जात असतील त्यांच्या मागोमाग सासरी जातो त्यासंबंधींचें गीत पहा.

तिकडूनशी आलें नवल पाखरूं बसलें डहाळीवर जी जी ।
सासऱ्याच्या मागें चालला नीट वाटेला सख्या जी, जी ।
तिकडूनशीं आलें नवल पाखरूं बसले डहाळीवर जी जी ।
सासूच्या मागें चालला नीट वाटेला सख्या जी जी ।
तिकडूनशीं आलें नवल पाखरूं बसलें डहाळीवर जी जी ।

कांहीं गोष्टींची नाटकेंही होत असतात. त्यांत तोंडाला मुखवटे बांधणें व निरनिराळें पोशाख करणें यालाही स्थान असतें. त्याचप्रमाणें त्यांचें हालचालींत नृत्य असतें. मधें संभाषण असतें व गाणीं असतात.





आंगणवाडी

एक म्हातारी पाटलाकडे कामं मागायला येते. बरेंच संभाषण होतें. पाटील म्हणत असतात कीं, तुझ्यानीं कांही काम व्हायचें नाहीं, तूं काय करूं शकतील ? म्हातारी सांगते मी जंगलांतून मोळ्या आणीन, पानें आणीन वगैरे. पाटील म्हणतो, जंगलांत जनावरें असतात; वानरें असतात; तुला तीं बोचकारतील,-पाडतील. म्हातारी जोरांत सांगतें, मी वानराला भिंत काय ? आलीं तर त्यांना मारून, घालवून देईन आणि मोळ्या घेऊन येईन. पाटील बरें म्हणतात व म्हातारी आनंदानें नाचत जंगलांत जाते, लाकडें गोळा करते, मोळी बांधून जायला निघते, तेवढ्यांत वानरें येतात. म्हातारी थोडी झुंजते पण शेवटीं वानरें तिला बोचकारतात व पाडतात. मग ती पाटलाकडे जाते व पुन्हा दुसरीं जंगलांत जाण्याची कामें मागते. तेव्हां पाटील शेण्या वेचून आणणें, डोबी (म्हशी) ना पाणी पाजायला नेणें वगैरे कामें तिला सोपवितो. व पुनः पुन्हा वानराशीं झुंज व म्हातारीचें पडणें चालतें.

या सर्व दृश्यांतील संभाषणामध्यें पुष्कळ विनोदाला व आयत्यावेळीं सुचून बोलण्याला अवकाश असतो. व त्यांतही त्यांच्या जीवनांतील करुण कहाण्या असतात. पण त्याकरतां रडत, दुःख करत न बसतां गमतीनें व विनोदानें ते तीं सहज वनवतात. कथानक अगदीं साधें असून पुनः पुन्हां थोड्याशा फरकानें तींच दृश्यें आलीं तरी एकंदरींत कंटाळवाळे होत नाहीं कारण त्यामध्यें विनोद, गाणीं, नृत्यें व खिलाडूवृत्तीचें सुंदर मिश्रण असतें.

—मा. खेर

———

एका नाटकांत एक कुंभार व कुंभारिण येतात. व त्यांच्याशी सोंगाडेदादाचें संभाषण चालतें. व कुठून आलांत, काय करतां वगैरे प्रास्ताविक गोष्टी झाल्यावर, तो कुंभाराला हंडे मडकीं करावयास सांगतो. इकडे सोंगाड्यादादाचें ढोलकें वाजून गाणें सुरूं होतें व तिकडे कुंभारदादा व कुंभारीणबाई आपलें चाक घेऊन मडकीं तयार करण्याचा अभिनय करूं लागतात. चाकाच्या जागीं एखादा मुलगा पांघरूण घेऊन बसतो व कुंभारदादा हाताच्या हालचालीनें मंडकीं उतरवूं लागतो.

कुंभारिणबाई, कुंभारेदादा बरे हंड्याची सोय ग करजो-बरे आवेचीं सोय ग करजो।

कुंभारिणबाई, कुंभारेदादा बरे हाटोलीची सोय ग करजो-बरे आवेची सोय ग करजो कुंभारीणबाई-कुंभारेदादा बरे कोडलीची सोय ग करजो-बरे आवेची योय ग करजो।

या कडव्यांच्या मधें मधें सभाषण, विनोद व एकमेकांच्या भोंवती नाचणें वगैरे असल्यामुळें एकंदर नाटक चांगलेच रंगतें.

तसेंच एक दुसरें बाल्याचें नाटक आहे. गाण्याचें कडवें एकच आहे.

आईली नी बाईली दोघेजण, बाल्या नांगर हाकूतो।

यांत शेतकरी जीवनाचें पडसाद उमटलेले दिसतात. बाल्या नांवाचा एक मजूर पाटलाच्या घरीं येतो व काम मागतो. पाटलाचा माणूस विचारतो कीं, तूं काय काय करशील ? त्यांत जमिनीच्या मशागतीचें, नांगरण्याचें व पिकपाणी सांभाळण्याचे वगैरे वेगवेगळ्या क्रिया येतात. मजूर म्हणून राहिल्यावर कामचुकारपणा कसा होत असतो यांचेंच हें नाटक असतें. बाल्याला पाटील जमीन मोजून देतो व बाल्या त्याच्यावर सुंदर नृत्य करून नांगरण्याची वगैरे क्रिया दाखवतो. व तिकडे ढोलकेंवाला वरीलप्रमाणें गाणें म्हणत असतो.

आईली बी बाइली दोघे जण बाल्या नांगर हाकूतो।

पण थोड्याच वेळांत बाल्या थकून जातो व झाडाखालीं विडी प्यायला बसतो. तिकडून पाटलाचा माणूस येतो आणि पाहतो तो शेतावरचे काम बंद असतें व बाल्या कोठेंही दिसत नाहीं. मग त्याला शोधून काढून काठीनें मारतो. आणि काम कसें बंद पडलें याबद्दल टपका देतो. तेव्हां बाल्या गयावया करून पुन्हां आपण असें करणार नाहीं असें कबूल करून काम मागतो. "काय पाटील, बाल्याला द्यायचे का काम ? 'आणखी एकदां हेरू' (पुनः एकदां पाहूं) असें पाटील उत्तर देतात मग बाल्यांचा नाच व ढोलक्यावरील गाणें पुन्हा सुरूं होतें.

अशीच एक म्हातारीची गोष्ट आहे—

मुलाखती

(१) स्वामी आनंद, कोसवाड

आदिवासी विभागांत काम करणाऱ्या कांहीं प्रसिद्ध व्यक्तींची मुलाखत मी घेतली त्याचा सारांश खालीं दिला आहे.

स्वामी आनंद यांनीं संबंध ठाणें जिल्ह्याची आर्थिक पहाणी १९३५ सालीं करून आपले निष्कर्ष १९३९ सालीं लिहून काढले होते. म्हणून त्यांचें त्यावेळचे अनुभव काय आहेत ते समजून घेण्याच्या दृष्टीनें मी त्यांना भेटलों. सुमारे वीस वर्षांपूर्वी आदिवासी विभागांत कोणकोणते धंदे चालू होते ? या माझ्या प्रश्नास त्यांनीं खालील उत्तर दिलें, "आदिवासी विभागांत खालील धंदे मुख्यतः चालतः—आंबाडी घायवात वगैरे जातीच्या वनस्पतीपासून दोर विणून ते बाजाराच्या दिवशीं विकावयास येत असत. आतां हा धंदा पूर्वीइतका चालत नाहीं. गिरण्यानीं हा धंदा बसविला आहे.

"दुसरा धंदा म्हणजे गवत कापणें. आदिवासी लोक अजून सुद्धां या धंद्यांत पुष्कळसे गुंतलेले दिसतात. पूर्वी गवत कापणीसाठीं खांडबारा, नंदुरबारपर्यंत हे लोक जात असत.

"चुन्याच्या घाणीच्या धंद्यांतही बरेचसे आदिवासी कामास असत. बरेचसे आदिवासी रेडा स्वतःचा बाळगीत व तो घाणीच्या कामासाठीं बरोबर घेऊन जात. सिमेंटच्या कारखान्यामुळें हा चुन्याच्या घाणीचा धंदा आतां जवळ जवळ बंद पडला आहे.

"जंगलांतील लांकडापासून कोळसे पाडणें हा मोठा धंदा असे. काथोडी लोक हा धंदा मुख्यतः करीत असत. पण आतां तो धंदा ऑन-ट्रक्टराद्वारें चालतो.

"पुष्कळसे ठाणे जिल्ह्यांतील आदिवासी लोक मुंबईच्या आसपास कामधंद्यास जात. त्याकाळीं मुंबईच्या परिसरांत काडी पेट्या बनविण्याचें सुमारें ३० कारखाने छोट्या प्रमाणावर चालत. त्यासाठीं लागणाऱ्या डब्यांसाठीं लांकडाच्या पातळ चीपा वगैरे रंगीन कागदाने चिकटवून डब्या तयार करण्याचीं कामें या लोकांना घरीं मिळत असत. Wimco ने हा धंदा नामशेष केला.

"या शिवाय जंगल संपत्ती गोळा करण्यांत बऱ्याच आदिवासीयांना काम असे. यामध्यें मध गोळा करणें, रानांतील खैराच्या लाकडांतून काथ करणें, रंगासाठीं हिरड्यासारख्या बिया गोळा करणें, इतर औषधी वनस्पती शोधून ती व्यापाऱ्यास विकणें वगैरे उद्योग त्या काळीं चालत. अजूनही हे धंदे थोड्या फार प्रमाणात चालू आहेत.

"या धंद्यांतून मिळणारा पैसा पुष्कळदां दारूत जात असे व दौर्बल्यही प्राप्त होत असे. त्यापायीं होणारी शारीरिक झीज भरून निघण्यासाठीं हे लोक ताडी पीत असत. हल्लीं त्यांना निरा देण्यांत येतो हें चांगलें आहे. निरेची सवय त्याना लागली पाहिजे."

(२) श्री. बापुराव अमृते—घोलवड

आदिवासी लोकांच्यामध्यें अनेक वर्षें श्री. बापूसाहेब अमृ काम करीत आहेत. आदिवासी लोकांची सध्यांची आर्थिक परिस्थिति कशी काय आहे हें समजून घेण्याच्या उद्देशानें मी त्यांना भेटलों.

आदिवासी लोकांची सध्यांची आर्थिक परिस्थिति कशी आहे या माझ्या प्रश्नास ते म्हणाले,

" पहाण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. त्यांची राहण्याची मूलभूत परिस्थिति भिन्न आहे. नुसत्या कपड्यालत्त्यावरून अगर दिखाऊपणा वरून त्यांच्या परिस्थितीचें अनुमान काढणें बरोबर नाहीं. त्याची रहाण्याची मूळ ठेवण पाहिली पाहिजे म्हणजे त्याच्यांतील सुधारणा आपणांस दिसेल."

" आपली आर्थिक परिस्थिती सुधारली या बद्दलची आदिवासीची मुळ कल्पना काय आहे यावद्दल थोडें स्पष्टीकरण कराल का !"

त म्हणाले, " घरचें बीं ज्याच्याकडे आहे त्याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, असें आदिवासी समजतो. त्याच प्रमाणें स्वतःचा नांगर व स्वतःचे बैलही हवेत. शेती करण्यासाठीं घरच्या माणसांचें पुरेसें पाठबळही हवें. स्वतःची गाडी असणें हे सुद्धां चागल्या परिस्थितीचें लक्षण तो मानतो. मात्र त्याच्याकडे रोकड फारशी मिळत नाहीं. ५।५० रु. लागले कीं त्याचें अडतें व तो सावकाराकडे धांव घेतो."

ते पुढें म्हणाले " सरकार यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं अनेक प्रयत्न करीत आहे. ज्या रकमा योजनेंत घातल्या गेल्या आहेत त्या योग्य माणसास मात्र मिळाल्या पाहिजेत. या योजनांचा फायदा मुंबईहून आलेला नोकरपेशी पुष्कळदां उपटतो; कारण त्याची त्याला माहिती असते, म्हणून योग्य ठिकाणींच या रकमा खर्चीं पडल्या पाहिजेत. पाणी झाडाच्या मुळापर्यंत पोहचविलें पाहिजे. यांची आर्थिक परिस्थिति खालावण्याचें एक कारण असें आहे कीं या लोकांमध्यें घरजांवई आणण्याची प्रथा आहे. हा जांवई मेहुण्याला परका वाटतो. पुढें परिवार वाढतो. भांडणे होतात; व बाहेरील माणसें याचा फायदा घेतात."

"यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं त्यांना खालील धंदे करतां येतील. कोंबडी, बकरी, गुरें पाळणें हें धंदे त्यांना पद्धतशीरपणें सहज करतां येतील. एक कोंबडी त्यांना सुमारें १७ पिलें देतें. कोंबडीपासून मिळणाऱ्या उत्पन्नांतून त्यांची मीठ मिरची सहज सुटते. बकरी त्याच्या बायकोला लुगडें पुरवतें. तर बैल म्हणजे लग्नवेळचें चलन ठरतो. गुरांचा धंदा याना पद्धतशीर करतां येण्यासारखा आहे. विण्यापूर्वी कांहीं महिने गुरें दूध देण्याच्या थांबतात. अशीं गुरें पोसणीस म्हणून आणावी. जंगल-

मध्यें चारापाण्यावर फारच थोडा खर्च होतो. त्याचा मोबदला मात्र मालकाकडून घ्यावा.

"या धंद्याला पद्धतशीर स्वरूप दिल्यास आदिवासी लोकांना एक चांगला धंदा लाभेल व त्यांचें नेहमींचें कोळसा पाडणें वनौषधी विकणें वगैरे त्यांचे धंदे चालूच राहतील."

(३) श्री. वसंतराव व सौ. कुसुमताई नारगोळकर—कैनाड—ता. डहाणु

श्री. वसंतराव नारगोळकर यांच्या कैनाड केंद्रावरील त्यांचे शक्षणिक अनुभव काय आहेत हे जाणून घेण्याच्या इच्छेनें मी त्यांची गांठ केंद्रावर जावून घेतली. श्री. वसंतराव व सौ. कुसुम ताईनीं खालील उद्‌बोधक माहिती सांगितली.

"आदिवासी मुलांना पुस्तकी शिक्षण देऊन चालणार नाहीं. त्यांना जीवनांतूनच शिक्षण दिलें गेलें पाहिजे. या दृष्टीनें जीवन शिक्षण पद्धति फारच चांगली आहे. आदिवासी लोक आतां जागे झाले आहेत. आदिवासी सेवा मंडळें व आदिवासी यांच्या उन्नतीसाठीं निघालेलीं निरनिराळीं केंद्रे या सर्वांच्या प्रयत्नामुळें आदिवासीयांत आतां पुष्कळ जागृति झाली आहे. तरीसुद्धां शिक्षण, दारूबंदी अशा-सारख्या प्रयत्नांना अगदीं अल्पसें यश मिळालें आहे. आदिवासीयांमध्यें संग्रहाची भावना नसते. मुंगीमध्यें असलेलें दूरदर्शित्व यांच्यामध्यें नाहीं. हा जगांतील सर्व आदिवासीयांबद्दलचा सिद्धांत ठाणें जिल्ह्यांतील आदिवासीयांनाही लागूं पडतो. त्यामुळें शिक्षण घेतल्यानें आपला पुढें काय फायदा होईल याची त्यांना कल्पनाच करतां येत नाहीं."

कैनाडच्या शाळेंत मुलांचे शिक्षण कशाप्रकारें चालतें या माझ्या प्रश्नाचें उत्तर देतांना ते म्हणाले "आमच्या येथें वसतिगृह आहे व गांवांतील दोन विद्यार्थी शिकण्यास येतात. वसतिगृह असल्यामुळें उपस्थिति नियमित असते. अमुक तास शाळा भरलीच पाहिजे. अमुक अमुक अभ्यासक्रम पुरा झालाच पाहिजे असा आग्रह आम्ही धरीत नाहीं. सकाळीं दोन तास शेताचें काम चालतें व दोन तास वस्त्र स्वावलंबनासाठीं कताई चालते. कामांतूनच ज्ञान दिलें जातें. वर्गांतील अध्यापन असें १ ते ५ पर्यंतच्या वेळांत होतें. झीज, भर अशा स्वरुपाची माहिती निसर्गांतून दिली जाते यासाठीं शिक्षकाची बौद्धिक पातळी वरच्या दर्जाची हवी. तो मूलोद्योगांतही तज्ञ हवा. विद्यार्थी पांढरपेशे बनणार नाहींत हे कटाक्षानें पाहिलें जातें. या दृष्टीनें शिक्षकानें प्रथम मजूर बनलें पाहिजे. तो पोषाखी असून चालणार नाहीं.

"प्रथम प्रथम वसतिगृहाच्या वातावरणाशीं मुलें समरस झाली नव्हती. त्यामुळें घरीं पळून जाणाऱ्या मुलांची सख्या जास्त होती. परंतु आतां मुलें फारशीं पळून जात नाहींत. त्यांना वसतिगृहांत जेवण चांगलें मिळतें. भाजी, फोडणी, ताक, दूध, वगैरेचा समावेश अशामध्यें केला जातो. घरच्या जेवणापेक्षां या जेवणाचे आकर्षण त्यांना अधिक वाटत असल्यानें तीं पळून जात नाहींत असें वाटतें. यामुळे गेल्या ४ महिन्यांत एकहि मुलगा पळाला नाहीं. सुट्या यांच्या गरजेप्रमाणें व सणांच्या महत्वाच्या मानानें देण्यांत येतात. बी पेरल्यापासून कापड तयार करण्यापर्यंत एक व्ययसाय मुलांपुढें ठेवण्यांत येतो व उत्पादन वाढविण्याकडे कटाक्षानें पाहिलें जातें." रा.ह. कापडी



शुभ प्रसंगाच्या वेळीं
मुखमाधुरीसाठीं वापरा
दिलरंजन
सुवासिक सुपारी
सुमधुर, शौकडों लोकांना
आनंदित करणारी—
—: सर्वत्र विकली जाते :—
आपल्या गांवांत एजन्सीसाठीं
लिहा :—
मालक : आर. के. सुपारीवाला,
शांती भुवन, चौपाटी सी फेस,
मुंबई ७. शाखा : पोस्ट ऑफिसच्या
बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुं. ४
चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ
ग्रॅट रोड, मुंबई ७



वसतिगृहानें आदिवासी शिक्षणाचा प्रश्न सुटेल कां !

मागासलेल्या विभागांत काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना सगळीकडे एकच अनुभव येतो कीं, मुलांना शाळेंत यायला वेळच नसतो. कांहीं थोडीशीं मुलें शाळेंत आलीं तर तीं एकदां अर्धातास शाळेंत बसतात. अत्यंत अनियमितपणें शाळेंत येतात. त्यामुळें मुलांचा अभ्यास फारच थोडा होतो. या शाळांच्या पाठीमागें वार्षिक कमीतकमी १००० रु. खर्च होतो. पण चार इयत्ता ओळीनें पास करणारांची संख्या वार्षिक २।३ पण नसते.

याला उपाय म्हणून लोक या मुलांचें वसतिगृह चालविणें अथवा आश्रमांत मुलें ठेवणें हा सुचवितात. वसतिगृहामध्यें मुलें आलीं कीं, उपस्थितीचा प्रश्न आपोआप सुटतो. आईबापांचा मुलांच्या खाण्यापिण्याचा व कपड्यांचा प्रश्न सुटतो; त्यामुळें काम सरळ झालें असें वाटतें; पण असें असलें तरी ज्या घरीं ४।५ मुलें असतात, त्यांतील एखाद्या मुलालाच वसतिगृहांत पाठवायला आईबाप तयार होतात. बाकीचीं मुलें त्यांना घरकामासाठीं हवीं असतात. त्यांच्या घरांतील ५ वर्षांचें मूल हीही एक घरची जबाबदार व्यक्ति असते म्हणून मुलांना आश्रमांत अगर वस्तीगृहांत पाठवायला लोक फारसे खूष नतताते.

तरीपण आश्रमामुळें मुलांची उपस्थिति व शिकण्यासाठीं पुरता वेळ मिळणें हे दोन्ही प्रश्न सुटतात यांत शंका नाहीं. या दृष्टीनें ही योजना चांगली वाटते—पण या योजनेंनें आदिवासी बालशिक्षणाचा प्रश्न सुटेल कां !

एक म्हणजे आश्रमांत अगर वसतिगृहांत मुलें सर्वस्वी वेगळ्याच रीतीनें रहाणी करणी शिकतात. त्यामुळें त्यांच्या घरच्या रीतिभाति त्यांना चमत्कारिक वाटतात स्वतःच्या घरांतच त्यांना परकेपणा वाटूं लागतो. पांढरपेशांप्रमाणें छान छोकींत रहाण्याची मुलांना हौस वाटते व स्वतःचें घर त्या मानानें अगदींच कुचकामाचें वाटूं लागतें. म्हणून घरापासून दूर जाण्याची त्यांची इच्छा बळावते व संधि मिळताच ती घर सोडून पळूव जातात अथवा मनांतल्या मनांत असंतुष्टपणें कुढत रहातात. म्हणून आम्हांला असें वाटतें कीं, लहान वयाचीं मुलें कुटुंबांतच वाढलीं पाहिजेत.

मुलें घरीं राहून शाळेंत शिकायला येतात तेव्हां रोज आपल्याबरोबर शाळेंत शिकलेलीं जीवनमूल्यें, आदर्श, चांगल्या संवयी, भाषा, चांगले संस्कार वगैरे गोष्टी घरीं घेऊन जातात. या रीतीनें थोडया घरीं कां होईना जर चांगलें संस्कार पोंचले तर त्याचा परिणाम आजुबाजुच्या इतर घरांवर व शेवटीं सर्व वस्तीवर होईल. त्यांच्या वस्तींतच सुधारणेचा वृक्ष रुजून वाढूं लागेल. हींच मुलें १०।१५ वर्षांनीं जेव्हां आई-बाप बनतील तेव्हां त्यांच्या रीतरिवाज व जीवन मूल्यांकामध्यें पुष्कळ फरक दिसून येईल. कारण सुधारणेच्या प्रक्रिया झाडाच्या जीवनाप्रमाणें मुळापासून व आंतरिक प्रेरणेनें होत रहातील. आपलें ध्येय हेंच आहे. त्यांच्या जीवनांतील मूळ रीतिभाती व नवे विचार, रहाणी-करणी या दोहोंच्या संघर्षानें जें परिवर्तन होईल तें अंतर्बाह्य व शाश्वत स्वरुपाचें होईल. वानरांसारखें अंधानुकरण घेतलेल्या वरवरच्या सुधारणा उपयोगाच्या नाहींत.

बारा तेरा वर्षांचीं होईपर्यंत मुलें घरांतच वाढलीं पाहिजेत. कारण गरीब असो कीं श्रीमंत असो, सुशिक्षींत असो कीं अशिक्षित असो घरांमध्यें आई-वडील व लहान मोठीं भावंडें हीं प्रेमरज्जुनीं एकमेकांना बांधलेलीं असतात. मुलांच्या मनो विकासासाठीं या नैसर्गिक प्रेमबंधनाची जरूरी असते. वसतिगृहामध्यें गृहमाता अगर पिता कितीही प्रेमळ असले, सुशिक्षीत असले, मानसशास्त्र जाणणारे असले तरीही आई-बाप देत असलेलें स्वाभाविक प्रेम देऊं शकणार नाहींत. मग तें बालघर असो-आश्रम असो कीं साधें वसतिगृह असो. यासाठीं वयाच्या १२-१३ वर्षांपर्यंत मुलांनीं घरांतच मोठें होणें जास्त आवश्यक आहे.

चांगल्या चांगल्या आश्रमांतूत खाण्यापिण्याची चंगळ असतांनाही मुलें घरीं पळून जातात असा अनुभव येतो. त्याचें कारणही हेंच कीं, परक्या वातावरणांत मुलांना सुरक्षितपणा वाटत नाहीं. आईबाप इष्टमित्र यांच्या सहवासांत जी मनाची शांति व निर्धास्तपणा वाटतो तो मिळत नाहीं. एक आपत्ति म्हणूनच हें आश्रम जीवन तीं स्वीकारतात; आणि म्हणून त्यांच्या जीवनांत कायम ठशाची सुधारणा होत नाहीं. थोडीं अशीं मुलेंही असतात की, ज्यांना घरापेक्षां आश्रम आवडतो. पण त्या ठिकाणीं घरीं कांहीं तरी उणेपणा असतो-आई-बापापैकीं कोणी नसणें, दोघांपैकीं कोणी फारच तापट अथवा व्यसनी असणें वगैरे. त्यामुळें स्वतःच्या घराबद्दल त्याला तिरस्कारच वाटतो.

मुलांचा आणखी एक वर्ग आढळतो-तो म्हणजे आश्रमांत आश्रमाप्रमाणें व घरीं घरच्याप्रमाणें रहाणारीं मुलें. कोठल्याही परिस्थितीशीं जुळवून घेतां येणें ही यांतली चांगली गोष्ट आहे. पण मागासलेल्या वस्तींतील सर्वसाधारण सुधारणांच्या दृष्टीनें ही गोष्ट आदर्श समजली जाणार नाहीं.

खरें पाहिलें असतां मुलांना निसर्गानें कौटुंबिक जीवनासारखी जी अमोलिक भेट दिली आहे-तीपासून वंचित रहाण्याची वेळ कधींच येऊं नये. आश्रम वातावरणांत जें कांहीं शिकायचें, स्वीकारायचें तें पूर्णपणें स्वतःचें म्हणून-आवडतें म्हणून त्यांनीं स्वीकारलें पाहिजें. सुशिक्षित समाजांत वावरण्याची एक वस्तु म्हणून सुधारकी जीवन त्यांनीं स्वीकारूं नये.

—अनुताई

नू. बा. शि. संघानें चालविलेलें महत्वाचें रचनात्मक कार्य

नूतन बालशिक्षण संघ आज ३२ वर्षें बालशिक्षणाच्या क्षेत्रांत विविध प्रकारचें कार्य करीत आहे. बारा वर्षांपूर्वी संघानें बोर्डी येथें ग्राम-बाल-शिक्षा-केंद्र काढून खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविलें. याच ग्राम-बाल शिक्षा केंद्रानें १९५७ सालीं आणखी एक पाऊल पुढें टाकलें आहे. तें म्हणजें आदिवासींच्या मुलांचें शिक्षण-या शिक्षणाविषयीं प्रयोग करण्यासाठीं 'विकासवाडी योजना' सुरू करण्यांत आली. या विकासावाडी योजनेचें महत्त्व ओळखून भारत सरकारनें तिला आपल्या द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें स्थान दिलें आहे.

पूर्वी बोर्डीला असलेलें ग्राम-बालशिक्षा केन्द्र आतां घोलवड स्टेशनपासून पूर्वेस २॥ मैलावर कोसबाड टेकडी आहे तेथें नेण्यांत आलें आहे. येथें गोखले एज्युकेशन सोसायटीचें कृषि विद्यालय संस्थेच्या शेजारीं असल्यामुळें बऱ्याच अपाट्यानें संस्थेचीं पावलें पुढें पडत आहेत. सध्यां येथें खालील विभाग काम करीत आहेत.

(१) विकासवाडी

(१) इ. ४ पर्यंत प्राथमिक शाळा-पटसंख्या ८५ यांत ६५ मुलगे + २० मुली आहेत. वय ७ ते १५.

(२) बालवाडी-पटसंख्या ५० वय २॥ ते ६.

(३) पाळणाघर-पटसंख्या १० वय ६ महिने ते २॥ वर्षें.

यांतील प्राथमिक शाळा संस्थेनें ताब्यांत घेतली तेव्हां पटसंख्या २९ होती व सरासरी उपस्थिति ९ होती. अजूनहि उपस्थिति नियमित व भरपूर असते असें नाहीं. परंतु ती सुधारली आहे.

कोसबाड टेकडीच्या आजुबाजूस ८ वाडे (लहान लहान वस्ती) आहेत. प्रत्येक वाड्यावर १०।१५ झोंपड्या असतात. जास्तींत-जास्त २५ ते ३० कोठें कोठें आहेत. सर्व वस्ती वारली जातीची आहे. हे लोक सकाळीं उठून डोंगरांत, रस्त्यावर, स्टेशनवर, कोठें मिळेल तेथें कामाला जातात. ६ वर्षें वयावरील



कामिनिया हेअर ऑईल
कामिनिया स्नो
कामिनिया टॉयलेट सोप
ऑटो दिलबहार

कामिनिया शृंगार

प्रसाधनांमुळें

चमकणारा केशकलाप, अनुपम लावण्य आणि रेशमाप्रमाणें मुलायम त्वचा प्राप्त करून घ्या.

कामिनिया प्रसाधनेंच उत्तम असतात हें मला माहीत आहे. माझ्या निवडीवद्दल मला अभिमान वाटतो आणि तो योग्यच आहे.


☆


वैजयंतिमाला—

भारत नाट्यमची ही प्रतिमा असें म्हणते पहा.

अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कंपनी,

२६५ जुम्मा मशीद, पोस्ट बॉक्स नं. २०८२ मुंबई २.





मुलेंही दोनचार आणे मिळतील तर बरें-म्हणून काम शोधतात नाहींतर पांखरें मारून खाणें, रानांतलीं कच्चीं फळें गोळा करून खाणें असा मुलांचा उद्योग चाललेला असतो.

दारिद्र्य, अज्ञान, व्यसनें या सर्व गोष्टींमुळें जनता मागासलेली आहे. त्यांना समजावून समजावून शाळेंत आणणें हा एक मोठा प्रश्नच आहे. त्यासाठीं शक्य ते सर्व उपाय येथें होत आहेत.

(१) पालकांचा संपर्क वाढविणें.
(२) वैद्यकिय मदत देणें.
(३) मुलांना रोज बोलावून आणणें.
(४) मुलांना थोडावेळ-त्यांना करतां येईल व ज्यांतून शिक्षण साधेल असें काम देणें.
(५) लहान मुलांसाठीं रात्रीं शाळा चालविणें.

मुंगीच्या पावलानें पण प्रगतीचीं पावलें पुढें पडत आहेत हें सांगण्यास आनंद वाटतो.

(२) विकासवाडी अध्यापन मंदिर
(बेसिंग ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन)

आदीवासी वस्तींमध्यें जाऊन शिक्षणाचें कार्य करकरण्यासाठीं तसेच निष्ठावंत, ध्येयनिष्ठ, हौशी आणि तळमळीचे कार्यकर्ते हवेंत. असे कार्यकर्ते खेड्यापाड्यांतून गेले तरी तेथल्या परिस्थितीस तोंड देत देत मार्ग कसा काढावा, याची त्यांना कल्पना असायला हवी. या सर्वांचें बाळकडू ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिकत असतांनाच मिळालें तर चांगलें-या हेतुनें येथें एक प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज चालविलें आहे. हल्लीं येथें एक वर्ग चालतो. २५ विद्यार्थी लोकलबार्डा-कडून आलेले आहेत. ८ विद्यार्थी खाजगी आहेत.

(३) ग्राम-बाल-अध्यापन-मंदिर

बालमंदिरांचें शिक्षक तयार करण्यासाठीं सरकारी ट्रेनिंग अभ्यासक्रम चालविला जातो. परीक्षेसाठीं सरकारी अभ्यासक्रम स्वीकारला असला तरी खेड्यांपाड्यांतून बालवाडी कशी चालवावी याबद्दल येथें प्रत्यक्ष अनुभव जास्त प्रमाणावरें मिळतात. त्यामुळें कस्तुरबा केन्द्रांतून विद्यार्थीनीं येथें येत असत. आतां त्या त्या केन्द्रानें आपापला तालीम वर्ग सुरू केला असल्यानें कस्तुरबा केंद्रांच्या विद्यार्थीनीं येत नाहींत. पण सर्वोदय केंद्रांतून व ग्रामदानीं गांवांत चालवायच्या बालवाड्यांचे कार्यकर्ते येथें बालवाडीचें शिक्षण घेण्यासाठीं येतात.

यावर्षी २४ स्त्रिया व १० पुरुष या वर्गांत शिक्षण घेत होत्या. गुजराथी व मराठी दोन्ही भाषांतून वर्ग शिकविले जातात.

(४) वसतिगृहें—

पुरुष विद्यार्थी व स्त्री विद्यार्थी यांसाठीं वसतिगृहें आहेत. विद्यार्थी मंडळी बाजारहाट करणें, हिशेब पहाणें, वगैरे सर्व व्यवस्था स्वतःच मंत्रीमंडळाच्याद्वारें पहातात. स्वयंपाकही पाळीपाळीनें स्वतःच करतात.

रंजन कार्यक्रम, भजनें, प्रवास, चर्चा, खेळांच्या स्पर्धा, सर्व राष्ट्रीय सण साजरे करणें वगैरे गोष्टी उत्साहपूर्वक होतात. त्या सर्वांमध्यें आदिवासी बंधु भगिनींचें सहकार्य मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न असतो. या विद्यार्थी विद्यार्थीनींनीं स्वतःच्या प्रयत्नानें लहानसें भातशेत करायला घेतलें होतें.

(५) अंबर चरखा वर्ग—

मोठ्या मुलांना व प्रौढांना सतत काम मिळालें पाहिजे

यासाठीं निरनिराळे औद्योगिक वर्ग येथें सुरू करणार आहोंत. त्याची सुरुवात म्हणून एप्रिल १९५८ पासून एक अंबर चरखावर्ग सुरूं झाला आहे.

संस्थेची आर्थिक बाजु—आदिवासींच्या शिक्षणाचा प्रश्न हातीं घ्यायचा म्हणजे त्यांच्यांत राहूनच काम करायला हवें. त्यासाठीं रहाण्यास योग्य अशीं साधीशींच घरें प्रथम हवीं. शिक्षणास योग्य अशीं साधनें, शेतीची जमीन वगैरे हवी, त्या दृष्टीनें सर्व योजना करून भारत सरकारकडे मागणी केली होती. त्यापैकीं खालील रकमा मंजूर झाल्या.

(१) इमारतीसाठीं (भारत सरकारकडून ६६% मदत)	१,३३,९४३ रु.
(२) जमीन लागवड व शेतीसाधनें	९,१०० रु.
(३) शिक्षण साहित्य ,,	६,७०० रु.
(४) पाणीपुरवठा योजना (भारत सरकारकडून ५०% मदत)	२७,८५४ रु.
(५) वसतिगृहासाठीं बिनव्याजी कर्ज	५३,००० रु.
	२,३०,५९७ रु.

सरकारी धोरणांत न बसलेल्या पण संस्थेस अत्यावश्यक असलेल्या कांहीं बाबींचा खर्च संस्थेला स्वतःच करावयाचा आहे.

नामंजूर गोष्टी

(१) जमीन खरेदी	६५०० रु.
(२) कुंपण	२००० रु
(३) बालवाडी व पाळणाघराचें साहित्य	२००० रु.
(४) आदिवासीसाठीं वसतिगृह	१०००० रु
	२०५००० रु.

योजना मंजूर होऊन अमलांत येईपर्यंतच्या अवधींत लांकूड-वीटा वगैरे सर्वच वस्तुंचे भाव वाढले. त्यामुळें एकूण खर्चांत ३५००० रु. नीं वाढला.

याप्रमाणें एकूण मंजूर	२,३०,५९७
नामंजूर	२०,५००
किंमत वाढल्यामुळें	३५,०००
खर्च व्हायचा आहे.	२,८६,०९७

या खर्चापैकीं

भारत सरकारकडून अनुदान	१,१२,००० रु
,, ,, कर्ज	५३,००० रु
संस्थेनें करावयाचा खर्च	१२१,१९७ रु
	२,८६,०९७

आहे.


आनंदाची गोष्ट आहे कीं संस्थेच्या कार्याचें महत्त्व पटून उदार जनतेनें बऱ्याच प्रमाणावर संस्थेस मदत केली आहे. आतांपर्यंत ७०,००० रु. दान छोट्या मोठ्या मंडळीकडून आलें आहे. आणखी ५१००० रु. ची जरूरी आहे. जनता संस्थेची हीही अपेक्षा पूर्ण करील असा विश्वास आहे.

विकासवाडी योजनेला मिळालेलीं दानें

१ भारतरत्न डॉ. डि. आर. कर्वे	५
२ गांधी स्मारक निधि	२५०००
३ श्री. कांताबाई रुइया	५०००
४ मातोश्री महाराणीसाहेब शांतादेवी गायकवाड, बडोदा	५०००
५ निझाम चॅरिटी ट्रस्ट	५०००
६ फ्रेन्डस ऑफ धी लेट श्री. मंगळदास मेहता	५०००
७ रामनारायण रुइया प्रा. लि.	६०००
८ ए पार्सी फ्रन्ड C/o कलायनीवाला अॅन्ड मिस्त्री	४०००



टोपली—काम करतांना



चला नांगरायला

९ होम डिपार्टमेंट, गवर्नमेंट ऑफ बॉम्बे	२०००	४९ श्री. लीलाबाई बखले	१००
१० सर, दोराबजी टाटा ट्रस्ट	१५००	५० ,, मनुताई आगटे	१००
११ मेसर्स सेकसरीया कॉटन मिल्स	११०१	५१ ,; प्रमिला भट	१००
१२ श्री आर. आर. कपितान	१०००	५२ ,, पूर्व प्राथमिक प्रकाशक	६५
१३ श्री. सरलादेवी साराभाई	१०००	५३ ,, पितांबरदास चौहान	५१
१४ श्री. काकासाहेब कालेलकर	१०००	५४ ,, नट्टभाई मिस्त्री	५१
१५ मेसर्स ए. एच्. वाडिया ट्रस्ट	१०००	५५ ,, सीताबाई मडगांवकर	५१
१६ गिजुभाई जयंति निधि	७०९	५६ ,, एन्. एम् आठवले	५१
१७ श्री. कैलासपान सिंगानिया	५००	५७ ,, जे. टी. पुणतांबेकर	५१
१८ श्री. फ्रेनी इरानी	५००	५८ ,, राघाबाई पळणीटकर	५१
१९ मेसर्स कामानी इंजीनीअरिंग कं.	५००	५९ डॉ. फणसाळकर	५०
२० श्री. भिवंडीवाला	३०१	६० ,, डि' सा	५०
२१ मेसर्स फ्रेन्डस प्रीमीयर ऑटोमोबाईल्स	२७६	६१ श्री. इंदिराबाई नियोगी	५०
२२ ,, फिल्मीस्तान लि.	२५१	६२ ,, कलावती कोतवाल	५०
२३ ,, ॲन्डरसन डॉन	२५१	६३ डॉ. दिवेकर	५०
२४ श्री. लखमसी नपू स्मारक फंड	२५१	६४ श्री सरोजबेन योघ	३०
२५ मेसर्स ग्रेन ॲन्ड ऑईल सीड्स असोसिएशन	२५०	६५ ,, बी. डी. कर्वे	२५
२६ श्री. पी. एस. देव	२५०	६६ ,, मनुताई अभ्यंकर	२५
२७ श्री. राजा पन्नालाल पित्ती	२५०	६७ डॉ. जोगळेकर	२५
२८ श्री. कपिलाबेन मेहता	२००	६८ श्री एस. एच. अभ्यंकर	२५
२९ एक्स. C/o आर. जी. एम.	२००	६९ ,, डी. ए. साठे	२५
३० डॉ. एम्. व्ही. जोगळेकर	२००	७० ,, नौशेर चिनॉय	२५
३१ मेसर्स सिंगारानी कॉलिअरीज	१५०	७१ ,, नादिरशा चिनॉय	२५
३२ लेडी प्रेमिला ठाकरसी	१०१	७२ ,, अहिल्याबाई किर्लोस्कर	२५
३३ श्री वीरचंद्र पानाचंद ट्रस्ट	१०१	७३ ,, पी. एस. देशमुख	२५
३४ ,, एस. आर. केतकर	१०१	७४ ,, ताराबाई केळकर	२५
३५ ,, ए. एम्. पटेल.	१०१	७५ ,, जे. एच. शेख	२५
३६ ,, डि. एम् डहाणुकर	१०१	७६ ,, एस. जे. पंड्या	२५
३७ ,, टोकरसी लालजी	१०१	७७ श्री. वेणूताई केतकर	२५
३८ ,, रामनाथ पोदार	१०१	७८ ,, शांता आठवले	२५
३९ ,, तारा धोटे	१०१	७९ ,, अे. मडगांवकर	२५
४० मेसर्स सिंधिया स्टीम नेव्हिगेशन कं.	१०१	८० ,, शांताबाई गायकवाड	२५
४१ डॉ. आजगांवकर	१००	८१ डॉ. एन. के. पंडित	२५
४२ श्री. शांतिलाल शाह	१००	८२ श्री. फाटक	२०
४३ मेसर्स रतिलाल ॲन्ड कं.	१००	८३ डॉ. वी. व्ही. आरोसकर	१५
४४ श्री. व्ही. एच्. केळकर	१००	८४ डॉ. वोरा	११
४५ ,, चंदुभाई जवेरी	१००	८५ श्री. एस अभ्यंकर	१०
४६ ,, दाऊदभाय मिस्त्री	१००	८६ ,, सरलाताई देवधर	१०
४७ ,, एल्. जी. मराठे	१००		एकूण रु. ७०७९६
४८ डॉ. सुमित्राबाई श्रीखंडे	१००	———	—अ. वाघ

हे असे आहेत गिरिजन

गेलीं दोन वर्षें आम्ही गिरीजनांच्या सहवासांत आहोंत. निर-निराळ्या प्रसंगीं त्यांचें कांहीं स्वभावविशेष आढळून आलें ते येथें देत आहोंत.

(१) मुक्त मनानें हंसणें—

रात्रीची वेळ होती. श्री. ताराबाई बोर्डीहून कोसबाडला एक दोन दिवसांसाठीं पाहुण्या म्हणून आल्या होत्या. त्यांना भेटायला अथवा पहायला म्हणा १०।१५ मुली आल्या होत्या. असतील १२ ते १५ वयाच्या. त्यांना सांगितलं. तुमचीं गाणीं म्हणा ग—हो, म्हणाल्या आणि हंसत सुटल्या. ज्या हंसल्या, ज्या हंसल्या, ज्या हंसल्या—त्याला कांहीं प्रमाणच नाहीं. अर्धा तास हंसत होत्या. शेवटीं आम्ही कंटाळून त्यांना गाणें म्हणावयास सांग-ण्याचा आग्रह सोडून दिला—

(२) नाचायची हौस

वरील मुली पुढें रोज रात्रीं नियमितपणें आमच्याकडे येऊं लागल्या. अभ्यास करायचा, गाणीं म्हणायचीं, गोष्टी ऐकायच्या नि आमच्या इकडेच झोपायचें असा त्यांचा रोजचा कार्यक्रम होता.

एके दिवशीं बाहेर शुभ्र चांदणें पडलें होतें. कोठून तरी तारफ्याचा आवाज ऐकूं येत होता. त्यामुळें मुलींची मने नाच-ण्यासाठीं अगदीं उत्सुक झालीं होतीं; पण जायचें कसें ! शेवटी एकीनें मोठा धीर करून विचारलें, 'आम्ही नाचायला जाऊं ?' 'हो' म्हणताक्षणींच सगळ्या चिमण्या भुरभुर उडाल्या—शाळेसमोरच्या मोठ्या पटांगणांत त्यांनीं फेर धरला नि नाचायला सुरुवात केली. मनसोक्त नाचून झाल्यावर त्या झोपायला परत आल्या. एकमेकींच्या कमरेशीं हाताची सांखळी करून केलेला घेरेदार गोल, तालबद्ध पडणारीं पावलें आणि वेलीप्रमाणें लवलव लवणारीं मुलींचीं शरीरें, त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नभाव—हें सर्व अजूनही डोळ्यासमोर येतें—तेव्हां खूप मजा वाटते.

(३) विहिरीवरील प्रार्थना

आमची विहीर खणण्याचें काम चाललें होतें. ५०।६० मजूर कामावर असत. स्त्री-पुरुष मिळून खोदणें, माती भरणें, भरभर टोपल्या वर देणें—टाकणें वगैरे कामाचें दृश्य पहाण्या-सारखें असे. या ५०।६० मंडळींशीं आपला परिचय व्हावा म्हणून संध्याकाळच्या वेळीं सामुदायिक प्रार्थनेचा कार्यक्रम सुरू केला.

प्रथम प्रार्थनेला बसायला कोणी तयारच नव्हतें. पण जेव्हां आग्रहपूर्वक सांगितलें—कामाच्या वेळांतलीं दहा मिनिटे प्रार्थनेसाठीं काढलीं, तेव्हां मंडळी तयार झाली; पण प्रार्थनेसाठीं ओळीनें समोर बसण्यास कोणी तयार होईना. आमच्यापासून २५ हात लांब समोरतीं पसरून सर्वजण उभीं राहिलीं. आणि बसायला सांगितलें तेव्हां आमच्याकडे पाठ करून बसलीं. गोष्ट ऐकणें मुळी माहीतच नव्हतें. त्यामुळें रामाच्या—कृष्णाच्या गोष्टींत प्रथम प्रथम त्यांना गंमत वाटत नसे. नंतर मात्र 'गोष्ट सांगा' असा आग्रह धरूं लागलीं. पण गोष्टींतील राम—कृष्णांचीं नांवेंही लक्षांत रहावयाचीं नाहींत.

(४) भीति कशाची ?

एका आदिवासी भगिनीकडे जेवायला गेलों होतों. जेवण

स्वदेशीची भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.



झाल्यावर अंगणांत बसून गप्पा गोष्टी चालल्या होत्या. झोपडी अगदींच एकाकी होती. अर्ध्या फर्लांगावर दुसऱ्या दहा पांच झोपड्या होत्या. चांदणें पडलें होतें. समोर डोंगर, किर्र झाडी स्पष्ट दिसत होती. सगळीकडे शुकशुकाट होता. घरांत पुरुष माणूस कोणी नव्हतें. मी म्हटलें, 'तुम्हांला भीति वाटत नाहीं !'

'कशाची भीति ? आतां तर २-४ मुलें आहेत. पण अगदी एकटी होतें तेव्हां पण मी अशी याच झोपडींत रहात होते. आतां तर येथें पुष्कळ वस्ती झाली. पण पूर्वी हा रस्ताही नव्हता नि वस्तीही नव्हती.' बाईनें जोरांत सांगितले.

खरंच आहे तें. चांगल्या विटा चुन्याच्या भीती—आणि भक्कम दरवाजांच्या इमारतींत राहूनही आम्हा पांढरपेशा स्त्रियांना सोबत लागते—भीति वाटते. त्या भीतिचा स्पर्शही यांच्याजवळ नाहीं. कारण दोन हात करण्याची ताकत त्यांच्या हातापायांत आहे. आणि वाटेल त्या लटपटी खटपटी करून जमविलेलें लवपिलेलें असें त्यांच्याजवळ कांहीं नाहींच. पुरता असंग्रह. तेव्हां लुटणार तरी काम आणि भीति कशाची बाळगायची.

(५) प्रामाणिकपणाचा पुरावा

ऑगस्ट महिना होता. बाहेर धूमधार पाऊस पडत होता. पण आंत पोटामध्यें भुकेच्या ज्वाला भडकत होत्या. तांदळाचा दाणा नाहीं, बाहेर कोठें मजुरी काम नाहीं, कोणी उधार देत नाहीं, अशा अवस्थेंत लहानग्यापासून म्हाताऱ्या कोताऱ्यांपर्यंत दांताला दांत लावून बसण्याची पाळी होती.

अशावेळीं आम्ही आमच्या घरच्यासाठीं म्हणून थोडें भात घेऊन ठेविलें होतें. भात महागाचें चांगल्या पैकीं होतें. पण त्या पोत्यांकडे पहावत नव्हतें. इतकीं माणसें भोवतीं उपाशी असतांना हें भात असं कसं ठेवायचं; पण मंडळीना विकत घ्यायला ऐपत नाहीं. शेवटीं त्यांचें भात पिकल्यावर त्यांनीं परत करावें असें ठरविलें—त्यांचें भात हलक्या प्रतीचें असेल तेंच परत घ्यावें पण प्रामाणिकपणें परत आणून देतील कां ? कां पठाणगिरी करावी लागेल ? कांहीं होवो भात द्यायचें ठरलें आणि इतकी मंडळी भात न्यायला आली कीं, तासाभरांत त्याची चटणी उडाली. पुष्कळांच्या मतें हें अगदीं अव्यवहार्य काम होतें.

पण भात पिकल्यावर प्रत्येकजणानें न मागतां न सवरतां भात परत आणून दिलें. मोजून घालतांना त्यांच्या डोळ्यांत कृतज्ञता भरपूर दिसत होती.

(६) काशीच्या आईचें लग्न

आज काशीच्या आईचें लग्न होतें. तें बघायला आम्ही जाणार होतों. 'काशीच्या आईचें लग्न' हा शब्दप्रयोग कानाला जरा विचित्र वाटतो. आम्हांला वाटलें—बाईचा पुनर्विवाह असेल, काशी पहिल्या घरची असेल—

पण असें नव्हतें. बाईचा पहिलाच विवाह होता. आणि तोही आतां तिच्या मुलीचें लग्न व्हायचें होतें त्यावेळीं तिला लग्नांत अक्षता टाकायला मिळायला हव्या होत्या. तो अधिकार मिळविण्यासाठीं हें लग्न होत होते !

त्याचें असें आहे कीं, या लोकांच्यामध्यें गांवच्या पंचासमक्ष लग्न नक्की होतें. त्याला 'बोल' असें म्हणतात. 'बोल' झाल्यावर मग वधु-वर एकत्र राहून संसार मांडतात. मग त्यांच्याजवळ पैसे जमतील तेव्हां गांवजेवण घालतताात. हें गांवजेवण झालें म्हणजे लग्न झालें. कधीं कधीं स्वतःच्या मुलांचें लग्न व्हायच्या वेळेपर्यंतही आईबापांना पैशाची सवड मिळत नाहीं. अशावेळी बापाचें व मुलाचें अशीं दोन्ही लग्नें एकाच मांडवांत होतात.

आम्ही लग्नाला गेलों. नवरानवरी पाहूं लागलों. नवरी अंगाला हळद लावून बाशिंग बांधून बसली होती—पण नवऱ्याचा पत्ता नव्हता. नवरा मुलगा कोठें ? म्हणून विचारलं तर त्याचं लग्न झालं आहे, तुकट्या बाईचंच लग्न व्हायचं आहे.' असें उत्तर मिळालें. 'बाईचें खरें, पण कोणाशीं ?' 'कोणाशीं नाहीं, तिचें एकटीचेंच !' यापेक्षां जास्त स्पष्टीकरण ही मंडळी करूं शकलीं नाहीं.

पण लग्न हा एक संस्कार आहे. तो प्रत्येकास आयुष्यांत एकदां व्हायला हवा. ब्राह्मणांतील मौंजिबंधनासारखें हें दिसतें. वरील लग्नांतील पुरुषाचें लग्न एकदां झालें. ती बायको मेली मग दुसरें लग्न वरील बाईशीं झालें. पण नुसता बोलच झाला. या बाईचें हें प्रथम लग्न होतें. तिच्यावर लग्नाचें संस्कार व्हायचे बाकी होतें. ते आज झाले.

(७) संकट प्रसंगीचें धैर्य—

एक लहानशी झोंपडी होती. झोपडींत आई व तिचीं ३ मुलें [१२ वर्षें व ६ वर्षें वयाच्या २ मुली, दीड वर्षाचा एक मुलगा.] एके दिवशीं झोंपडींतल्या चुलीवर पेज शिजत लावून आई घोलवडला तांदूळ आणण्यास गेली. मोठी मुलगी आणखी कांहीं कामाला गेली. धाकटी मुलगी नि मुलगा झोंपडीमध्यें खेळत होती. इतक्यांत सोसाट्याचा वारा सुटला. धुळीनें आकाश भरून गेलें. घरावरचीं कौलें नि पत्रेंही उडूं लागले. वाऱ्याच्या घांगडघिंगाण्यांतच झोंपडींतील चुलीच्या ज्वाळा भडकल्या आणि झोंपडीनें पेट घेतला. मुलगी आपल्या भावाला घेऊन बाहेर पळाली. हां हां म्हणतां झोंपडी जळून भस्म झाली. मदतीला पुष्कळ लोक धांवले, पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

घरांतील मुलें बिचारीं केविलवाणी होऊन उभीं राहिलीं होतीं. आई तर घरीं नव्हतीच. मुलांना घेऊन आम्ही आमच्या संस्थेत परतलों. थोड्यावेळानें मुलांची आई आली. आम्हांला

वाटलें, आतां ही खूप रडेल. पण मुळींच रडली नाहीं. घरांतले सगळे कपडे आणि भात जळालें, आतां खायला नि नेसायला कांहींच नाहीं, एवढें नुसतें म्हणाली. त्यादिवशीं त्या सर्वांना संस्थेंत जेवायला दिलें, एकदोन जुनींपानीं नेसायला दिलीं. रात्रीं झोपायला नि ४।८ दिवस रहायला येथेंच या म्हणून आग्रह केला. आम्हाला वाटलें बाई संध्याकाळीं मुलांना घेऊन येईल—पण ती आली नाहीं. दुसऱ्या दिवशीं चौकशी केली, तेव्हां, 'बहिणीकडे झोपायला गेले होतें !' असें म्हणाली. आणि ती कधींच आली नाहीं. आम्हांला वाटलें बहिणीकडे झोपत असेल—पण छे—ही जळलेल्या झोपडीच्या जागीं झाडाखालीं उघड्यावर आपल्या तिन्ही मुलांना घेऊन झोपत होती. अक्षरशः त्यांना अंथरायला जमीन पांघरायला आकाश होतें. बाईला ७ वा महिना चालू होता. नंतर दोन महिन्यांनीं बाईचा नवरा मुंबईहून आला—व ती झोपडी बांधली गेली—पण तोंपर्यंतचें आपल्या हालांचें रडगाणें या मंडळींनीं कोणापुढेंही गायिलें नाहीं.

(८) विनोदप्रिय मंडळी—

आमच्या गिरीजनांना बोलतां कमी येतें, पण कृतिनें आपला विनोद चांगला व्यक्त करतात.

एकदां येथील आदिवासी विद्यार्थी—विद्यार्थिनींना घेऊन आम्ही मुंबईस प्रवासाला निघालों होतों. मुंबईत एका उत्सवामध्यें यांचा 'तारफानृत्याचा' खास कार्यक्रम ठेविला होता. ही मंडळी दिवाळीच्या दिवसांतच तारफा वाजवितात. इतर वेळीं वाजवायचें नाहीं, असा यांचा दंडक आहे—तेव्हां ही मंडळी कार्यक्रमास तयार होतील कीं नाहीं, याची शंका होती. मुली तर सर्व तयारीनिशी निघाल्या होत्या. पण मध्यें उभें राहून तारफा वाजविणाऱ्या मुलीनें तारफा बरोबर घेतला कीं नाहीं, याची मी वारंवार चौकशी करीत होतें. घरून निघतांना तो म्हणाला 'पुढें माझें शेत आहे तेथून घेईन' आणखी थोडावेळ चालल्यावर पुनः विचारलें तेव्हां 'माझी बहीण आणून देणार' म्हणाला. शेवटीं स्टेशनवर पोंचलों. तरी तारफा दिसेना. तेव्हां माझा जीव अगदीं उडाला. गाडी प्लॅटफार्मवर आली आणि मुलें डब्यांत चढलीं तरी तारफ्याचा पत्ता नाहीं. आतां काय करावें ! तारफेवाल्याला अगदीं कसून विचारूं लागलें तेव्हां म्हणतों, 'ताई, या पिशवींत घातला आहे तारफा' म्हणजे इतका वेळ माझी नुसती गंमतच करीत होता तर हा !

आणखी नुकतीच एक गंमत झाली. आदिवासी भगिनींना पाहुण्या म्हणून एक दिवस रहायला श्री. ताराबाईंनीं आपल्या घरीं बोलावलें होतें. दुपारच्यावेळीं सगळ्याजणीं मिळून गप्पा गोष्टी करायला बसलों होतों. आदिवासी भगिनींना या कार्यक्रमाचें कौतुक वाटत होते. श्री. ताराबाईंना 'ताराताई' अथवा 'ताई' म्हणायचें नाहीं. त्यांना 'आई' म्हणायचं, असें एका भगिनीनें सगळ्यांना बजावलें. नंतर त्यांच्या गाण्याचा कार्यक्रम सुरू झाला. त्यांत एक गाणें त्यांच्या जीवनांत नित्य घडणाऱ्या एका प्रसंगावरचें होतें. गाण्यांत आपल्या आवडत्या व्यक्तीचें नांव घालून म्हणावयाचें त्यांनीं श्री. ताराबाईंचें नांव घातलें—

गाण्याचा आशय—'तारूताई दारू पिऊन माजली—पोलिस पार्टी आली—ठाण्यावर नेली—तिला पाहून कुसूमताई रडली. सजा भोगून तारूताई परत आली तेव्हां पद्माताई हंसली.'

हे गाणें या बायका मोठ्या गमतीनें म्हणत होत्या.

कसा आहे विनोद !

—अनुताई

प्रश्नोत्तरी

प्रश्न : माझी मुलगी येत्या २८ फेब्रुवारीमधें तीन वर्षांची होत आहे तिच्या वाढदिवसानिमित्त जमलेल्या तिच्याच पैशांतून कांहीं तरी उपयुक्त असें खेळणें तिला घ्यायचें आहे. खेळणें उपयुक्त तर असावेंच या बरोबर खेळतां खेळतां सहज ज्ञानप्राप्ति व्हावी अशी अपेक्षा आहे. त्याबरोबरच-३।४ वर्षांच्या मुलांना योग्य अशा कांहीं चित्रांची पुस्तकें असल्यास त्यांचाही पत्ता कळवावा. खेळणें कोणते घ्यावें तें सुचवावें.

उत्तर : मुलीच्या वाढदिवसानिमित्त किती पैसे जमले आहेत याचा अंदाज दिला असतात तर मला कांहीं निश्चि सांगतां आले असतें पण कोणतें खळणें कोणत्या मुलाला उपयुक्त होईल हें त्या बालकांच्या गरजा काय आहेत हें समजल्यावर अवलंबून आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या मुलीला आतांपर्यंत कोणतीं खेळणीं दिलीं आहेत हें समजणें जरूरीचें आहे.

हें खेळणें कसें असावें या संबंधीं आपण आपल्या ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत त्यावर आपण 'उपयुक्त' कशाला म्हणाल अथवा 'ज्ञानप्राप्तीचें स्वरूप काय हेंही स्पष्ट नाहीं. तरी पण मुलांना ज्याच्याशीं पुष्कळ दिवसपर्यंत खेळावेसें वाटेल तें खेळणें 'उपयुक्त' असें मानलें व अशा खेळण्याशीं खेळतां खेळतां जी अनुभवाची स्पष्टता मुलांना होते ही जर ज्ञानप्राप्ती आपण समजत असलां तर आपल्या खेळण्याबाबतच्या अपेक्षा चुकीच्या आहेत असें म्हणतां येणार नाहीं. तीन वर्षांच्या बालकाला भरणें, ओतणें, रचणें, ओढणें, खेचणें वगैरे क्रिया

खूप खूप आवडतात. रंगावरून आणि आकारावरून वस्तूंचें वर्गीकरण करणें, त्यांतून रचना करणें, मणी ओवणें ही कामें आकर्षक वाटतात. त्यांत त्यांच्या अवयवांच्या हालचालींना चांगला अवकाश मिळतो. त्याचप्रमाणें या वयांत बाहुलीचें किंवा भातुकलीचें खेळही मुलांना फार आवडतात. हें सर्व लक्षांत घेऊन पुढील कांहीं खेळणीं सुचवितो. जें आपल्याला परवडेल तें खेळणें घ्या. (१) लहानशी गाडी जींत विविध बाजू विविध रंगित केलेलें चौरस असतील. (२) पोस्ट बॉक्स किंवा सॉर्टिंग बॉक्स यांत निरनिराळ्या रंगांच्या आकृत्या मुलें वेगवेगळ्या करतात. (३) निरनिराळे रंगाचे खडू व फळा डस्टर. (४) लोटगाडी. (५) निरनिराळ्या रंगाचें मोठे मणी आणि रंगीत लेस (६) बाहुला बाहुली आणि भातुकलीचें (७) रेतीशीं खेळण्यासाठीं लागणारी आवजारें (८) झाडाला पाणी घालण्याची झारी (९) प्लॅस्टिसीन (१०) बंगला पेटी मोठ्या विटांची.

आपल्या येथें शिशुंना आवडतील अशी चित्रांचीं पुस्तकें जवळजवळ नाहींत म्हटलें तरी चालेल. इंग्रजी रशियन व चिनी पुस्तकांची नक्कल केलेलीं कांहीं पुस्तकें आहेत. परंतु तीं फेरीवाल्यांच्याकडे विकत मिळतात. त्यांचा पत्ता देणें सहज शक्य नाहीं. परंतु अशा पुस्तकांपेक्षांही धर्मयुग, टाइम्स विकली किंवा अशाच प्रकारचीं सचित्र मासिकें घेऊन त्यांतील मुलांना आवडतील अशीं चित्रें कापून त्यांचे संग्रह बनवले तर ते मुलांना फार आवडतात. अशा चित्रांच्या विशिष्ट योजना करून त्याबद्दलच्या गोष्टी आणि माहिती मुलांना सांगतां येते.

नूतन बाल-शिक्षण आणि संघ समाचार

श्री. नानिक बालमंदिर : कोप्री कॉलनी बिल्डींग क्रमांक १९ मध्यें हिंदी जाणणाऱ्या बालशिक्षिकेची जरूर आहे. गर जूनी व्यवस्थापकास भेटावें.

बालक्रीडांगणाचें प्रकाशन : पूर्व प्राथमिक शिक्षण विषयक प्रसिद्धी लेखक श्री. स. आ. केळकर जोगळेकरवाडी शीव, मुंबई यांचें 'बालक्रीडांगण' नांवाचें नवीन उपयुक्त पुस्तक नुकतेच प्रकाशित झालें आहे. (पृष्ठ संख्या काऊन साईस १३२, सचित्र, मूल्य दोन रुपयें) बालवाड्या, बालक्रीडांगणें, बालमंदिरें या सारख्या पूर्व प्राथमिक संस्थांना हें पुस्तक देणगीसारखेंच वाटेल. या पुस्तकाला डॉ. कृ. श्री. म्हसकर यांनीं प्रस्तावना लिहिली असून एक संग्रहणीय पुस्तक म्हणून याबद्दल आपला अभिप्राय व्यक्त केला आहे.

पूर्व प्राथमिक अध्यापन मंदिरांतील प्रवेशाच्या अटीसंबंधी : या वर्षी जो नवीन सरकारी शिक्षणक्रम सुरू करण्यात येत आहे त्यांत दोन वर्षांच्या शिक्षणक्रमांत प्रवेश मिळण्याच्या दृष्टीनें फार महत्वाचा फरक झालेला आहे. पूर्वी व्ह. फा पास झालेल्यांनाच या शिक्षणक्रमांत प्रवेश मिळत असें आतां मराठी सातवी पास अथवा अधिक इयत्ता झालेल्यांना कॉलेजनें योजलेल्या प्रवेश परीक्षेंत बसून प्रवेश मिळावितां येतो.

बाल अध्यापन मंदिर दादर : या संस्थेंत गेल्या दोन वर्षांपासून बालअध्यापनाचा दोन वर्षांचा शिक्षणक्रम बंद आहे. हा शिक्षणक्रम कोसबाड, घोलवड येथील ग्राम बाल शिक्षाकेन्द्रांत मात्र चालू आहे.

बाल-अध्यापन मंदिराच्या नवीन शिक्षण क्रमासंबंधी सेमिनार : बाल अध्यापन मंदिर दादर येथें जुलै ४, ५, ६ रोजीं बाल अध्यापन संस्थांच्या प्रतिनिधींची एक चर्चापरिषद योजली जात आहे. याचवेळीं 'इंटीग्रेशन' समितीनें पाठविलेल्या प्रश्नावलीसंबंधीं अधिकृत उत्तरें तयार करण्यासाठीं नू. बा. शि. संघाच्या कार्यकर्त्यांची एक विशेष सभाही बोलावली जाण्याचा संभव असल्याचें कळतें.

'इंटीग्रेशन' समितीचे पूर्वप्राथमिक शिक्षणासंबंधीचे प्रश्न : या प्रश्नासंबंधीं ज्या व्यक्ती अगर संस्थेला उत्तरें लिहावीशीं वाटतील त्यांनीं तीं येथें कार्यालयाकडे पाठवावींत. त्यासंबंधीं जुलैच्या पहिल्या आठवड्यांत चर्चा होऊन व त्यांस संघाचें अधिकृत रूप देऊन तीं समितीकडे पाठवण्यांत येतील.

(१) पूर्व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी राज्यसरकारनें कितपत व कोणत्या रीतीनें घ्यावी ?

(२) राज्य सरकारनें स्वतः कांहीं पूर्व-प्राथमिक शाळा चालवाव्या काय ? चालविल्यास, त्या कोणत्या उद्देशानें, किती व कोणत्या परिस्थितींत चालवाव्या ?

(३) स्थानिक संस्थांनीं पूर्वप्राथमिक शिक्षणाची थोडी फार जबाबदारी उचलावी अशी आपली शिफारस आहे काय ? असल्यास, त्या संस्थांनीं ही जबाबदारी किती व कशी घ्यावी ?

(४) पूर्व-प्राथमिक शाळांना कोणत्या तत्वावर मदत द्यावी ?

(५) पूर्व-प्राथमिक ट्रेनिंग संस्थांना कोणत्या अटीवर व किती मदत द्यावी ?

(६) ग्रामीण विभागांत व मागासलेल्या जातीमध्यें पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं कांहीं विशेष उपाय आपण सुचवतां काय ! सुचवित असल्यास ते कोणते ?

खोटेचं खरे तराजू

(पंचतंत्रांतील एक कथा)

नातुक नावाच्या एका व्यापाऱ्याला व्यापारांत जबर खोट बसून त्याचा सारा पैसा त्यांत गमावला. तेव्हां तो घर सोडून परदेशीं व्यापारधंदा करण्यासाठीं निघाला. पण निघायच्या पूर्वी आपला परम मित्र लक्ष्मण याच्याकडे जाऊन तो म्हणाला, "हें बघ मित्रा, हा माझा तराजू मी परत येईपर्यंत तुझ्यापाशीं ठेवून दे. मला तो विकून टाकायचा नाहीं. कारण आमच्या घराण्यांत कैक पिढ्या तो चालत आला आहे." आणि असं म्हणून तराजू मित्राकडे ठेवून तो मार्गाला लागला.

थोड्याच कालांत नातुकानं पुष्कळ पैसा मिळविला आणि मग परत तो आपल्या गांवीं आला. येतांक्षणींच लक्ष्मणाकडे जाऊन तो म्हणाला, "खूप उपकार झाले बरं तुझे मित्रा! माझा तराजू तूं इतके दिवस राखून ठेवलास— पण आतां देतोस का माझा तो परत?"

"हं, हं, तराजू ना?" लक्ष्मण म्हणाला, "अरे,तो उंदरांनीं खाऊन टाकला कीं रे!"

"वा!" संतापानं नातुक ओरडला, "एवढा जंगी तराजू तो!— उंदीर खातील तरी कसे? चांगले अडीचशें शेर वजन होतं ना त्याचं!"

"होय ना! पण उंदीरच इतके भयंकर झाले आहेत माझ्या घरांत कीं त्यांचा फन्ना उडवायला त्यांना कितीसा उशीर रे!"

नातुक क्षणभर विचारांत पडला. मग चेहेऱ्यावर हास्य आणून तो म्हणाला, "खरंच मित्रा! तुझा तरी काय घरं दोष यांत? माझंच नशिब खोटं! घरं आहे. मी जरा नदीवर जाऊन आतां स्नान करून येतों. माझे कपडे सांभाळण्यासाठीं तुझ्या मुलाला जरा पाठवतोस का माझ्याबरोबर?"



लक्ष्मणानं विचार केला, असा मोठेसं व्यक्ति, असा विचार करून लक्ष्मणानं होकार दिला.

नदीवरून परत येताना वाटेतल्या एका गुहेत नातुकानं मुलाला ढकलून दिलं आणि दारावर एक मोठी जडशी शिळा ठेवून त्याला कोंडून ठेवलं. नंतर तो लक्ष्मणाच्या घरी आला. लक्ष्मणानं विचारलं, "अरे, माझा मुलगा कुठं?"

नातुकानं सांगितलं, "नदीकिनाऱ्यावर तो बसला होता ना, लांबेली वरून एका मोठ्या ससाण्यानं त्याच्यावर एकदम झडप घातली आणि त्याला उंच पळवून नेला!"

"अरे बापाऽऽ!" लक्ष्मण ओरडला, "पंधरा वर्षांच्या एवढ्या मोठ्या मुलाला ससाणा रे उचलून कसा नेईल?"

"कसा म्हणजे? जर का अडिचशें शेर वजनाचा लोखंडी तराजू उंदरांना खाता येतो, तर पंधरा वर्षांच्या पोराला ससाणा कां पळवूं शकणार नाही? तेव्हां आतां मित्रा, तुझा मुलगा जर तुला पाहिजे असेल, तर माझा तराजू देऊन टाक कसा!"

नाना अचूक लागू पडली. नातुकाला त्याचा तराजू मिळाला!

तात्पर्य : ज्याची बाजू सत्याची आहे तो लबाडा सहज चव्हाट्यावर आणूं शकतो. 'वनस्पति'चेच उदाहरण घ्या. वनस्पति हें हितकर अन्न आहे, हें नामांकित शास्त्रज्ञांनी स्पष्ट दाखवून दिले आहे. प्रयोगान्तीच हे सिद्ध झालें आहे.

डालडा वनस्पति शुद्ध वनस्पति तेलापासून सक्त सरकारी नियमानुसार बनविली आहे. 'डालडा' सर्व स्वयंपाक प्रकारासाठीं उपयुक्त असून 'अ' आणि 'ड' ही जीवनसत्वे त्यांत अल्प प्रमाणांत मिळूं शकतात. त्याच्या प्रत्येक औंसात ७०० आंतरराष्ट्रीय युनिट्स् म्हणजे उत्तम तुपात असतें तितकेच 'अ' जीवनसत्व घातलेलें असतें. तेव्हा सर्व ठिकाणच्या सुगृहिणींचे असेच एकमत झालेले असतें तर आश्चर्य नव्हें का 'डालडा' स्वयंपाकासाठीं उत्तम तर आहेच, पण अन्य कोणत्याहि उपयुक्त आहे.

DL. 445-X52 MA

मुद्रक व प्रकाशक:—श्री. शेष नामजोशी, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर-मुंबई १४.
मुद्रणस्थान:—नामदेव प्रिंटिंग प्रेस, वर्किंग मी-निवास, नौरोजी रोड, दादर, मुंबई १४.

बर्फासारखें थंड

वनस्पतियुक्त

उमा

पांढरे केंस नुकसान न करतां काळे करणें, लांब व चमकदार बनवणें, उवा आणि लिखा काढून मेंदूला थंड ठेवण्यासाठीं


उमा वापरा

सर्वत्र विकत मिळतें—

बनविणार—

उमा प्रॉडक्टस् बोरीस चाळ, नॉवेल्टी सिनेमाजिक, ग्रांट रोड, मुं ७

स्टॉकिस्ट—केशवजी सी. ठक्कर, दवा बाजार प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २








ग्लॅडफील्ड्स

बी. झेड. केमिकल्स, मुंबई, ७



यूनिकेम लेबोरेटरीज्, बम्बई, २६

नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ वें : अंक ४ था

जुलै १९५८



कूट प्रश्नांच्या मुळाशीं

प्राथमिक शिक्षणाचे विकास आणि विस्तरणविषयक जे कित्येक प्रश्न कूट होऊन बसले आहेत, त्यांच्या मुळाशीं लेखन-वाचनाच्या सुरुवातीच्या सीमारेषेवर बाल-जीवनाचे दोन कृत्रिम भाग पाडून त्यासंबंधीं दोन धोरणें चालू ठेविण्याची आपली घोडचूक आहे. ही घोडचूक जोंपर्यंत आपल्या लक्षांत येत नाहीं तोंपर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या योजना सम्मत होणें शक्य नाहीं.

: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक

संपादक

श्री. शेष नासले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ किंमत
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई–१४.	२७ नये पैसे

MPS



सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी

रेमी

रेनो
व पावडर



— सोल डिस्ट्रीब्युटर्स —
ए. व्ही. आर. ए. अॅन्ड कं., मुंबई २

गुडलेस्वा पेन

REGD

संतोष कारक
कामासाठीं



सोल डिस्ट्रीब्युटर्स —
पेनमेन्स ईंडस्ट्रीयल सर्वीसेज
कांदीवली (मुंबई ४०० ०३१)
लोकल सेल 10, शानकोट स्ट्रीट, मुंबई २.

निराश का होता?



सफेद केसांमुळें चेहऱ्याला विद्रुपता येणें स्वाभाविक आहे पण तेवढ्यानें निराश होण्याचें मुळीच कारण नाहीं. लाखो लोकाप्रमाणें तुम्हीही लोमा वापरा व चेहऱ्याचें सौंदर्य कायम राखा.

लोमा

केसांना नैसर्गिकरीत्या काळेभोर
करण्यांसाठीं जगभर मान्यता पांवलेले.



सोल एजंटस्
एम्. एम्. खंभातवाला. अमदाबाद १.
एजंटस्: सी नरोतम अॅण्ड कं., मुंबई २ फो. ३०५७५

MPS-MAR.

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण–खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल–शिक्षण–संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ४] मुंबई [जुलै १९५८

संपादकीय—

संकलन समितीचे
पूर्वप्राथमिक शिक्षणासंबंधींचे प्रश्न

मुंबई राज्यांतील निरनिराळ्या प्रदेशांत चालू असलेल्या प्राथमिक आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या कार्यांत एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीनें गेल्या मे महिन्यांत मुंबई सरकारनें सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ श्री. जे. पी. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति योजिली आहे. या समितीनें पूर्वप्राथमिक व प्राथमिक शिक्षणांत कार्य करणाऱ्या व्यक्तींचा आणि संस्थांचा समितीच्या कार्याला सहकार प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीनें एक विस्तृत प्रश्नावली तयार केली आणि ती सर्वांच्याकडे पाठविली आहे. प्रश्नावलींतील सर्वस्पर्शी प्रश्न वाचल्यानंतर या समितीला ज्या प्रकारचें काम सरकारनें सोंपविलें आहे तें कार्य समिति यशस्वीपणें करूं शकेल याविषयीं शंका वाटत नाहीं.

आजच्या प्राथमिक शिक्षणाला जें कांहीं स्वरूप प्राप्त झालें आहे, त्याचा पाया लेखन–वाचन व गणित आहे हें सर्वांना माहित आहे. त्यामुळें हें शिक्षण ज्या वयाला मुलें घेऊ शकतील तेथून प्राथमिक शिक्षण सुरू होतें अशी एक चुकीची प्राथमिक शिक्षणासंबंधी कल्पना रूढ होऊन बसली आहे. आजच्या विज्ञानाच्या युगांत लेखन–वाचन गणितादि विषयांचें शिक्षण हें शिक्षण नसून तीं शिक्षण प्राप्त करण्याचीं माध्यमें आहेत ही स्पष्टता झाली आहे. प्राथमिक शिक्षणांत लेखन–वाचन–गणिताच्या जागीं बुद्धि–भावना आणि कौशल्य (Head, Heart and Hand) यांच्या विकासाला स्थान दिलें पाहिजे असें आपण कित्येक वर्षांपासून वाचीत आणि घोकीत आलों आहोंत. या गोष्टींना प्राथमिक शिक्षणांत खरोखरच आपण महत्त्व देण्याचा विचार केला, तर या प्रकारचें शिक्षण कोणत्या वयाला झालें पाहिजे आणि तें केव्हांपासून सुरूंचें केलें पाहिजे याविषयी त्याचा फारसा विचार न करतां त्याचें उत्तर सहज सुचणारें आहे. आजच्या प्राथमिक शिक्षणाचें स्वरूप घडतांना अंधपरंपरेनें घोपट बनलेल्या चाकोरीला सोडून या शिक्षणाच्या बदललेल्या उद्दिष्टांनाच समोर ठेविलें पाहिजे.

भारतीय घटनेंत देखील प्राथमिक शिक्षणासंबंधी जी कल्पना अभिप्रेत आहे, तींत प्राथमिक शिक्षण म्हणजे सामान्यतः सात वर्षें वयाच्या आसपास सुरू होणारें शिक्षण असें मानण्यांत आलें आहे. मनोविज्ञानाच्या या युगांत आपण अजूनही प्राथमिक शिक्षणाच्या बुरसटलेल्या कल्पनांनाच चिकटून बसणार का ? बालकाचा प्राथमिक विकास काय आपण सात वर्षानंतर करणार आहोंत ? आजच्या प्राथमिक शाळांत बालकाला कांहीं राज्यांत पूर्ण पांच वर्षानंतर, तर कांहीं राज्यांत पूर्ण सहा अथवा सात वर्षानंतर प्रवेश देण्याचें धोरण आढळतें. यासाठीं शहर आणि ग्रामीण विभागांतील बालकांत लेखन–वाचनपात्रतेची वरखालीं होणारी सीमारेषा हीच आपण. प्रमाणभूत मानलेली आहे. या रेषेमुळें मनुष्याच्या शिक्षणाचे प्राथमिक आणि पूर्वप्राथमिक असे दोन कृत्रिम तुकडे पाडण्यांत आले आहेत आणि त्यामुळेंच अनेक अनर्थांची परंपरा आपण आपल्यावर ओढवून घेतली आहे. या विभाजनामुळें प्राथमिक शिक्षणांत मानवी विकास–मूल्यांचें सातत्य राहिलें नाहीं. त्यास पुरतें स्थानही दिलें गेलेलें दिसत नाहीं. प्राथमिक शिक्षणांत या मूल्यांना योग्य स्थान न मिळाल्यामुळेंच पूर्व प्राथमिक शिक्षणाची कल्पना विचारकांना अधिक आकर्षक वाटली असावी. पूर्व प्राथमिक शिक्षण प्राथमिक शिक्षणाला पूरक बनवण्याचा प्रयत्न खऱ्या व खोट्या अर्थानें होत आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणांत खऱ्या अर्थानें ज्या मानवी विकासाच्या मूल्यांना महत्त्व देण्यांत आलें आहे, त्यांचें विस्तरण प्राथमिक शाळेंत होणें अनिवार्य आहे.

आज प्राथमिक शिक्षणासंबंधींच्या विकास आणि विस्तरणाचे जे अनेक प्रश्न आपल्याला भेडसावीत आहेत, त्याच्या मुळांत लेखन वाचनाच्या सीमारेषेवर बालजीवनाचे जे दोन तुकडे पाडले आहेत तें आहे. ही गोष्ट आपले शिक्षणतज्ञ आणि राज्यकर्ते जितकी लवकर समजतील तितका आपल्या प्राथमिक शिक्षणाचा उद्धार लवकर होईल.

प्राथमिक शिक्षणाचे गुंगळवणारे प्रश्न

आजच्या प्राथमिक शिक्षणाचे जे कित्येक प्रश्न बिकट होऊन बसले आहेत त्यांची बरीचशी कल्पना आपल्याला संकलन समितीच्या प्रश्नावलींतच सरळ सरळ मिळते. प्राथमिक आणि पूर्वप्राथमिक शिक्षण असा जो भेद आपण चालू ठेविला आहे त्यामुळेंच हे प्रश्न कसे बिकट होऊन बसले आहेत, हें पाहण्यासारखें आहे. संकलन समितीचे कांहीं प्रश्नच येथें वाचकांच्या माहितीसाठीं उद्धृत करतों.

प्र. १४ : 'आपल्या मतें प्राथमिक शिक्षणाचीं प्रमुख उद्दिष्टें कोणतीं ? सांप्रतच्या अभ्यासक्रमामुळें हीं उद्दिष्टें कितपत साध्य होत आहेत ? मुख्यत्वेंकरून अशी एक तक्रार आहे कीं, सांप्रतचा अभ्यासक्रम हा अनेक विषयांची खिचडी असून जड आहे. शिवाय तो सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेरील आहे. आपणालाहि असेंच वाटतें काय ? असल्यास आपल्या दृष्टीनें आवश्यक अशा दुरुस्तीची रूपरेषा द्या.

प्र. ८७ : प्राथमिक शाळांतील साधनसामग्री सामान्यतः फार अपुरी असते हें विश्रुतच आहे. ह्याबाबतींत सुधारणा करण्यासाठीं कोणती योजना असावी असें आपणास वाटतें ?

प्र. १११ : आपल्या मतें गळतीचीं कारणें कोणतीं आहेत ? तीं आपण कशीं दूर कराल ?

प्र. ११२ : एका वर्गांत एका वर्षापेक्षां अधिक काल मूल राहाणें यास 'कुचंबणा' असें म्हणतात. आपल्या मतें प्राथमिक शाळांत कुचंबणा होण्याचीं कोणतीं कारणें आहेत व तीं कशीं दूर कराल ?

प्र. ११३ : कुचंबणा ही विशेषेकरून पहिल्या इयत्तेंत जास्त आढळून येते. ह्या अनिष्ट गोष्टीचीं कोणतीं कारणें आहेत व तीं दूर करण्यासाठीं आपण कोणते उपाय सुचवाल ?

प्र. १३२ : मागासलेल्या वर्गांत प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्याच्या दृष्टीनें व त्या वर्गांतील प्राथमिक शिक्षण पुढारलेल्या वर्गाच्या बरोबरीला आणण्यासाठीं कोणते उपाय आपण सुचवूं इच्छितां ?

प्र. १३३, १३४ हे प्रश्न १३२ प्रमाणेंच आहेत परंतु ते वर्गीकृत जाति आणि वन्य जातीसंबंधीं विचारण्यांत आले आहेत.

समितीच्या प्रश्नावलींतून या प्रकारचे आणखीही प्रश्न काढतां येतील. या प्रश्नांवरून प्राथमिक शिक्षणाचा पसरता डोलारा पायाकडे लक्ष न घालतां कसा रचला जात आहे याची कल्पना येईल.

पायाशिवायचें आजचें प्राथमिक शिक्षण

६ व्या अथवा ७ व्या वर्षी सक्तीनें शाळेंत पाठवलेल्या मुलाचा जन्म कोणत्या परिस्थितींत होतो, कोणत्या परिस्थितींत त्याचें पुढील संगोपन होतें, या वयांत त्याच्या शरीराला आणि मनाला योग्य पोषण मिळालें आहे कीं नाहीं, आपल्या ग्रामीण आणि नागरी जीवनांत या मुलाला कोणतें संरक्षण मिळतें, ज्या कुटुंबांवर आपण सहा-सात वर्षेंपर्यंतच्या शिक्षणाची व संगोपनाची जबाबदारी टाकली तीं कुटुंबें ही जबाबदारी पार पाडण्यास पात्र आहेत का ? या कुटुंबांचें आर्थिक, सामाजिक, सांस्कारिक जीवन स्वस्थ आहे का ? या आणि असल्या पूर्व प्राथमिक जीवनाशीं आम्हाला कांहीं कर्तव्य नाहीं असे उद्गार कांहीं नेत्यांनीं काढलेले आहेत. 'आम्ही नियोजन मंडळाच्या आदेशाप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या प्रचाराचे आमचे लक्ष्यांक निश्चित केलेले आहेत. भारतीय घटनेनें जरी चौदा वर्षापर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी राज्यांची आहे असें म्हटलें असलें तरी आपल्या राज्याची परिस्थिति अशी आहे कीं आम्ही सहा वर्षानंतरच्या देखील सर्व मुलांना पुरतें शिक्षण देऊं शकत नाहीं. नाण्याची या प्रकारची मर्यादा असल्यानें आम्ही शिक्षणांत प्राथमिक शिक्षणाला प्रायरिटी दिली आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण फार चांगलें आहे. फार जरूरीचें आहे, परंतु त्याबाबतींत सध्या तरी आम्हांला कांहीं करतां येईल असें दिसत नाहीं. ही विचारसरणी काय दर्शविते ? प्राथमिक शिक्षणाच्या कोणे एके काळीं घडलेल्या कल्पनेचें भूत आमच्या इतकें मानगुटीं बसलें आहे कीं त्यामुळें जीवनाच्या समग्र विकासाचे प्रश्न समजूं शकत नाहींत असें झालें आहे.

संकलन समितीच्या चौदाव्या प्रश्नांतील वेदना काय आहे ? प्राथमिक शिक्षणाचीं म्हणून आपण जीं उद्दिष्टें मनाशीं बाळगलीं तीं साध्य होत नाहींत याची चिंता वाटते आहे. पुनः पुनः सुधारलेला अभ्यासक्रम बोजारूप बनला आहे. त्यांत सुसंगति वाटत नाहीं. ह्या अभ्यासक्रमांत कमी अधिक करून पूर्वप्राथमिक शिक्षण सुधारतां येईल का ? वस्तुस्थिति अशी आहे, कीं ज्या बालकांसाठीं ह्या अभ्यासक्रमांत वारंवार सुधारणा होत आहेत त्याचाच नेमका विचार प्राथमिक शिक्षणांत नाहीं. पूर्वप्राथमिक वयांत बालकांच्या मनाची कोणत्याही प्रकारची पूर्वतयारीची योजना न करतां गल्लीच्या धुळींत कालपर्यंत मुक्तपणें खेळत असलेल्या बालकाला एकाएकीं प्राथमिक शाळेच्या पहिल्या


वर्गांत नेऊन बसवण्यांत येतें. तेथें त्याच्या मनःस्थितीचा विचार न करतां पहिल्या वर्गाच्या अभ्यासक्रमाला सुरुवात होते. प्रश्न ११३ मधें पहिल्या वर्गांत बालकाची जी विशेष कुचंबणा होत असल्याची कबुली आहे, त्या कुचंबणेचें कारण अभ्यासक्रमांत काय सापडणार ! पहिलीचा अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी या बालकाच्या मनाची पूर्वतयारी जर व्यवस्थितपणें पूर्वप्राथमिक शिक्षण योजनेंत झाली तर प्राथमिक शाळेंतील पहिल्या वर्गाचा आणि पुढील वर्गांचा अभ्यासक्रम सहज होण्यासारखा आहे. प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाच्या पूर्वतयारीचा व्यापक पाया पूर्व प्राथमिक वयांत घातला गेला तर आज मुलांची जी कुचंबणा होते ती टळेल हें उघड आहे.

गळतीचें मुख्य कारण मुलांच्या कुटुंबांची आर्थिक स्थिति आहे हें जरी कबूल केलें, तरी त्याबरोबर आजच्या प्राथमिक शाळांचें स्वरूप, तेथील शिक्षकांचें वळण, तेथील साधनसामग्री आणि एकूण कार्यपद्धति हीं प्राथमिक वयाच्या बालकांना अगदीं अनाकर्षक वाटतात हेंही कबूल करावें लागेल. प्राथमिक शिक्षण योजनेंत सुरुवातीच्या बालकांच्या विकासाच्या गरजांचा विचार नाहीं. ही शिक्षण–पद्धति अजूनही सामुदायिक आणि बैठ्या योजनेवर आधारलेली आहे. पूर्वप्राथमिक शिक्षण–योजनेंतील क्रियाशील स्वातंत्र्याची कल्पना प्राथमिक शिक्षणांत नाहीं. ज्ञान-पाठ आणि उपदेशांवर त्यांत अवास्तविक भर आहे. ह्या गोष्टी लक्षांत घेऊन आपल्या प्राथमिक शिक्षणाच्या सुरुवातीच्या चार वर्गांत तरी पूर्व प्राथमिक शिक्षणपद्धति नेल्या पाहिजेत. आज पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळेच्या वातावरणांत जें महदंतर पडलें आहे तें पूर्वप्राथमिक शाळेंत शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या दृष्टीनेंहि अनिष्ट आहे. प्राथमिक शाळेच्या नव्या जगांत प्रवेश करणाऱ्या मुलांच्या अडचणीहि आपल्याला लक्षांत घ्याव्या लागतील.

प्राथमिक शाळेचे वर्ग आकर्षक बनवण्याच्या दृष्टीनें पूर्व प्राथमिक शाळा एक तर मुलांचें मन तयार करण्याची मदत करतील आणि दुसरें म्हणजे प्राथमिक शाळेचें वातावरण आकर्षक बनवण्याची चावीही पूर्वप्राथमिक शाळांच्या कार्यपद्धतींतून मिळूं शकेल. मुंबई राज्यांत दोन वर्षांपूर्वी पूर्वप्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळांच्या सुरु-वातीच्या वर्गांत काम करण्यास खात्यानें सवलत दिली होती.— त्याचा अनुभव फार चांगला आला. खात्याने जेव्हां पूर्वप्राथमिक शिक्षकांची ही सवलत विशेष विचार न करतां काढून टाकली तेव्हां अनेक शाळांनीं यावद्दल खात्याकडे तक्रारीही केल्या होत्या. शाळासंचालकांना पूर्वप्राथमिक शिक्षकांचें प्राथमिक शाळेंतील कार्य जास्त चांगलें आढळलें. पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणांत सीमारेषा निश्चित असल्या पाहिजेत हें राज्यकर्त्यांचें आणि शिक्षणखात्याचें धोरण बालकांच्या विकासाला पोषक ठरणारें नाहीं.

मागासलेल्या प्रदेशाचें प्राथमिक शिक्षण प्रगत प्रदेशाच्या शिक्षणाबरोबर कसें आणावें हाही एक शिक्षणखात्यापुढें मोठा प्रश्न आहे. परंतु या प्रश्नाचा आजपर्यंत जो विचार होत आहे, त्यांत सध्या ग्रामीण विभागांत ज्या प्रकारच्या सामान्य प्राथमिक शाळा आहेत, त्याच प्रकारच्या शाळा मागासलेल्या वस्तींत वाढवून हा प्रश्न सुटणार नाहीं ज्याप्रमाणें मागासलेल्या मुलांसाठीं अथवा प्रश्नरूप मुलांसाठीं शहरांत विशेष कक्षेवर शाळा चालविण्यांत येतात तशा प्रकारचें धोरण या मागा सलेल्या बालकांच्या प्राथमिक शाळांबाबत स्वीकारण्याची जरूर आहे. सामान्य प्रकारच्या शाळांनीं येथील शिक्षणाची पत पुढें जाणें अशक्य आहे. या प्रदेशांतील शाळा अधिक साधनसंपन्न, येथील शिक्षकवर्ग अधिक उच्च कक्षेचा आणि विशेष प्रकारचें प्राशिक्षण घेतलेला असला पाहिजे. त्याचप्रमाणें येथें शिक्षणाचा प्रसार करतांना लोकांच्या अडचणींचा विचार करण्यांत आला पाहिजे मुलांच्या प्राथमिक शाळांना जोडून 'पाळणाघरें', बालवाड्या आणि बेसिक पद्धतीच्या विशेष कक्षेवर चालविलेल्या प्राथमिक शाळा या भागांत निघाल्या पाहिजेत. थोडक्यांत, शिक्षण आणि विका

[पान ८ वर पहा]



दत्तात्रेय कृष्ण सांडू अदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.
फॅक्टरी व हेडऑफिस :— चेंबूर, मुंबई नं. ७८.

—: स्थानिक शाखा :—
ठाकुरद्वार, काळबादेवी, परेल व दादर

प्राथमिक संकलन समितीच्या कांहीं प्रश्नांचीं नूतन बालशिक्षण संघानें पाठविलेलीं उत्तरें

प्र. १ ला. पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या जबाबदारीचे मुख्यत्वें दोन भाग असावे. आर्थिक आणि शैक्षणिक. सद्यः परिस्थिती लक्षांत घेऊन यांतील आर्थिक जबाबदारींत राज्य सरकारनें शहरी प्रदेशांत ५० टक्के भार उचलावा आणि ग्रामीण प्रदेशांत ७५ टक्के उचलावा.

शैक्षणिक जबाबदारींत लोकांना सहभागी बनविण्यासाठीं सरकारनें पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठीं एक स्वतंत्र Statutory Board योजावें. या बोर्डावर पूर्वप्राथमिक संस्था, पूर्वप्राथमिक प्रशिक्षण संस्था, आणि पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा व्यापक प्रचार करणाऱ्या संस्था यांचे अर्धे प्रतिनिधी असावे व त्याशिवाय प्राथमिक शिक्षण मंडळ, युनि-व्हर्सिटीज व सरकारी शिक्षण खातें यांचे प्रतिनिधी असावे.

या बोर्डाचे कार्यक्षेत्रांत पुढील गोष्टींचा समावेश व्हावाः—

(१) पूर्वप्राथमिक शिक्षणाचें स्वरूप निश्चित करण्याच्या दृष्टीनें या संस्थांचे अभ्यासक्रम व कार्यक्रम घडणें, त्यांत वेळो-वेळीं जरूर त्या सुधारणा करणें आणि त्याबाबतचें मार्गदर्शन शिक्षक, संचालक, पालक, निरीक्षक आणि जनता यांस करणें व तत्संबंधीं साहित्य तयार करणें व प्रकट करणें.

(२) पूर्व प्राथमिक प्रशिक्षण संस्थांचे अभ्यासक्रम घडणें. त्यांत वेळोवेळीं जरूर त्या सुधारणा करणें. या संस्थांच्या विद्या-र्थ्यांच्या परीक्षा योजणें व प्रमाणपत्रें देणें.

(३) पूर्व प्राथमिक शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांच्या निरीक्षणाबाबतचे नियम घडणें, त्यांत वेळोवेळीं सुधारणा करणें.

(४) पूर्व प्राथमिक शिक्षण संस्था आणि प्रशिक्षण संस्थांच्या गरजा लक्षांत घेऊन त्यांना द्यावयाच्या अनुदानाचें धोरण ठरविणें.

(५) प्रयोग आणि संशोधन यांस उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें या क्षेत्रांत प्रकाशित होणाऱ्या साहित्याची नोंद करणें, त्याचा संग्रह करणे, योग्य साहित्याचा प्रचार करणें व प्रयोगांना उत्तेजन देणें.

(६) या संस्थांच्या उपयोगी साधन सामुग्री तयार करणाऱ्या लोकांना उत्तेजन देणें. या वस्तूंच्या निर्मितीवर नियंत्रण ठेवणें, त्यांस योग्य मार्गदर्शन करणें.

उपरोक्त प्रकारच्या बोर्डाच्या सल्ल्यानें शिक्षणखात्यानें अनु-दान, निरीक्षण आणि संस्थांचें नियंत्रण करावे.

प्र. २ रा. राज्य सरकारनें स्वतः कांहीं पूर्व प्राथमिक संस्था चालविणें आवश्यक आहे. यामुळें—

(१) अशा संस्था पूर्वप्राथमिक शाळांना नमुना म्हणून प्रेरक ठरण्याची शक्यता आहे.

(२) सरकारी यंत्रणेला अशा संस्थाचें संचालन करण्याचा व त्यांचे प्रश्न समजण्यास पुरता अनुभव मिळेल.

(३) अशा शाळा संशोधन कार्यासाठीं उपयोगी पडूं शकतील.

किती व कोणत्या परिस्थितींत चालवाव्या—

(१) प्रत्येक जिल्ह्यांत सध्यां तरी सर्वसामान्य मध्यम वर्गीय बालकांसाठीं योग्य अशा घोरणावर चालणारी एक शाळा काढावी.

(२) परंतु याशिवाय जिल्ह्यांतील विशिष्ट प्रकारच्या वस्तींत कांहीं विशेष प्रकारच्या—या वस्तीच्या विशिष्ट प्रश्नाला अनुसरून अशा—शाळा सरकारने चालवाव्या.

अशा प्रश्नरूप वस्तींत खालील प्रकारांचा समावेश कमींत कमी व्हावाः—(१) हरिजन वस्ती. (२) मजूर वस्ती. (३) कोंदट वस्ती (Slum). (४) गुन्हाप्रवृत्त आणि अनाथ मुलें. (५) पंगु मुलें. (६) वन्य जातीची वस्ती.

प्र. ३ रा. स्थानिक संस्थांनीं पूर्वप्राथमिक शिक्षणाची अंशतः जबाबदारी उचलावी, अशी या सभेची शिफारस आहे. स्थानिक संस्थांनीं नगर विभागांत २५ टक्के आणि ग्रामीण विभागांत १२॥ टक्के इतकी कमींत कमी जबाबदारी उचलावी असें या सभेचें मत आहे.

प्र. ४ था. सध्यां माध्यमिक संस्थांना ज्या तत्त्वांवर मदत देण्यांत येते त्याच तत्त्वांवर वर सुचविलेल्या टक्केवारीप्रमाणें ही मदत देण्यांत यावी. म्हणजे शाळेची आवक व सरकारी मदत मिळून जर ती खर्चापेक्षां अधिक असेल, तर खर्चाच्या $\frac{1}{10}$ इतकी रक्कम शाळेच्या Reserve फंडांत घालण्यांत यावी. यापेक्षां आवक अधिक असेल तर त्या मानानें सरकारी मदतींत कपात व्हावी.

मदत किंवा अनुदान देतांना पूर्व प्राथमिक शाळेच्या विशेष गरजा लक्षांत घेऊन खालील मुद्यांवर झालेला खर्च मान्य समजण्यांत यावा.

१ शिक्षक पगार.

(अ) सुरुवातीच्या २० बालकांपर्यंत एक शिक्षिका अथवा शिक्षक व १ नोकर.

(ब) २१ ते ५० पर्यंत बालकांसाठीं दोन शिक्षिका अथवा शिक्षक व एक नोकर.

(क) ५१ ते ७५ पर्यंत बालकांसाठीं तीन शिक्षिका अथवा शिक्षक, एक नोकर व एक स्वतंत्र मुख्य शिक्षिका.

पूर्व प्राथमिक संस्थेच्या एका युनिटमध्यें ७५ मुलांपेक्षां अधिक मुलें नसावींत.

याशिवाय (१) घरभाडें (२) साधनसामुग्री (३) फराळ खर्च (४) आरोग्य, वैद्यकीय तपासणी (५) क्रीडांगण व बाग (६) कन्टींजन्सी (७) नवीन साधनें; यावर झालेला खर्च मान्य गणण्यांत यावा.

प्रशिक्षण संस्थेच्या प्रॅक्टिसिंग स्कूलच्या संशोधन व प्रयोग यावर झालेला विशेष खर्चही अनुदानासाठीं मान्य गणण्यांत यावा.

प्र. ५ वा. पूर्वप्राथमिक ट्रेनिंग संस्थांना सध्या देण्यांत येणारी ग्रँट अपुरी असल्यानें या संस्थांनाही प्राथमिक ट्रेनिंग संस्थांच्या धोरणानेंच ६६⅔ ग्रँट देण्यांत यावी. कारण या संस्थांना शिक्षकांची शैक्षणिक लायकी, पगार धोरण, व इतर सर्व बाबतींत प्रा. ट्रेनिंग संस्थांचेच नियम लागू करण्यांत येतात.

प्र. ६ वा ग्रामीण आणि मागासलेल्या जातीमध्यें पूर्वप्राथमिक शिक्षणाचा प्रचार करण्यासाठीं या भागांतील लोकांच्या अडचणींचा विचार प्रथम झाला पाहिजे. बालवाड्यांना जोडून पाळणाघरें Creches आणि बेसिक प्राथमिक शाळा काढल्या पाहिजेत. या प्रकारच्या Composite शाळेचा नमुना योजण्याचा प्रयत्न श्रीमती ताराबाई मोडक यांनी चालविला आहे. तशा प्रकारच्या शाळेनें बालसंगोपन, पूर्वप्राथमिक शिक्षण आणि प्रशिक्षण या सर्वांचाच प्रसार होण्याची शक्यता दिसते.

प्र. ७ वा. प्राथमिक शाळेंत प्रवेश मिळण्याचें वय सध्याची येथील परिस्थिती लक्षांत घेतां पूर्ण सहा असावें. प्रवेश-वयाच्या बाबतींत पूर्ण ६ वयाला सक्ती करूं नये. घटनेंत निर्दिष्ट केल्याप्रमाणें तेथें सक्तीचें वय Age of compulsion असावें. हाच नियम शहर विभागाला देखील लागू करतां येतो. प्रवेश-वय सर्व सामान्य सहा पूर्ण वर्षें ठेवून सक्तीचें वय सात ठेविल्यास ग्रामीण शहरीं अशा दोनही प्रदेशांतील मुलांना शाळेशीं संयोजन साधायला पुरता अवकाश राहील.

सरकारी शाळा आणि खाजगी शाळा यांत फरक आपोआपच राहील. परंतु या दोनही प्रकारच्या संस्थांबाबत शिक्षण खात्यानें एकच किमान धोरण ठेवलें पाहिजे.

प्र. ८ वा. प्राथमिक शाळेंत शालेय वर्षाच्या सुरुवातीच्या महिन्यांतच मुलें दाखल करण्यांत यावींत. कारण तें शिक्षक आणि वर्गाच्या प्रगतीच्या दृष्टीनें सोयीचें होईल. या बाबतींत तीन प्रकारची परिस्थिती संभवनीय—

(१) जेथें बालवाड्या अथवा पूर्वप्राथमिक शाळाच नाहींत.

(२) जेथें बालवाड्या अथवा पूर्वप्राथमिक शाळेंत एक या दुसऱ्या कारणानें पालक मुलाला पाठवूं शकत नाहींत.

(३) जेथें पालक आपलीं मुलें प्रथम बालवाडींत अथवा पूर्वप्राथमिक शाळेंत पाठवतात.

पहिल्या, दुसऱ्या परिस्थितींत शहरी विभागांत ज्या बालकांचें वय जून-जुलैच्या सुमाराला सहापेक्षां कांहीं महिन्यांनीं कमी असेल अशा मुलांना पूर्ण सहा वय नसल्यानें शाळेंत प्रवेश-बंदी होऊन त्यांचें एक वर्ष वायां जाईल. अशा मुलांच्या बाबतींत ३-४ महिन्यांपर्यंत सवलत देण्याचें धोरण असावें. शाळेच्या अधिकाऱ्यानें मुलाचा व्यक्तिगत विचार करून बालकास प्रवेश द्यावा. ग्रामीण विभागांत सध्यां तरी फारशी अडचण येण्याचा संभव नाहीं.

जेथें पालक मुलांना पूर्व प्राथमिक शाळेंत घालतात, तेथें प्राथमिक शाळेंत मुलें आपोआपच सुरुवातीला दाखल होतील.

प्र. ९ वा. पूर्व प्राथमिक शाळेंत शिक्षण घेणाऱ्या बालकांना प्राथमिकच्या दुसऱ्या वर्गांत घेण्याची सूचना फार उपयुक्त वाटते. परंतु अशा पूर्व प्राथमिक संस्थांतून प्राथमिक शाळेंत दाखल होणाऱ्या बालकांना वयाची मर्यादा घालणें अत्यंत जरुरीचें आहे. पूर्व प्राथमिक संस्थेतून कोणत्याही कारणानें सात पूर्ण वय झाल्याशिवाय प्राथमिक संस्थेत मुलाला दाखल कर



सुगंधित झरणपासून बनणारें तेल

आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.



१. गळणारे केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२. मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M. P. S 9A

ण्यांत येऊ नये. नाहींतर पूर्व प्राथमिक शिक्षणाचें स्वरूप बालकांच्या सर्वांगी विकासाला पोषक रहाणार नाहीं. पालकांच्या 'लवकर शिकविण्या'च्या अनिष्ट इच्छेला उत्तेजन मिळेल. पूर्व प्राथमिक शिक्षणांत २-५ नर्सरी स्कूल आणि ५-७ इन्फंट अगट प्रिपरेटरी स्कूल या दोन्हीच्या कार्यक्रमांचा समावेश करण्यांत यावा. पूर्व प्राथमिक शाळेंतील शिक्षण व्यक्तिगत आणि अनौपचारिक रीतीनें होतें. त्यांचा फायदा ६-७ वर्षें वयाच्या बालकांना मिळेल. लेखन-वाचनादि शिक्षणाचा पाया चांगला घातला जाईल. पूर्व प्रा. शाळेंत प्राथमिक शाळेंतून मध्येंच मुलाला काढून घेणाऱ्या पालकाला उत्तेजन राहणार नाहीं.

विशेषत: ज्युनिअर प्राथमिक शाळेंतील शिक्षण आणि शिक्षण पद्धति यांत जो यांत्रिकपणा आणि समूहपद्धतीचा तांत्रिकपणा आलेला आहे, त्यामुळें हें शिक्षण मुलांना आकर्षक वाटत नाहीं. या वयातील बालकांच्या विकासाच्या मूलभूत गरजांचा त्यांत विचार नाहीं. लेखन-वाचनादि फॉर्मल विषयावर फार भार आहे. हें शिक्षण जीवन-हेतूंवर आधारलेल्या क्रियाशील उपक्रमांच्या द्वारें व्यक्तिगत पद्धतीनें झालें पाहिजे. थोडक्यांत, पूर्वप्राथमिक शिक्षणांत सध्यां - ज्या पद्धतीनें शिक्षण चालतें त्याचेंच विस्तरण या सुरवातीच्या प्राथमिक वर्गांत झालें पाहिजे. हें विस्तरण जेव्हां करतां येईल तेव्हां शक्यतों लवकर व्हावें. परतु तात्कालिक उपाय म्हणून पूर्वप्राथमिक शिक्षक प्रमाण परीक्षा पास झालेल्या प्रशिक्षितांना पूर्वीप्रमाणें प्राथमिक शाळेंतील सुरवातीच्या वर्गांत काम करण्याला सवड ठेवणें उपकारक ठरेल. या शिक्षकांबाबतचा याबबतचा जो कांहीं खात्याला अनुभव मिळालेला आहे, तो उत्तेजनास्पद वाटतो. अशा शिक्षकांना साधनसामग्रीबाबत थोड्या अधिक सवलती द्याव्या म्हणजे प्राथमिक शाळांच्या पद्धतींत जरूर सुधारणांना सुरवात होईल.

संकलन समितीचे पू. प्रा. शिक्षणासंबंधीचे प्रश्न

[पान ५ वरून चालू]


साच्या प्रश्नाकडे आपण समग्रदृष्टीनें पाहण्याची जरूर आहे. ठिकठिकाणीं प्रश्न उपस्थित होतील तेथें ठिगळें लावून प्राथमिक शिक्षण पुढें जाऊं शकणार नाहीं.

संकलन समितीनें प्राथमिक शिक्षणाबरोबर पूर्व प्राथमिक शिक्षणाचे प्रश्नही योजलेले आहेत. या प्रश्नांची संख्या आणि स्वरूप पाहता समिति पूर्वप्राथमिक शिक्षणाचा विचार निदान प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टिकोणांतून करील अशी आशा वाटते.

प्रत्यक्ष पूर्वप्राथमिक शिक्षणासंबंधीं विचारलेल्या प्रश्नावर नूतन बालशिक्षण संघाच्या कार्यकर्त्यांनीं नुकतीच मुंबईला एक चर्चा परिषद घडवून आणली; या सभेंत एकमतानें घेतलेले निर्णय या अंकांत अन्यत्र दिले आहेत. पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठीं संघानें आपल्या भावनगर येथें गेल्या वर्षी योजलेल्या गिजुभाई संमेलनांत स्टॅटयुटरी बोर्ड स्थापन करण्यासंबंधीची मागणी केली होती. त्याच मागणीचा पुनः उच्चार केला आहे. संकलन समिती संघासारख्या अनुभवी संघटनेच्या मताला योग्य प्राधान्य देईल अशी अपेक्षा आहे.

स्वदेशीची भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





आली पेरणी....

आली पेरणी रे आली पेरणी
चला शेतांत गाउं या गाणीं ॥ धृ० ॥

आकाशांत आले
ढग काळेनिळे
वाऱ्यावरती
रानफुल डुले
बघूं आंब्यावर कोकिळ-राणी ॥ १ ॥

चला चला सारे
बांधावर यारे
डोक्यामध्यें खोवू
गवताचे तुरे
मग येईल झरझर पाणी ॥ २ ॥

पावसांत भिजूं
गवतांत निजूं
हिरव्या हिरव्या पानांत
कांहीं कुजबुजूं
नाचूं रानांत पाखरांवाणी ॥ ३ ॥

बैल बघा माझे
जंगलचे राजे
वादळांत जणूं
विजली गर्जे
करुं झरझर शेताची पेरणी ॥ ४ ॥

—बाबा मोहोड

- मोर -

बहुरंगी डौलदार ।
आवडतो मज मोर ॥

पक्ष्यांचा हा शोभे राजा ।
काय वर्णू याच्या साजा ॥ १ ॥

वर्षाऋतु होतांरंभ ।
गर्जतां तें सारें नभ ॥

आनंदोर्मी उफाळून ।
नृत्य करी आनंदून ॥ २ ॥

देखतां ती नृत्यकला ।
माझ्या रसिक मनाला ॥
वाटे याच्यापुढें सारा ।
तुच्छ जगाचा पसारा ॥ ३ ॥
विधात्यानें याच्या अंगा ।
चितारिले सर्व रंगा ॥
नृत्यकला 'मेनका'ची ।
पदन्यासी होई साची ॥ ४ ॥
पाहतों मी मोर जेव्हां ।
शंका येते मनीं तेव्हां ॥
'देवाचा हा दूत तर ।
नसेल ना महीवर ! ' ॥ ५ ॥

—परशुराम मर्ढेकर

(आदिवासी बालकथा)

कोल्ह्याची फजिती

एक होता म्हातारा. एक होती म्हातारी. म्हातारा जायचा शेतावर. म्हातारी राह्यची घरीं. पाणी आणायची. तांदूळ दळायची. भाकरी भाजायची. टोपलींत घालून शेतावर जायची. वाटेंत होती एक नदी. नदीवर होते कोल्हे. ते म्हणाले, 'ह्या म्हातारीची भाकरी पळवली पाहिजे.' त्यांनीं युक्ति शोधून काढली. सगळे कोल्हे नदीत मुतले. नदीला आला पूर. म्हातारी म्हणते 'आतां कशी जाऊं ?' कोल्हे म्हणतात, 'आम्हीं तुला नेऊं.' म्हातारी कोल्ह्याच्या पाठीवर बसली. पलीकडे गेली. इतक्यांत कोल्ह्यांनीं भाकरी खाऊन टाकली. 'आतां काय नेऊं, म्हाताऱ्याला काय देऊं ?' तिनें पाण्याचें मडकें भरलें. म्हाताऱ्याला नेऊन दिलें. 'आपल्या घरीं पुष्कळ तांदूळ. मग पाणी कां आणलेंस ?' म्हाताऱ्यानें विचारलें. म्हातारी म्हणाली, 'कोल्ह्यांनीं भाकरी खाल्ली.' 'असें आहे काय, उद्यां करूं गम्मत,' म्हातारा म्हणाला. दुसऱ्या दिवशीं म्हाताऱ्यानें म्हातारीचें सोंग घेतलें. भाकरी घेऊन शेतावर निघाला. वाटेंत कोल्हे भेटले. 'म्हातारे, म्हातारे पाठीवर बस,' कोल्हे म्हणाले. 'मी पाठीवर बसेन पण मला भीति वाटते. तुमचीं शेपटें धरूं द्याल तर येतें,' म्हातारी म्हणाली. कोल्ह्यांनी 'हो' म्हटलें. म्हातारीनें कोल्ह्यांचीं शेपटें धरलीं. नदींतून सगळी मंडळी पलीकडे गेली. पण म्हातारीनें शेपट्या सोडल्याच नाहींत. त्या जोरानें पिरगळल्या. कोल्हे 'ओय् ओय् ओय्' करून जोरानें ओरडूं लागले. म्हातारीनें काठी घेतली. कोल्ह्यांना बडव बडव बडवलें. कोल्हे पळून गेले. पुन्हा म्हातारीच्या वाटेस गेले नाहींत. म्हातारा-म्हातारी सुखानें राहूं लागले.

—संग्राहक : अनुताई

येरे येरे पावसा

येरे येरे पावसा
शेतांत दिवसा
भिजवायला । भिजवायला
रिमझिमऽऽ रिमझिमऽऽ रिमझिम
ये रे ये रे मोरा
हलवित तुरा
डुलत डुलत । डुलत डुलत
मँवमँवऽऽ मँवमँवऽऽ मँवमँवऽऽ
कोकिळ राणी
गा ग गाणीं
कुहुकुहूऽ । कुहूकुहूऽऽ
कुहुकुहूऽऽ कुहुकुहूऽऽ कुहुकुहूऽऽ
चिउ काउ या रे
दाणे खा रे
खळ्यांतले । खळ्यांतले
कावकावऽऽचिवचिवऽऽकावकावऽऽ

—बाबा मोहोड

— आमचें खेडें —

खेडें अमुचें सुंदरसें—
दिसे मनोहर पहा कसें ! ! ध्रु०
समोवतालीं उंच किती—
पर्वत शोभुन हे दिसती !
श्यामल सुंदर,
दृश्य मनोहर—
मोहवि अंतर—
वेधुन येथें पहा कसें—
खेडें अमुचें सुंदरसें ! ! १
कष्टाळू हे शेतकरी—
पिकवितात हीं शेतं खरीं !
धनधान्यानें,
समृद्धीनें,
हरित तृणानें—
हरतें पाहुन भान कसें—
खेडें अमुचें सुंदरसें ! ! २
जीर्ण झोंपड्या उभ्या इथें—
सौख्य नांदतें सदा जिथें !
दारिद्र्यांतुन
फुललें जीवन
हंसतें सुख पण
इथें शांतता नांदतसे—
खेडें अमुचें सुंदरसें ! ! ३
इथें न कोठें दुर्गंधी—
शिवार सारें आनंदी !
नित्य या स्थळीं
हवा मोकळी
स्वच्छ चांगली
वाण कशाची-इथें नसे
खेडें अमुचें सुंदरसें ! ! ४
पलीकडे त्या बालांचें
शालामंदिर शिकण्याचें
मुलें-फुलें तीं
छोटीं-मोठीं
इथें उमलती
हांसत, नाचत उल्हासें —
खेडें अमुचें सुंदरसें ! ! ५
भेदभाव ना इथें मुळीं—
गर्व न ठाऊक कुणा मुळीं
बंधुत्वानें
प्रेमळतेनें,
आनंदानें
खेडें अमुचें नांदतसे—
खेडें अमुचें सुंदरसें ! ! ६

—बाळ कालेगांवकर

लोखंड खाणारे उंदीर

(पंचतंत्रांतील एक कथा)

नातुक नांवाच्या एका व्यापाऱ्याला व्यापारांत जबर खोट बसून त्याचा सारा पैसा त्यांत गमावला. तेव्हां तो घर सोडून परदेशीं व्यापारधंदा करण्यासाठी निघाला. पण निघायच्या पूर्वी आपला परम मित्र लक्ष्मण याच्याकडे जाऊन तो म्हणाला, "हें बघ मित्रा, हा माझा तराजू मीं परत येईपर्यंत तुझ्यापाशी ठेवून दे. मला तो निकूप टाकायचा नाहीं. कारण आमच्या घराण्यांत कैक पिढ्या तो चालत आला आहे." आणि असं म्हणून तराजू मित्राकडे ठेवून तो मार्गाला लागला.


थोड्याच कालांत नातुकानं पुष्कळ पैसा मिळविला आणि मग परत तो आपल्या गावीं आला. येतांक्षणीच लक्ष्मणाकडे जाऊन तो म्हणाला, "खूब उपकार झाले बरं तुझे मित्रा! माझा तराजू तूं इतके दिवस राखून ठेवलास— पण आतां देतोस का माझा तो परत?"

"हं, हं, तराजू ना?" लक्ष्मण म्हणाला, "अरे,तो उंदरांनी खाऊन टाकला की रे!"

"वा!" संतापानं नातुक ओरडला, "एवढा जंगी तराजू तो!— उंदीर खातील तरी कसे? चागलं अडीचशे शेर वजन होतं ना त्याचं!"

"होय ना! पण उंदीरच इतके भयंकर झाले आहेत माझ्या घरांत कीं त्याचा फन्ना उडवायला त्यांना कितीसा उशीर रे!"

नातुक क्षणभर विचारांत पडला. मग चेहेऱ्यावर हास्य आणून तो म्हणाला, "खरंच मित्रा! तुझा तरी काय बरं दोष यांत? माझंच नशिब खोटं! बरं आहे. मीं जरा नदीवर जाऊन आता स्नान करून येतो. माझे कपडे सांभाळण्यासाठी तुझ्या मुलाला जरा पाठवतोस का माझ्याबरोबर?"



काय मोठंसं त्यांत, असा विचार करून लक्ष्मणानं रुकार दिला.

नदीवरून परत येतांना वाटेंतल्या एका गुहेंत नातुकानं मुलाला ढकलून दिलं आणि दारावर एक मोठी जडशी शिला ठेवून त्याला कोंडून ठेवलं. नंतर तो लक्ष्मणाच्या घरी आला. लक्ष्मणानं विचारलं, "अरे, माझा मुलगा कुठं?"

नातुकानं सांगितलं, "नदीकिनाऱ्यावर तो बसला होता ना, त्यावेळी वरून एका मोठ्या ससाण्यानं त्याच्यावर एकदम झडप घातली आणि त्याला उंच पळवून नेला!"

"अरे थापाड्या!" लक्ष्मण ओरडला, "पंधरा वर्षाच्या एवढ्या मोठ्या मुलाला ससाणा रे उचलून कसा नेईल?"

"कसा म्हणजे? जर का अडिचशें शेर वजनाच्या लोखंडी तराजू उंदरांना खातां येतो, तर पंधरा वर्षाच्या पोराला ससाणा कां पळवूं शकणार नाही? तेव्हां आतां मित्रा, तुझा मुलगा जर तुला पाहिजे असेल, तर माझा तराजू देऊन टाक कसा!"

मात्रा अचुक लागू पडली. नातुकाला त्याचा तराजू मिळाला!

तात्पर्य: ज्याची बाजू सत्याची आहे तो लबाडी सहज चव्हाट्यावर आणूं शकतो. 'वनस्पति'चेंच उदाहरण घ्या. वनस्पति हें हितकर अन्न आहे, हें नामांकित शास्त्रज्ञांनी स्पष्ट दाखवून दिले आहे. प्रयोगान्तीच हें सिद्ध झालें आहे.

डालडा वनस्पति शुद्ध वनस्पति तेलांपासून सक्त सरकारी नियमांनुसार बनविली आहे. **'डालडा'** सर्व स्वयंपाक प्रकारांसाठी उपयुक्त असून 'अ' आणि 'ड' ही जीवनसत्त्वे त्यानें अल्प खर्चात मिळूं शकतात. त्याच्या प्रत्येक औसांत ७०० आतरराष्ट्रीय युनिट्स् म्हणजे उत्तम तुपांत असतें तितकेच 'अ' जीवनसत्त्व घातलेले असतें. तेव्हां सर्व ठिकाणच्या सुगृहिणींचें असेंच एकमत झालेलें असले तर आश्चर्य नव्हें कीं **'डालडा' स्वयंपाकासाठीं उत्तम तर आहेच, पण अन्न म्हणूनहि उपयुक्त आहे.**

DL 445-X52 MA

हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड, मुंबई

बाल-अध्यापनाच्या नवीन शिक्षणक्रमाच्या

कार्यपद्धतीचें अध्यापन

'बालशिक्षण कार्यपद्धति' हा शब्दप्रयोग इंग्रजींतील Practice of Child Education चा पर्याय शब्द म्हणून कित्येक वर्षांपासून प्रचलित बनला आहे. अध्यापन संस्थेच्या शिक्षणक्रमांत या विषयाला केंद्रीय महत्त्व आहे. अध्यापनांतील कार्यपद्धतीमुळेंच बालशिक्षण संस्थेच्या कार्यपद्धतीला स्वरूप प्राप्त होत असतें. त्यामुळें या विषयाला बालशिक्षण आणि बाल अध्यापन या दोन्ही दृष्टीनें महत्त्व प्राप्त होतें.

नव्या शिक्षणक्रमांतील कार्यपद्धति

मुंबई राज्यांतील बाल अध्यापन मंदिरांत पाणंदीकर समितीनें योजलेला अभ्यासक्रम या वर्षी सुरू झाला आहे. जुन्या शिक्षणक्रमांच्या परीक्षेंत 'कार्यपद्धति' या विषयावर १०० गुणांची एक पूर्ण प्रश्नपत्रिका असे; परंतु नव्या शिक्षणक्रमांत याच प्रश्नपत्रिकेंत शैक्षणिक उपपत्ति Theory of Education या विषयाचा समावेश असल्यानें कार्यपद्धतीच्या वांट्याला ५० गुण येतील असें दिसतें. यावरून नव्या अभ्यासक्रमांत कार्यपद्धतीचें स्थान कांहीं कमी झालें आहे किंवा काय अशी एक स्वाभाविक शंका येईल. परंतु समग्र शिक्षणाचा थोडा बारकाईनें विचार केल्यास नव्या शिक्षणक्रमांत या विषयाचें महत्त्व थोडें वाढलेलेंच दिसेल.

प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष गुणांची वांटणी

नवीन शिक्षणक्रमांत 'कार्यपद्धती'च्या मथळ्याखालीं जे जे विषय योजले आहेत, त्याला प्रत्यक्ष गुण ५० असले तरी या अभ्यासावर दुसरे जे विषय आधारलेले आहेत, त्यांना पुढीलप्रमाणें गुण दिलेले आढळतात. या अप्रत्यक्ष गुणांची वांटणी पुढीलप्रमाणें झालेली आहे:—

विषय	जुना अभ्यासक्रम	नवा अभ्यासक्रम
२० पाठ देणें २० पाठ टीका लिहिणें ४० निदर्शनांचें अवलोकन करणें	१००	१००
साधन पोथी	४०	२५
पाठ व तोंडी परीक्षा	१००	२००
	एकूण २४०	३२५

यावरून कार्यपद्धतीचे प्रत्यक्ष गुण ५० कमी झाले असले तरी अप्रत्यक्ष गुण ८५ नीं वाढलेले आहेत ही गोष्ट या विषयाचें अध्यापन करतांना ध्यानांत घ्यावी लागेल.

अभ्यासक्रमांतील फेरफार

जुन्या शिक्षणक्रमांत या विषयाचे पुढीलप्रमाणें विभाग होते.

(१) व्यावहारिक आणि सामाजिक जीवन—शिक्षण
(२) इंद्रिय—शिक्षणाचीं मॉंटेसोरी साधनें
(३) भाषा
(४) गणित
(५) शारीरिक शिक्षण,
(६) कला, हस्तव्यवसायाचीं साधनें आणि त्यांच्या उपयोगासंबंधीं पद्धति.

या सर्व विभागांना नव्या शिक्षणक्रमांत स्थान दिलेलें असून याशिवाय मुक्तव्यवसाय Free Activity आणि निसर्गपरिचय Nature Study हे दोन विभाग जास्तीचे योजण्यांत आले आहेत. जुने सहा विषय योजलेले असले तरी त्यांतील मुद्यांत बरेच फेरफार करण्यांत आले आहेत.

(१) 'व्यावहारिक आणि सामाजिक जीवनशिक्षण' या विषयाचा तपशील पूर्वीप्रमाणेंच आहे.

(२) 'इंद्रियशिक्षणाचीं मॉंटेसरी साधनें' Montessory Material for Sensory Education' असा या विषयाचा मथळा बदलून त्याचे जागीं 'इंद्रिय विकासाचीं साधनें' Material for Sensory Development अशी शब्दयोजना करून त्यांतील 'मॉंटेसरी' शब्द वगळला आहे. या विषयाचे तपशीलांतील जीं मॉंटेसोरी साधनांचीं नांवें होतीं तीं सर्वच्या सर्व वगळून यासंबंधीं एक सूचना देण्यांत आली आहे. अध्यापन संस्थेचें कार्य ज्या विशिष्ट पद्धतीनें चालत असे त्या विशिष्ट पद्धतीप्रमाणें या विषयाचा तपशील त्या त्या संस्था योजूं शकतील.

(३) **भाषा** : या विषयांत १. शब्दकोषाचा विकास, २. उच्चारशुद्धि, ३. संवाद, ४. नाट्य ५. वार्ताकथन, ६. गाणीं, ७. भाषाविषयक खेळ.

हे सर्व मुद्दे जुन्या अभ्यासक्रमांतून जसेच्या तसे घेतले आहेत. लेखन-वाचनाच्या तपशीलाऐवजीं लेखन-वाचनाच्या तत्परतेच्या Reading Readiness अनुसंधानांत त्या विषयाला पायारूप होऊं शकेल अशा गोष्टी घेण्यासंबंधीं सूचना.

गणित विषयाचा तपशील

(४) **गणित** : (अ) या विभागांतील मॉंटेसरी साधनांचीं नांवें वगळून १ ते १० पर्यंत राशि आणि चिन्हांचें निदर्शन

(ब) शून्याची कल्पना (क)१०पर्यंत मोजणी (ड)१००पर्यंतच्या अंकांची ओळख, (ई) भूमितींच्या आकृतींचा परिचय. एवढा तपशील ठेवून मूलकृत्यें, अपूर्णांक, क्षेत्रफळ वगैरे भाग काढून टाकण्यांत आला आहे.

(५) **शारीरिक शिक्षण** : या विभागाचा तपशील पूर्वीप्रमाणेंच आहे.

(६) **हस्तव्यवसाय** : या विषयाच्या तपशिलांत साधनांच्या उपयोग पद्धतीऐवजीं प्रयोजन–व्यवसाय असें लिहिलें आहे.

कार्यपद्धतीच्या स्वरूपाचा मूलभूत प्रश्न


सध्यांच्या बालमंदिरांत ज्या पद्धति आढळतात, त्यांना 'मॉंटेसरी' अथवा 'किंडर गार्टन' म्हणण्यांत येतें.


या दोन पद्धतींत 'किंडर गार्टन' पद्धति ही सतत प्रगतिशील राहिली आहे. तींत प्रयोग व संशोधन चालू राहून तिचें स्वरूप मनोविज्ञानाच्या प्रवाहींबरोबर विकसत आलेल आहे. परंतु मॉंटेसरी पद्धतीच्या बाबतींत तशी परिस्थिति निर्माण होऊं शकली नाहीं. मनोविज्ञानाच्या प्रगतीबरोबर मॉंटेसरी पद्धति प्रगति करूं शकली नाहीं. मॉंटेसरी पद्धतीची कार्यपद्धति मुख्यतः इन्द्रिय शिक्षणाच्या साधन — योजनेवर आधारलेली आहे. इंद्रिय शिक्षण मॉंटेसरी पद्धतीचा पाया आहे. मनोविज्ञानाच्या दृष्टिकोनांतून ही इंद्रिय शिक्षण योजना तपासल्यास ह्यासंबंधीं मतभेद आढळतात. संवेदनशिलतेसंबंधीं सर्वांच्या अनुभवास येणारी एक गोष्ट म्हणजे ही संवेदनशिलता बालकाच्या मनांतील हेतूच्या तीव्रतेवर अवलंबून असल्याचें दिसतें. मॉंटेसरी साधनांवरील खेळांत मुलांच्या मनांतील हेतु तीव्र बनण्यासाठीं पुरता अवकाश नसल्यामुळें या साधनांवरील खेळ पुढें पुढें यांत्रिक होऊं लागतात. यामुळें इंद्रियांची संवेदनशिलता वाढत नाहीं, आणि दुसरी गोष्ट अशी कीं हेतुपूर्वक योजलेल्या कार्यात स्वयंस्फूर्त विविध क्रियांनीं जितका अधिक अवकाश (Manupulative Scope) मिळेल तितकें इंद्रियांचें कार्य अधिक प्रभावी होतें. असा अवकाशहि मॉंटेसरी साधनांत नसल्यामुळें या साधनांतून इंद्रियशिक्षण होतें हा दावा टिकूं शकत नाहीं. सूसान आयझॅकच्या संपादकत्वाखालीं प्रकाशित झालेल्या 'Play in the Infant School' नांवाच्या पुस्तकांत या पुस्तकाची लेखिका मिस् बॉर्ईस म्हणते, 'In the place of sense training apperatus we use toys and raw materials as we were convinced that no one Faculty of the Child could be isolated and trained.

यावरून मॅडम मॉंटेसोरींच्या संवेदनीय एकीकरणाचा सिद्धान्त देखील सर्वांना पटेल असा नाहीं.

प्रभावी इंद्रियशिक्षण कसें होऊं शकेल ?

इंद्रिय–शिक्षण प्रभावी होण्यासाठीं वर सुचविल्याप्रमाणें हेतूंची स्पष्टता आणि साधनांतील क्रिया–अवकाश या दोन गोष्टी मुक्तव्यवसायाच्या साधनांत सर्वांत अधिक मिळूं शकतात. उदा० पाणी, रेती, माती, बांधकामाचीं साधनें, शोभारचनेचीं साधनें, रांगोळी, अल्पना, चित्रकाम, रंगकाम, खेळणीं बनवणें आणि प्रोजेक्टस् या व्यवसायांत आणि जीवन व्यवहाराच्या व्यवसायात इंद्रियांना विविध प्रकारें कसरत मिळते, त्यामुळें इंद्रियांना





पो. बॉ. नं. २०९३
मुंबई २

विशिष्ट कक्षेवर विकास होण्याची शक्यता आहे. इंद्रिय विकासासाठीं निश्चित साधनेंच असलीं पाहिजेत, हा आग्रह बरोबर नाहीं. या विषयाचें शिक्षण कसें प्रभावी होऊं शकेल याचा विचार झाला पाहिजे.

कार्यपद्धतीच्या विभागाचें वर्गीकरण

नव्या शिक्षणक्रमांतील कार्यपद्धतींत एकूण आठ विषय आहेत हें आपण वर पाहिलेंच आहे. या विषयावरील साधनांचे दोन भाग पडतात. कांहीं विभागांत साधनें प्रयोजित (Structured) दिसतात, तर कांहीं विभागांतील साधनें हीं अप्रयोजित अथवा Unstructured आहेत. प्रयोजित साधनांत विशिष्ट हेतु असल्यामुळें त्या हेतूच्या दृष्टीनें या साधनांचा उपयोग कसा करावा, याचें निदर्शन शिक्षक करूं शकतो. परंतु अप्रयोजित साधनात या साधनांवर खेळतां खेळतां मुलांच्या मनांतच त्यांचे हेतु निर्माण होतात, व या हेतूंप्रमाणें तीं आपल्या मनानें खेळतात. अशा साधनांच्या बाबतींत शिक्षकाचें कार्य हें निरीक्षकाचें बनतें. कार्यपद्धतींतील व्यावहारिक आणि सामाजिक, शिक्षण, भाषा, गणित, निसर्गावलोकन आणि इन्द्रिय-परीक्षण हे विषय प्रयोजित आहेत, तर मुक्तव्यवसाय, विविध हस्तव्यवसाय, शारीरिक शिक्षणाचा बराचसा भाग हा अप्रयोजित साधनांचा आहे. या साधनांवर मुलें दोन प्रकारच्या कक्षेवर खेळतांना आढळतात. यांपैकीं पहिल्या प्रकारांत त्यांचे स्वयंस्फूर्त खेळ हे तरंगाच्या Phantasy स्वरूपाचे असतात. आणि त्यांना जसजशी स्थिरता प्राप्त होते त्याप्रमाणें तीं वास्तविक भूमिकेवर खेळूं लागतात. मुक्तव्यवसायाचीं साधनें हळुहळू हस्तव्यवसायाचीं साधनें बनूं लागतात.

पद्धति—मॉंटेसरी कीं किंडर गार्टन ?

कार्यपद्धतीचे वर जे आठ विषय सुचविले ते, सर्वच्या सर्व कोणत्याहि एका पद्धतीच्या साच्यामध्यें बसवतां येत नाहींत उदा०—मुक्त व्यवसाय हा विषय किंडर गार्टन किंवा मॉंटेसरी या दोन्ही पद्धतींत नाहीं. या विषयाचा तपशील या पद्धतीवरून



कामिनिया हेअर ऑईल
कामिनिया स्नो
कामिनिया टॉयलेट सोप
ऑटो दिलबहार

कामिनिया शृंगार

प्रसाधनांमुळें

चमकणारा केशकलाप, अनुपम लावण्य आणि रेशमाप्रमाणें मुलायम त्वचा प्राप्त करून घ्या.

कामिनिया प्रसाधनेंच उत्तम असतात हें मला माहीत आहे. माझ्या निवडीबद्दल मला अभिमान वाटतो आणि तो योग्यच आहे.

☆

वैजयंतिमाला—

भारत नाट्यमची ही प्रतिमा असें म्हणते पहा.

ॲंग्लो इंडियन ड्रग ॲंड केमिकल कंपनी,
२६५ जुम्मा मशीद, पोस्ट बॉक्स नं. २०८२ मुंबई २.

साहित्यांतून मिळूं शकत नाहीं. मुक्त व्यवसायाचा तपशील आपल्याला चिकित्सालयाच्या कार्यपद्धतींत मिळूं शकेल. या विभागासाठीं मीं पुढील तपशील सुचवतों—

(१) बांधकाम—शिल्प रचना
(२) मॉडेलिंगसाठीं ओल्या रेतीचा ट्रे अथवा खड्डा
(३) मातीकाम अथवा प्लास्टिसीन
(४) चित्र आणि रंगकाम
(५) पाण्याचे खेळ
(६) बाहुलीचे खेळ
(७) खडूचा उपयोग
(८) हातोडी आणि खिळ्यांचा उपयोग
(९) कात्री आणि चित्रांचा उपयोग
(१०) मोतीकाम
(११) शोभारचना साहित्य.

या साधनांवर सुरवातीला कांहीं मुलें तरंगी कक्षेवर खेळतात; परंतु हळुहळू त्यांचे खेळ वास्तविक बनूं लागतात. वास्तविक कक्षेवर आलेल्या मुलांना योग्य वेळ पाहून शिक्षक एखाद्या साधनावर समूह-पाठहि योजूं शकतो. उदा० बांधकामाच्या साधनांवर (१) साधें घर, (२) शाळा, (३) दवाखाना, (४) स्टेशन, (५) किल्ला, (६) बंदर, (७) एरोड्रोम, (८) पोस्ट ऑफिस, (९) एखादा कारखाना वगैरेंच्या इमारतींचे नमुने शिक्षक बनवून दाखवूं शकेल.

कला, हस्तव्यवसाय आणि प्रयोजनें

हा विषय व्यक्तिगत अथवा लहानशा गटापुढें योजतां येतो. यांत सामुदायिक पाठांना स्थान नाहीं. कलाकौशल्य आणि हस्तव्यवसाय या विषयांना प्रयोजनांची जोड दिल्यानें तात्कालिक प्रबल हेतु निर्माण करतां येतो. प्रयोजनासाठीं कांहीं विषय:— (१) किल्ले, (२) कृष्णजन्माचीं दृश्यें, (३) शेत, (४) खेडें, (५) प्राणीबाग, (६) फळा फुलांचें प्रदर्शन, (७) पशुपक्ष्यांचें प्रदर्शन (८) मेळा. अशा प्रकारच्या प्रयोजनांत कागद, पुठ्ठा, लाकूड, कापड, रंग, बांबूच्या सळ्या, दोरा, गोंद वगैरेंचा उपयोग करून विविध प्रकारचीं दृश्यें बनवण्यास उत्तेजन देतां येईल. सुशोभनासाठीं मणी, मोतीं आदि वस्तूंचा उपयोग करतां येईल.

शारीरिक शिक्षण

या विषयांत क्रीडांगणाचीं साधनें—उदा. जंगलजीम, घसरगुंडी, निरनिराळ्या प्रकारचे जिने, सी-सॉ, शोपाळे वगैरे साधनांचा उल्लेख आहे. अशा साधनांच्या बाबतींत व्यक्तिगत निदर्शनांना कोठें कोठें अवकाश आहे, परंतु अध्यापन विद्यार्थ्यांना या साधनांची योजना, त्यांचा हेतु आणि उपयोग यांची कल्पना दिली म्हणजे पुरेसें होण्यासारखें आहे.

तालबद्ध खेळ आणि इतर खेळ या बाबतींत, त्याचप्रमाणें भाषा आणि गणिताचे बाबतींत, पुढील अंकीं देण्यांत येईल.

—शे. ना नामले



शुभ प्रसंगाच्या वेळीं
सुखमाधुरीसाठीं वापरा
दिलरंजन
सुवासिक सुपारी
सुमधुर, शेंकडों लोकांना
आनंदित करणारी—
—: सर्वत्र विकली जाते :—
आपल्या गांवांत एजन्सीसाठीं
लिहा :—
मालक : आर. के. सुपारीवाला,
शांती भुवन, चौपाटी सी फेस,
मुंबई ७. शाखा : पोस्ट ऑफिसच्या
बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुं. ४
चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ
ग्रॅट रोड, मुंबई ७



अध्यापन चर्चा परिषदेचे निष्कर्ष

दिनांक ४, ५ व ६ जुलै रोजीं शिशुविहार, दादर येथें मुंबई राज्यांतील नूतन बालशिक्षण संघाशीं संबंधित अशा बाल-अध्यापन मंदिरांची Pre-Primary Training Colleges या वर्षी सुरू झालेल्या अभ्यासक्रमाच्या अध्यापन कार्यांत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीनें एक चर्चा परिषद योजण्यांत आली. या परिषदेंत अमदाबाद, भावनगर, सुरेंद्रनगर, नडियाद, कोसबाड, मुंबई, पुणें, सांगली व सोलापूर येथें चालू असलेल्या एकूण अकरा बालअध्यापन मंदिरांच्या एकूण ३० अध्यापक-मुख्याध्यापकांनीं भाग घेतला होता. कांहीं बाल-अध्यापन मंदिरांच्या मुख्याध्यापिका आकस्मिक कारणानें वेळेवर येऊं शकल्या नाहींत, परंतु परिषदेच्या कार्याला त्यांनीं आपला पाठिंबा असल्याचें कळविलें होतें.

नवीन अभ्यासक्रमाबाबतचे पुढील विषयांवर परिषदेनें चर्चा केली.

(१) कार्यपद्धतीविषयक अभ्यासक्रमाचा तपशील (२) साधन-पोथीचें स्वरूप (३) पाठ (४) अवलोकनें (५) संस्थेनें करावयाचें मूल्यांकन (६) सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचें स्वरूप व त्याचें मूल्यांकन (७) हस्तव्यवसाय (८) वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षा (९) संदर्भ ग्रंथ व पाठ्य-पुस्तकें (१०) परिभाषा (११) आठवड्याचें वेळापत्रक (१२) दोन वर्षांच्या शिक्षणक्रमाचे प्रश्न (१३) सर्टिफिकेट विषय (१४) नापास विद्यार्थ्यांचा प्रश्न (१५) दुसऱ्या वर्षांत प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचा प्रश्न.

या सर्व विषयांवर एकूण १५ तास चर्चा झाली व शेवटीं खालील प्रमाणें निर्णय सर्वसंमत म्हणून स्वीकारण्यांत आले.

१ कार्यपद्धतीविषयक अभ्यासक्रमाचा तपशील : बालशिक्षणाचे सिद्धान्त आणि कार्यपद्धति या विषयांतील कार्यपद्धतिविषयक विभागांत एकूण आठ विषय आहेत. या सर्व विभागांत प्रत्येक अध्यापन संस्थेनें कमींत कमी पुढील अभ्यासक्रम करून घ्यावा. ज्यांना विशेष प्रकारचे प्रयोग करावयाचे असतील अशा संस्थांनीं देखील परिषदेचा हा एकमुखी निर्णय स्वीकारावा. कोणत्याही विषयांत यापेक्षां ज्यांना अधिक कार्य करावयाचें आहे, त्यांना या निर्णयानें बाध येत नाहीं.

मुक्तव्यवसाय Free activities : यांत पुढील दहा गोष्टींचा समावेश करावा. (१) शिल्परचना-बांधकामाचे ठोकळे (२) मॉडेलिंगसाठीं ओलसर रेतीचा ट्रे अथवा खड्डा व संबंधित खेळणीं (३) माती आणि प्लॅस्टिसीन (४) चित्र-रचना-शोभारचना रांगोळी, पॅटर्न मेकिंग, मोझेईक वर्क (५) चित्र आणि रंगकाम (६) फळा व खडूचा उपयोग (७) घरकुल अथवा बाहुल्यांचे खेळ (८) मण्यांचें काम (९) पाण्याचे खेळ (१०) हातोडी-खिळ्यांचा उपयोग.

२ व्यावहारिक व सामाजिक जीवन-शिक्षणाचे पाठ : Exercises of Practical and Social life.

स्वच्छता : (१) हातपाय धुणें (२) केर काढणें (३) साधनसफाई (४) लादी पुसणें **व्यवस्था :** (५) घड्या घालणें (६) बटणें घालणें **स्नायु नियंत्रण :** (७) चालणें (८) पाणी भरणें (९) भाजी चिरणें (१०) भांडीं घासणें (११) पदार्थ वाढणें **सामाजिक :** (१२) पाणी देणें (१३) नमस्कार करणें (१४) जेवणाची पूर्वतयारी करणें (१५) सुशोभन करणें.

कमींत कमी वरील प्रमाणें पाठ द्यावेत व याशिवाय पुढील आणखी पाठ होऊं शकतील ते ज्या त्या संस्थेच्या सोयीप्रमाणें करावे. (१) तोंड धुणें (२) आंघोळ (३) नखें काढणें (४) केंस विंचरणें (५) भिंत लिंपणें (६) कपडे धुणें (७) संडास मोऱ्या साफ करणें (८) सडा घालणें (९) चपला-बूट ठेवणें (१०) वर्गमांडणी (११) दळणें (१२) कुटणें (१३) कांडणें (१४) निवडणें (१५) पॉलिश करणें.

३ इंद्रिय-शिक्षण साहित्य : Material for Sensorial Development :-

(१) **घनाकृति** Solid forms **मधील फरक ओळखणें :-** यासाठीं दट्टापेट्या, बिनटोपणाचे दट्टे, रुंद जिना, लांब शिडी, मनोरा ही मॉन्टेसोरी योजनेंतील साधनें अथवा शिल्परचनेसारखीं अन्य साधनें अथवा हीं दोनही प्रकारचीं साधनें.

(२) **क्षेत्राकृति** Plane forms **मधील फरक ओळखणें :-** यासाठीं भौमितिक आकृतींची पेटी, कार्डे, रचना पेट्या हीं मॉन्टेसोरी योजनेंतील साधनें अथवा चित्ररचना व शोभारचना यांसारखीं साधनें अथवा दोनही प्रकारचीं साधनें.

(३) **रंग आणि छाया रंगांतील फरक ओळखणें :-** तीन रंग, अकरा रंग, रंग छाया यांच्या पेट्या हीं मॉन्टेसोरी योजनेंतील साधनें अथवा चित्ररचना व शोभारचना यांसारखीं किंवा शिक्षकांनीं योजलेलीं साधनें अथवा दोनही प्रकारचीं साधनें.

(४) **वजनांतील सूक्ष्म फरक ओळखणें :-** वजन तत्त्वांचें मॉन्टेसोरी साधन अथवा अन्य साधनें.

(५) **स्पर्शांतील सूक्ष्म फरक ओळखणें :** स्पर्शपाट्या, कापड पेटी, स्पर्शतक्त्या अथवा अन्य साधनें.

(६) **चव आणि वासांतील फरक ओळखणें :** मॉन्टेसोरी साधनांच्या धर्तीवर तयार केलेलीं साधनें अथवा अन्य प्रकारचीं साधनें.

(७) **आवाजांतील फरक ओळखणें :** आवाज–डब्या अथवा याप्रकारचीं प्रयोजित साधनें.

४ भाषा व **५ गणित :** या विषयांत नवीन नमूद केलेल्या मर्यादा लक्षांत घेऊन सध्या चालू आहे त्याप्रमाणेंच हे विषय घ्यावे.

६ निसर्ग परिचय : बॉबे नॅचरल हिस्ट्री सोसायटीनें 'निसर्ग दर्शनमालें'त प्रकाशित केलेल्या (१) आपले पक्षी पुस्तक १ (२) आपले पक्षी पुस्तक २ (३) आपले सुंदर वृक्ष या व अशा प्रकारच्या पुस्तकांच्या आधारें पुढील पक्ष्यांतून (१) सामान्य बुलबुल (२) होला (३) कोकिळ (४) गरुड (५) टिटवी. या पक्ष्यांचा विशेष अभ्यास व कावळा, चिमणी पोपट, मोर, दैयड, कोतवाल, बगळा, साळुंकी, सुग्रण, शिंपी या पक्ष्यांची सामान्य माहिती व ओळख. **वृक्ष :** (१) पळस (२) गुलमो (३) सावरी (४) चाफा (५) पांगरा. या वृक्षांचा विशेष अभ्यास व गुलाब, मोगरा, तगर शेवंती, पारिजातक, गुलछडी, जाई, जुई, झेंडू, झीनिया, आंबा, चिंच, नारळ, लिंबू, केळ, साग, निंब, बाभूळ, थोर, शीसम वगैरे वृक्षांची सामान्य माहिती व ओळख. **चतुष्पाद प्राणी :** (१) गाय (२) घोडा (३) हरण (४) उंट (५) हत्ती. यांचा विशेष अभ्यास. वाघ, बकरी, मेंढी, ससा, सिंह, कोल्हा, लांडगा, जिराफ, गाढव, बैल, मांजर, कुत्रा, अस्वल, यांची सामान्य माहिती व ओळख. **कीटक :** (१) माशी (२) फुलपाखरूं (३) डास (४) झुरळ (५) कोळी यांचा विशेष अभ्यास व मुंगी, मुंगळा, उधई, पतंग, ढेकूण, ऊ, पिसवा, भुंगा, गांधील माशी, मधमाशी यांची सामान्य माहिती व ओळख. **शास्त्रीय खेळणीं :** (१) कॅलिडोस्कोप (२) लेन्स (३) वासुदेव पेला (४) बकनळी (५) लोहचुंबक (६) लोलक (७) पटकोडके (८) ड्रॉपर (९) पिचकारी (१०) नट बोल्ट.

या विषयासंबंधीं अभ्यासक्रमांत Developments in plants, birds, insects and animals of the neighbourhood with use of simple scientific instruments' हा जो भाग आहे त्यांतील (१) neighbourhood या शब्दानंतर पूर्ण विराम घालावा. (२) with शब्द वगळावा (३) use मधील w कॅपिटल करावा व (४) 'instruments' च्या ऐवजी 'toys' शब्द घालावा, असें या सभेचें मत आहे तें शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांना कळवावें असें ठरलें.

७ कला, हस्तव्यवसाय आणि प्रयोजन व्यवसाय Art, hand work and project activities.

(१) यांतील अभ्यासक्रम नवीन अभ्यासक्रमाच्या मर्यादा लक्षांत घेऊन सध्या चालू आहे त्याप्रमाणें चालवावा. या अभ्यासक्रमाचा हेतु केवळ मुलांच्या शिक्षणाच्या मर्यादा लक्षांत घेऊन शिकवूं नये, त्यांत शिक्षकाला कांहीं जास्त यावें या दृष्टीनें अध्यापन व्हावें.

प्रयोजन प्रवृत्तींत पुढील प्रयोजनें पूर्वप्राथमिक शाळेंत घेतां येण्यासारखीं आहेत, म्हणून सुचविण्यांत आलें. (१) शेत (२) घबघबा–घरण (३) खेडेगांव (४) मळा (५) शाळा (६) दिवाळीचा किल्ला (७) प्राणीबाग (८) फळा-फुलांचे प्रदर्शन (९) स्टेशन (१०) शहराचा चौक.

८ शारीरिक शिक्षण Physical Education श्री. स. आ. केळकर यांच्या 'बालक्रीडांगण' या पुस्तकांतील क्रीडांगणाचीं साधनें या प्रकरणाच्या आधारें (१) झोपाळे (२) घसरगुंड्या (३) जिने (४) सीसॉ (५) चक्रया (६) सिंगल-बार (७) रोमन रिंग्ज (८) ढकल गाड्या हे विषय घ्यावे व नर्सरी गेम्सचीं निवड त्यांच्या बालखेळ या पुस्तकांतून करावी.

९ पाठ व अवलोकनें : आणि त्याचें मूल्यांकन

(१) पाठ Lesson हा कार्य–निदर्शन Demonstration चा भाग समजावा.

(२) विद्यार्थ्यांनीं अवलोकन करावयाच्या ४० कार्य–निदर्शनांत demonstrations मधें १४ वर्गावलोकनें, १६ आदर्श पाठावलोकनें (अध्यापकांनीं द्यावयाचे) व १० व्यक्तिगत अवलोकनें मिळून ४० अवलोकनें करावीं.

(३) ३० वर्गावलोकनांत (२) मधील १४ वर्गावलोकनें आणि त्याशिवाय दोन मुलांचीं (एक मुलगा व एक मुलगी) वर्गांत करावयाचीं १६ बालावलोकनें यांचा समावेश करावा. अवलोकनांची चर्चा करण्यासाठीं आठवड्यांत एक पीरिअड असावा.

(४) विद्यार्थ्यांना जे एकूण २० पाठ द्यावयाचे आहेत त्यांत ८ सामूहिक आणि १२ व्यक्तिगत पाठ द्यावेत. सामूहिक पाठांची टाचणें आधीं लिहावीं व व्यक्तिगत पाठाच्या नोंदी पाठ दिल्यानंतर लिहाव्या.

(५) पाठ–टीका लिहिण्यासाठीं स्वतंत्र वही असावी. या विषयासंबंधींच्या चर्चेसाठीं आठवडयांतील वेळापत्रकांत एका तासाची व्यवस्था असावी.

(६) पाठ व अवलोकनाला जे कॉलेजनें गुण द्यावयाचे त्याची वाटणी पुढील प्रमाणें असावी–(१) आदर्श–पाठांचीं अवलोकनें अथवा नोंदी २० गुण (२) पाठ–टीका १० गुण (३) २० विद्यार्थी पाठ २५ गुण (४) १० दिवस वर्ग-

संचालन २५ गुण (५) कार्यालय सर्व संग्रह Office-File २० गुण.

(७) या संबंधीचे रेकॉर्ड ठेवण्यासाठीं प्रस्तुत केलेला फॉर्म मान्य करण्यांत आला.

(८) कार्यपद्धतींतील प्रयोजित (Structured) साधनांवर पाठ योजावेत. अप्रयोजित (Unstructured) साधनांवर पाठ योजूं नयेत.

साधनपोथी : दोन साधनपोथ्या कराव्या. एक प्रयोजित साधनांच्या अवलोकनासाठीं आणि दुसरी अप्रयोजित साधनांच्या उपयोगासाठीं. मुक्तव्यवसाय, हस्तव्यवसाय, क्रीडांगण – साधनें यांचा समावेश अप्रयोजित साधनपोथींत करावा. बाकीचे विषय प्रयोजित साधनपोथींत योजावे. साधनपोथीच्या पानांचा नमुना सभेंत संमत करण्यांत आला.

परिभाषा आणि संदर्भ ग्रंथ : यासाठीं 'शिक्षण-पत्रिका' मासिकाचा उपयोग करावा.

विद्यार्थ्यांच्या अडचणींचा प्रश्न : १९५८ मध्यें जे विद्यार्थी परीक्षेस बसले त्यांच्यासाठीं पुढीलप्रमाणें ठराव करण्यांत आला.

'गेल्या वर्षी आणि त्यापूर्वी पूर्वप्राथमिक शिक्षक प्रमाण परीक्षेस बसले परंतु जे यशस्वी होऊं शकले नाहींत अशा विद्यार्थ्यांची कमीत कमी एक परीक्षा जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणें घेण्यांत यावी व याचा विचार सरकारी शिक्षणखात्यानें करावा असें या परिषदेचें मत आहे.'

'त्याचप्रमाणें जे विद्यार्थी दोन वर्षांच्या शिक्षणक्रमांत पहिल्या वर्षांतून या वर्षी दुसऱ्या वर्षांत आले आहेत त्यांना या वर्षी (१) Social studies (२) GeneralScience आणि (३) हिंदी ह्या तीन विषयांच्या परीक्षेंत सूट मिळावी.'

नवीन शिक्षणक्रमाचा बोजा आणि निरनिराळ्या अध्यापन संस्थांत पहिल्या वर्षाचा निरनिराळा अभ्यास करून घेण्यांत येत असल्यानें त्यांच्यावरील अभ्यासाचा बोजा कमी करण्याच्या दृष्टीनें या वर्षापुरती ही सवलत शिक्षण खात्यानें ठेवणें अनिवार्य आहे असें या सभेचें मत आहे.

अभ्यासक्रमासंबंधी : समग्र दृष्टीनें विचार केल्यास अभ्यासक्रम प्रगतिशील वाटतो, परंतु तो अमलांत आणण्याच्या दृष्टीनें एक वर्षाचा वेळ अपुरा होणार आहे असें सभेला वाटतें.

पूर्वप्राथमिक शिक्षणविषयक ग्रंथ-सूचि

1. Gardener, D. E. M.: The Education of Young Children, प्रकाशक London, Methuen 1956

आधुनिक मानसशास्त्राच्या प्रकाशांत शिक्षणविषयक सिद्धांत आणि पद्धतींची चर्चा या ग्रंथांत केली आहे

2. Great Britain Bord of Education; Infant and Nursery School 1933, Nursery Schools and Nursery classes 1936.

इंग्लंडच्या नर्सरी शाळांच्या कार्याची माहिती या पुस्तकांत आली आहे.

3. Holmes, B. M. and Davies. M. G.: Organised play in the infant and Nursery School. University of London Press 1943 यांत शारीरिक व्यायाम, खेळ, खेळगीतें व नृत्य विषयाचे पूर्वप्राथमिक स्वरूपाची कल्पना देण्यांत आली आहे.

4. Mc Crea: Lilian : Stories to tell in Nursery School London Oxford press 1950

5. Mellor Edna : Education through experience in the infant school years, Oxforde Black well 1955.

6. Read, K. H. : The Nursery School; human relationship laboratory. Philadelphia, Saunders 1950.

7. Rudolph Marguerita : Living and learning in Nursery School. New York Harper 1954.

8. Unesco : Mental Hygiene in the Nursery School Paris 1951.

9. Tudar-Hart Beatrix : Toys, Play and Discipline in Childhood 1950

10. serjeant F. I. : From day to day in the Nursery school London Blackie 1952.

11 Wolthein, Nelly : Psychology in the Nursery school. London. Duck worth 1953.

12 Yeaxlee, B. A. : Infant Teachers Hand book 1953

ही सर्व यादी भारत सरकारच्या केंद्रीय शैक्षणिक वाचनालयातर्फे प्रकाशित झालेल्या Gel Literature Notes वरून तयार केली आहे. या प्रकारें आपल्या माहितीच्या पुस्तकांचीं नांवें कोणीही पाठविल्यास या माहितीचा लाभ बाल शिक्षण-रसिकांस मिळावा या उद्देशानें येथें प्रकाशित करण्यांत येईल.

—संपादक

विकासवाडी वृत्त

[जुलै १९५८]

पाऊस-पाणी : जूनच्या २० ता. पर्यंत पावसानें आपला मागमूस लागूं दिला नव्हता. पण नंतर जो आला तो हत्तीच्या पावलानेंच. सारखा मुसळधार कोसळतोय.

शेतीवाडी—विकासवाडीच्या बागेमध्यें कलमी आंब्यांचीं ८० कलमें लावलीं, ७८ चिंकूचीं कलमें लावलीं, ५ एकर जमीन भातासाठीं नांगरून तयार झाली. आवणीचें काम चालूं आहे.

अभ्यासक्रम—प्राथमिक शाळा-आवणीची सुट्टी आहे.

रात्रीची शाळा—मुलें दिवसा शेतावर जातात. तरी रात्रीं शिकायला हौसेनें येतात. २० पर्यंत हजेरी असते.

बालवाडी
पाळणाघर } चालू आहे. पावसामुळें

उपस्थिति कमी आहे. पण पाळणाघराचा फायदा कांहीं कांहीं माता आपण होऊन घेऊं लागल्या आहेत.

ट्रेनिंग कालज—बेसिक ट्रेनिंग कॉलेज व प्री प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज अशीं दोन्ही कॉलेजें ९ जूनपासून सुरूं झालीं.

विशेष भेटी—श्री. चिंतामणराव देशमुख व श्रीमती दुर्गाबाई देशमुख. यांनीं संस्थेस भेट दिली. विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या वसतिगृह इमारतींचें दोघांच्या हस्तें उद्घाटन झालें—

अभयाश्रम — विद्यार्थी वसतिगृह
विनयाश्रम — विद्यार्थिनी वसतिगृह
} अशीं नांवें इमारतींस दिलीं.

अंबर चरखा वर्ग

प्रौढांसाठीं उद्योगवर्ग म्हणून १३ एप्रिल १९५८ पासून हा वर्ग सुरूं करण्यांत आला होता. १७ आदिवासी बंधु-भगिनींनी त्याचा फायदा घेतला. त्यांत ५ भगिनी होत्या. सुमारे १६०० गुंड्या सूत निघालें-पण प्रत्येक दिवसाची सरासरी काढतांना माणशीं दर दिवसाला २ च गुंड्या पडल्या आहेत. जास्तींत जास्त एका माणसानें ८ तासांत ४ गुंड्या काढल्या, त्यापलिकडे गति गेली नाहीं. सध्यां पावसाळी कामामळें हा वर्ग बंद केला आहे.

वैद्यकीय मदत औषधांची चांगली माहिती असणाऱ्या श्रीमती रमाबाई पंडित या सेविका अगदीं मनापासून आदिवासी जनतेला घरगुती औषधें देण्याचें काम करतात. मे ५८ पासून आतांपर्यंत खालीलप्रमाणें आदिवासी मंडळीनीं या विभागाचा फायदा घेतला आहे.

रोगाचें नांव	पुरुष		बायका		मुलं	
	आले	बरे झाले,	आल्या	बऱ्या झाल्या,	आलीं	बरीं झालीं
जंत	—	—	—	—	१५०	५०
ताप खोकला	२८	१७	२२	१२	४५	२३
आंव	१०	१०	१९	१५	४०	३५
डोळे येणें	२७	२७	४०	४०	६५	६५
कान दुखणें	१०	४	३	३	१९	९
	७५	५८	८४	७०	३१९	१८२

—अनुताई

नूतन बालशिक्षण आणि संघ समाचार

कोसबाड टेकडी घोलवड : सेंट्रल सोशियल वेलफेअर बोर्डानें पाठविलेल्या ग्रामसेविकांचा शिक्षणक्रम दिनांक १८ जुलै रोजीं सुरू करण्यांत आला आहे. लवकरच ग्रामबाल शिक्षा केन्द्राला ठाणें जिल्ह्यांतील समाज कल्याण कार्याचा एक प्रोजेक्ट देणार असल्याचें कळतें.


शिशुविहार मुंबई : दिनांक ४,५, व ६ जुलै रात्रीं मुंबई राज्यांतील पूर्वप्राथमिक संस्थांच्या अध्यापक आणि प्राध्यापक मंडळींची एक चर्चा परिषद योजण्यांत आली व तींत पाणंदीकर समितीनें योजलेल्या बालअध्यापन मंदिरांच्या नवीन अभ्यासक्रमाचा अध्यापन कार्याच्या दृष्टीनें विचार झाला. परिषदेंत ११ अध्यापन मंदिरांचे ३० अध्यापक-प्राध्यापक उपस्थित होते.

दिनांक ६ रोजीं दुपारीं मुंबई राज्यानें योजलेल्या प्राथमिक शिक्षण संकलन समितीनें योजलेल्या प्रश्नावलीचा विचार करण्याकरतां नूतन बालशिक्षण संघाच्या विद्यमानें राज्यांतील अध्यापक-प्राध्यापक आणि संघाच्या कार्यकारी मंडळाची एक सभा भरण्यांत आली. तींत पूर्व प्राथमिक शिक्षणाचा शहरी विभागांत ५० टक्के आणि ग्रामीण विभागांत ७५ टक्के भार उचलला, तरच पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणाचे प्रश्न कांहीं अंशीं सुटूं शकतील असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला.



लेखनांतील आनंद
जेंव्हा पेनचें द्विगुणित होतो

लाखों लोकांनीं तें वापरून पसंत केलें
आहे. घडण आणि उपयुक्तता या बाबतींत तें
परदेशांत तयार होणाऱ्या
उत्तम पेन्सच्या तोडीचें आहे.



खालील वैशिष्ट्यांतून आपली
निवड करा.

- तऱ्हेतऱ्हेचे आकर्षक रंग
- शाई भरण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा
- गोल्डप्लेटेड १४ कॅरट निब
- ४ रुपयांपासून १८ रुपयांपर्यंत
  निरनिराळ्या किमती

PLATO
REGD.

प्लाटो प्रॉडक्ट्स

व्यापारविषयक सर्व चौकशीसाठी :
तोल डिस्ट्रिब्यूटर्स
वेस्ट फाउंटन पेन डेपो,
७९, वेबकरण मॅन्शन, प्रिसेन्स स्ट्रीट, मुंबई.

Skilpi-11, P. 938 MAS

मुद्रक व प्रकाशक:—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर—मुंबई १४.
मुद्रणस्थान:—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

'बर्फासारखें थंड

वनस्पतियुक्त

उमा

पांढरे केंस नुकसान न करतां काळे करणें, लांब व चमकदार बनवणें, उवा आणि लिखा काढून मेंदूला थंड ठेवण्यासाठीं

उमा वापरा

सर्वत्र विकत मिळतें—

बनविणार—



उमा प्रॉडक्टस् बोरीस चाळ, नॉवेल्टी सिनेमाजिक, मांट रोड, मुं. ७

स्टॉकिस्टः—केशवजी वी. ठक्कर, दवा बाजार प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २





मॅप्रोसोन

बी झोन केमिकल कं. मुंबई, ७



युनिकेम

दवाई डिमांयेा

व्यवसायांत सौं

एकमेव विश्वसनीय

नांव

UNICHEM LABORATORIES QUALITY CONFIDENCE

युनिकेम लेबोरेटरीज, बम्बई, २६.




स्वातंत्र्य-दिन महोत्सवी अंक



सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी



— सोल डिस्ट्रीब्युटर्स —
ए. व्ही. आर. ए. अॅन्ड कं, मुंबई २



सर्व जगभर तें विकलें जातें !

आफ्रिका, इन्डोनेशिया, इराण, इजिप्त,
इंग्लंड आणि अमेरिका येथें सुद्धां.

दोन्ही गोलार्धांतील बहुतेक सर्व राष्ट्रांत लोगा विकलें जातें
आणि दिवसेंदिवस मागणी वाढतच आहे.

केसांना नैसर्गिकरीत्या
काळेभोर करण्यांसाठीं जगभर
मान्यता पावलेले.

MPS-MAR.

सोल एजटस् : एम्. एम्. खंभातवाला, अहमदाबाद १.
एजंटस् : सी. नरोतम अॅण्ड कं., मुंबई-२. फो. ३०५७६




संतोष कारक
कामासाठीं

सोल डिस्ट्रीब्युटर्स :—
पेनमेन्स इंडस्ट्रीयल सर्व्हिसीझ
कांदीवली (मुंबई ३६ स डी.)
लोकल सेल १०, शामसेट स्ट्रीट, मुंबई २.

स्टँडर्ड व्हॅक्यूम--

आपण कशाही तऱ्हेनें
मोटर हांका—
तरीपण जर आपण
स्टॅनव्हॅक प्रॉडक्ट्स्

मोबिल गॅस * मोबिल ऑईल-स्पेशल *
मोबिल ऑईल वापरत असाल तर
अति तीव्र वेगानें हाकूं शकाल.



स्टँडर्ड व्हॅक्यूम ऑईल कंपनी,
(मर्यादित जबाबदारीसहित
यु. एस्. ए. मध्यें स्थापित)

For Greatness & Grandeur

U. C. C.

ASHOK

UNIQUE RAYON FABRICS



Velvet

Silk Mills

SELLING AGENT

V. CHATRABHUJ & CO. PRIVATE LTD.

फाउन्टन पेन के लीये
परफेक्ट
इन्क
उत्तम है



चेम्पीयन इन्डस्ट्रीयल वर्क्स
चीसनगर ० बम्बई २

पो. बा. नं. २०९३.
बंबई २.

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई — उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक

कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी — कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे

चिटणीस : श्री. शेष नामले — उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण संस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपांत पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गांतून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठीं संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, **नूतन बाल-शिक्षण संघ,**
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे — श्री. अनुताई वाघ

सौ. सरलाताई देवधर — श्री. भा. धों. कर्वे

सौ. मालिनीबाई परांजपे

अनुक्रमणिका

प्रौढ विभाग

संपादकीय— शेष नामले

बाल शिक्षणाच्या प्रणेत्यास अभिवादन— शेष नामले

बेबीची झोंप— स. आ. केळकर

गृहजीवनाचे पडसाद— अनुताई वाघ

विठूकाकांची शैक्षणिक दृष्टि— शकुंतला गुप्ते

पूर्व प्राथमिक भाषा-शिक्षण— शेष नामले

शिक्षकाच्या रोजनिशींतून — अनुताई वाघ

पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या आर्थिक जबाबदारीचा प्रश्न — शेष नामले

बाल शिक्षणाचा विचका— पालक-माता

शिवाय-विकासवाडी वृत्त, बाल शिक्षण आणि संघ समाचार इ.

बाल विभाग

प्रतिज्ञा— दत्ताराम आ. बारस्कर

अंगणांत खेळूं माझ्या— ता. परांजपे

नागोबाची पूजा— शकुंतला गुप्ते

भिजली मुंबापुरी— बा. मा. हराळे

रामाचा हट्ट— सरलाताई देवधर

भारताचा मान— बा. मा. हराळे

सोनाईची कहाणी— अनुताई वाघ

महत्वाच्या सूचना :

ग्राहकांस—

१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.

'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन-विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल-शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नांवावर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारां-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नांवाचें एक सदर चाल-विण्यांत येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्यांना स्थान देण्यांत येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यांनीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे-पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

लेखकांस—

१) 'शिक्षण-पत्रिकें'त लेख लिहूं इच्छिणारांनीं आपलें लेखन कागदाच्या एकाच बाजूवर करावें. तें दर महिन्याच्या ता. १ च्या आंत संपादन कार्यालयाकडे पाठवावें. पसत नसलेल्या लेखांबरोबर पुरेसें पोस्टेज असल्यास लेख परत करण्यांत येतील.

२) 'शिक्षण-पत्रिका' कोणत्याहि महिन्यापासून सुरू करतां येते.

३) 'शिक्षण-पत्रिका' प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस पोस्टांत पडते. सामान्यतः ता. २५ पर्यंत ती सर्वांना मिळते. तशी न मिळाल्यास ग्राहकांनीं ता. ३० च्या आंत खाली दिलेल्या पत्त्यावर कळवावें.

४) 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रत्येक ग्राहकाचा नंबर पत्रिकेच्या वेष्टनावर लिहिलेला असतो. व्यवस्थापक-कार्यालयाशी पत्रव्यवहार करतांना हा नंबर ग्राहकानें अवश्य कळवावा.

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका'
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ५] मुंबई [ऑगस्ट १९५८

संपादकीय—

अकराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने—

ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्याच्या उत्सवांचा महिना. या महिन्याच्या पहिल्याच तारखेला भारतीय स्वातंत्र्यांचे उद्‌गाते स्व. लोकमान्य टिळकांचीच पुण्यतिथी येते. नंतर १५ तारखेला आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा वाढदिवस आणि शेवटी महिन्याच्या अखेर तारखेला बाल-स्वातंत्र्याच्या प्रणेत्या जगद्विख्यात् मॉंटेसरींची जन्मतिथी येते. एकाच महिन्यांतील स्वातंत्र्याच्या उत्सवांचा हा योगायोग ही आपल्या देशांतील सर्वांसाठी अत्यंत स्फूर्तिप्रद घटना आहे.

स्वराज्य म्हणजेच स्वातंत्र्य. प्रत्येक व्यक्ति, मग तें मूल असो कीं प्रौढ असो, आपल्या स्वातंत्र्याविषयीं आतुर असतें. प्रत्येक समाजदेखील आपल्या विकासाचें तंत्र आपल्या हातीं रहावें अशी इच्छा करतो. प्रौढांच्या या स्वातंत्र्याच्या जीवनहक्काची जी गोष्ट टिळकांनीं आपल्यापुढें स्पष्ट केली, तीच गोष्ट मादाम मॉंटेसरींनीं बालकांच्या बाबतींत सांगितली. या दोन्ही स्वातंत्र्याच्या नेत्यांनीं स्वातंत्र्याच्या प्रश्नासाठीं आपापल्या जीवनाचें समर्पण केलें. त्यांच्या या महान् समर्पणामुळेंच त्यांच्या जन्ममृत्यूचे दिनांक मानवी स्वातंत्र्याच्या उत्सवाचे दिवस बनले आहेत.

ऑगस्ट महिन्याच्या या स्वातंत्र्य दिनांच्या उत्सवांत मानवीजीवन-विकासाच्या निरनिराळ्या अंगांचा आपण विचार केला पाहिजे. लोकमान्य टिळकांनीं ज्या स्वातंत्र्याचा राष्ट्रीय झेंडा फडकवला-त्याचें फळ भारताला मिळून आपण भाग्यवान बनलों आहोंत. परंतु मादाम मॉंटेसरींनीं ज्या बाल-दुनियेच्या स्वातंत्र्यासाठीं समर्पण केलें तें स्वातंत्र्य अजून कितीतरी दूरदूर राहिलें आहे, असेंच आपल्या देशांतील कोट्यवधि बालकांचा विचार करतांना वाटतें. शिक्षणांतील स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विकासार्थ पाहिजे त्या साधनांची अनुकूलता. आपल्या देशांत लक्षावधि मुलें कशा परिस्थितींत जन्म घेतात, कशा परिस्थितींत त्यांचें संगोपन होतें, कोणत्या प्रकारचें पोषण व शिक्षण त्यांना मिळतें, कोणत्या परिस्थितींत तीं समाजाचें नागरिकत्व प्राप्त करून घेतात, हा विचार जेव्हां आपल्या देशांतील मागासलेले ग्रामीण आणि नागरिक विभाग यांच्या अनुसंधानांत करतों, तेव्हां मादाम मॉंटेसरींनीं ज्या बाल-स्वातंत्र्याची कल्पना आपल्यापुढें ठेवली तें खरोखरच फार दूर आहे, असें वाटायला लागतें. बाल-स्वातंत्र्याचा प्रश्न फार व्यापक आणि विशाल आहे. त्यासाठीं आपल्या आचार-विचारांत फार सूक्ष्मता यायला पाहिजे. बालकांच्या या स्वातंत्र्याखेरीज आपण मोठी मंडळीदेखील खऱ्या अर्थानें स्वतंत्र होऊं शकणार नाहीं. हा प्रश्न आपल्या समाजांतील आपणा सर्वांच्या मानसिक स्वास्थ्याशीं संबंधित झालेला आहे. आपले आजचे तुरुंग, दवाखान्यांच्या संस्था, लहानमोठीं न्यायालयें या सर्वांची संख्या वाढवण्यानें समाजाला जीवनस्वास्थ्य आणि आनंद प्राप्त होणार नाहीं. तुरुंग, पोलीस, न्यायालयें आणि दवाखान्यांच्या विस्तीर्णाचे ठिकाणीं आपल्या राष्ट्रानें बालसेवेच्या कार्यावर पुरता भर दिला पाहिजे.

स्वातंत्र्य-दिनाच्या उत्सवांच्या या महिन्यांत आपण मानवी सुखशांतीच्या प्रश्नाच्या मुळाशीं जाऊन चिंतन करूंया. आणि या महिन्यांतील प्रेरणा घेऊन आपलें जीवन अधिक समृद्ध बनविण्याच्या मार्गाला लागूं या.

—शेष नामले

बाल-शिक्षणाच्या प्रणेत्यास अभिवादन

मादाम मॉंटेसरींचें जीवन म्हणजे बालसेवेच्या क्षेत्रांतील एक महान् समर्पण. जगांतील बालप्रेमी जनतेला तें एखाद्या मंदिरांतील नंदादीपासारखें नेहमीं प्रकाश आणि प्रेरणा देणारें राहिलें आहे, यांत शंका नाहीं.

६ जानेवारी १९०७ मध्यें मादाम मॉंटेसरींनीं आपल्या शिक्षणाच्या कल्पनेचें पहिलें बालघर रोम शहराच्या एका कोपऱ्यांत सुरू केलें. या बालघरांतील शिक्षणाचें स्वरूप इतकें आकर्षक होतें कीं त्यामुळें शिक्षणाच्या इतिहासांत एका नव्या युगाला प्रारंभ झालेला दिसला. दारिद्र्यानें बरबटलेल्या ३ ते ६ वयाच्या ४०ते५० मुलांचें हें बालमंदिर होतें. तरीदेखील युरोप आणि अमेरिकेच्या कोपऱ्या कोपऱ्यांत या संस्थेची कीर्ति पोहोंचली. आणि मादाम मॉंटेसरी ज्या सुरुवातीला एक वैद्यकीय डॉक्टर म्हणून ज्ञात होत्या त्या नूतन बालशिक्षणाच्या प्रणेत्या म्हणून स्वीकारल्या गेल्या.

हा चमत्कार कसा झाला ?

इ. स. १८९६ मध्यें मादाम मॉंटेसरी रोम विद्यापीठाच्या डॉक्टर ऑफ मेडिसिन (एम्. डी.) झाल्या. ही पदवी मिळवणाऱ्या त्या स्त्रियांमध्यें पहिल्याच होत्या. त्यावेळीं त्यांचें वय २६ वर्षांचें होतें. नंतरच्या दोनच वर्षांत त्यांनीं 'असमधारण मुलांना सुधारण्यासाठीं औषध नव्हे, पण शिक्षणाची जरूरी आहे' हा विषय व्हिएन्ना येथें भरलेल्या परिषदेपुढें प्रस्तुत केला. तेव्हांपासून मंद मुलांच्या शिक्षणाचें स्वरूप कसें असलें पाहिजे यावर त्यांचें अधिकाधिक चिंतन सुरू झालें. सेग्युइन आणि इटार्ड नामक इटालीच्या प्रख्यात शिक्षणकारांच्या साहित्याची प्रेरणा घेऊन त्यांनीं मंद मुलांच्या शिक्षणासाठीं एक योजना तयार केली, व त्या योजनेप्रमाणें मुलांना शिक्षण देऊन सामान्य मुलांच्या परीक्षेला या मंद मुलांना बसवलें. या परीक्षेंतील अपेक्षित यशामुळें मॉंटेसोरींचा आत्मविश्वास बराच वाढला व प्रायोगिक मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांचा अभ्यास सुरू केला. हें करीत असतां आपल्या पद्धतीचा उपयोग समधारण मुलांसाठीं कसा होऊं शकेल यांचेंहि चिंतन चालू होतें. नेमकें याचवेळीं एका हाउसिंग सोसायटीनें ६ वर्षांखालील मुलांसाठीं चालू करावयाच्या क्रीडाघराबाबत मॉंटेसरींचा सल्ला विचारला. मॉंटेसरींना हवें होतें तेंच काम आपोआप पुढें आलें. नूतन बाल शिक्षणाच्या त्याच्या समधारण मुलांच्या योजनेला या हाउसिंग सोसायटीच्या क्रीडाघरांत परिणत स्वरूप प्राप्त झालें, व वर लिहिल्याप्रमाणें १९०७ मध्यें त्यांनीं पहिल्या बालघराची स्थापना केली. वैद्यकीय क्षेत्र सोडून त्या शिक्षणकार बनल्या. व त्यानंतरचीं जीवनांतील ४५ वर्षें त्यांनीं बालशिक्षणाच्या क्षेत्राला स्वतःला समग्रपणें वाहून घेतलें. यामुळें बालशिक्षणांत नवीन युगाला सुरुवात झाली. त्यांच्या शिक्षणकाराच्या भूमिकेला अंजलि वाहतांना एडिनबरोच्या शिक्षण-संस्थेच्या एका प्रमुखानें म्हटलें आहे, 'Teaching is a conservative profession, but once in a generation there arises an outstanding figure which comes with a breathe of new life inspiring people to new activities' शिक्षणाचा व्यवसाय रूढीचुस्त असतो, तथापि एकाद्या युगात अशा असामान्य व्यक्तित्वाचा उदय होतो, कीं त्यामुळें जीवनांत नवा प्राण येऊन लोकांचे प्रयत्न आणि उपक्रमांत प्रोत्साहन देऊन जातो.

शिक्षणाच्या क्षेत्रांतील जागतिक प्रभाव

सामान्यतः विभूतींचें जीवन सरळ आणि बिनसंकटांचें असत नाहीं, त्याचप्रमाणें मादाम मॉंटेसरींचें जीवन अनेक प्रकारच्या राजकीय आणि सामाजिक विरोधांनीं ग्रासलेलें होतें. परंतु त्यांतहि त्यांची कसोटी होऊन त्या अधिक तेजस्वी ठरल्या. स्थानांतरें, देशांतरें, स्थानबंदी आणि हद्दपारींतून पसार होऊन दुसरें युद्ध संपल्यानंतर ८० व्या वर्षीं त्या जेव्हां आपला मायदेश इटालींत पोहोंचल्या, तेव्हां तेथें त्यांचें भव्य राष्ट्रीय स्वागत करण्यांत आलें. शेवटीं सत्याचाच जय होतो, या तत्त्वाला अनुसरून त्यांच्या शिक्षणविषयक जीवनाचा जयजयकार युरोपांतील बहुतेक देशांत ऐकायला मिळाला.

युनेस्कोच्या प्रतिनिधींना दिलेलें उत्तर

सन १९४९ त इटालींतील सानरेमो येथें भरलेल्या परिषदेनंतर मादाम मॉंटेसरींना नोबेल प्राईझ देण्यांत यावें, अशा अनेक सूचना निरनिराळ्या देशांकडून गेल्या होत्या. युनेस्कोच्या शिक्षण विभागानें मादाम मॉंटेसरीकडे आपले प्रतिनिधी पाठवून त्यांची एक खास भेट योजिली होती.

जगाच्या निरनिराळ्या देशांत मित्रभावना कशी निर्माण होऊं शकेल, असा एक महत्त्वपूर्ण प्रश्न या भेटींत त्यांना विचारण्यांत आला होता. त्याचें उत्तर देतांना मा. मॉंटेसरी म्हणाल्या, "हा प्रश्न मानवी मनोरचनेवर अवलंबून आहे. मनुष्यांत मानवता आनुवंशिक नाहीं. मुलांचा ज्या समाजांत जन्म होतो, त्या समाजांतील रीतिरिवाज, भाषा, आचारविचार मूल आत्मसात करीत असतें. त्याच्याबरोबरच तें मानवताहि प्राप्त करीत

[पान १३ वर पहा]

पालकांचा विशेष विभाग

[या विभागांत बालशिक्षण, बालमानसशास्त्र, आरोग्य आणि संगोपन या विषयांवरील प्रयोग, उपक्रम, अनुभव, आणि माहितीपूर्ण लेख सुबोध भाषेंत योजण्यांत येतील. हा विभाग यशस्वी करण्याच्या दृष्टीनें पालकांनीं या विभागांत आपल्या अडचणी, प्रश्न, आणि अनुभव लेखी पाठवून आमच्या योजनेला प्रोत्साहन द्यावें अशी विनंती आहे. —संपादक]

बेबीची झोंप

'खरंच बाई, ज्यांचीं मुलें आपोआप आणि लौकर निजतात ते आईबाप किती तरी सुखी असतील ! आमच्या नशिबीं कुठलं आलं तें सुख !!' सरोजबाईनी बोलतां बोलतां सहज म्हणून उद्गार काढले.

आमच्या शेजारच्या दामल्यांच्या बाळावरून गोष्ट निघाली होती. तो आपला नेहमीं चटकन् झोपीं जातो व त्याच्या आईला त्याचा कसलाही त्रास नाहीं, हें मी सहजगत्या सरोजबाईना सांगितलें. पण त्याचा त्यांच्यावर केवढा परिणाम झाला ! दोन लहानशींच वाक्यें त्यांच्या तोंडून निघालीं. पण त्यांत त्यांची व्यथा पूर्णपणें प्रगट होईल, इतका त्यांचा आवाज बदलला होता. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव त्याची पुष्टि देत होते. त्यांचा हंसरा चेहरा पार बदलला व कांहींसा काळवंडला. जणुं चांगला सूर्यप्रकाश चमकत असतां एकाएकीं ढग यावेत व त्यानें सर्व वातावरण बदलून जावें; तसें आतां झालें. वास्तविक सरोजबाई म्हणजे एक आनंदी बाई. त्यांचा स्वभाव तर मनमिळाऊ व हौशी होताच; व त्यांचे यजमान वसंतरावही स्वभावानें दिलदार होते. त्यामुळें दोघांचा संसार नेहमीं खेळीमेळीनें चालायचा. या आनंदांत भर घालायला त्यांना एक चार वर्षांची बेबी पण होती. तिचें हे दोघेजण किती कौतुक करायचे ! आणि बेबीही तशीच हंसरी,



कामिनिया हेअर ऑईल
कामिनिया स्नो
कामिनिया टॉयलेट सोप
ऑटो दिलबहार

कामिनिया शृंगार

प्रसाधनांमुळें

चमकणारा केशकलाप, अनुपम लावण्य आणि रेशमाप्रमाणें मुलायम त्वचा प्राप्त करून घ्या.

कामिनिया प्रसाधनेंच उत्तम असतात हें मला माहीत आहे. माझ्या निवडीबद्दल मला अभिमान वाटतो आणि तो योग्यच आहे.

☆

वैजयंतिमाला—

भारत नाट्यमची ही प्रतिमा असें म्हणते पहा.

अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कंपनी,
२६५ जुम्मा मशीद, पोस्ट बॉक्स नं. २०८२ मुंबई २.

खेळकर व विनोदी होती. तेव्हां बेबीबाबत सरोजबाईंना कांहीं प्रश्न उत्पन्न झाला असेल किंवा त्रास होत असेल अशी माझी कल्पनाच नव्हती. पण आतां सरोजबाईंच्या वरील उद्गारानें माझा ग्रह बदलला.

'कांहो, तुमची बेबी लौकर झोपत नाहीं का? तिचा तुम्हांला त्रास होतो काय?' मी सहानुभूतीच्या स्वरानें विचारलें.

'नाहींतर काय मेला; हा रोजचाच त्रास! तशी बेबी फार चांगली आहे. इतर कोणत्याही बाबतींत तिचा मला त्रास नाहीं. तशी फार समजूतदार आहे. पण कोंबडी रोज दहा-अकरा वाजेपर्यंत रात्रीं जागी असते. तिला झोंपवणें हाच मला एक रोजचा उद्योग होऊन बसला आहे, आणि आमच्या 'ह्यांना' तर त्याची फार चीड येते. म्हणतात मीच तिला लौकर झोंपवत नाहीं. पण ती झोंपतच नाहीं, त्याला मी तरी काय करूं?'

'अस्सं आहे तर! मिया-बिबींच्या स्वातंत्र्यावर गदा येते म्हणून का हें दुःख!!' मी हंसत हंसत म्हटलें. 'अहो या वयांत थोडा फार संयम शिकायला हवा. नाहींतर म्हातारपणीं का तो शिकायचा?'

मी सरोजबाईंकडे पाहिलें. त्या थोड्या खजिल झाल्या व लाजल्या; पण लगेच सावरून म्हणाल्या,

'अहो, पण आमच्या दुःखाला इलाज काय, तो तरी सांगा. मुलीला झोंपविण्या-झोंपविण्यांत माझा जीव मेटाकुटीला येतो, त्यापेक्षां 'ह्यांना' जी त्याची चीड येते, ती मला सहन होत नाहीं. त्यानेच माझा पारा चढतो. आणि त्यांच्याकडे तरी नको का बघायला? काम करून-करून दमून भागून आलेला माणूस रोजचाच मुलीचा त्रास कसा सहन करणार?'

'म्हणूनच घरांत कोणी म्हातारं माणूस असावं लागतं बरं! पण आतांची तुम्ही मंडळी पहावी, तर त्यांना दोघांशिवाय तिसरं कोणी घरीं नको असतं.'

'तें जाऊं द्या हो. आमचं कांहीं तसं नाहीं. नाहीं आम्हाला कोणी त्याला काय करायचं? असलेल्या म्हाताऱ्या माणसांना आम्ही घरून घालवून तर दिलं नाहीं ना? आतां इलाज काय करायचा तो सांगा.'

'इलाज सांगतों मी; पण मला आधी तुमची पूर्ण माहिती हवी.'

'म्हणजे काय?'

'म्हणजे बेबीला तुम्ही कसें झोंपवतां तें मला सांगा.'

'तिनें लौकर झोपावं म्हणून तिला जोरजोरानें थोपटत असाल. 'नीज नीज' म्हणून म्हणत असाल. कांहीं गाणीं गात असाल रागवत असाल. मोठ्या आवाजानें दरडावून सांगत असाल. कांहीं भीति दाखवीत असाल.' 'कोंबडी कांहीं निजत नाहीं.' म्हणून अपशब्द बोलत असाल. काय काय करतां तें तरी कळूं द्या.'

'हें सर्व कांहीं करतें. मग आणखी काय करणार? जीव मेटाकुटीला आला म्हणजे राग येतोच. दोन धपाटेही देतें अशा वेळीं.'

'जें करूं नये तेंच तुम्ही करतां.'

'म्हणजे?' सरोजबाईंच्या चेहऱ्यावर एकदम आश्चर्य प्रगट झालें. आपलें करणें आपण जें योग्य समजत होतो तेंच चूक आहे कीं काय हा भाव त्यांच्या उद्गारांत प्रगट झाला. जणुं सरळ रस्ता समजून आपण चालत असावें आणि पाय नेमका लहानशा खड्ड्यात जावा म्हणजे माणूस जसा थोडा दचकतो, तसाही भाव त्यांचे चेहऱ्यावर स्पष्ट होता.

'हो तर. मी काय म्हणतें याचा तुम्हीं थोडा विचार करा, म्हणजे माझें म्हणणें तुम्हांला पटेल. अहो, लहान मुलांच्या कोणत्याही कामाबाबत आईबापांना विशेष चिंता वाटली किंवा त्रास वाटला व मुलाने अमुक प्रकारें वागावें म्हणून त्यांचा विशेष प्रयत्न सुरू झाला, की परिणाम नेमका उलट होतो. मग ती गोष्ट मुलानें रोज सकाळीं शौच्याला जाण्याची असो, कीं जेवण्या-खाण्याची असो, कीं झोंपण्याची असो. आईबापांच्या भावनांचा जो क्षोभ होतो त्याचा परिणाम मुलावर हा असा होतो. तेव्हां मुख्य म्हणजे आईबापांनीं आपल्या भावनांचा क्षोभ करून घेऊन त्याचें प्रदर्शन मुलांसमोर करतां कामा नये.'

'वा! खूप च सांगतां की तुम्ही! अहो, राग येणं साहाजिक नाहीं का? तुम्हांला असा मुलाला निजवण्याचा त्रास भोगावा लागला असता म्हणजे समजलं असतं. दुसऱ्याला उपदेश करणं फार सोपं असतं. बरं पण आम्ही काय करूं नये तें सांगण्यापेक्षां काय करावं तें तरी सांगा.'

'तें तर मला पुढें सांगायचंच आहे. पण विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणून आधीं काय करूं नये तें सांगितलं. अहो, मोठ्या माणसांपेक्षां मुलांना झोंप पुष्कळच जास्त असते. तेव्हां मुलांना झोंपविण्याचा त्रास आईबापांना पडूंच नये मुळीं. आमचा विन्याच पहा ना! आतां काय लहान आहे? चौदा वर्षांचा झाला. पण स्वारी जेऊन खाऊन आठ वाजतां जी निजते, ती दुसरे दिवशीं सकाळपर्यंत कशी ती त्याला शुद्ध नसते.'

'तें तर आमच्या बेबीचेंही आहे. एकदां निजली म्हणजे दुसरे दिवशीं आठ काय आणि नऊ काय, जेव्हां उठवावी तेव्हांच उठते. माझा आपला स्वयंपाक कसा सुरळीत पार पडतो. पण प्रश्न आहे तो तिच्या निजण्याच्या वेळेचाच. त्याला काय करावें?'

'तें मी सांगतों हो. पण मला आधी हें सांगा की बेबी रोज मुलांमध्ये चांगली खेळते का? तुमच्या जागेला तर अंगण आहे. आजूबाजूच्या बिऱ्हाडांत तिच्या वयाचीं मुलेंही आहेत. मुलांना भरपूर शारीरिक व्यवसाय हवा असतो. त्यांचा जस-जसा शरीरविकास होत जातो, तसतसा आपल्या हाता-पायांचा भरपूर उपयोग करावा अशी त्यांची इच्छाही असते. तसेंच त्यांना आपल्या वयाच्या मुलांत खेळायलाही हवें असतें. ही त्यांची सामाजिक गरज तर आहेच पण त्यांतच त्यांना भरपूर शारीरिक श्रमही करायला मिळतात. पण कित्येक पालक आपल्या मुलांना इतरांत मिसळूं देत नाहींत. कारण, मग त्यांना वाईट संवयी लागतात. वाईट सवयी लागूं नयेत म्हणून मुलांना जपायला हें हवेंच. पण त्याला उपाय म्हणजे इतर मुलांत न मिसळणें हा नव्हे. तशीच कोणी बिघडलेलें मूल शेजारी-पाजारीं असलं तर त्याची संगत आपल्या मुलाला लागूं नये म्हणून आई-बापांनीं जागरूक असावेंच, त्याच बरोबर आपल्या मुलांना त्यांच्या वयाचीं इतर मुलें खेळगडी म्हणून मिळणें आवश्यक आहे, हें पण लक्षांत घ्यायला हवें.'

'आमच्या बेबीच्या बाबतींत तो प्रश्न नाहीं. ती इतर मुलांत खूप खेळते तर काय झालं! शिवाय मी तिला बालमंदिरांत पाठवलें. आम्हांला तिच्या बालमंदिराची महिना पांच रुपये फी व इतर होणारे खर्च झेपायला जरा कठीण आहे. पण मी म्हणतें, आपण इतर ठिकाणीं काटकसर करूं. पण बालमंदिरामुळें जर तिला फायदा होतो तर तो मिळायलाच हवा. तेथें क्रीडांगणाचीं साधनें आहेत. बेबी त्यावर खूप खेळते. शिवाय मुलांचे इतरही खेळ चालूच असतात. त्यांचीच आवृत्ति बालमंदिरांतून घरीं आल्या-वर मुलें करतात. तेव्हा तो आमच्या बेबीचा प्रश्न नाहीं.'

'मग फार बरें. नाहींतर भरपूर खेळायला न मिळाल्यानें चांगली झोंप लागत नाहीं. शरीराला थकवा आला कीं विसावा हा लागतोच व शांत झोंप लागते. बरं, आतां सांगा तुम्ही बेबीला जेवायला केव्हां घालतां रात्रीच्या?' मी माझा मोर्चा बदलला.

'आम्ही तिचें एकदमच बसतों.'

'त्याला कांहीं हरकत नाहीं म्हणा. पण जर वसंतरावांना रात्रीं उशीरा जेवायची संवय असेल तर बेबीला आपलं लौकर जेवायला वाढावं. जेवल्यावर मुलें झोपीं जातात.'

'तसे कांहीं आम्ही उशीरां जेवत नाहीं रात्रीं. एखाद वेळेला उशीर झालाच तर बेबी कांहीं आधीं जेवत नाहीं. आमच्यावरोबरच बसण्याचा तिचा हट्ट असतो. त्याला काय करायचें?'

'नाहीं. म्हणजे बेबीला मुद्दाम आग्रहानें लौकर जेवायला घालायला नको. पण स्वयंपाक तयार असला व बेबीची जेवणाची इच्छा असली तर तिला जेवायला घालावें व झोपूं द्यावें. बरें तें असो. पण जेवल्यावर निजायला जाईपर्यंत तुम्ही काय करतां व बेबी काय करते?'

'आमचा तसा कांहीं विशेष कार्यक्रम नसतो. कधीं कधीं आम्ही दोघे गप्पागोष्टी करतों व त्यांत बेबीचीहि बडबड चालूच असते. पुष्कळवेळां 'ह्यांचा' आणि बेबीचा कांहींतरी तिला हंसवण्या-रडवण्याचा खेळहि चालला असतो. कधीं माझें शिवणकाम, भाजी निवडणें व असेंच कांहींतरी चालतें. त्यांत बेबीची लुडबूड असतेच. क्वचित्-वेळेला आमचे शेजारी जोशी आहेत ना, ते दोघे पत्ते खेळायला येतात. बेबी बडबड करीत असते. थोडाफार आम्हाला त्रासही देते. तिला झोप म्हटलें तर झोपत मात्र कांहीं नाहीं.'

'वा, ती अशी कशी झोपेल! तुमच्याबरोबर जागें राहून तिला विशेष प्रकारचा सामाजिक आनंद मिळतो. तो तिनें कां मिळवूं नये? त्यांत तुमचा तिला 'नीज नीज' म्हणून आग्रह अधून मधून होत असेल. तेव्हां तिला एरवीं जी स्वाभाविक झोप लागावी ती लागत नाहीं. बरं, आतां सांगा कीं तुम्ही गाद्या वगैरे केव्हां घालतां?'

'गाद्या कांहीं आम्ही लौकर घालत नाहीं. निजायच्या वेळेलाच घालतों. आधीं गाद्या घालून ठेवणें आम्हाला कसें जमायचें! दोन खोल्यांचा संसार. आधीं गाद्या घालून ठेवल्या तर त्यावर पाय पडतात. मला तें आवडत नाहीं.'

'पण बेबीची गादी तरी आधी घालतां कीं नाहीं?'

'ती तर माझ्या गादींतच झोपतें.'

शुभ प्रसंगाच्या वेळीं मुखमाधुरीसाठीं
वापरा
दिलरंजन
सुवासिक सुपारी
सुमधुर, शेंकडों लोकांना आनंदित करणारी—
—: सर्वत्र विकली जाते :—
आपल्या गांवांत एजन्सीसाठीं लिहा :—
: मालक :
आर. के. सुपारीवाला
शांती भुवन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.
शाखा : पोस्ट ऑफिसच्या बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड,
मुंबई ४
चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ, ग्रँट रोड,
मुंबई ७

'आता मला तुमच्या अडचणीची कल्पना आली. त्यावर मी उपायही सांगतों. पण तो तुम्ही करून पहायला हवा.'

'तुमचं काय म्हणणं आहे तें तरी कळूं द्या.'

'अहो, तुमच्या बेबीला रात्रीं लौकर झोप येत नाहीं, त्याचें कारण म्हणजे तिला झोप लौकर यावी म्हणून सोइस्कर वातावरण नाहीं. पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही जागें असेपर्यंत जागे राहाण्याची तिला संवय झाली आहे. याकडे तुम्ही यापूर्वी लक्ष दिलें नाहीं. तुमच्याबरोबर जागें राहाण्यांत तिला सामाजिक आनंद मिळतो, तिची त्यामुळें थोडीफार झोपमोड होत असेल. पण त्याची भरपाई सकाळी ९–१० वाजेपर्यंत झोपून दूर होते. तेव्हा आधीं म्हणजे बेबीसाठीं एक वेगळी गादी तयार करा. तुमच्या गाद्या जरी घातल्या नाहींत तरी बेबीची गादी घाला व तिला झोप आली कीं तिने गादीवर झोपावें म्हणून तिला सांगा. सुरवातीला कांहीं दिवस तुम्हाला विशेष प्रयत्न करायला हवेत. बेबीची उशीरा निजण्याची संवय मोडून तिला लौकर झोपी जाण्याची संवय लागायला हवी. त्यासाठीं तुम्हीं आपल्या गप्पागोष्टी–शिवण टिपण, खेळ वगैरे कांहीं दिवस बंद ठेवा. यांत वसंतरावांचीही मदत घ्यायलाच हवी. ते बेबीशी खेळतात ही फार चांगली गोष्ट आहे. पण असा खेळ रात्री निजण्याच्या वेळीं नसावा. त्याने मग झोप उडते. दिवसा खेळावें. दुसरें म्हणजे बेबीला निजविण्यासाठीं गाणीं म्हणणें वगैरे जें कांहीं तुम्ही करीत असाल तें अवश्य करा. वाटल्यास बेबीच्या शेजारीं कांहीं वेळ तुम्हीही पडा व पडल्या पडल्या तिला थोपटून गाणीं म्हणा. वसंतरावांनीं त्यावेळीं आपलें वाचन वगैरे करावें. 'बेबीला झोंप लौकर लागत नाहीं' याची चर्चा बेबीसमोर इतरांजवळ करूं नका. सुरवातीस बेबीला लौकर झोप आली नाहीं, तर तिला रागवूंही नका. कारण रागवून कांहीं झोंप लागत नाहीं. शक्य असल्यास दिव्याचा प्रकाश मंद करा. झोंपतांना बेबीचें मन प्रसन्न राहिलें पाहिजे. जेवण झालें व गादी घातलेली असली म्हणजे तिच्यावर जाऊन निजतांच बेबीला झोंप यायला हवी व ही संवय तिला लौकरच लागेल. मुख्य म्हणजे तुमच्या मानसिक क्षोभामुळेंच बेबीला लौकर झोंप लागत नाहीं. आई आपणाला निजविण्याचा एवढा आटापिटा कां करते? असाच प्रश्न तिला पडतो म्हणूनच ती लौकर झोपत नाहीं. आतां कांहीं दिवस प्रयत्न करून पहा व काय अनुभव येतो तो मला सांगा.'

—स. आ. केळकर

गृहजीवनाचे पडसाद

रामा, वनशा, रडक्या, कमळी, जानकी अशी सगळी बालगोपाळ मंडळी रात्रींच्या शाळेंत आली होती. शाळा सुरू झाली. कोणी उदाहरणें करीत होतीं, कोणी पुस्तक वाचीत होतीं, तर कोणी पाढा घोकीत होतीं. वनशाच्या पोटांत कांहीं तरी खदखदत होतें. त्याला कांहींतरी सांगायचें होतें. तें त्यानें मोठ्या कष्टानें आवरलें होतें. पण छः! फुटलंच एकदां बेंड. मध्याच्या बालपकडून नेलें ही बातमी त्यानें रामाला शेवटीं सांगितलीच आणि मग हळुहळू करतां सगळीच मंडळी या गप्पांत सामील झाली. पोलीस केव्हां आले होते, छापा कसा घातला, कोणाकोणाला पकडून नेलें, कोणकोण पळून गेले, बाटल्या कशा लपवल्या वगैरे गोष्टींचें अद्भुत रोमांचकारी वर्णन एकमेकांत चाललें होते. मीही त्यांत शिरलें आणि विचारलें, "कां रे, इतके दिवस मी तुमच्यामध्यें फिरतें आणि एक सुद्धा दारूची बाटली मला कशी दिसली नाहीं?" त्यावर मुलें खूप हंसली. "तुला कशी दिसणार भट्टी? चुलीसारखी चूल, त्याच्यावर मडकें ठेवलेलें. चार पैशाचा गूळ आणायचा, एक पैशाचा नवसागर आणायचा आणि थेंब थेंब दारू गाळायची. एवढें पण तुला माहिती नाहीं?"

"नाय रे बाबा, मला कुठून माहित असणार? आम्ही कधीं दारू करीत नाहीं आणि कधीं पीत नाहीं."

"कशी लागते रे दारू?"

"बेस; तुला एक घोट दिला तर तूं रोज मागशील. पण दारू प्यालेला माणूस कसा वेड्यासारखा होतो, कसें तरी बोलतो, धडपडत चालतो, मध्येंच पडतो, असें भूत होतें त्याचें."

"अशी मी भूत झालें तर तुम्हांला आवडेल का?"

"नाहीं नाहीं नाहीं, एकच ओरड झाला."

कमळी म्हणाली, "दारू फार वाईट. दारूने माणूस माजत नाहीं. उगीच बडवीत सुटतो एकेकाला.

"तुझ्या आईला तुझा बाबा मारतो का ग?"

"होय. फार मारतो."

माझा बाप पण मारतो, रडक्या म्हणाला.

"माझा पण, जानकी म्हणाली."

"अशा वेळेला तुम्हीं काय करतां रें?"

"आम्ही सोडवायला जातों. बाप आम्हांला पण मारतो. मग आम्हीं पळून जातों. मांडवावर चढून लपून बसतों. बाबांची दारू उतरली म्हणजे खालीं उतरतों."

"दुसरीं लहान भावंडें काय करतात?"

"तीं उगाच रडतात. कोपऱ्यांत लपून बसतात."

"तुमची आई भिते कीं नाहीं?"

"हो आई बेस भिते."

"मग आई बाबाला मारीत असेल."

"आई नाहीं मारीत, ती शिव्या देते नि रडते अख्खी रात्र. झोंप येत नाहीं," मुलांनीं सांगितलें.

"मग आपण अशी दारू प्यावी का?"

"नाहीं पिऊं." मुलांनीं ओरडून सांगितलें. पण ती वाऱ्यावरची वावडी. त्यांच्या घरीं आई आणि वडील रोज जें करतात तें मुलांच्या समोर कायमच आहे. असें आहे आमच्या मुलांचें गृहजीवन.

—अनुताई वाघ

विठूकाकांची शैक्षणिक दृष्टि

[कशाला शिक्षण म्हणायचें व कशाला शिक्षण म्हणायचें नाहीं, हा विठूकाकांपुढें आलेला प्रश्न कित्येक पालकांपुढें येण्याची शक्यता आहे. शशी आणि रामजीचें शिक्षण विठूकाकांनीं कसें परस्पर पोषक बनवलें तें या लेखांत वाचा. —संपादक]

तिसरीच्या परीक्षेंत पहिला नंबर आल्यामुळें शशीची स्वारी अगदीं खुषींत होती. उन्हाळ्याच्या सुट्टीचे कार्यक्रम आंखायला त्याला आतां आणखीनच उत्साह आला होता. इतक्यांत ओझरचे विठूकाका आले. त्यांनीं आग्रहानें शशीला ओझरचें आमंत्रण दिलें. बाबा म्हणाले, 'जातोस का शशी ओझरला ? खूप मजा आहे तिथें. शेतं, मळे, विहिरी खूप खूप पहायला मिळेल.' तिसरीच्या पुस्तकांतलें खेड्याचें वर्णन शशीला आठवूं लागलें. तोंच विठूकाका म्हणाले 'शशी, अरे चल. मुंबईचीं मुलें तुम्हीं. पुस्तकांतच सगळं पहातां, वाचतां. खरं पहायला मिळतंय् कुठं तुम्हांला ? कोकिळेची कविता म्हणतोस पण कोकिळा पाहिलीयस का कधीं ?' 'नाहीं बुवा' शशी म्हणाला. 'मग चलच तर ओझरला' विठूकाका म्हणाले. आणि शशीचा ओझरचा बेत पक्का झाला.

मध्ये दोन दिवस शशी आणि विठूकाका नाशिकला बनू आत्याकडे राहिले आणि मग एस्. टी. ने ओझरला आले. ओझर गांवांत एस्. टी शिरते तों दुपारचे ११॥ वाजले होते. भोंवतालचीं झाडं, पानं, रस्त्यावरील धूळ, फार, काय मधून मधून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकासुद्धां अगदीं उन्हानें तापून निघाल्या होत्या. घरीं पोहोंचतांच विठूकाका सदूला हाक मारून म्हणाले, 'सदू, अरे आपल्या मुंबईच्या छोट्या पाव्हण्यांशीं खेळायला दोस्त पाहिजे ना एक. त्या तात्याबाच्या रामजीला निरोप देऊन ये इथं यायला. तोपर्यंत पाव्हणे जेवणखाण आटोपतील.'

शशी कपडे बदलून जेवून उठतो तों रामजी हजर! काळा सावळा पण चलाख. मळकट पिवळी पैरण आणि ठिगळं लावलेली निळी चड्डी घातली होतीं त्यानें. विठूकाका रामजीला म्हणाले—'रामजी, हे मुंबईचे शशीदादा बरं. यांना आतां सगळं गांव दाखवायचं बरं कां तूं. आतां ऊन आहे तंवर पडवींत खेळा. मग संध्याकाळीं जा गांवांत भटकायला.' एवढें बोलून प्रवासानें शिणलेले विठूकाका झोंपायला गेले खोलींत. रामजी शशीकडे पाहून हंसला. पण शशीची कळी तेवढी खुलली नाहीं. रामजीचा एकंदर अवतार पाहून शशीची स्वारी जरा नाराजच झाली. त्यांत हंसल्यावर रामजीचे पिवळे दांत पाहून शशी मनांत म्हणाला 'शीः हा माझा मित्र.' पण आतां कांहीं इलाज नाहीं असें पाहून म्हणाला —'रामजी, चल आपण पडवींत बसून पत्ते खेळूं. मी पेटींतून पत्ते आणतो हं काढून.—' 'पन शशीदादा मला पत्ते न्हाई येत खेळतां. मध्येंच रामजी म्हणाला. शशीला आश्चर्य वाटलें, एवढा मोठा मुलगा आणि पत्ते नाहीं येत खेळतां. कमाल झाली! 'बरं तर आपण भेंड्या खेळूं कवितांच्या. सिनेमांतली गाणीं पण म्हणायचीं बरं कां.' पण याहि खेळांत रंग भरेना. कधींहि हातांत पुस्तक न धरलेल्या रामजीला दोन-चार गाण्यांपलिकडे कांहींच येईना. शशी कंटाळला. मनांतून थोडा रागावला. 'जाऊं दे आपण पुस्तकंच वाचूं गोष्टींचीं. मी खूप आणलींयत मुंबईहून पुस्तकं. तुला एक देतो हं.' 'पन शशीदादा, मला वाचतां न्हाई येणार पुस्तक.' 'म्हणजे तुला वाचतांहि नाहीं येत ?'- शशीनें आश्चर्यानें विचारलें. 'तसं उगाच र ट फ येतं म्हना. पन इकतं पुस्तक न्हाई बा शेनार वाचतां.' 'मग जा तूं घरीं. मी पुस्तक वाचणार आतां.' रामजी बिचारा हिरमुसला होऊन निघून गेला. शशी पुस्तक वाचूं लागला.

दुपारीं चारला चहा झाला. 'काय शशीबुवा, दुपारभर खेळलांत ना अगदीं ?' 'रामजी आमचा मोठा चलाख आहे



सुगंधित झरणपासून बनणारें तेल

आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.



१. गळणारे केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२. मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M. P. S.

बरं का!' मध्येंच शशी म्हणाला, 'कसला आलाय चलाख, काका एवढा मोठा झालायू पण वाचतां येईना कीं कविता म्हणतां येईनात. पत्ते देखील खेळतां येत नाहीं म्हणे! काय खेळणार आम्हीं त्याच्याशीं. मला नको हा अडाणी मित्र.'

विठूकाका चमकले. शशीचें तें रागाचें आणि तुच्छतेचें बोलणें ऐकून विठूकाकांना बरं वाटलं नाहीं. त्यांनीं समोरच्या गांधींच्या फोटोकडे पाहिलं. हातांतली कपबशी खालीं ठेवून ते शशीला म्हणाले 'शशी तुझा पहिला नंबर आलाय ना परिक्षेंत, मग विचारतों त्या प्रश्नांचीं उत्तर दे बरं. पाहूं तरी आमचा शशी किती हुषार आहे.' शशी उत्सुकतेनें काकांकडे बघूं लागला.

'शशी तण कशाला म्हणतात रे?' 'तण,' मला नाहीं माहित काका. आमच्या पुस्तकांत लावणी, पेरणी, कापणी असे शब्द आले आहेत. पण तण शब्द नाहीं. बुवा आला.' शशी हंळूच म्हणाला. 'बरं तर केळीं कशी काढायची तें माहित आहे का. तुला? आधी काय कापायचें?' 'नाहीं माहित' 'बरं झाडावर चढतां येत कां तुला?' 'नाहीं काका' शशी खाली मान घालून म्हणाला. 'शशी रानांत गाई चरायला नेशील का?' 'छेः काका गाईची तर मला फार भिती वाटते. आणि रानांत कोण जाईल? तिथें तर साप असतात.' शशीकडे रोखून पहात विठूकाकाका म्हणाले, 'मी विचारल्यापैकीं कांहींच सांगतां आलें नाहीं तुला शशी. एवढा मोठा झाला आहेस तरी गाईची धारहि काढतां येत नसेल ना तुला? मग मला तर वाटतं तूंच अगदीं अडाणी आहेस. तात्याबाच्या सहा वर्षाच्या पांडूला सुद्धा जें माहित आहे तेंहि तुला तुला येत नाहीं.'

शशी ओशाळला. नेहमी 'हुषार' म्हणून शाबासकी मिळवणारा शशी आज अडाणी ठरला. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले काका त्याच्या जवळ आले आणि म्हणाले— 'रागवूं नकोस हो. मी तुला अडाणी म्हटलें म्हणून. आणि वाईटहि वाटून घेऊं नकोस. अरे अमुक एक आलं म्हणजे ज्ञानी, अमुक एक आलं नाहीं म्हणजे अज्ञानी असं कांहीं नाहीं. सगळ्या गोष्टी सारख्याच महत्वाच्या आहेत. मी तर म्हणेन रामजीला जें ज्ञान आहे तें तुझ्या ज्ञानापेक्षां श्रेष्ठ आहे. कारण त्याचा जीवनाला अधिक उपयोग आहे. तुम्हां दोघांना जें येत नाहीं त्याचा दोष तुमच्याकडे नाहीं. तूं शेतांत वावरला नाहींस म्हणून मी विचारलेल्या गोष्टी तुला सांगतां आल्या नाहींत. तो शाळेंत गेला नाहीं म्हणून त्याला वाचतां येत नाहीं. म्हणूनच तुम्हीं एकमेकांना तुच्छ लेखतां कामा नाहीं. तुला जें येत आहे तें तूं त्याला शिकव, त्याला जें येतं आहे तें तूं शीक. म्हणजे पहा कशी गंमत येतेय्. देण्याचा आनंद आणि घेण्याचा आनंद यांत बुडून जाल दोघे. जा आतां कपडे कर. रामजीकडे जाऊं आपण.'

दुसऱ्या दिवसापासून रामजीची आणि शशीची चांगलीच गट्टी जमली. झाडावर चढायला शशी शिकला, तर दांत स्वच्छ ठेवायचें रामजी शिकला. शशी पोहायला शिकला, तर रामजी सोपे, आकाराचे शब्द वाचायला शिकला. सुट्टी कधी गेली तें समजलंही नाहीं शशीला.


जातांना बसच्या खिडकीशीं उभं राहून रामजी म्हणाला 'शशीदादा, मला दोन सोपीं पुस्तकं पाठवून द्या बरं कां वाचायला.' शशी म्हणाला 'हो तर गेल्याबरोबर चांगलीं ४।५ सुरेख सोपीं पुस्तकं पाठवतों पोस्टानें, पण विठूकाकांबरोबर द्राक्षं पाठवायला विसरूं नकोस हं तूं.' 'नायना, विसरीन कसा? आमच्याच मळ्यांतली द्राक्षं पाठवितो बघा. बरंय् शशीदादा राम राम!' गाडी सुरू होतांच रामजी म्हणाला. शशीनें 'हा हा' करायला हात वर केला होता तो चटकन् खालीं आणला आणि हात जोडून शशी हंसत म्हणाला 'बरय् राम राम.'

विठूकाका जवळच उभे होते. सगळं पहात होते. समाधानानें हंसत ते घराकडे परतले.

—शकुंतला प्र. गुप्ते, नाशिक

स्वदेशीची भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





बाल-विभाग

वर्ष २६ वें : अंक ५ वा : ऑगस्ट १९५८

– प्रतिज्ञा –

(छंद–अभंग)

नाहीं मी रे देवा । तुच्छ लेखणार ।
नाहीं हिणविणार । कुणालाहि ॥ १ ॥
करीन मी योग्य । साऱ्यांचा सन्मान ।
आदर ठेवून । नित्य काळीं ॥ २ ॥
संकटाच्या काळीं । कुणाचीहि देवा ।
करीन मी सेवा । मनोभावें ॥ ३ ॥
दुजांच्या सुखांत । सुखी मी होईन ।
होऊन प्रसन्न । खरेंच रे ॥ ४ ॥
नाहीं करणार । स्वप्नांत हेवा ।
कुणाचाहि देवा । कधिं काळीं ॥ ५ ॥
मोडणार नाही । वडीलांची आज्ञा ।
माझी रे प्रतिज्ञा । आहे अशी ॥ ६ ॥

—दत्ताराम आ. वारस्कर

अंगणांत खेळूं माझ्या

(चाल : आई तुला दाखवूं का)

या या सारे दाखवूं या, गमती करुनी ।
अंगणांत खेळूं माझ्या या रे या मिळुनी ॥ध्रु॥
डब्बे तुम्हीं एन्जिनाला घ्यारे जोडूनी ।
भप् भप् भप् भप् गाडी चाले
शिट्टी फुंकूनी ॥ १ ॥
सर सर सर सर चालवूं या रंगित मोटार ।
पों पों पों पों बोलते ही भुर्रकन् जाणार ॥२॥
गर गर गर गर भर्रर्रर्र जातें विमान आकाशीं ।
उंच जाऊं, खालीं पाहूं, गंमत हो खाशी ॥३॥
बैलजोडी जोडिली हो आम्हीं गाडीला ।
खुळ खुळ खुळ खुळ घुंगुर वाजे
जातो शेताला ॥ ४ ॥
सायकलवरती स्वार होऊं आम्हीं ऐटींत ।
ठिणिठिणि, ठिणिठिणि घंटा वाजे
जाऊं शाळेंत ॥ ५ ॥

—ता. परांजपे

नागोबाची पूजा

डुम् डुम् डुम् । नागोबाला दूऽऽध
डुम् डुम् डुम् । नागोबाला दूऽऽध
या रे पोरांनों गारुडी आला
टोपल्यांतला नागोबा दावतों तुम्हांला

मुलंबाळं आलीं—
पोरीसोरी आल्या—
आयाबाया आल्या—

हळूच काढलें टोपलीचें झांकण
नागोबाची फणा वर आली सणकन्

गारुडी वाजवतो पुंगी गान
नागोबाची फणा डुलते छान

डौलदार पिवळा नागोबा फाकडा
फणीवर त्याचा दहाचा आकडा

हळद वहा, कुंकू वहा—
लाह्या वहा, फुलं वहा—
पैसा वहा, सुपारी वहा—
नागोबारे नागोबा—

वाटीभर दूध पिऊन घे पोटभर
पुढच्या वर्षी ये बरं लवकर.

—शंकुतला गुप्ते

भिजली मुंबापुरी !

गर्जत नीलांबरीं । पावसा । येशी धरणीवरी ॥ध्रु०॥
काळे काळे मेघ झुकेले
दर्याचें जल खारें प्याले
तेच नभांतुन वर्षु लागले
अखंड भूमीवरी । पावसा ।
भिजली मुंबापुरी ॥ १ ॥

दिवस-रात्र कांहींच कळेना !
दीन जनांची होते दैना
अंधारांतुन मार्ग दिसेना
पाणी रस्त्यावरी । पावसा ।
भिजली मुंबापुरी ॥ २ ॥

बोरीबंदर-जलांत बुडलें
चौपाटीला वादळ झालें
'फाऊंटन' तें जलमय झालें
नजर बंद ही खरी । पावसा ।
भिजली मुंबापुरी ॥ ३ ॥

गरिबांच्या झोंपड्यांत सगळें
रस्त्यावरचें पाणी शिरलें
घरांघरांतुन कहर माजले
काहीं सुचेना तरी । पावसा ।
भिजली मुंबापुरी ॥ ४ ॥

भिडला सागर वाळकेश्वरा
तुटल्या साऱ्या विद्युत् तारा
कुठें न कोणा न मिळे थारा !
खडबडली अंतरीं । पावसा ।
सगळी मुंबापुरी ॥ ५ ॥

लोकल गाड्या पथीं अडकल्या
ट्राम कोठल्या, बसेस कुठल्या !
कामकऱ्यांचे ऑफिसांतल्या
थवे अडकले घरीं । पावसा ।
भिजली मुंबापुरी ॥ ६ ॥

ढोपरभर रस्त्यावर पाणी !
उतार न जाण्या म्हणुनी
ठायीं ठायीं वाहनांतुनी —
भिजली मानवपुरी । पावसा ।
गोंधळ माजे उरीं ॥ ७ ॥

—बा. मा. हराळे

(आदिवासी लोककथा)

– सोनाईची कहाणी –

एक कुणबी होता. त्याला सात मुलगे होते. सात मुली होत्या. धाकटी मुलगी फार सुंदर होती. तिचे केस सोनेरी होते. पावसाचे दिवस आले. शेतकरी राब करूं लागले. तसा कुणबी पण शेतावर गेला. त्याचे सात मुलगे शेतावर गेले. सात मुली पण शेतावर गेल्या.

दिवसभर पाला गोळा केला. शेण्या गोळा केल्या. राब अंथरला नि पेटवून दिला. सगळी मंडळी दमली. अंगांतून घामाच्या धारा निघाल्या. मग सगळे लोक नदीवर आंघोळायला गेले. मुली वरच्या बाजूला आंघोळ करीत होत्या. मुलगे खालच्या बाजूला आंघोळ करीत होते.

नहातां नहातां सोनाईचा केस तुटला. 'बाहेर टाकला तर कीडा-मुंगी गुरफटून मरेल, पाण्यांत टाकला तर खेकडे-मासे गुरफटून मरतील.' तिनें एक पान घेतलें. त्यांत केस ठेवला. पुडी बांधली. पाण्यांत सोडून दिली.

ती पुडी वहात वहात धाकट्या भावाच्या हातांत आली. त्यानें उघडून बघितली तर सोन्याचा केस. 'हा कोणाचा असेल ? जिचा असेल तिच्याशीं मी लग्न करणार.' त्यानें गांवांतल्या सगळ्या मुली बघितल्या. कोणाचे केस सोनेरी नाहात. त्याच्या बहिणीचेच केस सोनेरी. 'बस मी बहिणीशींच लग्न करणार.' तो हट्टून बसला. आईनें समजावलें, बापानें समजावलें, बहिणीनें समजावलें, भावांनीं समजावलें. शेवटीं सोनाईनें समजावलें पण तो कांहीं ऐकेना. तेव्हां लग्नाची तयारी झाली. सोनाईला वळेंच लग्नाला उभें केलें. दोघांचें लग्न झालें. पण सोनाई पळून गेली. ती डोंगरांत हिंडूं लागली. रानोरानीं भटकूं लागली. रडत बसायची–'आधीं होता भाऊ, मग झाला नवरा, काय करूं ?'

तिला एक गोसावी भेटला. त्यानें दोन बिया दिल्या. एक चंदनाची, एक शिरसाची. तिनें विहिरीच्या दोन बाजूला त्या लावल्या. त्याचीं दोन झाडें झालीं. सोनाई झाडावर चढून बसली.

सोनाईच्या सहा भावजया. रोज पाण्याला यायच्या तश्या पाण्याला आल्या. त्यांना विहिरींत सोनाईची सावली दिसली. त्यांना वाटलें आपलीच सावली. आपण एवढ्या सुंदर. मग पाणी कशाला भरायचं ? त्यांनीं मातीच्या घागरी फोडून टाकल्या. रिकाम्या हातानें घरीं गेल्या. त्याना सासूनें चामड्याच्या पिशव्या दिल्या. त्या त्यांनीं दातांनीं कुरतडून फाडून टाकल्या. मग सासूनें तांब्याच्या घागरी दिल्या. त्या त्यांनीं ठेंचून टाकल्या. तेव्हां सासू स्वतः पाण्याला आली. पाहिलें तर विहिरींत आपली सोनाई.

'सोनाई बाई ग खालीं उतर–घरीं चल.'

'मी उतरणार नाहीं. घरीं येणार नाहीं. माझें लग्न मोडा तर मी येईन.'

सोनाई घरीं गेली नाहीं. तिथेंच राहिली. तिथेंच मेली. आई–बापानीं झाडें कापून टाकलीं.

सोनाई तेथें अजून गाणें म्हणते—

'आधीं होता भाऊ, मग झाला नवरा,
काय करूं हो काय करूं ?'

—संग्राहक : अनुताई

———

रामाचा हट्ट

पौर्णिमेच्या दिवशीं राणी बसली गच्चीवरती
रामचंद्र युवराज आइच्या खेळे मांडीवरती
शुभ्र चांदणें चंद्र आकाशीं चांदण्यासवें खेळे
तया पाहुनी रामचंद्राचें मन हर्षित झालें
राम म्हणे 'दे चांदोबा मज आई खेळायाला
छानदार तो रंगित चेंडू मजला आवडला'
राणीनें मग मागविलीं बहु खेळणी रामासाठीं
दासिदासींनीं आणुनि दिधलीं खेळण्यांची
हो पाटी
हा बघ चेंडू चंद्रापरि हा आहे मोठा गोल
गरगर फिरतो भरभर सरतो बघ हा गोल
महोल
"नको मला तें नकोच कांहीं चांदोबा दे
मजला"
ऐसे म्हणुनीं रामानें मग रडुनी गोंधळ केला.
"किती हट्ट रे करिसी बाळा चंद्र कसा
तुज देऊं?
आपण तुजला नवी खेळणीं आणायाला
जाऊं."
परि रामाची समज होइना आक्रोशें तो रडला
बाळाचें तें दुःख खरोखर पहावेना आईला
राणीनें मग बोलाविलें राजा-प्रधानजीला
लगबगीनें राजे आले प्रधानजी सेवेला
सर्वांची मग धांदल झाली कोणा कांहीं सुचेना
रामचंद्र भुईवरती लोळे रडणें मुळीं थांबेना
प्रधानजीनें रामा हातीं एक आरसा दिधला
रामचंद्राच्या हातीं दिधला आकाशीं चंद्राला
आरशांतलें दिसलें रामा प्रतिबिंब चंद्राचें
समाधानची झालें चटकन् सोनुल्या रामाचें
खुदकन् हंसला चंद्रा पाहुनी राम आपुल्या
हातीं
पुन्हां पुन्हां तो पाही चंद्रा आरसा घेऊन
हातीं

—सरलाताई देवधर

भारताचा मान

हाच तुझा सन्मान । भारता । हाच तुझा सन्मान ।
अमेरिका, इंग्लंड, जर्मनी
सुधारलेलीं राष्ट्रें ज्ञानी
रक्तहीन तव क्रांती बघुनी
आज लवविती मान । आदरें ।
हाच तुझा सन्मान ॥ १ ॥

जुनें पुराणें दास्य संपलें
मानवतेचें स्वप्न रंगलें
निशाण तिरंगी उंच फडकलें
क्रांतीचें मैदान । भारता ।
हाच तुझा सन्मान ॥ २ ॥

कर्म-धर्म संयोग चांगला
देवदयेनें घडुनी आला
स्वातंत्र्याचा आणि लाभला
तुजशीं पहिला मान । भारता ।
हाच तुझा सन्मान ॥ ३ ॥

थोर तुझी पुण्याई होती
दैवगती ही प्रतिकुल नव्हती
करावया लोकांत जागृती
राखिलेंस अवधान । भारता ।
हाच तुझा सन्मान ॥ ४ ॥

आज सर्वही देश आदरें
कसे तुजकडे पाहती बरें
भाग्य तुझें बलवान असेरे
नसे कशाची वाण । भारता ।
हाच तुझा सन्मान ॥ ५ ॥

स्वातंत्र्यास्तव तुझ्या झुंजले
प्राणपणानें अखंड लढले
ते धन्यात्मे होऊन गेले !
त्यांना गोड प्रणाम । भारता ।
हाच तुझा सन्मान ॥ ६ ॥

—बा. मा. हराळे

पूर्वप्राथमिक भाषा शिक्षण

लेखांक पांचवा : शब्दकोशाचा विकास

[या मालेंतील पूर्वीचे लेख गेल्या वर्षी एप्रिल, मे, जून व सप्टेंबर या महिन्यांच्या 'शिक्षण–पत्रिकें'त येऊन गेले आहेत. नवीन विषयांच्या गर्दीमुळें ही लेखमाला पुढें चालवितां आली नाहीं. यंदा अध्यापन मंदिरांत कार्यपद्धतीचा जो नवीन शिक्षण-क्रम सुरू झाला त्यांत या विषयाला नवीन महत्व प्राप्त झाल्यानें कित्येक शिक्षकांनीं ही माला चालू करण्याची मागणी केली म्हणून ती पुनः चालू करीत आहोंत. —संपादक]

उच्चारांचा विकास मुख्यत्वें विशिष्ट प्रकारच्या मज्जा–स्नायूंच्या आंतरिक पक्वतेवर (Maturation) अवलंबून असतो. शब्द-कोशाचा विकास मुख्यत्वें बाह्य परिस्थितींत मिळणाऱ्या अनु-भवावर अवलंबून असतो. ज्या कुटुंबांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिति पुढारलेली असते, त्या कुटुंबांच्या बालकाचा शब्दकोश स्वाभाविकपणें वाढतो; उलट मागासलेल्या कुटुंबांतून येणाऱ्या बालकांचा शब्दकोश संकुचित असतो.

शब्दकोशाची वाढ ही बालकांच्या विकासाची एक महत्वाची बाजू आहे. या वाढींत बालकांच्या ओळखीच्या शब्दांची संख्या वाढते, एवढेंच नव्हे, तर शब्दा–शब्दांच्या सूक्ष्म अर्थांचें आकलन करण्याची पात्रता आणि त्याचबरोबर अशा शब्दांचा योग्य प्रसंगीं उपयोग करण्याची पात्रताही वाढत असते. शब्दांचा उपयोग हा जरी मूलतः आत्मप्रकटनाचाच एक प्रकार असला तरी त्याला बालकाच्या सामाजिक विकासाच्या दृष्टीनेंही फार महत्व आहे. भाषा हें सामाजिक जीवनाच्या विकासाचें अत्यंत प्रभावी साधन आहे. शब्दकोशाच्या वाढीमुळें दुस-ऱ्याच्या बोलण्याचा अर्थ कळतो, येवढेंच नव्हे, तर आपल्या भाषेनें दुसऱ्यावर प्रभाव पाडून दुसऱ्याचें नियंत्रणही करतां येतें. त्यामुळें शब्दकोशाची वाढ ही बालकाची वैयक्तिक आणि सामाजिक गरज आहे. बाल्यावस्थेंत ही गरज विशेष उत्कट दिसते. सामान्यतः पूर्ण दीड वर्षांच्या बालकाचा शब्दकोश वीस–बावीस शब्द असतो, तोच पूर्ण तीन वयाला हजार शब्दांचा आणि सहा वर्षाला अडीच हजार शब्दांचा होतो हें मागील लेखांत आलेंच आहे.

बुद्धि आणि शब्दकोशाची वाढ

बालकाच्या बुद्धीवर शब्दकोशाची वाढ सामान्यतः अव-लंबून असली तरी शब्दांच्या संख्येवरून बालकाची बुद्धि नेहमीं अजमावतांच येते असें नव्हे. प्रत्येक बालकाचा वाढत्या वयाचा शब्दकोश कमी–अधिक असूं शकतो. त्याचप्रमाणें या कोशाची वाढ क्रमशः च होते असें नाहीं. तीन वर्षांला ज्या बालकाचा शब्दकोश सामान्यतः कमी आढळला, त्याच बालकाच्या सहाव्या वर्षांच्या शब्दकोशांत एकाएकीं वाढही होऊं शकते, म्हणून शब्दकोशावरून बालकाच्या पात्रतेविषयीं शिक्षक–पालकांनीं अनुमानें बांधतांना काळजी घेतली पाहिजे.

बालमंदिराचा शिक्षणक्रम आणि शब्दकोशाची वाढ

शब्दकोशाच्या वाढीला बालमंदिराचें वातावरण, या संस्थेनें योजलेले कार्यक्रम यांची फार मदत होते. बालमंदिरांतून बाल-काला जितका व्यापक आणि वेचक अनुभव मिळेल, तितका बालकाचा शब्दकोश विस्तृत आणि उपयुक्त बनूं शकतो. बाल-



दत्तात्रय कृष्णा सांडू ब्रदर्स,
चेंबूर, बायव्हेट लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस : चेंबूर, मुंबई ३८
—: स्थानिक शाखा :—
काळवादेवी, ठाकुरद्वार, परेल व दादर

काला त्याच्या सभोवतीचें मानवी जीवन, भौतिक सृष्टि, वनस्पति, प्राणी जीवनांतील घटना या सर्वांविषयीं विलक्षण औत्सुक्य दिसून येतें. किड्या-मुंग्यांपासून मनुष्यांच्या हालचाली, जमिनीपासून आकाशांत-वातावरणांत होणारे फेरबदल ह्या सर्व गोष्टींतून बालमंदिरानें कोणत्या गोष्टींची निवड करावी हा बालमंदिरांच्या शिक्षकापुढें एक महत्त्वाचा प्रश्न आहे. भौतिकत-जैव आणि मानवी घडामोडींतून कोणत्या गोष्टींची योजना बालकांच्या अनुभव-विस्तरणासाठीं करतां येईल यासंबंधीचे प्रयोग झाले पाहिजेत. बालमंदिरांत बालकांसाठीं आपण जो कांहीं अनुभव योजूं, त्याचे शब्दकोशाच्या वाढीवर कसे परिणाम होतात यासंबंधींचें फारसें संशोधन आढळत नाहीं. चालू सामाजिक-आर्थिक आणि शालेय परिस्थितींत कोणत्या वयाचीं मुलें किती शब्द उपयोगांत आणतात यासंबंधीचीं माहिती मिळते. परंतु शब्दकोशाचा अनुभव योजनेशीं परस्पर संबंध काय यावर पद्धतशीर संशोधन झालेलें नाहीं. हे प्रयोग व्यापक प्रमाणावर जेव्हां होतील तेव्हां होवोत, परंतु त्यांची वाट बालमंदिरांनीं पाहूं नये, कारण प्रत्येक बालमंदिराला या बाबतींत कांहीं ना कांहीं करतां येणें शक्य आहे. तसें केल्यास त्यापासून बालकासंबंधींच्या आपल्या ज्ञानास व बालमंदिरांनीं योजावयाच्या उपक्रमांना चांगलें प्रोत्साहन मिळणार आहे.

बालमंदिराचें वातावरण

बालमंदिर म्हणजे एका दृष्टीनें एक विशाल कुटुंब आहे. दुसऱ्या बाजूनें तें समाजाचें सांस्कृतिक केन्द्र बनलें पाहिजे. त्यांत समाजाच्या ज्ञान-विज्ञान-उद्योग-कला जीवनाचें प्रतिबिंब पडलें पाहिजे. असें असलें तर बालकाच्या जीवनाचा पाया व्यापक अनुभवावर उभारला जाईल. शब्दकोशाची वाढ म्हणजे केवळ पोपटपंची अथवा निरर्थक शब्द बालकांकडून पाठ करून घेणें नव्हे. येथें आजुबाजूच्या जगाचा परिचय करण्याच्या दृष्टीनें शब्दांचें साह्य घ्यावयाचें आहे. आपण हें साह्य घेतांना प्रत्येक शब्दाचा **प्रत्यय** बालकाला मिळून तो शब्द **जिवंत वाटला पाहिजे.** म्हणून शब्दकोशाच्या वाढीची योजना म्हणजे बालकाला बालमंदिरांत मिळावयाच्या अनुभवाची योजना किंवा आजुबाजूच्या जगाच्या परिचयाचीच योजना करावी लागेल. प्रख्यात मानसशास्त्रज्ञ सूसान आयझॅक आपल्या 'Hand-book of child Psychology' या ग्रंथांत लिहिते, "The School, the teacher and the teaching alike are simply a Clarifying medium through which the facts of human life and the physical world are brought within the measure of the child's mind at successive stages of growth and understanding." शाळा, शिक्षक आणि शिक्षण ह्या गोष्टी म्हणजे बालकांना पोहोंचणाऱ्या कल्पना केवळ स्पष्ट करणारें माध्यम आहे. यामुळें मानवी जीवन, भौतिक जग यासंबंधींची हकीकत बालकांच्या वाढीच्या क्रमिक अवस्था व आकलनशक्तीच्या मर्यादा लक्षांत घेऊन पोहोंचविता येते.

बालमंदिराचें हें कार्य लक्षांत घेऊन बालकाला मानवी जीवन आणि भौतिक आणि मानवेतर प्राणी आणि वनस्पति जीवनाचा परिचय करून देण्याच्या दृष्टीनें काय काय करतां येण्यासारखें आहे तें पाहूं. येथें सुचवीत असलेल्या सर्व गोष्टी सर्व बालमंदिरांना करतां येतील असें नव्हे, परंतु या विषयाची शक्य ती व्यापक कल्पना शिक्षकांना मिळावी हा या तपशिलाचा उद्देश आहे.

भौतिक जगाचा परिचय-अनुभव

१ पदार्थ विज्ञान : निरनिराळ्या वस्तू हाताळणें, उचलणं, कापणें, ठोकणें, ताणणें, वाकवणें, दाबणे यासारख्या क्रियांतून बालकांना निरनिराळ्या पदार्थांचा परिचय बालमंदिरांत होतच असतो या परिचयांतून पदार्थ विज्ञानविषयक अनेक प्रकारचे सामान्य बोध बालमनांत विकसत असतात. या त्याच्या विकासाचें स्वरूप शिक्षकाला कळावें व त्याला बालकाला योग्य प्रकारची मदत देतां यावी म्हणून देतां येण्यासारख्या शब्दांचे एकक (Units) बनवून त्यासबंधीचा अनुभव कसा, केव्हां वाढवता येतो याची कल्पना देत आहों.

शब्दसमूह क्र. १ : आकारविषयक : लहान, मोठा, उंच ठेंगणा, रुंद, अरुंद, लांब, आंखूड, खोल, उथळ, उतरते, सपाट, जाड, बारीक.

अनुभव-योजना : शिल्परचनेतील विविध ठोकळे हाताळणे व त्यांचा उपयोग करणें, मॉन्टेसोरी साधनांत दट्टापेट्या, बिनटोपणाचीं दृश्यें, लांब व रुंद जिने, मनोरा यांवरील खेळ, हस्तव्यवसायांत वगैरेंत शिक्षकानें प्रथम योग्य शब्दांचा उपयोग केला पाहिजे. बालकांना या शब्दांचा अर्थ कळला आहे किंवा नाहीं हें समजून घेण्यासाठीं स्मृति खेळांच्या कसोट्या घ्याव्या. हे शब्द देण्याचे सामूहिक पाठही योजावे.

शब्दसमूह क्रमांक २ : भौमितिक आकारविषयक शब्द: वर्तुळ, चौरस, त्रिकोण, लंबवर्तुळ, अंडाकर घन, गोल, चिती, लंबगोल, घन-अंडाकार, दंडगोल.

अनुभव-योजना : भौमितिक आकृतीच्या पेटींतील सपाट आकृति. शिल्परचना आणि चित्ररचना यांतील आवश्यक आकृति

मातीकाम, चित्रकाम व कातरकामांत या शब्दांचा उपयोग शक्य तेथें करावा. या शब्दांचें संक्रमण (Transference) झालें आहे किंवा नाहीं तें पाहण्यासाठीं पाठांत कसोटी करावी. वर्तुळाकार काय काय असतें ? पोळी, चाक, पैसा, रुपया, ताट, वाटी, वगैरे. चौरस आकार कोठें दिसतो ? त्रिकोणी आकार कोठे दिसतो, कुणीं पाहिला आहे का ? याप्रमाणें वरील शब्दसमूह देतांना त्याच्या सामान्य बोधांचें विस्तरण करावें.

शब्दसमूह क्र. ३ : भौमितिक आकारः—चौकानाकृति. चौरस, लंब चौरस, समान्तर भुज चौकोन, समभुज चौकोन, समान्तर द्विभुज चौकोन, समद्विभुज चौकोन, अनियमित चौकोन.

अनुभव—योजना : हे शब्द शिशु—मोठ्यामध्यें देतां येण्याची शक्यता आहे. मॉन्टेसोरी साधनांतील भौमितिक आकृतींची पेटी, कार्डे यांचा उपयोग करावा. त्याचबरोबर कातर—काम, चित्रकाम यांत या शब्दांचा उपयोग करतां येतो. निरनिराळ्या आकारांच्या वस्तूंची आठवण देऊन या शब्दांच्या सामान्य बोधांचें विस्तरण करावें.

शब्दसमूह क्र. ४ : भौमितिक आकार—त्रिकोण—समभुज त्रिकोण, समद्विभुज त्रिकोण, विशालकोण त्रिकोण, लघुकोण त्रिकोण, काटकोण त्रिकोण, समद्विभुज काटकोण त्रिकोण, विषम काटकोण त्रिकोण, पाया, बाजू.

अनुभव—योजना : शब्दसमूह क्रमांक ३ प्रमाणें.

शब्दसमूह क्र. ५ : रेषावाचक शब्द : सरळ रेषा, वक्ररेषा, आडवी रेषा, तिरपी रेषा, उभी रेषा, लंब रेषा, कर्ण रेषा.

अनुभव—योजना : शिल्परचना, चित्ररचना, शोभारचना, सामूहिक कसरत, बागकाम, कातरकाम यांत शब्दांचा मुख्यत्वें उपयोग होतो. निरनिराळ्या रेषांचा अनुभव, विशेष प्रकारचीं साधनें, चित्रें योजूनही करता येईल. या शब्दांचे पाठ ' तार ' ' काठी ' वगैरेंचा उपयोग करून देतां येईल.

शब्दसमूह क्र. ६ : बहुकोणाकृतिः—पंचकोण, षट्कोण, सप्तकोण, अष्टकोण, नवकोण, दशकोण.

अनुभव—योजना : शब्दसमूह क्रमांक ३ प्रमाणे.

आकारविषयक शब्दसमूह आणखी योजतां येतील, परंतु या क्षेत्रांची कल्पना शिक्षकांना येण्यास हीं उदाहरणें पुरेशीं होतील. यापुढील लेखांत क्रमशः शब्दसमूह आणि त्यासंबंधींचा अनुभव अथवा पाठयोजना सुचवण्याचें ठरविलें आहे. या लेखांसंबंधीं बालशिक्षकांनीं आपल्या कांहीं सूचना पाठविल्यास मी त्यांचा आभारी होईन.

—शेष नामले

बालशिक्षणाच्या प्रणेत्यास अभिवादन

[पान ४ वरून चालू]

असतें. बालकाला ही मानवता प्राप्त करतां यावी म्हणून सध्यांच्या समाजांतील मनुष्य—मनुष्यांतील भेदभावांच्या जागीं प्रेमभावाला स्थान मिळालें पाहिजे. शिक्षणाच्या संस्कारांतून बालमनांत मानवी संस्कृतीसाठीं कृतज्ञता निर्माण झाली पाहिजे. बाल्यावस्थेंत मूल परकीय भाषा सहज प्राप्त करूं शकतें, याचा फायदा शिक्षण—योजनेंत घेतला गेला पाहिजे.

शिक्षणाचें नवें माध्यम

" सांस्कृतिक शिक्षणाचा शास्त्रीय पाया सहकाराच्या सिद्धांताच्या आधारानें रचल्यास विश्वांतील बरीच शक्ति आणि प्रत्येक जीवनप्रकारांत सुसंवाद निर्माण करण्याचें शक्य होईल. मानवी संस्कृतीच्या इतिहासांतून निरनिराळ्या संस्कृतींचे निर्माण कां व कसें झालें व या विकसलेल्या संस्कृतींत मानवी जीवनाचे उंच आदर्श यांत कशी एकवाक्यता आढळते याचा अभ्यास झाला, तर जगांतील राष्ट्राराष्ट्रांत सहानुभूति आणि सद्भाव सहज निर्माण होईल.

मूल आणि जागतिक शांति

जगांत शांतीच्या स्थापनेसाठीं बालकाचे अंगीं नवा मनुष्य घडण्याची जी अद्भुत नैसर्गिक शक्ति आहे, त्याचा उपयोग करण्याच्या दृष्टीनें व्यापक योजना घडल्या गेल्या पाहिजेत. बालकांतील या शक्तीमुळें तें नवीन शांतिमय मानवांची निर्मिति करूं शकेल, त्यांतूनच मानवी समाजाची पुनर्रचना होऊं शकेल अशी माझी जीवनश्रद्धा आहे. "

ता. ३१ ऑगस्टला मादाम मॉटेसरींची ८९ वी वर्षगांठ येते. त्या दिवशीं बालशिक्षण, बालशिक्षण संस्था, व या शिक्षणाची अभिरुचि असणाऱ्या व्यक्ति जगाच्या सर्व भागांतून मादाम मॉटेसरींना अंतःकरणपूर्वक अभिवादन करतील आणि त्यांच्या जीवनांतून प्रेरणा मिळवतील. अशा प्रसंगीं त्यांच्या जीवनाचा आणि विचारांचा अधिक बुद्धिपूर्वक अभ्यास झाला पाहिजे.

मादाम मॉटेसरी एक उत्तम मानव होत्या. त्यामुळें त्यांचे कित्येक भक्त काल—परिस्थितीचा विचार न करतां त्यांच्या सर्व विचारांना वेदासारखें सनातन स्वरूप देण्याचाहि प्रयत्न करीत असतात; परंतु यांत मादाम मॉटेसरींच्या आदर्शांच्या सेवेऐवजी त्यांची कुसेवाच अधिक होते असा आमचा नम्र अभिप्राय आहे. आमच्या अंधश्रद्धेमुळें मादाम मॉटेसरींना स्वर्गांतहि दुःख होईल. त्यांच्या विचारांचा बुद्धिपूर्वक विचार झाला पाहिजे, हींच त्यांच्या आत्म्याचीहि इच्छा असणार.

नूतन बाल शिक्षण संघ आणि ' शिक्षण—पत्रिका ' या दोन्हीहि संस्थांच्या प्रणेत्या मादाम मॉटेसरीच आहेत. त्यांच्या ८९ व्या शुभ जन्मदिनीं या दोन्ही संस्थांच्या वतीनें आम्हीं त्यांना मनःपूर्वक अभिवादन करतों.

—शेष नामले

शिक्षकाच्या रोजनिशींतून

(१) प्रसंगावधानी मुलें (ता. १४-८-५६)

सकाळपासून पाऊस नव्हता. माताच्या शेतांत गवत वाढलें होतें. म्हटलं चला खुरपूं या. मुलांना अशीं कामें आवडतात. कुदळी, खुरपीं घेऊन चटकन् तीं तयार झालीं. मुलगे निघाले, मुलीपण निघाल्या. पण लहान भावंडें कुठें ठेवणार? तीं नेहमींप्रमाणें कडेवरच होतीं. पाऊस नाहीं म्हणून कोणी इरलें घेतले नव्हतें कीं, सागाचें पान घेतलें नव्हतें. हो, इकडची मंडळी सागाचें मोठें पान डोक्यावर घेऊन हिंडतात. तीं त्यांची छत्री—

आम्ही शेतांत पोंचलों. कोणी काम सुरू केलें, तर कोणीं कडेला उभे राहून पहातच होतें. इतक्यांत वारा सुटला आणि हां हां म्हणतां आकाश ढगानें भरून गेलें. पावसाचे थेंबही पडूं लागले. आतां कसं करायचा-कांहीं मुली आपल्या भावंडांना घेऊन चिंचेच्या झाडाखालीं पळाल्या. तेथें जरा निवारा असतो. मुलगे आणखी कोठें कोठें पळाले. मी पावसांत भिजतच उभी होतें. इतक्यांत जवळूनच हसण्याचा आवाज आला. पहातें तर दोघी चौघी मुली जवळच्या आंब्याच्या ढोलींत एकमेकींना अगदीं चिकटून चिकटून घुसल्या आहेत. जणूं आंब्याच्या पोटांतच शिरत आहेत.

'वा! छान. पाऊस आला तर काय कराल?'

'छत्री उघडूं!' असें शहरी मुलें उत्तर देतील. आमचीं मुलें काय सांगतील—

× × ×

(२) शांतारामला पैसे हवेत. (ता. २५-९-५७)

शांताराम ६ वर्षांचा मुलगा. आई, मावशी, मामा, वडील सगळेच मिळवते. त्याला पैसे मिळविण्याची गरज नव्हती—पण शांतारामला तें पटत नव्हतें. त्याला शाळा नको. खेळ नको. काम हवें. कामाचे पैसे हवेत-आणि ते स्वतःच्या जवळ ठेवायला हवेत. आईजवळ द्यायचे नाहींत. शांतारामचा हा स्वभाव ओळखून मीं त्याला शाळेंत काम दिलें. तर काय आनंद झाला. वेळेच्या पांच मिनिटें अगोदर हजर असायचा. मध्यें दमायचा नाहीं. शाळेला सुद्धां नियमित हजर-आतां या छोट्या कामगाराला काम तरी काय द्यायचें? आणि मजुरी तरी काय द्यायची? लहान टोपली टोपलीनें मातीनें मातीची भर घालायाला सांगितलें. हातावर तीन आणे दिले ते घेऊन धूम घरीं पळाला. आपल्या कर्तृत्वाचा केवढा अभिमान त्याच्या चेहऱ्यावर तळपत होता.

× × ×

(३) हट्टी अनंता—(ता. १०-१-५८)

अनंता ८ वर्षांचा तिसरींतला मुलगा. तसा नियमितपणें शाळेंत येतो. अभ्यासही बरा आहे. पण घरांत त्याच्या दोन लहान बहिणी आहेत. त्यांना सांभाळणें हें पहिलें काम असें त्याला वाटतें. बालवाडींत त्या बहिणींना घेऊन आला तरीही त्यांच्याबरोबर खेळतच रहातो. बहिणींना बालवाडींत सोडून तूं शाळेंत जा म्हणून कितीही सांगितलें-तरी त्याला तें पटत नाहीं. आज असाच लहान बहिणींना खेळवत बालवाडीच्या आवारांतच तो बसला होता. त्याचा हात धरून मी शाळेंत घेऊन जाऊं लागलें तो कांही केल्या हलेना. 'तूं मला शाळेंत घेऊन जाऊन कुटशील' असें एकच वाक्य बोलत होता. शेवटीं मी त्याला सोडून दिलें.

घरीं पण कधीं कधीं अनंता रागावून न जेवतांच पळून शाळेंत येतो. त्यावेळीं बाप त्याला समजावयाला येतो. पण तो जाम ऐकत नाहीं. आम्ही सगळे सांगतों. 'जारे अनंता जेवून ये-!' पण अनंता ऐकत नाहीं.

त्या दिवशीं मला दुसऱ्या मुलांनीं सांगितलं कीं, 'बाप इथें गोड गोड बोलून घेऊन जातो पण घरीं नेऊन कुटतो.' तोच न्याय त्यानें मलाही लागू केला.

× × ×

(४) गवंडीकाम (ता. १६-२-५८)

बालवाडींतील मुलांच्या स्वयंपाकाच्या पाळ्या होत्या. म्हणजे हरभऱ्याची नाहींतर चवळींची उसळ करावयाची होती. शेगडी होती पण ती मुलांना आवडली नाहीं. 'आम्ही चूलच पेटवितों" त्यांनीं म्हटलं. भराभर विटा आणल्या, मांडल्या नि चूल तयार झाली. पण चुलीला वारें लागू लागलें. आतां काय करायचें? 'आम्ही भिंत बांधतों,' दिनू म्हणाला. सगळ्यांना कल्पना आवडली. झालें. कोणी विटांचे तुकडे गोळा केले. कोणी माती खणली. कोणी पाणी आणलें. कोणी चिखल तुडवला नि कोणी मोठ्या गवंड्याच्या रुबाबांत भिंत रचूं लागले. सगळी मंडळी कामामध्यें अगदीं तल्लीन होऊन गेली होतीं. वेळेचें अथवा भुकेचें कसलेंच भान त्यांना नव्हतें. आठ दिवस हें भिंत बांधण्याचें काम चालूं होतें.

— अनुताई

पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या आर्थिक जबाबदारीचा प्रश्न

मुंबई राज्यांतील पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत एकसूत्रता आणण्यासाठीं मौनी विद्यापीठाचे चिटणीस श्री. जे. पी. नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं जी इंटिग्रेशन कमिटी नेमण्यांत आली आहे, तिचें कार्य सध्या वेगांत आलें आहे. या कमिटीच्या कार्यप्रदेशांत प्राथमिक शिक्षणाचे जे विविध प्रश्न आहेत, त्यांत पूर्वप्राथमिक शिक्षणासंबंधी एकच निर्देश आहे. तो हा—पूर्वप्राथमिक शिक्षणाचे बाबतींत सरकारनें आपण होऊन किती जबाबदारी स्वीकारावी आणि त्या क्षेत्रांत काम करणाऱ्या खाजगी संस्थांना किती मदत द्यावी?—इंटिग्रेशन समितीच्या कार्यांत ज्याअर्थी या प्रश्नाचा समावेश करण्यांत आला आहे त्याअर्थी सरकार प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीबरोबर याही क्षेत्राबाबत कांहीं व्यवहार्य योजना समितीनें सुचविल्यास तिचा विचार करील अशीच सर्वांची अपेक्षा आहे. त्या दृष्टीनें पूर्व-प्राथमिक शिक्षणासंबंधीं सरकारनें सध्यांच्या परिस्थितींत किती जबाबदारी कशा तऱ्हेनें घ्यावी यासंबंधीं माझें व्यक्तिगत मत या लेखाचेद्वारें प्रकट करीत आहे.

मुंबई राज्यांतील पूर्वप्राथमिक शिक्षण-संस्थांना मिळणारें सहाय्य


पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत ज्यांना सरकारी सहाय्य मिळतें अशा दोन प्रकारच्या संस्था आहेत. पूर्वप्राथमिक शाळा आणि पूर्वप्राथमिक प्रशिक्षण संस्था (Pre-Primary Teachers' Training Colleges) या दोनही प्रकारच्या संस्था या राज्यांत केवळ लोकप्रयत्नानें स्थापन होऊन त्यांचा प्रचारही लोकांच्याच प्रयत्नानें दिवसेंदिवस वाढत चालला आहे. या संस्थांचें रजिस्ट्रेशन करणें, त्यांचें निरीक्षण करणें व त्यांना मान्यता देऊन आर्थिक सहाय्यता देणें हीं कामें सरकारनें अंगिकारलीं आहेत. परंतु या जबाबदारींत या प्रकारच्या संस्थांच्या संख्येच्या वाढीच्या प्रमाणांत सरकार या विभागावर खर्च करण्यास तयार नसल्यामुळें सरकारी मदतीच्या धोरणाला कोणतेंच धोरण राहिलेलें नाहीं. कदाचित् यामुळेंच सरकारनें या प्रश्नाचा विचार करण्याचें काम मुख्यत्वें प्राथमिक शिक्षणासाठीं योजलेल्या समितीवर सोंपवलेलें दिसतें.

पूर्वप्राथमिक शिक्षणाचा आवश्यक विशेष खर्च

पूर्वप्राथमिक शिक्षण प्राथमिक शिक्षणाचे मानानें अधिक खर्चाचें आहे. पण तें अधिक खर्चाचें असलें तरी सध्या आपण ज्याला प्राथमिक शिक्षण म्हणतों त्या शिक्षणापेक्षां तें व्यक्तीच्या जीवनाच्या दृष्टीने आणि समाजाच्या दृष्टीनें अधिक आवश्यक आहे, ही गोष्ट आतां अस्पष्ट राहूं शकत नाही. मानवी विकासासंबंधीं सामान्य कल्पना असणाऱ्या पालकांना तें कळून चुकलें आहे. प्रगतिशील सरकारलाही तें आज ना उद्यां समजून घ्यावेंच लागेल. परंतु आज या शिक्षणाला प्राथमिक शिक्षणाइतकें महत्व द्यायला सरकार तयार नाहीं. ही भूमिका लक्षांत घेऊनच सध्या पूर्वप्राथमिक शिक्षणाला सरकारनें कितपत मदत द्यावी या गोष्टीचा विचार आपल्याला करावा लागेल.

प्राथमिक शिक्षणाचे मानानें पूर्वप्राथमिक शिक्षणाचा खर्च प्रत्येक बालकाच्या दरडोई दोन ते अडीच पट अधिक येतो ही वस्तुस्थिति आहे. तीन ते सहा वर्षांच्या बालकांना शिक्षणासाठीं जागा प्राथमिक वयाच्या मुलांपेक्षां दुप्पट मोठी पाहिजे. त्याचप्रमाणें या शाळेंत एक शिक्षिका २० ते २५ पेक्षां अधिक बालकांची जबाबदारी घेऊं शकत नसल्यानें बालकाच्या दरडोई शिक्षक-खर्चहि प्राथमिक शाळेपेक्षा दुप्पट होतो. या विभागांतील शिक्षण व्यक्तिगत आणि क्रियाकेंद्री असल्यानें साधनसामग्रीचा खर्चहि अधिक असतो. त्याचप्रमाणें या वयाच्या शारीरिक आणि शैक्षणिक गरजा लक्षांत घ्यावयाच्या म्हणजे त्यांना मधलें खाणेंहि शाळेंत देणें जरूरीचें होतें. या सर्व

हजारों कुटुंबांतून आतां अत्यंत खुषीनें
वापरलें जात आहे



* गळणारे केंस बंद करतें व केंसांची वाढ करतें.
* मेंदूला शीतलता आणतें व केंस तुकतुकीत बनवितें.
* यशस्वी प्रयोगांनंतरच जनतेसमोर ठेवलें गेलें आहे.

लोमा प्रॉडक्टसची एक अनमोल कृति

: सोल एजन्ट्स :

एम्. एम्. खंभातवाला, रायपूर, अहमदाबाद

एजन्ट्स : स्री. दरोत्तम अँड कं.,
मंगलदास रोड, मुंबई-२.
टेलिफोन नं. ३०५७५

M.P.S

खर्चामुळें पूर्वप्राथमिक शिक्षणाचा खर्च सर्वसामान्य शाळेला बालकाच्या दरडोई दरमहा आठ ते दहा रुपये सहज येतो. जेथें हा खर्च यापेक्षां कमी होतो तेथें शिक्षकांना योग्य वेतन नसतें किंवा या शिक्षणाबाबतचे योग्य आदर्श–संकेत पाळले जात नसतात असें समजावें. पूर्वप्राथमिक शाळेच्या या खर्चामुळें ह्या शाळा आतांपर्यंत मुख्यत्वें शहरी विभागांतच वाढल्या आहेत.

अशा शाळांच्या खर्चांत सरकारनें किती भाग उचलावा, स्थानिक संस्थांनीं किती आणि पालकांनीं किती हा प्रश्न समाज-केंद्री राज्याच्या दृष्टिकोणांतूनही तपासण्यांत येतो. समाजकेन्द्री राज्यांत सरकारी मदतीचा ओघ सर्वप्रथम, जेथें खरी गरज आहे तेथेंच पोहोंचला पाहिजे. जुन्या मुंबई राज्यांत सध्यां ज्या शाळा दोन रुपयेपर्यंत मासिक फी घेतात, त्या शाळांना सरकार मंजूर खर्चाच्या २५% इतकी मदत देतें, परंतु हें मदतीचें सरकारी धोरण इतकें अव्यवहार्य ठरलें कीं त्यामुळें सरकारी मान्यतेची किंमत कमी होऊन अमान्य पूर्वप्राथमिक शाळांची वाढ अत्यंत वेगानें झाली. यामुळें सरकार पेचांत पडल्यासारखें झालें. शाळांना फी—वाढीची परवानगी द्यावी तर ह्या शाळांचा फायदा गरीब पालकांच्या बालकांना नाकारल्यासारखें होतें. म्हणून सरकारनें ज्या शाळांना मदत द्यायची, त्या शाळांवर फीचें नियंत्रण घातलें आहे. परंतु फी–नियंत्रणाबरोबर सरकारनें या शाळांच्या खर्चाची वास्तविक गरज लक्षांत घेऊन त्या मानानें या संस्थांची आर्थिक जबाबदारी उचलायला पाहिजे होती. तें सरकारला न करतां आल्यानें या संस्थांच्या शैक्षणिक धोरणाचा विचका करून टाकल्यासारखें झालें आहे.

सरकारनें हा बोजा स्थानिक संस्थांवर टाकावा का?

एका बाजूनें या शिक्षणाची फी वाढूं देणें सरकारला योग्य वाटत नाहीं व दुसऱ्या बाजूनें या शिक्षणाच्या खर्चाच्या वाट्यांत आपला हिस्सा वाढविण्याचाही सरकारचा विचार होत नाहीं; यामुळें या शिक्षणाची बरीचशी जबाबदारी स्थानिक संस्थांवर टाकावी अशी एक विचारधारा सुरू झाली आहे. परंतु स्थानिक संस्थांवर या प्रश्नाची फार मोठी जबाबदारी टाकणें उचित होणार नाहीं. स्थानिक संस्थांनाही आपापल्या आर्थिक मर्यादा आणि वाढते प्रश्न आहेत. हा सर्व विचार केल्यास सरकारनें स्वतःच थोडी अधिक जबाबदारी उचलण्याची तयारी दाखवून स्थानिक संस्था आणि पालकांना प्रोत्साहन देणें जरुरीचें वाटतें.

पूर्वप्राथमिक संस्थांना जर परिणामकारक मदत द्यावयाची असेल, तर सरकारनें या संस्थांना द्यावयाच्या मदतीचें धोरण शहरांत ५० टक्क्यापर्यंत आणि ग्रामीण विभागांत ७५ टक्केपर्यंत नेणें जरुरीचें आहे. याचा अर्थ दर बालकाला दरमहा जर आठ रुपये खर्च येतो असें धरलें, तर त्यातील शहरी विभागांत ४ रुपये व ग्रामीण विभागांत ६ रुपये सरकारनें दिले पाहिजेत. एवढ्या मदतीनेंदेखील पूर्वप्राथमिक शिक्षणाचा प्रश्न सुटूं शकणार नाहीं, असें आम्हाला वाटतें. कारण आपलें दारिद्र्य अपार आहे. आपल्या येथील ग्रामीण आणि शहरांतील मागासलेल्या भागांत पालकांकडून बालकाचे दरडोई चार आणि दोन रुपये तरी कसे मिळणार? म्हणून अशा पालकांच्या मदतीला सरकारप्रमाणेंच स्थानिक संस्थांची मदत घेणें उचित ठरेल. स्थानिक संस्थांना ही मदत करतां यावी या दृष्टीनें कायदेशीर सोय करण्यांत आली पाहिजे. स्थानिक संस्थांनीं आपापल्या गांवच्या विविध वस्तीच्या गरजा लक्षांत घेऊन खर्चाचा भार उचलला पाहिजे. जेथें फारच जरूर असेल तेथें सर्वच्या सर्व खर्च उचलण्याची तयारी देखील स्थानिक संस्थांनीं दाखविली पाहिजे. सरकारनें आम्हीं वर सुचविली आहे येवढी पूर्वप्राथमिक शिक्षणाची जबाबदारी न स्वीकारली, तर स्थानिक संस्थांना हें नवीन कार्य अंगिकारण्यास जरूर ती स्फूर्ति येऊं शकणार नाहीं, म्हणून सरकारनें स्वतःच्या उदाहरणानेंच याबाबत पुढाकार घेतला पाहिजे.

शहरांत सर्व खर्च पालकांवर टाकतां येईल का?

समाज–केन्द्री राज्याच्या मदतीचा ओघ सर्वप्रथम जे गरजू आहेत, त्यांच्याकडेच वळविला पाहिजे; हें राज्यनीतीचें धोरण मानलें तरीदेखील शहरांतील बालमंदिरांना मदत नाकारणें न्यायाचें होणार नाहीं. शहरांतील व्यक्तिगत आर्थिक उत्पन्न अधिक असलें तरी शहरांत राहणारांना तेथील अस्वाभाविक वातावरणांत विशिष्ट प्रकारचे अधीकीचे खर्च करावे लागतात. शहरांत मध्यम आणि कनिष्ठ उत्पन्न असणारा वर्ग फार मोठा असतो. त्यांचें जीवन अनेक प्रकारें अधिक तणातणीचें असतें. या लोकांचा विचार मुळींच न करतां त्यांच्या मुलांच्या पू. प्रा. शिक्षणाच्या योजनेंत सरकार सहभागी न बनलें तर शहरांत पूर्वप्राथमिक शिक्षण हा एक अनिष्ट स्वरूपाचा धंदा बनून त्या धंद्यांत बालकांचेंच बलिदान होईल, अशा प्रकारची स्थिति चालू आहे. शहरांतला हा शिक्षणाचा धंदा करणारा वर्ग आज सरकारची किंवा कोणाची पर्वा न करतां पालकांच्या लाचारीचा व अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडीत आहे. हें लुबाडणें असेंच चालू राहील. परंतु यांत पालक लुबाडले जात आहेत, यापेक्षां बालकांवर जो अन्याय होत आहे, ही गोष्ट सरकारनें लक्षांत घेणें जरूरीचें आहे.

दरमहा पांच रुपयांपेक्षां अधिक फी घेणाऱ्या संस्थांना सरकारनें मदत न देण्याचें धोरण ठरविलें, तर त्यामुळें अधिक फी घेणाऱ्या शाळांच्या धोरणांत कांहींच फीविषयक फेरफार होण्याचें कारण राहाणार नाहीं. सरकारी मदतीकरितां या शाळा-आपल्या फीचें धोरण खालीं आणून सरकारपुढें नवीन प्रश्न

उपस्थित करतील असें वाटत नाहीं. म्हणून पूर्वप्राथमिक शाळा-संचालनाच्या जबाबदारींत सध्यांची परिस्थिति लक्षांत घेतां आम्ही ज्या सूचना केल्या आहेत, त्याचा विचार करावा, अशी आमची संकलन समितीला आणि सरकारला अत्यंत कळकळीची विनंति आहे.

प्रशिक्षण संस्थांना द्यावयाच्या मदतीचा प्रश्न

मुंबई राज्यांत एकूण पंधरा बालअध्यापन मंदिरें आहेत. पूर्वप्राथमिक शिक्षणसंस्थांची सध्याची शिक्षकांची गरज लक्षांत घेतां एवढ्या संस्थांची मुंबई राज्याला जरूर आहे का ? या संस्थांची जरूर नसेल तर मग सरकारनें या संस्थांची वाढ कां थांबवूं नये ? निदान सरकारी पैसा तरी बिनजरूरी गोष्टीवर खर्च होऊं नये. नियोजनांच्या या दिवसांत असा विचार केला जाणें स्वाभाविक वाटतें. परंतु या बाबतींत थोडा खोलवर विचार झाल्यास या बाबतींत आपल्या प्रश्नांची भूमिकाच बदलून जाईल. पूर्वप्राथमिक शिक्षण ही गोष्ट जरूरीची कीं बिनजरूरीची याविषयीं दुमत नाहीं. पहिल्या पंचवार्षिक योजनेतहीं अशी नोंद घेण्यांत आली आहे कीं आपल्या देशांतील अज्ञान आणि दारिद्र्य या गोष्टी लक्षांत घेतां इतर देशांपेक्षांही येथें पूर्वप्राथमिक शिक्षण देणें अत्यंत जरूरीचें आहे. नियोजन मंडळाच्याच योजनेंत या शिक्षणाविषयीं या प्रकारचे उद्‌गार असल्यानें या शिक्षणाच्या आवश्यकतेविषयीं आणखी पुरावा पुढें आणण्याची जरुर नाहीं. अशा जरुरीच्या विषयाबाबत आर्थिक मर्यादेमुळें सरकारला विशेष कांहीं करतां येत नाहीं हीहि गोष्ट आपण मान्य केली पाहिजे. परंतु जी गोष्ट सरकारला आवश्यक वाटते ती गोष्ट लोकांना सरकारपेक्षाही अधिक आवश्यक वाटून जर या बाबतींत त्यांनीं स्वप्रयत्नानें प्रगति केली असेल तर सरकारनें या गोष्टीची नोंद घेणें अधिक जरूरीचें आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षण लोकप्रयत्नानें सरकारच्या विशेष मदतीच्या अभावीं मुंबई राज्यांत पसरत चाललें आहे, या गोष्टीची दखल घेऊन या प्रयत्नाला शक्य होईल ती साथच सरकारनें देणें इष्ट आहे. सरकारी मदतीच्या अभावीं या राज्यांत एकूण १५०० पूर्वप्राथमिक संस्था (रजिस्टर्ड व अन-रजिस्टर्ड) आणि १५ प्रशिक्षण संस्था स्थापन झाल्या आहेत. या संस्थांपैकीं पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांना सरकारी मदत इतकी अल्प आहे, कीं त्यामुळें या मदतीचें आकर्षण राहिलेलें नाहीं. प्रशिक्षण संस्थांना सरकारी मदत भरीव स्वरूपाची मिळते हें खरें आहे. सामान्यतः या संस्थांच्या मंजुर खर्चावर ५० टक्के ही मदत मिळत असल्यानें ह्या प्रशिक्षण संस्था जिवंत राहूं शकल्या आहेत. ही सरकारी मदत मिळाली नसती तर ह्या संस्थांची वाढ झाली नसती. पण याचा अर्थ मात्र असा नाहीं कीं या संस्थांना जी कांहीं मदत मिळते ती इतकी आकर्षक आहे, कीं त्यामुळेंच या संस्थांची वाढ झालेली आहे. या पंधराच्या पंधराही प्रशिक्षण संस्था नुकसान सोसून किंवा समाजाकडे भीक मागूनच आपला खर्च आजही भागवीत आहेत. यांत एकही संस्था नफा करीत नाहीं. लोकांना या संस्थांची गरज वाढत्या प्रमाणांत वाटूं लागली आहे. म्हणूनच या संस्थांची आणि त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढूं लागली आहे.

सरकारी नियोजनांत ही वाढ होऊं देण्याला पैसा नसला तरी ही वाढ एक मौलिक महत्वाच्या क्षेत्राच्या विकासासंबंधींची आहे. नियोजनांत या गोष्टीला स्थान दिलेलें नसलें तरी या संस्थांची लोकप्रियता आणि सामाजिक नवी गरज लक्षांत घेऊन या लोकप्रयत्नाला आपल्या नियोजनांत जागा करून देणें हें कल्याणकारी राज्याचें कर्तव्यच ठरतें. प्रशिक्षण संस्था चालवणें म्हणजे नफा मिळवून देणारा उद्योग नाहीं. समाजहिताची भावना व संघबळ असल्याखेरीज ह्या संस्था निघूं शकत नाहींत. अशा संस्थांतून जे शिक्षक तयार होतात त्यांना येथून पास झाल्याबरोबर आपल्या नोकऱ्या तयार नाहींत; आपल्याला कांहींही तयार मिळणार नाहीं, याची जाणीव असते आणि तरीही ते येथें प्रशिक्षण घेण्यासाठीं येतात. यांत स्त्रियांच्या बेकारीचें कारण आहे असें मानलें तरी त्या येथें जें कांहीं शिकतात त्याचा उपयोग त्यांना व्यवसायांत नाहीं, तर स्वतःच्या जीवनांत होताना दिसतो, हेंही तितकेंच खरें आहे. यांतून प्रशिक्षित झालेल्या ४० टक्के विद्यार्थिनी तरी सरकारच्या मदतीशिवाय चाललेल्या पूर्वप्राथमिक शाळांना किंवा नवीन निघणाऱ्या शाळांना मिळतात असें असलें तरी या प्रकारच्या प्रशिक्षण संस्थांची वाढ होत राहणें हें जरूरीचें आहे. पूर्वप्राथमिक शाळांच्या प्रचाराची योजना सरकारला स्वतःला घेतां न आली तरी प्रशिक्षण संस्थांना मदत करण्याच्या सरकारच्या आजवरच्या धोरणानें पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रचाराला मदत झाली आहे हें निर्विवाद आहे. पूर्वप्राथमिक शिक्षणाचा प्रचार सरकार करूं न शकलें तरी प्रशिक्षण संस्थांना दिलेल्या प्रोत्साहनामुळें पूर्वप्राथमिक शिक्षणाचा प्रचार आपोआप घडून येत आहे, म्हणून सरकारनें प्रशिक्षण संस्थांच्या वास्तविक गरजांचा विचार करून त्यांनाही कल्याणकारी राज्याच्या उभारणीच्या दृष्टीने अधिक मदत देणें जरूरीचें आहे. ह्या संस्थांना बेसिक ट्रेनिंग कॉलेजप्रमाणेंच मंजूर खर्चाच्या ६६% मदत मिळणें जरूरीचें आहे. म्हणून आमच्या सूचनांचा विचार संकलन समिति व सरकारकडून योग्यप्रकारें होईल अशी अपेक्षा करूं या.

—नामले

पालकांचे विचार-पत्रव्यवहार

बालशिक्षणाचा विचका

['शिक्षण-पत्रिके'त पालकांचीं मतें व्यक्त व्हावीं, त्यावर पालकांनीं चर्चा करावी या उद्देशानें पालकांसाठीं सुरू केलेल्या या विभागांत आम्ही शिशुविहारच्या एका पालक मातेचे विचार येथें प्रस्तुत करीत आहों. बालमंदिरांत आपलीं मुलें पाठवणाऱ्या पालकांनीं बालमंदिरांत काय चालतें आहे हें मुलांच्या कल्याणाच्या दृष्टीनें न पाहिलें, तर दर महिन्याला फी भरून आपल्या बालकाच्या विकासाला धोका पोहोंचण्याचा संभव आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. या पालकाप्रमाणें इतर पालकांनीही बालशिक्षण संस्थांबद्दल आपले अनुभव-विचार मांडल्यास आम्हीं त्यांनाही यथाशक्य स्थान देऊं.

'शिक्षण-पत्रिका' पालकाभिमुख करण्याच्या दृष्टीनें आम्ही हा जो नवीन विभाग सुरू केला आहे तो उपयुक्त वाटतो का? त्यांत काय काय हवें वगैरे सूचना पालकांनीं केल्यास आम्ही पालकांना पाहिजे ती माहिती देण्याचा प्रयत्न करूं.—सं.]

मुंबईत कोणत्याही ठिकाणीं जिकडे तिकडे बालमंदिरांचा सुळसुळाट झालेला तुमच्या दृष्टीस पडेल. पण या बालमंदिरांचा कारभार पाहिल्यास त्यांना बालमंदिरें म्हणावें कीं नाहीं हा प्रश्न पडतो. एकेका खोलींत न मावतील इतकीं बालकें भरून व त्यांच्या पालकाकडून दोन-तीन रुपये फी घेऊन चार गाणी-गोष्टी त्यांना शिकवून त्या त्यांच्याकडून पाठ करून घेतल्या व पाटीवर अक्षरें-अंक शिकवले कीं झाली लहान मुलांची शाळा ! बालमंदिरें बालकांच्या सर्वांगीण विकासासाठीं असतात, तीं त्याच्या अक्षर-शिक्षणावर भर देण्यासाठीं नसतात ही गोष्ट या पालक-चालकांच्या गावींही नसते. बालकाला स्वच्छता व्यवस्था, स्वावलंबन वगैरे चांगल्या संवयी लावणें, त्यांच्या शारिरीक व मानसिक बौद्धिक विकासाकडे लक्ष देणें व त्यांचें व्यक्तित्व आदर्श बनविणें हें बालमंदिराचें उद्दिष्ट बाजूलाच रहातें. केवळ प्राथमिक शाळेंत ६-७ वर्षांपर्यंत प्रवेश मिळत नाहीं म्हणून त्यापूर्वी त्यांना लिहावाचायला शिकवून घाईनें त्यांना १४ व्या १५ व्या वर्षीं मॅट्रिक करण्याच्या सोईसाठींच हीं बालमंदिरें असतात असा सामान्य पालकांचा समज असतो. अशिक्षित नाहीं, तर सुशिक्षित पालकसुद्धा आपलें मूल १४ व्या १५ व्या वर्षीं मॅट्रिक करण्यासाठीं धडपडतांना दिसतात. याचा परिणाम असा होतो कीं धंदेवाईक चालक, पालकांना खूष ठेवण्यासाठीं व आपल्या शाळेंत मुलांची भरती करण्यासाठीं या छोट्या छोट्या बालकांना मिळेल त्या खोलींत कोंडून तास दीड तास जबरदस्तीनें लिहिण्या वाचण्यास शिकवतात.

माझ्या शेजारच्या खोलींतच एका बाईनें अशा प्रकारचें बालमंदीर गेल्या दसऱ्याला सुरू केलें आहे. या शाळेचा कार्यक्रम पाहून तुम्ही थक्कच व्हाल. ही बाई पालकांना शाळेंत नाव घालायला आले कीं सांगते ' मी एक वर्षांत पहिलीची तयारी करून देईन. घाबरूं नका. अहो मोठ्या शाळांत काय ? फी जास्त घेतात तीं घेतात आणि नुसतं खेळायला देतात. लिहायवाचायला शिकवीत नाहींत.' झालें, पालक एकदम खुष ! या बाईला दुसऱ्या कोणत्याच साधनाचा काडीचाही खर्च नाहीं. म्हणून दोन रुपये फी कांहीं कमी नाहीं. पालक म्हणतात २ रुपयांत पहिलीची तयारी होणार मग काय वाईट आहे ? उत्तमच ! झालें, या शाळेंत आतां तीस पस्तीस मुलें झालीं आहेत. घरबसल्या दोन तासांत या बाईला ६०-७० रुपये मिळतात. आहे कीं नाहीं उत्तम धंदा ? साहजिकच अशा मुळींच साधनें नसलेल्या शाळेंत मुलें जायला तयार नसतात, तर या रडणाऱ्या मुलांची समजूत घालणाऱ्या पालकांची बोलणीं तर ऐकण्यासारखीं असतात. एक मुलगा त्या दिवशीं शाळेंत आल्यावर घरीं जाण्यासाठीं रडूं लागला त्याला अभ्यास करायचा नव्हता. तर त्याची आई त्याला सांगूं लागली ' अरे तुला लवकर डॉक्टर व्हायचं आहे ना ? मग ताई सांगतील तो अभ्यास केला पाहिजे तूं. ताईनीं सांगितलेला अभ्यास कर म्हणजे तुला पुढच्या वर्षी दुसरींत बसायला मिळेल. दुसरी एक बाई आपल्या मुलीला घेऊन आली व म्हणाली 'ताई, ही घरीं कांहीं अभ्यास करीत नाहीं. हिला चांगला मार द्या व काढून द्या पाटीवर. काढलं नाहीं, तर खाऊच डबा खायला देऊ नका.'

स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांना
बफ करण्यासाठीं 'जेकास'चें फायबर
पॉलिश ब्रश वापरा
: बनविणार :
जेकास ब्रश-वेअर
श्री लक्ष्मी वुलन मिल इस्टेट,
हेन्स रोड, महालक्ष्मी, मुंबई ११

ताई तर कांहीं विचारूंच नका ! पालकाच्या या वृत्तीचा तिनें फायदा घेतला आहे.


आतां या शाळेचा कार्यक्रम पहा हं. शाळेची वेळ दुपारीं १ ते ३ आहे. प्रथम प्रार्थना होते, नंतर एक तास म्हणजे दोन-पर्यंत बडबडगीतें व गाणीं शिकवते. गाणें बालकांच्या मनोरंजनासाठीं असतें हें या बाईच्या गावींही नाहीं. त्या गाण्यांना चाल नाहीं, ताल नाहीं नि कांहीं नाहीं. आपण एकेक ओळ शिकवायची ती प्रत्येकानें म्हटली पाहिजे. जो म्हणणार नाहीं त्याला दम मिळतो. रोज रोज म्हणून मुलांचीं गाणीं पाठ होतात व मग आपण कांहींतरी शिकविलें हें पालकांच्या लक्षांत येतें. कांहीं वेळां गोष्टी सांगते तर कांहीं वेळां पुस्तकांतल्या गोष्टी वाचूनच दाखविते. त्या गोष्टींवर प्रश्न विचारते. श्लोक शिकवते व त्यांचा अर्थ सांगते. बिचाऱ्या मुलांना कांहीं समजण्यासारखें नसतें, त्यामुळे जर त्यांनीं दुर्लक्ष केला तर त्यांना दम देते, 'मी काय सांगते तिकडे लक्ष द्यायचं कळत नाहीं ?' वगैरे. त्यानंतर त्यांना घरून करून आणायला सांगितलेला अभ्यास तपासते. कोणी तो करून आणलेला नसल्यास त्यांना दम देते व कांहींतरी बोलते. प्राथमिक शाळेंतील मुलांनाहीं इतकें कडक वागवीत नसतील. थोडासा आवाज झाला तर 'हाताची घडी, तोंडावर बोट' असा इषारा मिळतो. या मुलांना 'हंसायचं नाहीं, बोलायचं नाहीं, आजूबाजूच्या कोणत्याच वस्तूला हात लावायचा नाहीं' अशी ताकीद मधून मधून दिली जाते. मोकळे खेळायला तर त्यांना कधींच सोडत नाहीं. आपल्या मुलांची एक ट्रायसिकल ती प्रथम प्रथम थोडीं मुलें होतीं तेव्हां त्यांना मधून मधून द्यायची, पण आतां मुलें वाढलीं तीं सायकलची वाट लावतील म्हणून तीहि आतां बंद करून ठेवली आहे. मणी ओवणें व पाणी भरणें हीं दोनच साधनें तिनें ठेवलीं आहेत. त्यांवरसुद्धां अभ्यासापुढें मुलांना खेळायला मिळत नाहीं. अक्षरें चित्रपद्धतीनें शिकविल्यामुळें गवतांतला ग, मक्यांतला म याप्रमाणें मुलें सारखीं म्हणत असतात. तीनला मुलें घरून आणलेला खाऊचा डबा खातात व ३॥ ला घरीं जातात. काय म्हणावं या पालक-बालकांना ?

बालशिक्षणाचा विचका उडवून पसे मिळविण्याचा हा धंदा अतिशय उत्तम रितीनें मुंबईत ठिकठिकाणीं चालू आहे. हा धंदा बंद पाडल्याशिवाय आपल्या बालकांचें कल्याण होणार नाहीं. ज्या शिक्षिका अध्यापन मंदिरांतून परीक्षा पास होऊन बाहेर पडतात त्यांना अशाच संस्थातून काम करावें लागतें. त्यांनासुद्धां आपल्या मताप्रमाणें वागणें अशक्य होतें. कालाच्या प्रवाहांत सामावून जाऊन त्यांनाही पालकांना संतुष्ट करण्याचा हा धंदा करावा लागतो. त्यांना स्वतंत्र आदर्श शाळा काढतां येतील पण पैसा खर्च करून काढलेल्या त्यांच्या शाळा वरील पहिलीची तयारी करून देणाऱ्या शाळांपुढें चालणें शक्य नाहीं. त्यांचा खर्च केलेला पैसा फुकट जाण्याचा संभव फार. अशा शाळा काढायला सरकारकडून पैशाची मदत मिळणें अशक्य. म्हणून अशा शाळा काढायच्या भानगडींत कोणी पडत नाहीं.

बालशिक्षणाची ही दुर्दशा आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षाला किती विघातक आहे हें लक्षांत घेऊन बालशिक्षणप्रेमी बालशिक्षणतज्ञांनीं या बाबतींत उपाययोजना सरकारकडून करवून घेण्याची अतिशय जरूरी आहे. पाश्चात्य देशांप्रमाणें आपल्या देशांतील कोणत्याही क्षेत्रांतील प्रगतीसाठीं बालमंदिरांची सुधारणा झालीच पाहिजे.

—पालक-माता

———



विकासवाडी वृत्त

कोसबाड–ऑगस्ट १९५८

वनमहोत्सवः–दिनांक १७–७–५८ रोजीं दोन्ही अध्यापन मंदिरांच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी वनमहोत्सव थाटानें साजरा केला. करंज, काजू, फणस, अशोक अशीं झाडें योग्य ठिकाणी लावलीं. एक औषधी बगीचाही केला आहे. त्यांत तुळस, कोरफड, अडुळसा, गवती चहा, हीं प्रामुख्यानें आहेत.

श्रमदानः– दिनांक ८–७–५८ रोजीं विकासवाडी अध्यापन मंदिर विद्यार्थीबधूंनीं भाताच्या तीन खाचरांत स्वतःच्या सर्व प्रयत्नांनीं रोपणी केली.

दिनांक १६-७-५८ रोजीं अध्यापन मंदिराच्या भगिनींनी त्याचप्रमाणें दोन खाचरांमध्यें रोपणी केली.

शाळेच्या छोट्या विद्यार्थ्यांनींही एक दिवस अर्ध्या खाचरांत रोपणी केली.

टिळक जयंति सप्ताह : दिनांक २३-७-५८ ते १-८-५८ पर्यंत टिळक जयंति सप्ताह मोठ्या उत्साहानें व गांभीर्यानें पार पडला. लोकमान्य टिळकांच्या चरित्राविषयीं व्याख्यानें, त्यांच्या विशेष आठवणी, त्यांच्यावरील भूपाळी वगैरे कार्यक्रम झाले. श्रद्धेय श्री. कृ. म. चित्रे यांच्या हस्तें ह्या सप्ताहाचा समारोप झाला.

वैद्यकीय मदतः—गेला महिनाभर आदिवासी मंडळी आवणीच्या कामामध्यें गुंतली होती. त्यावेळीं त्यांना जेवायलाहि फुरसत नव्हती. मग औषधपाण्यासाठीं येणें लांबच. पण आतां कामें संपत आलीं आहेत. पाहतात तो पुष्कळांना आंव आणि जुलाब या दुखण्यांनीं पछाडलें आहे. सेविका श्री. रमाबाई पाड्यावर जाऊन लोकांना औषधपाणी देत आहेत.

लोकसंपर्कः—आवणीच्या कामामुळें शाळा–बालवाडी प्रत्यक्ष बंद आहे. पण मुलांची व पालकांची ओळख करून घेण्याचे कार्यकर्त्यांचे प्रयत्न चालू आहेत. दुपारच्यावेळी कुरणामध्यें मुलें गुरें चारीत असतात तेव्हां अथवा आपल्या आदीच लहानशा भांवंडाना खेळवीत झोपडीमध्यें बसलेलीं असतात अशावेळीं शिक्षक त्यांना भेटतात. गप्पागोष्टी, खेळ वगैरेचें कार्यक्रम होतात. त्यामुळें मुलांची गट्टी वाढली आहे.

आश्रमशाळा : मुंबई राज्यांत एकूण ३० आश्रमशाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत. अशा प्रकारची एक शाळा कोसबाड येथें गोखले एज्युकेशन सोसायटीनें नुकतीच सुरू केली असून तिचें उद्घाटन श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या हस्तें मोठ्या उत्साहाच्या वातावरणांत करण्यांत आलें

—अनुताई

नूतन बालशिक्षण आणि संघ समाचार

मुंबई : नू. बा. शि. संघाच्या व्यवस्थापक आणि नियंत्रण मंडळाच्या सभा रविवार दिनांक ७ सप्टेंबर १९५८ रोजीं अहमदाबाद येथें योजण्यांत आल्याचें समजतें.

बाल अध्यापन समाचार

गेल्या जुलैमधें मुंबई येथें योजलेल्या बालअध्यापन चर्चा परिषदेंत जे ठराव करण्यांत आले ते शिक्षण खात्याकडे पाठविण्यांत आले होते. या ठरावांचा शिक्षणाधिकाऱ्यांनीं सहानुभूतीपूर्वक विचार केला असून पुढीलप्रमाणें निर्णय घेण्यांत आलाः—

१. १९५८ पर्यंत पूर्वप्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र परीक्षेंत नापास झालेल्या विद्यार्थ्यांची १९५९ मध्यें जुन्या अभ्यासक्रमाच्या आधारें एक शेवटची परीक्षा सरकारतर्फे घेतली जाईल. १९५९ नंतर जुन्या शिक्षणक्रमाप्रमाणें परीक्षा घेतली जाणार नाहीं. सबब सर्व अध्यापन संस्थांनीं आपापल्या नापास झालेल्या परंतु परीक्षेला बसण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना तसें कळवावें.

२. १९५७ च्या जूनमध्यें ज्यांना अध्यापन संस्थेंत दोन वर्षांच्या शिक्षणक्रमांत प्रवेश मिळाला व ज्यांना १९५९ सालीं परीक्षेला बसावयाचें आहे त्यांना जुन्या अभ्यासक्रमावर किंवा नवीन अभ्यासक्रमावर आधारलेल्या परीक्षेला त्यांच्या इच्छेप्रमाणें बसण्याची सवलत ठेवण्यांत आली आहे. या विद्यार्थ्यांपैकीं ज्यांना नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें (१) बाल मानसशास्त्र, (२) शैक्षणिक सिद्धान्त आणि कार्यपद्धति, (३) शालेय व्यवस्था व बाल आरोग्य, (४) पूर्वप्राथमिक शिक्षणाचा इतिहास व प्रचलित शैक्षणिक प्रश्न. या चार विषयांना बसावयाचें असेल आणि जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणें (१) भाषा पेपर १ व २ आणि (२) इतिहास–भूगोल या विषयांना बसावयाचें असेल त्यांना त्याप्रमाणें करतां येईल. अध्यापन संस्थांनीं या सवलतीची नोंद घ्यावी.

३. हस्तव्यवसायाची परीक्षा व्यावहारिक परीक्षेबरोबरच स्थानिक स्वरूपाची घेण्यांत येईल.

सांगली : दिनांक २६ जुलै रोजीं येथील बालशिक्षण मंडळानें बाल अध्यापन मंदिराचा उद्घाटन समारंभ अत्यंत उत्साहानें साजरा केला. या प्रसंगीं हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब व हर हायनेस सौ. राणीसाहेब आणि नू. बा. शि. संघ चिटणीस श्री. नामले उपस्थित होते. पहिल्याच वर्षी या अध्यापन मंदिरांत विद्यार्थिनींची संख्या ६० चे वर दाखल झाली आहे.

अनुभवाचे बोल !

वृत्तपत्रें, साप्ताहिकें, डॉक्टर, वैद्य आणि मुंबईकर यांनी एकमुखानें ज्याची वाखाणणी केली आहे तें

'विको'

अमला – ब्राह्मी

कम्पाउन्ड

आतां सर्वत्र मिळतें

शुद्ध खोबरेल तेलाचें स्वस्त व उत्कृष्ट

आवळा-ब्राह्मी-तेल तयार करण्याची सोपी रीत

आपण स्वत: तयार केलेलें आवळा–ब्राह्मी तेल खात्रीचें व आल्हाददायक होत असतां बाजारांतील महाग व भेसळ तेलें कां वापरतां ?

आणि तें करण्यास तरी किती सोपें आहे ! तेल गरम करावयास नको, उकळावयास नको, कांहीं–कांहीं करावयास नको. दगदग नाहीं, त्रास नाहीं.

बाजारांतून १ औंस विको आवळा–ब्राह्मी कंपाऊंड [विको लॅबोरेटोरीज, जयेंद्र महाल, दादर, टी. टी, मुंबई नं, १४] आणा व १ पौंड (-॥- शेर) खोबरेल तेल शिशींत घेऊन त्यांत -।- औंस विको आंवळा–ब्राह्मी–कंपाऊंड टाका व शिशी हलवा कीं झालेंच आवळा–ब्राह्मी–तेल तयार. आहे कीं नाहीं सोपी रीत ?

पहा ना ! रंग, वास, गुण सर्व कांहीं त्यांत तुम्हांला दिसून येईल. केंस गळण्याचे व पिकण्याचे थांबतील. मेंदू शांत राहील. त्यामुळें डोळ्यांस थंडावा येईल. झोंप शांत लागेल. आवळा–ब्राह्मीचे जे गुण आहेत ते सर्व यांत तुम्हांला आढळून आल्यानंतर आणखी तुम्हांस काय पाहिजे सांगा बरें ?

आणि स्वस्त किती पडतें पहा ! बाजाराचें ३। रु. पौंड, तर घरचें स्वच्छ व पवित्र तेल १। रु. पौंड. आतां तुम्हींच सांगा, असें तेल घरीं करण्यास काय हरकत आहे ?

१ औंस रु. २–०–०	½ औंस रु. १–१३ नये पैसे
¼ औंस रु. ०-६३ नये पैसे	⅛ औंस रु. ०–३८ नये पैसे



सोल एजंट: विठ्ठल वामन मुठ्ये

११, शामशेट स्ट्रीट, मुंबई २.

टेलि. नं. २०६००]

[GRAM : "Muthyagent"

मुद्रक व प्रकाशक:—श्री. घोष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर–मुंबई १४.

मुद्रणस्थान:—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी–निवास, मोरवाग रोड, दादर, मुंबई १४.

वर्षासारखें शंड

वनस्पतियुक्त

उमा

पांढरे केंस नुकसान न करतां काळे करणें, लांब व चमकदार बनवणें, उवा आणि लिखा काढून मेंदूला थंड ठेवण्यासाठीं

उमा वापरा

सर्वत्र विकत मिळतें—


बनविणार—



उमा प्रॉडक्टस् बोरीस चाळ, नॉवेल्टी सिनेमानजिक, ग्रांट रोड, मुं. ७

स्टॉकिस्टः—केशवजी सी. ठक्कर, दवा बाजार प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २

आनंदी दृश्य कधी कोणत्याही वस्तीचित्रा उद्दीपि आजच विकत घ्या व न्याहाळा वैशिष्ट्यपूर्ण स्वतंत्र वस्तू



प्रस्टिज देखभालची मिळवो

मुनिकेम

दवाई निर्माण व्यवसायात सर्वांत विश्वसनीय नाम



मुनिकेम केमिकल्स, मुंबई २६.

आनंदी बालक..

जेवण पुलांना दांत येतं वेळीं होणारें अपचन मुलांच यांवर उत्कृष्ट!



ग्राइपोझोन

पी लाल केमिकल्स कं. मुंबई, ७

नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ वें : अंक ६ वा

सप्टेंबर १९५८



मानसिक आरोग्याचें मूळ

व्यक्तीला जें कांहीं करतां येत नाहीं त्यापेक्षां तिला जें कांहीं करतां येतें हें लक्षांत घेऊनच आपल्या जीवनाची रचना झाली पाहिजे. या प्रकारें प्रत्येक व्यक्तीवर श्रद्धा ठेवतां येईल, अशी श्रद्धा निर्माण करणें हीच शेवटीं आपली खरी गरज आहे.

भयभीत झालेल्या जगाला संवादी जीवनाची जरूर आहे. हें संवादी जीवन व्यक्ति-व्यक्तीला एकमेकांविषयीं वाटणाऱ्या श्रद्धेवर अवलंबून आहे.

: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक


संपादक

श्री. शेप नामले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई–१४.	३७ नये पैसे



सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी




— सोल डिस्ट्रीब्युटर्स —
ए. व्ही. आर. ए. अॅन्ड कं., मुंबई २



संतोष कारक
कामासाठी

सोल डिस्ट्रीब्युटर्स —
पेनमेन्स इंडस्ट्रीयल सर्व्हिसीझ
कांदीवली (मुंबई ४०० ४३ डी.)
लोकल ऑफिस: १०, २ रा फ्लोर स्ट्रीट, मुंबई २.



सर्व जगभर तें विकलें जातें !

आफ्रिका, इन्डोनेशिया, इराण, इजिप्त,
इंग्लंड आणि अमेरिका येथें सुद्धां.

दोन्ही गोलार्धांतील बहुतेक सर्व राष्ट्रांत लोमा विकले जातें
आणि दिवसेंदिवस मागणी वाढतच आहे.

लोमा

केसांना नैसर्गिकरीत्या
काळेभोर फरण्यांसाठीं जगभर
मान्यता पावलेले.

MPS-MAR.


सोल एजंट्स: एम्. एम्. खंभातवाला, अहमदाबाद १.
एजंट्स: सी. नरोत्तम ॲण्ड कं., मुंबई-२. फो. ३०५७५

For Greatness & Grandeur

ASHOK

Silk Mills

RICH RAYON FABRICS




SHATRABHUJ


फक्त बाबा तें करूं शकतील


प्रत्येक मुलाला आपले वडील म्हणजे कोणीतरी मोठे इतिहासतज्ञ, गणितज्ञ असे वाटत असतात—खरं सांगायचं म्हणजे आपल्या वडिलांइतके मोठे दुसरे कोणीच नाहीं असें त्याला वाटत असतें. तुमच्या मुलांना तुमच्याबद्दल खूप आदर वाटतो आणि त्यांचें पालन-पोषण करण्यास तुम्हीं समर्थ आहांत ह्याबद्दल त्यांना दृढ विश्वास वाटतो.

असा त्यांचा विश्वास संपादन करण्यास तुम्ही योग्य आहांत काय? तुम्ही त्यांच्या भवितव्यासाठी कांही योजना आंखली आहे काय? आयुर्विम्याच्या द्वारें नियमितपणें बचत करून आज भरलेल्या लहानशा रकमेंतूनच पुढें मोठी रक्कम मिळणार आहे ह्याची खात्री करून घ्या.



लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया





"टिनोपाल" हा जे. आर. गायगी, एस. ए. बाल, सित्झरलंड यांचा रजिस्टर्ड ट्रेड मार्क आहे.

"तुमची कन्या तशी फारशी सुरेख...
अं अं अं...आहे असें म्हणतां येणार नाहीं...
परंतु ती माझ्या चिरंजिवांचा संसार मात्र
चांगला करील यांत शंका नाहीं. मोठी
ससंजस मुलगी दिसली ती...कारण आपल्या
साडीसाठीं तिनें टिनोपाल वापरलें होतें."

कारखानदार: सुहृद गायगी प्रायव्हेट लिमिटेड, वाडी वाडी, बडोदा.

एकमेव वितरक: सुहृद गायगी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पो. ऑ. बॉक्स ९६५, मुंबई

ओळखा टिनोपालने स्वच्छ कपडे सर्वांत जास्त चमकदार पांढरे शुभ्र होतात

SISTA S SG-42 MAR

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण–खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल–शिक्षण–संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ६] मुंबई [सप्टेंबर १९५८

'शिक्षण–पत्रिका' घरोघर पोहोंचवा

'शिक्षण–पत्रिके'सारखें शिशुशिक्षणाला वाहिलेलें दुसरें एकही मासिक नाहीं. असें हें मासिक नुकसानींत चालवावें लागतें ही एक आश्चर्यांची गोष्ट आहे. घरोघर मुलें आहेत आणि मुलांचे प्रश्न आहेत. बालमंदिरांची संख्या सारखी वाढते आहे, मग 'शिक्षण–पत्रिका' नुकसानींत चालवण्याचा प्रसंग कां यावा ! यांत आपलाच कांहीं तरी दोष असला पाहिजे. आपल्या प्रचारांत कांहीं तरी कमी पडत असलें पाहिजे.

बालशिक्षणरसिकांची संख्या वाढते आहे. ही मंडळी 'शिक्षण-पत्रिके' वांचून बालशिक्षणाचा प्रचार कसा करणार आहेत ! शिशुशिक्षणाचा प्रचार करायचा म्हणजे पत्रिकेचा प्रचार झालाच पाहिजे. आपल्या कार्यकर्त्यांमधून प्रत्येकानें २०–२५ कुटुंबांत 'शिक्षण-पत्रिका' पोहोंचवीनच असा निश्चय केल्यास ह्या कौटुंबिक जरुरीच्या मासिकाचा प्रचार होण्यास कितीसा वेळ लागणार !

बू. बा. शि. संघाच्या मुंबई शाखेच्या कार्यकर्त्यांपुढें संघाचे कार्याध्यक्ष श्री. जादवजी मोदी यांनीं नुकतेंच केलेलें भाषण

सौराष्ट्राच्या सार्वजनिक कार्यांत ड्राइव्ह पद्धतीचा फार चांगला अनुभव आला आहे. ड्राइव्हमध्यें निश्चितपणें केलेल्या कामावर सर्व शक्ति केन्द्रित करून आम्ही कामें निकालांत काढीत असतों. एक काम निश्चित झालें कीं आम्ही सर्वच्या सर्व त्या कामासाठीं थोडा वेळ काढून त्या एकाच कामाच्या मागें लागतों. एका वर्षी आम्ही बालमंदिरें स्थापण्याची मोहीम एक आठवडाभर केली. गांवागांवांतून कार्यकर्त्यांनीं आपापल्या परीनें प्रयत्न केले. या प्रयत्नामुळें एक आठवड्याच्या आंत आम्ही सौराष्ट्रांतल्या शंभर गांवीं नवीन १०० बालमंदिरें काढूं शकलों. सामान्य पद्धतीनें इतकें काम दोन वर्षांतही करतां आलें नसतें.

मला वाटतें पत्रिकेसाठीं अशा प्रकारच्या Drive ची जरूरी आहे. आपल्या राज्यांत आज १५ बाल–अध्यापन संस्था आहेत, त्यांत पांचशें नवीन विद्यार्थि–शिक्षक दरवर्षी तयार होतात. शेकड्यांनीं मोजावी लागतील इतकीं बालमंदिरें आपल्या राज्यांत आहेत. 'शिक्षण–पत्रिके'चे चालू ग्राहकही शेकडों आहेत या सर्वांनीं मनांत आणलें तर एकाच सप्ताहांत 'शिक्षण–पत्रिका' घरोघर पोहोंचवता येईल. आणि ग्राहकांची संख्या कोठल्या कोठें नेतां येईल.

दिवसेंदिवस शिशुशिक्षणाची अधिकाधिक मागणी दिसून येत आहे. या मागणीला पुरे पडण्यासाठीं 'शिक्षण–पत्रिकेच्या' व्यापक प्रचाराची जरूर आहे. यासाठीं आपण 'शिक्षण–पत्रिके'चें स्वरूप जास्तींत जास्त लोकाभिमुख असें बनवूंया. गिजुभाई बालशिक्षणाचे गहन सिद्धान्त अत्यंत सुबोध शैलींत अशा तऱ्हेनें मांडीत कीं, त्यामुळें वाचकाला 'शिक्षण–पत्रिका' पुन्हां पुन्हां वाचाविशीच वाटे. आपणही आपल्या शक्तीप्रमाणें 'शिक्षण–पत्रिके'त असे फेरफार करूंया आणि या मासिकाच्या प्रचारासाठीं येत्या जयंति सप्ताहांत एक मोहीम सुरू करूं या. 'शिक्षण–पत्रिके'त येणाऱ्या लिखाणाची जरूर तर आहेच. पालकांना, शिक्षकांना आणि बालकांना आज त्याहीपेक्षां जास्त साहित्याची जरूर आहे. प्रथम 'शिक्षण–पत्रिके'ला निश्चित करूंया व मग बाल शिक्षणाच्या उपयोगी प्रकाशनांची योजना करूं. जरूर तर पत्रिकेंतील जाहिरातींचे आणखी भाव वाढवूं. मोठ्या मोठ्या कंपन्यांना भेटून आणखी जाहिराती मिळवूं आणि 'शिक्षण–पत्रिका' लोकांना शक्यतों कमी दरांतच देण्याचे प्रयत्न करूं. जगांतील कित्येक पत्रें केवळ जाहिरातीवरच निभत असतात. आपल्या सिद्धांतांच्या विरुद्ध आपण जाहिराती घेऊं नयेत पण समाजोपयोगी वस्तूंच्या जाहिराती घेण्यास कांहींच हरकत नाहीं.

या वर्षी गिजुभाई जयंति सप्ताहांत 'शिक्षण–पत्रिके'च्या प्रचाराचीच मोहीम सुरू करा. या क्षेत्रांतील प्रत्येक संस्थेनें 'शिक्षण–पत्रिके'च्या प्रचाराला मदत करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. घरोघर 'शिक्षण–पत्रिका' पोहोंचलीच पाहिजे असें करा. या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांची संघटना चालवण्यासाठीं पत्रिका हें फार प्रभावी साधन आहे.

—जादवजीभाई मोदी

———

नोंद

बालमंदिराच्या शिक्षकांच्या भावना समजून घ्या

बालमंदिराच्या शिक्षकाच्या कार्यांत भावनेचें महत्त्व विशेष असतें. ज्या वयाच्या बालकांत त्यांना काम करावें लागतें तेथें बुद्धि अथवा कर्तव्याच्या भाषेपेक्षां प्रेम-सहानुभूतीची भाषाच अधिक परिणामकारक ठरते. त्यामुळें बालमंदिरांच्या शिक्षकांना सहानुभूति, प्रेमळपणा इत्यादि गुण आपला व्यवसाय चांगल्या तऱ्हेनें करण्यासाठीं प्रयत्नपूर्वक प्राप्त करावे लागतात. या संस्था व संस्थेंतील बालकांच्या बाबतींत एक विशेष प्रकारचें महत्त्व त्यांना वाटत असतें. कांहीं दिवसांपूर्वी एका चांगल्या संस्थेंत पंधरा वर्षें काम केलेल्या शिक्षिकेला तिचा पगार परवडत नाहीं, या कारणामुळें कमी करण्यांत आलें तेव्हां ह्या बाई ज्या प्रकारें दुःखी झाल्या तें पाहिल्यावर असें वाटतें कीं बालमंदिरांच्या शिक्षकांशीं वागतांना त्यांच्या भावना समजून घेण्याची खरोखरच विशेष जरूर आहे. सार्वजनिक संस्थेंत नवीन नवीन संचालक-कार्यकर्ते निवडून येतात. नवीन येणाऱ्या कार्यकर्त्यांला शिक्षिकेच्या कामाची, त्या कामाच्या पूर्वेतिहासाची तेवढी जाणीव नसते. संस्थेच्या खर्चांत काटकसर करून दाखवण्याच्या आपल्या ध्येयांत त्यांची नजर शिक्षकांच्या पगारावर पडते आणि शेवटीं जुने शिक्षक, ज्यांचे पगार वाढलेले असतात त्यांना या संस्थेंत काम करणें कठीण होऊन बसतें. अशा शिक्षकांना सरकारकडून किंवा समाजाकडून कोणतेंच रक्षण मिळत नाहीं. न्याय मिळवण्यासाठीं कोणत्याही प्रकारचें द्वार असत नाहीं. सत्तेपुढें आपलें शहाणपण चालायचें नाहीं अथवा आपल्याला न्याय मिळायचा नाहीं हें समजून घेऊन हे शिक्षक परिस्थितीपुढें लाचार होतात. जुन्या शिक्षकांना आर्थिक कारणाकरतां या प्रकारें कमी करणें हें कोणत्याही संस्थेच्या लौकिकाला भूषणावह नाहीं. यामुळें संस्थेच्या खर्चांत बचत होत असेल पण शिक्षक, संस्था आणि शिक्षणाचें अहितच अधिक होतें हें आपण उमजून घेतलें पाहिजे.

बृहन्मुंबई पालक परिषद

मुंबईच्या विद्यार्थ्यांच्या पालकांपुढील प्रश्न व त्यांचे विचारांना संघटित स्वरूप देण्याच्या उद्देशानें मुंबईच्या नवबालोद्यान शाळेच्या पालक सभेच्या उपक्रमें एक बृहन्मुंबई पालक परिषद बोलाविली जाणार आहे. सध्या मुंबई राज्याच्या शैक्षाणिक घोरणाविषयींच्या असमाधानांतून या परिषदेला तात्कालिक चालना मिळालेली असली तरी अशा प्रकारच्या पालक संघटना निर्माण होणें हें शिक्षणाच्या क्षेत्रांतील आवश्यक जागृतीचें चिन्ह आहे असें आम्हांला वाटतें. बालकांच्या शिक्षणांत पालकांनीं केवळ आर्थिक (फी देणारे म्हणून) भागिदार बनून बालकांचें शिक्षण योग्य प्रकारें होईल ही कल्पना आपल्या अज्ञानाचींच द्योतक आहे. धर्मशास्त्रांत माता-पित्यांना बालकाचे प्रथम शिक्षक म्हटलें आहे. बालकाच्या व्यक्तित्वाचा पाया प्रथम कुटुंबांतच घातला जातो. कुटुंबनें घातलेल्या या पायावरच शालेय संस्कारांच्या द्वारें विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाची पुढील इमारत उभारली जाते. मूल मोठें होऊन शाळेंत जात असलें तरी त्याच्या विकासाला पालक मंडळींचें मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि संरक्षण अत्यंत आवश्यक असतें. पालकांच्या या कर्तव्याबाबत असहाय्यता, कोठें दुर्लक्ष, तर कोठें अनावश्यक लक्ष आढळून येतें. पालकांच्या विशाल वर्गाला आपण शाळेची फी भरली आणि वह्या-पुस्तकांना पैसे पुरवले म्हणजे बालकांच्या बाबतींतील आपलें कर्तव्य संपलें असें वाटतें. बाकीच्या गोष्टी शाळेनें व मुलानें ठरवण्याच्या आहेत अशी सोयीस्कर समजूत करून घेऊन शिक्षणाच्या प्रश्नांत तें फारसे आपल्याला करतां येण्यासारखें आहे, असें त्यांस वाटत नाहीं.

अमेरिकेंत आणि इतर देशांत एकट्या पालकांच्या नव्हे पण पालक-शिक्षकांच्या याच प्रकारच्या अत्यंत व्यापक आणि प्रभावी संघटना आहेत. अमेरिकेंतील पा. शि (पालक-शिक्षक संघटना) संघटनेतर्फे 'National Parents Teacher' नांवाचें एक उपयुक्त मासिक निघत असतें. या मासिकांत १५ एप्रिल १९५७ रोजीं या संघटनेचे १,० ६,९४,४७४ सभासद असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. या संघटनेचे उद्देश पुढीलप्रमाणें आहेतः—

(१) घर, शाळा, धर्म, संस्था आणि समाजांत बालक आणि युवकांच्या कल्याणाला प्रोत्साहन देणें.

(२) कौटुंबिक जीवनाची आचार-विचारांची पातळी उच्चतर करणें.

(३) बालकें आणि युवकांच्या कल्याण व रक्षणासाठीं योग्य कायदे घडवून आणणें.

(४) बालशिक्षणाचा पाया घालण्याच्या बुद्धिपुरस्सर योजनेंत शिक्षक व पालकांचा सहकार घडवून आणण्याच्या दृष्टीनें शाळा आणि घरांचे संबंध अधिक निकटचे बनविणें.

(५) शिक्षणतज्ञ आणि सामान्य जनता यांच्या संयुक्त प्रयत्नानें प्रत्येक बालकाला शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक (Spiritual) शिक्षणाचे जास्तींत जास्त फायदे मिळावेत म्हणून प्रयत्न करणें.

अमेरिकेच्या पालक-शिक्षक संघटनेच्या सभासदांची अवाढव्य संख्या आणि त्यांचे उद्देश आम्हाला मनन करण्यासारखे वाटतात. बृहन्मुंबई पालक परिषद अशा व्यापक आणि समाजांतील मानव-निर्मितीच्या या सहकारी रचनात्मक चळवळीचें निर्माण करील अशी आम्ही आशा करतों.

—नामले

पालकांचा विशेष विभाग

[घरोघर मुलें आहेत म्हणून घरोघर त्यांच्या संगोपनाच्या आणि शिक्षणाच्या प्रश्नांचा विचार आहे. पालक आपापले विचार, अनुभव, प्रश्न आणि कल्पना शि. प. कडे पाठवून विचारविनिमयासाठीं या विभागाचा उपयोग करून घेतील अशी अपेक्षा आहे—सं.]

प्रश्नोत्तरी

प्रश्न : नाग–विदर्भांतील एक भगिनी लिहितातः–'गेल्या अंकापासून योजलेला पालकांचा विशेष विभाग मला उपयुक्त वाटला. माझें शिक्षण बेताबेताचेंच असल्यानें मला मोठे मोठे शब्द समजत नाहींत. माझ्यासारखीची यांत सोय झाली. मला एक प्रश्न विचारायचा आहे. माझा चार महिन्यांचा मुलगा फार रडका आहे. तो न रडेल असा कांहीं उपाय सुचवाल का?'

उत्तर : रडण्याचें कारण समजलें तर तुम्हींसुद्धां उपाय करूं शकाल. म्हणून प्रथम संभवनीय कारणें मात्र लक्षांत घ्या. (१) भूक–दूध भूक भागण्याइतकें पुरतें मिळतें आहे ना? (२) झोपेंत वातावरण शांत असतें कीं कांहीं निरनिराळे आवाज कानीं पडत असतात? (३) दिव्याचा त्रास होतो का? (४) ढेकूण, मच्छर, पिसवा वगैरेचा त्रास नाहीं ना? (५) कपडे तंग नाहींत ना? (६) अंथरूण पांघरूण पाहिजे त्या प्रमाणांत उबदार आहे ना? (७) तुमचें लक्ष वेधण्याकरतां रडतो का? गप्प कसा होतो तें पहा. (८) तुम्ही त्याच्याशीं खेळत नाहीं म्हणून तर रडत नाहीं ना? (९) झोपण्याच्या जागेची अदलाबदल होते का? (१०) पोट साफ असतें ना? (११) केव्हां केव्हां थकण्यामुळेंही मुलें रडतात. (१२) केव्हां भीतीनेंही रडतात.


रडण्याचें कारण शोधा. कारण सांपडलें कीं उपाय सुचेलच. अति रडण्याचे मुलांच्या वाढीवर वाईट परिणाम होतात. रडण्याचें कारण शरीरांत किंवा बाह्य परिस्थितींत असणारच. मुलांच्या गरजा आपण न समजलों तर त्यामुळें मुलाला सुरक्षित वाटत नाहीं. त्याचा व संबंधित व्यक्तीचा संबंध वाईट रीतीनें स्थापन होतो. रडक्या मुलाला कोणी घेत नाहीं. त्याचा परिणामही मुलाच्या मानसिक वाढीवर होतो. मुलाचें थोडें रडणें स्वाभाविक समजलें पाहिजे.

प्रश्नः–सातारा जिल्ह्यांतील एक भगिनी लिहितातः–'माझा मुलगा येथील बालमंदिरांत सुरुवातीला आनंदानें जात असे. हल्लीं त्याला काय झालें आहे कोणास ठाऊक! बालमंदिराचं नांव काढलं कीं तो 'मी नाहीं जाणार' म्हणतो. नाहीं म्हणतांना त्याचा चेहरा उतरलेला असतो. तीन वर्षें पांच महिने त्याचें वय आहे.'

उत्तर : तीन ते चार वर्षांचीं मुलें अनेक कारणांमुळें स्वाभाविकपणें अस्वस्थ असतात. विशेषतः या वयांत त्यांना एकाद दुसरा मित्र किंवा मैत्रिण असते. शाळेंत त्याची मित्रमंडळी त्याच्याशी कशीं वागतात तें पहा. आणि हा मुलगाही त्या मित्रांशीं कसा वागतो तें पहा. बहुधा त्याच्या न जाण्याचें कारण त्याच्या मित्रमंडळीशीं कांहीं तरी कारणानें त्याचें जमत नसावें. ज्या गटांत तो खेळतो त्या मुलांच्या गटात तो मागासलेला आहे का? तुमच्या मुलावर बालमंदिरांत जाण्याची सक्ति तर तुम्ही करूंच नये. आपण फी भरतों तेव्हां बालकाची इच्छा असो नसो त्याला शाळेंत दामटण्याचा प्रयत्न तर तुम्ही नच केला पाहिजे. त्याला रहायचं असेल तितके दिवस घरीं राहूं द्या. घरीं राहिला तर त्याला एकटें एकटे खेळावें लागेल हें समजावून सांगा. तसें तो खेळायला तयार असल्यास त्याला खेळाचीं कांहीं साधनेंही देऊन त्याची सोय करा. तुम्ही त्याच्याशीं वेळ मात्र घालवूं नये. नेहमींप्रमाणें तुमचा जो स्वाभाविक कार्यक्रम असेल तोच तुम्ही चालू ठेवा. त्याला जी कांहीं मदत लागेल ती द्या; चार सहा दिवस झाल्यावरही त्यानें शाळेचें नांव न घेतलें तर त्याच्या मित्रांना बोलावून त्यांच्या समजूती करून द्या.

—ना०

बाळाची सुकुमार त्वचा...



निर्मळ आणि निरोगी राहणें बाळा साठी आहे तितकेच. बाळाला देत्यावर, किंवा कपड्यांतील घाण जागांना, बाळाच्या नाजूक शरीरावर उदी नर्सरी पावडरचा एक हात फिरविताच ही त्वचा आपण उल्हसित पाहाल आणि त्यांची त्वचा अत्यंत निर्मळ राहील.

ही खास बाळासाठी बनविली जंतूनाशक विशेषतीत जंतूनाशक (Antiseptic) दूर्गंध त्वचेचे फोड व त्वचारोग दूर करून जंतूना प्रतिरोध करतील

हजारो कुटुंबांत आणि कित्येक बालकाल्यांत नित्य वापरतात

उदी रिसर्च लेबोरेटरीज, मुंबई-२८

बालकाची प्रगति–नोंद

सामान्यतः वाढत्या वयाबरोबर बालकाचा सर्वांगीण विकास होत असतो. शरीराची उंची, निरनिराळ्या शरीरावयवांचा आकार वाढतो, त्याबरोबरच बालकाच्या वागणुकीतही फरक पडत जातो. वागणुकीवरूनच आपल्या बालकाच्या मानसिक व सामाजिक विकासाची कल्पना येते. निरनिराळ्या बालकांच्या विकास प्रगतीची नोंद ठेवीत गेलों तर असें आढळतें कीं, सर्व बालकांच्या विकासाची प्रगति सारखी नसते. एकाच प्रकारच्या वातावरणांत वाढणाऱ्या बालकांच्या विकासाच्या प्रगतींतहि बराच फरक आढळतो. असा हा फरक आढळणें ही गोष्टदेखील स्वाभाविक आहे. कारण प्रत्येक बालकाच्या वांट्याला आलेला वांशिक वारसा निरनिराळ्या प्रकारचा असतो. प्रत्यक्ष एकाच मातेच्या उदरीं एकाच वेळीं जन्म घेणाऱ्या बालकांतही हा वांशिक वारसा भिन्न भिन्न असूं शकतो. त्यांच्या शरीरावयवांत आणि मानसिक वळणांत सुरुवातीपासूनच भिन्नता असूं शकते. नंतर या मुलांचें संगोपन जरी एकाच घरांत होत असलें, तरी त्यांच्या विकासांत निराळेपणा दिसतो. एकाच पितरापासून एकाच वेळीं जन्म घेणाऱ्या आणि एकाच प्रकारच्या वातावरणांत वाढणाऱ्या बालकांत जर मनोदैहिक फेरफार आढळतात तर मग भिन्न भिन्न मातापित्यांच्या कुटुंबांत ज्यांचें संगोपन झालें आहे अशा बालकांच्या विकासाच्या प्रगतींत किती फरक पडत असेल याची कल्पना सहज येण्यासारखी आहे. बालमंदिरांत दाखल होणाऱ्या बालकांच्या विकासाचा इतिहास स्वतंत्र असतो, त्यामुळें प्रत्येक बालकाच्या वर्तनांत अनेक तऱ्हेचें फेरफार आढळतात. त्यांच्या स्वभावांतील, आवडी–निवडींतील व मनाच्या क्रिया–प्रक्रियांचे वेग आणि तीव्रता यांतील हे फेरफार निश्चितपणें कळावेत म्हणून बालकांच्या विकासाची प्रगति-नोंद ठेविली जाणें आवश्यक आहे.

बालमंदिरपूर्वकालाच्या विकासाची नोंद : बालकाच्या विकासाची प्रगति–नोंद मातेच्या उदरांत त्याचा संभव झाल्यापासून तो तें बालमंदिरांत दाखल होईपर्यंत ज्या ज्या प्रकारें करतां येईल त्या त्या प्रकारें ती व्यवस्थितपणें ठेविली गेली पाहिजे. नवीन सुशिक्षित मातांनीं याबाबत अशा काळजीपूर्वक नोंदी ठेवल्या तर बालमनाच्या अभ्यासाला त्यामुळें फार मदत होण्यासारखी आहे. अर्थात् आपल्या येथील मातांना याबाबत मार्गदर्शन मिळेल अशी सोयही आपण केली पाहिजे. बालमंदिरांनीं हें कार्य करण्यासारखें आहे. प्रत्येक बालमंदिरानें आपल्या आजूबाजूच्या कुटुंबांची नोंद ठेविली पाहिजे. सामान्यतः अडीचशे तीनशें कुटुंबांची नोंद प्रत्येक बालमंदिरांतील पालक रजिस्टरांत ठेविली गेली पाहिजे. या रजिस्टरांत प्रत्येक कुटुंबाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कला, उद्योग आवडी–निवडी याबद्दलची माहिती आणि त्याचप्रमाणें त्यांतील व्यक्ति, त्यांचीं वयें, जन्म, मरण वगैरे नोंदी ठेविल्यास, गरोदर राहिलेल्या स्त्रियांकडे नोंद–बुकें पाठवून व मधून मधून त्यांची चौकशी करून बालक बालमंदिरांत येईपर्यंत सर्व नोंद व्यवस्थितपणें ठेवण्याच्या उपक्रमाला चालना देतां येण्यासारखी आहे.

बालमंदिरांतील बालकाची प्रगति–नोंद

आपल्या येथील पूर्वप्राथमिक संस्थेंत अडीच वर्षांनंतर बालकें सामान्यतः दाखल केलीं जातात. हीं मुलें दाखल करून घेतांना आपण पालकाकडून सामान्यतः प्रवेश–पत्रक भरून घेतों. याच वेळीं बालकाच्या बालमंदिरांत दाखल होण्याच्या आधीच्या काळांत विकासाची कल्पना जर बालकाच्या शिक्षकाला मिळाली तर शिक्षक आपलें शिक्षणाचें कार्य अधिक यशस्वीपणें करूं शकेल यांत शंका नाहीं. म्हणून बालमंदिरांनीं वर सुचविल्याप्रमाणें नोंदपुस्तकें कुटुंबांना देण्याचा उपक्रम या दृष्टीनें फार उपयुक्त ठरेल; परंतु हा उपक्रम जेथें करतां येत नसेल तेथें निदान बालकाच्या प्रवेश–पत्रकाबरोबर पालकांकडून बालकाचें 'माहिती पत्रक' भरून घेण्याचा प्रघात पाडला पाहिजे. शिशुविहारांत सध्या अशा प्रकारचीं माहितीपत्रकें आम्ही योजीत आहोंत. पालकाच्या या माहिती–पत्रकाबरोबरच बालकाच्या मासिक संचयशील प्रगति–नोंदीची Monthly Cummulative Monthly Progress Records चीं पत्रकें ठेवतों. हीं संचयशील प्रगतिपत्रकें दोन प्रकारचीं असतात. एकांत दरवर्षी होणाऱ्या वैद्यकीय तपासणीची नोंद व आरोग्यविषयक प्रगतीची नोंद असते, तर दुसऱ्यांत बालकाच्या सर्वांगीण विकासाची नोंद, शिक्षक दर महिन्याला त्या त्या बालकाच्या जन्म–तारखेला लिहूं शकेल अशी सोय असते. हीं दोन्ही प्रकारचीं पत्रकें नूतन बालशिक्षण संघाच्या कार्यालयांत मिळण्याची सोय करण्यांत येत आहे.

पालकांनीं भरावयाचें माहिती–पत्रक

यांत मातापित्यासंबंधीं व कुटुंबासंबंधीची माहिती हा एक भाग आहे. यावरून मातापित्यांचीं वयें, त्यांचें शिक्षण, व्यवसाय, सवयी, आवडी-निवडी, कला–कौशल्य, संस्कारी जीवन, घरांतील माणसांचीं संख्या, त्यांचीं नांवें व वयें, कुटुंबाच्या घराची जागा, मोकळी जागा, कुटुंबाचें एकूण उत्पन्न वगैरे माहिती संग्रहित करतां येते. या माहितीमुळें बालक ज्या कौटुंबिक परिस्थितींतून येतें त्या परिस्थितीची निवडक माहिती मिळते.

याच पत्रकांतील दुसऱ्या भागांत बालकाच्या विकासाच्या प्रगती-संबंधींची निवडक माहिती लिहून ठेवावयाची असते. त्यामुळें बालकाच्या आरोग्याची, चलनविकासाची, भाषिक विकासाची, स्वभाव आणि सवयींची माहिती शिक्षकांच्या संग्रहीं राहते. घरांत लोकशाही आहे कीं सरमुखत्यारशाही, वातावरण संवादी कीं विसंवादी, प्रसन्न आणि सहकाराचें कीं अव्यवस्थित आणि असहकाराचें, मूल आपला वेळ कसा कोणाबरोबर घालवतें, त्याला शिक्षा करण्यांत येत असली तर केव्हां, कशा प्रकारची, प्रोत्साहन देत असले तर केव्हां कोणत्या बाबतींत वगैरे सूचक मुद्दे योजिले आहेत.

वैद्यकीय तपासणी व आरोग्यप्रगतीसंबंधीचें संचयशील पत्रक

प्रत्येक बालमंदिरांत वर्षांतून एक वेळा तरी बालकाची वैद्यकीय तपासणी डॉक्टर अथवा वैद्यासारख्या तज्ञ व्यक्तीकडून झाली पाहिजे. बालकाच्या वैद्यकीय तपासणींत ज्या कांहीं गोष्टी आढळतील, त्यांवर उपाय योजण्याबाबत पालकांना वेळींच सूचना गेल्या पाहिजेत. या सूचनांप्रमाणें पालक व बालमंदिर संस्थेच्या सहकारानें जे जे करण्यासारखे असतील ते सर्व उपाय योजले गेले पाहिजेत व त्यांचा परिणामही नोंदला गेला पाहिजे. या पत्रकांत वैद्यकीय तपासणीचा सर्वसामान्य तपशील असून चार वर्षांपर्यंतची नोंद एकाच ठिकाणीं करतां येईल अशी सोय आहे.

विकास-प्रगतीचें संचयशील पत्रक

यांत पहिला खण महिन्यांच्या नांवाचा आहे. बालकाच्या जन्म-दिनांकाच्या दिवशीं अथवा दुसरा सोयीचा दिवस ठरवून ज्या महिन्याची ही नोंद असेल त्या महिन्याचे सालासह नांव येथें भरलें पाहिजे. नंतर पुढील खणांचे मथळे क्रमशः याप्रमाणें आहेत—(२) शारीरिक विकास (क्रीडांगण, व्यावहारिक जीवन—व्यवसाय, हस्तव्यवसाय वगैरे), (३) साधना-वरील प्रतिवर्तन Response to Materials (४) बालकांच्या बाबतींत प्रतिवर्तन, (५) शिक्षकांशीं प्रतिवर्तन, (६) नित्यक्रमाबाबतचें (Routine) प्रतिवर्तन, (७) भाषा विकास, (८) भावनात्मक विकास, (९) स्थिरता आणि सामान्य संयोजन, (१०) लेखन-वाचन-गणित, (११) कला, (१२) विशेष सूचना.

वरील मथळे असलेल्या प्रत्येक खणांत शिक्षकानें आपलें बालकासंबंधींचें एक अवलोकन लिहावयाचें असतें. बालमंदिराच्या निरनिराळ्या विभागांत चालू महिन्यांत बालकांत जें कांहीं विशेष दिसलें त्यासंबंधींची नोंद त्यानें घ्यावयाची असते. या नोंदी मधून मधून पालकाच्या नजरेस आणाव्या व पालकांपुढें मुला-बाबत कांहीं प्रश्न असल्यास त्याचीही नोंद करून ठेवावी. पालकाची बालकाबाबतची अपेक्षा गैर असेल तर या बाबतींत पालकांचें मार्गदर्शनही शिक्षक व मुख्य-शिक्षक यांनीं मिळून करावें.

बालकाच्या प्रगतीचें सत्रान्त निवेदन
(Terminal Report)

कामाच्या वर्षाच्या मध्याच्या सुमाराला दिवाळी असते त्यामुळें वर्षाच्या सुरुवातीपासून दिवाळीची सुटी लागेपर्यंतच्या काळाला पहिलें सत्र म्हणतात. या सत्राच्या शेवटीं व तसेंच नंतर एप्रिल अखेर म्हणजे दुसऱ्या सत्रान्ताच्या वेळीं बालकांच्या पालकाकडे प्रगतीचें निवेदन कित्येक बालमंदिरें पाठवीत असतात. या निवेदन पत्रकांतही संचयशील प्रगति नोंदीप्रमाणेंच खण असतात. यामुळें संचयशील नोंदीवरून विकासाच्या प्रत्येक अंगासंबंधीं निवेदन शिक्षकाला सहज तयार करतां येतें. हें निवेदन पालकांच्याकडे पाठवून त्यांची यावर सही घेऊन परत मागवावें व तें बालकांच्या फाईलला लावून ठेवावें किंवा निवेदनाच्या दोन प्रति काढून एक पालकांकडे व एक फाईलसाठीं याप्रमाणें त्यांचा उपयोग करावा.

संचयशील प्रगति-नोंदींत लिहावयाचें अवलोकन कसें लिहावें यासंबंधीं पुढील लेखांत क्रमशः लिहीन. ही माहिती बाल-अध्यापनाच्या बाल अभ्यास-अवलोकनालाही उपयोगी होईल या दृष्टीनें देण्यांत येईल.

—नामले

शुभ प्रसंगाच्या वेळीं मुखमाधुरीसाठीं वापरा
दिलरंजन सुवासिक सुपारी
सुमधुर, शेंकडों लोकांना आनंदित करणारी—
—: सर्वत्र विकली जाते :—
आपल्या गांवांत एजन्सीसाठीं लिहा :—
मालक: आर. के. सुपारीवाला
शांती भुवन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.
शाखा : पोस्ट ऑफिसच्या बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४
चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ, ग्रॅट रोड, मुंबई ७

चुकतें कोठें ?

(बालकासंबंधीच्या अनुभवाच्या आधारें)

माझी मॅट्रिकची परीक्षा नुकतीच संपली होती. या सुट्टींत ३।४ महिने रहाण्याच्या इराद्याने मी माझ्या काकांच्याकडे जाणार होतें. आजपर्यंत आमचे काका काश्मिरलाच होते. नुकतीच त्यांची बदली मुंबईला झाली होती. सी. आय्. डी. खात्यामध्यें ते मोठ्या हुद्यावर होते. काकूहि सामाजिक कार्यकर्त्या होत्या.

काकांना तीन मुलं होतीं. थोरला पराग चौदा वर्षांचा, दुसरा प्रशांत दहा वर्षांचा व छोटी वर्षा सात वर्षांची. मी खूप दिवसांनीं माझ्या तिन्ही भावंडांना भेटणार होतें. काकांचा मोठा बंगला व कडेने सुंदरशी बाग होती. मी तिथं गेल्याबरोबर काकांनीं सगळ्यांची नव्यानं ओळख करून दिली.

"हा थोरला पराग अगदीं 'ढ' अन् घुम्या ! यंदा नापासच झालीय स्वारी. हा प्रशांत बडबड्या पण हुषार ! ही वर्षा एक नंबरची हट्टी."

प्रशांतच्या हुशारीचें मला खूप कौतुक वाटलें अन् तें मी बोलून दाखविलें. पराग मात्र हिरमुसला होऊन निघून गेला. प्रशांतची बडबड चालू झाली.

संध्याकाळीं सहज बागेंत शिरलें तों वेलीखालीं पराग खट्टू होऊन बसलेला होता. डोळेहि रडवेले झाले होते. मला पहातांच तर तो निघून गेला.

दुसरे दिवशीं सकाळीं प्रशांतला शिकवण्याकरतां मास्तर आले होते. कारण काका त्याला स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसवणार होते. परागचें अभ्यासांत लक्षच नसल्यामुळें त्याला शिकवणी ठेवायची नव्हती. मला तें जरा विचित्रच वाटलें.

पराग तुसडा असला तरी माझ्या मनांत मात्र त्याच्याबद्दल हळूहळू सहानुभूति उत्पन्न झाली. आणि मी त्याचा विश्वास संपादण्याचा प्रयत्न करूं लागलें. एक दिवस त्याची वही चाळली तर त्यामध्यें एक सुंदर गोष्ट लिहिलेली होती. मी त्याला विचारले "पराग, तूंच का लिहिलीस गोष्ट ? छान आहे हं !" विचाऱ्याच्या डोळ्यांत पाणी आलें.

तो म्हणाला—"आशाताई, तुला आवडली गोष्ट ? मला अभ्यास येत नाहीं पण मला निबंध छान येतात. खेळ चांगले येतात" एका दमांत त्यानें सर्व बोलून दाखवलें.


त्या दिवसापासून 'तूं हुषार आहेस, तुझें अक्षर चांगलें आहे' असं उत्तेजन देऊन मी त्याला बोलका केलें. रोज मी त्याच्याकडून अभ्यास करून घेऊं लागलें. त्याला फिरावयास बरोबर नेऊं लागलें. उगीचच कोंडमाऱ्यानें तो निर्बुद्ध ठरला गेला होता. तो आतां हंसतमुख दिसूं लागला. तिमाहीचें प्रगतिबुक आलें त्यांत प्रशांतचा दुसरा, तर परागचा चौथा नंबर आला. मुलांच्या मनोवृत्तीवर आई-बडिलांच्या रागावण्याचा कसा परिणाम होतो याचा अनुभव मला आला. मी काकाकाकूंना सर्व सांगितलें.


मला मात्र शाबासकी मिळाली. त्या प्रसन्न वातावरणांत शालापत्रकाचा अंक परागच्या नांवावर आला. परागची नकळत मी पाठवेलेली गोष्ट छापून आली होती. त्याचें नांव होतें 'चुकतें कोठें ?'

—प्रभा दाते—बारामती

———

स्वदेशीची भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





बाल-विभाग

वर्ष २६ वें : अंक ६ वा : सप्टेंबर १९५८

बाल संगीतिका

भक्त ध्रुव

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्यानें)

– १ –

ध्रुव :

आई ग जाऊं का
जरासा बागेंत ?
दंवाच्या थेंबांची
पाहूं का गंमत ?
आला ग पूर्वेला
तांबडा प्रकाश
न्हालें ग़ केव्हांचें
नितळ आकाश

सुनीति :

ध्रुव बाळा रे नकोस जाऊं
अजून आहे पहांट थोडी
अजून नाहीं गगनीं आली
सूर्याची सोनेरी गाडी
अशा पहाटें जागत असतें
एक नेहमीं आजीबाई
फुलवित असते बागेंतुन ती
वेलीवरची गुलाब जाई

ध्रुव :

तूं मजला दाखव आई
ती आतां आजीबाई
करीन सोबत मी तिजला
फुलें आणखी फुलवायला
झारी घेउन
तिचिया मागुन
धावत जाउन
थकविन तिजला मी आई
दाखव मज आजीबाई

सुनीति :

ध्रुवा, तुला रे दाखवीन मी
कधींतरी आजीबाई
सरून गेली पहांट चिमण्या
व्यर्थ अतां करणें घाई
जा; बागेंतुन असतिल फुललीं
वेलींवर कितीतरी फुलें
गंध पिलेलें असेल तेथें
फूलपाखरूं चिमूकलें

ध्रुव :

खूप खूप आवडतें आई
फूलपाखरूं मजला ग
दाखवीन मी क्षणांत एका
धरून आतां तुजला ग

सुनीति :

थांब जरासा थांब ध्रुवा रे
ऐक सांगतें एक तुला
नको धरू रे गोजिरवाणें
फूलपाखरूं कधीं मुला
असेल त्याची आई कोठें
असेल त्याचें चिमूकलें घर
रडेल त्याच्यासाठीं आई
बसुन बिचारी उंबरठ्यावर

ध्रुव :

पकडणार मी नाहीं आतां
फूलपाखरूं आई ग
दुरून पाहिन गंमत त्याची
दुखविणार तें नाहीं ग
[जातो]

सुनीति :

अगणित या दुःखांतहि
डोळ्यांचा तारा तूं
उघड्यावर बसलेल्या
अबलेचा थारा तूं
मायेनें थबथबल्या
ममतेचा पान्हा तूं
अश्रूंनीं भिजलेल्या
माझा रे कान्हा तूं

– २ –

ध्रुव :

फूलपाखरा, थांब थांब रे
त्याच फुलावर थांब जरा
ग्राजक्ताचे पंख तुझे ते
नकोस हलवूं भराभरा
हळूच घेइन तुज हातावर
पंखावरची पाहिन गंमत
दंवांत न्हाऊं आपण दोघे
खूप खूप करूं गंमत जंमत
अरे....पळालें दूर दूर तें
धरून ठेविन तरीहि तूंतें
तृणावनांतुन फूलपाखरा
धाविन मीहि सैरावैरा

पार्श्ववाणी :

पुढें चाललें फूलपाखरूं
धावत सुटला त्यामागें ध्रुव
ओलांडुनही झाली आतां
त्या दोघांची गावाची शिव

ध्रुव :

फूलपांखरा थांब थांब रे
थांब पांखरा थांब जरा
ग्राजक्ताचे पंख तुझे ते
नकोस हलवूं भराभरा
.....
फूलपाखरा सज्जावरती
उन्हांत पिवळ्या बाबा आई
उत्तम माझा भाऊ धाकटा
मांडीवरती बसे एकटा
.....
फूलपाखरा, थांब थांब रे
राजमहालीं आपण जाऊ
बसून बाबांच्या मांडीवर
करूं या गंमत नाचू गाऊ
.....
[किती वेळचा उभा इथें मी
शब्दहि बाबा बोलत नाहीं
दोन पावलें सरून मागें
मूक उभी बाजूला आई]

सुरुचि :

कळला कळला
कळला रे ध्रुवा
तुझ्या मनांतला
उत्तमाचा हेवा
यायचें होतेंस
माझिया कुशींत
ठेविलें असतें
फुलांच्या उशींत
नकोच थांबण्या
क्षणहि येथें तूं
बाधेल तुझ्या रे
मनांतला हेतू

– ३ –

सुनीति :

ठेचाळुन पडला का कोठे
रडें कशाचें ये चिमण्याला
ओढ अशी कां आज अनावर
पापणींतल्या या पाण्याला

ध्रुव :

आई ग ऽ ऽ

सुनीति :

गेला होता कुठें ?....कशाला ?

ध्रुव :

फूलपाखरू पकडायाला
.....
मध्येंच गेलों राजमहालीं
तिथें धाकटी होती आई
खूप बोलली ती आई मज
शब्द न वदले पण बाबाही

सुनीति :

राजस चिमण्या, ध्रुवा कशाला
अभागिनीच्या पोटीं आला
जगांत या तर नेहमींच रे
अपुल्यावरती देव कोपला

ध्रुव :

देव कुठें असतो आई ग
हुडकुन काढिन मी त्याला तर
देव शोधल्याविण मी आई
पाहणार हें नाहीं ग घर
निघालोंच हा आशीर्वच दे
आशीर्वच दे गाउन गाणीं
निघालोंच हा पुसून घे तूं
डोळ्यांतिल घळघळतें पाणी

सुनीति :

जा कोठेंही राखतील तुज
आशीर्वच आईचे
जा कोठेंही सांत्वन कर पण
या जळत्या हृदयाचें

– ४ –

ध्रुव :

नारायण नारायण नारायण
नारायण नारायण नारायण

देव :

आलों मी

ध्रुव :

कोण तुम्हीं ?

देव :

विष्णु मी बोल ध्रुवा
वर तुजला काय हवा ?

ध्रुव :

राज्य नको मज
स्वर्ग नको मज
कांहिं नको मज देवा
अढळपदाचा
एकच दे मज
चिरशाश्वत तूं ठेवा

देव :

तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु

—बाबा मोहोड

छोटुकलं गांव त्याचं इटुकलं नांव

छोटा नानू : ऐल तिरीं नाव, पैलतिरीं गांव
गांवाचें नांव, काय हो झिलपत राव ?
नावाडी : " छोटुकलं गांव,
त्याचं इटुकलं नांव "
मुलगा : इटुकलं नांव, छान आहे राव !
गांवांत काय काय ? सांगतां का राव ?
नावाडी : डोंगराची ओळ आहे,
पायथ्याशीं नदी आहे
पानांची सळसळ आहे,
ओहोळांची खळखळ आहे.
हिरवींगार शेतं आहेत
फळभाज्यांच्या वाड्या आहेत
एक मोठं तळं आहे
तळ्यामध्यें कमळं आहेत
आजूबाजूस टेंकड्या आहेत
टेकडीवरती शाळा आहे
शाळेभोंवती बाग आहे
बागेमध्यें फुलें आहेत
वडाचे पार आहेत
चढायला झाडें आहेत
इवल्या इवल्या झोंपड्या जाहेत
इवलीं इवलीं मुलं आहेत
काय छोटे राव
आवडलं का गांव ?
नानू : छान आहे गांव नि छान त्याचं नांव.
सोडा तुमची नाव दाखवा लवकर गांव
छोटुकलं गांव त्याचं इटुकलं नांव

—ल. देवघर

'जा मार भरारी उंच पांखरा

चल उडुनि पांखरा दूर जरा,
चल जाऊं आपण नदीतिरा,
प्रभात समयीं सूर्य उगवला,
प्रकाश पसरे चारि दिशेला,
हा झुळझुळ वाहे पहा झरा,
चल जाऊं आपण नदीतिरा,
चल उडुनि पांखरा दूर जरा ॥
चिमणि पांखरें चिंव चिंव करिती,
घरट्यामधें बागडताती,
पंख उडविती पहा जरा,
चल जाऊं आपण नदीतिरा,
चल उडुनि पांखरा दूर जरा ॥
या वेलीवर त्या वेलीवर,
फूलपाखरूं भिरभिरतें तर,
जा मार भरारी उंच पांखरा,

—सौ. उषा रामचंद्र जोशी

— पहांटेचा वारा —

पहांटेचा वारा
झुळझुळ आला
कळ्या फुलविल्या
जाइजुईच्या
पहांटेचा वारा
वहातो मंद मंद
पसरितो गोड गंध
कमळाचा
पहांटेचा वारा
वहातो थंडगार
कामाला येतो जोर
सर्वांच्या

—अनुताई

'आमचा बबन फार हुषार आहे'

'आमचा बबन फार हुषार आहे' असें स्वतःच्या मुलासंबंधीं सांगतांना आमचे स्नेही शामराव कधींच कंटाळत नाहींत. जेव्हां केव्हां त्यांची माझी भेट होते, तेव्हां बबनसंबंधीं कांहीं विशेष गोष्ट त्यांच्या तोंडीं तयारच असते, त्यामुळें मी तरी प्रत्येक वेळीं विचारांतच पडतों.

बबन पहिल्याच वर्षांत मलेरियाच्या तडाख्यांत असा कांहीं सांपडला, कीं त्याला सारखीं इंजक्शनें द्यावीं लागत. या सर्व आजारांत त्याला अशक्तपणा आला आणि उजवा पाय दगावला. पुढें मलेरिया गेला, पण बबन कायमचा लंगडा बनला. लंगडत लंगडत आपल्या हालचाली करणाऱ्या त्या मुलाकडे पाहिलं कीं, करुणेनं मन भरून येतं. आज बबन पांच-साडेपांच वर्षांचा आहे.

बबन आपल्या मित्रांच्या घोळक्यांत खेळत होता, तेथें मी जाऊन पोहोंचलों. हीं मुलं हौदाच्या वरून गेलेल्या एका नळावरून चालत जाऊन नंतर खालीं पाण्यांत उड्या मारीत होतीं. बबनला या खेळांत कोणती अडचण वाटेल हें त्या मुलांना कसें कळणार? त्या सगळ्यांचे पाय घडघाकट होते. पाईपवरून चालत जाणें बबनला शक्यच नव्हतें. परंतु लंगडा बबन कोणत्याच कामांत मागें राहाणारा नव्हता. पाईपवरून चालण्याऐवजीं तो पाईपवर लटकला आणि हाताच्या आधारानें लटकत लटकत पुढें जाऊन त्यानें पाण्यांत उडी मारली. त्याच्या या पराक्रमानें त्याचे सोबती मुग्ध बनले. त्यानें खालीं उडी घेतांच त्यांनीं हर्षभरें टाळ्या वाजवल्या. सोबत्यांच्या या आनंदानें बबनलाही स्वतः धन्यता वाटली.

बाल अध्यापन मंदिराच्या विद्यार्थ्यांना जेव्हां बबनच्या हिंमतीची आणि चपळतेची गोष्ट सांगितली तेव्हां त्या सर्वांना या मुलाची आठवण झाली व ते म्हणाले—'अहो, आम्ही त्याला ओळखतों. बबन धावण्यांत, चढण्यांत, उड्या मारण्यांत कधींच मागें पडत नाहीं. नेहमीं तो सर्वांच्या पुढें असतो. आपण लंगडे आहों याची जाणीव कधींच त्याच्या चेहऱ्यावर दिसत नाहीं. प्रत्येक कामांत त्याचा उत्साह सर्वांच्या वर.' बबन लंगडा असून देखील अशीं कामं तो करतो कीं आम्ही सर्व आश्चर्यचकित बनून जातों. या बालकांत एवढी शारीरिक शक्ति कशी आली असेल?

या त्याच्या विकासाचीं मानसिक कारणें मला अशीं वाटतातः— शारीरिक दोषांमुळें आपण मागें राहतां कामा नये, यासाठीं तो खूप प्रयत्नशील असतो. अरुण आणि हेमंतबरोबर त्याला भरभर चालतां येत नाहीं किंवा आनंद आणि सुधीरबरोबर त्याला धांवतां येत नाहीं याची त्याला जाणीव आहे, पण तरीदेखील आपल्या सोबत्यांच्या तो मागें पडत नाहीं. थोडे श्रम पडतील, त्रास होईल, तरी चालेल पण मागें पडायचें नाहीं, असें जणूं त्यानें ठरवून ठेवलेलें दिसतें.

पाय लंगडा असला तरी तो मनानें लंगडा नसल्यानें पायाची उणीव तो अधिक मानसिक शक्ति मिळवून भरून काढतो. व म्हणून या लंगड्या मुलाला त्याच्या मंडळींत पुढारीपण मिळालेलें आढळतें. तो लंगडा आहे ही गोष्ट कोणाच्याच लक्षांत येत नाहीं. आपल्या मित्रमंडळींत आपलें स्थान मिळवण्याकरतां हा या मुलाचा प्रयत्न पाहिला म्हणजे मुलें आपापल्या स्वभावाप्रमाणें कशीं प्रयत्नशील असतात त्याची चांगली कल्पना येते.

सामाजिक मान्यता ही मानवी मनाची एक मूलभूत गरज दिसते. त्यामुळें लंगडीं चालू लागतात, मुकीं बोलकीं होतात. बबनचा असा विकास बराचसा त्याच्या घरांत त्याला मिळणाऱ्या वागणुकीवरही अवलंबून आहे. त्याच्या वडिलांविषयीं तर मीं आधींच सांगून टाकलें कीं, त्यांच्या दृष्टीनें बबन म्हणजे खरोखरच हुषारीचा नमुना आहे. त्यामुळें बबनला त्याच्या पित्याकडून पाहिजे तसें सर्व प्रोत्साहन मिळत राहतें. मुलगा लंगडा म्हणून ही एक जन्माची ब्याद म्हणून त्याची अवगणना झाली असती तर बबनच्या चेहऱ्यावर आज जी प्रसन्नता दिसते ती दिसली नसती.

माता-पित्यांच्या मनांत आपल्या बालकांविषयीं विश्वास आणि समजुतदारपणा असला तर व्यंग असणाऱ्या मुलांनाही त्यांचा फायदा मिळतो, परंतु जेथें मुलाच्यावर कोणत्याही प्रकारचा विश्वास नसतो आणि जरूरी समजुतदारपणा दाखवला जात नाहीं, मूल म्हणजे खादाड, भांडखोर, स्वार्थी, दुष्ट अशाच समजुतीनें त्याच्याशीं सर्व व्यवहार होतात तेथें मुलांच्या मनालाही स्वाभाविक असामाजिक वळण लागतें. ज्या मुलाला त्याच्या घरांत मूर्ख, मंद समजण्यांत येतें तो मुलगा घराच्या बाहेर पडल्यानंतर त्याच्या सोबत्यांना मूर्ख आणि मंद समजून त्यांच्यावर खोटे वर्चस्व गाजवूं पाहतो. यामुळें बाहेरच्या मुलांशीं मैत्री जमत नाहीं. बबनच्या घरांत त्याच्या पित्याकडून ज्याप्रकारचें उत्तेजन मिळालें त्याच प्रकारचें उत्तेजन तो समाजापासूनही लंगडा असतांना मिळवूं शकला ही गोष्ट मला मननीय वाटते.

— ज्योतिभाई

पालकांचे विचार-पत्रव्यवहार

आदिवासी मुलांच्या भुकेचा प्रश्न

अध्यापन वर्गांची पाठाची परीक्षा होती. त्यासाठी परीक्षकबाई मुंबईहून आल्या होत्या. सकाळचें चहापाणी झालें व त्या सहजच समोरच्या व्हरांड्यांत बसल्या. अंगणांत वाळूचा ढीग होता. त्यावर आमच्या शाळेतील लहानमोठीं मुलें लोळत होतीं. "काय खाऊन आलीं असतील हीं मुलें!" त्यांनीं प्रश्न विचारला. खरंच, काय खाऊन आलीं असतील हीं मुलें! पाव, लोणी, बिस्किट, निदान चटकोर शिळी भाकरी! छे छे. त्यांपैकीं कांहींच हीं मुलें सकाळीं खात नाहींत. दूध तर औषधालाहि नाहीं. कुठें कुठें बिनदुधाचा चहाचा काढा मात्र पितात. त्या मुलांना दिवसांतून दोनच वेळां खायची सवय झाली आहे. दिवाळीनंतर भात पिकतें तेव्हां सरासरी दोन महिने पोट भरून भात खातात. लहान मुलांपुढेंहि भाताचा ढीगच्या ढीग असतो. पण त्यानंतर वर्षाचे दहा महिने तांदुळाची नुसती पेज खाऊन राहतात. फार तर नाचण्याची आंबील. मासे, कोंबडया, अंडीं, बोंबिल वगैरे हीं फारच क्वचित् वेळीं खातात. भाजीपाला, चटणी, लोणचें वगैरे गोष्टी त्यांच्या आहारांत जवळजवळ नसतातच. पावसाळ्याच्या शेवटीं शेवटीं स्वतःच्या वाडयांत होणारे पापडी, भेंडी, गोवारी, आंबाडी, दुधी एवढ्या भाज्या खातात. लाल भोपळ्यांचे वेल प्रत्येकाच्या झोपडीवर असतात. त्याला मोठमोठे भोपळे येतात. पण ही मंडळी ते भोपळे विकतात. स्वतःसाठीं क्वचितच खातात. फळफळावळ विकत आणून खाण्याचें त्यांना माहितच नाहीं. अशा परिस्थितीमध्यें या मुलांचा शारीरिक विकास कसा होत असेल? शहरामध्यें नियमितपणें जेवण, मधल्यावेळचे खाणें, तूप, दूध, फळें व टॉनिक वगैरे मुलांना देतों तरी आरोग्यदृष्टया थोड्याच मुलांची समाधानकारक रीतीने वाढ होते. येथे तर सर्वच गोष्टींचा अभाव आहे. मग हीं मुलें जगतात तरी कशीं! जगतात. जगण्यासाठीं वयाच्या चौथ्या पांचव्या वर्षापासूनच कोठेंहि झाडावर कच्चें फळ असलें कीं या मुलांची त्याच्यावर धाड पडलीच समजा; चिंचा, बोरं, आवळे, कैऱ्या, खजुऱ्या, हीं तर कच्चीं खातातच, पण सीताफळीच्या झाडावर असलेलीं सिताफळें टिकूं देत नाहींत. पोपईवर पोपई शिल्लक ठेवीत नाहींत, उंबराचीं फळें, वडाचे कोवळे कोंब, मोहाचीं फळें व फुलें हें सर्व त्यांच्या भक्ष्यस्थानी पडतें. त्यामुळें त्या बाजूला फळबागा वगैरे करण्याची लोकांना भीति वाटते. आदिवासी मुलांचा उपद्रव फार अशी तक्रार बागवान मंडळी करतात. पण वरीलप्रमाणें या मुलांचें खाणें पाहिलें तर बिचाऱ्यांचीं पोटांत खवखवलेली आग शान्त करण्यास दुसरा कोणता उपाय आहे? वरील प्रकाराशिवाय आणखी एका प्रकारचें खाणें हीं मुलें मिळवीत असतात. तें म्हणजे पाखरें मारून खाणें. उंदीर व ससे मारून खातात. जमिनींतील कंदमुळें उपटून खातात. हें भक्ष्य शोधण्यासाठीं हीं मुलें रानामध्यें फिरत असतात. त्यावेळीं त्यांना शाळेचें, अभ्यासाचें भान कसें रहाणार? दोन्ही वेळां पोटभर खायला मिळाल्याशिवाय या मुलांच्या मनाची शांति कशी होणार! मुलें खूप मेहनती आहेत. त्यांना काम दिल्यास आठ आठ तास काम करतात. भीक मागत नाहींत. आपण खात बसलों तरी आशाळभूतपणें उभीं रहात नाहींत. अशी मानी मंडळी आहे. त्यांच्या भुकेचा प्रश्न सुटल्याशिवाय शिक्षणाचा प्रश्न सोडवतां येणार नाहीं.

—अनुताई

सांडू बालामृत
व्हिटॅमिनयुक्त
मुलांचे टॉनिक



दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स,
चेंबूर, प्रायव्हेट लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस : चेंबूर, मुंबई ३८
—: स्थानिक शाखा :—
काळबादेवी, ठाकुरद्वार, परेल व दादर

पूर्वप्राथमिक भाषा–शिक्षण

लेखांक ६ वा : शब्दकोशाचा विकास

भौतिक जगाचा परिचय (पुढें चालू)

[मागील लेखांत आपण वस्तूंचे आकार आणि भौमितिक आकारविषयक शब्द बालकांना अनुभवद्वारें कसें पोंहोंचवतां येतील हें आपण पाहिलें. आकारानंतर वस्तूंचा रंग आणि त्यांच्या छाया किंवा वस्तूंच्या इतर संवेदनीय अनुभवाचा व त्यासंबंधींच्या शब्दांचा या लेखांत विचार करूं. —संपादक]

शब्दसमूह क्र. ७ : रंगसंवेदनविषयक शब्द : लाल, पिवळा, निळा, काळा, पांढरा, हिरवा, जांभळा, नारंगी, गुलाबी, तपकिरी, राखी, गडद रंग, फिका रंग, रंग छाया.

अनुभव योजना : चित्ररचना, शोभारचना, रंगतक्त्याचें मॉन्टेसोरी साधन, कागदकाम, फुलांचे रंग, आकाशाचे रंग, कपड्यांचे रंग, रंगीत पेन्सिलींचा उपयोग, जल रंगाचा उपयोग त्यांचीं मिश्रणें व चित्रणें.

शब्दसमूह क्र. ८ : रंगविषयक : सोनेरी, रुपेरी, केशरी, पोपटी, चंदनी, बदामी, मिरची, लिंबोणी, अबोली, किरमिजी, आकाशी, डाळिंबी, दुधी.

अनुभव योजना : हे रंग धारण करणाऱ्या वस्तूंच्या जोड्या दाखवून या रंगाशीं संबंध येईल तेव्हां त्यांची माहिती देणें व अनुभव व्यापक करणें.

शब्दसमूह क्र. ९ : स्पर्शादि संवेदनें, गुळगुळीत, खडबडीत, खरखरीत, टणक, मऊ, थंड, गरम, ऊन, सुखद, दुःखद हलका, भारी.

अनुभव योजना : वरील शब्दांत जो परस्परविरोधी अनुभव मिळतो, त्यामुळें लक्षांत राहण्यास मदत होते. आरशाचा पृष्ठभाग गुळगुळीत आहे, कागद खरखरीत आहे, दगडाचा पृष्ठभाग खडबडीत आहे किंवा उशी मऊ आहे, टेबलाचा पृष्ठभाग टणक आहे या प्रकारें विशिष्ट शब्दांचा अनुभव कोठें कोठें

पाडलीच आयुर्वेदीय असलेली
विको
वज्रदंती
दंतपेस्ट
विको त्वचा सौंदर्य साबण
विको लॅबोरेटरीज, दादर, मुंबई १४

मिळतो, यासंबंधीं प्रश्न–चर्चा उद्‌बोधक ठरते. रोजच्या उपयोगाच्या वस्तूंत हा विशिष्ट अनुभव कोठें कसा मिळतो हें मुलांच्या नजरेला आणून द्यावें. या संवेदनासाठीं योजलेलीं मॉन्टेसोरी साधनेंही उपयोगांत आणावीं. त्यावर स्मृतिखेळ द्यावे.

शब्दसमूह क्र. १० : स्वाद गंधादि : कडू, गोड, खारट, तिखट, अळणी, आंबट, मधुर, सुगंधी, दुर्गंधी, उग्र वास, मंद वास.

अनुभव योजना : फराळाच्या वेळीं, स्वाद–आणि गंध-संबंधित शब्दांच्या अर्थाविषयीचें अनुभवस्मरण, त्यासंबंधीच्य गोष्टी किंवा मॉन्टेसोरी तंत्रावर साधन–योजना करून यासंबंधींचें पाठही देतां येतील.

संवेदनीय भाषेबरोबर वस्तूंच्या गुणधर्मांच्या बाबतींतही बालमंदिरांत योग्य साधनें असल्यास बालकांना अनुभव मिळूं शकतो.

शब्दसमूह क्र. ११ : मोजमापें : मिलिमीटर, सेंटीमीटर, डेसीमीटर, मीटर, किलोमीटर, ग्राम, किलोग्राम, क्विन्टल, लिटर.

अनुभव योजना : बालमंदिराच्या स्वयंपाकघरांत हस्त-व्यवसायांत सूतकताई, बागकाम वगैरेंत जेथें जेथें मोजमापांचें काम योजतां येईल तेथें तीं योजिलीं पाहिजेत. त्यासाठीं बाल–मंदिरांत सर्व प्रकारच्या वजनामापांचे संच बसविले पाहिजेत. तराजू आणि बालकांचीं वजनें घेण्याचा तराजू, उंची मोजण्या-साठीं व्यवस्था या सर्व गोष्टी शाळेचा नित्यक्रम बनला पाहिजे.

शब्दसमूह क्र. १२ : कालमापन : सेकंद, मिनिट, तास, दिवस, सप्ताह, महिना, वर्ष, ऋतु.

अनुभव योजना : रोजच्या कार्यक्रमाच्या वेळेची नोंद : घड्याळाचा उपयोग करा. उदा. शाळा केव्हां उघडते; बंद होते, सूर्य केव्हां उगवतो, मावळतो, फराळाची वेळ, गोष्टीची वेळ; तासांचे ठोके, घड्याळाची टिकटिक, मोठा कांटा, लहान काटा काय दाखव तात, सुटीचा दिवस, जन्मदिवस–दिनांक, वर्तमान पत्रावरील दिनांक नोंद, निरनिराळे सण, उत्सव यांचे दिनांक, घड्याळ कॅलेंडर, वेळापत्रक यांचा उपयोग.

शब्दसमूह क्र. १३ : पूर्ण वस्तु व तिचे भाग : अर्धा, पाव, दुप्पट, तिप्पट, निमपट, अर्धा पेला, अर्धी पोळी, अर्धा तास, अर्धा दिवस, अर्धा महिना, अर्धा मीटर, अर्धा किलो, पाव किलो.

अनुभव योजना : मोजमापांच्या परिमाणांच्या परिचयांत हस्तव्यवसाय, बागकाम, वर्कशॉपमध्यें करवतीचा उपयोग करतांना, मातीकामांत या शब्दांचे सामान्य बोध चांगले घडण्याला अवकाश मिळतो.

शब्दसमूह क्र. १४ : पदार्थांचे गुणधर्म : छिद्रालुता Porosity संकोच आणि प्रसरणशीलता, वळणशीलता Maleability, स्थितिस्थापकता Elasticity, टणकपणा ठिसूळपणा, चिवटपणा, चिकटणें.

अनुभव योजना : खडू, मातीचें ढेकूळ, स्पंज, रेती, माठ यांत छिद्रालुता कशी असते तें दाखवणें. कपडे पिळतांना पाणी कोठून निघतें हें लक्षांत आणून देणे, पाण्याचा हवेचा संकोच व प्रसरण कसें होतें, माती दबणें, रेती दबणें, समुद्राच्या कांठी रेतीच्या खडुयांत हें दाखतां येईल. प्लॅस्टिसीन तार, रबर, चेंडू, मातीचें ढेकूळ, गोंद, कागदांतील चिवटपणा वगैरे अनुभव योजना मुलांनाही रसप्रद वाटते.

शब्दसमूह क्र. १५ : भौतिक शक्ति : वीज, घर्षण, उष्णता, ध्वनी, प्रकाश, लोहचुंबकत्व, गुरुत्वाकर्षण,

अनुभव योजना : बालमंदिरांत या विषयाशीं संबंधित असलेलीं अनेक शास्त्रीय खेळणीं मिळतात. कांहीं खेळणीं मुलें स्वतःही बनवूं शकतात. उदा० विजेचा लहानसा दिवा, विजेचा लहान पंखा, काचेचे दांडे, एबोनेटचे दांडे, कंगवे, रेशमी कापड, लहान दिवा, स्टोव्ह, लेन्स, कॅलिडोस्कोप, न्यूटनचे रंगचक्र, पटपट राव, गुरुत्वाकर्षणावर आधारलेलीं इतर खेळणीं यांच्या उपयोगाबरोबर त्याबाबतची भाषा–योग्य शब्द योग्य ठिकाणीं शिक्षकांनीं वापरले पाहिजेत. वर दिलेल्या शब्दांच्या यादींत शिक्षक मंडळी स्वानुभावाच्या अनुसंधानांत आणखी भर घालू शकतील.

शब्दसमूह क्र. १६ : भौतिक बल आणि यंत्रे : ॲक्स, स्प्रिंग, हिंज बेल्ट, लीव्हर, पुली, स्क्रू, यांत्रिक लाभ, स्क्रूड्रायव्हर, हतोडी, कातर, अडकित्ता इत्यादि.

अनुभव योजना : यंत्राचा उपयोग लहान मुलेंसुद्धां करीत असतात. हातोडीचा ठोका जोरानें बसावा म्हणून हातोडीचा दांडा योग्य ठिकाणीं पकडणें, सी–सॉवर दोन मुलांचीं वजनें समतोल करण्यासाठीं पाठीवर मागें–पुढें बसणें, कातरीचा उपयोग, वस्तु साध्या जमिनीवर सरकवणें व चाकावर घालून सरकवणें, स्क्रू हिंजेस यांचा उपयोग.

शब्दसमूह क्र. १७ : पदार्थांच्या रूपांचा अनुभव: घन, द्रव, वायुरूप हवेचा दाब इत्यादि.

अनुभव योजना : बर्फाचें रूपान्तर पाण्यांत होतांना व पाण्याचें पुन्हा वाफेंत होतांना, मेण घनरूप व वायुरूप, तेल थिजणें, हायड्रोजन फुग्यांत भरणें, हवा भरणें, काढून टाकणें, सायफनचा उपयोग, ड्रॉपर, पिचकाऱ्या व पंपाचा उपयोग.

—शेष नामले

निसर्ग कसें शिकवितो ?

शिकविण्याच्या अनेक पद्धतींपैकीं 'नैसर्गिक पद्धती' ही एक होय. परंतु तिचा अर्थ नीट न समजल्यामुळें आमच्यांतील कित्येक शिक्षकांची सदिच्छा व कळकळ असूनही, त्या पद्धतीचें ते यशस्वीरित्या अवलंबन करूं शकत नाहींत. बालकांच्या स्वभावांतील सहजता, सरलता, निर्मलता आणि त्यांच्यांत वसत असलेले सुप्त गुण व शक्ती यांना जागृत करून मार्गदर्शन करणें हें आम्हां शिक्षकांचें कर्तव्य आहे. परंतु या मार्गदर्शनांत आग्रह किंवा जबरदस्ती नको, तर बालकाला आपल्या स्वतंत्रतेचा साक्षात्कार होऊन त्यानें स्वयंस्फूर्तीनें व आनंदानें आपल्या प्रगतीची वाटचाल चालूं लागावें, हेंच आजच्या शिक्षणाचें उद्दिष्ट आहे. अशा पद्धतींत आम्ही बालकांच्या स्वतंत्रतेचा आदर करतोंच, पण त्यांच्या विकासाला व आनंदालासुद्धा जास्तीत जास्त वाव याच पद्धतींत मिळू शकतो. हेंच कार्य निसर्ग नांवाचा शिक्षक कसें करतो हें आपण पाहूं.

निसर्गाच्या सान्निध्यांत आमच्या सुप्त भावनांना आपोआप चालना मिळते. लतावृक्षांचें हलणे–डोलणे, फुलांचें बागडणे, व पक्ष्यांची किलबिल पाहून बालकाच्याही मनांत आनंदाच्या उर्मी उसळून येतात. त्याच्यांतला कलावंत जागृत होऊन तोही नाचूं–डोलूं लागतो. त्याचें मानस विशाल होऊन त्याला सर्वत्र मंगलता व आनंद दिसूं लागतात. ही सारी किमया निसर्गाची ! बालकांतला कलावंत तर त्यानें इतक्या हळूवार हातानें जागृत केला कीं बालकाला त्याचा पत्तासुद्धा लागला नाहीं. आपल्या आनंदाचे व कलेचे जनक आपणच या जाणिवेनें बालकाला आपल्या कर्तृत्वाचा साक्षात्कार झाला. आत्मविश्वास व प्रयत्नांचा आनंद आणि समाधान–अशा रितीनें निसर्ग बालकांत निर्माण करीत असतो. प्रातःकाळीं भव्य बालरवीचें दर्शन, सुखद वायु, हिरवेंहिरवेंगार रान, रुपेरी कणांचा अखंड वर्षाव निर्माण करणारा जलप्रपात् हें सारें दृष्य पाहिल्यावर त्याच्या मनांतला कलावंत जागृत झालाच पाहिजे. तें चित्र काढण्याची अनिवार इच्छा निर्माण होऊन बालचित्रकार आपल्या भावनांना चित्र काढून व्यक्त करूं लागतो. पाहिलेल्या दृष्याचा कायम ठसा त्याच्या मनावर उमटतो व घरीं आल्यावर तेंच चित्र कुंचला किंवा अन्य साधन घेऊन बालक अंकित करूं लागतो. चित्र पूर्ण झाल्यावर हें चित्र मीं स्वतः काढलें–याचा जनक केवळ मीच–या कल्पनेनें त्याला प्रगाढ आनंद होतो व शतपटीनें त्याचा आत्मविश्वासही वाढतो. विजयाचें समाधान मूर्तिमंत त्याच्या मुखावर विलसतें. निसर्गानें त्याच्या सुप्तगुणांना जागविलें व कांहीं अंशीं मार्गदर्शनपण केलें–पण अशा रीतीनें कीं त्यांत बालकाचें व्यक्तिमत्व किंवा स्वाभिमान यांना तिळमात्रसुद्धा न दुखविता ! अशी आहे निसर्गाची शिक्षणपद्धती !

निसर्गाच्या या पद्धतीनेंच मानवांतील खरें साहस व प्रयत्न प्रगट होतात. आमचें नौकानयनशास्त्र. भूगोल किंवा भूगर्भशास्त्र, प्राणी किंवा वनस्पतीशास्त्र इत्यादी अनेक शास्त्रांचा जनक निसर्ग आहे. पण त्याचें श्रेय तो मानवाला देत असतो. वास्तविक निसर्गाची शक्ती फार प्रचंड, पण खऱ्या शिक्षकांच्या व प्रेमळ मातापित्याच्या नात्यानें तो आम्हास 'निसर्गावर' विजय मिळाल्याचें पूर्ण समाधान लाभूं देतो. निसर्गाच्या शाळेंत आदर्श अथवा उपयोगितेपेक्षा 'विकासावरच' जास्त भर दिला जातो. आम्ही नवीन गोष्टी शिकाव्यात म्हणून, कधीकधी कठीण अशी वाटणारी स्थिती व कांहीं अबोधित नियम तो निर्माण करीत असतो. पण हें सारें केवळ मार्गदर्शन करण्याकरिताच !

आमच्या कला आणि साहित्याचा तो जनक आहे–तत्त्वज्ञानाचा तो आधार आहे–त्याच्या सौंदर्य, रम्यता व उदात्तता यांच्या त्रिगुणी संगमस्थानी आमचे धर्म व क्षेत्रें उदयास आलीं. मानवाला जीवन व शिक्षण–स्वातंत्र्य देणारा हा महान

झरणा

सुगंधित झरणपासून बनणारें तेल



आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.

१. गळणारे केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२. मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M. P. S

व शक्तिशाली शिक्षक अत्यंत प्रेमळ व आपल्या कलेंत बाकबगार असा आहे. शास्त्रीय विषयांतसुद्धां तो आम्हास कसें मार्गदर्शन करतो तें पहा! वाळलेल्या छोट्याशा बीचा होणारा वृक्षविस्तार, निसर्गातील विविध घटना आमच्या सुप्त जिज्ञासेला जागृत करून आमच्यांत प्रयत्नांची कधींहीं न विझणारी ज्योति प्रज्वलित करतात; आणि या प्रयत्नांतूनच आजच्यासारखा प्रचंड ज्ञानविस्तार निर्माण होतो. प्रत्येक शोधागणिक आम्हाला विजयाचें व स्वतःच्या 'कृतीचें' समाधान वाटतेंच कीं नाहीं! शेती, शस्त्रास्त्रें, विमानें, औषधें किंवा आधुनिक बालचंद्र यांच्यातील प्रत्येक शोधागणिक निसर्गावर मात केल्याचें समाधान आम्हास लाभतें. निसर्गानें आपला हेका किंवा पद्धती न चालवितां प्रयोगाचें व विकासाचें अनिर्बंध स्वातंत्र्य आम्हांस दिलें आहे. आम्ही त्याच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेऊन कधीं कधीं हानिकारक गोष्टी निर्माण करतों. आमचें वर्तन बेजबाबदार होतें. त्याचे भयानक परिणाम निसर्ग आमच्या दृष्टोत्पत्तीस आणतो–अशा वेळीं कधीं कधीं कांहीं सौम्य किंवा क्वचित् तीव्र शिक्षाही आम्हांस तो करतो. पण त्याच्या मूळ शिक्षणतत्वांना हा थोर शिक्षक कधींहि त्यागत नाहीं.

निसर्गाच्या शाळेंतील वातावरण असें असतें. त्याच्या शिक्षणाचीं मूलतत्वें म्हणजे स्वातंत्र्य, विकास व प्रेम हीं होत, तर प्रयोगाकरितां म्हणून असंख्य साधनें व नमुनें त्यानें तयार केले आहेत. प्रयोगांत पूर्ण स्वातंत्र्य असतें. कोठेंही सक्ती नाहीं. म्हणून तर आपण कधीं कधीं घोडचुका करतों! तरीपण निसर्ग आवश्यकतेखेरीज कधीही हस्तक्षेप करीत नाहीं. प्रत्येक गोष्ट तो आम्हास 'डायरेक्ट मेथडने' व आकलनीय उदाहरणानें शिकवीत असतो. काल्पनिक किंवा अप्रत्यक्ष स्वरूपांतील उदाहरणें तो आम्हास देत नसतो. निसर्गाच्या अशा पद्धतीलाच आपण शिक्षणाची 'नैसर्गिक पद्धती' म्हणतों.

निसर्गाचा आदर्श व त्याचे गुण आमच्यापैकीं किती शिक्षक आत्मसात करूं शकतात? आमच्या मानवी मर्यादा व जगांतील वस्तुस्थिती ओळखूनसुद्धां आम्ही शिक्षकांनी वरील पद्धतीनेच शक्यतोवर बालकांना मार्गदर्शन केलें पाहिजे. निसर्गाच्या महान व प्रभावी स्वरूपाची जरी आम्ही बरोबरी करूं शकलो नाहीं, तरी त्याच्या शिक्षणतत्त्वांचें जास्तींत जास्त अनुकरण आम्ही केलें पाहिजे. विद्यार्थ्यांसमोर आमचें स्वरूप तसलेच महान पण प्रेमळ असलें पाहिजे. आमचें व्यक्तिमत्व व चारित्र्य त्यांच्या सुप्त गुणांना जागविणारें व मार्गदर्शन करणारें असलें पाहिजे. आमच्या सहवासांत त्यांचें जीवन स्वयंस्फूर्तीने व स्वतेजानें विकसित झालें पाहिजे. 'शिक्षक' म्हणून निसर्गाचे व त्याच्या पद्धतीचे जास्तीत जास्त गुण आम्ही अंगीं बाणले पाहिजेत, तरच बालकांचा सर्वांगीण विकास होऊं शकतो.

याकरिता स्वच्छ, रम्य व मोकळें वातावरण व प्रयोगाकरितां साधनांची विपुलता ही प्रत्येक शाळेंतून निर्माण केली पाहिजे. सहली, निरीक्षण व स्पष्ट उदाहरणें या प्रत्यक्ष पद्धतीचा अवलंब केला पाहिजे—व मग आमच्या निरपेक्ष व नैसर्गिक प्रेमानें व आदर्श जीवनाच्या ज्योतीनें बालकांतील सुप्त गुणांच्या ज्योतीला उजळलें कीं, तीं बालकें आत्मनिर्भर व बुद्धिमान होऊन प्रगतीच्या राजमार्गावर अग्रेसर होतील.

—प्रभाकर चांदे

अभिप्राय व पोंच

'समाजहित' : मुंबई राज्याच्या समाज कल्याण सलाहकार मंडळाचें मुखपत्र : संपादक–श्रीमती पुष्पावती महेता आणि श्रीमती कुसुम वानखेडे. समाज कार्य ज्या लोकांत करावयाचें त्यांच्या भाषेंत या कार्याच्या संघटनेसाठीं आणि प्रचारासाठीं मुखपत्र असणें अत्यंत आवश्यक असल्यानें मुंबई राज्य मंडळानें 'समाजहित' मराठी आणि गुजराती भाषेंत सुरू केल्याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. या मासिकाच्या पहिल्या अंकांत मुंबई राज्यांत समाज कल्याण मंडळानें चालविलेल्या कार्याची माहिती, त्याचप्रमाणें येथील कांहीं समाज कार्य करणाऱ्या संस्थांची उपयुक्त माहिती देण्यांत आली आहे. समाज कल्याण कार्यांत मार्गदर्शक म्हणून या मासिकाचा फार उपयोग होईल असें आम्हांला वाटते.

'घर आणि शाळा' 'सोविएट संघाविषयीं प्रश्न आणि उत्तरें' : मूल्य अनुक्रमें २० व ५० नये पैसे. हीं दोनही पुस्तकें सोविएट सरकारच्या भारतीय माहिती विभागाकडून प्रकाशित झालीं आहेत. रशियासंबंधीं सामान्य वाचकाला त्यांत थोडक्यांत भरपूर माहिती देण्यांत आली आहे. रशिया हा आपला उत्तरेकडील शेजारी देश असल्यानें या देशाची माहिती करून घेणें हें जरूरीचें आहे. आपली ही गरज या प्रकारच्या पुस्तकांनीं अंशतः भागेल यांत शंका नाहीं. राजदूतवासाच्या या प्रकारच्या उपक्रमाबद्दल आम्ही त्यांचेंही मनःपूर्वक अभिनंदन करतों. —संपादक

नोटीस

नू. बा. शि. संघाच्या सभासदांस नोटीस : देण्यांत येतें कीं अमदाबाद-रायखड येथील गुजरात बाल-अध्यापन मंदिरांत रविवार दिनांक १९ ऑक्टोबर रोजीं दुपारीं ३-३० वाजतां नूतन बालशिक्षण संघाची सामान्य सभा पुढील कामकाजासाठीं योजण्यांत आली आहे. या सभेला संघाच्या सर्व प्रकारच्या सभासदांनीं उपस्थित व्हावें.

सभेचा कार्यक्रम

(१) गेल्या सभेचा अहवाल, (२) १९५७-५८ चा अहवाल व हिशोबास मंजुरी, (३) घटनेंत करावयाच्या सुधारणांबाबतचे ठराव, (४) अध्यक्षांच्या परवानगीनें इतर. घटनेबाबतच्या सुधारणा पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

Page 10 Section 25 : Add sub-Section No. V as uuder :

(v) Members of the Board of Trustees.

Page 11 Section 29 : Sub Section (ii) Substitute three for two.

Page 11 Section 32 A : Add after 32 as under

(32) A. One of the Vice Presidents shall work as the Chairman of the Niyantran as well as Madhyastha Vyavasthapak Mandal.

Page 13. Add after Section 41 (iii) sub Section iv as under—

(iv) Members of the Board of Trustees,

Page 16—Section 64. Add as under—

All the Trustees so appointed shall automatically be members of the Madhyastha Vyavasthapak Mandal and M. V. Mandal.

Page 16. Delete from 69 the last sentence and substitute the following—

The books of accounts of the Board of Trustees shall be open to inspection by the M. V. Mandal. The books of accounts kept by the Board of Trustees as well as kept by the M. V. Mandal shall be got audited by the Registered auditor and shall be published by the M. V. Mandal.

Page 16. Read Sectiou 70 as under—

The Board of Trustees shall keep true and accurate accounts of all the assets and funds vested in them or otherwise all the income derived therefrom and or all the property received by them or in their possession or under their control and of the expenditure incurred by them in the execution or administration of the Trust or in discharge of their duties as Trustees, the accounts of their management and administration.

यासंबंधीं संघाच्या घटनेची विस्तृत इंग्रजी प्रत त्या त्या प्रादेशिक शाखांच्या मंत्र्यांच्या कार्यालयांत वाचण्यासाठीं सभासदांना मिळूं शकेल.

चिटणीस
नू. बा. शि. संघ, मुंबई

बालशिक्षण आणि संघ समाचार

कोसबाड : तीन ते पांच वर्षांच्या आदिवासी मुलांसाठीं एक आश्रम संस्था सुरूं करण्यांत आली आहे. या संस्थेंत मोखाडा, वाळगांव, उंबरगांव तालुक्यांतून दूरदूरचीं ५० मुलें घेण्यांत आलीं आहेत. या मुलांचा सर्व खर्च संस्था करीत आहे.

स्थानिक थोडीशीं मोठ्या वयाचीं आदिवासी मुलें या वेळीं गुरें चारण्याचें काम मुख्यत्वें करीत असल्यानें जेथें कुरणांत ढोरें चारण्याचें काम होतें तेथेंच या मुलांसाठीं शाळा चालवण्याचा प्रयोग ग्राम-बाल शिक्षा केन्द्रानें सुरू केला आहे.

समाज कल्याण केन्द्र योजनेच्या ४५ विद्यार्थिनी ग्रामसेविका शिक्षणक्रमांत दाखल झाल्या आहेत. उद्योग वर्गांत पत्राळी बनवणें, अंबर चरखा व औषधी बाटल्यांची पॅकिंग कव्हर्स तयार करण्याचीं कामें काढलीं आहेत. औषधोपचार विभागावर ऑगस्ट महिन्यांत विशेष ताण पडला. टागोर जयंती, रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिनाचे कार्यक्रम उत्साहपूर्व साजरे झाले.

मुंबई : दिनांक ७ सप्टेंबर रोजीं नू. बा. शि. संघाच्या व्यवस्थापक व नियंत्रण मंडळाच्या सभा होऊन तींत संघाचें शिक्षणविषयक धोरण सुसूत्रित करणें, बालमंदिर, बालवाड्या, आणि अध्यापन मंदिराच्या शिक्षणक्रमांत अनुभवाच्या आधारें जरूरी फेरफार करणें, त्याचप्रमाणें बालशिक्षण आणि बाल-अध्यापनाच्या प्रगतीच्या दृष्टीनें संघाला सूचना करणें. यासाठीं

एक शिक्षण समिती नेमण्यांत आली असून तीत सभासदांची नांवें येणेंप्रमाणें आहेत; (१) श्री. श्रीमती ताराबाई मोडक, (२) श्री. भा. घों. कर्वे, (३)श्री. स. आ. केळकर (४) श्री. सुशीला कसुमगर (५) श्रीमती मनुबेन देसाई (६) श्री. माणेकलाल ठाकर, (७) श्री. यशस्वतिबेन भट्ट (८) डॉ. लीलावती शाह, (९) श्री. नरेन्द्र बघेका, (१०) श्री. चंदुलाल भट्ट (११) श्री. पुनमचंद शहा, (१२) श्री. सोमाभाई पटेल (१३) श्री. कुसुमबेन शाह, (१४) श्री. इश्वराचार्य, (१५) श्री. सरलाताई देवधर, (१६) श्री. हेमलता माळवी, (१७) श्री. रेवाशंकरभाई मेहता, (१८) श्री. ज्योतिभाई देसाई, (१९) श्री. अनुताई वाघ, (२०) शे. ना. नामले, (२१) श्री. ताराबाई परांजपे, (२२) श्री. कुमुदबेन शेवडे, (२३) श्री. हॅमॅकर, (२४) श्री. सुधाताई कुलकर्णी, (२५) श्री. मालिनीबाई देसाई, (२६) श्री. विमलाबाई शेवडे, याशिवाय बालशिक्षणाच्या प्रत्यक्ष अभिरूची असणाऱ्या मंडळींना निमंत्रणें करून त्यांच्या विचारांचा लाभ समितीनें घेत जावा असें सुचविण्यांत आले आहे.

गिजुभाई जयंति निधि: या वर्षी गिजुभाई जयंति दिवाळीच्या सुटींत येत असल्यानें डिसेंबरच्या पहिल्या सप्ताहांत सर्व संस्थांनीं ती साजरी करावी असें ठरविण्यांत आलें. या सप्ताहांत संघाशीं जोडलेल्या आणि मित्र संस्थांचा सरकार सहकार साधून केंद्रीय संस्थेला १० हजार रुपये मिळवून देण्याच्या दृष्टीनें प्रचार योजना करावी असें ठरलें.

बालअध्यापन नियंत्रण समितीसंबंधी ठराव : मुंबई राज्यांत सौराष्ट्र आणि नागविदर्भाचा समावेश झाल्यानें बा. अ. नि. समितीनें आपल्या १६ फेब्रुवारीच्या सभेंत बालअध्यापन नियंत्रण समितीचें विसर्जन करण्याचा जो ठराव केला आहे त्यास मंजुरी देण्यांत येत आहे. या समितीचे चिटणीस श्री. भा. घों. कर्वे यांनीं समितीचें कार्य निरलसपणें करून संघाला ज्याप्रकारें उपकृत करून ठेविलें आहे त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानण्यांत येत आहेत. समितीचें विसर्जन झालें तरी संघाला श्री. भा. घों. कर्वे यांनीं पूर्वीप्रमाणेंच मार्गदर्शन करावें व संबंध चालू ठेवावे अशी विनंती करण्यांत येत आहे.

संघाच्या प्रवेश व प्राविण्य शिक्षणक्रमाच्या १९५९ मधील एक शेवटची परीक्षा योजण्यासाठीं (१) श्री. ता. मोडक, (२) श्री. भा. घों. कर्वे, (३) श्री. शेष नामले, (४) श्री. शालिनीबाई मोघे, व (५) श्री. नरेन्द्र बघेका यांची एक परीक्षा समिति नेमण्यांत आली. संघाशीं जोडलेल्या सर्व बाल अध्यापन मंदिरांनीं, संघाच्या शिक्षणक्रमाच्या परीक्षेंत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसावयाचें असल्यास, ही शेवटची संधि आहे असें कळवून यापुढें संघाच्या परीक्षा बंद करण्यांत येत आहेत असें कळवण्यासंबंधीं सूचना द्याव्या असें ठरलें.

साभार पोंच आणि अभिप्राय

National Institute of Basic Education. 55 Friends Colony, New Delhi 14 या भारत सरकारनें योजलेल्या संस्थेनें प्रकाशित केलेलीं (1) Basic Education Abstracts, No. 1 & No. 2, (2) Buniyadi Talim No. 1 & No. 2, (3) Exhibitions in Basic Education (4) Basic Activities for non—Basic Schools हीं सहा उपयुक्त पुस्तकें पोहोंचलीं. बेसिक शिक्षण पद्धतीच्या विकासाला या प्रकारच्या साहित्यानें अत्यंत महत्त्वाची मदत होत आहे. बेसिक शिक्षणासंबंधी सामान्य शिक्षकांत आणि पालकांत अश्रद्धा असल्यानें ज्या ज्या ठिकाणीं या शिक्षणाला स्वरूप देण्याचे श्रद्धायुक्त प्रयत्न सुरू आहेत व त्यासंबंधी योग्य साहित्यही निर्माण होंत आहे, अशा साहित्याचें संकलन करून या क्षेत्रांतील संशोधनासंबंधीं माहिती देणें व या प्रकारच्या कार्य करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शक होईल अशा प्रकारचें साहित्य प्रकाशित करणें हें जें कार्य या राष्ट्रीय संस्थेनें अंगिकारलें आहे तें अत्यंत उपयुक्त आहे.

Indian Education Abstracts हें त्रैमासिक भारत सरकारच्या शिक्षणखात्याच्या जे केंद्रीय शैक्षणिक पुस्तकालयातर्फे सुरू करण्यांत आलें; त्याचे आत्तापर्यंत सहा अंक निघालेले आहेत. यांत शिक्षणविषयक ग्रंथ आणि मासिकांतून प्रकाशित होत असलेल्या साहित्याबद्दल सूचक नोंदी असतात. ह्या नोंदीवरून विद्यापीठांत अथवा शिक्षण संस्थांत विशिष्ट विषयाचा अभ्यास करणारांना व संशोधन कार्य करणारांना फार उपयोग होऊन त्यांचें कार्य फार सरळ होणार आहे. Abstracts मध्ये नमूद केलेलें पुष्कळसें साहित्य संदर्भासाठीं केंद्रीय पुस्तकालयांतून मिळूं शकतें. त्याबद्दल The Librarian, Central Educational Library, Ministry of Education Govt. of India, New Delhi या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

शिक्षण-खात्याच्या दोनही उपक्रमाबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. संपादक

लोखंड खाणारे उंदीर

(पंचतंत्रांतील एक कथा)


नातुक नांवाच्या एका व्यापाऱ्याला व्यापारांत जबर खोट बसून त्याचा सारा पैसा त्यांत गमावला. तेव्हां तो घर सोडून परदेशीं व्यापारधंदा करण्यासाठीं निघाला. पण निघायच्या पूर्वी आपला परम मित्र लक्ष्मण याच्याकडे जाऊन तो म्हणाला, "हें बघ मित्रा, हा माझा तराजू मी परत येईपर्यंत तुझ्यापाशीं ठेवून दे. मला तो विकून टाकायचा नाहीं. कारण आमच्या घराण्यांत कैक पिढ्या तो चालत आला आहे." आणि असं म्हणून तराजू मित्राकडे ठेवून तो मार्गाला लागला.

थोड्याच कालांत नातुकानं पुष्कळ पैसा मिळविला आणि मग परत तो आपल्या गांवीं आला. येतांक्षणींच लक्ष्मणाकडे जाऊन तो म्हणाला, "खूब उपकार झाले बरं तुझे मित्रा! माझा तराजू तूं इतके दिवस राखून ठेवलास— पण आतां देतोस का माझा तो परत?"

"हं, हं, तराजू ना?" लक्ष्मण म्हणाला, "अरे, तो उंदरांनीं खाऊन टाकला कीं रे!"

"वा!" संतापानं नातुक ओरडला, "एवढा जंगी तराजू तो!— उंदीर खातील तरी कसे? चांगलं अडीचशें शेर वजन होतं ना त्याचं!"

"होय ना! पण उंदीरच इतके भयंकर झाले आहेत माझ्या घरांत कीं त्याचा फन्ना उडवायला त्यांना कितीसा उशीर रे!"



नातुक क्षणभर विचारांत पडला. मग चेहेऱ्यावर हास्य आणून तो म्हणाला, "खरंच मित्रा! तुझा तरी काय वरं दोष यांत? माझंच नशिब खोटं! वरं आहे. मीं जरा नदीवर जाऊन आतां स्नान करून येतों. माझे कपडे सांभाळण्यासाठीं तुझ्या मुलाला जरा पाठवतोस का माझ्यावरोबर?"

काय मोठंसं त्यांत, असा विचार करून लक्ष्मणानं रुकार दिला.

नदीवरून परत येतांना वाटेंतल्या एका गुहेंत नातुकानं मुलाला ढकलून दिलं आणि दारावर एक मोठी जडशी शिळा ठेवून त्याला कोंडून ठेवलं. नंतर तो लक्ष्मणाच्या घरीं आला. लक्ष्मणानं विचारलं, "अरे, माझा मुलगा कुठं?"

नातुकानं सांगितलं, "नदीकिनाऱ्यावर तो बसला होता ना, त्यावेळीं वरून एका मोठ्या ससाण्यानं त्याच्यावर एकदम झडप घातली आणि त्याला उंच पळवून नेला!"

"अरे थापाड्या!" लक्ष्मण ओरडला, "पंधरा वर्षांच्या एवढ्या मोठ्या मुलाला ससाणा रे उचलून कसा नेईल?"

"कसा म्हणजे? जर का अडिचशें शेर वजनाचा लोरांडी तराजू उंदरांना खातां येतो, तर पंधरा वर्षांच्या पोराला ससाणा कां पळवूं शकणार नाहीं? तेव्हां आतां मित्रा, तुझा मुलगा जर तुला पाहिजे असेल, तर माझा तराजू देऊन टाक कसा!"

मात्रा अचुक लागू पडली. नातुकाला त्याचा तराजू मिळाला!

तात्पर्य: ज्याची बाजू सत्याची आहे तो लबाडी सहज चव्हाट्यावर आणूं शकतो. 'वनस्पति'चेच उदाहरण घ्या. वनस्पति हे हितकर अन्न आहे, हें नामांकित शास्त्रज्ञांनीं स्पष्ट दाखवून दिलें आहे. प्रयोगान्तींच हें सिद्ध झालें आहे.

डालडा वनस्पति शुद्ध वनस्पति तेलांपासून सक्त सरकारी नियमानुसार बनविली आहे. 'डालडा' सर्व स्वयंपाक प्रकारांसाठी उपयुक्त असून 'अ' आणि 'ड' ही जीवनसत्त्वे त्यानें अल्प खर्चांत मिळूं शकतात. त्याच्या प्रत्येक औंसांत ७०० आंतरराष्ट्रीय युनिट्स् म्हणजे उत्तम तुपांत असतें तितकेच 'अ' जीवनसत्त्व घातलेलें असतें. तेव्हां सर्व ठिकाणच्या सुगृहिणींचें असेंच एकमत झालेलें असलें तर आश्चर्य नव्हें कीं 'डालडा' स्वयंपाकासाठीं उत्तम तर आहेच, पण अन्न म्हणूनहि उपयुक्त आहे.

DL. 445-X52 MA

हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड, मुंबई

मुद्रक व प्रकाशक:—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर-मुंबई १४.

मुद्रणस्थान:—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

एक शिक्षण समिती नेमण्यांत आली असून तीत सभासदांची नांवें येणेंप्रमाणें आहेत; (१) श्री. श्रीमती ताराबाई मोडक, (२) श्री. भा. घों. कर्वे, (३) श्री. स. आ. केळकर (४) श्री. सुशीला कसुमगर (५) श्रीमती मनुबेन देसाई (६) श्री. माणेकलाल ठाकर, (७) श्री. यशस्वतिबेन भट्ट (८) डॉ. लीलावती शाह, (९) श्री. नरेन्द्र बघेका, (१०) श्री. चंदुलाल भट्ट (११) श्री. पुनमचंद शहा, (१२) श्री. सोमाभाई पटेल (१३) श्री. कुसुमबेन शाह, (१४) श्री. इश्वराचार्य, (१५) श्री. सरलाताई देवधर, (१६) श्री. हेमलता माळवी, (१७) श्री. रेवाशंकरभाई मेहता, (१८) श्री. ज्योतिभाई देसाई, (१९) श्री. अनुताई वाघ, (२०) शे. ना. नामले, (२१) श्री. ताराबाई परांजपे, (२२) श्री. कुमुदबेन शेवडे, (२३) श्री. हॅमॅकर, (२४) श्री. सुधाताई कुलकर्णी, (२५) श्री. मालिनीबाई देसाई, (२६) श्री. विमलाबाई शेवडे, याशिवाय बालशिक्षणाच्या प्रत्यक्ष अभिरूची असणाऱ्या मंडळींना निमंत्रणें करून त्यांच्या विचारांचा लाभ समितीनें घेत जावा असें सुचविण्यांत आले आहे.

गिजुभाई जयंति निधि: या वर्षी गिजुभाई जयंति दिवाळीच्या सुटींत येत असल्यानें डिसेंबरच्या पहिल्या सप्ताहांत सर्व संस्थांनीं ती साजरी करावी असें ठरविण्यांत आलें. या सप्ताहांत संघाशीं जोडलेल्या आणि मित्र संस्थांचा सरकार सहकार साधून केंद्रीय संस्थेला १० हजार रुपये मिळवून देण्याच्या दृष्टीनें प्रचार योजना करावी असें ठरलें.

बालअध्यापन नियंत्रण समितीसंबंधी ठराव: मुंबई राज्यांत सौराष्ट्र आणि नागविदर्भाचा समावेश झाल्यानें बा. अ. नि. समितीनें आपल्या १६ फेब्रुवारीच्या सभेंत बालअध्यापन नियंत्रण समितीचें विसर्जन करण्याचा जो ठराव केला आहे त्यास मंजुरी देण्यांत येत आहे. या समितीचे चिटणीस श्री. भा. घों. कर्वे यांनीं समितीचें कार्य निरलसपणें करून संघाला ज्याप्रकारें उपकृत करून ठेविलें आहे त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानण्यांत येत आहेत. समितीचें विसर्जन झालें तरी संघाला श्री. भा. घों. कर्वे यांनीं पूर्वीप्रमाणेंच मार्गदर्शन करावें व संबंध चालू ठेवावे अशी विनंती करण्यांत येत आहे.

संघाच्या प्रवेश व प्राविण्य शिक्षणक्रमाच्या १९५९ मधील एक शेवटची परीक्षा योजण्यासाठीं (१) श्री. ता. मोडक, (२) श्री. भा. घों. कर्वे, (३) श्री. शेष नामले, (४) श्री. शालिनीबाई मोघे, व (५) श्री. नरेन्द्र बघेका यांची एक परीक्षा समिति नेमण्यांत आली. संघाशीं जोडलेल्या सर्व बाल अध्यापन मंदिरांनीं, संघाच्या शिक्षणक्रमाच्या परीक्षेंत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसाव्याचें असल्यास, ही शेवटची संधि आहे असें कळवून यापुढें संघाच्या परीक्षा बंद करण्यांत येत आहेत असें कळवण्यासंबंधीं सूचना द्याव्या असें ठरलें.

साभार पोंच आणि अभिप्राय

National Institute of Basic Education. 55 Friends Colony, New Delhi 14 या भारत सरकारनें योजलेल्या संस्थेनें प्रकाशित केलेलीं (1) Basic Education Abstracts, No. 1 & No. 2, (2) Buniyadi Talim No. 1 & No. 2, (3) Exhibitions in Basic Education (4) Basic Activities for non—Basic Schools हीं सहा उपयुक्त पुस्तकें पोहोंचलीं. बेसिक शिक्षण पद्धतीच्या विकासाला या प्रकारच्या साहित्यानें अत्यंत महत्वाची मदत होत आहे. बेसिक शिक्षणासंबंधी सामान्य शिक्षकांत आणि पालकांत अश्रद्धा असल्यानें ज्या ज्या ठिकाणीं या शिक्षणाला स्वरूप देण्याचे श्रद्धायुक्त प्रयत्न सुरू आहेत व त्यासंबंधी योग्य साहित्यही निर्माण होंत आहे, अशा साहित्याचें संकलन करून या क्षेत्रांतील संशोधनासंबंधीं माहिती देणें व या प्रकारच्या कार्य करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शक होईल अशा प्रकारचें साहित्य प्रकाशित करणें हें जें कार्य या राष्ट्रीय संस्थेनें अंगिकारलें आहे तें अत्यंत उपयुक्त आहे.

Indian Education Abstracts हें त्रैमासिक भारत सरकारच्या शिक्षणखात्याच्या जे केंद्रीय शैक्षणिक पुस्तकालयातर्फे सुरू करण्यांत आलें, त्याचे आत्तापर्यंत सहा अंक निघालेले आहेत. यांत शिक्षणविषयक ग्रंथ आणि मासिकांतून प्रकाशित होत असलेल्या साहित्याबद्दल सूचक नोंदी असतात. ह्या नोंदीवरून विद्यापीठांत अथवा शिक्षण संस्थांत विशिष्ट विषयाचा अभ्यास करणारांना व संशोधन कार्य करणारांना फार उपयोग होऊन त्यांचें कार्य फार सरळ होणार आहे. Abstracts मध्ये नमूद केलेलें पुष्कळसें साहित्य संदर्भासाठीं केंद्रीय पुस्तकालयांतून मिळूं शकतें. त्याबद्दल The Librarian, Central Educational Library, Ministry of Education Govt. of India, New Delhi या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

शिक्षण-खात्याच्या दोनही उपक्रमाबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. संपादक

लोखंड खाणारे उंदीर

(पंचतंत्रांतील एक कथा)

नातुक नांवाच्या एका व्यापाऱ्याला व्यापारांत जबर खोट बसून त्याचा सारा पैसा त्यांत गमावला. तेव्हां तो घर सोडून परदेशीं व्यापारधंदा करण्यासाठीं निघाला. पण निघायच्या पूर्वी आपला परम मित्र लक्ष्मण याच्याकडे जाऊन तो म्हणाला, "हें बघ मित्रा, हा माझा तराजू मी परत येईपर्यंत तुझ्यापाशीं ठेवून दे. मला तो विकून टाकायचा नाहीं. कारण आमच्या घराण्यांत कैक पिढ्या तो चालत आला आहे." आणि असं म्हणून तराजू मित्राकडे ठेवून तो मार्गाला लागला.

थोड्याच कालांत नातुकानं पुष्कळ पैसा मिळविला आणि मग परत तो आपल्या गांवीं आला. येतांक्षणींच लक्ष्मणाकडे जाऊन तो म्हणाला, "खूब उपकार झाले बरं तुझे मित्रा! माझा तराजू तूं इतके दिवस राखून ठेवलास— पण आतां देतोस का माझा तो परत?"

"हं, हं, तराजू ना?" लक्ष्मण म्हणाला, "अरे,तो उंदरांनीं खाऊन टाकला की रे!"

"वा!" संतापानं नातुक ओरडला, "एवढा जंगी तराजू तो!— उंदीर खातील तरी कसे? चांगलं अडीचशें शेर वजन होतं ना त्याचं!"

"होय ना! पण उंदीरच इतके भयंकर झाले आहेत माझ्या घरांत कीं त्याचा फना उडवायला त्यांना कितीसा उशीर रे!"

नातुक क्षणभर विचारांत पडला. मग चेहेऱ्यावर हास्य आणून तो म्हणाला, "खरंच मित्रा! तुझा तरी काय वरं दोष यांत? माझंच नशिब खोटं! वरं आहे. मीं जरा नदीवर जाऊन आतां स्नान करून येतों. माझे कपडे सांभाळण्यासाठीं तुझ्या मुलाला जरा पाठवतोस का माझ्यावरोवर?"

काय मोठंसं त्यांत, असा विचार करून लक्ष्मणानं रुकार दिला.


नदीवरून परत येतांना वाटेंतल्या एका गुहेंत नातुकानं मुलाला ढकलून दिलं आणि दारावर एक मोठी जडशी शिळा ठेवून त्याला कोंडून ठेवलं. नंतर तो लक्ष्मणाच्या घरीं आला. लक्ष्मणानं विचारलं, "अरे, माझा मुलगा कुठं?"

नातुकानं सांगितलं, "नदीकिनाऱ्यावर तो वसला होता ना, त्यावेळीं वरून एका मोठ्या ससाण्यानं त्याच्यावर एकदम झडप घातली आणि त्याला उंच पळवून नेला!"

"अरे थापाड्या!" लक्ष्मण ओरडला, "पंधरा वर्षांच्या एवढ्या मोठ्या मुलाला ससाणा रे उचलून कसा नेईल?"

"कसा म्हणजे? जर का अडिचशें शेर वजनाचा लोरांडी तराजू उंदरांना खातां येतो, तर पंधरा वर्षांच्या पोराला ससाणा कां पळवूं शकणार नाहीं? तेव्हां आतां मित्रा, तुझा मुलगा जर तुला पाहिजे असेल, तर माझा तराजू देऊन टाक कसा!"

मात्रा अचुक लागू पडली. नातुकाला त्याचा तराजू मिळाला!



तात्पर्य: ज्याची बाजू सत्याची आहे तो लवाडी सहज चव्हाट्यावर आणूं शकतो. 'वनस्पति'चेच उदाहरण घ्या. वनस्पति हें हितकर अन्न आहे, हें नामांकित शास्त्रज्ञांनीं स्पष्ट दाखवून दिलें आहे. प्रयोगान्तींच हें सिद्ध झालें आहे.


डालडा वनस्पति शुद्ध वनस्पति तेलापासून सक्त सरकारी नियमानुसार बनविली आहे. 'डालडा' सर्व स्वयंपाक प्रकारांसाठीं उपयुक्त असून 'अ' आणि 'ड' ही जीवनसत्त्वे त्यानें अल्प खर्चांत मिळूं शकतात. त्याच्या प्रत्येक औंसांत ७०० आंतरराष्ट्रीय युनिट्स् म्हणजे उत्तम तुपांत असतें तितकेंच 'अ' जीवनसत्त्व घातलेलें असतें. तेव्हां सर्व ठिकाणच्या सुगृहिणींचें असेंच एकमत झालेलें असलें तर आश्चर्य नव्हें कीं **'डालडा' स्वयंपाकासाठीं उत्तम तर आहेच, पण अन्न म्हणूनहि उपयुक्त आहे.**

DL. 445-X52 MA

हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड, मुंबई

मुद्रक व प्रकाशकः—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर—मुंबई १४.
मुद्रणस्थानः—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

हजारों कुटुंबांतून आतां अत्यंत खुषीनें
वापरलें जात आहे



* गळणारे केंस बंद करतें व केंसांची वाढ करतें.
* मेंदूला शीतलता आणतें व केंस तुकतुकीत बनवितें.
* यशस्वी प्रयोगांनंतरच जनतेसमोर टेवलें गेलें आहे.

लोमा प्रॉडक्टसची एक अनमोल कृति

: सोल एजन्ट्स :

एम्. एम्. खंभातवाला, रायपूर, अहमदाबाद

एजन्ट्स : **सी. नरोत्तम अँड कं.,**
मंगलदास रोड, मुंबई–२.
टेलिफोन नं. ३०५७५

M P. 5








नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष [illegible] वें : अंक ७ वा

आक्टोबर १९५८



ज्ञान महत्वाचें आहे. परंतु त्यापेक्षां त्याचा उपयोग करणाऱ्या शक्तीचें महत्व अधीक आहे आणि त्याहीपेक्षां आणखी महत्वाचें म्हणजे मनुष्याचीं श्रद्धा-केन्द्रें कोणतीं आहेत हें. तो 'कशाला' चांगलं आणि 'कशाला' वाईट समजतो? त्यांच्या जीवनांत कांहीं धोरण अथवा मूल्यें आहेत का कीं ज्यांच्यासाठीं तो मरायला आणि जगायला तत्पर असतो?

—सर आर. लिविंग्स्टन

☆


: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक

संपादक


श्री. शेष नामले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई-१४.	३७ नये पैसे



सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी

— सोल डिस्ट्रीब्युटर्स —
ए. व्ही. आर. ए. अँन्ड कं., मुंबई २



दोन्ही खंडांत सर्वत्र विकले जातें

आफ्रिका, इन्डोनेशिया, इराण, पॅरिस,
इंग्लंड आणि अमेरिका येथें खुशाल.


दोन्ही गोलार्धांतील बहुतेक सर्व राष्ट्रांत जेथे विकले जातें
तेथे दिवसेंदिवस मागणी वाढतच आहे.


केसांना नैसर्गिकरीत्या
काळेभोर करण्यासाठी जगभर
मान्यता पावलेले.


MPS-1140

सोल एजंट्स: एम्. एम्. खंगातवाला, अहमदाबाद १.
एजंट्स: सी. नरोतम अँण्ड कं., मुंबई-२.फो. ३०५७६—

— सोल डिस्ट्रीब्युटर्स —
दि इंडस्ट्रीयल सर्व्हीसिंग
गोदावरी (मुंबई अेस डी)
10, आनंद स्ट्रीट, मुंबई २.







"टिनोपाल" हा जे. आर. गायगी, एस. ए. चा ल, लिमिटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेड मार्क आहे.

"तुमची कन्या तशी फारशी सुरेख...
अं अं अं...आहे असें म्हणतां येणार नाहीं...
परंतु ती माझ्या चिरंजिवांचा संसार मात्र
चांगला करील यांत शंका नाहीं. मोठी
समंजस मुलगी दिसली ती...कारण आपल्या
साडीसाठीं तिनें टिनोपाल वापरलें होतें."

कारखानदार: सुहृद गायगी प्रायव्हेट लिमिटेड, वाडी वाडी, बडोदा.

एकमेव वितरक: सुहृद गायगी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पो. ऑ.. बॉक्स ९६५, मुंबई

थोड्याशा टिनोपालनें स्वच्छ कपडे सर्वांत जास्त चमकदार पांढरे शुभ्र होतात

SISTA S SG-42 MAR

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई — उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक

कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी — कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे

चिटणीस : श्री. शेष नामले — उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण संस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपांत पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गांतून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठीं संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, **नूतन बाल-शिक्षण संघ,**
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे — श्री. अनुताई वाघ

सौ. सरलाताई देवधर — श्री. भा. धों. कर्वे

सौ. मालिनीबाई परांजपे

अनुक्रमणिका

प्रौढ विभाग

संपादकीय—	शेष नामले
सामाजिकतेचें वळण—	श्री. ताराबाई मोडक
प्रेमाची दूरदृष्टि प शिजलें म्हणून पचलें } —	ऐमा मेंगदे
बालकांची प्रगति-नोंद—	शेष नामले
पूर्व प्राथमिक भाषा-शिक्षण—	शेष नामले
शिवाय-बाल शिक्षण व संघ समाचार वगैरे—	

बाल विभाग

वार्ली लोकगीत—	अनुताई वाघ
चंदामामा पकडूं या—	शरद साटम
सूर्यदेव वरि आला—	बा. मा. हराळे
माझी बाहुली—	सौ. उषा रामचंद्र जोशी
खाऊन टाका मटामटा—	सरलाताई देवधर
काठीचा घोडा—	सुमन फाळे
फुलबाग—	सौ. उषा रामचंद्र जोशी
ढग—	अनुताई वाघ
चलरे गड्या—	शकुताई
विचारतो मी सांगा मजला—	दत्तारामः आ. वारस्कर

महत्त्वाच्या सूचना :

ग्राहकांस—

१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.
'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन-विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल-शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नांवावर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारां-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नांवाचें एक सदर चाल-विण्यांत येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्यांना स्थान देण्यांत येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यांनीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

लेखकांस—

१) 'शिक्षण-पत्रिकें'त लेख लिहूं इच्छिणारांनीं आपलें लेखन कागदाच्या एकाच बाजूवर करावें. तें दर महिन्याच्या ता. १ च्या आंत संपादन कार्यालयाकडे पाठवावें. पसंत नसलेल्या लेखांबरोबर पुरेसें पोस्टेज असल्यास लेख परत करण्यांत येतील.

२) 'शिक्षण-पत्रिका' कोणत्याहि महिन्यापासून सुरू करतां येते.

३) 'शिक्षण-पत्रिका'. प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस पोस्टांत पडते. सामान्यतः ता. २५ पर्यंत ती सर्वांना मिळते. तशी न मिळाल्यास ग्राहकांनीं ता. ३० च्या आंत खालीं दिलेल्या पत्त्यावर कळवावें.

४) 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रत्येक ग्राहकाचा नंबर पत्रिकेच्या वेष्टनावर लिहिलेला असतो. व्यवस्थापक-कार्यालयाशीं पत्रव्यवहार करतांना हा नंबर ग्राहकानें अवश्य कळवावा.

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका'
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण–खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल–शिक्षण–संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ७] मुंबई [ऑक्टोबर १९५८

संपादकीय

पहिली इयत्ता बालमंदिरांत करून द्या

आपल्या येथील पूर्व–प्राथमिक संस्थेंत सामान्यतः अडीच वर्षें वयाच्या बालकांना प्रवेश मिळतो. त्यानंतर तीन अथवा साडेतीन वर्षें मूल या संस्थेंत असतें आणि पूर्ण सहा वर्षांच्या आसपास या मुलाला प्राथमिक शाळेंत प्रवेश मिळू शकतो. या पूर्ण सहा वर्षांच्या आसपासपर्यंतच्या कालात कांहीं बालमंदिरांत मुलांची पहिली इयत्ता करून घेतली जाते, तर कांहीं बालमंदिरांत या प्रकारची जबाबदारी न घेतां मुलांना प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गांतच पाठविण्यात येतें. या बाबतींत अनेक बालशिक्षकांचा अनुभव असा आहे कीं लेखन–वाचनावर जर संस्थेनें त्या विषयासंबंधींचें भरपूर साहित्य ठेवून लेखन–वाचन–गणित या विषयावर पुरता भर दिला, तर पूर्ण सहा वयाच्या कांहीं मुलांचा पहिल्या इयत्तेचा अभ्यासक्रम सहज करून घेतां येतो, तर कांहीं मुलाना इतपत प्रगति करणें बरेंच जड जातें. पालकांना स्वाभाविकपणें असें वाटतें कीं तीन वर्षें मुलाचें शिक्षण जर पूर्वप्राथमिक संस्थेंत केलें तर निदान प्राथमिक शाळेचें एक वर्ष तरी पदरांत पडावें; परंतु सर्वच मुलांची या वयाला पहिल्या वर्गाची परीक्षा देऊन पास होण्यासारखी तयारी होत नसल्यानें कांहीं मुलांवर संस्थेला लेखन–वाचन–गणित शिक्षणाची जबरदस्ती तरी करावी लागते किंवा पालकांना नाखूष तरी करावें लागतें. पूर्वप्राथमिक संस्थांना यामुळें एक मोठा पेंच निर्माण होतो. या परिस्थितींतून मार्ग काढायचा म्हणजे एक तर पूर्वप्राथमिक शिक्षणाचें उद्दिष्ट अधिकृतपणें स्पष्ट केलें गेलें पाहिजे. या उद्दिष्टांत लेखन–वाचन–गणितादि तांत्रिक (Formal) शिक्षणाच्या जबाबदारींतून पूर्वप्राथमिक संस्थांची कालमर्यादा एकाद्या वर्षानें कमी करून एकतर या संस्थांना मुक्त केलें पाहिजे अथवा या कालमर्यादेत एकाद्या वर्षाची वाढ करून या शिक्षणाच्या प्रारंभिक शिक्षणाची थोडी जबाबदारी त्यांच्यावर टाकली पाहिजे.

बालकांची लेखन–वाचनाभिमुखता

अलीकडील मानसशास्त्रीय संशोधनांत 'वाचनाभिमुखता' ही सामान्यतः साडेसहा वर्षें वयाला विकसत असल्याचें आढळून आलें आहे. ही अभिमुखता कांहीं बालकांना त्यांच्या विशिष्ट परिस्थितीमुळें आधीं येऊं शकते, तर कांहीं बालकांत ती याहीपेक्षां उशिरां येते. म्हणून वाचनाभिमुखतेचें सामान्य मानसिक वय साडेसहा समजण्यांत येतें. ही अभिमुखता विकसण्याचे आधीं जर या बाबतींत शिक्षणाची संस्थेकडून अथवा पालकांकडून घाई अगर सक्ती झाली, तर त्याचे मुलाच्या पुढील प्रगतीवर कायमी स्वरूपाचे घातक परिणाम होत असल्याचें आढळून आलें आहे.

मानसशास्त्राच्या या संशोधनांत ही अभिमुखता कांहीं अंशीं लेखन–वाचन–गणितादि विषयांचें शिक्षण ज्या पद्धतीनें अथवा प्रकारानें केलें जाते त्यावरही अवलंबून असण्याची शक्यता असल्याचें नमूद केलें आहे.

पूर्वप्राथमिकचें एक वर्ष वाढवणेंच श्रेयस्कर

वाचनाभिमुखतेचें वय आणि सध्याच्या प्राथमिक शिक्षण पद्धति आणि मुलांच्या विचाराला महत्त्व दिल्यास पूर्वप्राथमिक संस्थेचें एक वर्ष कमी न करता तें वाढवणेंच अधिक श्रेयस्कर ठरतें. यामुळें पूर्वप्राथमिक संस्थेंत अडीच ते सहा ऐवजीं सात वर्षेंपर्यंत मुलांना ठेवण्यांत यावें व सध्याच्या प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गाची जबाबदारी पूर्वप्राथमिक संस्थांवर सोपविण्यांत यावी. असें केल्यास लेखन–वाचनाभिमुखता लवकर किंवा उशिरां विकसणाऱ्या मुलांची अडचण त्यामुळें दूर होईल. लेखन–वाचनादि विषयांत त्यांच्यावर निष्कारण जबरदस्ती शिक्षकांना करावी लागणार नाहीं. त्यांची प्रगति त्यांच्या स्वाभाविक गतीप्रमाणें होऊं शकेल. या योजनेचा आणखी एक विशेष फायदा मुलांना मिळेल. पूर्वप्राथमिक

शिक्षण-पद्धति आणि प्राथमिक शिक्षण-पद्धतींत सध्या तरी फार मोठा फरक आढळतो. एके ठिकाणीं बालकांच्या व्यक्तिगत गरजा आणि गति लक्षांत घेऊन त्याला अनुसरण्याचा प्रयत्न असतो, तर प्राथमिक शाळेचें शिक्षणतंत्र हें सामुहिक अथवा वर्गपद्धतीचें असतें. त्यांत वैयक्तिक गरजांपेक्षां सामूहिक गरजांना स्वाभाविकपणें प्राधान्य असतें. त्यामुळें येथील शिक्षकाची वागणूक अधिक अवैयक्तिक (Impersonal) स्वरूपाची असते. येथील शिस्तीच्या आणि ती शिस्त निर्माण करण्याच्या पद्धतींतही फार फरक असतो; त्यामुळें सध्यां सहाव्या वर्षी मूल जेव्हां पूर्वप्राथमिकमधून प्राथमिकमध्यें जातें, तेव्हां पूर्वप्राथमिकपेक्षां सर्व तऱ्हेनें निराळ्या अशा परिस्थितीशीं त्याला संयोजन साधावें लागतें. यांत त्याचा गोंधळ उडतो. त्यामुळें सुरुवातीचे कांहीं दिवसपर्यंत हीं मुलें मागासलेलीं व भित्रीं अशीं वाटतात. मुलांना केव्हां ना केव्हां तरी प्राथमिकच्या या तंत्राशीं जुळवून घ्यावेंच लागेल. कारण सर्व देशांत प्राथमिक शाळांना नवीन क्रियाशील स्वरूप यायला अजून बराच अवधि लागेल; अशा स्थितींत सहा वर्षांच्या पूर्वप्राथमिक शाळेच्या बालकांना प्राथमिक शाळेंत ढकलण्याऐवजीं जर एक वर्ष जास्त देऊन त्यांची येथेंच अधिक मानसिक तयारी करून घेतां आली तर तें बालकांना फार उपकारक ठरेल.

शिक्षणखात्याच्या आणि संचालनाच्या अडचणी

प्राथमिक शिक्षणाचें प्रवेश-वय सहा असल्यामुळें बालमंदिरांतील बालकांचे दोन गट पाडावे लागतील. पूर्ण सहाच्या खालील वयाचीं मुलें व पूर्ण सहाच्या वरील वयाचीं मुलें. सहापेक्षां कमी वयाच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी पूर्णतया सरकारची नसल्यानें आर्थिक अनुदानाचें धोरण सहाच्या खालील बालकांसाठीं निराळें आणि सहाच्या वरील बालकांसाठीं निराळें राहील. त्यामुळें बालमंदिरांतील सहाच्या वरील मुलांच्या शिक्षणासाठीं होणारा खर्च स्वतंत्र ठेवावा लागेल. या खर्चाचें धोरण ठरवावें लागेल. त्याची अंमलबजावणी करतांना शिक्षणखात्याला अडचणी वाटतील हें खरें असलें, तरी यांतून शिक्षणखात्यानें मुलांच्या अडचणीला आणि त्यांच्या विकासाच्या गरजांना प्राधान्य देऊन याबाबत जे कांहीं नियम आणि व्यवस्था करण्याची जरूर असेल तीं केलींच पाहिजे.

इंग्लंडमध्यें काय परिस्थिति आहे ?

इंग्लंडांतील राष्ट्रीय शिक्षण योजनेंत पांच ते सात या वयाच्या इन्फंट स्कूलचा समावेश आहे. तेथें सक्तीच्या शिक्षणाचें प्रवेश-वय पूर्ण पांच वर्षे आहे. या शाळांची व्यवस्था आणि पद्धति पांच वर्षांचे खालील बालकांच्या नर्सरी स्कूलपेक्षां आणि दुसऱ्या टोकाशी असलेल्या प्राथमिक शाळेपेक्षां निराळी आहे. त्याचप्रमाणें हीं इन्फंट स्कूल्स कोठें प्राथमिक शाळांना जोडून आहेत, तर कोठें नर्सरी स्कूल्सनाही जोडून असलेलीं आढळतात. तरी या विभागाची रचना व खर्च यांत तेथें स्वतंत्रपणें ठेवण्यांत तेथील शिक्षण खात्याला कांहीं अडचण वाटत नाहीं. आपल्या येथील सहा ते सात वयाच्या मुलांसाठीं एक वर्षाचें शिक्षणक्रमाचें स्वतंत्र खातें निर्माण करून त्याची नेटानें व्यवस्था केल्यास हें आपल्या येथेंही करतां येईल असें आम्हास वाटतें.

इंग्लंडमधील बालकाला नर्सरी शाळेंतून प्राथमिक शाळेंत प्रवेश मिळेपर्यंत मधें दोन वर्षांचा काल संयोजनासाठीं मिळतो तसा येथें निदान एक वर्षाचा काल दिला गेल्यास मुलांची आणि पूर्वप्राथमिक संस्थांची फार सोय होण्यासारखी आहे. मुंबई राज्यानें निदान मर्यादित क्षेत्रांत प्रयोग करून याबाबत पुढाकार घेतला पाहिजे.

मुंबई राज्यांतील प्राथमिक शिक्षणाचें सुसूत्रीकरण करण्यासाठीं जी इंटिग्रेशन कमीटी नेमली आहे, तिनें आमच्या या सूचनेचा जरूर विचार करावा. सध्या बालमंदिराचा प्रचार सार्वत्रिक नाही. सरकारमान्य बालमंदिरांची संख्या बेताचीच आहे. त्या सर्व बालमंदिरांना अशा प्रकारचे स्वतंत्र पहिले वर्ग चालवण्याची व्यवस्था करण्यास उत्तेजन देऊन बालमंदिरांतून पुढें जाणाऱ्या बालकांना प्राथमिक शाळेंतील दुसऱ्या वर्गांत प्रवेश मिळेल असें करावें.

राज्यानें ही सुधारणा करण्यास वेळ घेतला तरी या कामीं स्वतः पूर्वप्राथमिक संस्थांना पुढाकार घेतां येण्यासारखा आहे. जीं बालमंदिरें प्राथमिक शाळांना जोडून आहेत त्यांनीं पहिला वर्ग बालमंदिर पद्धतीनेंच चालवण्याचा आग्रह ठेवावा. जीं बालमंदिरें प्राथमिक शाळांना जोडलेलीं नाहींत त्यांनीं आपल्या कार्यक्रमाचें एक वर्ष वाढवून बालमंदिरांच्या मुलांची सोय करावी. बालमंदिरांच्या या उपक्रमाच्या मार्गांत ज्या कांहीं अडचणी उपस्थित होतील त्याकडे सहानुभूतीनें पाहण्याचें व मार्गदर्शन करण्याचें धारण शिक्षणखात्यानें ठेवावें. मुलांच्या अडचणींना प्राधान्य दिल्यास आम्ही करीत असलेल्या सूचना व्यावहारिक वाटतील अशी आमची कल्पना आहे.

सामाजिकतेचें वळण


मनुष्य हा समाजप्रिय आहे. वाघ, सिंहाप्रमाणें गिरीकंदरांत अथवा जंगलांत जाऊन एकांतांत रहाणेंच पसंत करणारे कांहीं अपवाद सोडले तर सर्वसाधारणतः मनुष्यप्राणी समाजांत वाढतो, व्यवहार करतो, मैत्री जोडतो, प्रेम करतो व करवून घेतो, समाजांत जगतो. कोणाचें जग आपल्या कुटुंबापुरतें अथवा एखाद दुसऱ्या मित्रापुरतें मर्यादित, तर कोणाचें विशाल. पण स्वतःशिवाय इतर मानवांशीं संपर्क, त्यांचेबरोबर सहजीवन, देवाण-घेवाण, फार काय, गोडीगुलाबीच्या संबंधांबरोबर संघर्षहि मानवास हवे असतात व त्यांतच मानवी अनेक गुणांचा व एकंदर मानवतेचा उगम आहे. मनुष्य एकटा राहिला असता तर तो वाघ, सिंहासारखा स्वकेंद्रित प्राणी झाला असता, व मानवाचा विकास झालाच नसता.

एके काळीं कांहीं तत्कालिक कारणानें मनुष्य समूह करून राहूं लागला असेल. जगण्यासाठीं संघशक्तीची गरज भासूं लागल्यामुळें तो टोळी करून राहूं लागला असेल, पण आतां हजारों-कदाचित् लाखों वर्षांनंतर तर समाजांत जगणें हा त्याचा जन्मजात स्वभाव बनला आहे.

मूल जन्मतें तेव्हां तें संपूर्णतः स्वकेंद्रित असतें हें खरें. पण थोड्याच दिवसांत त्याला जसजशी बाह्य जगाची जाणीव होऊं लागते, तसतसें तें आजूबाजूच्या वस्तु न्याहाळूं लागतें. प्रथम प्रकाश व अंधार व नंतर रंग, रूप, आवाज स्पर्श इत्यादींची जाणीव होऊं लागते. ही जाणीव स्पष्ट नसली तरी बाळाचें लक्ष वेधण्यास पुरेशी असते. या सर्व अनुभवांतून वेगळा असा आईचा स्पर्श, आईचा आवाज, आईचें रूप होय. इतर सर्व अनुभवांत एक प्रकारचा निर्जीवपणा, तर यांत एक प्रकारचा सजीवपणा त्याला वाटतो. एक विशेष लोहचुंबकी संवेदना त्याला आईच्या स्पर्शांत, आवाजांत व जवळ घेण्यांत अनुभवास येतात व त्या आनंदप्रद असतात. स्वतःशिवाय इतर व्यक्तींशी आलेलें हेंच बाळाचें पहिलें दळणवळण होय.

हळू हळू मूल मोठें होतें. घरांतील हमेशा दिसणाऱ्या माणसांना तें थोडेफार ओळखूं लागतें. आईशिवाय बाकीच्या मंडळींतून कोणी हसतें, कोणी उचलतें, कोणी खेळवतें, तर कोणी ओरडे, रागावतें. बाळाला त्यांतल्या कांहीं गोष्टी बऱ्या वाटतात, पुन्हा व्हाव्यात असें वाटतें तर कांहीं त्याला आवडत नाहींत. मग आवडेल त्यावेळीं हसायचें व नावडेल तेव्हां रडायचें असें चालतें. पण हें सर्व क्षणिक असतें. मुख्य भान एकाच गोष्टीचें असतें. ती म्हणजे आपल्या गरजा. भूक लागणें, ओलें लागणें, दुखणें, खुपणें वगैरे. या शारीरिक गरजांबरोबर एक मानसिक गरज नकळतपणें वाढत जाते. ती म्हणजे आईचा सहवास, व त्यामागून ओघानेंच घरांतल्या इतर माणसांचा सहवास. आपल्याला उचलावें, कुरवाळावें, छातीशीं घ्यावें, मुके घ्यावे, फिरायला न्यावें, ह्या गोष्टी त्याला प्रिय होतात. इतरांनीं त्या केल्या नाहींत तर त्यांना त्या कशा करायला लावतां येतील हेंहि त्याला समजूं लागतें. तरीपण स्वतःपेक्षां इतर व्यक्तींशीं दळणवळण वाढूं लागलें तरीहि मूल स्वकेंद्रितच असतें. ही सर्व मंडळी आपल्याला ह्व्या आहेत त्या गोष्टी कशा करतील व नको तें कसें दूर करतील, आपली भूक व तहान कशी भागवतील एवढ्या दृष्टिकोनांतूनच बाळास त्यांचें अस्तित्व जाणवतें.

मूल आणखी मोठें होतें. तें चालूं व थोडेफार बोलूं लागतें. लोकांचें बोलणें तर बरेंच समजूं लागतें. तोंडांत दांत येतात. खाण्यापिण्याची गोडी समजूं लागते. आवड व विशेषतः नावड कळूं लागते. शिवाय जग चांगलें दिसूं व ऐकूं येऊं लागतें.



सुगंधित झरणपासून बनणारें तेल

आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.



१. गळणारे केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२. मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M. P. S.

बऱ्याच वस्तूंशीं परिचय होतो. पण नवेंनवें असेंहि बरेंच शिल्लक असतें. एकंदरींत पहिल्या अवस्थेंतून–अर्भकावस्थेंतून–तें बाहेर आलेलें असतें. पहिलें परावलंबन नष्ट झालेलें असतें. त्याला स्वतःच्या शक्तीची जाणीव झालेली असते. सहाजिकपणेंच बाळाचें क्षेत्र आतां विस्तार पावतें. आतां घरच्या मंडळींच्या सान्निध्यांतच घराच्या सुरक्षित किल्ल्यांतून बाहेर पडावेसें वाटतें. एक जुनी आजीबाईची गोष्ट आहे कीं–"एक होता मोठा पेढाभाऊ, डब्यांत हळूहळू त्याला हात–पाय आले, तेव्हां त्याला जग पहायला निघावेसें वाटलें. एकदां डबा चुकून उघडा राहिला. तेव्हां तो टुणकन् उडी मारून बाहेर आला, व धांवत सुटला. रस्त्यांत त्याला गाय, माउ वगैरे बरेच कोणी कोणी भेटतात. पण न घाबरतां त्या सर्वांना धीटपणें उत्तरें देत देत हा जग पहायला पुढें पुढें जात असतो." पाय फुटलेल्या मुलाची अवस्था या गोष्टींत बरोबर वर्णिली आहे. त्याला आतां जग विस्तृतपणें पहाण्याची इच्छा होत असते. तें घराच्या अंगणांत येतें पुष्कळदां 'पेढाभाऊ' प्रमाणें गल्लींत वा रस्त्यावर धांवत सुटतें. शेजारीं पाजारीं जाऊन बसतें. नव्या नव्या माणसांशीं बोलतें. जिना चढतें उतरतें. बरोबरच्या इतर मुलांत मिसळण्याची त्याला तीव्र इच्छा होत असते. इतकें झालें तरी तें घराशीं व विशेषतः आईशीं अदृश्य अशा दोरीनें बांधलेलेच असतें. जरा इकडून तिकडून हिंडून तें घरीं येतें; आईच्या आसपास, अंगावर खांद्यावर लुडबूड करतें. कधीं कधीं तर आईला नुसतें पहातें व पुन्हां बाहेर जातें. घरापासून, घराच्या संरक्षणापासून, घरच्या छोट्या जगापासून तें दूर जातें. स्वतःच्या पायानें, स्वतःच्या हिंमतीवर जातें. तरीपण तें घराशीं निगडित असतेंच.

ओघानेंच त्याला समाजांत वावरण्याचा, इतर व्यक्तींशीं–घरच्या बाहेरच्या व्यक्तींशीं–वागण्याचा प्रसंग येतो. त्यांत त्याला पुष्कळ नवे अनुभव येत असतात. घरचीं माणसें त्याच्याशीं वेगळ्या रीतीनें वागतात व बरोबरीचीं मुलें अगदीच वेगळ्या रीतीनें वागतात. घरीं लाड असतात. त्याचें स्वतःचें असें विशिष्ट स्थान असतें. विशेष हक्क असतात. अंगणात तें कांहीं नाही. शेजारचे बंडू व गोपू, माडीवरली बबी, पलीकडची चिंगी सर्वजण एकत्र येतात. कोणी मारतें, कोणी चावतें, कोणी रडतें, कोणी हिसकावतें, कोणी ढकलतें, अनेक प्रकार होतात. एकमेकांशीं खेळावें, दोस्ती करावी, सहवास साधावा असें तर सर्वांनाच वाटत असतें, पण कधीं ही इच्छा सफळ होते तर कधीं काहींतरी बिनसतें, आणि समाजांत वावरण्याची किल्ली हातीं आलेली नसते. त्यामुळें 'तुझें माझें पटेना व तुझ्यावांचून गमेना' अशी अवस्था होते. विविध व्यक्तींच्या, विविध स्वभावाच्या, विविध संवयींच्या माणसांत स्वतःला व्यवस्थितपणें बसवून घेणें हें फार मोठें बिकट कार्य मुलापुढें येतें, व तें फार महत्त्वाचेंहि असतें. त्यावेळच्या त्याच्या वागण्यावरच पुढील सबंध जीवनाचा पाया घातला जातो. याच वेळीं कोणी जगाला भिऊन दूर पळणारें बनतें. कोणी दोन धक्के देणारें व दोन खाणारें बनतें. समाजाशीं मिळतें जुळतें घेऊन वेगवेगळ्या स्वभावांच्या व्यक्तींशीं कसें वागायचें तें शिकण्याचा हाच काळ असतो. हा काळ फार महत्त्वाचा असतो. यावेळीं मुलाच्या पुढील आयुष्यांतील साफल्याचा वा वैफल्याचा पाया घातला जातो. कारण व्यवहारांत योग्य रीतीनें वागतां येणें, आपल्या आजूबाजूच्या जगांत वांकडे तिकडे असलेले कोपरे घांसून नीट जुळवून घेतां येणें हीच सफलतेची किल्ली आहे मुलाला त्याच्या पहिल्या अडीच, तीन वर्षांत कुटुंबांतील माणसांकडून एकमेकांशीं वागण्याचें जें वळण मिळतें, त्यावर त्यांच्या समाजांत मिसळण्याच्या रीति बव्हंशीं अवलंबून असतात. त्याचप्रमाणें बिकटकाळांत कसें वागावें याबद्दल त्या काळांत वडील माणसांकडून ज्या सूचना मिळतात त्यावरहि अवलंबून असतें. म्हणजे कुटुंबाच्या व कुटुंबाभोंवतींच्या वातावरणांत मुलाला सामाजिकतेचें–म्हणजे समाजांत योग्य रीतीनें जगण्याचें–शिक्षण मिळत असतें

पहिल्या दोन, अडीच वर्षांत जाणीवपुरःसर मूल कांहींच शिकत नसतें व त्याला स्पष्ट अशी कसलीच कल्पना आलेली नसते. तरीपण बाहेरून होणाऱ्या आघाताचे प्रत्याघात त्याचे मनांत उमटत असतात. तसेंच आजूबाजूचीं माणसें एकमेकांशीं, दूरच्या व जवळच्या नातलगांशीं, शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं जशीं वागतात तसें त्याचें प्रतिबिंब मुलाच्या मनावर उमटत असतें. मुलांचें संस्कारक्षम मन त्यातून वागण्याचे प्रकार व रीति–भाती शोषून घेत असतें. कुटुंबांत वागण्याचें व मुलांना वागविण्याचे अनेक प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु मुख्यतः मुलाला वळण लागण्याचे दृष्टीनें त्याचे आईवडिलांचे वागणुकीचा महत्त्वाचा वांटा असतो. आईवडलांना पुष्कळ करतां येण्यासारखें असतें. तसेंच कुटुंबांतील निरनिराळ्या घटकांचें सुसूत्र असें एकच धोरण होणें अत्यंत आवश्यक असतें. त्याचप्रमाणें मुलानें घराबाहेरील वातावरणांत कसें वागावे, वेगवेगळ्या प्रसगांतून कसें पार पडावें, पडलेल्या आढ्या कशा उकलाव्या, आलेल्या अडचणी कशा दूर कराव्या व सामाजिकतेचा योग्य विकास कसा होईल या दृष्टीनें दिशा सुचविणारें असें तंत्र असणें आवश्यक आहे. यासाठीं योग्य दिशेनें चालणारीं बालक–मंदिरें फार उत्तम काम करूं शकतात. बालकमंदिरांतून अनेक व्यवसाय असतात. मुलांना आवश्यक अशा हालचाली करण्यास व त्यांच्या शक्ति वाढीस लावण्यास पोषक असें वातावरण असतें. गोष्टी, गाणीं, खेळ वगैरे मनोरंजनात्मक विभाग असतात पण या सर्व गोष्टींपेक्षां बालकास अधिक महत्त्वाचें असें शिक्षण तेथें मिळत असतें तें म्हणजे समाजांत योग्य रीतीनें जगण्याचें. स्त्रिया जेव्हां बालकमंदिरें पहावयास येतात, तेव्हां पुष्कळ वेळा त्यांच्या तोंडून 'धन्य आहे बाई, तुमची ! रोज इतकीं मुलें संभाळतां तीं !' असे

उद्गार निघतात. कोणी म्हणतात, 'आमच्या घरीं सुट्टीच्या किंवा इतर प्रसंगानें चार मुलें जमलीं कीं घर डोक्यावर घेतात, मारामारी करतात ! रडारडी नि ओरडाओरड कांहीं विचारूं नका, इथें हीं नीट कशीं रहातात ? काय जादू आहे बाई ! ' त्यांचें वास्तविक कारण इतकेंच कीं येथें समाजांत वागण्याचे कांहीं नियम असतात. हे नियम जर घरोघरीं लहानथोरांनी पाळले तर मुलांचें व मोठ्यांचेंहि जीवन सुकर होईल व मुलाला समाजांत वागणेंहि सुलभ होईल. या नियमांत पहिला नियम म्हणजे सर्व मुलांचे हक्क सारखे व ते सर्वांनी दक्षतेनें ज्याचे त्याला दिले पाहिजेत. फार मोठी गोष्ट आहे. शास्त्रीय भाषेंत विवेचन केलें तर थोरांनाहि चटकन् आकलन होणार नाहीं. पण प्रत्यक्षांत या छोट्या बाल-मनास समजतें, व तिला अनुसरून वागतां येतें. हा नियम बालकमंदिरांत कसा अंमलांत येतो ?—

सुरवातीसच सांगण्यांत येतें कीं, ज्याला जें खेळायचें असेल तें खेळा. जी वस्तु घ्यावीशी वाटेल ती घ्या. खेळ सुरू होतांच कूट प्रश्न उभा रहातो. बाळू एक सुरेख 'साधन' घेऊन येतो. त्याच्याच वयाच्या बंडूला वाटतें आपण बाळूबरोबर खेळावें. बंडूचा आवेश (Impulsion) जास्त असतो. तो बाळूच्या हातून तें ओढूं लागतो. बाळूहि कांहीं कमी नसतो. तो आपलें खेंळणे घट्ट धरून ठेवतो. बंडूला दुसरा उपाय सुचतो. तो बाळूच्या थोबाडींत देतो. बाळू त्याच्या खांद्याला चावायला जातो. पण असा समर-प्रसंग उभा रहाण्यापूर्वीच तेथल्या ताईंचें लक्ष तिकडे गेलें तर त्या बंडूला सांगतात, 'हें पहा बंडू, बाळूचें खेळणें संपलें कीं तो तें ठेवून देईल. मग तूं घे.' युद्ध सुरूच झालें असेल तर ताई प्रथम दोघांना सुटे पाडतात, व चौकशी करतात, 'आधीं कोणी घेतलें होतें ? एकाचें खेळणें झाल्यावर दुसऱ्यानें खेळावें, तोंवर वाट पहावी.' असेंहि सांगतात. किंवा जेथें शक्य असेल तेथें 'दोघांनीं मिळून खेळावें' असा सल्ला देतात. हळू हळू हा नियम बंडूच्या अंगीं बाणूं लागतो. तोहि दुसऱ्या मुलांना हा नियम सांगतो. असें करतां करतां बालक मंदिराच्या बालसमाजांत वागण्याचा एक नियम रूढ होतो. सगळीं मुलें वाट पहायला शिकतात, किंवा दोघें तिघें मिळून खेळतात. ओढाओढी व त्यांतून निघणारी मारामारी वगैरे गोष्टींना कायमचा फाटा मिळतो. आणखी कांहीं थोडे असेच नियम असतात. पाळी लावणें हा फार आवश्यक नियम आहे. घसरगुंडीवर सर्वांनाच आपण प्रथम बसावें, खूप वेळ बसावें असें वाटतें. दुसऱ्याला ढकलून आपण आधीं पाणी प्यावें असें सर्वांनाच वाटत असतें. फार काय, खायला मुलें बसलीं कीं प्रत्येकाला प्रथम आपल्याला मिळावें असें वाटतें व जो तो 'मला द्या, मला द्या' असें ओरडूं लागतो, पण पाळीपाळीनेंच जायचें व तो येईपर्यंत वाट पहावयाची ही एक सवय लागली कीं सामाजिक वर्षणाचे कितीतरी प्रसंग आपोआप नाहींसे होतात. आपल्या समाजांत मोठ्या माणसांतहि ओळ लावून वाट पहायची व पाळीनें जायची सवय आंत्तां कोठें गेल्या दहा वर्षांत लागली आहे. पण लहानपणापासून ही सवय लावायची म्हटलें तर वेळ लागत नाहीं. सहकाराचें तत्व याच वेळीं अंगीं बाणू शकतें. एखादी वस्तु जी एकट्याला उचलत नाहीं, तीच पांचसहाजण मिळून उचलूं शकतात. अशाप्रकारें सहकारानें कितीतरी मोठमोठीं कामें होतात, हें त्यांना दाखवलें तर तीं सहकार करण्यास चटकन् तयार होतात. 'मिळून करूं या' हा नियम मोठा छान असतो. टेबलें, खुर्च्या, सतरंज्या उचलणें, पुसणें, मांडणें वगैरे अनेक कामें मुलें मिळून मिसळून करूं लागलीं म्हणजे त्यांना त्यांत फार मजा वाटते.

एकमेकांत स्पर्धा उत्पन्न करण्यापेक्षां सहकार उत्पन्न करणें सामाजिक जीवनास अधिक पोषक आहे. स्पर्धा उत्पन्न झाली कीं माझें काम माझ्या मित्रापेक्षां अधिक सरस दिसलें पाहिजे अशी भावना येते. त्यामुळें एकमेकांना मदत करून दोघांचेंहि सरस दिसलें पाहिजे अशी भावना नष्ट होते व तसें करणें अशक्य होतें. आपलें कोणालाहि दाखवायचें नाहीं ही वृत्ति येते. कधीं कधीं दुसऱ्याचें बिघडवण्यासहि मुलें तयार होतात. अर्थात् प्रत लावणें, चांगल्या-वाईटाचा क्रम लावणें, आपला क्रम कमी असेल तर अधिक चांगलें करण्याचा प्रयत्न करणें हें सर्व होऊं शकतें. फक्त त्यांत स्पर्धेची धार नसली म्हणजे झालें. मुलांना ५।१० चित्रें दाखवलीं तर त्यांत, हें सर्वांत चांगलें, हें बरें असें तीं ठरवूं शकतात व कित्येक मुलें आपलीं टेबलें चांगलें चित्र काढणाऱ्याजवळ घेऊन जातात व त्यांचें पाहून शिकतात. याचें कारण मुलांमध्यें ईर्ष्येचीं, स्पर्धेचीं बीजें न पेरतां खालच्यांना व वरच्यांना सर्वांना सारखेंच उत्तेजन दिलेलें असतें. सर्वांना सारखें वागवलेलें असतें. सर्वांचे हक्क सारखे हें तत्त्व उपयोगांत मात्र आणलेलें असतें आणि म्हणूनच एकमेकांचें पाहून आपलें काम सुधारणें व सर्वांनाच चांगलें काम येण्याकरितां एकमेकांस मदत करणें चांगलें असें मुलांना वाटावयास लावणें हें अधिक योग्य होय. सहकारांतून मैत्रीचा जन्म होतो. एकमेकांना मदत करण्याची भावना जागृत होते. सहानुभूति व प्रेमाच्या पायावर समाजरचना होण्यास सुरवात होते. मुलांच्या बालजीवनांत एक सुंदर गोड तत्व दाखल होतें. वास्तविक पहातां बालमनाला एकमेकांना एकमेकांच्या वस्तु देणें-घेणें आवडत असतें. परंतु या गोष्टीला पुष्कळदां घरून आळा घालण्यांत येतो. अगदीं चुकीचें वळण देण्यांत येतें. आपल्या नात्यांचींच मुलें यायचीं असलीं तर एखादी आई मुलाला सांगते, 'हें बघ, उद्यां काकांचे सुरेश, अभय यायचे आहेत. तुझा नवा बॅटबॉल आण इकडे कपाटांत ठेऊन देऊं' या 'नाहींतर बाबे, तुझी बाहुली

उगीच मळेल सर्वांनीं हात लावून, मावशी जाईपर्यंत पेटींत ठेऊन देऊं, आण.' मुलांना आपलीं नवीं खेळगीं इतर मुलांना दाखविण्याची कोण हौस असते! पण घरांतून वेगळ्याच सूचना मिळत असतात. तसेंच मारामारीबद्दलहि चुकीच्या सूचना घरांतूनच मिळत असतात. 'काय, त्या मंगेशनें तुला मारलें? मग, तूंहि दिलीस कीं नाहीं चांगलीशी? हात् बावळट कुठला! त्यानें एक दिली तर आपण दोन ठेवून द्यायच्या.' अशा शिकवणीमुळें मुलांमधील मारामाऱ्या वाढायच्याच. शेवटीं 'बळी तो कान पिळी' या न्यायानें त्या बाल समाजांत तंटे मिटवण्याचा चुकीचा मार्ग शिरतो आणि सशक्त व धीट मुलें बळी होतात, व इतरांना त्यांच्या हातांत जावें लागतें. दुसऱ्यांना ठोकून काढणाऱ्या मुलाच्या बापाला कदाचित् त्यावेळीं आपल्या मुलाबद्दल अभिमान वाटत असला तरी पुढें मोठेपणीं त्याला गुंड झालेला पाहून खात्रीनें आनंद वाटणार नाहीं.

घरांतील आपल्या वागण्यामुळें मुलांना अप्रत्यक्षपणें धडे मिळत असतात. आपली आई, शेजारीण आजारी असली कीं मदतीला जाते. तिच्या मुलीची वेणी घालून आंघोळहि घालते, पाहुणे येणार म्हणून वडील अनुदारतेनें न बोलतां त्यांचें आगत—स्वागत करतात, त्यांच्याकरितां आपल्या घरांत होणारी गैरसोय सोसतात असें मुलें पहातात. कांहीं घरीं याच्या उलट गोष्टीहि मुलांना दिसतात. एखादी आई, आगगाडींत मुलाला मांडीवर घेऊन उभे रहाणारणीला जागा करून देते, तर दुसरी एखादी मुलाला नको असलेली जागा अडवायला सांगते. मुलगा म्हणतो, 'मला खिडकीपाशीं उभे रहायचे', तर आई म्हणते जागा जाईल ना!'

पुष्कळदां सुट्टीच्या दिवशीं कोठें खेळायचें अशी पंचाईत पडते. कारण प्रत्येकाला आपल्या स्वतःचे घरांत मुलांची गडबड नको असते. यापेक्षां सर्व बिऱ्हाडकरांनीं एकेक रविवार वाटून घेतला तर महिन्या दोन महिन्यांनी एकेकाचा पाळी येईल व मुलांनांहि दर सुटीला खेळायला मिळेल. मुलांनी काय खेळायचें कसें व किती खेळायचें ह्याचा तरतूद केली तर त्यांच्या खेळण्याचा त्रास होण्याचा संभवहि उरत नाहीं.


कांहीं कांहीं कुटुंबांत फार कडक शिस्त असते. आईवडिलांनी कांही सांगितलें कीं मुलांनी 'हूं,' किं 'चूं' न करतां ऐकलें पाहिजे. अशीं मुलें सदा कोमेजलेलीं व दबलेलीं असतात किंवा घरीं गरीब गाय व बाहेर मोठा शेर होतात. कांहीं घरीं मुलांचे फार लाड होतात. त्यांचा हरएक शब्द झेलला जातो. अशा मुलांना इतरांत मिसळणें फार कठीण जातें. कारण समूहजीवनांत प्रत्येकाला स्वतःचें थोडें थोडें सोडल्याशिवाय एकत्र रहाणें शक्य नसतें. घरातील शिष्टपणा समूहांत कोण सहन करणार? कारण समूहांत प्रत्येक व्यक्तीचें स्थान व हक्क सारखेच असतात.

एकंदरींत समाजांत मिळून मिसळून वागण्याचें वळण—समाजांत मिसळण्याची जेव्हां मुलामध्यें इच्छा उत्पन्न होते—तेव्हांच मिळणें आवश्यक असतें. त्यावेळीं आपले कोपरे वाढूं न देतां सामूहिक मेळासाठीं कोपरे झिजवून गोल होऊन समाजांत मिसळण्याची क्षमता येणें फार आवश्यक असतें. आज समाजांतील विसंवादीपणा पाहिला म्हणजे योग्य वेळीं योग्य वळण मिळण्याचें महत्त्व पटतें.

—श्रीमती ताराबाई मोडक बी. ए.

स्वदेशीचा भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





बाल-विभाग

वर्ष २६ वें : अंक ७ वा : ऑक्टोबर १९५८

वाली लोकगीत

(लहान मुलें सहज उड्या मारीत नाचत खालील गाणें म्हणतात. अर्थ कीं, डोंगरावर गाजाहूम नांवाचें फळ आलें आहे तें एका मुलानें पाहिलें. मला येऊन सांगितलें नि तो पळाला. पुनः डोंगरावर-सरकन् झाडावर चढला, भराभर फळें पाडलीं-पोटभर खाल्लीं, इतकीं कीं शेवटीं पोट फुगलें)

बारडाच्या खिडकींत गाजाहुम पिकला
गाजाहुम पिकला, ये दादुनं नांगला
ये दादुनं नांगला तें मला येऊन सांगला
मला येऊन सांगला ते दादु गेला
दादु गेला ते सरकन् चढला
सरकन् चढला ते भरकन् पाडला
भरकन पाडला ये दादुनं खाल्ला
ये दादुन खाल्ला ये दादु फुगला

संग्राहक : अनुताई

==*==

चंदामामा पकडूं या

"आपण दोघे चल जाऊं या
चंदामामा पकडूं या.
धरुनि तयाला
आणुं घराला
चक्कित आईला करूं या"

"दूर दूर वर कधीं जाउनी
मोदें खेळूं या गगनीं
रात्रीं जाउनि
तारे वेचुनि
दोघेही मग परतूं या"

"का तूं वाऱ्या
माझ्या घरिं या
येशिल अंगणिं नाचाया?"

—शरद लाटस

==*==

सूर्यदेव वरि आला

डोंगराच्या कुशींतुनी—सूर्यदेव वरि आला
अंधारानें हळूहळू—पाय माघारी घेतला !

गोठ्यांमाजी गाई वत्सें—दावणीला ओढ घेती
पान्हा फुटूनिया गाई—दुग्ध भूमीस ओपिती !

भुकेलेल्या वासराची—'हम्मा हम्मा' ऐकूं येते
देवळांत घणघणा—घंटा आरतीची होते !

रानाकडे धांव घेती—मेंढ्यासवें मेंढपाळ
पावरीचा नाद घुमे—वारा ऐकवितो शीळ !!

कावळ्यांची कावकाव—कर्कश शब्दें चालते
वेधुनियां कान घेती—निर्झरांचीं गोड गीतें !

नातवंडां उठविते—आजी मारुनिया हांक
लाडक्याला झोके देत—आई म्हणे डोळे झाक!

अंगणांत संमार्जन—ताई उठूनि घालते
घाटावरी ब्राह्मणांची - स्नानास्तव दाटी होते

करीं पळी पंचपात्री—घेऊनियां देवळांत
कोणी संध्येस बैसती—नेत्र मिटुनी ध्यानस्थ !!

शेतकरी शेताकडे—बैल घेऊन धांवती
गुरामागुनी गुराखी—शीळ घालीत चालती !

केरामाजी हुंदडती—पंख झाडून कौंबडी
पांखरांची फौज उडे—आकाशांत उंच खडी !

मालवती रत्नदीप—चोहीकडे उजाडतां
प्रकाशाचा झोत येई—उषःकाल नभीं होतां !!

—श्री. बा. मा. हराळे, साहित्यप्राश

==*==

ढग

हे ढग केवढे
रेतीच्या कणा एवढे
हे ढग केवढे
गोल गोल गोट्या एवढे
हे ढग केवढे
मोठ्या मोठ्या धोंड्या एवढे
हे ढग केवढे
कोसबाड टेकडी एवढे
हे ढग केवढे
वारड्याच्या डोंगरा एवढे

हे ढग केवढे
सह्याद्रि पर्वता एवढे
एवढे ढग कशाला
पाऊस पाणी द्यायला
एवढा पाऊस कशाला
शेतीभाती पिकायला
एवढी शेती कशाला
पोट भरून खायला

—अनुताई

==*==

खाऊन टाका मटामटा

तांदूळ घ्या हो पसा पसा
धुऊन टाका खसा खसा
भात शिजेल रटा रटा
खाऊन टाका मटा मटा

मटकी घ्या भिजत टाका
दुसऱ्या दिवशीं उपसून टाका
मटकीला येतील मोडच मोड
उसळ लागेल गोडच गोड

वास सुटेल घम् घम्
खायला लागेल चम् चम्

पीठ चाळा सरासरा
कणिक भिजवा भराभरा
लाट्या करा गरागरा
पुऱ्या लाटा सरासरा
तळून काढा पटापटा
खाऊन टाका मटामटा

—स. देवधर

==*==

"काठीचा घोडा"

माझा काठीचा घोडा पहा
त्यावरती मी स्वार अहा
दोरीचा चाबूक करूनी
घोडा पळवी वेगानी ॥ १ ॥

बाबा जाती ऑफिसला
पोचवतो मी वेळेला
ताई–दादाची सवारी
जातां जातां पोचती करी ॥ २ ॥

ओ भाय, जरा संभालो
रस्त्याच्या बाजूनी चलो
सायकलवाला जरा देखना
घंटी बजाकर साईड देना ॥ ३

नाहीं घोडा माझा दमला
लागत नाहीं चारा दाणा
खोलीच्या कोपऱ्यांतला
छोटासा ह्याचा तबेला ॥ ४

—सुमन काळे

==*==

फुलबाग

अंगणांत चाफा फुले,
झाडावरी फूल डोले,
नाजुक ग मोगऱ्याचीं,
झाडी झुपकें डुललीं,
जाई जुई ग चमेली,
वेली पहा बहरली,
गुलाब ग काट्यामध्यें,
नाजुकसा हा दिसला

वकुळीच्या ग फुलांनीं,
सडा अंगणीं घातला,
अंगणांत पारिजात,
रातराणी सुगंधित,
पवनही फिरवी भारी,
सुगंध हा चारी दारीं

—सौ. उषा रामचंद्र जो

माझी बाहुली

छान माझी बाहुली,
छोटी तिची साउली,
गोड गोड हंसते,
नाजुकशी दिसते
नवे कपडे शिविन,
सुंदर वेण्या घालीन,
शाळे तुज नेईन,
विद्या तुला शिकविन,
(ग, म, भ, न शिकवीन)

नवा खेळ आणीन,
भातुकलीला देईन,
मैत्रिणींना बोलवी,
खेळ मजेचा खेळेल
बाळ मोठी झाली,
परकर चोळी केली,
खुदकन् गाली हंसली,
सुंदरशी दिसली.

—सौ. उषा रामचंद्र जोशी

==*==

चलरे गड्या

(चलगे सये वारुळाला—चालीवर)

चलरे गड्या खाजणाला,
खाजणाला, खाऽजणाला
बेलकडी, ओंझळभरी,
आणायला, आणायला, आऽणायला
चलरे गड्या डोंगराला,
डोंगराला, डोंगराला
धामणं आणु करंदं—तोरणं
खावयाला खावयाला, खाऽवयाला

चलरे गड्या शेतावरी
राखण्याला राखण्याला, राऽखण्याला
रोप लावूं, भात करूं,
खावयाला खावयाला, खाऽवयाला
चलरे गड्या पागोरीला
पागोरीला, पागोरीला, पागोरीला
लेवट्या, कोळंबी, मासे धरू,
खावयाला खावयाला, खाऽवयाला

—चकुताई

==*==

विचारतों मी, सांगा मजला

राखट निळा रंग मनोहर ।
दिसे खुलुनि जो अति सुंदर ॥
दिला कुणि या आभाळाला ?
विचारतों मी, सांगा मजला ॥ १ ॥

निळा, तांबडा, हिरवा, पिवळा ।
दिला पारवा आणि जांभळा ॥

रंग कुणी ह्या इंद्रधनूला ?
विचारतों मी, सांगा मजला ॥ २ ॥

निळीं जांभळीं चकाकणारीं ।
कांचेचीं जणुं भिंगें न्यारीं ॥
दिलीं कुणी परि या मोराला ?
विचारतों मी, सांगा मजला ॥ ३ ॥

—दत्ताराम आ. वारेकर

श्री. गोपाळराव कुळकर्णी यांचें दुःखद निधन

नूतन बालशिक्षण संघाच्या कामांत प्रथमपासून आवडीनें भाग घेणारे, त्याचप्रमाणें संघाच्या मदतीसाठी सदैव धांवून येणारे, सघाचे खरेखुरे मित्र श्री. गोपाळराव कुळकर्णी, शनिवार दिनांक २० सप्टेंबर रोजी वयाच्या अवघ्या अठ्ठावन्नाव्या वर्षी आपल्या निवासस्थानीं कालवश झाले हें कळविण्यास आम्हांला अत्यंत दुःख होत आहे ! गेलीं कित्येक वर्षें ते हृदयविकारानें आजारी होते. त्यामुळें त्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित झालें होतें. तरीसुद्धां भारतीय स्वातंत्र्य–इतिहासाच्या लेखनांत व चिंतनांत ते आपला समय खर्च करीत असत. गुजरात विद्यापीठांतून स्नातक ही पदवी घेऊन बाहेर पडल्यावर त्यांनीं देशाच्या स्वातंत्र्य लढ्यांत भाग घेतला. १९३० ची असहकाराची चळवळ संपल्यावर ते दक्षिणामूर्ति भवनच्या विनय मंदिरांत काम करूं लागले. दक्षिणामूर्तिसारख्या राष्ट्रीय शिक्षण संस्थेंत त्यांच्या शिक्षणविषयक विचारांना मूर्त स्वरूप मिळालें. त्यानंतर विलेपार्ले येथील प्यूपिल्स ओन स्कूल, न्यू इरा स्कूल, अविधा विद्यालय, शिशुविहार व बाल अध्यापन मंदिर, दादर वगैरे निरनिराळ्या संस्थांमध्यें शिक्षक म्हणून गोपाळरावांनीं काम केलें. प्रभावी पण निरभिमानी, शांत परंतु मर्मस्पर्शी अशा स्वभावामुळें जे जे विद्यार्थी त्यांच्या निकट येत ते ते त्यांच्या व्यक्तित्वाकडे आकर्षित होत. बुनियादी व पूर्व बुनियादी शाळेच्या शिक्षणाच्या आंखणीमध्यें अविधाहून जे महत्त्वाचें कार्य त्यांनीं केलें, तें अजून पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालें नाहीं, तरीसुद्धां 'शिक्षण पत्रिके'मधून त्याची जी रूपरेखा प्रसिद्ध झाली आहे, त्यावरून त्यांच्या प्रतिभेची ओळख पटल्याशिवाय राहात नाहीं. मानसशास्त्र, समाजशास्त्र, गांधीजींचे विचार हे त्यांच्या खास आवडीचे विषय होते.

१९४६–४७ मध्यें गोपाळरावांनीं 'शिक्षण–पत्रिके'चे सह संपादक म्हणून काम केलें. ह्यामधील लिखाणावरून त्यांच्या व्यापक दृष्टीची चांगली कल्पना येते. गोपाळरावांचे अनुभव, वाचन, लेखन, चिंतन फार व्यापक होतें. मराठी, गुजराती, हिंदी, इंग्रजी या विविध भाषांवर त्यांचें सारखेंच प्रभुत्व होतें. कोणत्याही प्रसंगासाठीं त्यांची योजना केली म्हणजे त्या प्रसंगाला प्रतिष्ठा प्राप्त होत असे. ते सव्यसाची वक्ते होते. आपला विषय अत्यंत सोप्या, साध्या शैलीमध्यें, कोणत्याही भाषेंत ते मांडूं शकत असत. त्यांच्या कोणत्याही भाषणांत त्यांची राष्ट्र-भक्ति व ध्येयवाद वाचकाना प्रतीत होत असे.

श्री. गोपाळरावांच्या अकालीं निधनाने एका तत्त्वचिंतक व सौजन्यशील प्रभावी शिक्षकाला आपण दुरावलों आहोंत. त्यांची पत्नी श्री. नलिनीबाई, पुत्र सुरेश व कन्या माया यांच्या दुःखाला पारावार नाहीं. त्याच्या दुःखांत नू. बा. शि. संघ, 'शिक्षण–पत्रिका' व शिशुविहार मंडळ या सर्व संस्था सहभागी आहेत. परमेश्वर त्यांना हें दुःख सहन करण्याची शक्ति देवो, व गोपाळरावांच्या आत्म्याला शांति देवो, ही प्रभुचरणीं प्रार्थना.

—संपादक

पाईनीच आयुर्वेदीय असलेली
विको
वज्रदंती
दंतमंजन
विकोच्या कसाची साक्ष करणारी!
विको लॅबोरेटरीज, दादर, मुंबई १४

प्रेमाची दूरदृष्टि

दौरा संपवून अमितचे वडील परत येणार तो दिवस आला. प्रथम विमान रात्रौ येणार म्हणून आम्ही विमानतळावर जाण्याचें रहित केलें होतें. परंतु अचानक विमान दिवसा येणार म्हणून समजलं. मग काय अमितची गडबड! भराभर सर्व तयारी करून आमचेबरोबर स्वारी विमानतळावर आली. विमानाची वेळ विचारली व लक्षांत ठेवली. तिथें गेल्यावर मोठ्या माणसाप्रमाणें मधून मधून वेळ विचारी. विमान येण्याचे वेळीं अगदीं आकाशांला नजर लावून स्वस्थ उभा राहिला होता. तीनचार इतर विमानें आलीं. परंतु स्वस्थ उभा. अगदीं ठरल्यावेळीं विमान कसचें येतें म्हणून आम्ही इकडे तिकडे करीत होतों परंतु वेळ झाली म्हणतांच येणाऱ्या अगदीं सूक्ष्म काळ्या ठिपक्याकडे पाहतांच 'हेंच काकांचें विमान' म्हणून स्वारीनें इतक्या सर्व मंडळींत प्रथम हेरलें. आणि खरोखर तेंच विमान होतें. प्रेमानें जणूं वेळेवर मात केली. प्रेमाची दूरदृष्टीच नव्हे का ही ?

अमित ३ वर्षांचा झाला. त्याला लहान भावंड होणार होतें. त्रास देईल म्हणून त्याला त्याची कल्पना न देण्याचा शहाणपणा मी केला.

नंतर मी बाहेर गेल्यावर त्यानें सर्वांना सळो का पळो केलें. प्रश्नांचा भडिमार सुरू झाला व किंचित् बाळाचा राग पण येई.

नंतर सहा महिन्यांनी अमितचे वडील रशियाला जाणार होते. वडिलांचा तो फारच लाडका आहे. मी काळजींत पडलें होतें पण ह्यावेळीं पक्का एक महिना आम्हीं त्यास सर्व गोष्टी समजावून सांगितल्या. खेळ आणतील असें सांगितलें, तिकडे वडिलांच्या जेवणाची सोय आहे असें पटवून दिलें. चित्रांच्या साह्यानें थोडें रशियासंबंधीं ज्ञान दिलें. भय व काळजी नष्ट केली.

जाण्याचे दिवशीं बरोबर विमानतळावर नेलें. स्वस्थ होता. घरीं आल्यावर खेळू लागला. मधून प्रश्न विचारी परंतु उत्तर शांतपणानें दिल्यामुळें समाधानी वृत्ति ठेवी. आनंदांत राहिला व आनंदाचे क्षण मनांत सांठवून ठेवी.

—हेमा मेंगदे

बालकांची प्रगति-नोंद

(पान ११ वरून चालू)

(१३) चढणें उतरणें (१४) सी-सॉवर वरखालीं होणें (१५) खेचणें–ओढणें (१६) डोलणें–तोलणें इत्यादि क्रियांत मोठ्या स्नायूंच्या हालचाली कशा होतात तें पाहतां येतें. अर्थात् ह्या क्रियांचे सूक्ष्म अवलोकनासाठीं बालकांना योग्य अशी साधनसामग्री मिळाली तरच या क्रियांचें सूक्ष्म अवलोकन शक्य आहे. उदा. चालणें बघायला चालन–पट्टी, नृत्याचा सफाईपणा बघायला शाळेच्या कार्यक्रमांत नृत्याला स्थान असणें, लोंबकळण्यासाठीं दोर, कड्या आणि सोयीचीं लाकडी साधनें याप्रमाणें वर उल्लेखिलेल्या प्रत्येक क्रियेसाठीं अनुकूल अशीं साधनेंही बालमंदिरांत असायला पाहिजेत.

मोठ्या स्नायूंच्या हालचालींबरोबर सूक्ष्म स्नायूंच्या हालचालींतील सौष्ठव आणि कौशल्य यांचीही नोंद घेतली गेली पाहिजे. ही हालचाल जीवनव्यवहाराच्या अथवा हस्तव्यवसायाच्या साधनांचा उपयोग करीत असतांना बघायला मिळते. उदा. मॉन्टेसोरी साधनांपैकीं बटनिंग फ्रेम्स या साधनांत गुंड्या लावतांना, केस बांधतांना, क्लिपा लावतांना, गांठीची बांध–सोड करतांना, बोटांच्या हालचाली लक्षांत घ्यावा.. याशिवाय पाणी ओतणें, चाकूचा उपयोग, किसणीचा उपयोग, फुलांच्या माळा करणें, नळ उघडणें चित्राचीं पुस्तकें उघडणें–बंद करणें, पाण्याचे पेले नेणें–आणणें, पदार्थ वाढणें यांत मुलांच्या हालचाली सहज होतात, कीं या हालचालींचा पुरता विकास झालेला नाहीं ही गोष्ट लक्षांत घेणे फारसें कठीण नाहीं.

(३) कलाकौशल्यांतील हालचालींचा विकास : खडू, ब्रश, पेन्सिली, कातर, हुन्नर--उद्योग विभागांतील हातोडी, करवत, पेचकट, पान्हा, यांचा उपयोग बाहुलीच्या खेळांतील मांडणी, शिल्परचना, मोतीकाम, शिवण, चित्ररचना, मातीकाम, चित्रकाम, रेतीचे खेळ, पाण्याचे खेळ यांत हेतुपूर्ण बारीक बारीक हालचाली मूल करूं शकते किंवा नाहीं ही गोष्ट पाहतां येते.

निरनिराळ्या वयाच्या मुलांच्या या प्रकारच्या हालचाली पाहिल्यास या विकासाची क्रमिक कल्पना येण्यास अथवा त्यांत मागासलेपणा अथवा पुढारीपण कळण्यास उपयोगी पडतें. या विकासांत समधारण काय व असमधारण काय हें समजण्यासाठीं अनेक अवलोकनांची नोंद केली पाहिजे. सरावानें कोणत्याही बालकाच्या या मुद्यावरील विकासाची बाजू लक्षांत येते.

(पुढील अंकीं चालू)

—शे. ना. नामले

बालकांची प्रगति-नोंद

लेखांक २ रा संचयशील प्रगति-नोंद

(Cumulative Record of individual Children)

प्रत्येक बालमंदिरांत बालकाच्या वैद्यकीय तपासणी आणि आरोग्य प्रगतिसंबंधीचें संचयशील नोंद-पुस्तक आणि त्याचप्रमाणें त्यांच्या विकास-प्रगतीचें संचयशील नोंद-पुस्तक अशीं दोन पुस्तकें ठेविलीं पाहिजेत. या पुस्तकांतील पत्रकाच्या तपशीलाचा थोडासा परिचय यापूर्वीच्या लेखांत करून दिला आहे. यापैकीं पहिल्या पुस्तकातील नोंद ही शिक्षक आणि डॉक्टर यांनीं मिळून करायची असते, तर दुसऱ्या पुस्तकांतील नोंद ही शिक्षिकेलाच करावी लागते. बालकाच्या दरमहा येणाऱ्या जन्मदिनांकाच्या दिवशीं करण्याचा प्रघात ठेवला तर सामान्यतः शिक्षिकेला रोज एक किंवा दोन बालकांच्या नोंदी लिहाव्या लागतील. शिक्षिकेची ही मासिक नोंद म्हणजे बालकाच्या एक महिन्याच्या प्रगतीच्या अवलोकनाचा आढावा. हा आढावा काढण्यासाठीं जर शिक्षिका रोजच्या कार्यक्रमाची व कार्यक्रमाबाबत बालकांच्या दिसून आलेल्या विशेष प्रतिक्रियांची दैनंदिनी ठेवीत असेल तर मासिक नोंद लिहायला अशा दैनंदिनीचा फार चांगला उपयोग होतो. शिक्षिकेला ह्या नोंदी चांगल्या लिहितां याव्या म्हणून बाल अध्यापन मंदिराच्या अभ्यासक्रमांत या विषयाला बरेंच महत्त्व देण्यांत येतें.

(१) बालअध्यापनांतील या विषयाचें स्थान : बालशिक्षणांत शिक्षणाची योजना बालकांच्या आवडी-निवडी, शक्ति-बुद्धि इत्यादि गोष्टी ध्यानांत घेऊनच मुख्यत्वें व्यक्तिशः होत असल्यानें प्रत्येक बालकाचें व्यक्तिगत ज्ञान मिळवण्याची पात्रता वाढवणें हा एक बालअध्यापनाचा उद्देश आहे. त्यासाठीं शिक्षिका होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला बालमानसशास्त्राचा अभ्यास करावा लागतो. या अभ्यासाच्या अनुसंधानांत दोन बालकांचा विशेष अभ्यास करावा लागतो. त्यासाठीं प्रत्येक बालकाच्या प्रगतीचें अवलोकन दर पंधरा दिवसांनीं बालअध्यापन विद्यार्थ्याला लिहावें लागतें. मानसशास्त्राचा अभ्यास आणि ह्या अवलोकनामुळें शिक्षिकेची बालकाच्या मासिक प्रगति-नोंदी लिहिण्याची पात्रता वाढते. म्हणून अध्यापन मंदिरांतील या कामाचा संबंध संचलनशील प्रगति-नोंदीशीं कसा आहे, हें अध्यापकानीं शिक्षक-विद्यार्थ्यांच्या लक्षांत आणून दिलें पाहिजे.

विकास-प्रगतीचे संचयशील पत्रक आणि शिक्षक-विद्यार्थ्यांनीं करावयाच्या अवलोकनांची योजना यांत एकसूत्रता असणें आवश्यक आहे. या दृष्टीनें अवलोकनासंबंधींचे मुद्देच संचयशील प्रगति-पत्रकांच्या खणांचे मथळे म्हणून योजले आहेत. या मुद्यांचा बालशिक्षक आणि बालअध्यापनाचे विद्यार्थी, शिक्षक यांना उपयोग होणार असल्यानें हे मुद्दे येथें विस्तारानें विशद करीत आहें.

(२) शारिरीक विकास : (खेळ, क्रीडांगण, व्यावहारिक जीवनव्यवसाय आदींचे अवलोकनावरून) यांत चार मुद्यांचा विचार झाला पाहिजे. (क) सामान्य देखाव (ख) शारीरिक आरोग्य, (ग) शरीरचापल्य व (घ) चलनसुसंबद्धता (Motar Coordination) (क) बालकाच्या सामान्य देखाव अथवा दर्शनांत त्याचा शारिरिक बांधा, वजन, शरीरावयवांतील सप्रमाणता, व्यक्तिगत आकर्षकपणा, स्नायुस्थिति या मुद्यांबरोबरच नीटनेटकेपणा, स्वच्छता आणि पोषाख सोयीचा व आकर्षक असतो किंवा नाहीं यासंबंधीची नोंद द्यावी. (ख) शारीरिक आरोग्याच्या बाबतींत दोन गोष्टी लक्षांत घ्याव्या. एक म्हणजे बालकाची सहनशक्ति. थंडी, उष्णता, ऊन, वारा, पाऊस श्रम वगैरेंचा त्याच्या शरीरारोग्यावर कसा परिणाम होतो तें, पाहिलें पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे संसर्गजन्य अथवा साथीच्या रोगाची बाधा त्यांना लगेच होते किंवा नाहीं याची नोंद ठेविली पाहिजे. सारांश त्याच्या आजाराची व ते आजार होण्याच्या कारणांची नोंद ठेविली पाहिजे (ग) चलनचापल्याच्या बाबतींत बालकाच्या हालचाली मंद, जलद कीं समधारण आहेत हें इतर मुलांच्या मानानें पाहून नोंद झाली पाहिजे. (घ) चलन सुसंबद्धता : यांत बालकांच्या स्नायूंच्या हालचालींच्या विकासाची नोद लिहावी स्नायूंच्या विकासक्रमात प्रथम मोठ्या स्नायूंचा विकास होतो. यांत बालकाच्या (१) चालणें (२) धावणें (३) दोरीच्या उड्या मारणें (४) साध्या उड्या मारणें (५) नाचणें (६) तोल सांभाळणें (७) लोंबकळणें (८) घसरणें (९) चढणें (१०) ट्रायसिकल चालवणें (११) झेलणें व फेकणें (१२) उचलणें-ठेवणें

(पान १० वर पहा)

पूर्वप्राथमिक भाषा-शिक्षण

लेखांक ७ वा: शब्दकोशाचा विकास : भौतिक विज्ञान परिचय

शब्दसमूह क्रमांक १८ : उष्णतासंबंधित शब्द: गरम, थंड, जळणें, भाजणें, भिजणें, उकळणें, वाफ होणें, कडकडणें, वितळणें, उष्णमान, प्रसरण पावणें, घर्षण, घासणें इत्यादि.

अनुभव योजना : उष्णतेचा अनुभव बालकाला परोपरी होत असतो. या अनुभवांतून उष्णता म्हणजे काय, ती कशी निर्माण होते किंवा कोठून मिळते, तिची जरूरी काय, उपयोग काय, पदार्थांवर तिचा काय परिणाम होतो वगैरे गोष्टींकडे बालकाचें लक्ष शिक्षकाला सहज वेधतां येईल. उन्हाळ्यांत पातळ कपडे कां घालतों, थंड पाणी कां पितों, पंखे कां चालवतों, थंड पेयें कां पितों, उलट हिवाळ्यांत त्याच्या उलट कां करतों यासंबंधीं प्रसंगविशेषीं सूचन करतां येतें. चुलीवर पाणी, दूध, तेल ठेवलें कीं तें गरम होतें, आपले हात एकमेकावर घासले तर ते गरम होतात. पांगाऱ्याच्या बिया दगडावर घासल्या तर चटका कां बसतो ! एखादा स्पिरिट लँप घेऊन उष्णता कशाला म्हणायचें, उष्णतेच्या पाण्यावर परिणाम कोणते होतात, पाण्याचें उष्णमाण कसें वाढत जातें, पाणी प्रसरण कसें पावतें, त्याची वाफ कशी होते, सर्व पाणी कसें आटतें, तसेंच मेण कसें वितळतें, बोट कसें भाजतें वगैरे गोष्टींची स्पष्टता सहज करतां येते. स्पिरिट लँपप्रमाणेंच सूर्यापासून आपल्याला उष्णता कशी मिळते, ती उन्हाळ्यांत जास्त कां मिळते व हिंवाळ्यांत कमी कां मिळते, थंड हवा, गरम हवा, त्यांची ठिकाणें. सारांश उष्णतेसंबंधीचा जीवनांत जो व्यापक अनुभव मिळतो त्याच्या आधारें उष्णतासंबंधित शब्द शिक्षकांनी योग्य अर्थाच्या संदर्भांत वापरले पाहिजेत. या शब्दाचा उपयोग मुलांना करावा लागेल असे प्रसंग उपस्थित केले पाहिजेत.

बाळाची मुलायम त्वचा...



जंतुरोधक आणि किटाणूंचा नाश करणारे आहे. नियमित आंघोळ केल्यानंतर, किंवा केव्हांही गरज असतांना, बाळाच्या नाजूक कातडीवर उदी नर्सरी पावडरचा एक हात फिरविल्यास ही त्वचेला सर्वदिन उल्हसित ठेवेल आणि त्वचा सर्वदिन निरोगी राखील.

ही खास बाळासाठी बनविली असून सिध्दांतील जंतुरोधक (Antiseptic) गुणधर्म त्वचेचा स्वच्छंद करुन शरीराचे तापमान योग्य राखण्यास मदत करतील.

घरोघरी कुटुंबांत आणि प्रत्येक बालकाच्यांत नित्य वापरतात

उदी नर्सरी पावडर, मुंबई-२८

शब्दसमूह क्रमांक १९ : प्रकाशसंबंधित शब्द : प्रकाश, अंधार, उजेड, भरपूर छाया–उजेड, कमी उजेड, किरण, प्रतिमा, प्रतिबिंब, परिवर्तन, इंद्रधनुष्य, भिंग, प्रतिमावर्धन, प्रतिमा–संकोच, सूक्ष्मदर्शक, फोकस, इलेक्ट्रिक लाइट, न्यूऑन लाइट, चिमणी, कंदील, पणती, आकाशदिवा, पेट्रोमॅक्स, मशाल इत्यादि.

अनुभव योजना : उष्णतेप्रमाणें प्रकाशाचा अनुभवही मुलांना रोज रोज मिळतो. तरीदेखील या विषयाच्या परिचयासाठी किंवा या विषयासंबंधीचें भान निर्माण करण्यासाठीं पूर्व–प्राथमिक संस्थेंत थोडी साधन–सामग्री ठेविली पाहिजे. प्रकाश नियमावर आधारलेलीं अनेक खेळणीं बाजारांत मिळतात. उदा. निरनिराळ्या प्रकारचीं भिंगें, लोलक, त्रिपार्श्व काच, कॅलिडोस्कोप, चष्म्याच्या काचा, आरसे, बहिर्गोल, अंतर्गोल आरसे, पिनहोल कॅमेरा, न्यूटन्स डिस्क या साधनांशीं कसें खेळावें, काय पहावें वगैरेसंबंधींच्या सूचना कराव्या व मुलांना प्रयोग करूं द्यावे. पाण्यानें अर्ध्या भरलेल्या ग्लासांतील चमचा तुटलेला दिसतो, भिंगांतून प्रतिमा लहानमोठ्या करतां येतात. प्रकाशाचा परिणाम रोपट्यावर कसा होतो, प्रकाश जीवजंतूना आवडत नाहीं, स्वच्छतेच्या

फॅन्सी नायलॉन साडी, नायलॉन जेकार्ड, बॉर्डर,

डोरिया, क्रेप, जॉर्जेट, टॉफेटा, सॅटीन, फ्लावर वगैरे

निरनिराळ्या रंगांत, तसेंच आकर्षक डिझाइन्समध्यें छापलेले मिळतात


: टेलिग्राम :

'BIPFABRIC

: टेलिफोन :

मिल : ६०५०४

शॉप : ३९७४९



क्लॉथ शॉप

गोविंद गल्ली,

मूळजी जेठा मार्केट,

मुंबई २

'BIPSU FABRICS

: रीटेल शॉप :

बिपीन सिल्क मिल्स कं. प्रायव्हेट लि.,

१२ दाहर रोड, मुंबई २८

(इंडिया)

A (ROHIT) GROUP OF ENTERPRISES

दृष्टीनें प्रकाशाचें महत्त्व काय, उजेड कोठून मिळतो वगैरे सामान्य ज्ञान मुलांना करून देतां येण्यासारखें आहे. बारीकसारीक कीटकांचे अवयव; फुलांचे भाग पाहण्यासाठीं भिंगाचा उपयोग करणें, शाळेंतील एपिडायोस्कोप, मॅजिक लॅन्टर्न, विजेचे दिवे; त्यांचे रिफ्लेक्टर्स, घराच्या खिडक्या, काचेचीं कौलें अशा अनेक गोष्टी मुलांच्या ध्यानांत आणतां येतील.

शब्दसमूह क्रमांक २० : विद्युत्संबंधी शब्द : घर्षण, ऋणविद्युत, धनविद्युत, विजेचा प्रवाह, आकर्षण प्रतिसारण, प्लग, स्वीच, बल्ब बॅटरी, सेल, युनिट इत्यादि.

अनुभव योजना : ग्रामीण प्रदेशांतील बालकांना विजेचा अनुभव स्वाभाविकपणें मिळत नाहीं. केस विंचरतां विंचरतां केस उभे राहून कंगव्यांना चिकटतात व कट् असा बारीक आवाज येतो तो केव्हां केव्हां मुलांना कळतो. शहरांतील मुलांना विजेचा अनुभव जिथें तेथें येतो. विजेचें दिवे, पंखा, बॅटरी, विजेच्या तारा, स्विच, प्लग, विजेची घंटा इत्यादि. शाळेच्या वातावरणांतहि यासंबंधींचा विशेष अनुभव योजणे फारसें अशक्य नाहीं. शाळेंत कांचेचे दांडे, एबोनेटचे दांडे, मांजराचें कातडें, रेशमी कापड, एखादा इलेक्ट्रोस्कोप, बॅटरी, घंटा कशी वाजते वगैरे दाखवणारें खेळणें, इलेक्ट्रिकचा उष्णतेसाठीं प्रकाश मिळविण्यासाठीं व गति निर्माण करण्यासाठीं उपयोग, इलेक्ट्रिक शेगड्या, हीटर्स, इस्त्र्या, लहानसा स्विच बोर्ड वगैरे साहित्य ठेविल्यास या विषयाची जिज्ञासा सहज उत्पन्न करता येईल.

शब्दसमूह क्रमांक २१ : चुंबकत्वसंबंधित शब्द : लोहचुंबक, उत्तर ध्रुव, दक्षिण ध्रुव, चुंबकीय सुई, चुंबकीय दगड इत्यादि.

अनुभव योजना : चुंबकीय नियमावर आधारलेलीं अनेक खेळणी बाजारांत मिळतात. 'राम-रावण-सीता'चें खेळणें, चुंबकीय बंगला पेटी, चुंबकीय फिश पॉड, चुंबकीय चक्र मासे आणि इतर वस्तु या खेळण्यांशिवाय निरनिराळ्या प्रकारचे लोहचुंबक, लोखंडाचा कीस, चुंबकीय सुया, दिशादर्शक होकायंत्र वगैरे वस्तु बालमंदिरात ठेवाव्या. लोहचुंबकत्व कांचेतून, पुठ्ठ्यांतून, लाकडांतून कसें कार्य करतें त्यासंबंधी खेळ पाहणें मुलांना फार आवडतें. त्याचप्रमाणें लोखंडी सळ्यावर चुंबक घासून नवें लोहचुंबक बनवणें, त्याचें आकर्षण व प्रतिसारण पाहणें व त्याचे प्रयोग करणें यांत मुलांना फार मौज वाटते.

शब्दसमूह क्रमांक २२ : ध्वनिसंबंधित शब्द : आवाज, आवाजाच्या लहरी, ध्वनि-प्रतिध्वनि, स्वर, स्वरभिन्नता, स्वरज्ञान, सूर, ताल, ध्वनिवाहक, ध्वनिअवाहक,

बर्फासारखें थंड
वनस्पतियुक्त
उमा
पांढरे केंस नुकसान न करतां काळे करणें, लांब व चमकदार बनवणें, उवा आणि लिखा काढून मेंदूला थंड ठेवण्यासाठीं
उमा वापरा
सर्वत्र विकत मिळतें—
बनविणार....
उमा प्रॉडक्टस्
बोरीस चाळ, नॉवेल्टी सिनेमाजिक, ग्रांट रोड, मुं. ७
स्टॉकिस्ट:-केशवजी सी. ठक्कर, दवा बाजार
प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २



शुभ प्रसंगाच्या वेळी सुखमाधुरीसाठीं वापरा
दिलरंजन सुवासिक सुपारी
सुमधुर, शेंकडों लोकांना आनंदित करणारी—
—: सर्वत्र विकली जाते :—
आपल्या गांवांत एजन्सीसाठीं लिहा :—
मालक: आर. के. सुपारीवाला
शांती भुवन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.
शाखा : पोस्ट ऑफिसच्या बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४
चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ, ग्रॅट रोड, मुंबई ७

अनुभव योजना : सध्याच्या रेडिओच्या काळांत ध्वनि-संबंधित ज्ञानही मुलांना स्वाभाविकपणें होत असतें. शाळेंत संगीताचा तास असतो त्यांत स्वर कोणते, सूर कशाला म्हणायचें, उंच स्वर, खालचा स्वर, ताल द्रुत गतीचा, मंद गतीचा, ताल प्रकार यांचे ज्ञानाकडे थोड्याशा प्रयत्नानें मुलांचें लक्ष वेधतां येतें. नदीनाल्यावर, तलावावर जाऊन पाण्यांत दगड पडला म्हणजे जशा लहरी उठतात,तशाच आवाजाच्या लहरी उठतात. देवळांत आवाज केला म्हणजे प्रतिध्वनि कसा उमटतो वगैरे अनुभव मुलांना देतां येतील. याशिवाय रेडिओ लहानमोठा करून आवाजांतील भिन्नता दाखवतां येईल; मुलांनीं ध्वनिवर्धक भुंगळे बनवणें, त्यांचा उपयोग करणें, दोऱ्याचे टेलिफोन बनवणें, त्यांचा उपयोग करणें यावरून ध्वनीचा कसा पसार होतो याची कल्पना चांगली येऊं शकते. विजांच्या कडकडाटांत प्रथम वीज चमकते, तिचा प्रकाश दिसतो व नंतर आवाज येतो; त्यावरून प्रकाश आणि ध्वनीच्या गतीकडे लक्ष वेधतां येईल. शाळेत एक लहानसा ट्यूनिंग फोर्क, थोड्या तारा वगैरे साहित्य ठेवलें तर ध्वनीबाबत विविध अनुभव मुलांना करून देतां येतील.

शब्दसमूह क्रमांक २३ : हवामानविषयक शब्द : थंड, गरम, कोरडी, दमट हवा, उष्णमान, थर्मामिटर, हवेंतील ओलावा, दंव, धुकें, ऋतु, वादळ, हवेची गति, हवेची दिशा, वारा.

अनुभव योजना : वनभोजन, प्रवास यांत हवामानाचा विचार सुचवणें; पतंग कोणत्या वेळीं उडवतां येतात, थंड हवेच्या ठिकाणीं कां जातात, समुद्राजवळची हवा, देशावरची हवा, पावसाळी हवा, ढग यासंबंधींच्या गप्पागोष्टी, तसेंच शाळेंत उष्णतामापक, **हवेचा कोंबडा**, पर्जन्यमापक, दिशा दर्शक वगैरेंचा उपयोग करणें, त्याचप्रमाणें **फिरकडी**, पतंग, चकरडी वगैरे वस्तु खेळणीं म्हणून बनण्याला प्रोत्साहन देणें, हवामानाच्या खुणांचे चार्टस् भरणें, प्रवासांत हवामानाच्या परिणामदर्शक गोष्टीकडे लक्ष वेधणें.

विज्ञानाची आवड असणाऱ्या शिक्षकांना ह्या अनुभव-योजना सूचक ठरतील. यांतील प्रत्येक गोष्टीचें विवरण विस्तारानें करण्याचें टाळलें आहे. या विषयांत अनेक प्रकारें नवीन गोष्टी मुलांच्या अनुभवांत कशा आणाव्या हें काम करीत असतां व त्या दिशेनें विचार करणाऱ्या शिक्षकांस अधिक सुचेल. निर-निराळ्या प्रकारचे दगड, जमिनीचे प्रकार, निरनिराळे धातु, त्यांचा उपयोग वगैरे विषय भौतिक विज्ञानाच्या दृष्टीनें आणखी सुचवतां येण्यासारखे आहेत. प्रस्तुत लेखमालेंत बालमंदिराचें वातावरण समृद्ध कशा तऱ्हेनें करावें येवढेंच सुचवण्याचा उद्देश आहे.

भौतिक विज्ञानासंबंधीं येथें आटोपतें घेऊन पुढील लेखांत सचेतन सृष्टीच्या अनुभवावर आधारलेल्या शब्दांचा आणि त्यांच्या अनुभव योजनांचा विचार करीन.

—ना.

———

सांड्र बार्लीमृत
व्हिटॅमिनयुक्त
मुलांचे टॉनिक



दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स,
चेंबूर, प्रायव्हेट लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस : चेंबूर, मुंबई ३८
—: स्थानिक शाखा :—
काळबादेवी, ठाकुरद्वार, परेल व दादर

बाल-शिक्षण आणि संघ समाचार

अहमदाबाद : दि. १९-१०-५८ रोजीं नू. बा. शि. संघाचे कार्याध्यक्ष श्री. जादवजीभाई मोदी यांच्या अध्यक्षतेखालीं संघाच्या व्यवस्थापक मंडळाची सभा होऊन तींत आगामी बालशिक्षण जयंति सप्ताहांत गुजरात-सौराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यांत 'शिक्षण-पत्रिका' आणि संघकार्याचा प्रचार करण्याचा निर्णय घेण्यांत आला. याच दिवशीं दुपारीं संघाच्या सामान्य सभेची बैठक होऊन व्यवस्थापक मंडळाच्या प्रचार योजनेस पाठिंबा देण्यांत आला. संघाचे १९५७-५८ च हिशोब व अहवाल सभेला सादर करण्यांत आले.

मुंबई : शिशुविहार, दादर या संस्थेचा बाविसावा वार्षिक उत्सव दिनांक ११ आणि १२ रोजीं मुंबई महापालिकेचे डेप्युटी कमिशनर श्री. एस. एम्. वाय. शास्त्री आणि ना. दा. ठा. विद्यापीठाच्या व्हाइस चॅन्सेलर लेडी श्रीमती ठाकरसी यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. संस्थेचा रौप्य महोत्सव १९६१ सालीं येत असल्यानें संस्थेच्या मंडळानें संस्थेचें विस्तरण करण्याच्या दृष्टीनें संस्थेच्या इमारती बांधण्यासाठीं दहा लाख रुपयांचा निधी एकत्र करण्याचें ठरविलें आहे.

श्री. शे. ना. नामले : नू. बा. शि. संघाचे मुख्य चिटणीस व 'शिक्षण-पत्रिके'चे संपादक यांची दिनांक २०-१०-५८ रोजीं रशियास जाणाऱ्या तीन व्यक्तींच्या प्रतिनिधी मंडळांत निवड झाली. हें मंडळ रशियांत एक महिना राहून तेथील प्राथमिक आणि पूर्व-प्राथमिक संस्थांच्या विकासाचा अभ्यास करील. गेलीं बावीस वर्षें पूर्व-प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत एकनिष्ठपणें कार्य करणाऱ्या श्री. नामले यांची निवड केल्याबद्दल हे प्रतिनिधी पाठवणाऱ्या इंडो-सोविएट कल्चरल सोसायटीला धन्यवाद दिले जात आहेत.

विकासवाडी योजनेसाठीं 'मौसी' : श्रीमती ताराबाई मोडक यांनीं नू. बा. शि. संघाच्या विकासवाडी योजनेसाठीं आर्थिक मदत मिळावी म्हणून श्री. प्रभातकुमार यांनीं दिग्दर्शित केलेल्या 'मौसी' चित्रपटाचा पहिला खेळ मिळाविला आहे. या खेळाचें उत्पन्न विकासवाडी योजनेला देण्यांत येणार आहे.

अध्यापन प्रवास : शिशुविहार, बाल अध्यापन मंदिर, दादरच्या विद्यार्थिनी दिनांक २१ ते २६ मौनी विद्यापीठ गारगोटी, कोल्हापूर, किर्लोस्करवाडी व कोयना प्रोजेक्टची माहिती घेण्यासाठीं त्या बाजूस प्रवास करणार आहेत.

बाल अध्यापन मंदिरांस अगत्याची सूचना : १९५९ मधें बाल अध्यापनाच्या ज्या परीक्षा होतील त्यांत मानसशास्त्र, कार्यपद्धति, बाल-आरोग्य, शालेय व्यवस्था, प्रचलित प्रश्न आदि पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या चार विषयांचे पेपर्स जुन्या आणि नव्या शिक्षणक्रमाप्रमाणें योजले जातील. त्यामुळें नापास झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनीं जो अभ्यास केला असेल त्याप्रमाणें परीक्षेला बसतां येईल.

दोन वर्षांच्या शिक्षणक्रमांतील भाषा-इतिहास-भूगोलादि विषयांचे पेपर्स पूर्वप्राथमिक अध्यापनाच्या जुन्या शिक्षणक्रमाप्रमाणें स्वतंत्र काढण्यांत येतील. आपल्या संस्थेतील किती **आजी-माजी विद्यार्थी नव्या किंवा जुन्या शिक्षण क्रमाप्रमाणें कोणत्या विषयांच्या परीक्षेला बसणार आहेत, तें स्पष्टपणें आगाऊच खात्याला कळविण्याची खबरदारी, प्रत्येक बाल अध्यापन संस्थेच्या मुख्याध्यापकांनीं घेतली पाहिजे असें समजतें.**


× × ×

'बालगीत संग्रह' पुस्तकासाठीं विनंति

पूर्व-प्राथमिक प्रकाशनातर्फे लौकरच एक बालगीत संग्रह प्रसिद्ध करण्याचें ठरलें आहे. त्यांत मुलांच्या वयाप्रमाणें २॥ ते ३॥, ३॥ ते ४॥ व ४॥ ते ६ अशा तीन गटांसाठीं वेगवेगळ्या कवींच्या कविता एकत्रित करण्यांत येतील. या संग्रहासाठीं कविता पाठविण्यास सर्व बालकवींना विनंति आहे. कविता कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरांत लिहावी. त्यावर गाण्याचा राग, ताल व जमल्यास नोटेशन लिहून पाठवावें. न पसंत पडणाऱ्या कविता वापस हव्या असल्यास सोबत पुरेसें पोस्टेज पाठवावें. ज्यांच्या कविता पसंत केल्या जातील त्यांना तसें कळविण्यांत येईल.

लक्ष्मीबाग, जोगळेकरवाडी, शीव, मुंबई—२२ } स. आ. केळकर, पूर्व-प्राथमिक प्रकाशनातर्फे

ASP/LIC-3..




खरं जन्मभर कोण झोंके ?



झोंके पेत असतांना, समजा, छोट्याशा मुलीचा हात सुटला आणि ती जमिनीवर आपटली तर तिला तीव्र वेदना होतात; परंतु तिला पडतांना पाहणाऱ्या तिच्या आई बडिलांना ज्या वेदना होतात, त्या कांहीं निराळ्याच प्रकारच्या असतात.

आईवडील म्हटले म्हणजे अनेक प्रकारच्या भावना हा आल्याच. त्यांपैकीं एक म्हणजे जिव्हाळा. मुलाबाळांच्या सुखदुःखाशीं तो निगडीत असतो; आणि दुसरी म्हणजे त्यांच्या चालू आणि भावीकाळच्या कल्याणाची काळजी.


एक दूरदर्शी आईवडील ह्या नात्यानें आपल्या मुलांच्या भावी काळासाठीं आपण कांहीं तरी तरतूद केलीच पाहिजे असें तुम्हांला वाटत असतें. आयुर्विमा ही तुमची काळजी सहज दूर करूं शकतो. तुम्हीं जिवंत असा किंवा नसा, तुमच्या मुलाच्यासाठीं आखलेल्या तुमच्या योजना पूर्ण करण्याची, आयुर्विमा तुम्हांला संपूर्ण मी देतो. तुम्हांला शक्य असेल तेवढी बचत करा–दरमहा आयुर्विम्यासाठीं वांचविलेल्या पांच किंवा दहा रुपयांमुळें सुद्धां तुम्हांला आणि तुमच्या आवडत्या जिव्हाळ्याच्या माणसांना एक प्रकारची नवीनच सुरक्षितता मिळेल.



मोफत हेल्पफुलनेस सर्टिफिकेट ऑफ इन्शिया

मुद्रक व प्रकाशक:—श्री. शेष-सामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर-मुंबई १४.
मुद्रणस्थान:—समर्थ प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, पोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

हजारों कुटुंबांतून आतां अत्यंत खुषीनें
वापरले जात आहे



* गळणारे केंस बंद करतें व केंसांची वाढ करते.
* मेंदूला शीतलता आणतें व केंस तुकतुकीत बनवितें.
* यशस्वी प्रयोगांनंतरच जनतेसमोर ठेवलें गेलें आहे.

लोमा प्रॉडक्टसची एक अनमोल कृति

: सोल एजन्ट्स :


एम्. एम्. खंभातवाला, रायपूर, अहमदाबाद

एजन्ट्स : सी. नरोत्तम अँड कं.,
मंगलदास रोड, मुंबई-२.
टेलिफोन नं. ३०५७५

CM P. S.







शिक्षण पत्रिका

दिपोत्सवी विशेषांक



प्रवासाची चांगली रीतभात

—☆—

१ देवपदाच्या खालोखाल स्वच्छतेचा महिमा आहे म्हणून स्वच्छतेची संवय करा. रेल्वेच्या डब्यांत अथवा प्लॅटफॉर्मवर अन्नावशेष, फळांचीं सालपटें व पाणी फेंकण्याचें टाळा. उतारूंच्या डब्यांत व स्टेशनवर ठेवलेल्या कचरा-पेट्यांचा उपयोग करा.

२ प्लॅटफॉर्मवर अविवेकानें जेथें तेथें थुंकणें आरोग्याला विघातक आहे. रीतभात म्हणून देखील ती वाईट गोष्ट आहे. कृपया थुंकदाण्यांचा उपयोग करा.

३ थंड आणि गाळून शुद्ध केलेलें पाणी स्टेशनवर पिण्यासाठीं ठेवलेलें असतें, त्याचा दुरुपयोग करूं नका.

४ बसण्याच्या जागेवर पाय ठेवून बसल्यामुळें दुसऱ्याला चीड येईल. कृपया डब्यांत योग्य रीतीनें बसा.

५ आपलें भारी सामान ब्रेक-व्हॅनमध्यें ठेवण्याची व्यवस्था करा, आणि आपल्या सहप्रवाशांना आणि स्वतःला डब्यांत अधिक मोकळी जागा करा.

६ अति गर्दीच्या वेळीं, जेव्हां दारें-खिडक्या बंद असतात तेव्हां सहप्रवाशानें हरकत घेतल्यास गाडीच्या डब्यांत धूम्रपान करणें हा गुन्हा आहे. तेव्हां सहप्रवाशानें विनंति केल्यास धूम्रपान करण्याचें टाळा.

७ रेल्वेगाड्या ही आपल्या राष्ट्राची संपत्ति आहे म्हणून जे कोणी लोक रेल्वेच्या मालमत्तेची नासधूस किंवा नुकसानी करतात त्यांना पकडून देण्यास मदत करणें हें सर्वस्वी हितकारक काम आपण केलें पाहिजे. याकरितां आपण कामावर असलेल्या, संबंधित युनिफॉर्म घातलेल्या रेल्वे स्टाफला अशा प्रकारचे प्रकार कळवून दाखवून द्यावयास पाहिजे. त्याचप्रमाणें जे कोणी समाजघातकी लोक विनाकारण रेल्वेची साखळी ओढून धोका दर्शवतील त्यांनाही पकडून द्यावयास पाहिजे.

— मध्य आणि पश्चिम रेल्वेकडून —

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ८] मुंबई [नोव्हेंबर १९५८

संपादकीय

प्रकाशमय दिवाळीपासून सुरू होणारें नूतन वर्ष 'शिक्षण-पत्रिके'च्या लहानमोठ्या आणि सर्व प्रकारच्या वाचकांना आनंदाचें जावो.

अलीकडे वर्तमानपत्रें आणि मासिकें यांचा संसार अत्यंत जिकीरीचा झाला आहे, याची सर्वांना कल्पना आहे. छपाई आणि कागदाचे भाव सारखे वर वर जात आहेत. त्यामानानें ग्राहक-संख्येंत विशेष भर पडत नाहीं. त्यामुळें दिवाळीसारखे सणवार 'पत्रिके'सारख्या लहानशा संसाराच्या मासिकांना बेतावेतानेच करावे लागतात. 'दारीं सण नि उरीं ऋण' करण्याचें धोरण आम्ही अवलंबीत नाहीं. याबद्दल 'पत्रिके'चे हितचिंतक आम्हाला दोषी ठरवतील असें वाटत नाही.

यंदा दिवाळी नोव्हेंबरांत आल्याने नूतन बालशिक्षण संघाचे संस्थापक स्व. गिजुभाई यांचा जयंत्युत्सव आणि दीपोत्सव एकमेकाला लागून आले, ही विशेष योगायोगाची गोष्ट आहे. बालशिक्षण जयंत्युत्सवांत पुण्यश्लोक गिजुभाईंच्या जीवन-स्मृतींतून नवीन नवीन प्रेरणा घेऊन, त्यांनीं ज्या कार्यासाठी आपलें जीवन समर्पण केलें तें बालशिक्षणाचें कार्य अधिक जोमाने चालावें, यासाठीं विविध उपक्रम योजण्यांत येतात. यंदाच्या जयंत्युत्सवांत 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रचाराला अग्रक्रम देण्यांत येईल अशी आम्हीं अपेक्षा करतों. या प्रचारामुळेंच 'शिक्षण-पत्रिका' पालक, शिक्षक आणि बालकांची सेवा अधिक कार्यक्षम बनून करूं शकेल यांत शंका नाहीं.

या वेळच्या अंकांत युरोप-अमेरिकेंतील पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या इतिहासाचा संपूर्ण आढावा बाल-शिक्षणप्रेमी वाचकांना सादर करण्याचा आमचा मनोदय होता. परन्तु 'पत्रिके'च्या पृष्ठसंख्येवर मर्यादा घालावी लागल्यामुळें हा समग्र आढावा या एकाच अंकांत सादर करणें आम्हाला शक्य झालें नाहीं. पूर्वप्राथमिक शिक्षणाची सुरवात आणि आर्थिक दृष्ट्या शिक्षण स्वावलंबी करावें, असा पुरस्कार करणाऱ्या पेस्टॉलाझीचें जीवन आणि विचार बालशिक्षणप्रेमी वाचकांना स्फूर्तिदायक वाटतील असा आम्हाला विश्वास वाटतो. पेस्टालॉझी-प्रमाणेंच इंग्लंडमधील दलितवर्गांत मॅकमिलन भगिनींनी पूर्वप्राथमिक शिक्षणाचें कार्य केलें आहे, त्याची कथाही वाचकांना उद्‌बोधक वाटेल अशीच आहे. भारताच्या उत्थानाचें कार्य सर्वत्र चाललें असतांना या दोन शिक्षण-कारांनीं आपापल्या जनतेसाठीं काय केलें, आपल्या शैक्षणिक समस्या कशा सोडविल्या, दारिद्र्यानें, उपेक्षेनें आणि शोषणानें धैर्यगलित झालेल्या प्रजेचें उत्थान पूर्वप्राथमिक शिक्षण-योजनांतून कसें केलें, तो सर्व वृत्तांत आपल्या देशांतील नवरचनेच्या कार्याला प्रोत्साहन देणारा आहे.

'पत्रिके'च्या याच अंकांत अन्यत्र पूर्वप्राथमिक प्रकाशनातफें बालगीतांच्या प्रकाशित व हस्तलिखित पुस्तकांचें परीक्षण योग्य अशा समितीकडून करण्यांत येऊन उत्तम ठरणाऱ्या तीन पुस्तकांना चांगलीं बक्षिसें देण्याची योजना जाहीर केलेली आहे. त्याबद्दल आम्हीं पूर्व-प्राथमिक प्रकाशनाच्या चालकांना धन्यवाद देतों. या कामीं सर्व बालकवींनी साह्य द्यावें अशी आमची विनती आहे. त्यामुळें अनायासेंच प्रकाशित बालगीतांच्या पुस्तकाचें समालोचन होऊं शकेल व अप्रकाशित पुस्तकाच्या लेखकांना आपलीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याची प्रेरणा होऊन कांहीं मार्ग सांपडेल अशी आशा आहे.

'पत्रिके'च्या गेल्या अंकांत 'बालगीत-संग्रह' पुस्तकाबाबत जाहीर विनंति आलेलीच आहे, त्याबाबत आम्हीं वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. बालमंदिरांत काम करणाऱ्या शिक्षकांना या कामीं विशेष मदत करतां येईल. त्याशिवाय अन्य सर्व कवींनी या कामीं सक्रीय साह्य द्यावें व हा गीत-संग्रह उत्तम बनविण्यास मदत करावी.

पुनश्च आपणां सर्वांना दिवाळी व नूतन वर्ष आपल्या सर्वांच्या आकांक्षांना पोषक व प्रेरक ठरो अशी प्रार्थना करून आपली रजा घेतों.

बालमंदिरांचे अध्वर्यु—गिजुभाई

बालमंदिराचे अध्वर्यु स्व. गिजुभाई बधेका यांचा जन्मदिन १५ नोव्हेंबर हा आहे. म्हणून या सुमारास गिजुभाई जयन्तीचा विशेष कार्यक्रम ठेवण्याचा नूतन बालशिक्षण संघाचा प्रघात आहे. त्यांत संघाला नेहमींच अनेकानेक बालमंदिरांचें साह्य लाभत असतें.

गिजुभाईंचें बालशिक्षणाचें काम हें राष्ट्रीय उत्थापनांतील एक महत्त्वाचें काम आहे. आपलें राष्ट्र ज्यावेळीं पारतंत्र्याच्या कर्दमांत रुतलेलें होतें, त्यावेळीं त्यांतून बाहेर पडण्याची ताकद नव्या बालशिक्षणाने उत्पन्न करणें आवश्यक आहे, अशी खात्री पटल्यामुळेच गिजुभाईनी स्वतः या कामाला तममनधनाने वाहून घेतलें. आपल्या कामांतील एकनिष्ठतेमुळें, निरनिराळे अनुभव प्रत्यक्ष घेत असतां गिजुभाईना बालशिक्षणाची विशेष दृष्टि प्राप्त झाली. त्यामुळेच भावनगरच्या एका टेकडीवर रम्य वातावरणांत एक नमुनेदार बालमंदिर चालवून त्यांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. बालमंदिरांतील शिक्षणाचें साफल्य बऱ्याच प्रमाणांत पालकांच्या मुलांशीं वागण्याबाबतच्या मनोपरिवर्तनांत आहे हें जाणून आपल्या बालमंदिराच्या पालकांचें परिवर्तन घडवून आणण्याचें कामही त्यांना करावें लागलें. पण एवढ्यानें त्यांना समाधान लाभण्यासारखें नव्हतें. राष्ट्र-उत्थापनाच्या कामांतील बालशिक्षणाचा वांटा उचलावयाचा, तर राष्ट्राच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यांत बालमंदिरें उघडलीं गेलीं पाहिजेत, राष्ट्रांतील एकही मूल या लाभापासून वंचित राहूं नये म्हणून खटपट केली पाहिजे, या भव्य व उदात्त आकांक्षेनें त्यांनी नूतन-बाल-शिक्षण-संघाची स्थापना केली व त्याचें मुखपत्र म्हणून 'शिक्षण-पत्रिका' मासिकही सुरू केलें. याप्रमाणें बालशिक्षणाच्या कामाची मुहूर्तमेढ त्यांनीं आपली सर्व शक्ति पणाला लावून केली.


बालशिक्षणाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि आध्यात्मिक होती. बालसेवा हीच त्यांना प्रभुसेवा वाटत असे. म्हणूनच आपल्या बालशाळेला त्यांनी 'बालमंदिर' हें सार्थ नांव दिलें. 'बालमंदिर' हा शब्द त्यांनी घडविला आहे. आज हा शब्द रूढ झालेला आहे. पण त्या शब्दामागील भावना सतत नजरेसमोर बाळगण्याची आवश्यकता आहे.

गिजुभाई भावनेने भारावलले होते, त्यांच्या हृदयांत तळमळीचा अग्नि प्रखर पेटलेला होता. बालकार्यासाठीं सर्वस्वाचा होम करण्याची त्यांची तयारी होती; म्हणून त्यांच्या हातून उगम पावलेली ही बालशिक्षणाची गंगोत्री कित्येक अडी अडचणींच्या खांचखळग्यांतून अविरत तीव्र वेगानें चाललेली पाहण्याचें भाग्य त्यांच्या हयातींत त्यांना लाभलें. स्वतःनंतर आपलें कार्य तितक्याच प्रखर भावनेने चालू ठेवणारे कार्यकर्ते त्यांना लाभले व त्या कार्यकर्त्यांच्या हृदयांत गिजुभाईंच्या तळमळीच्या दीपज्योतीनें अनेकानेक ज्योति पेटविल्या गेल्या. सौराष्ट्र व गुजरात या प्रांतांतून त्यांना अनेक शिष्य लाभले. त्यानीं गिजुभाईंपाशीं येऊन फक्त बालशिक्षणाचें मर्मच जाणून घेतलें नाहीं, तर ते गिजुभाईंच्या भावनारसात ओतप्रोत झाले. मग त्यांनीं ठिकठिकाणीं बालमंदिरें उघडून नूतन-बालशिक्षणाचा झेंडा ठायीं ठायीं फडकविण्यास सुरवात केली. एवढेंच नव्हे, तर इतर अनेक प्रांतांतून कित्येक कार्यकर्ते त्यांच्याकडे ही बालशिक्षणाची नवी दृष्टि प्राप्त करून घेण्यास आले व त्यांच्या कार्याला अखिल भारतीय स्वरूपाचें बाळसें दिसूं लागलें.


आपला देश स्वतंत्र झाल्यापासून बालशिक्षणाचें कार्य अधिक वेगानें सुरू झालेलें आहे. नूतन बालशिक्षणाची महत्वाकांक्षा धारण केलेल्या कित्येक संस्था निर्माण झालल्या आहेत व होत आहेत. फक्त शहरांत व तेंही मध्यम आणि उच्च सामाजिक कक्षेच्या क्षेत्रात काम करून देशाला विशेष लाभ होणार नाही, हें ध्यानांत घेऊन या शिक्षणाची मशाल खेडोपाडीं घेऊन जाण्यासाठीं झटणाऱ्या कित्येक संस्था आज आपल्या भाग्याने हें काम करण्यास पुढें येत आहेत. आपल्या देशाचा भावी काळ उज्ज्वल होण्यास या संस्थांचें कार्य विशष उपयोगी पडणारें आहे. या सर्व चळवळीचें प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष श्रेय गिजुभाईंना आहे हें मान्य करण्यांत आपण आपल्या राष्ट्राच्या एका सुपुत्राचा आदर करीत आहोंत, एवढेंच नाहीं तर या भावनेंतून आपणाला मोठी शक्ति प्राप्त होणार आहे व त्यायोगें आपलें काम दिवसेंदिवस अधिकाधिक विकसित होणार आहे. कारण उत्पन्न होणाऱ्या अनेक अडचणींना मानसिक तळमळीच्या जोरावर पार करून जाण्याची शक्ति स्व. गिजुभाईंच्या जीवन-चरित्रावरून आपणांस प्राप्त होते.

स्व. गिजुभाईंनीं प्रज्वलित केलेली नूतन बाल शिक्षण संघाच्या कार्याची ज्योत दिवसेंदिवस अधिकाधिक तेवत राहून त्यायोगें अधिक मोठ्या क्षेत्रात प्रकाश फैलावला जात आहे. स्व. गिजुभाईंच्या हयातींत नूतन बाल शिक्षण संघानें स्वतंत्रपणें प्रायोगिक संस्था चालविली नव्हती परंतु त्याच तळमळीनें

[पान १२ वर पहा]



"कान्ता, तुझ्या अभ्यासावद्दल कांहीं फारसें
बोलण्यासारखें नाहीं, परंतु तुझा युनिफॉर्म मात्र
टिनोपाल वापरल्यामुळें नेहमीं अतिशय
चमकदार पांढराशुभ्र असतो म्हणूनच
मी तुला वरच्या वर्गांत घालतें."



"टिनोपाल" हा जे. आर. गायगी, एस. ए., बाल, त्वित्सरलंड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे.

कारखानदार : सुहृद गायगी प्रायव्हेट लिमिटेड, वाडी वाडी, वडोदा

एकमेव वितरक : सुहृद गायगी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पो. ऑ. बॉक्स ९६५, मुंबई

थोड्याशा टिनोपालने सर्व कपडे सर्वांत जास्त चमकदार पांढरे शुभ्र होतात

SISTA'S-SG 44 MAR

पालकांचा विशेष विभाग

याला जबाबदार कोण ?

'आधी भात खा, मगच तुला पोळी व श्रीखंड वाढेन. हें ग काय नेहमीं नेहमीं मला सतावतेस ! आतां का तूं लहान आहेस ? पांच वर्षांची पूर्ण झालीस. कालचा शिरीष आणि जयश्री कसं सगळं नीटनेटक जेवतात. तुला मात्र हें नको आणि तें नको. अशाने तुझी प्रकृति नीट कशी राहायची ?'

कमलताई आपल्या रंजनावर रागवत होती. एकंदर वातावरण गरमागरम होतें. आपण उगाच अशा वेळीं आलों असें मला होऊन चोरट्या चोरट्यासारखें झालें. रंजना मला फार आवडावयाची. मोठी गोड नि हंसरी पोरगी. लाघवी पण तितकीच. त्यामुळें तिच्याशीं गप्पागोष्टी करतांना मी आमच्या दोघांतील वयाचें अंतर नेहमींच विसरून जायचा.

'का ग, कमलाताई काय चाललं आहे ?' मी घरांत शिरतां शिरतां कांहीं तरी बोलायचं म्हणून प्रश्न केला.

'पहा हा भाऊमामा आला. आतां त्याच्यासमोर तरी मला खालीं पहायला नकों लावूं बाई.' रंजनाला उद्देशून बोलतांना कमलताईचा आवाज एकदम खालीं आला. रंजना मात्र फुरंगटून पाटावर बसलीच होती. समोर ताटांत वरणभात व बाजूला आमटी–भाजी दिसत होती.

'पहा रे भाऊ, आतां का रंजना लहान आहे ? पण रोज आपली पोळीच खाते. भात कसा तो तिला नकोच असतो. अशानें का तिला बाळसं येईल ? आमच्या वाड्यांतील तिच्या बरोबरीचीं सर्व मुलें कशी सगळं सगळ खातात ! त्यांना कोणाला माझ्यासारखा त्रास होत नाहीं. तूं तरी सांग मी आतां काय करूं तें !'

कोणाची बाजू घ्यावी याची मला मोठी पंचाइत पडली. कमलताईला कांहीं समजावून सांगणं शक्यच नव्हतं. बरं रंजना तरी माझं ऐकून वरणभात खाऊन युद्ध संपवून तह करेलच अशी खात्री नव्हती. तिला वरणभात खायला सांगायचें म्हणजे आमच्या मैत्रींत उगाच अंतर निर्माण करण्यासारखें झालें असतें. तरीपण रंजनालाच समजावण्यासाठीं प्रयत्न करायचं मी ठरवलं.

'काय रंजना, मी तर तुला आमच्या घरीं न्यायला आलों. तुझी मामी घरीं वाट पहाते आहे. येणार ना तूं ?'

रंजनाचा चेहरा एकदम खुलला. आमच्या घरीं तिला यायला फार आवडायचं. एक तर तिच्या मामीशीं तिची गट्टी होतीच. पण आमच्या शेजारचा पेंडशांचा पपू तिला फार आवडायचा. त्या दोन वर्षाच्या मुलाचें कौतुक करण्यांत, त्याला खेळवण्यांत, त्याचे पापे घेण्यांत रंजनाचा किती तरी वेळ जायचा. आपल्याला असा भाऊ कां नाहीं, याचाहि तिला खेद व्हायचा. एकदां तर सरळ तिने आपल्या आईला सांगितलें होतें 'तूं आण ना ग मला एक भाऊ. सगळीं कशीं दवाखान्यांत जाऊन बाळ आणतात ! तूं केव्हां जाणार !'

'आई, जाऊ का मी भाऊमामांकडे. खरंच पपू किती गोड आहे.' रंजनानें माझें आमंत्रण स्वीकारलें.

'हो तर. मी आतां तुला तयार करून देतें. पण तेवढा वरणभात खा. मग तुला श्रीखंड–पोळी देतें, ती खा. नाहींतर मामीला दुपारची भूक लागली, म्हणून त्रास देशील.'

रंजनाने तहाच्या अटी कबूल केल्या. वरणभात भराभर कालवून ती त्याचे गोळे गिळूं लागली. कसातरी भात संपवायचा हीच तिची इच्छा होती.

'असं नाहीं करूं रंजना. चावून चावून खावं. अशी भराभर भात गिळतेस काय ? आपल्याला कांहीं घाई नाहीं. सावकाश जेव, मग आपण जाऊं' मी रंजनाला समजावूं लागलों.

'मला नाहीं भात आवडत,' रंजनाने थोडक्यांत जबाब दिला. पण भाताचे गोळे गिळण्याचा क्रम चालूच ठेवला. मग भात संपला. कमलाताईला तिची खाण्याची रीत आवडली नव्हती, हें तर तिच्या चेहऱ्यावरील भावांवरून स्पष्टच होतें. पण ती कांहीं बोलली नाहीं. यामुळें मला बरें वाटलें. नाहींतर पुन्हा रणमैदान गर्जूं लागलें असतें.

'मला एकच पोळी वाढ,' रंजना म्हणाली.

'कां ग, रोज तर तीन पोळ्या खातेस ! या लहानशा पोळ्या, एक खाऊन कसें भागेल ! मग तुला भूक लागेल ना !' तुझें हौईपर्यंत भाऊमामा थांबणार आहे, तूं आपली सावकाश जेव.

रंजनाची घाईघाईनें जेवण्याची इच्छा होती. पण श्रीखंड-पोळी हे पदार्थ तिच्या आवडीचे असल्यामुळें आधीं एकच पोळी खाण्याची तिने इच्छा दाखवली, तरी नंतर दोन पोळ्या खाऊन ती उठली. कमलताईने तिचे कपडे बदलून दिले व मी तिला घेऊन निघालों, तेव्हां रंजना मोठ्या आनंदांत होती.

मी पाहिलेला आजचा प्रसंग एक मामुलीच होता. पण मुलांच्या खाण्यापिण्याच्या कितीतरी तक्रारी आमच्या ओळखीच्या मंडळींत नेहमीं ऐकूं येतात व

(पान १२ वर पहा)

जगाचा शेवट

झाडावरून खालच्या पाचोळ्यांत थड्दिशीं एक फळ पडलं. तो आवाज एका सशाच्या कानांत पडला. तो ऐकतांच तो स्वत:शींच म्हणाला, "अरे बापरे! पृथ्वी फुटून तिच्या ठिकऱ्या होताहेत! हो, त्याचाच हा आवाज! आतां जीव वांचवण्यासाठीं पळच काढला पाहिजे!"

आणि तो इतक्या जोरानं पळत सुटला, कीं शेतांत चरत असलेल्या एका हरणाला नवल वाटून त्यानं विचारलं,

"अरे भय्या, इतकी ही धांवपळ का रे?"

सशानं धांपा टाकीत उत्तर दिलं, "वाः तुला पत्ताच नाहीं का अजून! अरे, पृथ्वी फुटून तिच्या ठिकऱ्या होताहेत! चल पळ, प्राण वांचवायचे असतील तर धांव माझ्याबरोबर!"

झालं! सशामागून हरण पळत सुटलं. थोड्याच वेळांत एक रेडा त्यांना येऊन मिळाला. नंतर एक वनवैल, एक गेंडा, एक वाघ, एक हत्ती आणि एक सिंह देखील, या पळापळींत सामील झाले. किंबहुना, रानांतील साऱ्याच पशूंची धांवपळ करीत एक प्रचंड मिरवणूकच निघाली!

मैलच्या मैल ही बेफाम दौड चालूच होती. शेवटीं सारे अगदीं थकून गेले. मग हत्तीच्या मनांत विचार आला, पृथ्वी कोसळून पडण्याचं दुसरं चिन्ह तर कांहीं दिसत नाही. मग खरं तरी काय आहे? त्यानं नवलानं वाघाला विचारलं, "वाघोबा दादा, पृथ्वी फुटते आहे असं खरंच का वाटतंय तुम्हांला?"

वाघ थांबला नी म्हणाला, "अरे, मला ही बातमी या गेंड्यानं दिली!"


गेंडा तत्काळ ओरडून म्हणाला, "अरे, मला तरी कुठं काय ठाऊक आहे? या वनवैलानं सांगितलं मला हें!"

वनवैलानं लगेंच एक डरकाळी फोडीत म्हटल, "मला नको लावूं बोल! रेड्यानं मज जें सांगितलं तेंच मी याला कळ्यलं!"

रेड्यानं लगेंच हरणाकडे बोट दाखविलं. तशीं हरण चांचरत चांचरत बोललं, "सशाला विचारा. त्यानंच ही प्रथम मला माहिती दिली."

हत्तीनं एक मोठा चीत्कार करून सशाला बोलावून विचारलं, "काय हो राव, कुणी सांगितलं तुम्हांला, पृथ्वी कोसळून पडतेय म्हणून?"

"मला कशाला कुणी सांगायला हवं!" ससेराव डिमाखात म्हणाले, "याइ् असा आवाज ऐकूं आला, तेव्हांच मीं ताडल कीं प्रळयकाल आला, पृथ्वी आतां फुटून लयाला जाणार!"



यावर हत्ती खदखदून हसून म्हणाला, "अस्स! एकूण तुम्हांला केवळ हें वाटलंच म्हणायचं!"

सारेच पशु मग मोठमोठ्यानं हंसूं लागले आणि प्रत्येकानं आपली वाट सुधारली.

तात्पर्य : खऱ्या गोष्टी कळण्याची सोय असतांना व सर्वत्र त्या माहित असतांना अफवांवर मुळींच विश्वास ठेवूं नका. 'डालडा'चीच गोष्ट घ्या. त्याजविषयींचा खरा प्रकार काय आहे? 'डालडा' हें सर्व स्वयंपाकासाठीं वापरतां येतं. शुद्ध वनस्पति तेलांपासून व सक्त सरकारी नियमनमुन्यांनुसार तें बनविलेलं असतं. जादा पुष्टीसाठीं 'डालडा'च्या प्रत्येक औंसांत ७०० आंतरराष्ट्रीय युनिट्स् इतक अ जीवनसत्त्व घातलेलं असतं. म्हणजे चांगल्या तुपांतल्या इतक्याच प्रमाणांत तें 'डालडां' तहि असतं. शिवाय, ड जीवनसत्त्वहि दर औंसांत ५६ आंतरराष्ट्रीय युनिट्स् इतकं त्यांत घातलेल आहे. लाखो गृहिणी स्वयंपाकासाठीं 'डालडा' वापरतात. कारण त्यांना चांगलं ठाऊक झाल आहे, की 'डालडा' स्वयंपाकासाठीं तर उत्तमच आहे, पण शिवाय अन्न म्हणूनहि तें उपयुक्त आहे!

हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड, मुंबई

DL. 325-X52 MA

काय बाई हीं बालमंदिरं !

'काय बाई हीं बालमंदिरं ! कोणीही उठावं आणि बाल मंदिर काढावं. त्याला काहीं घरबंधच राहिला नाहीं. का हो विमलाताई, सरकारने कायदा करून हीं भू-छत्राप्रमाणें ठायीं ठायीं निर्माण होणारीं, लहान लहानशा खोल्यांतून चालणारीं व्यापारी बालमंदिरं चालवायला बंदी केली पाहिजे, असें नाहीं का तुम्हांला वाटत ?'

सुलोचनाबाईंनी भावनेने ओथंबलेल्या आवाजाने आपल्या विचारांना वाचा फोडली. विमलाबाई नक्कीच आपल्या विचारांना पाठिंबा देतील व कांहीं नाहीं तरी महिला मंडळांत या बाबतींत चर्चा घडवून आणतील व विरोधाचा ठराव पास करून घेतील असा त्यांना भरंवसा होता.

विमलाबाई या महिला मंडळाच्या नुसत्या नांवाच्या चिटणीस नव्हत्या; तर आपलें घरकाम सांभाळून त्या महिलामंडळाचें काम खूपच उत्साहानें करीत असत. घरची पाहुणीं राहुणीं, नित्यनैमित्तिक प्रसंग, मुलांबाळांचा घबडका, या सर्व गोष्टी व्यवस्थित आटोपून महिला मंडळाच्या कामाला त्यांना एवढा वेळ देतां तरी कसा येतो, याचेंच आश्चर्य सर्वांना वाटत असे; त्यांच्यामुळेंच मंडळाचें काम विकसित होऊन त्याची कक्षाही उंचावत गेल्याचा सर्वांचा अनुभव होता. त्यामुळें त्यांनीं हातीं घरलेल्या कामाला सर्वच बायका उत्साहानें हातभार लावीत. मंडळानें नुकतेंच एक बालमंदिर काढलें होतें व त्याला व्यवस्थित रूप देण्याचें कार्य विमलाबाईमुळेंच योग्य दिशेने चाललेलें होतें. अशा स्थितींत इतर बालमंदिरांच्या संस्थांबाबत त्यांनीं कांहींतरी विचार केलाच असणार अशी सुलोचनाबाईंची रास्त कल्पना होती.

'तुमचं म्हणणं बाई माझ्या नीटसं ध्यानांत आलं नाहीं. सरकारला बालमंदिरं चालविण्याची बंदी कशी करतां येईल ? फार झालं तर आपली मान्यता देणें अगर न देणें या बाबतींत सरकार काय तें ठरवूं शकेल. पण ज्या बालमंदिरांना सरकारच्या मान्यतेची कांहीं किंमत नाहीं, त्यांना सरकार कसें अडवूं शकेल ? तुम्ही म्हणतां तशीं बालमंदिरं पुष्कळ चालतात याची मला कल्पना आहे. पण तशीं बालमंदिरं हल्लीं तरी चालणारच. त्यांना बंदी करून समाजाचें हित साधेल असं मला वाटत नाहीं.' विमलाबाईंनीं संथपणें व हळूहळू बोलायला सुरवात केली. सुलोचनाबाईंच्या भावना तर दुखविल्या जाणार नाहींत ना ? त्यांना आपलें म्हाणणें पटेल का ? अशी शंका त्यांच्या आवाजांत प्रगट होत होती.

'तुम्हीच का विमलाताई हें बोलतां ? आपल्या मंडळाच्या बालमंदिराला पुष्कळशीं चांगलीं साधनें हवींत, त्यासाठीं लागेल तो सर्व खर्च केलाच पाहिजे, त्याला चांगलं क्रीडांगण हवं व यथायोग्य अशी स्वतंत्र इमारतही हवी, म्हणून नेहमीं तुमचं टुमणं चाललं असतं. आज तुमच्या या आग्रहामुळेंच आपल्या बालमंदिराच्या कामासाठीं २० हजार रुपये जमा झाले आहेत. त्यासाठीं मंडळानें कितीतरी तऱ्हेतऱ्हेचे प्रयत्न केले ! आणि तुम्ही मात्र लहानशा खोल्यांतील व्यापारी बालमंदिरांची तारीफ करतां ? वा, हें खूपच झालें ! तुमच्याविषयीं माझी कल्पना तर वेगळीच होती. मला तर वाटलं की आपण आपल्या मंडळांत बालमंदिरांच्या बाबतींत एक चर्चा ठेवावी व या आलतुफालतु बालमंदिरांबाबत आपल्या मंडळाचा विरोध ठराव करून जाहीर करावा.'

'आपण आपल्या मंडळांत बालमंदिराची चर्चा अवश्य ठेवूं. पण विरोधाचा ठराव करून काय होणार ? त्याने का अशीं बालमंदिरें बंद होतील ?'

'पण निदान लोकमत तर तयार व्हायला मदत होईल ना ?'

'अहो, पण आज बालमंदिरांची गरज शहरांत किती निरनिराळ्या कारणाने लोकांना भासते, हें आपल्याला नको का पहायला ? पालक का मूर्ख असतात म्हणून तुम्ही म्हणतां तशा टाकाऊ बालमंदिरांत ते आपल्या मुलांना पाठवतात ? त्यांच्या दृष्टीने आपल्याला विचार नको का करायला ?'

'पालकांचा विचार काय करायचा ? त्यांना त्यांत कांहीं समजत नाहीं. बालमंदिरांत काय असावं याची त्यांना कल्पना नसते. प्रायमरी शाळेंत सहा वर्षांपूर्वी मुलांना घेत नाहींत म्हणून पालक अशा नांवाच्या बालमंदिरांत मुलांना पाठवतात. तेथे खरं पाहतां प्रायमरी शाळेसारखंच लेखन, वाचन व गणित शिक्षण चालू असतं.'

'तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे. हीं जीं गल्लोगल्लीं बालमंदिरें चालतात त्यांत बाहेर पाटीवर 'मॉन्टेसोरी पद्धतीने चालणारें' असें लिहिलेलें असतें. पण आंत मुलें पाहिलीं तर पाटी-दप्तरें घेऊन आलेलीं असतात व शिक्षक-बाया त्यांना अक्षरें, अंक व लेखन-वाचन शिकवतात. त्यांत कांहीं पद्धत नसते किंवा बालमंदिराचीं साधनेंही नसतात.'

'आतां कसं बरोबर बोललांत. नाहींतरी तुम्ही व मैनाताईंनी २०-२५ बालमंदिरं पाहिलेलीं आहेत. तेव्हां तुम्हांला माझ्यापेक्षां बालमंदिराच्या नांवाखालीं चाललेल्या सांवळ्या गोंधळाची वास्तविक कल्पना पुरेपूर असणार असें समजूनच आज हा विषय मी मुद्दाम काढला. तेवढ्यासाठींच मी आलें

आहे. शनिवारच्या चर्चा-सभेत याबाबत चर्चा ठेवावी असं मला निश्चित वाटतं आणि त्यासाठी मी एक ठरावही केला आहे.' आतां विमलाबाई आपल्या म्हणण्याला दुजोरा देतील या विश्वासानें सुलोचनाबाईंचे डोळ्यांत आनंदाची चमक झळकली व ते अधिकच तेजस्वी दिसूं लागले.

'पण सुलोचनाबाई, माझं म्हणणं तर पुरतं ऐकून घ्या. आम्ही जेव्हां मंडळातर्फे बालमंदिराच्या कामाची कल्पना येण्यासाठी अनेक बालमंदिरें पाहिलीं व तेथील निरनिराळ्या कार्यकर्त्यांशी त्यांच्या अडीअडचणीबाबत बोललों, तेव्हां चालू बालमंदिराबाबत आमचा दृष्टिकोन बदलला.'

'सांगा तरी तुमचं काय म्हणणं आहे तें.' सुलोचनाबाईंच्या आवाजांत निराशेचा सूर होता. विमलाबाईंही त्यामुळें थोड्या दचकल्या.

'हें पहा सुलोचनाबाई, तुमचं म्हणणं मला पसंत नाहीं असा ग्रह नका करून घेऊं. पण पालकांच्या व चालकांच्या दृष्टीनें विचार करतें, तो ऐकून घ्या.'

'हो तर, त्याला माझी तयारी आहेच. सांगातरी काय तें.'

'आम्हांला तर बाई असं दिसलं कीं पालकांची बालमंदिराबाबत अपेक्षाच निरनिराळी असते. कोणी बायका तर मुलांना बालमंदिरांत पाठवतात म्हणजे तेवढा त्यांना विसांवा मिळतो. दिवसभर कामाच्या रामरगाड्यांत त्यांचा जीव उबगेला असतो. लहानशा घरांत मुलांना खेळायला जागाही नसते. बाहेर रस्त्यावर मुलांना जाऊं देतां येत नाहीं. तेव्हां बालमंदिरांत मुलं गेलीं म्हणजे त्यांची काळजी दूर होते अशी कांहीतरी सोय असायलाच हवी ना ? त्यांना बालशिक्षणाचं कांहीं वाटत नाहीं. पण मुलांना कोणीतरी सांभाळलं म्हणजे पुरेसं होतं अहो, १॥-२ रुपयात मुलाला रोज दोन-तीन सांभाळणारं कोणी मिळेल का ? मी तर म्हणतें कीं बायकांची ही अपेक्षा काय चूक आहे ? त्यांना तेवढा विसावा मिळाला तर मुलांचे कष्ट काढणें व घरचीं कामें करणें त्यांना सोइचें होतें.'

'हें तुमचं म्हणणं बावगं नाहीं. पण आणखी काय तुम्हांला दिसलं ?'

'कांहीं पालकांना तर मुलांना अक्षरें व गणितं शिकवावींत असेंच वाटत असतें. घरी असतांना मुलें खेळतच असतात.

With Best Compliments from:—

For Best Lithographic Printing
Consult:-
M/s. RAGHUNATH LITHO WORKS,
10TH KHETWADI LANE, BOMBAY No. 4.
TEXTILE LABELS & ALL SORTS
OF COLOUR PRINTING.

त्यासाठी त्यांना बालमंदिरांत तें कशाला पाठवायचं ! एवढी फी द्यायची तर मुलांना काहींतरी शिक्षण मिळायला हवं असं त्यांना वाटतं. म्हणजे प्रायमरी शाळेंत मुलें भराभर पास होतात. असे पालक मुळीं ४–५ वर्षांच्या मुलानाच बालमंदिरांत पाठवतात. मी म्हणतें, जर या वयांत मुलांनी थोडीफार अशी अक्षर ओळख करून घेतली तर काय बिघडलं ? मुलांवर सक्ती करूं नये हें खरं आहे. पण जर गोडीगुलाबीने मुलें शिकलीं तर हरकत काय ? २॥–३ वर्षांच्या मुलांना शिकवावें असें तर कोणी म्हणत नाही. मुलं देखील हंसत खेळत शिकतात असं आम्ही पाहिलेल्या बालमंदिरांत आम्हाला दिसलं.'

'म्हणजे बालमंदिरांचा हाच का आदर्श ? कमाल आहे बाई तुमची !' सुलोचनाबाईंच्या स्वरांत कांहीसा राग प्रगट झाला.

'मी नाहीं तसं म्हणत. पण हा सगळा एक प्रकारें पैशाचा प्रश्न नाहीं का ? बालमंदिराला साधनं हवींत, चांगली मोठी जागा हवी, क्रीडागण हवें, सर्व कांहीं हवं ! पण हें गल्लोगल्ली कसं मिळणार ? पालकांकडून भरपूर फी घेतली तर अशीं बालमंदिरें चालवितां येतील पण असे किती पालक फी देणार ! नाहीतर आपल्या मंडळाने जसे अनेक करमणुकीचे कार्यक्रम करून बालमंदिरासाठीं फंड गोळा केला, तसें तरी केलें पाहिजे. पण हें सर्वांना कसं जमणार ! पैशाचं कांहीं सोंग तर आणतां येत नाहीं ना ?'

विमलाबाईंनीं थोडीशी पडती खाल्लेली पाहून सुलोचनाबाईंना अधिकच चेव आला.

'अहो हीं बालमंदिरें चालवणारीं स्वतःसाठी उत्पन्न काढीत नाहींत का ?, बालमंदिराच्या नांवाखालीं शाळा चालवतात, शिक्षकांना १०–१०, १५–१५ रुपये पगार देतात आणि स्वतः फायदा कढतात.'

'तुम्ही म्हणतां तशा कांहीं संस्था आहेत खऱ्या. तें कांहीं चांगलें नाही. पण आपण त्याला काय करणार ? हा पालकशिक्षकांचा प्रश्न आहे. पालक आपलीं मुलें पाठवतात म्हणूनच नाहीं बालमंदिरं चालतात ? अशा बालमंदिरांना मुलांचीही कांहीं कमतरता दिसत नाहीं. १०–१५ रुपयांत मिळणारे शिक्षकही त्याच लायकीचे असतात. एका शिक्षकास बरींच मुलें सोंपविलेलीं असतात म्हणून आरडाओरडी, धांकदपटशा असेहो प्रकार चालतात.'

'अता कसं बरोबर बोललांत ! माझा विरोध तरी अशाच सेरयांना आहे. त्यासाठीं आपण सुशिक्षित बायकानीं कांहीं करायला नको का ?'

'हो तर, अवश्य करायला हवं. कांहीं प्रमाणांत आपल्या मंडळालाही हें काम करतां येईल. बालमंदिरें कशीं असावींत या बाबतींत जर मातांच्यामध्ये आपण कांहीं दृष्टि उत्पन्न करूं शकलों तर पुष्कळ काम होईल व या बाजारी संस्थाना कांहीं आळा तरी बसेल. पण हें काम चुटकीसरसं होणार नाहीं, हळू-हळू करावं लागेल. पण मला तुम्हाला दुसरंच सांगायचं आहे; आम्ही जीं बालमंदिरें पाहिलीं त्यांत पुष्कळशा चांगल्या गोष्टी पाहिल्या. त्यांच्या चांगुलपणाचा आढावा आपल्याला घ्यायला नको का ?'

'म्हणजे, तुमचं म्हणणं तरी काय ? माझ्या तर कांहीं लक्षांत येत नाहीं.'

'तेच तर सांगतें. आम्ही कांहीं संस्था अशा पाहिल्या की दोनचारजणी मिळून दुपारच्यावेळीं कांहीं व्यवसाय म्हणून बालमंदिरं चालवतात. त्यांपैकीं कांहींजणांचा बालमंदिराचा कोर्सही झालेला असतो. या कामांत त्यांना १०–१५ रुपये हातखर्ची मिळते खरी. पण तो त्यांचा उद्देश नसतो त्यांचं आपल्या कामांत चांगलं लक्ष रुपये असतं. १॥–२ फी घेऊन त्यांना जेवढं कांहीं करतां येतं तेवढं तीं करतात. कांहीं ठिकाणी बाया आपआपल्या घरींच एकेकट्या बालमंदिर चालवतात तेथें १०–२० मुलं असतात. त्यांच्या घरीं जागा फारशी नसतेच, पण कुटुंबाला आर्थिक मदत व्हावी म्हणून त्या हें काम करतात. मात्र अशा कित्येक ठिकाणीं या बायांची मुलांशीं बागणूक फार चांगली असते. मुलें त्याच्याशीं आपासारखींच वागतात. त्यांना शिक्षकाची म्हणून भीति वाटत नाहीं. कांहीं ठिकाणीं तर मुलें आम्ही परकी असतांनाही आमच्याशीं मोकळेपणाने हास्यविनोद करतांना दिसलीं. एका ठिकाणीं तर एका मुलाने 'मावशी आल्या' म्हणूनच माझी ओळख आपल्या मित्रांना करून दिली. दुसऱ्या ठिकाणीं एक मुलगी सरळ आपली माझी बेटें घरून लडिवाळपणाने माझ्या पायाशीं अंग घासूं लागली व माझ्या पिशवीत काय आहे, तेंही पाहूं लागली. अशा ठिकाणच्या शिक्षक-बाया जरी बालमंदिराच्या कोर्स केलेल्या नसल्या तरी मला त्या आवडल्या. त्या कांहीं मुलांना मारत नाहींत कीं भीति दाखवीत नाहींत, हें मुलांच्या वागणुकीवरूनच दिसतं. मुलं आनंदी दिसलीं; तेथेही अक्षर–ओळख व अंक–ओळख हेंच बालमंदिराचें काम चाललें होतें. पण तें सर्व मुलांच्या कलाने घेत असतात, अशा बालमंदिरांना नावं ठेवावींत असं मला वाटत नाहीं. मास्तर मंडळी शिकवण्या करतात ना, तसला हा प्रकार. अशा बायांना जर शिक्षण मिळालें तर त्या चांगलं काम करतील असं मला वाटतं. खरं म्हणजे १॥–२ रु. फी घेऊन चांगलीं बालमंदिरें भरपूर चालविण्याची कांहीं सोय करतां आली तर टाकाऊ बालमंदिरं आपोआपच बंद होतील.'

ASP/LIC-34



उद्यांची गृहिणी...

असें म्हणतात की, प्रत्येक मुलगी ही जन्मजात माता असते. गृहकृत्यांमध्यें असणारें तिचें लक्ष, बाहुल्याविषयी तिला वाटणारें प्रेम ह्या गोष्टी म्हणजेच आपलें स्वतःचें कधीतरी एक घर असावें, आपण स्वतः आई व्हावें, असें जें तिला मनापासून वाटत असतें त्याचें निदर्शक आहे.

गृहिणीच्या जबाबदाऱ्या काय असतात हें तुमची पत्नी तुमच्या मुलीला पदोपदीं समजावून देण्याचें कर्तव्य करीत असते, परंतु तुम्हीं तुमची जबाबदारी पार पाडीत आहांत काय ?

लग्न म्हटलें कीं भलीमोठी रक्कम आलीच ! त्या मंगल प्रसंगीं एक ठराविक रक्कम, आपण असलों किंवा नसलो तरीसुद्धां निश्चित मिळावी म्हणून तुम्हींसुद्धा आजपासूनच आयुर्विम्याच्याद्वारें बचत करण्यास सुरुवात करा.

आपल्याला फारच थोडी बचत करतां येंण शक्य आहे, असें जरी तुम्हांला वाटत असलें तरीसुद्धां ती आयुर्विम्याच्याच सहाय्यानें करा. अनेक पॉलिसींपैकीं तुम्हांला फायदेशीर कोणती आहे तें तुमच्या विमा-एजंटाकडून समजावून घ्या.



लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

'तें कसं काय करायचं ! आपल्या मंडळाला एक बालमंदिर चालवायलाच कोण आटापिटा करावा लागतो ! मग जास्त संख्येनें चांगलीं बालमंदिरं कशीं निघणार ?'

'तोच तर मुख्य प्रश्न आहे. कमीत कमी खर्चांत आपणाला जर बालशिक्षणाचं कांहीं काम करतां आलं, तर आज तें हवं आहे. या कामाला सरकारी मदत नाही. लोकांना जास्त फी देणं झेपत नाहीं. मग जास्त खर्च कसा करायचा ! पण आपल्यापैकी कांहीजणी जर एकत्र आल्या तर कांहीं वेगळी योजना करून प्रयत्न करून पाहतां येईल. मला यात तुमची मदत हवी आहे.'

'तुम्ही कांहीं नवीनच गोष्ट कढली. मी तर दुसऱ्याच उमेदीने आलें होतें. पण तुमचं म्हणणं मला समजून घ्यावसं वाटतं. माझ्याकडून होईल तें करण्यास मी तर तयार आहे. पण आता तर मला घरीं जायलाच हवं. पांच वाजायला आले व 'घरीं येण्याची' वेळ झाली. पण मी परत सवड काढून येईन.'

'या बरं अवश्य या. आमचीं मुलंही येण्याची वेळ झालीच आहे व आता मलाहि काम आहेच. पण आपण सवडीनें याबाबतींत बोलूं; त्यासाठीं आमच्या विचाराच्या दोघीचौघीजणींना एकत्र यायला हवं.'

'हो हो, तें तर करायलाच हवं. येतें बरं.'

सुलोचनाबाई जातांना कांहींशा समाधानानेच घरीं गेल्या व विमलाबाईनाही आनंद वाटला.

—स. आ. केळकर

याला जबाबदार कोण ?

(पान ६ वरून चालू)

यांत चूक कोणाची असावी असा विचार नेहमींच माझ्या मनांत येतो. आमची मोलकरीण पारू हिला कधीं असा त्रास होत नाहीं. तिचा मुलगा चार वर्षांचा आहे. पण पारूने कधीं त्याच्या खाण्याची तक्रार केली नाहीं. मी एकदां तर मुद्दामच पारूला याबाबत विचारलें,

'का ग, बाळा तुला खाण्याबाबत त्रास देतो का ?'

'नाहीं साहेब, माझ्या बाळाचा कसलाही खाण्याचा त्रास नाहीं कीं हट्ट नाहीं. पण त्याला तिखट फारस आवडत नाहीं. बाकी त्याला भुकेच्या वेळीं काहीं दिलं तरी तो खातो.'

आज पारूनें बोलणें माझ्या मनात पुन्हा पुन्हा घोळूं लागलें. जर पाठच्या मुलाला किंवा तिच्यासारखी मालमजुरी करून पोट भरणाऱ्या इतरांच्या मुलांना खाण्यापिण्याचे प्रश्न उत्पन्न होत नाहींत, तर मग आमच्यासारख्या पांढरपेशाच्या घरांत हे प्रश्न कां उत्पन्न होतात ? या गरीबाची मुलें कधीं आनंदी व धट्टीकट्टी त्यांच्या मुलांवर खाण्यासाठीं तीं का विशेष खर्च करतात ? आमचीं मुलें मात्र हडकुळीं व रोडकीं, सदा कांहीं ना कांहीं आजार आहेच. आमच्या मुलांच्या खाण्यांत इतकीं जीवनसत्त्वें असतात, मग असें कां ? आमच्यापैकीं कांहींचीं मुलें चांगली बाळसेदार व थोराड दिसतात खरीं, पण त्यांच्या आईबापांनाही मुलांच्या खाण्याच्या कित्येक कटकटी रोज उपसाव्या लागतात. असं कां बरं व्हावं ?

मला तर वाटतं कीं आमचंच मुलांशीं वागण्यांत कांहीं चुकत असावं. त्यांनीं हें खावं व तें खावं असं आम्हाला नेहमीं वाटत असतं आणि आमचा तसा विशेष प्रयत्न चालू असतो. यामुळें मुलांना खाण्याच्या पदार्थांविषयीं रुचि उत्पन्न न होतां उलट तीं नेमके तेच पदार्थ नको असें म्हणूं लागतात व त्यांना खाण्यापिण्याच्या वाईट संवयी लागतात. मुलांच्या खाण्यापिण्याच्या वाईट संवयीबाबत खरं पाहतां आम्ही पालकच जास्त जबाबदार नाहीं का ? पण हें कितीसे आईबाप कबूल करतील ?

—स आ. केळकर

बालमंदिराचे अध्वर्यु—गिजुभाई

[पान ४ वरून चालू]

तसेंच प्रखर भावनेनें कार्य करणाऱ्या श्रीमती ताराबाई मोडक यांनी गिजुभाईंच्या मृत्युनंतर संघाच्या कार्याची धुरा तर उचलून घेतलीच; पण त्यांनी संचालन करण्याचें कबूल केल्यामुळेंच संघाला बेडींल ग्राम-बाल-शिक्षा-केन्द्र या प्राथमिक संस्थेची स्थापना करतां आली. आतां तर गेल्या वर्षापासून या केन्द्रातर्फे कोसबाडला विकासवाडीचा विशेष महत्त्वाचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर सुरू झालेला आहे. भारत सरकारनें व राज्य सरकारनें आपआपल्या नियमांप्रमाणें या प्रयोगाला आर्थिक सहाय्य केलें आहे. पण ५० टक्के आर्थिक साह्य सामान्य जनानीं केलें आहे. याचें श्रेय स्व. गिजुभाईंना व त्यांच्याप्रमाणें या कार्यासाठीं स्वतःचा हात कष्टून घेणाऱ्या त्यांच्या कार्यकर्त्यांना आहे. गिजुभाईंचें हें बालशिक्षणाचें कार्य सदोदित उत्तरोत्तर वाढत जावो व राष्ट्रीय नवरचनेंतील आपल्या कामाचा वांटा त्यायोगें सफल रीतानें उचलला जावो, हीच सदिच्छा गिजुभाईंच्या जयन्तीच्या वेळीं सर्वत्रांच्या मनांत निर्माण होणें स्वाभाविक आहे.

—स. आ. केळकर

आर्थिक स्वावलंबी शिक्षणाचा पुरस्कर्ता
पेस्टालॉझी

शैक्षणिक जीवनरेखा

स्वित्झरलंडच्या जर्मनभाषी भागांत एका सुंदर सरोवराच्या कांठीं झुरिच गांव वसलेलें आहे. सतराव्या शतकापासून आजपर्यंत हें गांव तेथील संपत्ति, संस्कृति आणि विविध प्रकारच्या उत्तम शाळांमुळें प्रसिद्ध आहे. याच गांवांत मूलोद्योगी शिक्षणाच्या पुरस्कर्त्या जॉन हेन्री पेस्टालॉझीचा (१७४६–१८२७) जन्म झाला. पेस्टालॉझीचे वडील आल्पस पर्वताच्या दक्षिणेकडील उतरणीच्या इटालियन प्रदेशांतून येथें येऊन या वैद्यकीय व्यवसायांत स्थायिक झाले होते. झुरिचमधील चांगल्या कुटुंबांशीं पेस्टालॉझी कुटुंबाचा चांगला संबंध होता. हेन्रीची मातृभाषा जर्मन होती. वयाच्या पांचव्या वर्षीं वडील वारल्यामुळें त्या विधवा मातेकडून त्याचें संगोपन झालें. हेन्रीला एक भाऊ आणि एक बहीण होती. त्यागी, प्रेमळ माता आणि कुटुंबसंबंधीं अत्यंत आदर असलेला नोकर यांच्या स्नेहाळ वातावरणांत हेन्री लहानाचा मोठा झाला. वातावरणांत बुद्धिपेक्षां त्याच्या हृदयाचाच अधिक विकास झाल्यानें शाळेंत हेन्रीचें अनेक प्रसंगीं हंसें होई. परंतु त्याच्या निःस्वार्थी स्वभावामुळें त्याच्याविषयीं सर्वांना सद्भाव असे. झुरिचपासून तीनच मैलांवर हेन्रीचे आजोबा एका लहानशा खेड्यात धर्माधिकारी होते. सुटीच्या दिवसांत हेन्री आजोबांकडे जात असे. यामुळें हेन्रीला गरीबी कशी असते आणि सेवापरायण मनुष्य गरीबांची कशी सेवा करूं शकतो, याचे आजोबांकडून जणुं पाठच हेन्रीला येथें मिळाले. आजोबांचें व्यक्तित्व हेन्रीला सहाजिकपणें मोठें आकर्षक वाटे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकण्याच्या उद्देशानें हेन्रीनें प्रथम धर्मशास्त्रांचा अभ्यास केला.

झुरिचच्या लहानशा विद्यापीठांत जेथें हेन्रीचें उच्च शिक्षण झालें तेथें प्रा. बॉदमीरच्या 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी'च्या आदर्शाला महत्व प्राप्त झालें होतें. या विद्यापीठाच्या चमकदार चळवळ्या विद्यार्थ्यांत हेन्री पेस्टालॉझीनें विशेष स्थान प्राप्त केलें होतें. हे विद्यार्थी राजकारण, समाजसुधारणा, बुद्धिवादाची चळवळ, शिक्षण वगैरे विषयांच्या प्रश्नांवर मोठमोठ्या चर्चा घडवून आणीत. 'मेमोरिअल' नांवाचें या विद्यार्थ्यांनीं पत्रही चालविलें होतें. या पत्रांत पेस्टालॉझींचें सुरवातीचें लिखाण वाचावयास मिळत. वयाच्या १९ व्या वर्षी पेस्टालॉझीनें फ्रेंच राज्यक्रान्तीला प्रेरक ठरलेले रुसोचे 'कॉन्ट्रॅट सोशल' (Contrat Social आणि 'अेमिल' हे ग्रंथ वाचले. याच विद्यापीठांत हेन्रीला समाजोद्धाराच्या कार्याची प्रेरणा मिळाली. त्यानें धर्मशास्त्राचा अभ्यास सोडून कायद्याचा अभ्यास सुरू केला. रुसोच्या नैसर्गिक विकासवादाचा निषेध करून राष्ट्राच्या खालावलेल्या आर्थिक जीवनाचा उद्धार करण्यासाठीं स्वतः पेस्टालॉझीनें शेतकरी बनण्याचें ठरवलें. त्याच्या भावनाशाली, प्रामाणिक आणि दुसऱ्यावर सहज विश्वासून राहण्याच्या वृत्तिविषयीं त्याच्या एका मित्रानें दिलेल्या सल्ल्यांत पेस्टालॉझीच्या स्वभावाचें सुंदर चित्रण आढळतें. आपल्या मृत्युसमयीं त्यानें पेस्टालॉझीला लिहिलेल्या पत्रांत तो लिहितो, "मी आतां गेलों म्हणजे तूं एकटा पडशील. तुझा चांगुलपणा आणि दुसऱ्यावर विश्वास ठेवण्याच्या गुणाचा दुरुपयोग होऊन

टेलिफोन नं. ६३२४३] [स्थापना १९३३
शुद्ध व नेहमीं ताजें
लोणी-तूप
-: मिळण्याचें विश्वसनीय एकमेव ठिकाण :-
❀ सामंत ब्रदर्स ❀
दादर स्टेशनसमोर (प. रेल्वे), वसंत निवास, मुंबई २८.
श्रीखंडाचा चक्का
नेहमीं ताजा मिळतो
रोज सकाळीं फक्त ५ ते ७ पर्यंत १२ आणे शेर भावानें
खानदेशातील सकस पाश्चराइज्ड् (मच्छी न काढलेलें)
दूध नियमितपणें विकत मिळतें
सूचना : मुंबईत अंधेरी उपनगरात आमची शाखा नाही

तुझा बळी घेतला जाईल अशा व्यवसायांत तूं पडूं नकोस. बिनधोक्याच्या, शांत स्वरूपाच्या व्यवसायाचीच तूं निवड कर. आणिक तुला सांगायचें म्हणजे जोपर्यंत तुझ्या खांद्याला खांदा लावून शांतपणें निर्णय देणारी, चांगलें व्यावहारिक ज्ञान असलेली आणि तुझ्याविषयीं अढळ श्रद्धा असणारी आणि तुझें रक्षण करणारी व्यक्ति तुला मिळत नाहीं तोपर्यंत तूं कुठचेंही नवें साहस करूं नकोस." आपल्या मित्राचा हा उपदेश पेस्टालॉझीनें कधींच मानला नाहीं. त्याचें समाज-प्रेम आणि समाजोद्धाराच्या कल्पना सारख्या ओसडत होत्या.

पत्नीला लिहिलेल्या एका पत्रांत तो लिहितो, 'प्रियतमे, माझ्या भवितव्याच्या आड येणाऱ्या अवगुणांची मला कल्पना आहे. दूरदृष्टीचा अभाव, असावधपणा आणि समयसूचकतेचा अभाव यामुळें माझ्या सभोवतींच्या परिस्थितींतून मला मार्ग काढण्यांत यश मिळत नाही. सभ्यता, रीतिरिवाजाबाबतचा माझा अक्षम्य निष्काळजीपणा आणि असमतोलपणा हे माझे अवगुण सर्वांना माहीत आहेत. ते तुझ्यापुढें कबूल करण्यास मला कांहीच संकोच वाटत नाहीं. माझ्या जीवनांत तुझ्या संबंधांना मी माझ्या राष्ट्रकर्तव्याच्या कल्पनांपुढें नेहमीच गौण गणलेलें आहे. मी सर्व कांहीं तुला सांगितलेलें आहे. देशाबाबतच्या माझ्या निष्ठेमुळें तुझ्या आदराला मी अपात्र ठरलो तरी माझ्या प्रामाणिकतेसंबंधीची बाजू तूं पाहिल्यास माझ्याविषयींचा तुझा अनादर कमी होईल.'


पेस्टालॉझीच्या या पत्रावरून त्याची असीम राष्ट्रभक्ति आणि आत्मनिरीक्षणाची संवय याविषयीं चांगली कल्पना येते. त्याला आपल्या स्वभावाची, आपल्या शक्ति आणि दुर्बलतेची स्पष्ट कल्पना होती.


राष्ट्रोद्धाराच्या कल्पनेच्या उत्साहांत त्यानें झुरिचजवळच एक पडसर जमीन विकत घेऊन 'आधीं केलची पाहिजे' या सूत्राप्रमाणें स्वतः शेतीचा पेशा पत्करला. राष्ट्राच्या आर्थिक उत्पादनाला शेतीशिवाय दुसरा कोणताही आधार नाहीं हें तत्कालीन स्वित्झरलंडच्या आर्थिक अधोगतीसंबंधींचें त्याचें निदान बरोबर होतें. शेतीवर त्यानें परिश्रमही जिवापाड केले आणि तरी देखील त्याची शेती त्याच्या अंगावर आली. तो या प्रयोगांत निष्फळ ठरला. त्याला व्यवहारांत इतकें कर्ज झालें की शेवटी पत्नीच्या मित्रांनीं हात दिल्यानेंच त्याचा तात्पुरता बचाव झाला.

पेस्टालॉझीनें पुनः आत्मनिरीक्षणाला सुरुवात केली. 'या शेतीत शेवटीं माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या निर्वाहासाठींच माझ्या सर्व शक्तीचा व्यय होतो आहे ना!' जोपर्यंत लोकांची कार्यक्षमता वाढत नाहीं, तोपर्यंत शेतींतून अधिक उत्पन्न काढणें अशक्य. शिक्षणाशिवाय या दलित आणि दरिद्री लोकांचा उद्धार नाहीं, या विचारानें त्याच्या मनांत ठाणें धरलें. अकार्यक्षम शेतकरी शेतीचा उद्धार करूं शकत नाहीं म्हणून प्रथम त्यास शिक्षण दिलें पाहिजे. शिक्षण म्हणजे पुस्तकी शिक्षण नव्हे. परंतु ज्या शिक्षणामुळें लोकांच्या आर्थिक जीवनमानांत फरक पाडतां येईल, अशा प्रकारचें शिक्षण कसें देतां येईल याचा त्यानें विचार चालविला होता. 'प्रश्न त्यांच्या ज्ञानाचा किंवा अज्ञानाचा नसून त्यांच्या आचरणाचा आहे' हें त्यानें वेधलें व त्यासाठीं योग्य भावना जागृत करून त्यांना योग्य तें करायला उद्युक्त केलें पाहिजे असें त्यानें ठरविलें.

शेतीच्या प्रयोगाविषयी एके ठिकाणीं तो म्हणतो, "माझ्या प्रयोगामुळें माझ्या पत्नीला फार फार सहन करावें लागलें; परंतु लोकांचें शिक्षण सुलभ आणि व्यवहारिक दृष्टीनें कार्यक्षम बनविण्याच्या आमच्या प्रयत्नांत आमच्या उरलेल्या वेळेचा,

स्वदेशीचा भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





बाल-विभाग

वर्ष २६ वें : अंक ८ वा : नोव्हेंबर १९५८

दिवाळी झगमगते

आज कशी बघ ही । दिवाळी । झगमगते आई ॥धृ०॥
रोज रोज शाळेंत जाउनी
पुस्तकांतले धडे वाचुनी
कधीं छडीचा मार खाउनी
कंटाळा येई । दिवाळी । झगमगते आई ॥ १ ॥
जिकडे तिकडे हिरवे पिवळे
लाल तांबडे गोलक सगळे
नवलपुरीचे दीप सानुले
मन वेधुन घेई । दिवाळी । झगमगते आई ॥ २ ॥
बोरीवंदर चमचम करतें
चौपाटी अमृतांत न्हाते
वाळकेश्वरीं शोभा गमते
नंदनवन आई । दिवाळी । झगमगते आई ॥ ३ ॥
चर्चगेटच्या बोगद्यांतुनी
खेळविलेली वीज चमकुनी
देत रोषणाई ती नयनीं
भाग्यवती आई । दिवाळी । चमचमते बघ ही ॥ ४ ॥
वार धडाधड कुणी काढिती
बाण कुणाचे नभास भिडती
फटाक्यास त्या नाहीं गणती
हर्षभरें आई । दिवाळी । नवलाची येई ॥ ५ ॥
तेल कुणी अंगास सुगंधी
चोपडुनी तें मन आनंदी
मौजा लुटती त्या स्वच्छंदी
स्वर्गांतुन कांहीं । दिवाळी । अवतरली आई ॥ ६ ॥
पक्कान्नावर ताव मारुनी
संतोषानें ढेकर देउनि
गात सुखाची जीवनगाणीं
रमुनी मन जाई । दिवाळी । झगमगते आई ॥ ७ ॥

—वा. मा. हराळे

संगीतिका

सेतुबंधन

दृश्य : सागरतीरी एका विशाल खडकावर श्रीराम प्रभु सचिंत मुद्रेनें बसले आहेत, समोर अथांग सागर हेलावत आहे, बाजूला लक्ष्मण उभा आहे.

लक्ष्मण :

अथांग सागर आतां पुढें तर
रामा काय करावें हो ?
पल्याड लंका, इथें न नौका
पार कसें उतरावें हो ?
सीतावहिनी परत घेउनी
प्रभू कसें कुणि यावें हो ?

राम :

एकच चिंता लक्ष्मणा रे
एकच आतां उरला हेतू

हवा कुणितरी वांधायाला
समुद्रांत या दगडी सेतू

लक्ष्मण :

जगावेगळा हेतू हा तर
सफल कसा प्रभु व्हावा
पाण्यावरती दगड राघवा
कैसा सांग तरावा ?

नल :

युक्ति तयाची अगदीं सोपी
दगडहि उचलिल पाणी
त्या दगडावर असेल जेव्हां
अक्षर 'राम' लिहूनी

राम :

अजून माहित मलाहि नव्हती
माझ्या नावामधली शक्ति

लक्ष्मण :

हे तर सोपें खूप
रामा हें तर सोपें खूप
मीच सांगतों हनुमंताला
रहा आतां तूं चूप
क्षणांत येइल वानरसेना
करीत रे हुप हूप
होइल सेतू पूर्ण राघवा
अमुच्या अंगीं हुरूप

लक्ष्मण :

हनुमंता रे, हनुमंता रे
धावत धावत धावत ये रे
बांधायाला सेतू आतां
वानरसेना घेउन हाता

हनुमान :

[सामोरा येत]

हुकुम ऐकवा मजला तुमचा
काय करूं मी सेवा
पायिक आहें आतुरलेला
लवकर सांगा देवा

लक्ष्मण :

बोलावुन घे वानरसेना
करावयाला पत्थर गोळा
आवेशाने आतां सारे
श्रीरामाची जयजय बोला

सर्वजण :

श्रीरामचंद्र की जय
श्रीरामचंद्र की जय
श्रीरामचंद्र की जय

वानरसेना :

हुप हुप हुप
हुप हुप हुप

हनुमान :

सगळे ऐका । लवकर ऐका
करुया आपण । पत्थर गोळा
लिहूं अक्षरें । त्यावर 'राम'
सुरू करू । सेतूचें काम

वानरसेना :

चला चला रे चला चला
पत्थर जमवूं चला चला
सीतामाई आणायाला
सेतू बांधूं चला चला

एक खार :

रे सगळे
व्हा पुढती
आणाया
दगड किती
मी इवली
खार जरी
कण जडविन
सेतुवरी

रामलक्ष्मण :

लहानशी तूं खार जरी
भाव तुझा महान ग
देवही तुझ्यापुढें
व्हायचे लहान ग

वानरसेना :

चला चला रे
चला चला
पत्थर जमवूं
चला चला
सीतामाई आणायाला
सेतू बांधूं चला चला
काम प्रभूचें
करूं चला
चला चला रे
चला चला

—बाबा मोहोड

[नागपूर आकाशवाणीच्या कृपेनें]

पोपटभाऊ अन् बोकेदादा

पोपटभाऊ ! पोपटभाऊ !
या ना जरा खालीं
मऊ मऊ गवताची
गादी अंथरली

बोकेदादा ! बोकेदादा !
तुम्हीच या ना वर
आंब्याचें हें झाड दादा !
चढा सरासर

पोपटभाऊ ! पोपटभाऊ !
पांहिला का पेरू ?
छान गुलाबी आहे खाऊ,
चार फोडी करूं

खाऊन आलों केवढे तरी
पोट भरलें तट्ट
बोकेदादा ! एक तरी
तुम्ही करा चट्ट

बरें बाबा, जातों आतां,
येतच नाहींस खालीं !
बोकेदादा ! जाच आतां,
युक्ति तुमची फसली !

—सुमति पायगांवकर

अंधाऱ्या रातीं

अंधाऱ्या रातीं । उजळती । नभीं दीपज्योती ॥ धृ० ॥
दिनभर चालुन चालुन दमला
सूर्य नभीं अस्तास चालला
चाहुल त्याची अंधाराला
लागतांच रातीं । उजळती । नभीं दीपज्योती ॥ १ ॥
विहंगमांचे थवे विसुकले
रानांतुन घरट्यांस परतले
अंधारानें विश्व व्यापिलें
पडे मना भ्रांती । उजळती । नभीं दीपज्योती ॥ २ ॥
देवांची स्वर्गांत दिवाळी
रोज चालते संध्याकाळीं
प्राजक्ताच्या झाडाखालीं
शुभ्र फुलें पडती । उजळती। नभीं दीपज्योती ॥ ३ ॥
शुभ्र पांढऱ्या टपोर लाह्या
विसकटल्या गगनांत कुणी ह्या
अंगरख्याच्या सारुन बाह्या
वेंचाया पळती । अंबरीं । देवदूत रातीं ॥ ४ ॥
स्वर्ललनांचे नभीं सांडले
अमृतघट ते उपडे झाले
ओघळ त्यांचे खालीं आले
लोकनयन दिपती । पाहुनी । अंधाऱ्या रातीं ॥ ५ ॥
इंद्राचा ऐरावत सुटला
चोहिकडे तो धावत सुटला
रहाणुनि त्या तें पकडायला
कुणी धाव घेती । उजळती । नभीं दीपज्योति ॥ ६ ॥
सुरासुरांचें युद्ध जुंपलें
भात्यामधले बाण संपले
जागोजागीं नभीं सांडले
नसे तया गणती । उजळती । नभीं दीपज्योती ॥ ७ ॥

—वा. मा. हराळे

वाघोबा वाघोबा

वाघोबा, वाघोबा,
बस करा बाबा
गरागरा गरा गरा
फिरताय काय अन्
पिंजऱ्यांतुन गुरगुरत
बघताय् काय ?
लांब लांब आंग अन्
बुटकेशे पाय !
मधुनच पटदिशीं
बसताय् काय ?

आंगभर हळद
माखलीत् काय अन्
आंगभर पट्टे
काढलेत काय !
हळदीच्या सुपांत
लोळलांत वाटतं !
कोळशाचे पट्टे
ओढलेत वाटतं !

डोळे नर जशा कांहीं
जाड हिरव्या कांचा !
छोटीशी मावशी अन्
हा एवढा भाचा
उगाचच डुरकाळ्या
देताय काय अन्
निमुकल्या मुलांना
भिववता काय !
वाघोबा, वाघोबा,
बस करा बाबा !

—सुमति पायगांवकर

दादा येईच ना !

एक होतें रान. हिरवें हिरवें गार.

तिथें आंब्याच्या झाडावर पोपटाचीं दोन पिल्लें राहात होतीं.

तीं दोघें इकडे तिकडे हिंडायचीं. झाडांच्या फांद्यांवर बागडायचीं. शेतांत जाऊन दाणे खायचीं. झऱ्याचें पाणी प्यायचीं. तिन्हीसांजा झाल्या कीं घरट्यांत येऊन झोंपून जायचीं.

एकदां धाकटा पोपट मोठ्याला म्हणाला,

'दादा, आज आपण लांब फिरायला जाऊं.'

दोघेहि पोपट दूर पेरूच्या बनांत गेले नि एका पेरूच्या झाडावर बसले.

तिथें छान पेरू होते, मोठाले मोठाले,

सुंदर पिकलेले !

पोपटदादा आपल्या धाकट्या भावाला म्हणाला,

'भाऊ, खालीं गवतांत दोन मोठाले सुंदर पेरू पडले आहेत. आणूं का मी जाऊन ? एक होईल तुला नि एक होईल मला.'

भाऊ म्हणाला,

'खरंच ! किती मोठे पेरू ! असले तर झाडावर देखील नाहींत ! आणतोस ?'

दादा खालीं गवतावर गेला. तो पेरू उचलणार इतक्यांत बाजूच्या झाडींतून एक राजकन्या हळूच पुढें आली. तिनें झपकन् आपली शाल पोपटदादाच्या अंगावर टाकली. त्याला शालींत गुंडाळून आपल्या गाडींतून ती घेऊन गेली !

भाऊ तें पाहून झाडावरून मोठमोठ्यानें ओरडला पण गाडी धांवली पुढेंच. पोपटभाऊ पण गाडीमागें धावला पण मधेंच ती कुठें दिसेनाशींच झाली.

भाऊला वाटेंत भेटली खार. ती म्हणाली,

'भाऊ, कां रे रडतोस ? कुठें धांवतोस ? दादा कुठें आहे ?'

भाऊ म्हणाला,

'गेलों पेरूच्या बना,
पेरू होते नाना,
तिकडून राजकन्या आली,
लपवून शालीखालीं
दादा घेऊन गेली !
दादा येईच ना
पेरू खाईच ना !'

खार म्हणाली,

'अरेरे ! चल आपण शोधूं हं तुझ्या दादाला.'

पुढें गेल्यावर एका झऱ्यापाशीं त्या दोघांना एक ससा भेटला.

तो म्हणाला,

'भाऊ कां रे रडतोस ? कुठें धांवतोस ? दादा कुठें आहे ?'

भाऊ म्हणाला,

'गेलों पेरूच्या बना,
पेरू होते नाना,
तिकडून राजकन्या आली,
लपवून शालीखालीं
दादा घेऊन गेली !
दादा येईच ना
पेरू खाईच ना !'

ससा म्हणाला,

'अरेरे ! चल आपण शोधूं हं तुझ्या दादाला.'

इकडे राजकन्येनं पोपटदादाला घरीं नेलें.

त्याला एका सोन्याच्या छानदार पिंजऱ्यांत ठेवलें, डाळिंब नि पेरू दिले.

ती पोपटदादाला म्हणाली,

'गाणें गाई मिठू । बोल विठू विठू !'

दादा म्हणाला,

'माऊ सोन्याचा पिंजरा
त्यांत डाळिंब्राचा चारा
लाडें राजकन्या वाढी
छान पेरूच्या फोडी
परी लागेना गोडी,
माऊ दिसेचना
दादा खाईचना.'

राजकन्येच्या जवळच तिचा मोर हिंडत होता. त्यानें दादाचें गाणें ऐकलें. त्याला वाईट वाटलें.

खालीं बागेंत हरीण होतें. मोर गेला हरणाकडे.

तो हरणाला हळूच म्हणाला,

'आधीं चल मांझ्याबरोबर. साळुंकीताईला भेटायचंय्.'

हरीण आणि मोर धांवतच आले शेतांत. साळुंकी दाणे टिपीत फिरत होती. मोर तिला म्हणाला,

'ताई पोपटभाऊ दिसला का ग कुठें ? या तुझ्या शेतांत ? आंब्याच्या राईत ? पेरूच्या बनांत ?'

साळुंकी म्हणाली, 'ऊंऽहुंऽ ! पण कशाला रे ?'

मोर म्हणाला,

'पोपट दादाचा निरोप आहे—
'माऊ, सोन्याचा पिंजरा
त्यांत डाळिंब्राचा चारा
लाडें राजकन्या वाढी
छान पेरूच्या फोडी
परी लागेना गोडी !
माऊ दिसेच ना—
दादा खाईच ना.'

साळुंकी म्हणाली,

'थांबा थांबा. चटकन्, पटकन् चला माझ्याबरोबर.
लांब रानांत, पोपटमाऊ, नक्की भेटेल झऱ्यावर.'

झऱ्याजवळ एका झाडाच्या बुंध्याशीं ससा विचार करीत बसला होता. खार झाडाच्या फांदीवर पोपटमाऊची समजूत घालीत होती.

साळुंकीनें विचारलें,

'खारूताई, पोपटमाऊ कां ग रडतो ?'

माऊ स्वतःच म्हणाला,

'गेलों पेरूच्या वना,
पेरू होते नाना,
तिकडून राजकन्या आली
लपवून शालीखालीं
दादा घेऊन गेली !
दादा येईच ना,
पेरू खाईचं ना !'

साळुंकी एकदम म्हणाली,

' त्याला सोन्याचा पिंजरा,
त्यांत डाळिंबाचा चारा
लाडें राजकन्या वाढी
छान पेरूच्या फोडी
परी लागेना गोडी !
भाऊ दिसेचना—
दादा खाईचना ! '

खारूताई नि ससा म्हणाले,

' चला, चला, धांवा, धांवा. आपण आत्तां घेऊन येऊं दादाला.'

सर्वजण थोड्याच वेळांत राजकन्येच्या महालाजवळ आले. पोपटदादाचा पिंजरा राजकन्येच्या खोलीच्या खिडकींत टांगला होता. खारूताई सुरसुर पिंजऱ्यावर चढली. ती आंत तोंड घालून पोपटदादाला म्हणाली,

' अहो, आलाय् भाऊ,
नका उशीर लावूं,
पिंजरा केलाय् खुला,
भुर्र उडा, चला ! '

खारूताईनें सरकन पिंजऱ्याचें दार वर ओढलें.
पोपटदादानें सुर्रर्र भरारी मारली.
पोपटभाऊनें पण सुर्रर्र भरारी मारली.
आणि मागोमाग,

खारूताई, साळुंकीताई, हरीण, ससा नि मोर पण पळत पळत लांब पेरूच्या बनांत गेले.

तिथें सगळ्यांनीं खूप पेरू खाल्ले, नि तेव्हांपासून,
सगळे मग तिथेंच जवळ जवळ राहूं लागले.

—सुमति पायगांवकर

दुकानदार

आई ग मी तर
मोठा झाल्यावर
दुकान सुंदर
काढणार काढणार १

कांचेच्या खिडक्या
कांचेची जमीन
कपाट नवीन
असणार असणार २

खारिक खोबरं
पेपरमिटच्या वड्या
खेळांतल्या होड्या
ठेवणार, ठेवणार ३

गमबूट छत्री
विमान मोटर
मोजे स्वेटर
विकणार विकणार ४

कापडांचे गठ्ठे
दोऱ्यांची रिळं
मोठ मोठी बीलं
करणार करणार ५

बिस्किटांचे पुडे
गव्हाच्या गोणी
नाहिं खोटीं नाणी
चालणार चालणार ६

लिमलेटच्या गोळ्या
चघळत चघळत
मित्रांची वाट,
बघणार बघणार ७

—निर्मला देशपांडे

द्रव्याचा आणि शक्तीचा केवळ याच कार्याकरतां उपयोग करण्याच्या आमच्या निश्चयापासून कोणतीही गोष्ट आम्हाला विचलित करूं शकणार नाहीं."

ल्यू हॉफच्या शाळेचा प्रयोग

इ. स. १७७४ मधें पेस्टालॉझीची शेती कर्जदारांच्या घरांत गेली होती. त्याचें घर काय तें राहिलें होतें. या घरांतच त्यानें दलित वर्गाचीं मुलें एकत्र करून शालेय शिक्षणाच्या दुसऱ्या प्रयोगाला सुरुवात केली. यावेळीं त्याचा मुलगा चार वर्षांचा होता. स्वतःच्या घराचेंच बालघर बनवून येथें राहिलेल्या मुलांचा सांभाळ आणि शिक्षण पेस्टालॉझीनें आपल्या मुलांप्रमाणें केलें. हीं मुलें शेतांत, बागेंत काम करीत व सूतकताई करीत व या कामांतून थोडा वेळ काढून त्याना शिकवण्याचें काम करून घेत असे. लिहिण्यावाचण्याच्याआधीं मुलांना चांगलें बोलतां यायला पाहिजे म्हणून दैनंदिन अनुभवांवर आधारलेले संवादही मुलांकडून करून घेत असे. मधून मधून गायबलमधील उताऱ्यांचें पठणही चालत असे.

कांहीं थोड्या महिन्यांच्या कालावधींतच गरीब वस्तीचा कायापालट झालेला आढळला. त्यांच्या चेहऱ्यावर आरोग्याचा आनंद दिसू लागला. अंगमेहनतीबरोबर त्यांच्या ज्ञानांत आणि आत्मविश्वासांत फार फरक पडल्याचें त्याला आढळलें. मुलांची संख्या वाढूं लागली. त्यांच्या श्रमांतून मिळणारें उत्पन्न त्यांच्या जीवननिर्वाहाला कमी पडूं लागलें. यामुळें पुनः नवीन कर्जाचे डोंगर वाढूं लागले. शेवटीं ही शाळा बंद करण्याचा प्रसंग आला. जवळ होतें नव्हतें तें सर्व द्रव्य संपलें आणि यानंतरचें पुढील १८ वर्षांचें जीवन अत्यंत हालअपेष्टेचें गेलें. कोळसा घेण्याची ऐपत न राहिल्यानें कित्येक दिवस थंडींत कुडकुडत बसून काढावे लागले. कधीं कधीं उपासमारही करून दिवस कंठावे लागले. राष्ट्राच्या उद्धाराची रात्रंदिवस तळमळ बाळगणाऱ्या या थोर पुरुषाला अशीं अठरा वर्षें दैन्यावस्थेंत काढावीं लागली ही कल्पनाच असह्य वाटते.

शेवटीं एक नाट्यपूर्ण घटना घडली. पेस्टालॉझीकडे नोकरीस असलेल्या एलिझाबेथ नांवाच्या बाईस आपला धनी अत्यंत हलाखीच्या स्थितींत असल्याचें कळलें. मध्यंतरीं तिची परिस्थिति सुधारली होती. तिनें आपलें सर्वस्व धन्याला समर्पण करायचें ठरवलें. परंतु पेस्टालॉझीनें तिची मदत नाकारली. परंतु ती आपल्या निश्चयापासून ढळली नाहीं. पेस्टालॉझीच्या घराची डागडुजी करून त्याची व्यवस्था आपल्याकडे घेतली.

पेस्टालॉझीच्या मनावर या निरक्षर पण सूज्ञ आणि उदार

बालकांच्या सर्वांगीण विकासासाठीं
बालशिक्षणाचें

प्रबोधक-साहित्य

शिशु-कल्याण केन्द्र
मजूर-कल्याण केंद्र
नर्सरी शाळा
पूर्व-प्राथमिक शाळा
शिशु-अध्यापन मंदिर
वगैरेसाठीं साहित्य

सूचिपत्र मागवा
किंवा प्रत्यक्ष भेटाः—

जेचंद तलकशी ॲण्ड सन्स
एम्पायर बिल्डिंग, पहिला मजला,
कॅपिटॉल सिनेमाच्या बाजूला
बोरीबंदर, मुंबई १

झरणा

सुगंधित झरणपासून बनणारें तेल



आपणाला त्रिविध लाभाची खात्री देत आहे.

१. गळणारे केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२. मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.

: सोल एजंट :
सुगंध घर
खाडिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम ॲंड कं.
मंगलदास रोड, मुंबई २

M. P. S.

खेडूत स्त्रीच्या चारित्र्याचा फार प्रभाव पडला. 'लीओनार्ड आणि जर्ट्रुड' नामक आपल्या ग्रंथांत जर्ट्रुडलाच त्यानें नायिका बनवून एक खेडवळ प्रेमळ स्त्री आपल्या बालकांना कताईं शिकवीत असतांनाच बायबलांतील गोष्टी सांगून त्यासंबंधीची व्यावहारिक चर्चा करते असें दाखविलें आहे. दैनिक व्यवहारांतून आणि कताईत निघालेल्या सुताच्या तारांची मोजणी करायचें सुचवून ती गणित शिकवीत असे. शाळेच्या पायऱ्या, खिडक्यांचीं तावदानें जें कांहीं आजूबाजूला मोजतां येण्यासारखें दिसेल, त्यांतून ती शिक्षण करीत असे. बालकावरील प्रेमामुळें तिनें सांगितलेली कामें मुलें लक्ष देऊन करीत. शाळा म्हणजे एक विशाल घर बनलें पाहिजे आणि अशा घराच्या प्रेमळ वातावरणांतच सुरुवातीचें शिक्षण होऊं शकतें अशी या खेडवळ स्त्रीची शाळेची कल्पना होती. पेस्टालॉझींच्या या पुस्तकामुळें त्याच्या विचारांचा प्रचार दूरदूरच्या देशांत झाला.

न्यू हॉफच्या शाळेच्या प्रयोगाविषयी लिहितांना पेस्टालॉझी म्हणतो–"ज्यांचें आरोग्य, शक्ति आणि जीवनांतील धैर्य नाहींसें झालें होतें त्यांना माझ्या शिक्षण–पद्धतीनें आरोग्य, शक्ति आणि उत्साह येऊं शकतो हें मी सिद्ध केलें आहे." या आत्मश्रद्धेमुळेंच त्यानें आपल्या संस्थेचें विस्तरण केलें पण त्याचा परिणाम काय झाला तो आपण वर पाहिला. एलिझाबेथनें घर चालवायला घेतल्यानें पेस्टालॉझींचा काळ पुनः बदलला. आपल्या विपन्न परिस्थितींतून आपण काय शिकलों हें लिहिताना तो म्हणतो, "मला सहन कराव्या लागलेल्या दारिद्र्याच्या यातनांतूनच मला लोकांच्या दारिद्र्याच्या यातनांची कल्पना आली. अनुभवाशिवाय खरें ज्ञान होत नाहीं म्हणून इतरांना लोकांच्याविषयीं जें लोकांना कळत नाहीं तें मला कळतें. माझी भाषा जरा विचित्र वाटेल, परंतु माझ्या शिक्षण–संस्थेच्या अपयशामुळेंच ज्या तत्त्वावर मी ही संस्था उभारली होती त्या (शिक्षणाच्या) मूलभूत तत्त्वाविषयीं माझी अधिक खात्री होऊन चुकली आहे."

एलिझाबेथच्या आगमनानंतर कांहीं मित्रांनीही पेस्टालॉझीला मदत दिली. पेस्टालॉझी लिखाणांतून त्याला कांहीं उत्पन्न मिळूं लागलें. 'लिओनार्ड आणि जर्ट्रुड' या ग्रंथांच्या प्रकाशनामुळें पेस्टालॉझीला विशेष स्थान प्राप्त झालें. यापुढील कालांत आणखी बरेंच लिखाण केलें. परंतु लोकांचें दैन्य दिवसेंदिवस वाढतच जात आहे असें पाहून त्याला लेखना-





चाच कंटाळा आला. लोकांचें दारिद्र्य वाढतें आहे आणि आपण मात्र पुस्तकेंच लिहीत बसलों आहोंत." कीर्ति किंवा पैशासाठीं साहित्य लिहिणें म्हणजे पाप आहे असें तो समजत असे. ज्या साहित्यानें लोकांच्या जीवनांत फेरफार होत नाहीं तें साहित्य काय उपयोगाचें, म्हणून १७८० ते १७९८ पर्यंत पेस्टालॉझीनें आपली लेखणी चालवणें बद केलें. दरम्यान फ्रेंच राज्यक्रांति झाली. क्रांतीच्यामागील विचारांतील चांगल्या आणि बाईट गोष्टींची पूर्ण कल्पना पेस्टालॉझीला होती. फ्रेंच क्रांतिकारकांच्या फौजांनी स्विट्झरलड जेव्हां पायाखालीं घातलें तेव्हां या देशाची फ्रान्सच्या धर्तीवर पुनर्रचना करण्यासाठीं क्रांतीच्या विचारांशी सहमत असलेल्या पेस्टालॉझीला नवीन सरकारनें हाताशीं धरलें. 'पीपल्स न्यूज' नांवाच्या सरकारी पत्राच्या संपादनाचें काम, त्याचें शैक्षणिक सुधारणा सुचवण्याचें अशी अनेक कामें दिलीं. शेवटीं राजकीय हुद्यावर त्याची जेव्हां नेमणूक झाली तेव्हां ती नाकारून 'मी शाळामास्तर होणें पसंत करीन' असें त्यानें सांगितलें. नव्या राजवटीला कांहीं लोकांचा विरोध होता अशा लोकांनीं पेस्टालॉझीला सांहजिक विरोध केला. पेस्टालॉझीच्या इच्छेप्रमाणें बर्नच्याजवळील स्टॉज या गांवच्या ८० अनाथ मुलांच्या शाळेची जबाबदारी सोपविण्यांत आली. येथें पेस्टालॉझीच्या शैक्षिणक पद्धतींची खरी खरी कसोटी झाली. या शाळेंत त्याच्या मदतीला फक्त एकच नोकर होता. राजकीय मतभेदांमुळें लोकांचा शाळेला संपूर्ण विरोध होता. साधन-सामग्रीचा संपूर्ण अभाव होता. मदतीला त्याच्या कल्पनेचे शिक्षक नव्हते आणि तरीदेखील येथें झालेल्या पांच महिन्यांच्या कार्याचे जे परिणाम दिसले, त्यामुळें उद्योगाच्या शिक्षणावरची पेस्टालॉझीची श्रद्धा आणखीच वाढली.

राजकीय उलाढालीमुळें बर्गडॉर्फ येथील शाळेवर त्याची नेमणूक झाली. १७९९ पासून ते १८०४ पर्यंतचें येथील कार्य शिक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत संस्मरणीय असें झालें. दारिद्र्यानें गांजलेल्या अगदीं लहान मुलांचें शिक्षण प्रथम त्याला सोपवलें गेलें व नंतर स्वतःच्या कल्पनेची उद्योग माध्यमाची वेडुन किल्ल्यांत शाळाही काढण्यास त्यास परवानगी मिळाली. येथेंच पेस्टालॉझीच्या शिक्षणपद्धतीला पूर्णता आली. येथेंच त्यानें 'How Gertrude Teaches Her Children,' 'An experiment in teaching mothers how to bring up their little ones' ही पद्धतीविषयक पुस्तकें लिहिली. आपल्या एका सहकाऱ्याच्या साह्यानें 'Book

टेलिफोन : ऑफिस : २५११६१ तार 'रोप मार्ट'

एम्. बेस्ट कॉटन रोप

मॅन्युफॅक्चरिंग कं.

(प्रो. एम्. जे. थानावाला ॲन्ड कं.)

४७-४९, फॉर्बस स्ट्रीट, कोट, मुंबई १

खालील वस्तु आमच्याकडे बनतात

☆ कॉटन ड्राइविंग रोप्स

☆ कॉटन बेन्डिंग्स

☆ स्पीन्डल टेप्स

☆ कॉपर कन्डक्टर



for Mothers' लिहिलें. येथेंच त्याच्या संस्थेची कीर्ति ऐकून परदेशांतील अनेक विद्यार्थी व शिक्षणकार त्याचेकडे येऊन गेले. यांत हर्बार्ट स्पेन्सर, फ्रेड्रिक फ्रॉबेल, कार्ल रिटर यांजसारखे थोर लोक होते.

कार्ल रिटरनें पेस्टालॉझीच्या या संस्थेविषयीं लिहितांना म्हटलें आहे–'मी स्वित्झरलँडच्या स्वर्गापेक्षाही येथें कांहीं अधिक पाहिलें. मला पेस्टालॉझी आणि त्याच्या विशाल हृदयाचें आणि प्रतिभेचें दर्शन येथें घडलें. या थोर व्यक्तीच्या सान्निध्यांत मी जे दिवस घालविले, त्या दिवसांत शिक्षकाच्या पवित्र कार्याविषयींच्या कल्पनेनें आणि मानवी स्वभावाच्या गौरवानें माझें मन भारावून गेलें."

या संस्थेंतील पेस्टालॉझीचीं शेवटचीं कांहीं वर्षें सहकाऱ्यांशीं झालेल्या मतभेदांचा सामना करण्यांत अत्यंत वाईट रीतीनें गेलीं. पेस्टालॉझीला त्याच्या साहित्याच्या हक्काबद्दल ज्या मोठ्या रकमा मिळाल्या, त्यांतील आपला वांटा त्यानें शिक्षण संस्थांच्या विकासार्थ देऊन टाकला. १७ फेब्रुवारी १८२७ मध्यें त्याचें देहावसान झालें. त्याच्या समाधीवर 'Everything for others, nothing for himself' असें लिहिलेलें आहे.


पेस्टालॉझीचे शैक्षणिक विचार

पेस्टालॉझी जनतेच्या उद्धारासाठीं शिक्षणाच्या क्षेत्रांत उतरला. दारिद्र्यानें गांजलेल्या, अधोगतीला पोहोंचलेल्या आणि धैर्यगलित झालेल्या जनतेला कार्यक्षम करायचें तर शिक्षणाचें स्वरूप कसें असावें, या एकाच विचारानें त्यानें शिक्षणाच्या क्षेत्रांत प्रयोग केले, त्यामुळें त्याचे शैक्षणिक विचार जागतिक महत्त्वाचे बनले आहेत. ज्या ज्या देशांत प्रजाकीय जीवनाच्या पुनर्निर्माणाचा प्रश्न आहे, तेथें पेस्टालॉझींचे शिक्षणविषयक विचार प्रेरणादायक वाटतील.

व्यावहारिक कार्यक्षमतेवर भर

शिक्षण म्हणजे पुस्तकांच्या उपयोगाचें शिक्षण नव्हे. शिक्षणानें व्यक्तीच्या आचारांत प्रगति झाली पाहिजे. खालच्या वर्गांतील शेतकऱ्यांच्या मुलांची कार्यक्षमता वाढण्यासाठीं काय करावें याचा मार्ग पेस्टालॉझी शोधीत होता. पुस्तकी ज्ञानानें कार्यक्षमता वाढेल का! त्यांना ज्ञान कोणतें द्यावें हा प्रश्न महत्वाचा नसून त्यांना जें करतां येत नाहीं तें करतां यावें हा शिक्षणाचा प्रश्न आहे. वेळोवेळीं पेस्टालॉझीनें आपल्यापुढील प्रश्नाचें स्पष्टीकरण केलें आहे. 'They must be taught





to help themselves and contribute to their own expenses' त्यांना स्वावलंबन शिकवलें पाहिजे आणि या स्वावलंबनांतून स्वखर्चाला लागणाऱ्या रकमेंत त्यांनी आपली भर घातली पाहिजे.


पेस्टालॉझीचीं हीं वाक्यें वाचलीं म्हणजे महात्मा गांधींनी मूलोद्योग शिक्षणाची योजना जनतेपुढें मांडलेल्या सिद्धान्ताचीच आठवण होते. 'लिओनार्ड आणि जर्ट्रुड' या पुस्तकांत एक निरक्षर, खेडवळ स्त्री गांवांतील मागासलेल्या वस्तीच्या मुलांना कार्यक्षम बनविण्याच्या दृष्टीनें कसें व्यावहारिक शिक्षण देऊं शकते, यासंबंधीच्या स्वतःच्या व्यावहारिक शिक्षणाच्या कल्पना पेस्टालॉझीनें मांडल्या आहेत. या पुस्तकांत ज्या ज्ञानामुळें क्रियांना प्रेरणा मिळत नाहीं असें पुस्तकी ज्ञान व्यर्थ असल्याचें त्यानें प्रतिपादन केलें आहे. शब्दांचा कमींत कमी उपयोग करून दैनंदिन व्यवहारांतून शिक्षण देऊन मुलांचें जीवन उद्योगाकडे वळवणें म्हणजेच मानवतेचें प्रेम शिकवणें किंवा ईश्वराची मुग्ध प्रार्थना करण्यासारखें आहे असें पेस्टालॉझीचें मत होतें.

लेखन-वाचनाच्या पूर्वी बालकांच्या क्रिया-कौशल्याचा विकास झाला पाहिजे. लिहायला वाचायला येण्यापूर्वी त्यांना चांगलें बोलतां आलें पाहिजे. चांगलें बोलतां येण्यापूर्वी त्यांना चांगला व्यावहारिक अनुभव मिळाला पाहिजे. त्यामुळें जर्ट्रुड आपल्या वर्गांतील मुलांना 'मुला हें तुझें नाक आहे, हे तुझे कान आहेत, हा तुझा हात आहे, हीं तुझीं बोटें आहेत, तुझे डोळे कोणते, कान कोणते असे प्रश्न न विचारतां ती म्हणते- "मुलांनो, या, मी तुमचे छोटे छोटे हात धुवून देतें हं, तुमचे केस विंचरून देतें, बोटांची नखे कापूं या हं." ह्या तिच्या ज्ञानापेक्षां व्यावहारिक बाजूवरील भरामुळें तिच्या मुलांचें क्रिया-कौशल्य, बुद्धि आणि क्रियाशीलता वाढून त्यांचा सर्वांगविकास होत असल्याचें ती नमूद करते.

गणिताचें शिक्षण असेंच ती रोजच्या व्यवहारांतून देत असे. शाळेच्या पायऱ्या चढतांना पायऱ्या मोजणे, सूत कातीत असतांना सुताचे धागे मोजणें, चाकांचे फेरे मोजणें यांतून ती मोजण्याचें शिकवीत असे. आठवड्यांतील घटनांविषयीं बोलून त्यांत आपलें कोठे बरोबर वर्तन झालें, कोठे चुकलें याविषयी चर्चा करून मुलांचें नीतीशिक्षण करीत असे. मुलांच्या गुणदोषांची चर्चाही ती करीत असे.

व्यावहारिक व उद्योगमूलक शिक्षणासंबंधींचे निष्कर्ष :

(१) शिक्षण शिकणाराच्या स्वतःच्या अनुभवाच्या पायावरच आधारलें पाहिजे.



कितीही जुनाट मूळव्याध बरा होतो. हजारों रोग्यांना फायदा झाल्याचा रिपोर्ट आहे. डॉक्टर पण ह्याची शिफारस करतात. रक्त पडणे, कफ पडणें वगैरे पूर्णपणें नाहींसें होतें.

अर्शारी पिल्स वापरा
मलम

सर्वत्र मिळतें

: बनविणार :

हरबल हीलिंग कं.,

मुंबई नं. ७



दत्तात्रेय कृष्ण सोंड्रु लिमिटेड केमिस्ट मायलेट लि.
चेंबूर-मुंबई.७८

(२) शिकणाराचा अनुभव आणि अवलोकन यांचा संबंध त्याच्या भाषेशीं जोडला पाहिजे.

(३) शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानोपार्जन नव्हे अथवा क्रियाकौशल्याचाही विकास नव्हे, परंतु व्यवहार आणि उद्योगांतून मनाच्या शक्ति सुदृढ करणें, त्यांचा विकास करणें हा शिक्षणाचा उद्देश समजला पाहिजे.

(४) ज्ञानानें शक्ति आणि श्रमानें कौशल्य संपादन झालें पाहिजे.

नैसर्गिक विकासानुसारी शिक्षणाचा पुरस्कार : पेस्टालॉझीपूर्वीच्या शिक्षणकारांनी नैसर्गिक विकासानुसारी शिक्षणाचा पुरस्कार केला आहे. विशेषतः या शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांत रुसोकडे बोट दाखवण्यांत येतें. परंतु रुसो आणि पेस्टालॉझीच्या नैसर्गिक विकासानुसारी शिक्षणाची कल्पना सारखी नाहीं. नैसर्गिक या शब्दाचा दोघांचा अर्थ फार निराळा आहे. मनुष्यांत पशुत्व आणि दिव्यत्व दोनही दिसतात, यांतील दिव्यत्वाच्या विकासाला शिक्षणानें अनुसरलें पाहिजे ही पेस्टालॉझीची भूमिका होती.


'Man will only become man through his inner and spiritual life. He becomes, through it, independent, free and contented. Mere physical nature leads him not hither. She is in her nature very blind; her ways are ways of darkness and death. Therefore education and training of our race must be taken out of the hands of, blind sensuous nature and the influence of her darkness and death, and put into the hands of a moral and spiritual being and its devine, eternal inner light and truth.'

'आंतरिक आणि आध्यात्मिक जीवनाच्या द्वारेंच मनुष्य हा 'मनुष्य' बनूं शकेल. यांतूनच तो स्वावलंबन, स्वातंत्र्य आणि समाधान मिळवूं शकेल. केवळ भौतिक, निसर्ग या गोष्टींचा विकास करू शकणार नाही. कारण निसर्ग जात्याच आंधळा आहे, त्याचे मार्ग अंधार आणि मृत्यूकडे वळवणारे आहेत. म्हणून 'शिक्षणाचे सिद्धान्त स्वाभाविक विकासाच्या नियमांवर आधारलेले पाहिजेत,' याचा अर्थ दुसरा तिसरा कांहीं नसून मनुष्यामधें जें संवादी, अविनाशी आणि दिव्य (Spark of Divinity) तत्त्व आहे, त्याच्या विकासाला अनुसरून शिक्षण झालें पाहिजे. यांत आपल्या स्वभावांतील अधमपणाशीं आपण झगडत असतों. या झगड्यांत शिक्षणानें आपल्यांतील उच्चतर प्रेरणांना प्रोत्साहक बनलें पाहिजे. आपल्यांत जें कांहीं स्वाभाविक असें चांगलें आहे त्याचा विकास होण्यासाठीं शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे.'

बारा वर्षेपर्यंत मुलांना निसर्गाच्या सान्निध्यांत अनिर्बंध सोडणें हा वेळेचा अपव्यय आहे. कारण समाजाच्या पारंपरिक संस्कारापासून त्यांना दूर ठेवण्यानें त्यांचीं मनें कोरी करकरीत राहतात असें नव्हे, उलट त्यांची अधोगती होते, त्यांची संस्कारक्षमता नाहींशी होते. जीवनाच्या सुरुवातीच्या वयांतच त्यांची विशेष निगा होणें जरूरीचें असल्यानें, जन्मापासूनच मनुष्याची शिक्षणाची सुरुवात योजनापूर्वक केली पाहिजे असें पेस्टालॉझीचें मत होतें

मानसिक विकासक्रम म्हणजेच शिक्षणाचें मानसीकरण

व्यक्तिगत अनुभवांत व्यक्तीचा वातावरणाशी संबंध येतो. या प्रत्यक्ष ज्ञानामुळेंच अमूर्त गोष्टींचीहि कल्पना करतां येते; त्याचप्रमाणें प्रत्यक्षाच्या विशिष्ट ज्ञानांतूनच सामान्य-ज्ञानाचें आकलन होऊं शकतें. पेस्टालॉझीच्यापूर्वीच्या जुन्या शिक्षणाच्या कल्पना नेमक्या याच्या उलट होत्या. शिक्षणांत



ईश्वरविषयक किंवा अन्य अमूर्त (abstract) तात्त्विक गोष्टींपासून सुरू करून ते मूर्त घडामोडींचें विवेचन करीत असत. ज्ञानापासून अज्ञानाकडे जाण्याऐवजीं अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याचा त्यांच्या शिकवणीचा क्रम होता. त्याचप्रमाणें विशिष्ट ज्ञानापासून सामान्याकडे आणि अप्रत्यक्षाकडून मग प्रत्यक्षाचें शिक्षण करण्याची त्यांची रीत होती. शिकणाऱ्याच्या मनाचा विकास त्यावेळीं ध्यानांत घेतला जात नसे. मानवी मनाचा विकास प्रत्यक्षाकडून अप्रत्यक्षाकडे, ज्ञानाकडून अज्ञानाकडे आणि विशिष्टाकडून सामान्याकडे होतो, म्हणून शिक्षणांत व्यक्तीच्या स्वतःच्या अनुभवाला प्रथम स्थान मिळालें पाहिजे.

शालेय शिक्षणाचा मुख्य उद्देश पेस्टालॉझीच्या मतें शिकविणें (to teach) नसून विकसवणें (to develope) हा आहे. शिक्षणाच्या या उद्देशामुळें पेस्टालॉझीनें लहान मुलांच्या शिक्षणाचें महत्त्व प्रतिपादिलें आहे. 'विकास हा जीवनाच्या सर्व प्रकारांत नंतर येणाऱ्या अवस्थांपैकी सुरुवातीच्या अवस्थांवरच अधिक अवलंबून असतो.' मनुष्याच्या बाबतींतहि ही गोष्ट तेवढी नेमकी निराळी असण्याचें कारण नाहीं. लहान मुलांच्या विकासाविषयीं त्यांनीं लिहिलें आहे–'सर्व शिक्षणाची सुरुवात मुलें जें कांहीं आजूबाजूला अवलोकन करतात, त्यापासून झाली पाहिजे. अत्यंत विपन्न स्थितींतील बालकांचे टिकाणीदेखील विविध शक्ति, भावना, रुचिवैविध्य, पात्रता, कल्पना आढळल्या. त्यांच्या विकासाला शिक्षणांत अवकाश मिळाल्यास त्यांतून उत्तम मनुष्यनिर्मिति होऊं शकेल. परंतु शिक्षणांत या गोष्टींना वाव देण्याच्या ऐवजीं दुसऱ्यांच्या कल्पना, विचार, भावना, ज्ञान विद्यार्थ्यांवर लादण्याचा प्रयत्न आढळून येतो, ही पेस्टालॉझीची तत्कालीन शिक्षणासंबंधींची तक्रार होती. शाळेंतील शिक्षक मुलांच्या आंतरिक गोष्टीना बाहेर येऊं न देतां मुलांवर दुसऱ्यांच्या उसन्या कल्पना लादीत असतात. त्यांच्या स्वाभाविक विकासाला अडथळा होतो असें त्याचें म्हणणें होतें.

मानसिक वयाला अनुसरणारें शिक्षण

बालकांचा आंतरिक मनोविकास आणि शिक्षणानें करावयाचे संस्कार यांत योग्य वेळीं योग्य तेंच शिकवलें गेलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. शिक्षणाच्या इतिहासांत या गोष्टीला शिक्षणाचें मानसीकरण Psychologing of Education असें म्हणतात. शिक्षणाचा विषय योग्य मानसिक अभिमुखता 'Psychological moment' लक्षांत घेऊन बालकांच्यापुढें रुजूं केला पाहिजे. मनाची योग्य तयारी असल्यावर मनाला रुंधवून टाकणें हें जसें अयोग्य त्याचप्रमाणें मनाची योग्य तयारी नसतांना विषय लादणें हेंही अयोग्य आहे. म्हणून शिक्षणानें विकासाचा अनुक्रम अनुसरला पाहिजे. स्टॉझ येथील शैक्षणिक प्रयोगांत त्यानें आपल्या शिक्षणयोजनेला ही मानसशास्त्रीय बैठक दिली. यासंबंधीच्या त्याच्या सिद्धान्ताचा थोडक्यांत सारांश पुढील प्रमाणें आहे.

(१) प्रत्येक विषयांत शिक्षणाची सुरुवात सोपी व सुबोध असली पाहिजे. बालकाच्या विकासाबरोबर पुढील एकेक पायरी योजली पाहिजे.

(२) प्रत्येक मानसिक कक्षेवर शिकवलेला भाग शिकणाराच्या बुद्धीनें ग्रहण केला आहे किंवा नाही हें पाहिल्याशिवाय शिक्षकाने पुढें जाऊं नये.

(३) शिक्षणानें बालकाच्या विकासाला अनुसरले पाहिजे. विकासाच्या विचाराशिवाय शाब्दिक विवरण करण्यांत अर्थ नाही.

(४) शिक्षकानें बालकाचें व्यक्तित्व पवित्र मानलें पाहिजे

(५) शिक्षक आणि विद्यार्थी यांतील संबंध आणि शालेय शिस्त ही प्रेमानेंच नियंत्रित केली पाहिजे. शिक्षणाच्या प्रक्रियेंत शिकवण्याला महत्व नसून शिक्षक–विद्यार्थ्यांच्या प्रत्येक संबंधाला महत्व आहे.

शिक्षणाच्या मानसीकरणांत आणखी एक नवीन गोष्ट पेस्टालॉझीनें सुचविली आहे. अनुभवानें शिक्षण होतें परंतु

नवीन डिझाइन्सचें
सुंदर पुस्तक
यांत ६४ आकर्षक डिझाईन्स व निरनिराळ्या
टांक्यांच्या ३४ आकृतींची
माहिती दिलेली आहे.
किं. रु. ३–०–० टपाल खर्च वेगळा
व्यापारी माहितीसाठीं लिहा:—
एस्. मधुकर
अँन्ड ब्रदर्स
ट्रामनाका, दादर, मुंबई–१४

अनुभवाचा फायदा करून घेण्याची पात्रता मनाच्या सहजप्रवृत्त अभिमुखतेवर intuitive apprehension अवलंबून असते. शिक्षणाच्या संस्कारानें ही अभिमुखता वाढवून बालकाला मिळणारा अनुभव अधिक प्रभावी आणि टिकाऊ असा बनवतां येतो. किंबहुना शिक्षणाच्या योजनेचा मुख्य उद्देशच पेस्टालॉझीच्या मतें मनाला कार्यान्वित करणें हा आहे. या दृष्टीनें लेखन-वाचन-गणितादि विषयांच्या शिक्षणांत त्यानें अशा प्रकारच्या योजना योजल्या आहेत कीं त्यामुळें बालकांची अभिमुखता वाढत रहावी.

पेस्टालॉझीचे वस्तुपाठ आणि अवलोकनपाठ :

जीवनाच्या सुरुवातीला मनावर सभोवतालच्या जगांतील विविध वस्तूंची अस्पष्ट छाप पडत असते. त्यांत स्पष्टता निर्माण करणें हें शिक्षणाचें महत्वाचें कार्य आहे. म्हणून सभोवतालच्या वस्तूंचा अथवा पदार्थांचा परिचय करून देण्यांत आला पाहिजे. हा परिचय करून देण्यांत व्यवस्थित क्रम असला पाहिजे. विविध विषयांतील हा क्रम मुलांच्या वाढत्या शक्तीशीं समान्तर असला पाहिजे.

पेस्टालॉझीचे पाठ कसे असत, याविषयी वेर्डुनच्या शाळेंतील एक विद्यार्थी लिहितो-"भूगोलविषयक प्राथमिक गोष्टी शिकवण्यासाठीं प्रथम आम्हाला वेर्डुनच्या दूर असलेल्या एका दरीवर नेण्यांत आलें. तो सर्व प्रदेश आम्ही पाहिला. त्यांतील बारीक सारीक तपशील आम्ही प्रत्यक्ष नोंदला. शाळेंत परतलों तेव्हां आम्हाला माती देण्यांत आली व नंतर आम्ही पाहिलेल्या दरीचा मातीचा प्रत्यक्ष नकाशा तयार केला. पेस्टालॉझी-पाठाचा नमुना त्याच्या नवीन शिक्षण-पद्धतीची कल्पना देण्यास पुरावा आहे."

पाहिजे

'शिशु विकास मंदिर' **उस्मानपुरा** (महिला मंडळ, औरंगाबाद) संस्थेला अनुभविक, मॅट्रिक, मॉंटेसरी ट्रेन्ड हेडमिस्ट्रेसची गरज आहे. गरजूंनीं प्रशस्ति-पत्रिकेसोबत २५ नोव्हेंबरचे आंत खालीं सही करणाराकडे अर्ज पाठवावा. मासिक वेतन ९० रु. सर्व अलाऊन्ससह दिलें जाईल.

—सौ. राजकुंवर काबरा,
चिटणीस, शिशु विकास मंदिर,
उस्मानपुरा, औरंगाबाद.

☆

बालशिक्षणाचे खेळ आणि स्वातंत्र्याचें महत्व

शिक्षण म्हणजे खेळ नव्हे असें पेस्टालॉझीचें मत होतें. हें शिक्षण विद्यार्थ्यांचें मनोरंजन करीत करीत नकळत व्हावें असें त्याला वाटत नव्हतें. एके ठिकाणी तो म्हणतो, 'शिक्षणाच्या अशा कल्पनेनें ज्ञानाचा भारदस्तपणा नाहींसा होईल आणि त्यामुळें विद्यार्थ्यांना त्यासाठीं पुरते परिश्रम करावेसे वाटणार नाहींत. शिक्षणांत बालकाच्या वैचारिक शक्तीचा सतत उपयोग होत राहिला पाहिजे. ज्ञानोपार्जनासाठीं परिश्रम करणे अपरिहार्य आहे, असेंच विद्यार्थ्यांना वाटलें पाहिजे. अर्थात् हे परिश्रम करण्यास आपण उत्तेजन दिलें पाहिजे. त्याचें भय निर्माण करतां कामा नये. विद्यार्थ्यांचें पाठांत लक्ष लागत नसलें तर त्याचीं कारणें शिक्षकानें प्रत्यक्ष स्वतःचें परीक्षण करून शोधलीं पाहिजेत. शिक्षकाचें कार्य कल्याणकारी निरीक्षणाचें Benevolent Superintendence असलें पाहिजे. त्याचा उद्देश विधात्यानें बालकाला ज्या कांही शक्ति दिल्या असतील, त्यांचा विकास करण्याचें आहे. बालकांचा नैतिक, बौद्धिक आणि शारीरिक विकास त्यानें प्रेमळ वातावरण निर्माण करून घडवून आणला पाहिजे. शिक्षक ही गोष्ट त्याच्या बौद्धिक गुणापेक्षां हृदयाच्या गुणानेंच घडवून आणूं शकतो.

पेस्टालॉझीचें शैक्षणिक विचारांचें गांधीजींच्या विचारांशीं असलेलें साम्य पाहून या शिक्षणकाराविषयीं आपली आणखीच उत्सुकता वाढते आणि त्याच्या वाङ्मयाचा अभ्यास करावासा वाटतो.

पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या कल्पनांचा उगम

प्राथमिक शिक्षण म्हणजे बालकाला लेखन-वाचनविषयक अभिमुखता प्राप्त झाल्यानंतर जें शालेय शिक्षण देण्यांत येतें तें शिक्षण, अशी व्याख्या केल्यास या शिक्षणाच्या पूर्वी योजिलें जाणारें शिक्षण यास पूर्वप्राथमिक शिक्षण म्हणतां येईल. येथें शाळा म्हणजे घराच्या बाहेर शिक्षणाचे संस्कार करण्याच्या दृष्टीनें समाजानें केलेली व्यवस्था असा अर्थ घेतला

पाहिजे. या अर्थानें पूर्वप्राथमिक शाळांची स्थापना युरोपांतील पुढारलेल्या देशांत अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास झाल्याचें आढळतें. परंतु अशा शाळांची योजना जरी अठराव्या शतकांत झालेली असली तरी पूर्वप्राथमिक वयाच्या बालकांच्या शिक्षणाची कल्पना इसवी सनापूर्वीच्या चवथ्या शतकांतील ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोच्या रिपब्लिक ग्रंथांत आढळते. त्यानंतर ती अर्वाचिन कालांत कॉमीनिअस, रुसो, पेस्टालॉझी आणि रॉबर्ट ओवेन या सोळा ते अठराव्या शतकांतील युरोपिय शिक्षणकारांच्या साहित्यांतही आढळते. सामाजिक उद्धाराचें प्रभावी साधन म्हणून पूर्वप्राथमिक वयाच्या बालकांचे शिक्षणाचा काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. या विचारकांनीं प्रतिपादलेलीं तत्वें आणि शिक्षण-पद्धति यांस त्यांच्या प्रत्येकाच्या धर्माविषयक समजुतीचा अथवा त्यांच्या विशिष्ट तत्वज्ञानाचा रंग असला तरी त्यांच्या कांहीं कल्पनांना आजच्या पूर्वप्राथमिक शिक्षणांतही स्थान मिळालेलें आढळतें.

कॉमिनिअसचे (१५१२-१६७१) विचार : कॉमिनिअसनें पूर्वप्राथमिक वयाच्या बालकांच्या आरोग्याची काळजी घेऊन मातेनें बालकाला आजुबाजूच्या जगाचा परिचय कसा करून द्यावा, यासंबंधीं 'The School at mothers' knee' 'मातेच्या गुडघ्याशीं भरणारी शाळा' या नांवाच्या लहानशा पुस्तकांत लिहिलें आहे. या वयांतील बालकाचा अभ्यासक्रम त्यांच्या दैनिक जीवनव्यवहारांवर, त्याचप्रमाणें आजुबाजूच्या वातावरणांतील ज्या गोष्टींचें त्याला आकर्षण वाटेल त्यावरच आधारला पाहिजे असे त्यानें सुचवलें होतें. कॉमिनिअसनें चार शतकांपूर्वी सुचवलेलीं हीं शैक्षणिक तत्वें आजच्या पूर्वप्राथमिक शिक्षणांतही स्वीकारलेलीं आहेत.

रूसोचे (१७१२-१७७८) सिद्धान्त : व्यक्तीवर शिक्षणाचे संस्कार करण्यापूर्वी व्यक्तीच्या नैसर्गिक विकासाला शिक्षणांत प्रथम स्थान दिलें गेलें पाहिजे. बालक म्हणजे छोटा मनुष्य नव्हे, त्याच्या विकासाच्या गरजा मोठ्या माणसापेक्षां निराळ्या असल्यामुळें जीवनाच्या सुरुवातीला समाजापासून दूर अशा नैसर्गिक मोकळ्या वातावरणांत मुलांचें अनिर्बंध शिक्षण झालें पाहिजे, असा रुसोचा अभिप्राय होता. व्यक्तीच्या विकासविषयक गरजा आणि सामाजिक रीतिभाती यांत विरोध आहे अशी रुसोची कल्पना असल्यानें व्यक्तीचें सुरुवातीचें शिक्षण समाजापासून दूर अशा स्थळीं झालें पाहिजे. दहा-बारा वर्षेंपर्यंत बालकांना लेखन-वाचन-गणितादि विषय शिकवूं नयेत असें त्याचें मत होतें. प्रत्येक बालकाला आपल्या विकासासाठीं स्वतंत्रता मिळाली पाहिजे, ह्या रुसोच्या विचारसरणींतील विचाराचा पुढें बराच प्रचार झालेला आहे. आजच्या पूर्वप्राथमिक शाळेंत बालकाच्या स्वाभाविक क्रियांच्या अवलोकनावर जो भर दिला जातो, त्या कल्पनेचा आद्यजनक रुसो आहे. रुसोच्या कालांतच फ्रान्समध्यें फ्रेंच राज्यक्रान्तीच्यापूर्वी कांहीं ठिकाणीं पूर्वप्राथमिक शाळाही काढण्यांत आल्या होत्या.

पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांची सुरुवात

पूर्वप्राथमिक शिक्षणांत बालकांच्या गरजा लक्षांत घेऊन चालविण्यांत येणाऱ्या दोन प्रकारच्या शाळा आढळतात. त्यांपैकीं दोन ते पांच वर्षें वयाच्या बालकांसाठीं चालणाऱ्या शाळांना विशेषतः इंग्लंडमध्यें नर्सरी शाळा (Nursery-Schools) म्हणतात. त्यानंतर म्हणजे पांच ते सात वर्षें वयाच्या बालकांसाठीं चालविण्यांत येणाऱ्या शाळांना शिशु-शाळा (Infant-Schools) म्हणतात. पूर्वप्राथमिक शिक्षणाचा इतिहास म्हणजे एकापरीनें या दोन प्रकारच्या शाळेंत येणाऱ्या बालकांच्या विशिष्ट वयाचेंच शिक्षण आहे. 'किंडरगार्टन' 'मॉन्टेसरी' ही या वयाच्या बालकांना द्यावयाच्या शिक्षणाच्या पद्धतींचीं निदर्शक नांवें आहेत. या पद्धतींपैकीं एक अथवा दोन्हींचे कांहीं अंशीं मिश्रण आजच्या पूर्वप्राथमिक शिक्षण-शाळेंत आढळतें. नर्सरी शाळा आणि शिशुशाळा यांत शिशुशाळा प्रथम निघाल्या आणि नंतर शालेय वय खालीं नेण्याची गरज भासल्यानें नर्सरी शाळा अस्तित्वांत आल्या.

शिशुशाळा : The Infant Schools

युरोपांत औद्योगिक युगाला जशी चढती येत गेली, त्याप्रमाणें कारखान्यांत स्त्रियांचीही भरती होऊं लागली. या स्त्रियांच्या अर्भकांना आणि शिशूंना सांभाळण्यासाठीं प्रथम धंदेवाईक Dame-Schools म्हातारींच्या शाळा आणि Creche म्हणजे पाळणा घरें निघूं लागलीं, परंतु या संस्थेंत मुलांना सांभाळण्याशिवाय कोणताच शैक्षणिक हेतु नव्हता.

क्षमस्व

'शिक्षण-पात्रिका' दीपोत्सवी अंक दि. १० लाच वाचकांपुढें सादर करूं इच्छीत होतों; परंतु त्या तारखेला पोस्ट करण्याची पोस्ट ऑफिसातर्फे परवानगी न मिळाल्यामुळें सदर अंक नेहमीच्या तारखेसच प्रकाशित करावा लागला याबद्दल खेद प्रदर्शित करीत आहोंत.

—व्यवस्थापक

सतराव्या शतकांतही अशा प्रकारच्या संस्था प्रथम अस्तित्वांत आल्याचें सांगण्यांत येतें. या शाळांत शैक्षणिक हेतूंचाच अभाव असल्यानें त्यांना आपण पूर्वप्राथमिक शिक्षण-संस्था म्हणूं शकत नाहीं. बालकांच्या लहान वयाच्या गरजांचा विचार ज्या संस्थांत प्रथम झाला त्यांना शिशुशाळा Infants Shools असें नांव पडलें. या प्रकारच्या शाळांची कल्पना सतराव्या शतकामध्यें कॉमिनिअसच्या बरोबर इतरहि कांहीं शिक्षणकारांना होती. मागासलेल्या वर्गात पालकांच्या अज्ञानामुळें या प्रकारच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांना न वाटल्यानें या वर्गाचा उद्धार करणाऱ्या मानवतावाद्यांनीं या वस्तीच्या बालकांसाठीं स्वतंत्र शिशुशाळा काढण्यास सुरुवात केली. फ्रेंच क्रांतीच्या पूर्वी फ्रान्सच्या पूर्व भागांत जीन फ्रेड्रिक ओबर्लीनचा (१७४०–१८२८) प्रयत्न खास लक्षांत घेण्यासारखा आहे.

ओबर्लीनच्या शिशुशाळेचें स्वरूप

ओबर्लीन शिक्षिकेच्या पदीं उत्साही तरुण मुलींची निवड करीत असे. शिक्षणांत खेळ, मोठ्या मुलांना सूतकताई, विणकाम, शिवण आणि त्याचबरोबर चित्रकाम, सृष्टिपरिचय, निरानिराळे संग्रह करणें, संगीत, हस्तव्यवसाय वगैरे गोष्टींचा समावेश केलेला असे. मुलांना प्रवासाला बाहेर नेऊन फुलें आणि इतर वस्तु जमवण्याबाबत प्रोत्साहन देण्यांत येत असे. ओबर्लीननें ज्या प्रकारच्या पालकांच्या आणि समाजाच्या विरोधाला तोंड देऊन या प्रकारच्या शिशुशाळांना फ्रेंच सरकारकडून मान्यता मिळविली आणि ज्या प्रकारें समाजाचेंही नेतृत्व केलें तो इतिहास शिक्षकांना स्फूर्तिदायक वाटेल असा आहे.

इंग्लंडच्या शिशुशाळांचें सुरुवातीचें स्वरूप

१८०० च्या सुमाराला इंग्लंडमधें रॉबर्ट ओवेनच्या प्रयत्नानें शिशुशाळांचा चांगला प्रचार झाला होता. या शाळांत मुलांचें शारीरिक आरोग्य आणि सवयीकडे विशेष लक्ष देण्यांत येत होतें. चित्रें आणि प्रत्यक्ष वस्तूंच्या मदतीनें पाठ देण्यांत येत. स्वच्छता, व्यवस्था आणि आज्ञाधारकपणा यांची आवड मुलांना वाटावी म्हणून आग्रहानें प्रयत्न केला जात होता. ईश्वरासंबंधीं आपलें काय कर्तव्य आहे याची जाणीव मुलांना देण्यांत येत होती. पंधरा पंधरा मिनिटांचे वेळापत्रकांत समय योजले जात, त्यांत ठोकळ्यांचें बांधकाम, गाणें, खेळ, धावणें वगैरे कार्यक्रम होत. शाळेचें वातावरण प्रसन्न ठेवण्यांत येई. क्रीडांगणाच्या उपक्रमांना विशेष महत्व देण्यांत येई.

इंग्लंडमध्यें या प्रकारच्या शिशुशाळा फार लवकर लोकप्रिय झाल्या. कारण त्यामुळें कारखान्यांत काम करायला जाणाऱ्या मुलांच्या शिक्षणाचा काल वाढला. या शाळांत मुलांच्या लेखन वाचन-गणितादि विषयासंबंधी पूर्वतयारी चांगली होत असे. त्यामुळें १८७० मध्यें शिशुशाळांना इंग्लंडच्या सरकारी शिक्षण-योजनेंत कायमचें स्थान व मान्यता मिळवून देणारा कायदा करण्यांत आला. आतां इंग्लंडमध्यें प्राथमिक शाळांच्या बरोबरच शिशुशाळांची वाढ झालेली असून हें शिक्षण सक्तीचें झालें आहे. मानसशास्त्रीय शोधामुळें शिक्षणविषयक कल्पनांत जसजसे फरक पडत गेले त्याप्रमाणें शिशुशाळांच्या साधन-सामग्रीत, उद्देशांत आणि कार्यक्रमांत फरक पडत गेले आहेत.

इंग्लंडमधील 'नर्सरी स्कूल'

औद्योगिक युगामुळें स्त्रियांना मोठमोठ्या कारखान्यांत अधिकाधिक कामें मिळूं लागली, त्यामुळें शिशुशाळेंत प्रवेश न मिळणाऱ्या पांच वर्षांखालील मुलांची सोय कशा तऱ्हेनें करावी, हा प्रश्न विचारांत घ्यावा लागला. दुसऱ्या बाजूनें शिशुशाळांचा (Infant Schools) प्रचार जसजसा मागासलेल्या कामगार वर्गांत होऊं लागला, तसतसे शाळा संचालकांना पांच वर्षांखालील मुलांसाठी कांहीं सोय झाली तर शिशुशाळांचें कार्य अधिक यशस्वी रीतीनें करतां येईल असें वाटूं लागलें. लहान मुलांचें शिक्षण कुटुंबांतच व्हावें अशी जरी तत्कालीन मान्यता होती, तरी देखील कामगार माता-पित्यांकडून याबाबतच्या अपेक्षा सफल होत नव्हत्या. या मुलांच्या शिक्षणाचें महत्त्व त्यांना पटवून त्यांचेकडून हें शिक्षण घरांत करून घेण्याच्या प्रयत्नाबरोबरच दोन ते पांच वर्षांच्या बालकांसाठीं स्वतंत्र संस्था काढल्या पाहिजेत, निदान शिशुशाळांत पांच वर्षांखालील बालकांना प्रवेश देण्यांत यावा हा विचार पसरू लागला. फ्रान्समध्यें ओबर्लीनच्या शिशुशाळांत आणि स्वीत्झरलंड, जर्मनींतील किंडर गार्टनमध्यें लहान मुलांना घेण्यांत येऊं लागलें.

इंग्लंडमध्यें शिशुशाळा इतक्या लोकप्रिय झाल्या होत्या कीं १८७० मध्येंच त्यांना राज्याच्या शिक्षणयोजनेंत स्थान मिळालें होतें. १८७३ मध्यें सालफोर्ड येथील एका शिशुशाळेला स्नानघर आणि स्वयंपाक-घर जोडून किंडरगार्टन पद्धतीची पहिली नर्सरी शाळा सर विल्यम मॅथर यांनीं सुरू केली आणि नंतर या शाळांचा प्रचार प्रथम शहरांतील कामगार वस्तीत होऊं लागला.

नर्सरी स्कूल चळवळीचा जन्म

सन १८७३ पासून १९११ पर्यंत ज्या प्रकारच्या नर्सरी शाळा निघाल्या त्यांत लहान वयाच्या बालकांचा विशेष विचार झाला पाहिजे, ही कल्पना तितकीशी व्यवहारांत उतरली नव्हती. या प्रकारची स्पष्टता मार्गारेट सिस्टर्सनीं या शाळांना ज्या प्रकारचें स्वरूप दिलें त्यामुळें झाली म्हणून या शाळांचें इंग्लंडमधील नेतृत्व मार्गारेट भगिनींकडे जातें. त्यांच्या कार्याचा आढावा पुढील लेखांत घेऊं.

—नाम्ले

मार्गारेट मॅक्मिलन आणि नर्सरी स्कूलचा विकास

इंग्लंडमधील नर्सरी स्कूलच्या प्रणेत्या म्हणून मॅक्मिलन भगिनींचें नांव पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत सर्वश्रुत आहे. 'पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि गलिच्छ वस्तीच्या मुलांच्या शिक्षणासाठीं कार्य करणाऱ्या तळमळीच्या कार्यकर्त्यांना स्फूर्ति आणि उत्साह देण्याचें सामर्थ्य' या भगिनींच्या जीवन-चरित्रांत आहे यांत शंका नाहीं. यापूर्वीच्या प्रकरणांत सुचविल्याप्रमाणें दोन ते पांच या विशिष्ट वयाच्या बालकांच्या विकासाच्या गरजा ओळखून त्याप्रमाणें त्यांच्या शिक्षणसंस्थेला विशिष्ट प्रकारचें स्वरूप देण्यांत या भगिनीनीं विशेष सफलता मिळविली आहे. घरची गरीबी आणि शैक्षणिक लायकी अगदी सामान्य प्रकारची परंतु आपल्या कार्यासंबंधींची त्यांची असामान्य निष्ठा त्यांनीं दाखवल्यामुळें इंग्लंडच्या पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या इतिहासांत या भगिनींना विशेष स्थान मिळालेलें आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नाकडे कशा वळल्या ?

या भगिनींचे वडील मूळचे स्कॉच. तरुणपणींच ते अमेरिकेंत गेले व एका शेतीवाडीवर स्थाईक झाले. तेथेंच रॅचेल आणि मार्गारेट या मॅक्मिलन भगिनीचा जन्म झाला. यांपैकीं रॅचेल मार्गारेटपेक्षां एका वर्षानें मोठी. लहानपणींच वडील आणि एक धाकटी बहीण वारल्यानें त्यांची आई स्कॉटलॅंडमधील इनव्हर्नेस ह्या आपल्या माहेरच्या गांवीं भावाकडे मुलींना घेऊन परतली. परंतु कांहीं दिवसांनीं येथें त्यांच्या आईचे वडील व आई यांना देवाज्ञा झाली आणि ह्या दोनही मुली पूर्णपणें पोरक्या बनल्या. येथें त्यांचें माध्यमिक शिक्षण झालें, त्यावेळीं घरांत ७० वर्षांची आईची आई होती. तिची शुश्रूषा करणें रॅचेलकडे आलें व मार्गारेटला गव्हर्नेसच्या शिक्षणासाठीं जिनीव्हास पाठवण्यांत आलें. त्यावेळीं रॅचेल १८ वर्षांची होती. पुढील ११ वर्षें इनव्हर्नेस येथेंच राहून रॅचेलनें आजीच्या शुश्रूषेंत घालविलीं; या कालांत 'स्त्रियांच्या उद्धारासाठीं' आपण समर्पण करावें अशी तिला इच्छा झाली. कांहीं कारणानें एडिंबरोला गेली तेव्हां समाजवादी मंडळींची ओळख झाली. समाजवादावरील साहित्य तिनें वाचलें आणि शेवटीं दलितांच्या सेवेला स्वत:ला वाहून घेण्याचें ठरविलें.

कांहीं दिवसांनीं लंडनमधें रॅचेलला नोकरी मिळाली. युरोपांतील आपलें शिक्षण संपवून मार्गारेटही लंडनला आली. दोघी मिळून समाजवाद्यांच्या सभा-व्याख्यानांना जात. दर रविवारीं लंडनच्या गोदी भागांत समाजवादी तत्त्वज्ञानाचा प्रचार करीत. 'जस्टिस' आणि 'कॉमन विल' या समाजवादी पत्रांची त्या विक्री करीत, चौकाचौकांत व्याख्याने देत आणि लंडनमधील गलिच्छ वस्तींच्या प्रश्नाबद्दल वर्तमानपत्रांत खरमरीत लेख लिहीत असत. मार्गारेटनें कामकरी मुलांसाठीं एक संस्कार केंद्र पण सुरू केलें होतें. आपल्या समाजवादी मतामुळें मार्गारेटला चांगल्या कमाईच्या नोकरीवर पाणी सोडावें लागलें. समाजवादी कार्यकर्ती म्हणून तिची कीर्ति हळू हळू वाढूं लागली. ब्रॅडफोर्डच्या समाजवादी मंडळींनीं तिला ब्रॅडफोर्ड येथें येऊन कार्य करण्यास आग्रहाचें आमंत्रण दिलें मार्गारेटनें तें स्वीकारल्यावर रॅचेलनेंही आपली एका वसतिगृहांतील नोकरी सोडून आपल्या बहिणीबरोबर ब्रॅडफोर्डलाच कार्य करायचें ठरविलें. येथें ब्रॅडफोर्डला या दोनही भगिनींचा जम त्यांच्या सेवापरायण वृत्तीमुळें चांगलाच बसला. येथें कार्य करीत असतांनाच मजुरीसाठीं कारखान्यांत पिटाळल्या जाणाऱ्या गलिच्छ वस्तीच्या मुलांच्या प्रश्नावर त्यांनीं आपलें लक्ष केंद्रित केलें. ब्रॅडफोर्डच्या स्कूलबोर्डावर मार्गारेट निवडून आल्या. त्यांच्याच उपक्रमानें ब्रॅडफोर्डच्या स्कूलबोर्डानें प्राथमिक शाळेंतील मुलांची वैद्यकीय तपासणी करण्याची नवीन प्रथा सुरू केली. यांत बालकांच्या आरोग्याचा प्रश्न हातीं घेतल्याशिवाय त्यांचें शिक्षण करणें व्यर्थ आहे, याची त्यांना जाणीव झाली. राष्ट्र आरोग्यसंपन्न बनवायचें असेल तर शालेय मुलांची वैद्यकीय तपासणी सक्तीची आणि सार्वत्रिक झाली पाहिजे, या घोषणेचा त्यांनीं सर्व इंग्लंडमधें प्रचार केला.

१९०८ मधें त्यांनी अशा प्रकरच्या तपासणीसाठीं एक केन्द्र उघडले, परंतु या प्रयत्नाची तेथील अशिक्षित समाजाला किंमत न कळल्यानें १९१० सालीं लंडनच्या पूर्व भागांत डेटफर्ड येथें दुसरें केन्द्र सुरू केलें. हें केन्द्र खूप भरभराटलें आणि येथें काम करीत असतांनाच या भगिनीच्या मनांत अशी कल्पना आली कीं, केन्द्रानें रोगी मुलांना तपासून उपचार करीत बसण्यापेक्षां हे कित्येक रोग जडण्याच्या आधींच कांहीं प्रतिबंधक योजना कां करूं नये ? पांच वर्षें वयाला त्यावेळीं तेथील मुलांना प्रवेश मिळत होता. तेव्हां दोन वर्षापासूनच जर या मुलांसाठीं कांही करतां आलें तर त्यामुळें आरोग्याच्या प्रश्नाची पुढील यातायात करावी लागणार नाहीं, या विचारानें त्यांनीं १९११ मधें वर उल्लेखिलेली पहिली नर्सरी शाळा काढली. ही शाळा काढताना त्यांनी जॉन लॉकचें Sound mind in a sound body हें सूत्र आपल्यापुढें ठेवलें होतें. शारीरिक आरोग्यासाठीं एका बाजूनें या शाळेंत नर्सेस व डॉक्टर्स यांची सेवा आणि मनाच्या विकासासाठी किंडर गार्टन व मॉन्टेसोरी पद्धतींत जें कांहीं उत्तम आहे त्याचा समन्वय करून शिकविणाऱ्या-प्रशिक्षित शिक्षकांची-

सेवा या शाळांना मिळवून देण्याची त्यांनीं योजना आंखली होती. आरोग्याच्या दृष्टीनें बालकाला सकस अन्न, मोकळी हवा, स्वच्छतेच्या सवयी आणि प्रसन्न वातावरण ह्या गोष्टी सर्वप्रथम मिळाल्या पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष होता.

खुल्या हवेच्या (Open Air) नर्सरी शाळा

मुलांना सर्वांत जास्त जरूरी स्वच्छ, मोकळी हवा आणि सूर्यप्रकाश यांचीच असल्यानें त्या डेट्फर्डची शाळा बहुतेक पडवींतच भरवीत. आराम, झोप ही देखील शक्य तों खुल्या हवेंतच घेण्याचा त्यांना आग्रह असे. एक ते सात या वयांत बालकांच्या प्रवृत्तीला खुली जागा ही अन्न आणि हवे-सारखीच एक आवश्यक बाब असल्यानें मार्गारेटच्या शाळा शक्य तों उघड्यावर भरत. शाळेला जोडून बाग असावी या गोष्टीला त्यांनीं फार महत्व दिलें होते. बागेंत वृक्ष, फुलझाडें लॉन्स, भाजीपाल्याची वाडी असलीं पाहिजेत. जेव्हां हवामान अनुकूल असेल तेव्हां मुलांना खुल्या हवेंत बागेंतील कामें मिळालीं पाहिजेत. मार्गारेटनी पूर्वप्राथमिक शाळांच्या इमार-तीला खुले आसरे Open shelters म्हटले आहे व वर्ग Class-room हा शब्द टाकला आहे. याचें कारण ह्या नर्सरी शाळा शक्य तेव्हां खुल्या हवेंतच भरविल्या जाव्या व अगदींच नाइलाज झाल्यास शाळेचीं कामें आसन्यांत करावीं अशी त्यांची कल्पना होती.

या शाळेंत मुलें सकाळीं ८ वाजतां येत आणि संध्याकाळीं पांच-साडेपांचच्या सुमारास तीं घरीं जात. शाळेंत तीन वेळां खाणें दिलें जात असे आणि मधल्या वेळांतील विश्रांतीला (वामकुक्षी) फार महत्व देण्यांत येत असे.

साधनसामग्री

शाळेच्या आंत प्रवेश केल्यानंतर त्यांत वर्गाची रेषाबद्ध रचना नसे. लहान लहान खुर्च्या, टेबलें मुलांना सोयीस्कर वाटतील अशा प्रकारें विखुरलेलीं दिसत. झोपण्यासाठीं स्ट्रेचर्स-सारखी व्यवस्था असें. त्यामुळें उघड्यावर न्यायचीं झालीं तर तीं नेतां येत आणि काम संपलें म्हणजे तीं आसन्यांत एकावर एक रचतां येत. आसन्याच्या आंतील वातावरण घरासारखें प्रसन्न ठेवण्यांत येत असे. शिक्षिकांच्यासाठीं देखील कमी उंचीच्या खुर्च्या असत. भिंतीवर चित्रें, विविधरंगी फुलें, सुगम संगीत यामुळें शाळेंत स्नेहाळ वातावरण निर्माण केलें जाई.

शैक्षणिक साधनसामग्रींत किंडर गार्टनमधील गाणीं, गोष्टी, खेळ, हस्तव्यवसाय, मातीकाम, बांधकामाचे ठोकळे, सामुदायिक पाठ यांस लागणारें साहित्य असे.

१९१२ नंतर मॉन्टेसोरी शिक्षणपद्धतीच्या विचाराचा इंग्लंडमध्यें बराच प्रचार झाल्यानें या पद्धतींतील इंद्रिय-शिक्षणाचीं साधनें, जीवन-व्यवहार, व्यक्तिगत कामाचें तंत्र याही गोष्टींना आपल्या नर्सरी शाळेंत मार्गारेटनें स्थान दिलें होतें. यावरून मॅक्मिलन भगिनींच्या शिक्षणविषयक विचारांत बालकांच्या आरोग्याचाच विचार प्रथम होता असें दिसेल. शिक्षणा बाबतच्या संस्कारासंबंधीं कोणताच आग्रह नसून बालकांच्या सर्वांगी विकासाला जें जें म्हणून पथ्यकर दिसेल तें घेण्याकडे आणि शालेय वातावरण प्रसन्न ठेवून बालकांच्या भावनात्मक विकासावर भर देण्याचें धोरण होतें.

१९१४ मध्यें सुरुवातीच्या खुल्या नर्सरी शाळेला स्वतःची इमारत मिळाली. लगेच या शाळेंत मिळालेल्या अनुभवाच्या आधारें बालअध्यापन मंदिर सुरू करण्याचा निश्चय झाला. परंतु लगेच महायुद्धाच्या ज्वाला भडकल्या. त्यांत ब्रॅड-फोर्डवर बॉबवर्षाव होऊं लागला. त्यावेळीं गांवांतील लोकांची पळापळ झाली, पण या भगिनींनी आपलें कार्य शेवटचें मूल असें तोपावेतों चालू ठेवलें. शाळेंतून नोकरवर्ग पळून गेलेला, आर्थिक मदत ओसरलेली, अशा परिस्थितींत अत्यंत धैर्यानें त्यांनीं शाळेचें कार्य चालू ठेविलें. १९१६ सालीं रॅचेलनें आपला देह ठेवला. मार्गारेटनें हें कार्य अशाही स्थितींत चालू ठेविलें. युद्ध संपल्यानंतर या संस्थेला पुनः प्रकाशाचे दिवस प्राप्त झाले. १९३० सालीं रॅचेलच्या स्मरणार्थ बाल अध्यापन मंदिराची स्थापना झाली. या संस्थेच्या स्थापनेसाठीं मार्गारेटनें जे भगीरथ प्रयत्न केले, त्याची तुलनासुद्धां श्रीमती ताराबाई मोडक यांनीं विकासवाडी योजनेसाठीं चालविलेल्या प्रयत्ना-सारखीच वाटते. शेवटीं मार्गारेटच्या कार्याला राजमान्यता मिळाली. त्यांना सी. बी. ई. व-सी. एच. ह्या पदव्या देऊन इंग्लंडच्या राणीनें गौरव केला. आपल्या या जीवनकार्याची सार्थकता अनुभवीत असतां १९३१ सालीं मार्गारेट खिस्तवासी झाल्या.

—नाम्ले

शुभ प्रसंगाच्या वेळीं मुखमाधुरीसाठीं वापरा
दिलरंजन सुवासिक सुपारी
सुमधुर, शेंकडों लोकांना आनंदित करणारी—
—: सर्वत्र विकली जाते :—
आपल्या गांवांत एजन्सीसाठीं लिहा :—
मालक: आर. के. सुपारीवाला
शांती भुवन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.
शाखा : पोस्ट ऑफिसच्या बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४
चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ, ग्रॅट रोड, मुंबई ७

नू. बा. शि. संघ समाचार

अहमदाबाद:—रविवार ता. १९-१०-५८ रोजीं गुजरात बाल-अध्यापन मंदिरांत सकाळीं ९ वाजतां संघाच्या व्यवस्थापक मंडळाची सभा श्री. जाधवजीभाई मोदी यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. यांत सभेच्या नियोजित कामकाजाव्यतिरिक्त, विशेष म्हणजे गुजराती 'शिक्षण-पत्रिका' भावनगर येथें छापण्यास मंजुरी देण्यांत आली. भावनगर येथें छापण्याचा खर्च कमी आल्यास 'शिक्षण-पत्रिके'ला येणारी खोट कांहीं अंशाने कमी होईल अशी अपेक्षा आहे.

त्याच दिवशीं दुपारीं ३॥ वाजतां सामान्य सभा 'अखंड आनंद' छापखान्याच्या हॉलमध्यें भरली. अध्यक्षस्थानी श्री. जाधवजीभाई मोदी होते. मागील सभेचा अहवाल पास झाल्यानंतर सभेपुढें ५७-५८ सालचा तपासलेला हिशेब व वार्षिक अहवाल सादर करण्यांत आला व तो सर्वानुमतें पास झाला. त्यानंतर संघाच्या घटनेंत सुचविलेल्या सुधारणासंबंधीचा ठराव श्री. माणेकलाल ठाकर यांनी मांडला. त्याला श्री. प्रभुभाई उपाध्याय यांनी अनुमोदन दिलें. थोड्या फेरफारासहित हा ठराव सर्वानुमतें पास झाला. यामुळें संघाच्या विश्वस्त मंडळाच्या सर्व सभासदांना नियंत्रण मंडळांत स्थान मिळालें व तीन सभासद व्यवस्थापक मंडळांत घेण्याचें ठरलें. अशा रीतीने संघाच्या विश्वस्त मंडळाच्यां दैनंदिन कामांत सक्रीय सहकार लाभण्याची व्यवस्था निर्माण झाली.

आतापर्यंत संघाच्या उपप्रमुखांच्या दोन जागा होत्या, त्याऐवजीं आता तीन जागा करून त्यांतील एकजणाने कार्याध्यक्षाचें काम पहावें असें ठरलें.

विश्वस्त मंडळाचे हिशेब व्यवस्थापक मंडळाने दाखल करून घेऊन संघाच्या वार्षिक हिशेबाबरोबर छापण्याचें ठरलें.

संघाचे मंत्री व 'शिक्षण पत्रिके'चे संपादक श्री. शेष नामले इन्डो-सोव्हिएत कल्चरल् सोसायटीतर्फे रशियाला जाणार म्हणून त्यांचें हार्दिक अभिनंदन करून त्यांचा प्रवास सुखाचा होवो असा ठराव पास झाला.

स्व. गिजुभाई बधेका यांची जयंति ता. १५-११-५८ रोजीं साजरी करावी व डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत गिजुभाई सप्ताह ठेवून निधी गोळा करावा असें अध्यक्ष श्री. जाधवजीभाई मोदी यांनीं सुचविलें व तें मान्य झालें.

शेवटीं डॉ. नानुभाई देसाई, श्री. जसुबेन भट व श्री. प्रभुभाई उपाध्याय यांचीं आभारदर्शक भाषणें होऊन सभेचें कामकाज संपविण्यांत आलें.

विलेपार्ले गोकळीबाई बालमंदिर : ता. ९-१०-५८ रोजीं दुपारीं ३॥ वाजतां श्री. प्रभुभाई उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालीं मातांची सभा झाली. त्यांत 'मातांचा बाल-मंदिराला सहकार' या विषयावर प्रवचन झालें. उपस्थित मातांनीं यांत उत्साहानें भाग घेऊन अनेक प्रश्न विचारले व त्यांचीं उत्तरें देण्यांत आलीं. शेवटीं श्री. मधुरीबेन त्रिवेदी यांनीं सर्वांचें आभार मानले.

शिशुविहार, दादर : ता. ११-१०-५८ ला शनिवारी संध्यांकाळीं ७ वाजतां मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे डेप्युटी कमिशनर श्री. एस. एम्. वाय. शास्त्री यांच्या अध्यक्षतेखालीं मराठी पालकांसाठीं व दुसरे दिवशीं रविवारीं लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी यांच्या अध्यक्षतेखालीं गुजराती पालकांसाठीं समारंभ होऊन संस्थेचा २२ वा वार्षिक समारंभ थाटाने साजरा झाला.

विकासवाडी, कोलवाड : विकासवाडी योजनेच्या मदतीसाठीं लिबर्टी थिएटरमध्यें ता. १७-१०-५८ रोजीं 'मौसी' चित्रपट ठेवण्यांत आला होता. त्यावेळीं मुंबई राज्याचे मुख्य प्रधान ना. यशवंतराव चव्हाण ह्यांनीं अध्यक्षस्थान

होमिओपाथी

पश्चिम भारतांतील उच्च प्रतीचीं व खात्रीचीं चोख होमिओपाथीचीं तसेंच बायोकेमिक औषधें, ग्लोब्स, बाटल्या, बुचें आणि इतर साहित्य, अमेरिकन, इंग्लिश व भारतीय वाङ्मयसुद्धां मिळतें. सूचिपत्र फुकट पाठविलें जातें.

बायो - टोना

लहान मुलांना वरदान

मुलें गुटगुटीत व सशक्त होण्यासाठीं अगदीं पाळण्यापासून उपयोगी पडणारें औषध.

रॉय ॲन्ड कंपनी

प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २

लॅक्स-ओ-लॅक्स जुलाबावर सर्वोत्तम औषध


स्वीकारलें होतें. योजनेकरता आर्थिक साह्य मिळविण्यासाठीं नेमलेल्या समितीचे अध्यक्ष पालनपूरचे नबाब यांनीं आपल्या भाषणांत समितीला चाळीस हजारांची रक्कम मिळवितां आली असें जाहीर केलें.

श्री. नामले यांचें रशियास प्रयाण : इन्डो–सोव्हिएत कल्चरल सोसायटीतर्फे तीनजणांच्या प्रतिनिधिमंडळापैकी एक म्हणून श्री. नामले ता. २०–१०–५८ रोजी रशियास जाण्यासाठीं मुंबईहून दिल्लीला रवाना होऊन तेथून त्यांनीं रशियास प्रयाण केलें. निरनिराळ्या शास्त्रीय शोधांत आज रशियानें बरीच आघाडी मारली आहे. तेथील रहिवाशाच्या जीवनांत त्यामुळें विशेष परिवर्तन घडून येत आहे. म्हणून रशियाबद्दल सर्वांनाच कुतुहल आहे. श्री नामले रशियातील प्रगतिक शिक्षणसंस्था पाहून येतील व त्याचा फायदा आपल्या देशाच्या पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या चळवळीला व विशेष म्हणजे नू. बा. शि. संघाच्या कामाला मिळेल अशी अपेक्षा आहे.

अनुभवाचे बोल

कुंदकळ्या या तुमच्या कैशा काळ्या कीं पिवळ्या
अथवा किडक्या कीं, आहेतची नकली त्या कवळ्या।
कशाहि असल्या कांहींहि असल्या लावाच 'वज्रदंती'
उजळुनी निघतील मोत्यावाणी दातांच्या पंक्ती।
तोंड उघडतां बोलायाला दुर्गंधीहि सुटते का?
दुसरें माणुस तोंड फिरवत ठाऊक तुम्हां आहे का?
'वज्रदंती'ला ह्या राबवून अन् बघाच गंमत कशी होते
जवळ जाऊनी कितीहि बोला दुसरें मुख ते ना फिरते।
परिस लागतां लोखंडाला सौवर्णाचें तेज चढे
'वज्रदंती'चा पीरस लागतां दातांनाहि तेज चढे।
चम् चम् चम् चम् चमकतील ते हिरेच ऐशी भूल पडे
उगाच कांहीं सांगत नाही अनुभवाचे बोल खडे!





बालगीतांच्या पुस्तकांस बक्षिसें

बालमंदिरात गाण्यास योग्य अशा मराठी भाषेंतील बालगीतांच्या प्रकाशित व हस्तलिखित पुस्तकांचें परीक्षण करून त्यांत उत्तम ठरणाऱ्या पहिल्या तीन पुस्तकांना अनुक्रमें रु. ७५, ५० व २५ चीं बक्षिसें देण्याचें पूर्वप्राथमिक प्रकाशनातर्फे योजलें आहे. बालशिक्षणाच्या क्षेत्रांत अनेक वर्षें तपश्चर्या करून स्वतः निरनिराळा अनुभव मिळविलेल्या तीन व्यक्तींची एक समिति पुस्तक परीक्षणासाठीं नेमली जाईल व त्यांचा निकाल अखेरचा मानला जाईल. तरी बालगीतांवर ज्यांनीं आपलीं पुस्तकें प्रसिद्ध केलेलीं आहेत किंवा ज्यांना हस्तलिखित सादर करावयाचें आहे, त्यांनीं आपल्या पुस्तकाच्या प्रत्येकी तीन प्रति पाठवाव्यात. हस्तलिखित पुस्तकांत कमींत कमी २० गीताचा संग्रह असावयास हवा. या चढाओढींत भाग घेणाऱ्यांना प्रवेश–फी एक रुपया आहे. प्रवेश–फी पुस्तकाबरोबर म. ऑ. ने पाठवावी. पत्रव्यवहाराचा पत्ता : पूर्वप्राथमिक प्रकाशन, C/o सौ. सरलाताई देवघर, ११८ हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

दंत शास्त्रांत अजब शोध


किडके दांत व सडक्या हिरड्यांनीं मनुष्याची पचन क्रिया बिघडते. ती बिघडूं नये म्हणून १८ वनस्पतीयुक्त शास्त्रीय रीतीनें फॉर्म्युला देऊन बनविलेली 'विको वज्रदंती' रोज नियमानें सकाळ संध्याकाळ वापरल्यानें दांत स्वच्छ व मजबूत होतात. हिरड्या घट्ट व गुलाबी बनतात. अन्नपचून चेहरा आनंदी दिसतो. थोडक्यांत म्हणजे दंत रोग सर्व बरे होतात. खात्रीसाठीं आजच **वज्रदंती** खरेदून वापरण्यास सुखात करा ८ दिवसांत जादू केल्या प्रमाणें तुम्हाला फरक दिसेल.

सर्व स्टोअर्स मध्यें मिळते.



विको वज्रदंती

पेस्ट अगर पावडर आवडी प्रमाणें वापरा.



ही दिवाळी व नूतन वर्ष
आपणांस आनंदाचें
व सुखसमृद्धीचें जावो !

plato
प्लेटो म्हात्रे प्रॉडक्ट
म्हात्रे पेन ॲन्ड प्लास्टिक इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड
व्यापारविषयक सर्व चौकशीसाठी :
बेस्ट फाउंटन पेन डेपो,
७९, देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २.

PLATO
REGD

shilpi-186

मुद्रक व प्रकाशकः—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर—मुंबई १४.
मुद्रणस्थानः—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ वें : अंक ९ वा

डिसेंबर १९५८



खरें शिक्षण

सध्याच्या शिक्षणानें शिकलेल्यांत आणि बिनशिकलेल्यांत डोंगराएवढी मोठी भिंत उभारली आहे. या शिक्षणानें श्रमाचा गौरव नाहींसा केला. श्रमांतून वाचवण्यासाठीं आपल्या मुलांना शिकायला पाठवलें पाहिजे अशी वृत्ति खेड्यांतील लोकांची बनली आहे. कमींत कमी काम करावें व जास्तींत जास्त पगार मागावा अशी वृत्ती या शिक्षणानें उत्पन्न झाली आहे. हें देशाला घातक ठरेल.

जीवनाचीं खरीं मूल्यें ज्यामुळें कळतात आणि मनुष्याच्या जीवनविकासाला ज्यामुळें मदत होते ती विद्याच खरी विद्या आहे, तेंच खरें शिक्षण आहे.

(आलियाबाडा येथील प्रवचनाच्या आधारें)

—विनोबाजी


: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक

संपादक

श्री. शेष नामले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई–१४.	३७ नये पैसे



तुम्ही कोठेत्रून आलेले आहात?

आफ्रिका, इन्डोनेशिया, इराण, इजिप्त,
इंग्लंड आणि अमेरिका येथे सुद्धां.

जगाच्या गोलार्धांतील बहुतेक सर्व राष्ट्रांत लोक विकले जातात
आणि दिपसेंदिवस मागणी वाढतच आहे.


केसांना नैसर्गिकरीत्या
काळे आणि कायमचे जगभर
मान्यता पावलेले.

MPS-IND.


मेड एजन्ट्स: एम्. एम्. त्रंबकलालजी, अहमदाबाद १.
प्रिन्टर्स: डी. नरोतम ॲण्ड कं., बॉम्बे-२. फो. ३०७७५




सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी



— सोल एजन्ट्स —
ए. व्ही. आर. ए. ॲन्ड कं., बॉम्बे २






— सोल एजन्ट्स —
पेस्टोनजी इराचीयल सलीसिटर्स
(एस्टोजी (इन्डिया) प्रायव्हेट लि.)



"मिस झुलेखा सेटवर येण्याचें नाकारते.
ती म्हणते कीं टिनोपाल नें सफेद
केलेली साडी नेसलेल्या त्या "एक्स्ट्रा" पुढें
ती फिक्की पडेल अशी तिला भीति वाटते."



"टिनोपाल" हा जे. आर. गायगी, एस ए, बाल, स्वित्झरलंट यांचा रजिस्टर्ड ट्रेड मार्क आहे.

कारखानदार: सुहृद गायगी प्रायव्हेट लिमिटेड, वाडी वाडी, वडोदा

एकमेव वितरक: सुहृद गायगी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पो. ऑ. बॉक्स ९६५, मुंबई

थोड्याशा टिनोपालनें सफेद कपडे स्वच्छ आणि चमकदार बनतील हें सुद्धा लक्षांत

SISTA S SG 43 MAR

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई
उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक
कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी
कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे
चिटणीस : श्री. शेष नामले
उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण संस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपांत पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गांतून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठीं संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, **नूतन बाल-शिक्षण संघ,**
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे
श्री. अनुताई वाघ
सौ. सरलाताई देवधर
श्री. भा. घों. कर्वे
सौ. मालिनीबाई परांजपे

अनुक्रमणिका

प्रौढ विभाग

संपादकीय— शेष नामले

पालकांचा विशेष विभाग

चौकस राजू — निर्मला देशपांडे
सांस्कृतिक भांडवल-संस्कार धन — मूळशंकर भट्ट

शिक्षक व शिक्षण विभाग

माझी रशियाची यात्रा-लेखांक १ — शे. ना. नामले
बालमंदिरांतील बालगीतें — स. आ. केळकर
बालकांची प्रगति-नोंद — शेष नामले
क्षोभ-प्रक्षोभ व प्रेमसगाई — ओजस्
शिवाय बालशिक्षण व संघ समाचार वगैरे

बाल विभाग

कावळ्याचा चष्मा — मुंबई आकाशवाणीच्या सौजन्यानें
डिंग डांग टिंग टांग — राम उगावकर
गप्पा — सौ. मालती जोशी
मनी मावशी — परशुराम मर्ढेकर
सकाळ — शरद गो. साटम
पावसांतील गंमत — राम उगावकर

महत्वाच्या सूचना :

ग्राहकांस—

१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.
'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन-विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल-शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नांवावर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारां-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नांवाचें एक सदर चाल-विण्यांत येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्यांना स्थान देण्यांत येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यांनीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे-पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

लेखकांस—

१) 'शिक्षण-पत्रिकें'त लेख लिहूं इच्छिणारांनीं आपलें लेखन कागदाच्या एकाच बाजूवर करावें. ते दर महिन्याच्या ता. १ च्या आंत संपादन कार्यालयाकडे पाठवावें. पसंत नसलेल्या लेखांबरोबर पुरेसें पोस्टेज असल्यास लेख परत करण्यांत येतील.

२) 'शिक्षण-पत्रिका' कोणत्याहि महिन्यापासून सुरू करतां येते.

३) 'शिक्षण-पत्रिका' प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस पोस्टांत पडते. सामान्यतः ता. २५ पर्यंत ती सर्वांना मिळते. तशी न मिळाल्यास ग्राहकांनीं ता. ३० च्या आंत खालीं दिलेल्या पत्त्यावर कळवावें.

४) 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रत्येक ग्राहकाचा नंबर पत्रिकेच्या वेष्टनावर लिहिलेला असतो. व्यवस्थापक-कार्यालयाशीं पत्रव्यवहार कर-तांना हा नंबर ग्राहकानें अवश्य कळवावा.

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका'
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ९] मुंबई [डिसेंबर १९५८

संपादकीय

संघाला कार्यक्षम बनवा

नूतन बालशिक्षण संघ ही बालशिक्षणाच्या एकमेव चळवळीला वाहिलेली एक लोकसंस्था आहे. बालशिक्षणाच्या प्रश्नांचा अभ्यास करणें, अभ्यासाच्या आधारानें आपल्या येथील बालशिक्षणाला योग्य स्वरूप देणें, अशा शास्त्रशुद्धयोग्य बालशिक्षणाचा बालकल्याणाच्या दृष्टीनें प्रचार करणें हा संघाच्या चळवळीचा उद्देश आहे.

हा उद्देश सफल करण्यासाठीं गेलीं ३३ वर्षें संघ आपल्या शक्तीप्रमाणें हें कार्य करीत आला आहे. आज कोसबाड येथें संघाचें स्वतःचें आदिवासी बालकांसाठीं चालविलेलें शिक्षण-केन्द्र आहे. या केन्द्रांत आदिवासी बालकाच्या शिक्षणासंबंधीचे त्याचप्रमाणें बालशिक्षणाच्या प्रशिक्षणासंबंधी प्रयोग चालविले आहेत. या केन्द्रातर्फे चालणाऱ्या विकासवाडी योजनेला संघाच्या संस्थापक श्रीमती ताराबाई मोडक यांच्या अविश्रान्त प्रयत्नानें भारत सरकारची मदत लाभली आहे. मुंबई राज्याचीही मदत या प्रयोगास होत आहे.

आदिवासी शिक्षण केन्द्राशिवाय गेलीं कित्येक वर्षें संघ पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांची आणि प्रशिक्षण संस्थांची संघटना करण्याचें, त्यांना मार्गदर्शन करण्याचें कार्य करीत आहे. त्यासाठीं पूर्वप्राथमिक संस्थांना भेट देणे, त्यांचें कार्य पाहून योग्य त्या सूचना करणें, पूर्वप्राथमिक शिक्षकांसाठीं शिबिरें, संमेलनें व परिषदा भरविणें, त्याचप्रमाणें प्रशिक्षण संस्थांच्या (बाल अध्यापन संस्था) अध्यापकांचीं संमेलनें भरविणें, त्यांत शिक्षणाच्या अभ्यासक्रमासंबंधींच्या प्रश्नावर चर्चा करणें वगैरे कार्य मधून मधून करण्यांत येतें.

संघाच्या बाल-शिक्षणविषयक विचारांचा प्रचार बालकांच्या पालक वर्गांत व शिक्षकवर्गांत करण्यासाठीं संघातर्फे गुजराती आणि मराठी भाषेंत 'शिक्षण-पत्रिका' चालविण्यांत येतात.

संघानें हें सर्व कार्य चालविलें आहे तरी संघाची संघटना सध्या ज्या रीतीनें कार्य करीत आहे, त्या गतीनेंच तें चालू राहिल्यास संघाविषयीं जी भावना आज लोकांत आहे ती नाहींशी होईल असें वाटतें. संघाविषयीं लोकांच्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत. शिक्षण संस्था आणि बालशिक्षकांस संघानें अनेक गोष्टी केल्या पाहिजेत असें वाटतें. संघानें बालशिक्षणासंबंधीचें उत्तम पुस्तकालय चालवलें पाहिजे. या पुस्तकालयाबरोबर बालशिक्षण साहित्याचें एक अद्यावत् संग्रहालय संघानें चालविलें पाहिजे. अशा संस्थेतर्फे प्रत्येक बालशिक्षण संस्थेला बालसाहित्य, बाल-शिक्षण साहित्य, बालशिक्षण साधनांचें मार्गदर्शन मिळण्याची सोय झाली पाहिजे. अशा संस्थेत बालशिक्षणाचा विशेष अभ्यास करूं इच्छिणाऱ्या शिक्षकांना पुस्तकें मिळण्याची व अभ्यासांत मार्गदर्शनाची सोय झाली पाहिजे. या संस्थांबरोबर संघानें बालशिक्षणविषयक मार्गदर्शक साहित्याचें प्रकाशन केलें पाहिजे.

बालमानसशास्त्रावर अद्ययावत् पुस्तकें नाहींत, बालशिक्षण शास्त्रावर पुस्तकें नाहींत. बाल अध्यापन मंदिराच्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारीं, बाल-शिक्षकाचें ज्ञान व्यापक बनवणारीं, पालकांना बालकांच्या रोजच्या प्रश्नांत मार्गदर्शन करणारीं पुस्तकें संघानें स्वतः प्रकाशित केलीं पाहिजेत असें कित्येक कार्यकर्त्यांना वाटतें, नव्हें, बालशिक्षणाविषयक मार्गदर्शक साहित्याची गरज अखिल भारतीय बनली आहे. अशा अधिकृत साहित्यऐवजीं या क्षेत्रांतील रसिक मंडळींना अंधारांत चाचपडत रहावें लागत आहे.

बालसाहित्याबाबतही असाच सर्वत्र टाहो ऐकूं येतो. बालसाहित्य म्हणून दाखवतां येण्यासारखीं, प्रकाशनांत बालकांच्या दृष्टीनें विचार केलेलीं, उत्तम बाल्यभोग्य चित्रांनीं सजवलेलीं, मोहरेदार छपाईमुळें डोळ्यांत भरणारीं पुस्तकें अजूनही प्रकाशित होत नाहींत असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. अशा पुस्तकांचें प्रकाशन प्रकाशकाला परवडत नाहीं असें सांगण्यांत येतें म्हणून नू. बा. शि. संघासारख्या संस्थांनीं असें काम घेऊन अशा साहित्याचा प्रचार करून लोकांचें चागल्या साहित्याला उत्तेजन मिळेल असें केलें पाहिजे.

केन्द्रीय समाज कल्याण आणि इतर संस्थांच्याकडून अनेक संस्थांना अनुदानें मिळतात, परंतु या अनुदानाचा उपयोग कसा करावा यासंबंधीचें लोकांना मार्गदर्शन नाहीं. मार्गदर्शन मिळालें तर बाजारांतून योग्य पुस्तकें, योग्य साधनें निवडणें हें भगीरथ कार्य एका सामान्य संस्थेच्या मगदुराबाहेरील काम होऊन बसलें आहे. बाजारांतून काय घ्यावें, कोठून घ्यावें यासंबंधीं मार्गदर्शन नसल्यानें अनुदानाच्या रकमा संपवण्यासाठीं संस्था बाजारांत दिसतील त्या वस्तु, व्यापारी मागेल तो भाव देऊन उचलतात. अशा वस्तूसाठीं वाटेल तो भाव द्यावा लागूनहि पुनः संस्थेंत या वस्तूंचा प्रत्यक्ष कांहीं उपयोग होत नाहीं आणि संस्थेची रडकथा चालूच राहते असा सर्वत्र अनुभव येत आहे. राष्ट्रीय पैशाचा हा अपव्यय आपलें कल्याण-कार्य अधिक योजनाबद्ध झाल्याशिवाय बंद होणार नाहीं. संघा-सारख्या संस्थेला या दिशेनें पुष्कळ करतां येण्यासारखें आहे, नव्हे, अशावेळीं संघानें आपल्या योजना घडवून नवीन कार्य अंगिकारलें पाहिजे. त्यासाठीं लोकांकडून व सरकाराकडून मदत मिळविली पाहिजे.

संघाजवळ हें कार्य करण्याबाबतचा अनुभव आहे, कार्य-कर्तेहि आहेत. परंतु हें कार्य करण्यास लागणारें द्रव्यबळ नाहीं. दरवर्षी संघ यासाठीं निरनिराळ्या बालशिक्षण संस्थांच्या द्वारें बालशिक्षण जयंति-निधि मिळवण्याचा प्रयत्न करतो. परंतु या प्रयत्नाला चांगलें धवघवीत यश अजून येत नाहीं.

बालशिक्षणाच्या संस्थांस, कार्यकर्त्यांस आणि पालकांस—

संघ आपणा सर्वांचा आहे. आपण सर्व संघासाठीं जेवढी तळमळ बाळगाल तितकेंच संघाचें कार्य पुढें जाईल. आपण स्वतः याबाबत आपला सक्रीय सहकार न देतां स्वस्थ बसून संघानें 'हें केलें पाहिजे' 'तें केलें पाहिजे' असें म्हणाल तर संघ कांहीं करूं शकणार नाहीं. संघासंबंधीं आपल्या अपेक्षा आहेत ना, मग त्याला कार्यक्षम बनवा. कार्यक्षम बनविण्या-साठीं संघाला आर्थिक साह्य मिळणें अनिवार्य आहे. बाल-शिक्षणाच्या कार्याला लाखों रुपयांची गरज आहे. द्रव्यबळ मिळाल्याशिवाय नुसत्या कल्पनांवर आणि अपेक्षांवर संघाकडून कार्य होणार नाहीं. आपण पुढाकार घेऊन संघाला आर्थिक साह्य स्वतः केलें पाहिजे, लोकांकाडून मिळवून दिलें पाहिजे. संघाला आपल्या समर्पणाची गरज आहे. आपल्या मदतीची गरज आहे. आपण संघाला द्याल तर संघ आपल्याला कांहीं देऊं शकेल. आपल्या बालशिक्षणाची पातळी वर न्यावयाची असेल तर संघाला आपण कार्यक्षम बनवा.

बाळाची सुकुमार त्वचा...



निर्मळ आणि निरोगी राखणें आतां सोपें आहे दिवसभर, अंघोळ करण्यावर, किंवा केव्हांही गोर मातानां, बाळाच्या नाजूक त्वचेवर उटी नर्सरी पावडरचा एक हात फिरविताच की त्याला अत्यंत उत्साहित वाटेल आणि त्याची त्वचा अत्यंत निर्मळ राहील.

ही खास बाळासाठी बनविली असून किटाणूंतील जंतुघ्न (Antiseptic) द्रव्यें त्याच्या त्वचेचें कंड व त्रासदायक दाह या पासून रक्षित रक्षण करतील

हजारो कुटुंबांत आणि कित्येक बालकाल्यांत नित्य वापरतात

श्री निर्मल केमिकल वर्क्स

शुभ प्रसंगाच्या वेळीं सुखमाधुरीसाठीं वापरा

दिलरंजन सुवासिक सुपारी

सुमधुर, शेंकडों लोकांना आनंदित करणारी—

—: सर्वत्र विकली जाते :—

आपल्या गांवांत एजन्सीसाठीं लिहा :—

मालक: आर. के. सुपारीवाला

शांती भुवन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.

शाखा : पोस्ट ऑफिसच्या बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४

चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ, ग्रँट रोड, मुंबई ७

फॅन्सी नायलॉन साडी, नायलॉन जेकार्ड, दोरिया,

क्रेप, जॉर्जेट, टॉफेटा, सॅटीन, फ्लावर वगैरे

निरनिराळ्या रंगांत, तसेंच आकर्षक डिझाइन्समध्यें छापलेले मिळतात


: टेलिग्राम :

'BIPFABRIC'

: टेलिफोन :

मिल : ६०५०४

शॉप : ३९७४९



क्लॉथ शॉप

गोविंद गल्ली,

मूळजी जेठा मार्केट,

मुंबई २

BIPSU FABRICS

: रीटेल शॉप :

बिपीन सिल्क मिल्स कं. प्रायव्हेट लि.,

१२ दादर रोड, मुंबई २८

(इंडिया)

A (ROHIT) GROUP OF ENTERPRISES

चौकस राजू

एक छोटा राजू
रहातो आमच्या शेजारीं.
नाहीं रडका; नाही हट्टी
पण चौकस भारी.
आई म्हणते " तुझ्या चौकशांनीं
मी झालें बेजार.
जा बाहेर खेळायला
नाहीतर खाशिल मार. "
वडील म्हणतात " नकोरे बाबा
पिकवूस डोकं !
ऑफिसच्या कामानं माझं झालंय
खोकं
स्वस्थ पड्डून वाचूं दे कांहीं
वाचनाची तर तुला गोडी नाहीं
पुस्तकं वाचावींत छानछान
वाढतं आपलं सामान्य ज्ञान. "
ताई म्हणते " राजुटल्या
नको प्रश्न विचारुंस उठल्या सुटल्या
तो बघ आला शेजारचा चंदू
खेळायला बोलावते विटीदांडू. "
हिरमुसला राजू माझ्या घरी येतो
प्रश्नांचं गाठोडं ठेवून जातो.
गाठोडं उघडून बघावं तर
प्रश्न पडतात बाहेर भराभर
टुणटुण करीत मजकडे येतात
' आधीं मला सोडवा ' म्हणून हट्ट घेतात—
हें कां ? तें कां ? मग कां ? आता कां ?
कां आहे ? कां नाही ?
हजारों आणखीही.

आकाश निळें कां ? चाफ्याचें फूल पिवळें कां ?
तारे चमकतात कां ?
वारे वहातात कां ?
शहाळ्यांत पाणी कां ?
ताकावर लोणी कां ?
पक्ष्यांना पंख कां ?
मधमाशांना डंख कां ?
गुलाबाला कांटे कां ?
हरणाचे डोळे मोठे कां ?
मनी मांजर गोरी कां ?
दुधाची करते चोरी कां ?
वर्षाचे महिने बारा कां ?
थर्मामिटरमध्यें पारा कां ?
विमान जमिनीवर कां नाहीं चालत ?
चांदोमामा माझ्याशीं कां नाहीं बोलत ?
आकाशांतल्या चिमुकल्या परी
कधी येतील का हो माझ्या घरी ?
देव्हाऱ्यांतल्या कृष्णाला
दुधाचा येतो कंटाळा
वाटीभर दूध रोज टाकतो
मी मात्र दूध टाकलं की बोलणी खातों !.....
...कांहीं प्रश्नांना सोडवून मोकळं केलं
छोट्याशा राजूचं समाधान झालं
कांहीं प्रश्न बसलेत मनाला बिलगून
कांहीं प्रश्न सुटले नाहींत अजून !
कां ?
कोण जाणे !

—निर्मला देशपांडे

पिता झालेल्या प्रत्येक तरुणापुढें दोन प्रश्न उभे असतात :

एक म्हणजे : आपल्या कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागविणें आणि


दुसरा म्हणजे : आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं, मुलीच्या लग्नासाठीं आणि स्वत:च्या सेवानिवृत्ति-नंतरच्या काळासाठीं पैसा सांठवून ठेवणें, आणि त्याहून महत्वाचें म्हणजे जर कदाचित तुम्हीं आपल्या कुटुंबाला अकालीं सोडून गेलांत तर त्यांच्या चरितार्थाची तरतूद करून ठेवणें.

अन्नदाता.....

ह्या सर्व गरजा भागविण्याइतकी मोठी बचत तुम्हीं कधीं तरी करूं शकाल का? फक्त आयुर्विम्याच्या सहाय्यानेंच तुम्हांला एवढी मोठी बचत करणें शक्य आहे. तुम्हीं जिवंत असलांत किंवा नसलांत तरी सुद्धां, जेव्हां अत्यंत जरूर भासेल अशा वेळीं एक ठराविक रक्कम तुमच्या हातांत पडणार आहे ह्याची हमी देणारी आणि तुमची नियमित बचत करणारी अशी ही दुहेरी सुरक्षितता आहे.

तुम्हीं आंखलेल्या योजनांमधील अडचणी ज्यामुळें दूर होतील अशा अनेक पॉलिसींची माहिती तुमच्या लाइफ इन्शुअरन्स एजंटला नीट समजावून देण्यास सांगा.

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया



सांस्कृतिक भांडवल : संस्कार-धन

कथा म्हणजे मनुष्याचें सांस्कृतिक भांडवल. तें जितकं वापरावं तितकं वाढतं. तें कधीच जुनं होत नाहीं. आपण आपल्या मुलांना कांहीं स्थूल मिळकत देऊ शकतो कीं नाहीं या गोष्टीला विशेष महत्व नाहीं परंतु आपल्या संस्काराचें वारसागत धन तर उपयोग न करतां पडून राहिलें तर तें आपलें मोठें नुकसान समजलें पाहिजे.

वाणी, रंग आणि स्वर या तीन गोष्टींतून मनुष्यानें नित्य नव्या अशा कलाकृतीची रचना केली आहे. आपण माता-पिते होण्याला कितपत योग्य आहों हा एक प्रश्न आहे. कथा जशा बालकांना प्रेरणा देणाऱ्या असतात, तशाच त्या सांगणारांनादेखिल प्रेरक असतात. कथा सांगणारांना याचा प्रत्यय येतो.

प्रत्येक माता-पित्यास आपल्या बालकाचें प्रेम तर असतेंच पण हें प्रेम प्रकृतिनेंच दिलेलें म्हणून प्राकृत प्रेम म्हटलें पाहिजे. मनुष्य या प्राकृत प्रेमाला प्राकृत भूमिकेवरून सांस्कृतिक भूमिकेवर नेऊ शकतो. पण हें केव्हां शक्य होतें ? बालप्रेम त्यासाठीं विशाल बनलें पाहिजे, त्यांत विवेक असला पाहिजे. बालकांत असलेल्या विकासतत्वाला त्यानें गति मिळाली पाहिजे. आपल्या प्रेमाच्या धाग्यांत ओवून संस्कारांच्या फुलांची माला आपण त्याला दिली पाहिजे.

कथा त्यांतीलच एक शुद्ध, निर्दोष, सरळ आणि आनंद-प्रेरक असें एक साधन आहे. सांगणाऱ्याचें आणि ऐकणारांचें दोहींचेंही त्यांत समाधान होतें. गरीब मनुष्य देखील ह्या साधनाचा उपयोग करूं शकतो. त्यासाठीं उत्साह पाहिजे. त्याचें महत्व कळलें पाहिजे. कथा सांगण्याची थोडी हातोटी प्राप्त कली पाहिजे.

—मूळशंकर भट्ट

क्षोभ-प्रक्षोभ

[पान १९ वरून चालू]

न्यायपंच आपलें काम ज्या तऱ्हेनें करतात त्यामुळें लहान मुलांच्या न्यायबुद्धीचें, त्यांच्या चिकाटीचें कौतुक वाटतें. आणि म्हणूनच मी म्हणतो कीं मुलांचं खरं शिक्षण शाळेच्या बाहेरच राहातं.

प्रेम सगाई २५-१०-५८

त्या दिवशीं सकाळीं मी व छोटी मुलं नृत्यशाळेंत काम करीत असतां परेशभाई परीक्षेला जाण्यापूर्वी माझ्या पाया पडण्यासाठीं तिथें आला. तो गेल्यानंतर थोडयाच वेळांत माझ्या शेजारचा विनुभाई म्हणाला 'परेशभाई माझा कंबर-पट्टा दे ना.' परेशभाईच्या पॅटला पट्टा नसल्यानें ती खालीं घसरत होती हें पाहून विनोदनें विचारलें.

विनोद तर या सत्रांतच दाखल झाला आहे परंतु बाल-गृहाचें वातावरणच अशा प्रकारचें आहे की येथें नवीन आलेला मुलगा चटकन् जुन्या मुलांत मिसळून जातो व जुन्या मुलां प्रमाणेंच वागूं लागतो. त्यांच्यामधील परिग्रह वृत्ति नाहींशी होते. स्वतःची वस्तू दुसऱ्यांना देण्यांत त्याला आनंद वाटतो, इतकेंच नव्हे, तर दुसऱ्यानें ती वापरावी म्हणून आग्रह करतो.

दुसरी विशिष्टता ही कीं इथे रूळलेलीं पहिलीं मुलें नवीन येणाऱ्या मुलांशीं फटकून वागत नाहींत किंवा त्यांची थट्टा-मस्करी करीत नाहींत.

पण अशा प्रकारच्या मुलांनासुद्धां कोणत्याहि प्रकारें त्रास देतांना दिसून येत नाहीत. उलट नव्या आलेल्या मुलांना येथें निराळें वाटूं नये त्याचप्रमाणें त्यांनीं लवकर तेथील गोष्टी आत्मसात कराव्यात असा प्रयत्न जुनीं मुलें सतत करीत असतात.

ललितभाई तर नवीन मुलांना वागवण्यांत पटाईत (expert) आहे.

नवीन मुलांना तो आपल्या शेजारच्या खाटेवर झोंपण्यास घेतो. अर्ध्या रात्रीतूनसुद्धां उठून त्यांना मदत करतो. अगदीं लहान मुलांना सर्व मोठीं मुलं खांद्यावर घेऊन हिंडवतात. ही त्यांच्या मनाची घडण शिकवून आलेली नाही, तर तें त्यांच्यांतील निर्व्याज वाहणाऱ्या प्रेमाचें प्रतीक आहे.

विनोदभाईला आपला पट्टा द्यावासा कां वाटला? याच्या-मागें दोन कारणें वाटतात—एक तर प्रेम दिल्यानें प्रेम मिळतं हा अनुभव आणि दुसरें म्हणजे दुसऱ्याकडून गौरवून घेणं. पण गौरव करणें व गौरवून घेणें यांत गैर काय आहे ?

असाच प्रकार मायलेकरांतही नसतो का ! याला स्वार्थ म्हणून त्याची निंदा करणें योग्य नाहीं. हेंच वातावरण शिक्षण-क्षम असतें.

—ओजस्

लेखांक १ : माझी रशियाची यात्रा —शे. ना. नामले

रशियांतील शिशुसंगोपन

कार्यक्षम, कर्तव्यपरायण आणि सुखी समाजनिर्मितीसाठी शिशुसंगोपनापासून प्रत्येक व्यक्तीकडे लक्ष पुरविलें पाहिजे याबद्दलची जाणीव सर्व सुधारलेल्या देशांत आढळून येत आहे. जनतेच्या सर्वांगी विकासासाठीं पाळण्यापासूनच सुरुवात झाली तरच विकास परिणामकारक आणि कायमी होतो ही गोष्ट पुरोगामी राष्ट्रांच्या ध्यानांत आलेली आहे. रशियांत या प्रश्नाचा मूलग्राही विचार झाला आहे व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणीही सुरू आहे. त्यामुळें तेथील अनुभवाचा उपयोग दुसऱ्यांनाही होण्यासारखा आहे.

रशियांत शिशुसंगोपनांच्या कार्याचें सामाजीकरण जवळ-जवळ पूर्णत्वानें झालेलें आहे. समग्र समाजाला उत्पादन-केंद्री बनविल्याशिवाय लोकांचें दारिद्र्य कधींच नष्ट होणार नाहीं हें रशियाच्या विकासाचें सूत्र असल्यानें उत्पादनवाढीच्या राष्ट्रीय कार्यक्रमांत स्त्रियांना सहभागी कसें बनवतां येईल याचा तेथें योजनापूर्वक विचार झाला. या योजनेचा भाग म्हणून या देशांत शिशुसंगोपनाच्या सामाजीकरणाचा प्रयोग होत आहे. आजच्या जवळ जवळ पंचाण्णव टक्के स्त्रिया दोन महिन्याच्या अर्भकाला पाळणाघरांत (संगोपनगृह) सोपवून आपापल्या कारखान्यांत, शेतावर, शाळा-कचेऱ्यांतील सर्व प्रकारच्या कामावर जात आहेत. यामुळें रशियन स्त्रिया आर्थिक दृष्टीनें सावलंबी तर झाल्याच पण त्याशिवाय तेथील समाजांत त्यांना पुरुषांच्या बरोबरीचें सामाजिक स्थानही मिळालेलें आहे. कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत त्या पुरुषांच्या बरोबरीनें कामें करतांना दिसतात.

रशियांतील शिशुसंगोपनाच्या सामाजीकरणानें स्त्रियांची प्रगति निश्चितपणें दिसत असली तरी शिशुसंगोपन व्यक्तिगत रीतीनें मातेनें कुटुंबांतून करणें बालकल्याणाच्या आणि समाजाच्या दृष्टीनें योग्य आहे किंवा त्याच्यासाठीं सामाजिक संस्था योजणें योग्य आहे यासंबंधीं सर्व समाजशास्त्रज्ञांचीं मतें एक नाहींत. स्त्रीजीवनाच्या विकासाबरोबर बालकांच्या जीवनाविकासावर, संगोपनाच्या सामाजीकरणावर कोणते परिणाम होतील यासंबंधींचें संशोधन झालें पाहिजे. ज्या स्त्रीच्या उदरीं बालकांचा जन्म होतो त्याच स्त्रीकडून बालकाचें संगोपनही होणें जरूरीचें आहे का ? मातेला आपल्या अपत्याचें संगोपन यथेच्छ करण्याची इच्छा असते, त्याचप्रमाणें या वयांतील बालकालाही मातेचा सहवास हवा असतो या भूमिकांचाही या प्रश्नांत विचार झाला पाहिजे.

शिशुसंगोपन कुटुंबांतच व्हावें, त्याचें सामाजीकरण झाल्यास त्याचे बालकाच्या मनोविकासावर विपरित परिणाम होतात असें कांहीं तज्ज्ञांचें म्हणणें आहे. युनेस्को तज्ज्ञ डॉ. गोल्ड फार्थनें या विषयावर जें संशोधन केलें आहे, त्याच्या आधारें त्यांचें म्हणणें असें कीं ज्या मुलांचें संगोपन अनाथालयासारख्या सामाजिक संस्थेतून होतें त्या मुलांच्या विचारप्रक्रियेंत दोष उत्पन्न होतात. त्यांच्यात अपूर्व कल्पकता (Abstract thinking) योग्य रीतीनें विकसत नाहीं. रशियाच्या समाजयोजकांना डॉ. गोल्ड फार्थचें हें म्हणणें पूर्णपणें मान्य नाहीं. दारिद्र्याच्या लढ्यांत स्त्रियांना सहभागी बनवण्याच्या कार्यक्रमांत ज्या ज्या गोष्टी येतील त्या गोष्टींची व्यवस्था त्यांनीं अशा तऱ्हेनें लावली आहे कीं त्यामुळें त्यांतील अनिष्ट टळावें. शिशुसंगोपनासाठीं या देशांत संस्थांचें सार्वत्रिक जाळें पसरलें आहे. या प्रकारच्या भव्य प्रयोगाचे परिणाम काय झाले हें आपल्यासारख्या दारिद्र्याशीं नित्यशः लढा द्याव्या लागणाऱ्या देशांनीं समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

युरोप-अमेरिकेशीं तुलना करतांना, रशियांत जीवनोपयोगी वस्तूंची विपुलता नाहीं आणि तरीदेखील आपल्या देशांतील बालकांचें संगोपन राजपुत्राप्रमाणें शास्त्रशुद्ध रितीनें झालें पाहिजे असा तेथें आग्रह आहे. शिशुसंगोपनावर कोट्यवधी रूबल्स खर्चून योजनांवर योजना तेथें सुरू केल्या जात आहेत. या सर्व सरकारी योजनांत सात वर्षांपर्यंतच्या बालकाच्या संगोपनाच्या जबाबदारींत मुख्य भाग माता-पित्यांचाच असला पाहिजे अशी तेथें मान्यता आहे.

देशांतील कोणत्याही प्रदेशांतील विवाहित अथवा अविवाहित स्त्रीनें गर्भधारण करणें म्हणजे तें मानवनिर्मितीचें सामाजिक कार्यच आहे अशी तेथें समजूत रूढ करण्यात आली आहे. त्यामुळें गर्भवती स्त्रीला तेथें सरकार शक्य त्या प्रकारें मदत करतें व तिचे रक्षणाची तरतूद करतें. गर्भवती स्त्रियांना त्यांच्या नोकऱ्यांत-कामधंद्यांत विशेष सवलती तेथें कायद्यानें देण्यात आल्या आहेत. प्रसूति-पूर्वकालांत ५६ दिवस आणि नंतर ५६ दिवस अशी जवळ जवळ चार महिने भर पगारी रजा

स्त्रियांना मिळते. याशिवाय त्यांची प्रकृति चांगली नसेल तर आजारपणाची अधिक रजाही मिळू शकते. देशांतील शहरी आणि ग्रामीण भागांत सर्व ठिकाणीं विनामूल्य प्रवेश देणारीं प्रसूतिगृहें आहेत. त्यांत नांव नोंदून योग्य वेळीं स्त्रियांना प्रवेश देण्यांत येतो. अशा प्रसूतिगृहांत केवळ वैद्यकीय सल्लाच नव्हे, तर पोषक अन्न आणि जरूरी औषधोपचार विनामूल्य मिळण्याची तेथें सोय आहे. दाखल झालेल्या स्त्रियांना बालसंगोपनविषयक लहानसा शिक्षणक्रमही देण्यांत येतो. या प्रकारच्या स्त्रियांना मिळणाऱ्या विशेष सवलतींबरोबर या देशांतील सर्व लोकांना सर्व प्रकारची वैद्यकीय मदत विनामूल्य मिळते हेंही लक्षांत घेतलें पाहिजे. येथील लोकसंख्येच्या प्रमाणांत डॉक्टरांची संख्या जगांतील इतर देशांपेक्षां जास्त आहे. १९५६ सालीं आरोग्य खात्यावर ३५२० कोटी रुबल्स खर्च करण्यांत आल्याचें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.


प्रसूतीनंतर आपल्या अपत्याच्या संगोपनासाठीं पाळणाघराचा उपयोग करावा किंवा न करावा हें प्रत्येक स्त्री अथवा तिचें कुटुंब ठरवूं शकते. परंतु तेथील बहुसंख्य कुटुंबांची आर्थिक स्थिति अशीच असते कीं, त्यामुळें स्त्रीला कामावर जावेंच लागतें. मुलांचें संगोपन पूर्णतया घरीं करणें सर्वसामान्य कुटुंबाला परवडत नाहीं. उच्च उत्पन्नाच्या पांच टक्के कुटुंबाखेरीज या देशांतील सर्व स्त्रिया पाळणाघराचा उपयोग करतात.


ताश्कंद येथील एका कापड गिरणींतील पाळणाघर

कामगार वर्गाच्या शिशूंसाठीं प्रत्येक कारखान्यांत पाळणाघराची व्यवस्था असते. मध्य आशियांतील उजबेगिस्तानची राजधानी ताश्कंद या शहरांत एक मोठी कापडाची गिरणी आहे. तेथील एक पाळणाघर आम्ही पाहिलें.

सकाळचा १२-१२। चा सुमार होता. पाळणाघराच्या मुख्य दाराजवळ पोचतांच आमच्या स्वागतासाठीं तेथील संचालिका आपल्या एकदोन सहकार्यकर्त्यांबरोबर उभ्या होत्या. स्मितपूर्वक त्यांनीं आमचें स्वागत केलें. स्वागतासंबंधींच्या उत्तरांत 'आपलें पाळणाघर आणि त्याची कार्यकर्ती मंडळी यांच्या भेटीची आम्हांला जी संधि मिळाली त्याबद्दल अत्यंत आनंद होत आहे' असें आम्ही कळविलें. आमचे ओव्हरकोट काढतांच एका परिचारिकेनें आपल्याकडे मोठ्या दवाखान्यांतील डॉक्टर्स वापरतात त्याप्रकारचे स्वच्छ पांढरे गाउन्स घालण्याची विनंति केली. यामुळें पाळणाघरांत स्वच्छतेचें घोरण किती काटेकोरपणें पाळलें जातें यासंबंधींची कल्पना येऊन आमचें कुतुहल वाढलें. सर्व ठिकाणीं स्वच्छता, सौंदर्यपूर्ण व्यवस्था आणि शांतता वाटली. प्रसन्न वातावरणाच्या या प्रभावामुळें आमच्या हालचालींतही हळुवारपणा आला. व्यवस्थेतील भव्यतेमुळें एकाद्या राजमहालांतील राजशिशूला तर आम्ही बघायला जात नाहीं ना असें वाटलें. सुरवातीलाच आम्ही एका भव्य दालनांत पोंचलों. चकचकीत पॉलीश केलेली लाकडी फरशी, त्यावर पसरलेला विस्तृत गालिचा, दारें-खिडक्यांवरील स्वच्छ आणि सुखद रंगाचे पडदे, भिंतीवरील शैशवक्रीडेचीं भव्य चित्रें, कपाटांत नमुन्यादाखल योजलेलीं शिशूंचीं खेळणीं पाहून राजमहालाच्या दिवाणखान्यांत तर आपण नाहीं ना, असें आम्हांला वाटलें. संचालिकेचें माहिती सांगणें चालू होतें, 'आमच्या या पाळणा घरांत शंभर मुलांची व्यवस्था आहे. कामावर जाणाऱ्या स्त्रिया कारखान्यांत

स्वदेशीची भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





बाल-विभाग

वर्ष २६ वें : अंक ९ वा : डिसेंबर १९५८

गोष्ट :— (प्रौढांनीं वाचून सांगण्यासाठीं)

कावळ्याचा चष्मा

एक लिंबाचं झाड होतं.
त्यावर एक घरटं होतं.
घरट्यांत एक कावळा रहात होता.

एके दिवशीं खायचं शोधतां शोधतां
एका घरांत त्याला दिसला चष्मा.
चष्मा दिसला अन्
चटकन् त्यानें तो उचलला.
आणि गेला घेऊन घरट्यांत.

घरट्याच्या पुढें लिंबाच्या फांदीवर
त्यानें एक झोपाळा बांधला होता.
चष्मा नाकावर चढवून
तो झोपाळ्यावर झोके घेऊ लागला.
झोके घेऊ लागला नि
गाणीं गाऊं लागला—
'लिंबाच्या डाळीवर लिंबाच्या डाळीवर
झुले काग देव राय
नाकीं चष्मा शोभे
अहा! लिंबाची डाळ—लिंबाची डाळ.

कावळा रोज खायचा प्यायचा
नि झोपाळ्यावर झोके घ्यायचा अन् गाणीं
गायचा—
'लिंबाच्या डाळीवर—लिंबाच्या डाळीवर
झुले काग देव राय
नाकीं चष्मा शोभे
अहा! लिंबाची डाळ; लिंबाची डाळ.'

एके दिवशीं असाच तो गात होता.
झोके घेत होता.
इतक्यांत लालतोंड्या वानरांनीं
त्याला पाहिलं.
एक वानर हळूच कावळ्याच्या
मागून गुपचुप आलं
एकदम चष्मा काढून घेऊन पळालं.

कावळा काव काव करीत मागें धावला
'माझा चष्मा दे—दे माझा चष्मा' म्हणाला
पण ऐकतंय कोण?
माकडानें चष्मा कांहीं दिला नाहीं.
त्यानं चष्मा आपल्या डोळ्यांवर चढवला.

आणि तें लागलें उड्या मारायला
या झाडावरून त्या झाडावर
या छपरावरून त्या छपरावर
उड्यावर उड्या, नि कुद्यावर कुद्या.

कावळ्याला दिसली साळुंकी
तिला पाहतांच तो रडूं लागला 'अँ अँ अँ!!'

साळुंकी म्हणाली,–'कावळ्या दादा
कावळ्या दादा
कां रे रडतोस ?
तुझं कांहीं दुःखतंय का ? '

कावळा म्हणाला,
'लिंबाच्या डाळीवर
माझ्या घरट्याच्या अंगणीं
नाकीं चष्मा चढवून
झोके घेत होतों
गाणीं गात होतों
लालतोंडं वानर आलं
माझा चष्मा घेऊन गेलं
परत आणून देशील
तर मोठे उपकार होतील.'

साळुंकी म्हणाली,—
'कावळे दादा, जाऊं दे रे
नाव काढूं नको त्या माकडाचं
तुला मारलं तर नाहीं त्यानं
तुझं घरटं तर मोडलं नाहीं ना?'

कावळा म्हणाला—
'नाहीं. घरटं मोडलं नाहीं.'

साळुंकी म्हणाली—
'बस झालं चूप.
घरट्यांत जाऊन झोप काढ
माकडाचं आपण काय करणार!'

कावळा निराश झाला नाहीं.
त्यानें हिंमत सोडली नाहीं
घारीकडे तो गेला
अन् रडूं लागला—अँ अँ अँ!!

घारीनें विचारलें
'कांरे कावळ्या रडतोस कां?
कांहीं दुखत तर नाहीं ना?'

कावळा म्हणाला—
'लिंबाच्या डाळीवर
माझ्या घरट्याच्या अंगणांत
नाकीं चष्मा चढवून
झोके घेत होतों
गाणीं गात होतों
लालतोंडं वानर आलं
माझा चष्मा घेऊन गेलं
परत-आणून देशील
तर मोठे उपकार होतील.'

घार म्हणाली—
'बस येवढ्यासाठींच रडतोस ?
जा घरट्यांत जाऊन बस
आतां तुझा चष्मा आणतें.'

कावळा घरट्यांत आला.
घार चकरा घेत घेत
उंच आकाशांत गेली.
उंच उंच चढली नि खालीं पाहिलं
एक मुलगा हातांत
पुडा घेऊन जात होता
घार भुर्रदिशी खालीं आली
पुडा घेऊन वर गेली

पुडयांत होते चणे
चणे घेऊन गेली माकडाजवळ

एका घराच्या छपरावर
चष्मा चढवून माकडाचे चाळे चालले होते.
घारीनें त्याच्या जवळ
हळूच चण्याचा पुडा सोडला
दोन चार चणे त्याच्या अंगावर फेकले
चणे अंगाला लागतांच माकड चमकलें.
इकडे तिकडे पाहूं लागलें.
चणे पाहून आनंदलें.
डोळ्यावरचा चष्मा काढून त्यानें बाजूला
ठेवला.
पुड्यांतील चणे घेऊन ते खाऊ लागलें.
खातां खातां त्यानें
कितीतरी आनंदभरांत उड्या मारल्या.
चष्म्याचा त्याला विसर पडला.
बस, घारीला हें पाहिजे होतं
तिनं चष्मा उचलला व ती
पोहोंचली कावळ्याच्या घरट्यांत.

चष्मा पाहून कावळ्याला आनंद झाला.
घारीचे त्यानें खूप खूप आभार मानले.
पुनः नाकीं चष्मा घातला.
झोपाळ्यावर झोके सुरू झाले
अन् तेंच गाणें तो पुनः गाऊं लागला—
'लिंबाच्या डाळीवर—लिंबाच्या डाळीवर
झुले काग देव राय.
नाकीं चष्मा शोभे
अहा! लिंबाची डाळ, लिंबाची डाळ!'

(आकाशवाणी मुंबईच्या सौजन्यानें)

'डिंग डांग टिंग टांग'

डिंग डांग डिंग डांग
टिंग टांग टिंग टांग
चला खेळूं पिंग पांग

चेंडू टाकूं पटापट
टोले मारू फटाफट

कसरत करूं ढीगभर
दूध पिऊ शेरभर

खेळ नामी पिंगपांग
सारे बनूं किंगकांग

डिंग डांग डिंग डांग
टिंग टांग टिंग टांग

—राम उगावकर

गप्पा

ऐका हो ऐका। चार चौघांतल्या गप्पा
या गांवाचं नांव काय?
किर्लोस्कर वाडी
अवववव कोणी वरं बांधली ही येवढी
मोठी माडी?

मी सांगू? तूं तर दिसतेस मला खरोखर वेडी
अग, ज्यांनीं बांधली ही माडी, ते तेर होते
सुतार, गवंडी आणि गडी
तवेल्यांत दिसते आहे कोरी मोटर गाडी
दारावरती पहारा करतोय शिपाई गडी

—मालती जोशी

मनी मावशी

(जाति—फुलवेल)

मनी मावशी। बहु आवडते ही मजशी ॥ धृ० ॥
देह असे हा हिचा पांढरा।
जणूं कापसाचाच ढिगारा॥
सदैव भटके ही घर-दारा।
मनी मावशी। मज वाटे ही सुंदरशी ॥ १ ॥
चाले ऐटित हलवी पुच्छ।
नजर हिची चहूंबाजू देखत ॥
अंधारामधीं ती चमकावित।
मनी मावशी। ऐट ही हिची मोठीशी ॥ २ ॥
हळू पावलीं घरांत शिरते।
बाळाचें दुध ओरुनि पीते॥
माळ्यावरती मग ही दडते।
मनी मावशी। बाळांना ठेवि उपाशी ॥ ३ ॥
कधिं 'मामां' च्या घरासमोरी।
दृष्टि लावुनी बसे निरंतरीं ॥
दिसतां उडि घेई 'माम'वरी।
मनी मावशी। बहु चपळ हरणा-जशी ॥ ४ ॥
नाहीं हिजला हो घरदार।
तरी पोशितो हिज परमेश्वर॥
सुखांत रहाते वारंवार।
मनी मावशी। ठाउक ना दुःखें हिजशीं ॥ ५ ॥

—परशुराम मर्ढेकर

सकाळ


सूर्य उदेला पूर्व दिशेला
भूवरी—प्रभा रम्य पसरली॥
उंच उंच डोंगरामागुनी
तेजाच्या अन् रथीं बैसुनी
हळूच पाही डोकावूनी
दिनमणी—हसे मधुर गालीं॥
काळोखाचा बुरखा काढुन
रविकिरणांसह मोदें खेळुन
सुरेख गुपितें सांगुन-ऐकुन
तृणफुलें—मनांत आनंदलीं॥
सुंदर, कोमल कलिका फुलती
वायूसंगे झोके घेती
फर सभोती रविकर धरिती
खुलतसे—खळी गोड गालीं॥
स्वच्छंदें खग फिरती गगनीं
आनंदानें गातीं गाणीं
स्वागत करण्या मनीं फुलूनी
सृष्टिही—पहा कशी नटली!॥
रथमार्गावर उधळिलिं सुमनें
तरूलतांनी अन् वायूनें...
मनीं हांसुनी फिरुनि पहाणें
रविनें—आतां नभोमंडलीं!॥

—शरद् गो. साटम

पावसांतील गंमत

ढग गडगडती	—गड गड गड
वीज कडाडे	कड कड कड
पाऊस आला	सप् सप् सप्
गारा पडती	टप टप टप
सारे पळती	पट पट पट
दारें लाविती	फट फट फट
दादा आई	बसले आंत
आपण खेळूं	पावसांत
पाऊस पडतो	झिम झिम
आपण होऊं	ओलेचिंब
गारा वेंचू	पटापट
खाऊन टाकूं	मटामट

—राम उगावकर



चंद्रावर स्वारी

(एक प्राचीन लोककथा)

वानरांची पोरं एका अरण्यांत जमून खल करीत होतीं. सर्वांची तक्रार एकच: तुम्ही लहान, तुम्हांला कांहीं कळत नाहीं, असं हीं वडील माणसं म्हणत असतात, नी मग सर्वांनीं एकच गजर केला, "छे: छे: आम्ही मुळींच लहान नाहीं, आम्हांला सारं कांहीं कळूं लागलंय!" "नी वाटलं तर आम्ही हे सिद्धहि करून देऊं!" त्यांचा म्होरक्या गरजला, "चला रे, आपण आपली एक वानर सेनाच बनवूंया, की मग आपल्याला काय हवं तें करता येईल!"

ही सभा आटोपतांच सारे वानरवचे घरोघर गेले. पण त्या रात्री आईबापांच्या कुशीत कुणीहि झोपला नाहीं. एका तलावाकांठच्या झाडाच्या शेंड्यावर एकेक गट करून ते झोपले.

मध्यरात्रीच्या सुमारास एका वानरवचाला जाग आली. झाडाच्या त्या शेंड्यावरून त्याची नजर खालीं गेली. खालीं तलावांत चंद्राचं चकचकीत प्रतिबिंब त्याच्या दृष्टीस पडलं. लगेच त्यानं आरोळी ठोकली, "अरे, उठा! उठा! चांदोबा तळ्यांत पडला आहे! चला, चला, दुसरं कुणी येऊन त्याला बाहेर काढायच्या पूर्वी आपणच काढूंया त्याला बाहेर!"

"वा वा, छान आहे कल्पना!" दोस्त मंडळी त्याला साथ देत उद्गारली, "एवढं करतां आल तर आपला केवढा प्रचंड बोलबाला होईल!"

लगेच त्यांचा म्होरक्या पुढं सरला नी म्हणाला, "त्या चंद्रापर्यंत पोंचायचं तर एकच मार्ग आहे. आपण सर्वांनीं मिळून आपली एक सांखळी बनविली पाहिजे!"

तावडतोव त्या वानरवचांनीं एकेकाची शेपटी घट्ट पकडून एक लांब सांखळी बनविली. म्होरक्या सर्वांत पुढे राहिला. आणि मग त्या साऱ्या टोळक्यानं धाडकन् खालच्या पाण्यांत उडी घेतली. उसळलेल्या पाण्याचा जंगी नाद अरण्यभर दुमदुमला — आणि शांत झाला! — सारे वानरवचे मरून गेले होते!!

तात्पर्य: आपल्याला कळतं असं ज्यांना केवळ वाटतं त्यांचा सल्ला घेतांना सावध रहा; ज्यांना खरोखरींच कांहीं कळतं त्यांचाच सल्ला ऐका. वनस्पतीचंच उदाहरण घ्या. वनस्पति हे हितकर अन्न असून भारतीयांच्या आहारांत त्यानं मोलाची भर पडली आहे, असंच मत आरोग्य नी शरीरपोषण या विषयांतील प्रमुख अधिकारी मंडळी एकमुखानं प्रकट करीत आहे. डालडा वनस्पति — जी लाखों गृहिणी पूर्ण विश्वासानं वापरीत आहेत — शुद्ध वनस्पति तेलांपासून सक्त सरकारी नियमानुसार वनविली आहे. सर्व स्वयंपाक प्रकारासाठीं ती वापरतां येते. शक्तिदायक स्निग्ध पदार्थ तींत भरपूर प्रमाणांत तर आहेतच, पण शिवाय ती जादा पुष्टिदायक आहे. 'डालडा'च्या प्रत्येक औंसांत ७०० आंतरराष्ट्रीय युनिट्स् — म्हणजे उत्तम तुपांत असतं तितकंच — अ जीवनसत्त्व घातलेलं असून त्याखेरीज ५६ आंतरराष्ट्रीय युनिट्स् ड जीवनसत्त्वहि घातलं आहे. याप्रमाणे 'डालडा' स्वयंपाकासाठीं उत्तम तर आहेच, पण अन्न म्हणूनहि उपयुक्त आहे.

DL 440-X52 MA

हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड, मुंबई

जाण्याच्या आधीं येथें रात्रीं किंवा सकाळीं (पाळीप्रमाणें) मुलांना सोंपवून देतात. यामुळें आमची संस्था रात्रंदिवस उघडी असते. येथें दाखल होणाऱ्या मुलांचे आम्ही तीन गट पाडले आहेत. पहिल्या गटांत एक वर्षाखालील मुलें, दुसऱ्या गटांत एक ते दोन वर्षापर्यंतचीं आणि तिसऱ्या गटांत तीन वर्षापर्यंतच्या मुलांना ठेवतों. या सर्व मुलांच्या झोपेचे प्रमाण निरानिराळें असल्यानें त्यांच्या कार्यक्रमांतही थोडाफार फरक असतो. सामान्यतः प्रत्येक गटांत सोळा मुलांचा एक विभाग असतो. या प्रत्येक विभागावर दोन परिचारिका नेमलेल्या असतात. वरच्या गटांतील विभागावर परिचारिकांच्या जोडीला आणखी एक शिक्षिकेचीही नेमणूक केलेली असते. सोळा मुलाच्या या विभागासाठीं एक खोली झोपण्याची, एक खेळण्याची आणि एका खोलींत मुलें आणि माता भेटण्यासाठीं अशा तीन खोल्या असतात. सर्व गटांसाठीं एक मोठे स्वयपाक घर आहे. याशिवाय कार्यकर्त्यांच्या खोल्या आहेत. सामान्य डॉक्टर, त्याप्रमाणें निष्णात डॉक्टरांची जरूर असल्यास मदत मिळते.'

बोलतां बोलतां आम्ही एका विभागाच्या झोंपेच्या खोलींत पोंचलों. तेथें स्टेनलेस स्टीलचे छोटेछोटे सोळा पलंग होते. त्यावरील स्वच्छ, उबदार अथंरूणांत झोंपलेलीं मुलें दिसत होतीं. या झोंपणाऱ्या मुलांचे शांत, गुलाबी, आरोग्यसंपन्न चेहरे पाहून आम्हाला आनंद वाटला. या मुलाचे कपडे, टायलेटच्या वस्तु याचें आम्ही बारकाईनें निरीक्षण केलें. खिडक्यांवरील जाळीदार पडद्यांतून येणाऱ्या मंदमंद प्रकाशामुळें खोलींतील वातावरणांत शांतता आणि प्रसन्नता यांचें सुंदर मीलन दिसत होतें. मुलांच्या झोपेच्या खोलींतून आम्ही खेळाच्या खोलींत पोंचलों. सामान्यतः आपल्या येथें शिशूंचीं कठडा-घरें (Pens) जमीनीवर योजलेलीं असतात. पण येथें तीं दोन अडीच फुटांच्या उंचीवर योजलेलीं होतीं. ६×१० च्या एका छानदार कठडाघरांत एका गालीचावर दोन शिशु खेळत होते. त्यांच्यासमोर रंगीत रबराची तीन-चार खेळणीं, लोकरीचे दोन-तीन चेंडू, दोन-तीन बाहुल्या आणि टिडींग रींग्ज पडलेल्या होत्या. शिशूंच्या चेहऱ्यावर खेळकरपणा दिसत होता. या कठडाघराच्या बाजूला दुसरें एक नवीन प्रकारचें कठडाघर होतें. त्याचा आकार 'यू-शेप' असून घसरगुंडीसारखी त्यांत घसरण्याची सोय होती.

या कठडा-घरांतर रंगीत वस्तू टांगलेल्या आढळल्या. अशा वस्तूंशीं खेळतांना शिशूंना खूप मौज वाटत असेल यांत शंका नाहीं. या कठडा-घराच्याजवळच विशेष प्रकारचीं एक-दोन टेबलें होतीं. या टेबलांच्या तीन बाजूंना नुकतेच बसायला लागलेलें बालक सुरक्षित बसूं शकेल अशी सोय होती. एका बाजूला शिक्षिका अथवा परिचारिका बसूं शकेल अशी सोय होती. भिंतीवर मोठीं मौलिक चित्रें होतीं. खोलींतल्या एका कोपऱ्यांत सावलींत वाढणाऱ्या वनस्पतींच्या कुंड्या योजून कोपरा आकर्षक बनविलेला होता. प्रत्येक खोलींत हवा व प्रकाश खेळतीं होती.

तिसऱ्या खोलींत जिथें मुलांच्या माता त्यांना भेटायला येत त्या खोलीच्या मधोमध एक मोठें टेबल होतें. टेबलावर सुंदर टेबल क्लॉथ आणि त्यावर भव्य फुलदाणी होती. टेबलाच्या आसपास मऊ गादीच्या बारा-तेरा खुर्च्या होत्या. या खोलीचें वातावरण, रंगयोजना आणि भव्य तैलचित्रांमुळें ही खोलीदेखील मोठ्या दिवाणखान्यासारखी वाटत होती. संचालिका म्हणाली, 'येथें मुलांच्या माता त्यांना अंगावरचें दूध पाजण्यासाठीं येतात. दिवसांतून दोन वेळां येतात. तासभर मुलांशीं खेळतात' त्यांच्याबरोबर खाणेंपिणें करतात. अर्भकें असलेल्या मातांना सवलत मिळते.'

यानंतर आम्ही मोठ्या मुलांच्या विभागांत गेलों. तेथेही तीच टापटीप आणि व्यवस्था. खेळाच्या खोलींत खेळण्यांची संख्या अधिक होती व गाणीं ऐकण्यासाठीं ग्रामोफोन होते. स्नानगृह, शौचागार आणि बेसिन अगदीं स्वच्छ होतीं. मुलांचे कपडे धुण्याची व्यवस्था आधुनिक होती. तें सर्व पहात पहात आम्ही संस्थेच्या अंगणांत आलों येथें आम्हाला संस्थेच्या आर्थिक बाजूची कल्पना देण्यांत आली. शिशुसंगोपनाच्या जबाबदारींत मातापित्यांचा भाग असला पाहिजे म्हणून येथें फी घेण्याचें धोरण होतें. पालकांच्या उत्पन्नाप्रमाणें मुलांची फी घेण्यांत येत होती. सामान्यतः पालकांना ३० ते ४० रुबल्स द्यावे लागत. परंतु सरकार प्रत्येक मुलासाठीं २०० रुबल्सपर्यंत खर्च करीत असे. येथील कार्यकर्त्यांना सहा तास काम करावें लागतें. येथे नोकरी करणाऱ्यांसाठीं विशेष प्रकारचे शिक्षणक्रम आहेत सैपाक करणाऱ्या बाईंनादेखील लहान मुलांच्या खाण्यापिण्याबाबतचा शिक्षणक्रम करावा लागतो.

———

बालमंदिरांतील बालगीतें

बालमंदिरांतील कार्यक्रमांत निरनिराळ्या गोष्टींपैकीं बालगीतें हा एक सर्वसामान्य कार्यक्रमाचा भाग आहे. कांहीं बालमंदिरांत याला विशेष स्थान असतें. भावनगरला स्व. गिजुभाईंच्या देखरेखीखालीं बालमंदिराच्या कार्याच्या सुरवातीस जें कांहीं स्वरूप देण्याचें कार्य झालें, त्यांत बालगीतांच्या कार्यक्रमाला विशेष स्थान दिल्याचें आढळतें व तेथें शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांनीं तेथील ही विशेष रीत आपणाबरोबर निरनिराळ्या प्रांतांत नेली. भावनगरच्या श्री. दक्षिणामूर्ति बालमंदिरांत या कार्यक्रमाला एक विशिष्ट दर्जा दिलेला होता. म्हणून या कार्यक्रमासाठीं त्या बालमंदिरांत एक स्वतंत्र असें दालन होतें. त्याच्या भिंतीवर वाद्यांचीं चित्रें काढलेलीं होतीं आणि एका बाजूस। उंचसें स्टेज होतें. कार्यक्रमांत निरनिराळ्या वाद्यांचाही उपयोग केला जात असे, त्यावेळीं या कार्यक्रमाला संगीत हें नांव होतें व आजही हें नांव कांहीं ठिकाणीं प्रचलित असलेलें आढळतें. या सुरवातीपासून आजपर्यंतच्या काळांत बालमंदिरांत या कार्यक्रमाच्या स्वरूपांत काय काय व कसे कसे फेरबदल होत गेले याचा अभ्यास मनोरंजक वाटेल. पण बालमंदिरांत या कार्यक्रमाला जें स्थान मिळालें त्याचें मूळ, घरांतील बालसंगोपनांत आढळतें. घरोघरीं अनादिकालापासून माता किंवा आजी किंवा अन्य व्यक्ति मुलांना रमविण्यासाठीं किंवा खेळविण्यासाठीं किंवा निजविण्यासाठीं गीतांचा उपयोग करीत असल्याचें आपणाला माहीत आहे. अर्थातच यांत बालगीतांची उपयोगिता सिद्ध होते. मुलांना गाणीं प्रिय असतात म्हणूनच बालमंदिरांतील कार्यक्रमांत त्यांना स्थान मिळालें आहे. दुसरें म्हणजे भाषाविकास, अभिनय, नृत्य, खेळ वगैरे गोष्टींसाठींही बालगीतें उपयोगी पडतात.

बालगीतांबाबत विचार करतांना सुरवातीसच बडबडगीतें व लालनगीतें यांपासून त्यांची भिन्नता समजली पाहिजे. बडबडगीतें व लालनगीतें यांस कांहीशी गेयता व ताल असलीं तरी तीं बालगीतांहून वेगळ्या प्रकारचीं असतात. बालगीतांत राग, ताल, चाल हीं जशीं दिसतात, तशीं तीं बडबडगीतांत नसतात, हा भेद विशेष आहे. संगीतापेक्षांही बालगीतांचें स्वरूप वेगळें आहे. संगीतांत भावनोद्रेग दाखविण्यासाठीं स्वरांचेंच महत्त्व विशेष असतें. त्याचप्रमाणें गायकीचें कौशल्य हीही संगीताची एक विशेषता आहे, पण बालगीतांच्या चाली मुलांना म्हणण्यास शक्य होतील अशा सोप्या असतात. त्यांत गायकी नसते, आणि विशेष म्हणजे अर्थाला 'महत्त्व असतें. नुसतें स्वर आळवणें हें संगीतांत जसें आढळतें, तसें तें बालगीतांत नसतें.

बालगीतांचे त्यांच्या विशिष्ट उपयोगांवरून कांहीं प्रकार कल्पिलेले आहेत. तरी पण या सर्व प्रकारांत बालगीतांचें सर्वसामान्य स्वरूप एकसारखेंच असतें. हे प्रकारही विशेष भिन्न स्वरूपाचे नसून सोयीच्या दृष्टीनेच ते कल्पिलेले आहेत. यांत सामान्यतः पुढील प्रकार आढळतात.

पहिला प्रकार म्हणजे प्रार्थनागीतें : प्रार्थनागीत हें बालगीतांच्या कार्यक्रमांत किंवा शाळेच्या सुरवातीस म्हणण्यांत येतें. त्याचा उद्देश परमेश्वराची प्रार्थना हाच असतो. जरी मुलांना त्यांतील सर्व अर्थ समजला नाहीं, तरी गांभीर्य समजतें. यामुळें एकप्रकारचें गंभीर वातावरण उत्पन्न होतें. याच कार्यांत भर पडण्यासाठीं कांहीं कांहीं बालमंदिरांत यावेळीं उदबत्ती वगैरेही लावतात.

दुसरा प्रकार म्हणजे श्रवणगीतें : यांत मुलांनीं गीत ऐकणें हाच हेतु असतो. त्यामुळें हळुहळू हीं गाणीं व त्यांच्या चाली मुलांना अवगत होतात. यांतूनच आनंदाबरोबर नकळत भाषा-शिक्षणाचें कार्य होतें. इतर सर्व बालगीतांच्या प्रकारांचा उपयोग श्रवणगीतासारखाही होऊं शकतो.

तिसरा प्रकार म्हणजे अभिनयगीतें : यांचा उपयोग श्रवणगीतांसारखाही होऊं शकतो. तसा उपयोग केला तर तीं श्रवणगीतेंच म्हणावीं लागतील. पण ज्यावेळीं हीं गीतें म्हणतांना त्यांतील विशिष्ट अर्थांची कल्पना देणारे हावभाव व क्रिया केल्या जातात तेव्हांच त्यांना अभिनयगीतें हें नांव देणें योग्य होय. म्हणजे हा प्रकार मूलतः कांहीं नसून तो उपयोगावरूनच कल्पिलेला आहे.

चौथा प्रकार म्हणजे खेळगीतें : हीं गीतें विशिष्ट खेळांवरोबर म्हटलीं जातात. पुष्कळ वेळां या गीतांचें स्वरूप बडबडगीतांसारखेंच असतें. फुगड्या, झिम्मा वगैरे कित्येक खेळांत अशा गीतांचा उपयोग परंपरेने चालत आलेला आहे. या प्रथेला अनुसरून कांहीं नवीन खेळगीतेंही बनविलीं जातात. गोफ विणतांना अशींच गीतें म्हणण्याचा प्रघात आहे.

पांचवा प्रकार म्हणजे कूचगीतें : यांत विशिष्ट प्रकारच्याच ठेक्याचा ताल असतो. हीं गीतें म्हणतांना त्यांतील तालाप्रमाणें पाय टाकून चालण्याचाच कार्यक्रम असतो. म्हणजे

खेळगीतांसारखाच. पण विशिष्ट हालचाल करण्यासाठीं या गीतांचा उपयोग केला जातो.

सहावा प्रकार म्हणजे नृत्यगीतें : प्रत्येक प्रांतांत कांहीं ना कांहीं रीतींची लोकनृत्यें आढळतात व त्यावेळीं गाणी म्हणण्याचा प्रघात असतो, म्हणजे खेळगीतांसारखाच येथेंही गाण्याचा उपयोग होतो. उदाहरणार्थ, गुजरातेंत गर्बा व रास म्हणजे दांडिया हे प्रकार सर्वत्र आढळतात. महाराष्ट्रांत टिपऱ्या खेळण्याचा प्रकार आहे तो दांडियासारखाच आहे. शिवाय कित्येक आदिवासी जातींत विशिष्ट प्रकारानें फेर घेण्याची व त्यावेळीं गाणीं म्हणण्याची प्रथा आढळते. या सर्वांनाच नृत्यगीतें या शब्दांनीं संबोधिलें आहे. यांत नवीन प्रकारही आढळतात. त्यांतील एक म्हणजे एकीकडे गीत गायलें जातें व मुलें गाणें न म्हणतां त्याचा अर्थ प्रगट करणारें नृत्य व: नाट्य करतात. ही गोष्ट बालमंदिरांतील लहान मुलांना फारशी जमत नाहीं. तरीपण कांहीं मोठ्या मुलांना जमते व संस्थेच्या वार्षिक समारंभांत वगैरे हे प्रकार आढळतात.

याशिवाय प्रसंगगीतें, अंगाई गीतें व लोकगीतें असेहि तीन प्रकार आहेत. प्रसंगगीतें म्हणजे विशिष्ट प्रसंगाच्यावेळीं म्हणण्याची गाणीं होत. उदा. समारंभांत सुरवातीला स्वागतपर गाणीं म्हणणें. अंगाईगीतें यांचा उपयोग घरोघर मुलांना निजविण्यासाठीं केला जातो. त्यांत अर्थाला फारसें प्राधान्य नसतें म्हणजे मुलाला सर्व अर्थ समजेलच असें पाहिलें जात नाहीं. मोठ्यांची मुलांविषयीं प्रेमाची भावना त्यांत विशेष व्यक्त केलेली असते. ही गीतें म्हणण्याची एक ठराविक चालहि असते आणि तीं एकाच आवाजांत म्हटलीं जातात. त्यांत चढउतार नसतो. म्हणून मूल गाणें ऐकतां ऐकतां झोपी जातें. बालमंदिरांत—या गीतांना फारसें स्थान नाहीं. तरी गंमत म्हणून किंवा कूच वगैरे करून दमल्यावर मुलांना थोडा वेळ स्वस्थ पडून विश्रांति घ्यावी म्हणून कूचगीतांच्या जोडीला अंगाई गीतांचा उपयोग केला जातो. लोकगीतें हा गीतांचा विशिष्ट प्रकार नाहीं. जीं गाणीं परंपरेनें चालत आलेलीं असतात व ज्यांच्या कवींबाबत माहिती नसते, अशा गीतांना लोकगीतें म्हणतात. सामान्यतः पुष्कळशा विशिष्ट प्रसंगांच्या वेळीं म्हणण्याचीं गाणीं लोकगीतें असतात. खेळगीतें, नृत्यगीतें व अंगाईगीतें यांत लोकगीतांचा भरणा पुष्कळ आढळतो. शिवाय बोहोल्याची गाणीं वगैरेही कांहीं लोकगीतें मुलांच्या तोंडी असतात. पण लोकगीतांत व्यक्त होणाऱ्या भावना प्राथमिक स्वरूपाच्या असल्यामुळें आजच्या आपल्या सामाजिक रीतीरिवाजांना व मूल्यांना अनुसरून त्यांत फेरबदल करूनच तीं लहान मुलांना दिली जाणें इष्ट आहे. या गोष्टीकडे चालक-शिक्षकांनीं लक्ष द्यायला हवें आणि त्यासाठीं संशोधनहि व्हायला हवें. गिजुभाईंच्या देखरेखीखालीं अशाप्रकारचें संशोधनाचें काम सौराष्ट्रांतील कांहीं लोकगीतांबाबत थोडेंफार झालें होतें. पण हें सर्व प्रान्तांतून व विशेष सखोल विचार करून व्हायला हवें.

बालगीतांचे त्यांच्या विशिष्ट कार्यांप्रमाणे जसे प्रकार असतात तसेच मुलांच्या वयाला अनुसरूनही कांहीं प्रकार करण्याची आवश्यकता आहे. याचा खास उपयोग बालमंदिरांना तर आहेच, कारण तेथे मुलांच्या वयाला व काम करण्याच्या शक्तीला अनुसरून कांहीं विभाग केलेले असतात. पण पालकांना घरीं गाणीं म्हणण्याच्या दृष्टीनेही याचा उपयोग आहे. बालमंदिरांत सामान्यपणें २॥ ते ६ वर्षांचीं मुलें असतात. त्यांचे वयाप्रमाणें विभाग करावयाचे झाल्यास २॥ ते ३॥, ३॥ ते ४॥ व ४॥ ते ६ असे तीन मुख्य विभाग करतां येतात. कारण या काळांत मुलांच्या शारीरिक व मानसिक वाढीच्या कक्षेप्रमाणें असे तीन विभाग करणें सोईचें असतें. कोठे कोठे दोनच विभाग करतात. हे विभाग याप्रमाणे करणें जरी सोईचें असलें तरी वय हें त्याचें गमक नाहीं. मुलाची समज शक्ति, कार्यकुशलता व भाषाविकास ह्या गोष्टी ध्यानांत घेऊन विभाग करावयास हवेत. त्यादृष्टीने लहान मुलांचा पहिला विभाग, त्यापेक्षा थोड्या मोठ्या मुलांचा मध्यम किंवा दुसरा विभाग व मोठ्या मुलांचा तिसरा विभाग असेच तीन वर्ग समजणें अधिक योग्य ठरतें. या विभागांच्या दृष्टीनें बालगीतांत भाषा विषय व चाली यांची निवड व्हायला हवी. त्या दृष्टीनें प्रत्येक विभागाची विशेषता ध्यानांत घेऊन काय असावें तें पहावयास हवें. तसा थोडासा विचार पुढें केला आहे.

पहिला विभाग (२॥ ते ३॥) : या वयांतील मुलांचा भाषाविकास सामान्य असतो. त्यांच्या बोलण्यांत येणाऱ्या शब्दांची संख्या लहान असते. पण त्यांना पुष्कळ शब्द माहीत असतात. तरी या दोन्ही प्रकारच्या शब्दांचे स्पष्ट अर्थ मुलांना माहीत नसतात असें आढळतें. कांहीं शब्द ऐकून ऐकून मुलांच्या तोंडीं बसतात, पण शब्दांचे अर्थ समजण्यास योग्य तो अनुभव मुलांना नसतो. वाक्येंदेखील मुलांना मोठीं किंवा गुंतागुंतीचीं समजत नाहींत. त्यांच्या स्वतःच्या उपयोगांत साधीं वाक्यें असतात. म्हणून या वयासाठीं ज्या बालगीतांची निवड करावयाची, त्यांतील शब्द सोपे म्हणजे मुलांना कळतील असे असावेत व गाणीं लहान असावींत. नेहमीच्या उपयोगांत येणारे जोडाक्षरयुक्त कांही शब्द असले तरी हरकत नसते. कारण त्यांचे अर्थ व उच्चार मुलांना माहीत झालेले असतात. गीतांत शब्दांच्या लयबद्धतेला

या विभागाच्या दृष्टीने खास महत्त्व आहे. म्हणूनच अर्थ समजला नाहीं तरी त्यांतील लयबद्धता व प्रास अनुक्रम यामुळे मुलांना तसलीं कांहीं गीतें विशेष प्रियही वाटतात. गीतांच्या चाली मुलांना म्हणण्यास सोप्या जातील अशा असाव्यात, पण त्यांत वैविध्यही असणें आवश्यक असतें. एकाच चालीचा सदोदित उपयोग करणें योग्य नाहीं. गीतांत तालाचें स्वरूप मुलांना ठेका देतां येईल असें असावें. या वयांतील मुलांसाठीं गीतांचे विषय कोणते असावेत हीं गोष्टही महत्त्वाची आहे. त्यासाठी या काळांतील मुलांना कोणत्या गोष्टी आकर्षित करतात व त्यांची समजण्याची कक्षा काय असते, हें विचारांत घ्यायला हवें. विषय निवडतांना तो मुलांच्या सामान्य वातावरणांतील असावा लागतो. या वयांतील मुलांना मधुपक्षी विशेष प्रिय असतात. त्याचें कारण म्हणजे त्यांचे आकार, रंग, हालचाल व आवाज यामुळें मुलें त्यांच्याकडे आकर्षित होतात. मुलांच्या नेहमीच्या परिचयाचे पशुपक्षी म्हणजे चिमणी, कावळा, मोर, पोपट, कुत्रा, गाय, उंदीर, मांजर वगैरे असतात. या पशुपक्षी चित्रांकडे मुलें जिज्ञासेने पाहतात व त्यांत स्वत:च्या भावनांची मिसळ करतात. म्हणूनच पशुपक्ष्यांना प्रेमानें खायला देणें, अपघातांपासून त्यांचें संरक्षण व्हावें असा विचार करणें वगैरे गोष्टी मुलांच्या विचारांत प्रतिबिंबीत होतात. यांत प्रेमभावना म्हणजे आपुलकी ही गोष्ट विशेष आढळते. दुसरें म्हणजे जिज्ञासाही डोकावत असते. या वयांतील मुलांना गतिमान गोष्टींचेही विशेष आकर्षण असतें. म्हणून पशुपक्ष्याचें उडणें, धावणें, चालणें वगैरे हालचाल, शिवाय टांगा, बैलगाडी, मोटर, सायकल, आगगाडी यांत दिसणारी गति यांविषयीं मुलांना कुतुहल असतें, म्हणून या गोष्टीं नाहीं बालगीतांत स्थान हवें. या वयांतिल मुलांत अभिनय व नाटक या गोष्टीही मोठ्या प्रमाणांत आढळतात. घरोघर तें दिसतच असतें. कारण मुलें निरनिराळ्या प्रकारांची नक्कल व अभिनय करून आपलें नाट्यप्रेम व्यक्त करतात व मोठ्यांनाही त्यांत मजा वाटते, म्हणून तीं त्यांना प्रोत्साहन देत असतात. भांडीवाली, दहीवाली, दूधवाली, फेरीवाला, म्हातारीं म्हाणसें व पशुपक्षी आणि इतर वाहनांच्या हालचाली या सर्वांना या वयांतील मुलांच्या नाट्यांत स्थान मिळतें. या गोष्टीचा विचार करून या वयांतील मुलांसाठीं अभिनय गीतांची रचना व्हावयास हवी पण अभिनय सोपे हवेत. सामान्य शारीरिक खेळही मुलांना आवडतात म्हणून धांवणे, बसणें, उठणें, वाहनांप्रमाणें किंवा पशुपक्ष्यांप्रमाणें चालणें वगैरे गोष्टींचीं निवड अभिनयाच्या दृष्टीनें गाण्यांत केली जाणें इष्ट आहे.

दुसरा विभाग (३॥ ते ४॥) : या वयांतील मुलांच्या आवडीनिवडी पाहिल्या विभागासारख्याच असतात. तरी या काळांत मुलांचा भाषाविकास अधिक झालेला असतो. त्यांचा वापरण्याचा व समजण्याचा शब्दसंग्रह वाढलेला असतो. निरनिराळे अनुभव जसे जसे जास्त मिळत जातात तशी शब्दांतिल अर्थांची स्पष्टताहि होत जाते. शारीरिक कार्यशक्ति व समजशक्ति या वयांत वाढलेल्या असतात. म्हणून मुलांसाठीं गीतांची निवड करतांना पहिल्या विभागाप्रमाणेंच सर्व गोष्टींचा विचार करून त्याबाबत जरा वरची कक्षा घ्यावयास हवी. गाणींहि थोडी लांब असावींत. या वयांत अर्थ स्पष्ट करणारे हावभाव मुलें करूं शकतात. त्यांची विनोद समजण्याची शक्ति विकसित होत असलेली आढळते. त्यामुळें गीतांत त्यांनाहि स्थान असतें. भाऊ–बहिणी, आजा-आजी, काका, मामा वगैरे नातेवाईकांचेंहि आकर्षण मुलांना असतें. त्यांत त्यांची प्रेमभावना व नातेवाईक कशाप्रकारें प्रेम करतात तें समजणें, या दोन्हीं गोष्टी आढळतात. म्हणून बालगीतांत त्या गोष्टींना स्थान मिळावयास हवें. या



वयांत बऱ्याच खेळगीतांचा उपयोग मुलें करूं शकतात, कारण निरनिराळ्या क्रिया करून खेळ खेळणें त्यांना जमतें. कूचगीतें मुलांना विशेष प्रिय असतात. कारण तालाच्या ठेक्यावर पाय जोरांत टाकणें व हाताची हालचाल करणें त्यांना विशेष आवडतें. नृत्यगीतें म्हणजे गर्बा, रास, फेर वगैरे मुलांना प्रिय वाटत असतात. अभिनयगीतांची कक्षाही जरा वरची असावयास हवी. म्हणजे त्यांत शारीरिक हालचालीबरोबर भाव व्यक्त करण्याचें थोडेंफार कामही मुलांना जमणें शक्य असतें. म्हणून गाडी चालवणें, नांगरणें, प्रेमभावना व दुःख प्रगट करणें वगैरे गोष्टींचा समावेश अभिनयांत होणें शक्य असतें.

तिसरा विभाग (४॥ ते ६) : या वयांत मुलांना सामान्यपणें भाषेच्या बारीकसारीक गोष्टीही अवगत होतात व त्यांचें व्याकरणाकडे लक्ष असतें. म्हणजे मुलें व्याकरणाचे नियम समजतात असें नाहीं. पण भाषेंतील शुद्धाशुद्धतेचें कांहींसें स्वरुप त्यांना कळूं लागतें. क्रियापदांचीं निरनिराळीं रुपें व काळही त्यांना समजतात. त्यांच्या भाषेंत शब्दांचे सर्व प्रकार त्यांतील अर्थाच्या व उपयोगितेच्या दृष्टीनें योग्यप्रकारें वापरात आणले जातात. गुंतागुंतीची व मिश्र प्रकारची आणि लांब अशी वाक्यरचना हीं मुलें उपयोगांत आणतात. प्रत्यक्ष वापरण्याच्या व समजण्याच्या त्यांच्या शब्दसंग्रहांत या काळांत मोठ्याच प्रमाणाने वाढ झालेली असते. त्याचप्रमाणें अनुभवांत वाढ होत असल्यामुळेंच त्यांतही भिन्नभिन्न प्रकार येत असल्यामुळें मुलांना शब्दांचे अर्थही मोठ्या प्रमाणांत स्पष्ट होत असतात. या काळांत त्यांची क्रियाशक्ति तर विशेषच विकास पावलेली असते, त्यामुळें बऱ्याच धडपडीच्या हालचाली करण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते. व्यवहारांतील देवघेवीचे प्रकार समजून घेण्याची त्यांची कक्षाही वाढलेली असते. तेव्हां या वयांतील मुलांसाठीं गाण्यांची निवड करतांना पहिल्या दोन विभागांतील सर्व गोष्टींचा समावेश करून, त्यांची कक्षा वरच्या दर्जाची ठेवावयास हवी. म्हणूनच गाण्याचे विषय व चाली यांत जास्त विविधता यावयास हवी. सामान्य व्यवहारांत प्रदर्शित होणाऱ्या भावना या वयांत मुलांना समजतात व कांहीं मुलांना त्यांतील बारकावेही हेरतां येतात. मुलांत विनोदशक्ति व सहानुभूति या वयांत विशेष आढळतात. सहकार्य करण्याची शक्यता ही या वयाची एक विशेषता आहे. त्यामुळें एकमेकांना मदत करण्यास मुलांची तयारी असते. आतां त्यांची दृष्टी घरांतून बाहेर जाण्याची विशेष असते. त्याला कारण म्हणजे विकसित पावणारी सामाजिक भावना होय. यांतच व्यक्तिव्यक्तींतील वेगवेगळ्या संबंधांना स्थान मिळूं लागतें. या वयांतील मुलांचे खेळाचे प्रकार जोरदार, कौशल्याचे, सहकाराचे व कांहींशा नियमांनी बांधलेले असतात. या सर्व गोष्टींचें प्रतिबिंब त्यांच्यासाठीं निवडण्याच्या बालगीतांत यावयास हवें आणि याच दृष्टीनें विशेष अशा अभिनयगीतांना या वयांत स्थान मिळावयास हवें. गर्बा व रास या वयांतील मुलांना चांगलींच जमतात. पण त्यांची संवय प्रथमपासून नसली, तर शिकण्यास पुरेसा वाव द्यावा लागतो म्हणजे त्यांत उत्तरोत्तर विकास करून घेण्याची त्यांची तयारी होते. श्रवणगीतांची कक्षाही उच्च प्रकारची असावी. त्यांत बऱ्याच गोष्टी समाविष्ट करतां येतात व अन्य भाषांतील गीतें, त्यांच्या चाली व शब्दलालित्य आणि कुतुहलता यामुळें मुलांना प्रिय होऊं शकतात. आंतरभारतीच्या कल्पनेचा विकास व्हावा या दृष्टीने अन्य भाषांतील गीतांनाही या वयांत थोडेंफार स्थान देणें आवश्यक व इष्ट आहे. गीतांतून गोष्ट सांगणें किंवा प्रसंगाचें वर्णन करणें यांनाही या वयांतील मुलांच्या समजण्याच्या कक्षेप्रमाणें अवकाश असतो.

मुलांच्या या तीन विभागांचा विचार त्या त्या कक्षेप्रमाणे केला जाणें आवश्यक आहे. पण त्यांत अनुल्लंघनीय बांध असूं नयेत. अधूनमधून लहान मुलांना मोठ्या मुलांचीं गाणीं ऐकावयास मिळालीं, तर हरकत नसते. पण त्याचें प्रमाण काय असावें हाच मुख्यतः विचार करण्याचा प्रश्न आहे. दुसरें म्हणजे लहान मुलांचीं गाणीं मोठ्यांना तर आवडतातच. कारण त्यांना आता तीं संपूर्णपणें समजतात व मानवाच्या रूढीप्रिय स्वभावाप्रमाणें त्यांचें त्यांना विशेष आकर्षणही वाटतें.

—स. आ. केळकर

बालकांची प्रगति-नोंद

लेखांक ३ रा. : संचयशील प्रगति-नोंद

(यापूर्वीचा लेख ऑक्टोबरच्या पत्रिकेंत आलेला आहे-सं.)

कलाकौशल्याच्या हालचालींचा विकास : कोणत्याही साधनाच्या उपयोगांत बालक प्रारंभिक बुद्धि दर्शवतो का ? या साधनाच्या उपयोगांत त्याचें असें कांहीं वैशिष्टय असतें का ? सर्व प्रकारचीं साधनें वापरून पाहतो का, कीं जे खेळ माहितीचे आहेत तेच तो खेळत बसतो, यावरून त्याचें अभिरुचिवैशिष्टय कळून येतें. खेळत असताना आणखी एक गोष्ट लक्षांत घ्यायची ती म्हणजे त्याचें 'अवधान क्षेत्र'-एकदा खेळ जेव्हां निवडतो तेव्हां त्या एकाच खेळावर पुष्कळ वेळ रमतो कीं थोडा वेळ एक साधन, नंतर लगेच दुसरें मग तिसरें अशा प्रकारें एकावरून दुसऱ्या गोष्टीकडे त्याचें लक्ष फुलपाखरासारखें उडत रहातें ? खेळत असताना त्याला मौज वाटते का ? चेहऱ्यावर आनंद, उत्साह दिसतो, कीं कांहींच भावना नसतात ?

खेळ किंवा साधनाच्या उपयोगांत बालकाच्या कल्पनाशक्तीचें आपण बारकाईनें अवलोकन केलें पाहिजे. बाधकामाचे ठोकळे, शोभारचना, रेती, माती, चित्रकाम, बाहुलीचा खेळ, ट्रायसिकल, जंगलजिमसारख्या साधनांचा उपयोग करतांना त्याच्या उपयोगांत यांत्रिकपणा असतो का ? त्याच त्या गोष्टी रटाळीत असतो कीं कांहीं मौलिकता (Originality), प्रयोगशीलता, उत्सुकता, शोधक बुद्धि दिसून येते ?

कलेच्या साधनांच्या उपयोगांत शिक्षिकेनें त्याच्या पात्रतेचा थोडा अंदाज घेतला पाहिजे. चित्रकाम, मातीकाम, हुन्नर विभाग, गोष्टी सांगणें, कातरकाम, नाटकें, नृत्य या विषयांत कोणत्या गोष्टींची त्याला विशेष आवड आहे ? ज्या गोष्टी त्याला आवडतात त्यांत आपल्या मनांतील आशय योग्य तऱ्हेनें प्रकट करूं शकतो का ?

साधनांचा उपयोग जसजसा करतां येऊं लागतो तसतसा साधनांबद्दल मुलांच्या मनांत आदर वाढत असतो. म्हणून मूल साधनांची काळजी कितपत घेतें. तीं जागच्या जागीं, काम झालें म्हणजे नीटपणें जशींच्या तशीं ठेवतें का ? शिक्षिका सांगते म्हणून ठेवतें कीं त्याला स्वतःला तशी आवड आहे हें बारकाईनें पाहून या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे. साधनांच्या उपयोगांत आणखी दुसरी गोष्ट बघायची म्हणजे बालक आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीबाबत कितपत संवेदनशीलता दर्शवतें ! विविध प्रकारचीं दृश्यें, विविध प्रकारचे आवाज, आकार, रंग, गंध, अथवा घटनांनिसर्गांत होणारे बदल, सामाजिक उत्सवामुळें बदलणारें सभोवतीचें वातावरण यांतील गोष्टी लक्षांत येतात का ? त्याची याबाबत कांहीं सौंदर्याभिरुची आढळते का ? 'ताई, भिंतीवर लावलेलें चित्र मला खूप खूप आवडतें, छान आहे नाहीं ?' असें म्हणतो का ? आकाश, सूर्य, चंद्र, पानें, फुलें, फळें, बिया, जीवजंतु, कीटक यांच्यासंबंधीचें कुतुहल कितपत असतें ! गाणीं, गोष्टी, नवीन नवीन नाटकें याबाबत आपल्या आवडीनिवडी तो प्रकट करतो का ?

साधनांच्या उपयोगांत किंवा खेळांत अंतर, वेळ, अवकाश वगैरेचे अंदाज त्याला करता येतात का ?

संचयशील पत्रकांतील पहिल्या खणांत वर्गशिक्षिकेनें अवलोकनाची तारीख, वर्गाचें नांव, आपलें स्वतःचें नांव लिहायचें असतें. दुसऱ्या खणांत निवेदन पत्रकांतील (१) शरीर व हालचालींचा विकास व (२) साधनांचा उपयोग. हे दोनही मुद्दे एकाच खणांत योजले आहेत. त्याचें कारण खणाला जागा मोठी मिळावी हें आहे. ह्या दोनही मुद्यांचें विवरण स्वतंत्र पॅरिग्राफ पाडून लिहिलें म्हणजे निवेदनासाठीं पाहिजे त्या मुद्यावर मजकूर नजरेखालून घालणें सोपें होतें.

बालकें आणि शिक्षकांशीं वागणूक : या खणांत वरीलप्रमाणेंच निवेदनांतील दोन मुद्यांची नोंद करावी-(१) बरोबरीच्या मुलांशीं वागणूक व (२) वडील मंडळीशीं अथवा शिक्षिकेशीं वागणूक. या दोनही मुद्यांत बालकांच्या सामाजिकतेच्या विकासाची व त्यांतील प्रश्नांची आपल्याला कल्पना आली पाहिजे. जन्मतः मूल सामाजिक नसतें. दुसऱ्यांशीं कसें वागावें हें त्याला दुसऱ्याचें पाहूनच शिकावें लागतें. त्याला दुसऱ्यांनीं, विशेषतः कुटुंबांतील माणसांनीं ज्या प्रकारची वागणूक दिली असेल, ज्या प्रकारें वागविलें असेल त्याची प्रतिक्रिया बहुधा त्याच्या इतर मुलांशीं अथवा शिक्षिकेशीं वागण्यांत आढळते. ही वागणूक योग्य दिशेनें आहे किंवा नाहीं हें पाहून त्याला योग्य मार्गदर्शन करून देण्याची गरज असते. बालमंदिरांतील वागणें लोकशाही स्वरूपाचें असतें. येथें शिक्षिका बालकांच्या अनुमतीनें समुहाचें शासन चालवते किंवा शासन करणें हें देखील मुलांच्याकडेच सोपवते. येथें असणाऱ्या प्रत्येक मुलाला सारखे हक्क असतात. कोणाच्याही

बाबतींत पक्षपात ठेवतां येत नाहीं. कुटुंबांतील वातावरण अशाच प्रकारचें असल्यानें बालकाच्या सामाजिक विकासाला मदतरूप होतें परंतु कुटुंबांत अजून बालकाच्या सामाजिकतेचा विचार जागृतपणें होत नसल्यानें बालमंदिरावरच बालकाच्या सामाजिक विकासाची विशेष भिस्त असतें. म्हणून बालकाचें या बाबतींत बारीकसारीक निरीक्षण होणें जरुरीचें आहे.

बालकांशीं वागणूक : मूल आपल्या बरोबरच्या इतर बालकांशीं कशा प्रकारचे संबंध प्रस्थापित करतें हें पाहण्यासाठीं पहिली गोष्ट म्हणजे त्याला दुसऱ्या "लांशी खेळावेंसें वाटतें का हें पाहिलें पाहिजे. ही मुलें त्याच्यापेक्षां वयानें लहान असतात कीं मोठीं कीं बरोबरीचीं असतात, नेहमी तींच तींच असतात कीं तो नवीन नवीन मित्र बनवतो जुन्या मित्रांना विसरतो हें पाहिलें पाहिजे. मित्रांची संख्या किती असते, मित्रांशीं संबंध कशा प्रकारें आणतो, त्यांच्या बाजूला राहून ते काय करतात याचें अवलोकन करीत असतो कीं त्यांच्या क्रियांवर वागणुकीवर टीका करीत असतो ? मित्रांच्या खेळण्यांत त्याची वागणूक मित्रत्वाची म्हणजे सहकाराची असते कीं विरोधाची ? खेळांत सर्वांना रुचतील अशा सूचना करतो का ? कांहीं बोलण्याचा प्रयत्न करतो का ? बोलण्यांत सहानुभूति, प्रेम, कोमलता दिसते का ? कीं मारामारी, चिडवणें, निर्भत्सना करणें, दुसऱ्याच्या खेळांत मधें पडणें, आपली सत्ता गाजवणें, मोठेपणा राखणें, शक्ति दाखवणें, वरचढपणा करणें, दुसऱ्यांना ढकलून देणें, चावणें, चिकटणें वगैरे प्रकार असतात ?

विशेषतः दुसरीं मुले जवळ आलीं म्हणजे याची प्रतिक्रिया कशी असते ? तींत सहकाराची भावना असते कीं विरोधाची ? त्या मुलांत फूट पाडतो का ? त्यांच्यांतील कांहींना पसंत करतो, कांहींना दूर लोटतो असें करतो का ? या मुलांशीं खेळताना स्वतःचे व स्वतःच्या हक्काचें रक्षण करतो का ? तें रक्षण करण्यासाठीं बलाचा उपयोग करतो का ? कीं बोलण्यांतच तशा प्रकारचा प्रयत्न दिसतो ? समूहांतून पलायन करण्याची वृत्ति दिसते का ? त्याच्या प्रतिक्रियेंत रडणें किंवा मोठ्या मंडळींची मदत घेण्याचा प्रयत्न असतो का ? मुलांमधें तो लोकप्रिय कितपत आहे ? मुलांना तो हवासा वाटतो कीं तीं त्याच्याकडे दुर्लक्ष करतात ? कीं तीं त्याच्यावर आक्रमण करतात ?

आपलें साध्य प्राप्त करतांना तो तें कोणत्या पद्धतीनें करतो याचीही नीट नोंद घेतली पाहिजे. त्यांत धमकावण्या दटावण्यांचा उपयोग असतो का ? कांहीं आमीषें दाखवतो का ? कीं व्यवहारांत तो सौदा करतो ? देवघेव समान्तर असते कीं आपल्या साध्याकरतां लाच देण्याचा तो प्रयोग करतो. कांहीं मुलांची तऱ्हा आर्जव-विनंत्या करण्याची असते. कांहीं साध्यासाठीं मारामारी करून वस्तु मिळवतात, कांहीं आपल्या हुशारीचा (लुच्चेपणाचा) उपयोग करतात. कांहीं रडून गोंधळ करून आपलें साध्य प्राप्त करून घेतात. पण हें सर्व करीत असून देखील मुलांत त्यांचें काय स्थान आहे हें शिक्षिकेनें पाहिलें पाहिजे. इतर मुलें जेव्हां त्याचें मानतात तेव्हां त्याला स्वतःला कसें वाटते तें पाहिलें पाहिजे. कांहीं वेळां मुलें त्याला चाहतात, कांहीं वेळां त्याचा विरोध करतात, कांहीं वेळां त्याचें हंसे किंवा फजीतीही करतात, कांहीं वेळां त्याच्यावर टीका करतात. या सर्व बाबतींत याचें वळण कसें असतें याची नोंदही शिक्षिकेनें केली पाहिजे.

लहान मुलांच्या बाबतींत तो कसा वागतो ? त्याची वागणूक सुखद असते का ? त्यांचे रक्षणाची काळजी दाखवतो का ? कीं त्यांच्यावर आक्रमण करतो ? कधीं कधीं स्वतः निष्क्रिय राहून त्यांच्यांत लक्ष घालण्याची वृत्ति आढळते, कधीं लहान मुलांना विरोध तर कधीं त्यांच्याशीं स्पर्धा करण्याचीही वृत्ति आढळते. मोठ्या मुलांच्या बाबतींत वर्तन कसें असतें ? सुखद असतें का ? त्यांचें म्हणणें स्वीकारतो का ? कीं तेथेंहि स्वप्रस्थापन असतें ? मुलांच्या नेत्याची स्तुति करतो का ? कीं त्याच्याशीं स्पर्धा करण्याचा प्रयत्न असतो ?

इतर मुलें असतांना तो चांगलें खेळतो कीं नसतांना ?

शिक्षकांशीं वागणूक : बालमंदिराच्या वातावरणांत मोठ्या मंडळींत शिक्षिका, मुख्य शिक्षिका, नोकर, माळी वगैरेंचा संबंध येतो. या सर्व मंडळीचें मित्रत्व करण्याचा कीं त्यांच्या सत्तेला विरोध करण्याचा प्रयत्न असतो ? वागणुकींत स्वतंत्रता दाखवतो कीं मोठ्या मंडळीवर अवलंबन ? लाजाळुपणा, स्वभावातिरेक (Self consciousness) पलायन वृत्ति यापैकीं काय आढळतें ? मोठ्यांनीं सांगितलेलें मान्य करतो कीं त्यावर टीका करतो ? कीं सांगितलेल्या गोष्टी टाळतो ?

शिक्षिकेनें या बाबतींत तो घरीं मोठ्या मंडळीशीं कसा वागतो याचीही नोंद माहिती पुस्तकांतून पाहिली पाहिजे अथवा माता-पित्याशीं या बाबतींत बोलून माहिती मिळविली पाहिजे.

कांहीं मुलें शिक्षिकांना फार चिकटतात, तर कांहीं तिच्या वाऱ्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात. कांहींना ती सांगेल तेंच प्रमाण वाटतें, तर कांहीं नेहमी तिचा विरोध करीत राहतात. तिच्या सांगण्याचें दुर्लक्ष करतात. कांहींच्यांत खेळकरपणा आढळतो. बालकांच्या सामाजिकतेंत वयापरत्वें व अनुभवामुळें सारखा फरक पडत असतो हेंही आपण ध्यानांत घेतलें पाहिजे. संचयशील नोंदींत आपण महिन्या महिन्यानें नोंद करतों तेव्हां त्यांतील अवलोकनांत नवीन काय हें पाहिलें पाहिजे.

—शोष नामले

घर : बालगृह ता. २९-८-५८

क्षोभ-प्रक्षोभ

१

काल सकाळच्या सहलीच्या वेळीं उषा बराबर होती. फिरून येतांना कांहीं मोठीं मुलें मला भेटतात तेव्हां धांवत येऊन मला 'गुड मॉर्निंग' करतात व स्वतः वेंचलेल्या फुलांतून कांही फुलं देतात. त्यामुळें माझेजवळ खूप फुलें होतात. मी तीं फुलें माझ्याबरोबर असलेल्या मुलांना वांटून देतों.

अशीं फुलें हातात धरून उड्या मारीत मारीत प्रकाश, विजू, छोटी उषा माझे आसपास चालत असत.

आज छोटी उषा माझ्या पुढें चालत होती. ती प्रकाशला म्हणाली, 'प्रकाश, आज मी घरीं जाईन तेव्हां हीं फुलं ताईला देईन आणि सांगेन कीं हीं सर्व फुलं फुलदाणीत ठेव.'

गोष्ट अगदीं साधीच आहे. परंतु तिच्यामागील अर्थाची कल्पना आल्यानें मी आनंदात होतों.

'बालगृह' हें नांव मी याच उद्देशानें पसंत केलें आहे. मुलांच्या मनांत हेंच घर झालें पाहिजे.

आणि आज छोट्या ५ वर्षांच्या उषानें परोक्ष रीतीनें पण माझी खात्री करून दिली कीं ती बालगृहाला स्वतःच घर समजत होती.

× × ×

२

काल शुक्रवार होता.

दर शुक्रवारीं मुलें स्वतः रचलेल्या, ऐकलेल्या, वाचलेल्या गोष्टींची स्वयंस्फुरीत संवादांत नाटकें करतात.

यामध्यें मुलांची मौलिकता इतकी दिसून येते कीं त्यामुळें मला खूपच आनंद होतो. हीं मुलें नाटकें करताना त्यांच्या स्थळांच्या कल्पना वेष-योजना इतक्या विविध असतात कीं मला त्यापासून पुष्कळ नवीन शिकावयास मिळतें. पोषाखाबाबतही हीच गोष्ट दिसून येते.

वेषपरिधानाबाबत ही मंडळी साध्या कपड्यामधून पात्रानुरुप वेष तयार करतात.

नाटकांतील संवाद स्वयंस्फूरति असल्याने फार गंमत वाटते आणि त्यांत मुलांच्या बुद्धीची चमक दिसून येते.

काल एका नाटकाचा पात्र-परिचय, स्थळ, वेळ जाहीर करतांना सूत्रधाराने सकाळचा ११ चा वेळ जाहीर केला.

त्या नाटकांत एक दुधवाला येतो.

तावडतोब वजुभाई म्हणाला,

'११ वाजतां कोणी दूध घ्यायला येतो?'

ही शंका अगदीं वरोवर होती. माझ्या तें नंतर लक्षांत आलें.

मी नुसताच बसून राहिलो, ह्या अवास्तविकतेचें समर्थन कसें करतात हें पाह्यचें होतें.

पण त्यावर दुसरा विद्यार्थी शशिकान्त म्हणाला 'अरे दुधवाला दूध घालून परत जाताना हा प्रसंग घडला.'

चला. अशा प्रकारें त्यांनीं आपला मार्ग काढला.

दूधवाल्याला नाटकातून काढून न टाकतां त्याची अस्वाभाविक उपस्थिती स्वाभाविक केली गेली.

खरोखर साहित्य म्हणजे तरी काय? आपण समजलेल्या अवास्तविक गोष्टी वास्तविक वाटतील अशाप्रकारेंच पुढें ठेवतो कीं नाहीं!

अशाप्रकारें अनेक गोष्टी ही मंडळी सहज रितीनें करतात.

काल 'अति लोभाचें फळ' हें नाटक पाहतांना मला मुलांच्या नाट्यविषयक अभिनयाची कल्पना आली स्वयंस्फूरीत नाटकांतून मुलांचा बुद्धिविकास, कल्पनाविकास वगैरे गोष्टी साध्य होतीलच पण मलासुद्धां पुष्कळ शिकायला मिळतं.

आणि गंमत हीच आहे कीं या मुक्त-नाटकांसाठीं मुलें इतकीं आतुर झालेलीं असतील कीं शुक्रवार आला कीं मला आठवण करून देतील.

'काका आज शुक्रवार. आज आमचं नाटक.'

इतर दिवशीं इंग्रजी, हिंदी नाटकं ही मंडळी करतात व त्यांतही त्यांना मजा वाटते. पण त्यांत लिहिलेले व ऐकलेले संवाद म्हणायचे असतात. त्यामुळें त्यांत तीं रंगत नाहींत.

यावरून असं दिसून येतं कीं नैसर्गिक बुद्धीच्या उपयोगाचा खरा आनंद मुलांनाच वाटतो. मात्र अशा आनंदापासून दूर पळणारी मोठीच मंडळी असतात.

नाटकासारखाच आकर्षक दिवस आहे बुधवारचा. बुधवार आमचा 'प्रश्नोत्तराचा दिवस' आहे. हा कार्यक्रमही अगदीं जिवंत वाटतो. ह्यांत एक तास केव्हां निघून जातो तें कळतही नाहीं.

एकच प्रश्न विचारला जातो, पण त्या प्रश्नाला इतके फाटे फुटतात कीं तो प्रश्नसुद्धां एका तासांत संपत नाहीं.

अशा वेळीं एकाद्या तक्रारींत त्यांचा इतका वारकावा चालतो, समोरासमोर इतके मुद्दे उपस्थित होतात कीं बोलण्याची सोय नाहीं.

[पान ८ वर पहा]

नूतन बाल शिक्षण आणि संघ समाचार

मुंबई : नूतन बालशिक्षण संघाला मदत म्हणून दर वर्षी नोव्हेंबर-डिसेंबरचे सुमारास येथील बालशिक्षण जयंति निधी एकत्र करण्यांत येते. बालमंदिरांत शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक बालकाच्या पालकानें वर्षातून एक वेळा या संस्थेला चार आणे, आठ आणे अथवा १ रुपया किंवा दोन रुपये द्यावे एवढीच अपेक्षा असते. या अल्प मदतीवर संघाचें कार्य चालतें. दरवर्षीप्रमाणें याही वर्षी ठिकठिकाणच्या बालमंदिरांनीं बालमंदिरांच्या या केन्द्रीय संस्थेला मदत करावी अशी विनंती संघातर्फे करण्यांत आली आहे.

कोसबाड : ग्राम बालशिक्षा केन्द्राच्या विकासवाडी-साठीं मुंबईच्या प्रमुख नागरिकांतर्फे पालनपूरच्या नबाबसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं एक विकासवाडी योजना फंड समिति योजण्यांत आली होती. या समितीनें लिबर्टी सिनेमाच्या चालकांच्या मदतीनें एक सिनेमा योजून रु. ४१,००० चें दान मिळवून दिलें. या दानाच्या रकमेमुळें विकासवाडी योजनेच्या विकासाला जोराची चालना मिळाली आहे.

बालशिक्षकांना काम पाहिजे : कोसबाड येथील पूर्व-प्राथमिक बाल अध्यापन मंदिरांत प्राशिक्षण घेतलेल्या सात शिक्षकांना बालवाड्या व बालमंदिरांत काम पाहिजे. मनोहर खाशाबा जाधव, मु. निनाम, पो. पाडळी, जिल्हा सातारा या पत्त्यावर लिहिल्यास शिक्षक मिळूं शकतील.

श्री सरस्वति मंदिर, नवीन गोवें : संस्थेचा ४५ वा वाढदिवस नोव्हेंबर महिन्यांत सुविद्य इंजिनीयर श्री. प्रभाकर खळुराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

बालशिक्षण मंदिर सोलापूर : संस्थेचा १३ वा वार्षिकोत्सव सुप्रसिद्ध साहित्यिका सौ. मालतीबाई बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

बाल निकेतन संघ, इंदूर : संस्थेचा १९५७-५८ सालचा अहवाल प्रकाशित झाला आहे. त्यावरून संस्थेच्या दिवसेंदिवस वाढत चाललेल्या कार्याची व कार्यक्षमतेची कल्पना येते. संस्थेच्या प्रगतीबद्दल संचालकांचें आम्ही मनः-पूर्वक अभिनंदन करतों.

बालमंदिरें आणि बाल अध्यापन मंदिरांसाठीं : बालमंदिरांतील बालकांना प्रवेश देताना त्यांची कोणती माहिती संस्थेनें पालकाकडून घेतली पाहिजे याची सविस्तर माहिती देणारें माहिती पत्रक, बालकांच्या मासिक प्रगती नोंदीसाठीं विकास-प्रगतीचें संचयशील प्रगति पत्रक, पालकांना पाठवावयाचें प्रगति निवेदन पत्रक, वैद्यकीय तपासणीचें संचय-शील प्रगति पत्रक हीं सर्व पत्रकें सर्व बालमंदिर संस्थांना अत्यंत उपयोगी पडणारीं अहेत. सहा आण्याचीं तिकिटें पाठविल्यास या पत्रकांचा एकेक नमूना पोस्टानें पाठवण्यांत येईल. त्याच-प्रमाणें बालअध्यापन मंदिराच्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील अशा ३०-३२ शालेय फॉर्म्सचे नमुने छापण्यांत आले आहेत. रु. १-१२-० म. ऑ. ने पाठवल्यास या फॉर्म्सचे सर्व नमुने नू. बा. शि. संघ कार्यालय, ११८ हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४, या पत्त्यावर मिळूं शकतात.


बाल अध्यापनासंबंधींच्या जुन्या शिक्षणक्रमाची शेवटची परीक्षा : सर्व बाल अध्यापनांच्या १९५८ पर्यंत Pre P. T. C. परीक्षेस बसलेल्या परंतु एक अथवा दोन भागांत नापास झालेल्या विद्यार्थ्यांस कळविण्यांत येतें की, या वर्षी Pre P. T. C. चा शिक्षणक्रम बलल्लेला आहे. परंतु गेल्या वर्षापर्यंत ज्यांनीं जुन्या शिक्षणक्रमाप्रमाणें शिक्षण घेतलें त्यांस जर परीक्षेस बसावयाचें असेल तर त्यांना जुन्या अभ्याक्रमावर आधारलेल्या प्रश्नप्रत्रिका १९५९ सालच्या म्हणजे चालू सालच्या परीक्षेंत योजण्यांत येतील. यापुढें म्हणजे १९६० सालापासून फक्त नवीन शिक्षणक्रमाप्रमाणें परीक्षा घेण्यांत येतील. म्हणून ज्यांना जुन्या शिक्षणक्रमाप्रमाणें परीक्षा पाहिजे आहे त्यांच्यासाठी १९५९ सालची परीक्षा ही शेवटची संधी आहे. ज्या विद्यार्थ्यांना या परीक्षेस बसावयाचें असेल त्यांनीं आपापल्या अध्यापन संस्थेला आपलीं नांवें ताबडतोब कळवावीं म्हणजे त्यांची परीक्षा घेण्याची व्यवस्था होवूं शकेल.

शिशुविहार, दादर संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांस : १९६१ सालीं श्रीमती ताराबाई मोडकप्रणीत शिशुविहार, दादर संस्थेचा रौप्य महोत्सव विशेष रीतीनें साजरा व्हावयाचा आहे. तो तसा साजरा करता यावा म्हणून तीन वर्षांचा कार्य-क्रम संस्थेनें आंखला आहे. आतांपर्यंत या संस्थेंतून २००० पर्यंत मराठी-गुजराती विद्यार्थी-विद्यार्थिनी शिकून गेल्या आहेत. या सर्वांचा संस्थेला संपर्क साधता यावा म्हणून त्यांच्या पत्त्यांची संस्थेला जरुर आहे. तरी या संस्थेच्या माजी विद्या-र्थ्यांनीं आपापले संपूर्ण पत्ते या संस्थेच्या मुख्याध्यापकांकडे पाठवावे.

'शिक्षण-पत्रिके'चा जानेवारीचा अंक : नेहमीप्रमाणें पत्रिकेचा जानेवारी अंक हा प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानें विशेषांक म्हणून दिनांक २६ ला प्रकट करण्यांत येईल. या वेळच्या अंकाचा विषय 'रशियांतील बालशिक्षण' हा राहील. जीवनाच्या पुनर्रचनेंत या देशानें बालशिक्षणाला, कसें महत्त्व दिलें व त्यासाठीं काय केलें यासंबंधींच्या विविध लेखांनी हा अंक भरलेला राहील, त्याचें वाचक स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

साभार स्वीकार—नियतकालिक-अमृतमहोत्सव विशेषांक
नू. म. विद्यालय, प्रशाला, पुणें.


Ancient Roman Coin Found in Ancient Roman Coin



Ancient Roman coin found in ancient Roman coin

Ancient Roman coin found in ancient Roman coin

Ancient Roman coin found in ancient Roman coin







सुगंधित
झरणपासून
बनणारें
तेल

आपणाला त्रिविध लाभाची
खात्री देत आहे.

१. गळणारे केंस थांबवितें व केसांना तुकतुकीत बनवितें.

२ मेंदूला पोषक तत्त्व पुरवितें.

३. श्रम, वेळ व पैसा वांचवितें.

आजच एक बाटली खरेदी करा व नेहमीं वापरलें जाणारें सर्वोत्तम केशतेल घरबसल्या तयार करा.

सर्वत्र मिळतें.


: सोल एजंट :
सुगंध वर
खाटिया, अहमदाबाद

टेलिफोन नं. ३०५७५
सी. नरोत्तम अँड कं.
मगलदास रोड, मुंबई २

M. P. S.




मुद्रक व प्रकाशक:—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर-मुंबई १४.
मुद्रणस्थान:—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, मोग्रास रोड, दादर, मुंबई १४.



प्रजासत्ताक-दिन-विशेषांक

सोव्हिएट बालशिक्षण

जानेवारी १९५९



वय वाढतें आहे
परंतु केंस मात्र
पांढरे होत नाहींत





लोमा

केंसांना नैसर्गिकरीत्या काळेभोर करण्यासाठीं जगभर मान्यता पावलेले.

कोणत्याही अवस्थेंतील डोक्यावरील केंस कितीही पांढरे झालेले असोत लोमा ते खात्रीनें काळे केल्याशिवाय राहणार नाहीं!

लोमा कलप नव्हे परंतु तें नैसर्गिकपणें केंस काळे करणारें असून त्याचबरोबर केंसांची वाढ करणारीं नैसर्गिक द्रव्यें त्यांत असलेलें तें एक हेअर ड्रेसर आहे...त्याला अत्यंत आल्हाददायक सुवास असतो.

सोल एजंटस: एम. एम. खंभातवाला, अहमदाबाद १.
एजंटस: सी. नरोतम ॲन्ड कंपनी मंगलदास रोड, मुंबई २.

MPS-MAR

फॅन्सी नायलॉन साडी, नायलॉन जेकार्ड, दोरिया,
क्रेप, जॉर्जेट, टॉफेटा, सॅटीन, फ्लावर वगैरे
निरनिराळ्या रंगांत, तसेंच आकर्षक डिझाइन्समध्यें छापलेले मिळतात

: टेलेग्राम :
'BIPFABRIC'

: टेलिफोन :
मिल : ६०५०४
शॉप : ३९७४९

BIPIN SILK MILLS CO. PRIVATE LTD. ☆ BOMBAY (INDIA) ☆

क्लॉथ शॉप
गोविंद गल्ली,
मूळजी जेठा मार्केट,
मुंबई २

BIPSU FABRICS

: रीटेल शॉप :

बिपीन सिल्क मिल्स कं. प्रायव्हेट लि.,

१२ दादर रोड; मुंबई २८
(इंडिया)

A (ROHIT) GROUP OF ENTERPRISES

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल

भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई — उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक

कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी — कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे

चिटणीस : श्री. शेष नामले — उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण संस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपांत पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गांतून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठीं संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, नूतन बाल-शिक्षण संघ,
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे — श्री. अनुताई वाघ

सौ. सरलाताई देवधर — श्री. भा. धों. फर्वे

सौ. मालिनीबाई परांजपे

अनुक्रमणिका

प्रौढ विभाग

संपादकीय—	शेष नामले
स्वातंत्र्य आणि व्यक्ति विकास—	,,
वोल्हएत युनियनमधील पूर्वप्राथमिक संस्थांची साधनसामुग्री व शिक्षण—	,,
बालकांसाठीं प्राण्यांचा कोपरा—	,,
रशियातील बालोद्यानें—	,,
लेनिनग्राडचें प्राशिक्षण विद्यालय—	,,
शैक्षणिक शासनाचें एकमांतील कार्य—	,,
पाठ शिक्षण व संघ समाचार इ.—	,,

: आधसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक

: संपादक :

श्री. शेष नामले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई-१४.	३७ नये पैसे

महत्वाच्या सूचना.

ग्राहकांस—

१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.

'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन, विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल-शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नांवांवर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारां-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नांवाचें एक सदर चालविण्यांत येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्यांना स्थान देण्यांत येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यांनीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे-पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

☆

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक १०] मुंबई [जानेवारी १९५९

संपादकीय

भारतीय 'प्रजासत्ताक-दिना'च्या महोत्सवांत सहभागी होण्याच्या दृष्टीनें 'शिक्षण-पत्रिका' विशेषांकाच्या रुपांत प्रकाशित करण्याची प्रथा गेलीं कांहीं वर्षें पाडण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहों. या विशेषांकाला दलदार अंकाचें रंगरूप जरी आम्हाला देतां येण्यासारखें नसलें, तरी राष्ट्रीय महोत्सवाच्या या पर्वकालांत बालशिक्षणाच्या एकाद्या विशेष प्रश्नावर लक्ष वेधण्याचा प्रयत्न आम्ही करीत असतों.

या वर्षी इंडो-सोविएत कल्चरल सोसायटीच्या कृपेनें मला सोविएत युनियनमधील बालसंगोपन आणि बालशिक्षणाशीं संबंधित कांहीं संस्था बघायला मिळाल्या. त्या देशांत नव्या प्रकारची समाज रचना करण्याचा एक महान प्रयोग गेल्या चाळीस-एकेचाळीस वर्षांपासून सुरु झाला आहे हें सर्वांना विदितच आहे. कम्युनिझमच्या या प्रयोगाविषयीं अनुकूल अथवा प्रतिकूल विचार व्यक्त करणाऱ्या सर्वांनाच या देशाविषयीं अत्यंत कुतुहल निर्माण झालें आहे.

सोविएत युनियनच्या प्रगतीचा विशेष असा कीं चाळीस वर्षांपूर्वी या देशांत ८५ टक्के लोकसंख्या निरक्षर होती. आपल्या येथें आहे त्याप्रमाणें निरनिराळे धर्म, भाषा, चालीरीतींचें वैविध्य त्याही देशांत होतें. मूठभर लोकांची श्रीमंती आणि विराट समुदायाच्या नशीबीं दारिद्र्य आणि निर्वाह-चिंता अशी तिथेंही स्थिति होती. या सर्व परिस्थितींतून तेथील समाजसर्वसत्तावादानें मार्ग काढून या राष्ट्राला जगांतील पहिल्या दोन राष्ट्रांतील स्थान प्राप्त करून दिलें आहे. ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रांत या राष्ट्रानें सर्व जगाला दिपवून टाकलें आहे. त्यामुळें त्याच्या प्रगतीसंबंधानें सर्वांना जिज्ञासा आहे.

या देशांतील बालसंगोपन आणि शिक्षणाच्या प्रश्नाकडे लोकांचें सुरूवातीपासूनच विशेष लक्ष आहे. सात वर्षांपर्यंतच्या बालकाच्या संगोपनाची व शिक्षणाची जबाबदारी मुख्यत्वें बालकांच्या पालकांवर असली, तरी येथील शासनसंस्था प्रत्येक बालकाच्या योग्य विकासासाठीं बालकाच्या जन्मपूर्व कालापासून सर्व प्रकारची काळजी घेते. त्यामुळें बालसंगोपनाच्या आणि शिक्षणाच्या प्रश्नांत या देशाला जो अनुभव मिळाला आहे त्यापासून आपल्याला पुष्कळ शिकण्यासारखें आहे असें मला वाटतें.

जगांतील मोठमोठ्या संस्कृतींच्या संग्रहाचा हा काल आहे. पाश्चात्य संस्कृतीसंबंधीं आपली साचेबद विचारसरणी असेल तर ती टिकण्याची शक्यता नाहीं. मार्क्सवाद आणि कम्युनिझमनें निर्माण केलेलें तत्त्वज्ञान आणि त्यावर आधारलेली या देशाची नवसंस्कृति याकडे आपली डोळेझाक करून आपण आपली आध्यात्मवादी संस्कृति टिकवूं शकणार नाहीं. या संस्कृतीचीहि आपण पूर्वग्रहरहित अशी सर्वांगी समीक्षा केली पाहिजे प्रत्येक संस्कृति स्वभावतः संचयशील असते. भारतीय संस्कृतीचा इतिहास त्याची साक्ष देईल. सर्व दृष्टीनें विचार केल्यास या देशाविषयीं आपल्या येथें अभ्यास झाला पाहिजे असें मला वाटतें.

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानें या देशांतील बाल-शिक्षणासंबंधीचा हा विशेषांक 'शिक्षण-पत्रिके'च्या वाचकांना सादर करतांना मला विशेष आनंद वाटतो. या प्रसंगीं सोविएत युनियनमधील संस्था पाहण्याचा योग ज्या इंडो-सोविएत सोसायटीनें मला प्राप्त करून दिला त्या संस्थेचेही मी मनःपूर्वक आभार मानतों. 'पत्रिके'सारख्या स्थलमर्यादित मासिकांत जी कांहीं बाल-शिक्षणासंबंधीची कल्पना थोडक्यांत मांडता आली तीं 'पत्रिके'चे उदार वाचक गोड करून घेतील अशी माझी अपेक्षा आहे.

स्वातंत्र्य आणि व्यक्तिविकास

"काय हो, तें खरं आहे का—म्हणे रशियांत ते लहान मुलांना खाऊपिऊ खूप खूप घालतात—चांगलं धष्टपुष्ट करतात, पण त्यांच्या डोक्यांतून मेंदू काढून घेतात" एका उच्च शिक्षणाधिकाऱ्यानें मला विचारलें.

मी म्हटलें, "मेंदू-बुद्धि काढून घतल्यावर अंतराळांत स्पुटनिकं सोडतां येतील का? सूर्यामोंवती उपग्रह यशस्वी रीतीनं सोडणं बुद्धि नसलेल्यांना शक्य होईल का?"

"त्या यांत्रिक बुद्धीला काय महत्व आहे! तिथं कांही व्यक्ति-स्वातंत्र्य आहे का? व्यक्तीला आपलीं जीवनमूल्यें ठरवण्याचा अधिकार आहे का? हे रशियन लोक जन्म-पूर्वकलापासून बालकाला आपल्या ताब्यांत घेतात. अशी कांही परिस्थिति त्यांच्या सभोवती निर्माण करतात कीं प्रत्येक मुलाचा नेमका पुढें कम्युनिस्ट होतो. काय, हें काय स्वातंत्र्य आहे क'? रशियांत कम्युनिझमच्या विरुद्ध बोलायची सोय नाहीं—बोललांत कीं नुसती जीभच नव्हे तर तुमचा गळाच कापून खाली ठेवतील हे रशियन लोक." शिक्षणाधिकाऱ्यानें आपला रशियन लोकांविषयींचा अभिप्राय स्पष्टपणें सांगितला.

मी म्हटलें, "तुम्ही फार चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. रशियाहून आल्यापासून स्वातंत्र्य आणि व्यक्तिविकासा-संबंधीच्या कांहीं गोष्टींचा मी फेरविचार करूं लागलों आहे."

"अहो हें असं व्हायचंच. रशियानं मिळविलेल्या सिद्धीनं अन् तिथल्या वैभवानं आपल्या येथील तरुण मंडळी दिपून जातात आणि मग कम्युनिस्ट तरी काय बोलेल इतक्या आत्म-विश्वासानं ती येथें कम्यनिझमचा अन् रशियाच्या 'स्वर्गाचा' प्रचार करूं लागतात."

आमचं हें संभाषण एक अध्यापिकाबाई शांतपणें ऐकत होत्या. त्या माझ्याकडे पाहून हंसल्या अन म्हणाल्या—'नामल्यांचं हें तुम्ही म्हणतां असंच झालं आहे. रशियांतल्या नंदनवनांतल्या सिद्धीनं ते फार प्रभावित झाले आहेत. मी म्हणतें रशियानं भौतिक प्रगति साधली असेल; खायला प्यायला तेथें तबेल्यांतल्या पशूंप्रमाणं भरपूर मिळत असेल पण तें सर्व स्वातंत्र्याचें मोल देऊनच ना? इंग्रजांचं सुराज्य होतं कीं आमच्या येथें! पण आमची तहान त्या सुराज्याच्या अमृ-तानं भागत नव्हती. आम्हाला खंडतल स्वराज्यच पाहिजे होतं. सोन्याचा असला तरी व्यक्तिविकासाच्या दृष्टीनें तुरूंगच ना? तिथें मोकळ्या मनानं बोलतां येत नाहीं, लिहितां येत नाहीं आणि वाचन पण मिळत नाहीं म्हणे."

मी म्हटलें "सोविएतमधें स्वातंत्र्य आहे कीं नाहीं, तें कितपत आहे याची निश्चित मला कल्पना नाहीं परंतु व्यक्तिविकास मात्र तेथें दिसला. तेथें व्यक्ति-व्यक्तींत समानतेची व बंधुतेची म्हणजे परस्पर सहकाराची भावना दिसली. सामान्य लोकांच्या व्यवहारांत लबाडी सापेक्षतः कमी दिसली. तेथील समाज सापेक्षतः एकमेकाला शोषून अथवा लुबाडून जगत नाहीं. व्यापक प्रमाणांत फसवेगिरी तेथें दिसत नाहीं. स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमीपणा वाटत नाहीं. तेथें दलितवर्ग सापेक्षतः दिसत नाहीं. कुत्र्या मांजराप्रमाणें रस्त्याच्या फूटपाथवर दुर्लक्षित पडलेलीं माणसें दिसत नाहींत. उलट प्रत्येक स्त्री-पुरुष आपापल्या कार्यांत मग्न दिसतात. निश्चिंत दिसतात. लोकांच्या बोलण्या-चालण्यांत सौजन्य दिसतें, त्यांच्यांत शिस्त दिसते, स्वदेशाविषयीं उत्कट प्रेम दिसतें, पाहुण्या-विषयीं आस्था दिसते, ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रांत तीं पुढारलेलीं दिसतात. बहुतेकांना आपल्या कार्याचा आनंद वाटतो आहे असें दिसतें. याला व्यक्तिविकास म्हणाल कीं नाहीं!" मी त्या दोघांना विचारलें.

अध्यापिकाबाई म्हणाल्या "ह्या गोष्टी इंग्लड-अमेरिकेसारख्या लोकशाहींत नाहीं का दिसत? त्याला लोकांची मुस्कटदाबी कशाला करायला पाहिजे?"

मी म्हटलें, "प्रत्येक देशाची परिस्थिति-प्रश्न निरनिराळे असतात. एका ठिकाणीं जी गोष्ट शक्य होते ती गोष्ट तशीच दुसरीकडे शक्य झाली पाहिजे असें कसें म्हणता येईल? मी जें तेथील व्यक्तींचें वर्णन केलें त्याला तुम्ही व्यक्तिविकास म्हणत असाल तर मी रशियांतील व्यक्ति-स्वातंत्र्यासंबंधीं कांहीं तेथील कल्पना मांडण्याचा प्रयत्न करतों."

शिक्षणाधिकारी म्हणाला, "तेथें लोकाची बुद्धि साचेबंद करण्यांत येते या गोष्टींचें तुम्ही समर्थन कसें करूं शकता? व्यक्तीला प्रत्येक गोष्टीसाठीं समाजसत्तेच्या तोंडाकडे बघावें लागलें तर ती स्वतंत्र कशी राहूं शकेल? समाजसत्तेच्या विरुद्ध बोललं कीं जिथें शिरकाण होतं. तिथें व्यक्तीवर जबर-दस्ती होत असली पाहिजें हें निश्चित."

मी म्हणालों "जबरदस्ती कांहीं बाबतींत असेल देखील. शासन जोपर्यंत आहे तोपर्यंत कोणत्या ना कोणत्या प्रकारची जबरदस्ती-सरकारची किंवा समाजाची-असणारच. आपल्यावरही आपल्या सरकारची कांहीं बाबतींत जबरदस्ती होतेच कीं नाहीं? स्वातंत्र्य आणि जबरदस्ती किंवा नियमन म्हणून पाहिजे तर या गोष्टी

एकाच नाण्याच्या दोन बाजूसारख्या आहेत. बाल-शिक्षणांत तरी निर्बंधांच्या कल्पनेशिवाय स्वातंत्र्याच्या सिधान्ताला कांहीं अर्थच असूं शकत नाहीं. स्वातंत्र्य हें प्रगतिशील असतं. त्याचा जसजसा सतत विकास होतो तशीं बंधनें मर्यादित होतात. अगदीं सुरुवातीला मुलांचं रक्षण करण्यासाठीं त्यांच्या शारीरिक अन मानसिक हालचालींवर निर्बंध घालावे लागतात. बालकाला जसजसें समजूं लागतें, आपल्या जबाबदारीचें भान येतें तसतसे निर्बंध कमी करूनच मुलाचा विकास साधावा लागतो."

"म्हणजे देशांतल्या समग्र प्रजेला लहान मुलांसारखं मूर्ख समजणार का तुम्ही?" तो शिक्षणाधिकारी तडकला.

मी म्हटलें "चांगला शिक्षक बालकाला मूर्ख समजत नाहीं. बालकाच्या शक्तीवर आणि सत्प्रवृत्तीवर तो पूर्ण विश्वास ठेवतो. आणि असा विश्वास असतो म्हणूनच तो त्याच्या विकासाचं काळजीपूर्वक रक्षण करूं शकतो-आणि रक्षणासाठीं बंधन घालूं शकतो."

"म्हणजे रशियांत व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर जे निर्बंध दिसतात ते यथाकाल कमी होतील असं म्हणायचं आहे का तुम्हांला!" अध्यापिकाबाईंनीं माझा मुद्दा स्पष्ट केला. म्हणाल्या, "बाकी तुम्ही म्हणता तेंही थोडंसं खरं दिसतं आहे. रशिया झपाट्यानें बदलत चालला आहे ही गोष्ट कोणालाही कबूल केली पाहिजे. परवाच तेथील पिनल कोड (दंडनीति) बदलल्याचं मी वाचलं आहे."

मी म्हटलं "रशिया बदलतो आहे कीं नाहीं याची चिंता मला नाहीं. आपण विचार बरोबर करतों कीं नाहीं याची मला काळजी वाटते. प्रगतिशील व्यक्ति, समाज आणि संस्था सारख्या बदलत असतात. त्यांच्यासंबंधी स्थिर स्वरूपाचीं मतं बनवून त्यावर विवाद करण्याची आपल्याला संवय असते. प्रगति प्रवाही असते. या क्षणाला इथें तर दुसऱ्या क्षणाला तिची पार्श्वभूमि पार बदलून जाते ही गोष्ट आपण विचारांत-लक्षांत घेतली पाहिजे."

"म्हणजे मग 'रशियाचा भूतकाळ लक्षांत घेऊं नका. तो पार बदलत चालला आहे; ही त्याची बदलाची दिशा लक्षांत घ्या' असंच तुम्हाला म्हणायचं आहे तें आम्ही समजलों; पण समाजसर्वसत्तावादानं व्यक्तीचं स्वातंत्र्य मर्यादित होतं कीं नाहीं यासंबंधी तुम्ही तिथं काय पाहिलं?"

मी म्हटलं-"मला तिथं व्यक्तीच्या स्वातंत्र्याला मर्यादा दिसली पण त्याचबरोबर प्रजेच्या विकासक्ष स्वातंत्र्याला भरपूर अवकाश दिसला."

"अवकाश कसा दिसला तें सांगा ना," अध्यापिकाबाईंनी मला निश्चित मुद्दा मांडायला सुचविलें.

मी म्हणालों, "मी शिक्षक असल्यानें स्वातंत्र्याचा अर्थही माझ्याच दृष्टींतून करतों. स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या विकासाला पोषक अशा साधनसामग्रीचें वातावरण. ही साधनसामग्री निर्माण करणं ही स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचाच एक भाग आहे. विकसणाऱ्या व्यक्तीला जगायचं कसं हीच विवंचना असली तर विकासाचीं पावलं कशीं पुढें पडणार? आज भारतांत हेंच चाललं आहे. कमीत कमी साधनसामग्रीसुद्धां आपल्याजवळ नाहीं. प्रत्येक व्यक्तीला जगण्यापुरती तरी साधनसामग्री मिळाली पाहिजे. ही साधनसामुग्री निर्माण करायला सोविएतनें सर्वसमाजसत्तावादी (Communist) आर्थिक जीवनरचना केली त्यामुळें थोड्या काळांत तेथें सर्वांना सापेक्षतः पुरेशी साधनसामग्री निर्माण होवूं शकली आणि सर्व समाजसत्ता तेथें असल्यानें साधनसामग्रीचें सापेक्षतः समान वाटपही तेथें होवूं शकतें आहे."

पण व्यक्तिस्वातंत्र्याचें काय?" शिक्षणाधिकाऱ्यानें पुनः मला मुद्यावर आणण्याचा प्रयत्न केला.

मी म्हटलें, "आवश्यक साधनसामग्री निर्माण करतां आली तरच व्यक्तिस्वातंत्र्याला कांहीं अर्थ निर्माण होतो. नाहींतर व्यक्तीचे हक्क नुसते घटनेंत राहतात. सोविएतमधें प्रत्येकाला काम मिळालें पाहिजे हा हक्क नुसता स्वीकारला गेला नाहीं तर तेथें बेकारी नाहींशी झाली आहे. प्रत्येकाला काम देण्यांत त्या देशात व्यक्तिस्वातंत्र्याची फार फार जोपासना होते असं मला दिसलं."

"प्रत्येकाला काम देण्यांत व्यक्तिस्वातंत्र्याची जोपासना कशी!" अध्यापिकाबाईंनीं आणखी खुलासा मागितला.

मी म्हटलें, "कामाचें वाटप तेथें प्रत्येकाची आवड निवड, शक्ति ध्यानांत घेऊन करण्यांत येतें. अगदी लहानपणापासून शालेय संस्थांतून व्यक्तीच्या विकासासाठीं विविध प्रकारची पोषक साधनसामग्री दिली जाते. व्यक्तीचं वैशिष्ठ्य आणि आंगिक शक्ति याचा अभ्यास शाळेंत केला जातो आणि नंतर त्या व्यक्तीला जें उत्तम प्रकारें करतां येईल असें काम देण्याची तेथें सोय आहे. याचा परिणाम असा दिसतो कीं प्रत्येकाला तेथें आपल्या आवडीचें काम मिळूं लागलें आहे. त्यामुळें प्रत्येकाला आपल्या कामाचा आनंद मिळण्याची अधिक शक्यता निर्माण झाली आहे."

(पान १७ वर पहा)

सोविएत युनियनमधील

पूर्व-प्राथमिक संस्थांची साधनसामुग्री व शिक्षण

सोविएत युनियनमधील पूर्वप्राथमिक संस्थांच्या इमारती मला आकर्षक वाटल्या नाहींत, परंतु या इमारतींत योजलेल्या साधनसामुग्रींत जी संपन्नता आणि विविधता दिसली त्यावरून 'जें जें म्हणून उत्तम असेल तेंच बालकांना दिलें पाहिजे,' हा लेनिनचा आदेश तेथील शासनानें अंमलांत आणल्याचें दिसलें. या संस्थाचें फर्निचर लहान मुलांच्या सोयीचें आणि आकर्षक होतें. तेथील हवामानांत सर्वच ठिकाणीं हवेतील उष्णतामान नियंत्रित करण्याची सोय होती ती पूर्वप्राथमिक शाळेंतही होती. तेथें खेळ, कसरत आणि व्यायामासाठीं एक स्वतंत्र हॉल योजिला होता. व्यायाम आणि संगीताची जोड जी आपल्या येथें करण्यात येते ती तेथें दिसली नाहीं. सकाळीं सुरुवातीलाच व्यायामाचा तास ठेविलेला असतो त्यावेळीं सर्वांची सामुदायिक कसरत घेण्यांत येते. 'ही कसरत संगीताच्या तालावर घेता किंवा काय' असें विचारलें असता संचालिकेनें 'नाहीं' असें उत्तर दिलें. तिच्या म्हणण्याचा आशय असा कीं संगीताच्या वेळीं तालबद्ध हालचाली आणि नृत्यें यांचा कलेच्या विकासाच्या दृष्टीनें विचार होतो. येथें शरीराच्या सर्वांगाना समतोल, निर्भेळ व्यायाम मिळावा हाच उद्देश आहे. अशा प्रकारच्या कसरतींसाठीं छोट्या काठ्या, डंब बेल्स, वळणांच्या वेताच्या सोट्या, दोऱ्या, निशाणें, रिंग्ज वगैरेंचा उपयोग करतात. शिटीचा आवाज देऊन सर्व समूहाच्या हालचालींना मार्गदर्शन करतात. खेळासाठीं मात्र विविध प्रकारचें साहित्य जें आपल्याकडे योजण्यांत येतें तेंच तेथेंही दिसलें. उदा. निरनिराळ्या रंगांच्या पिशव्या, रुमाल, खडू, निरनिराळ्या रंगांचे पट्टे (खेळांतील भिडूंचे विभाग पाडण्यासाठीं) लहान मोठ्या चटया, निरनिराळ्या प्रकारच्या टोप्या, कागदी व कापडी फुलें. ह्या सर्व वस्तू कपाटांत मुलांना काढतां-घेतां येतील अशा तऱ्हेनें ठेवलेल्या दिसल्या.

शालेय फर्निचर आणि सुशोभन

शाळेंत प्रवेश झाल्याबरोबर साडेतीन फूट उंचीच्या आडव्या कपाटाचें दर्शन होई. या आडव्या कपाटांत सहा बालकांना आपापल्या वस्तू, कपडे ठेवण्यासाठीं १×३॥ फुटांचा स्वतंत्र खण दिलेला असे. या प्रत्येक खणाचें दार स्वतंत्र असे. आंत ओवरकोट, कोट, टांगता येईल अशी सोय, वस्तु ठेवण्यासाठीं वर आणि पादत्राणें ठेवण्यासाठीं खालीं एक एक खण असे. दाराला वरच्या बाजूला हवा खेळती रहावी म्हणून तीन भोकें असत. प्रत्येक दारावर मुलांना दिलेल्या प्रतीकाचें चित्र असे. त्यामुळें वाचतां न येणाऱ्या मुलांना देखील आपला खण चटकन ओळखायला मदत होत असे. फर्निचरमधें खुर्च्या, टेबलें हलकीं, धुतां येण्यासारखीं आणि आकर्षक रंगाचीं होतीं. फरशीवर उत्तम प्रकारचें मॅटिंग असे दारा-खिडक्यांवर उंची योग्य कापडाचे पडदे होते. आम्ही पाहिलेल्या शाळांत भिंतींवर चित्रकारांचीं मौलिक चित्रें, मधून मधून उत्तम शिल्पांचे नमुने अर्थात यांत लेनिनचीं पार्ट्रेटस् आणि पुतळे यांना विशेष स्थान दिल्याचें दिसलें.

सामान्यतः वर्गांची मांडणी आकर्षक होती. तथापि राहत्या इमारतींतच बहुतेक शाळांची योजना झाल्यानें पूर्वप्राथमिक वर्गांना ज्या प्रकारच्या मोठ्या आणि मोकळ्या खोल्या असायला पाहिजेत अशा प्रकारच्या खोल्या दिसल्या नाहींत. जेवणाच्या खोल्या आणि झोपण्याच्या खोल्याही त्यामुळें गजबजलेल्या वाटत. त्यांत योजलेलें फर्निचर सोयीचें, मुलांच्या उंचीला योग्य असेंच होतें. विशेषतः घडीचे झोपण्याचे स्टेनलेस पलंग फारच नमुनेदार होते. त्यावरील शय्येचीं साधनें स्वच्छ, उबदार आणि मऊ होतीं.

शाळेंतील प्रत्येक खोलींत विशिष्ट उंचीवर सावलींत वाढणाऱ्या वनस्पतींच्या कुंड्यांची योजना फारच आकर्षक वाटे. त्या तशा तेथील हवेंत कुंड्यांची जोपासना करणें म्हणजे मोठें यातायातीचें आणि तरी देखील प्रत्येक खोलींत दोन कॅक्टस्, दोन तीन क्रोटन्स, दोन-तीन फुलांच्या कुंड्या फारच शोभून दिसत. या कुंडयांची जोपासना करणें हा त्यामुळें आयताच एक जीवनव्यवहाराचा विषय होई.

वनस्पतीप्रमाणेंच प्रत्येक खोलींत पशुपक्ष्यांच्या पिंजऱ्यांची योजनाही तशीच डोळ्यांत भरणारी होती. एका ठिकाणीं एका उंच मजेदार पिंजऱ्यांत कोंबडी आणि तिचीं पिलं पाहिल्यावर तर मी थक्कच झालों. मी शिक्षिकेला विचारलें-"एवढ्या लहानशा पिंजऱ्यांत या कोंबडीस ठेवतां?" शिक्षिका म्हणाली "नेहमीकरतां नव्हे. बाहेर तिचा मोठा पिंजरा आहे पण मुलांना जवळून कोंबडी दिसावी म्हणून थोडा वेळ तिला येथें आणलें आहे." प्रत्येक खोलींत कुठे ससा, तर कुठे खार, कुठे रेवन कावळा तर कोठें पांढरे उंदीर या प्रकारें हेजहॉग, चिमण्या, बेडूक, मासे, कासव आदि प्राण्यांची योग्य सोय करून मुलांच्या खेळाच्या खोलींत स्थान दिलेलें होतें. या सर्व प्राण्यांना खाणें-पिणें देणें, त्यांना स्वच्छ ठेवणें हाही एक दैनिक कार्यक्रम असे.





सामान्यतः २०–२५ शिशूंच्या गटाला तीन खोल्या योजलेल्या दिसल्या. एक खोली खेळण्यासाठीं, एक झोपण्यासाठीं आणि एक जेवणासाठीं. खेळण्याच्या खोलींत फार्निचर. साधनें यांची जरा गर्दी दिसे. परंतु सर्व साधनें व्यवस्थित ठेवण्याच्या सोयी केलेल्या असल्यानें वातावरण व्यवस्थित दिसत असे.


या खेळाच्या खोलींत चित्रकाम, मातीकाम, कागदाचीं खेळणीं बनवण्याचें काम, बाहुलीचा कोपरा, बांधकामाचे ठोकळे, लेखन–वाचन–अंक शिक्षणाचीं साधनें, इंद्रिय शिक्षणाचीं साधनें, अशीं सर्व साधनें आम्हांला दाखवण्यांत आलीं. वनस्पति आणि पशु–पक्ष्यांच्या कोपऱ्याबरोबरच बाहुलीचा अथवा घरकुलाचा कोपरा त्यांतील आकर्षक वस्तूंमुळें फारच आकर्षक दिसे. या बाहुलीच्या घरांत खेळाचीं कपाटें, झोंपण्याच्या सोयी, भांडीं, फार्निचर, स्नानाचा सेट, जेवणाचा सेट, खेळाचा सेट अशा किती तरी आकर्षक गोष्टी होत्या.

रंगपरिचयाचीं कांहीं साधनें

विविध प्रकारचे मनोरे, स्टँडवर मध्यभागीं एक सळी आणि तींत ओवण्यासाठीं रंगीत वर्तुळें असलेल्या साधनांत प्रत्येक रंगाचीं जोडीचीं वर्तुळें असत. हीं वर्तुळें कमी–अधिक व्यासाचीं असत. त्यांत योग्य आकार आणि रंगाच्या जोड्या लागल्या तरच मनोऱ्याला योग्य असा आकार देतां येत होता. आपल्या येथें अशा प्रकारचीं साधनें बाजारांत मिळतात. परंतु त्यांत रंगाच्या जोड्या माझ्या पाहण्यांत आल्या नाहींत. अशाच प्रकारच्या एका दुसऱ्या साधनांत रंगाच्या छाया मुलांना क्रमानें लावाव्या लागत. हें छायारंगाचें साधन आपल्या येथें आणण्यासारखें वाटलें. यांत प्रत्येक रंगाच्या चार पांच छाया योजून कुतुबमिनारसारख्या मजल्यांची योजना केल्यास रंगछायांचें साधन सध्या आपण वापरीत असलेल्या मॉन्टेसोरी साधांनपेक्षांही तें मुलांना आकर्षक वाटेल यांत शंका नाहीं.







रंगाचें एक आणखी साधें साधन तेथें योजिल्याचें दिसलें. त्या एका ९ इंची व्यासाच्या पांढऱ्या तबकडीवर सहा रंगाचीं एक इंची जोडीजोडीचीं घुटी कागदाचीं वर्तुळें चिकटविलीं होतीं; व एका डबींत तशाच प्रकारचीं सहा वर्तुळें कापून ठेवलीं होतीं. या वर्तुळांतून एक वर्तुळ घेऊन तें तबकडींत योजलेल्या त्या रंगाच्या वर्तुळावर ठेवण्याचे खेळ होते. मुलें खूप मजेनें हा रंग–ओळखीचा खेळ खेळून दाखवीत.

बांधकामाचे ठोकळे

बांधकामाचे ठोकळे खूपच मोठे मोठे असत. दोन तीन कपाटें भरतील इतके ते विपुल असत. यांत ९ इंची घन, चित्या, त्रिकोण, मनोरे, वर्तुळ, अर्ध वर्तुळें, नळाकार वगैरे अनेक भौमितिक घनाकार योजलेले आढळले. या प्रत्येक घनाकारांस तीन तीन एक इंची भोकें योजलेलीं होतीं. त्यामुळें मुलांनीं ठोकळ्यांचे कांहींही बनवलें तरी त्यांत काठ्या घालून ती रचना पक्की करतां येत असे. त्यामुळें केलेली रचना मुलांच्या अंगावर पडण्याचें भय नसें. हेंही साधन आपल्या येथें सहज आणण्यासारखें आहे.

चित्रकाम व मातीकाम

चित्रकामासाठीं जलरंगाचा उपयोग विशेष दिसला. तीन ते चार वयाच्या बालकांना चित्रकामाचा खास तास असतो म्हणून सांगण्यांत आलें. त्यांत शिक्षिका घरें, झाडें, मनुष्य, कांहीं वस्तु यांचीं चित्रें कशीं काढावींत यांसंबंधी कांहीं सामुदायिक पाठ घेतात. उदाहरणार्थ, झाड काढायचें तर प्रथम जमीनीची रेषा कुठें दाखवावी, त्यावर झाड काढतांना प्रथम मघलें मोठे खोड काढावें, नंतर त्या खोडावर डाळ्या कशा निरनिराळ्या प्रकारें फुटतात, नंतर पानें कशीं त्रशांनीं ठिपके करून दाखवायचीं, नंतर फुलें, फळें, पक्षी दाखविणें किंवा झाडाचीं झडणारीं पानें कशीं दाखवायचीं हें क्रमशः मुलांना सांगण्यांत येतें. मुक्त मनाने मुलांना चित्रें काढूं देतां कीं नाहीं असें विचारल्यानंतर शिक्षिका म्हणाली, "मुलें तर आपल्या मनानें चित्रें काढणारच, त्यांना कोण थांबवू शकणार? विशेषतः आम्ही रोज बाहेर त्यांना फिरायला नेतों तेव्हां कांहीं कांहीं गोष्टी त्यांच्या मनांत घोळत रहातात. त्या दृश्यांचीं अनेक चित्रें मुलें काढतात. अशीं चित्रें काढतांना आम्ही जे चित्रशिक्षणाचे पाठ दिलेले असतात त्यांचा त्यांना उपयोग होतो. अर्थात् त्यांच्या मनाच्या चित्रांत ते पाठांचें सर्व तंत्र सांभाळतातच असें नाहीं. शिक्षण खात्यानें तीन ते सात वर्षांच्या मुलांसाठीं चित्र–शिक्षणाचा एक पाठक्रम तयार केला आहे. त्याप्रमाणें पाठ घेण्यांत येतात व मुक्त मनानें हीं मुलें चित्रें काढतात."


मातीकामाची सुरुवात सुरुवातीच्या वर्षांत बहुधा होत नाहीं पण दुसऱ्या व तिसऱ्या वर्षांत त्यांना मातीला आपल्या कल्पनेप्रमाणें आकार देतां येतात. चित्रकामाप्रमाणें मातीकामाचा एक पाठक्रम तयार केला आहे. या पाठांच्या योजनेमुळेंच कीं काय शाळेंतील चित्रसंग्रहांत आणि मातीकामांच्या नमुन्यांत सारखेपणा मात्र दिसत होता. व्यक्तिगत विविधता आपल्या येथें दिसते तशी दिसली नाहीं, परंतु प्राथमिक शाळेंतील चित्रकामाचे आणि मातीकामाचे नमुने मुलांच्या वयाच्या मानानें चांगले वाटले.

पाठान्तर संगीत आणि नाट्य

कसरत शाळेंप्रमाणें संगीत आणि नाट्यासाठीं एक विशेष खोलीची योजना शाळेंत दिसली. कोपऱ्यांत मोठा पियानो, फरशीवर फेर धरण्यासाठीं लहान-मोठीं वर्तुळें काढलेलीं होती. पियानोवर संगीत सुरू होतांच मुलांची ठराविक मंडळी अभिनय करीत वर्तुळावर फेर धरीत. मुलांचा उत्साह, त्यांचें आरोग्य खरोखरच डोळ्यांत भरण्यासारखें असे. त्यांचें पाठान्तर बरेंच करून घेतल्यासारखें वाटलें. प्रासगीतें, वृंदगीतें हीं तर पाठ चांगलीं असतच पण गद्यदेखील पाठ करून साभिनय म्हणून घेण्याचा तेथें उपक्रम दिसला. या गद्यांत लेनिन-स्तवन, देशस्तवन, बालकाचे निश्चय, मोठ्या माणसाशीं कसें वागावें यासंबंधीं १०-१५ वाक्यें योजिलेलीं असत. समूहांत बसलेलीं मुलें एकापाशीं एक उभीं रहात आणि मोठ्या स्पष्ट आवाजांत पाठान्तर म्हणून दाखवीत. नृत्यांचे विविध प्रकार आढळले. नाटकांत वेषभूषा साध्याच पण आकर्षक दिसल्या. अभिनयाचें मार्गदर्शन शिक्षिका करीत. अभिनयांत स्वयंस्फूर्त अभिनयापेक्षां दिग्दर्शित अभिनयाचें प्राबल्य दिसलें. त्यामुळें तांत्रिक सफाई विशेष दिसे.

गोष्टी आणि गप्पागोष्टी

बालकथा सांगण्याचें शिक्षिकांचें तंत्र अभ्यासपूर्ण वाटलें. शिक्षिका कांहीं गोष्टीत पपेट्रीचा उपयोग फारच परिणामकारक रीतीनें करीत. पपेट्री म्हणजे गोष्टींतील पात्राचे मुखवटे बनवून त्यांच्या हालचाली आणि हावभावाचे निदर्शन. ससा आणि कोल्ह्याचा गोष्टींत सशाचा आणि कोल्ह्याचे मुखवटे बनविले होते. दोन हातांत दोन मुखवटे




भरवून त्यांच्या कानाच्या, तोंडांच्या हालचालींतून कथावस्तु छान रंगत असे.

गप्पा-गोष्टी ही एक प्रवासांतील करमणूक असे. दोन मुलांना कुठें तरी बाहेर न्यायचें हा शाळेंतील महत्त्वाचा कार्यक्रम असल्यानें या कार्यक्रमांत योजनापूर्वक गप्पागोष्टींना स्थान देण्यांत आलें होतें. रस्त्यावरचीं विविध दृश्यें दिसल्यानंतर मुलांना बोलायला प्रत्यक्ष विषय मिळतो व त्यांतून शिक्षिका गप्पागोष्टींचा विषय कुशलतेनें पुढें नेत असत.



लेखन-वाचन-अंक-शिक्षण

या शिक्षणाची जबाबदारी पूर्वप्राथमिक संस्थेवर नाहीं. पूर्ण सात वर्षें वयापर्यंत मुलें पूर्वप्राथमिक शाळेंत असतात, तरी त्यांच्या मागें या शिक्षणाचा काच नाहीं. खेळत खेळत सुरुवातीचें लेखन-वाचन आणि अंकपरिचय येथें करून देण्यांत येतो. मुलासाठीं विशेष मोठ्या टाईपाचीं आणि चित्रांचीं सुंदर पुस्तकें आणि अंकांचें विविध खेळांचें साहित्य दिसलें. हें साहित्य व्यक्तिशः किंवा समूहांत खेळतां येण्यासारखें होतें.



पूर्वप्राथमिक शाळेंतील शिक्षणाचा तपशील स्थलाभावी थोडक्यांत द्यावा लागल्याबद्दल वाचक क्षमा करतील अशी अपेक्षा बाळगतो.

—शेष नामले

—००—

बालकांसाठीं प्राण्यांचा कोपरा

Children's Animal Corner

(रशियांतील बालमनोरंजनाचा एक प्रकार)

दुपारचा दोनचा सुमार होता. दुपारचें जेवण जरा लवकरच उरकून आम्ही बालकांसाठीं चालविण्यांत येत असलेला प्राण्यांचा कोपरा बघण्यासाठीं बाहेर पडलों. प्रथम वाटलें कोणाच्या तरी खाजगी घरांत आम्ही शिरत आहोंत. संस्थेच्या कार्यालयाच्या बाजूला असलेल्या खोलींत आम्ही आपापले ओवरकोट काढून ठेवले. आम्हाला थोडासा उशीर झाल्याने संस्थेची माहिती वगैरे करून घ्यायला वेळच राहिला नव्हता म्हणून आमच्या हातीं संस्थेची सचित्र माहितीची पुस्तिका देऊन तेथील चालिका म्हणाली "खेळ सुरू झाला आहे आपण तेथेंच सरळ जाऊं या."

दोन बाजूला खोल्या असलेल्या मधल्या लाल मॅट घातलेल्या रस्त्यावरून थोडेसें चालल्यावर सिनेमागृहासारख्या हॉलमध्यें आम्ही पोहोंचलो. हॉलमध्यें असलेल्या स्टेजवर एक भव्य दृश्य दिसत होतें. स्टेजच्या डाव्या कोपऱ्यांत एक परिकथेंत शोभेल अशी सुंदर लाकडी ओंडक्यांची झोपडी होती. झोपडीच्या डाव्या बाजूला देवदार वृक्षांचें हिरवेगार सुंदर जंगल दिसत होतें. घटापल्लवांतून झिरपण्याऱ्या सूर्य किरणामुळें जंगलाचें अंतरंग लख्ख प्रकाशल्याचें दिसत होतें. झोपडीच्या समोर थोडेसें अंगण आणि त्याच्या पलीकडे लगेच जंगल दिसत होतें. अंगणांत लाकडी ओंडक्यांच्या आकर्षक बैठका मधें मधें दिसत होत्या.

स्टेजच्या मुख्य पडद्याच्या लगत बाहेर असलेल्या ओट्यावर एक बालशिक्षिका उभी होती. समोर असलेल्या दोन-अडीचशें शिशूंना ही बालशिक्षिका कांहीं तरी संबोधित होती. मधेंच तिनें एक प्रश्न विचारला, "आपल्या बालकथांत प्राण्यांपैकी मुख्य नायक कोण आहे तें माहित आहे कोणाला ?"

एक शिशु म्हणाला, "कोल्हा कोल्हा."

दुसरा म्हणाला, "कोल्हा कांहीं मुख्य नायक नाहीं. मुख्य नायक हत्ती आहे."

"आणखी कोण आहे जो आपल्या गोष्टींत पुनः पुनः येतो?"

"अस्वल ! अस्वल ! !" कांहीं मुलें एकदम ओरडलीं.

"बरोबर ! बरोबर ! ! हे अस्वलदादा राहतात कोठें कोणाला माहीत आहे का ?"

'गुहेंत'.....'जंगलांत'.....'डोंगरांत'—कितीतरी उत्तरें मिळालीं. बालशिक्षिका म्हणाली,— "डोंगरांत-जंगलांत आणि गुहेंत तिनही उत्तरं बरोबर. या अस्वलदादाचीं बोटं पाहिलीं आहेत कुणीं ?" मुलें लगेच उत्तरली,—"बोटं नसतात त्यांना-त्यांना मोठीं मोठीं नखं असतात."

"अरे वा, तुम्हाला बरीच माहिती दिसते." शिक्षिका या प्रकारें अस्वलासंबंधीं मुलांचें निरीक्षण समजून घेत होती; त्यांना कांहीं माहिती देत होती. नंतर ती म्हणाली, "या इथल्या जंगलांत एक अस्वलदादा राहतात. इथें ह्या झोपडींत त्या अस्वलदादाचा एक मित्र राहतो. त्या पलीकडच्या खिडकींतून त्याचा पलंग दिसतो आहे. तो आतां झोपडींतून बाहेर येईल. तो काय म्हणतो ते ऐका हं" ...बाल शिक्षिका खुर्चीवर बसते.

इतक्यांत मध्यें घंटा होते. एकादें मिनिट सर्वत्र शांत वातावरण होतं. सर्व शिशु आणि त्यांच्या मागच्या खुर्च्यांवर बसलेले त्यांचे दीड-दोनशें पालक स्तब्ध झाले आहेत. झोपडीच्या पडवींत एक राजपुत्रासारखा पोषाख घातलेला मुलगा येतो आणि मोठमोठ्यानं हाका मारतो—

—"वान्या ! वान्या ! !" पडवींतून तो खालीं अंगणांत येतो आणि समोरच्या जंगलांतून पुनः "वा ऽ ऽ न्या ऽ ऽ वा ऽ ऽ न्या ऽ ऽ" अशा हांका घालतो. त्याच्या हाकेलाच जणुं ओ देत एक धष्टपुष्ट ब्राऊन रंगाचें अस्वल पुढें येतें. दोघे एकमेकांना भेटतात.

"वान्या ! किती उशीर केलास रे उठायला !

सगळींकडं उनं पडलीं आहेत बघ.

शुभ प्रसंगाच्या वेळीं मुखमाधुरीसाठीं वापरा

दिलरंजन सुवासिक सुपारी

सुमधुर, शेंकडों लोकांना आनंदित करणारी—

—: सर्वत्र विकली जाते :—

आपल्या गांवांत एजन्सीसाठीं लिहा :—

मालक: आर. के. सुपारीवाला

शांती भुवन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.

शाखा : पोस्ट ऑफिसच्या बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४

चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ, ग्रॅट रोड, मुंबई ७

आज रिनेग्रॉव्ह (खेड्याचें नांव) यथें एक मोठी जत्रा आहे. त्या जत्रेला मी जाणार आहे. (अस्वल 'मी येतो' 'मी येतो' सांगण्यासाठीं मान हालवतो.) अरे हो! तुला पण नेणार आहे. पण मग तूं सकाळचीं सर्व कामें उरक की! अजून आपला सकाळचा व्यायामाचा कार्यक्रम देखील पार पडला नाहीं. सकाळची कसरत आपण कशी करतों ती दाखव कीं या मुलांना." (अस्वल बैठका घालतं, जोर काढल्यासारखा अभिनय करत, वेट लिफ्टिंग करून दाखवतं)

राजपुत्र—"पण हा तर नेहमीचा व्यायाम झाला. तुला माहीत आहे ना, त्या जत्रेंत खेळांच्या आणि व्यायामाच्या खास स्पर्धा लावल्या आहेत. सर्वांत ज्याचा नंबर वर येईल त्याला मोठं बक्षिस मिळणार आहे. वान्या या स्पर्धेंत भाग घेतलाच पाहिजेस."

"काय काय खेळ करून दाखवशील रे तिथें?"

अशीं सुरुवात करून राजपुत्राच्या पोषाखांत असलेल्या खेळकऱ्यानें अस्वलाकडून निरनिराळे खेळ करून घेतले चेंडूचा खेळ, गोलावर उभें राहून तो चालवून दाखवण्याचा खेळ, सिंगलबार, डबलबार, निरनिराळ्या प्रकारच्या उड्या. शेवटीं रिनोग्रीव्हला जायची तयारी होते. अंगणांत न्याहारीची तयारी होते टेबल मांडलें जातें. कॉफी, केक, फुलदाण्या सर्व कांहीं तयारी करून हातपाय धुवून बोलत बोलत न्याइरी करण्यांत येते. न्याहारी संपतांच दोघे मुलांच्या समोर येतात. राजपुत्र मुलांना संबोधून म्हणतो, "वान्या आतां रिनोग्रीव्हच्या स्पर्धेत भाग घ्यायला जातो आहे. मोठी मोठीं सर्व बक्षिसं तो मिळवणार आहे—होय ना रे वान्या? (अस्वल मानेनें नाहीं नाही म्हणतं).

अरे बाबा 'नाहीं नाहीं' नाहीं म्हणायचं. हो म्हणायचं. चल येतो आहेस ना?" असं म्हणून राजपुत्र व तो रिनोग्रीव्हला निघून जातात. मुख्य पडदा पडतो. हॉलमध्यें दिवे लागतात आणि पुनः ती शिक्षिका ओट्यावर पुढें येऊन मुलांशीं बोलूं लागते.

"कोणा कोणाला आवडला आमचा वान्या अस्वल? हात वर करा बघूं" मुलें हात वर करतात. हॉलमध्यें प्रकाश पडल्यानें 'मुलासाठीं प्राण्यांचा कोपरा' म्हणजे काय प्रकार आहे त्याची पूर्ण कल्पना आम्हाला आली. लेनिनग्राडच्या प्राणिबागेंत हा प्राण्यांचा कोपरा योजिलेला आहे. बालकांच्या मनोरंजनासाठीं व त्याबरोबरच पशुपक्ष्यांचा प्रत्यक्ष परिचय करून देणारी ती एक योजनापूर्ण संस्था होती. अस्वलाच्या जंगली स्टेजवर निरनिराळ्या दृश्यांचीं सेटिंग्ज येत कोल्हा बॅजर, खार, वानर, रेवनकावळा, सील, अमेरिकन हायना असे कितीतरी प्राणी स्टेजवर आणले गेले. प्रत्येक प्राणी ज्या परिस्थितींत राहतो त्याची शक्यतो हुबेहूब कल्पना देणारीं विविध भव्य दृश्यें आणि त्याला कल्पनारंजित स्थापत्याची व पात्रांची जोड देऊन गोष्टीच्या रूपानें हे प्राणी मुलांना दाखवले जात. विशेषतः सीलचा स्टेजवरील प्रवेश आम्हाला फारच यथार्थ आणि उद्बोधक वाटला. त्यांत बर्फाळलेल्या अंटार्टिक महासागराचें दृश्य योजलेलें होतें. सील अशा सागरांत कसे राहातात तें बघायला मिळालें. सील स्टेजवर येण्यापूर्वी चलचित्राच्या साह्यानें ते अंटार्टिक महासागराचें मनोवेधक दृश्य दाखवण्यांत आलें. समुद्राचें निळें निळें पाणी व मधून मधून तरंगणारे बर्फाचे शुभ्र डोंगर दिसत होते. अशा दृश्याच्या पार्श्वभूमींतून ओल्याचिंब शरीराचें धूड घेऊन फरफटत फरफटत सील स्टेजवर आलें. तेव्हां पालकांनीं आणि बालकांनीं टाळ्यांच्या कडकडाटांत त्याचें स्वागत केलें. त्याच्या जीवनाचा परिचय सर्कसच्या एका प्रसंगाशीं गुंफून सीलचा समतोल सांभाळण्याच्या कौशल्याचा परिचय करून देण्यांत आला.

रशियाचा हा प्राण्यांचा कोपरा पहात असतांना आपल्या येथें अस्वलांचें खेळ करणारे, बकरी, वानरें, मुंगुसें, साप यांचे खेळ जनतेला रस्तोरस्ती करून दाखवणारे अनेक प्रकारचे कलाकार माझ्या मनःचक्षूंपुढें येऊन गेले. नंदिबैलाला नखशिखांत दागिन्यानीं मढवून त्याचे खेळ करून लोकरंजन करणारे कलाकार त्यांच्या धंद्याला उत्तेजन नसल्यामुळें कसे नाहींसे होत चालले आहेत याचा विचार मनांत आला. बाज, पोपट, तित्तर, साळुंक्यांना, कोबड्यांना खेळवणाऱ्या लोकांच्या कला समाजातून नाहींशा होत आहेत. आपल्या येथें मोठमोठ्या शहरीं प्राणिबाग आहेत. परंतु त्यांत मुलांचा विचार जवळ जवळ नसतोच म्हटलें तरी चालेल. अशा ठिकाणीं पशुपक्ष्यांचे खेळ करून दाखवणारांना साह्य देऊन त्यांच्या व्यवसायाचें पुनरुत्थान केलें तर आपल्या बालकांना देखील अशाच प्रकारचें मनोरंजन सहज उपलब्ध करून देतां येईल. आपल्या प्राणी-कलाकार ना थोड्याशा मदतीचा हात समाजानें आणि सरकारनें दिल्यास हे कलाकार आपल्या येथील बालकांचें उत्तम मनोरंजन करूं शकतील यात शंका नाहीं. या प्रकारच्या मनोरंजनांत बालकांना किती फायदा होईल हें नमूद करण्याची मला जरूर वाटत नाहीं. आपल्या येथें लोकरंजन करणाऱ्या अनेक प्रकारच्या कलाकारांचीं घराणीं आहेत. व्यायामाचे खेळ करून दाखवणारे डोंबारी, पुतळ्यांचे खेळ करून दाखवणारे, जादूचे चमत्कार करून दाखवणारे जादुगार, पशुपक्ष्यांचें पालन करून त्यांचे खेळ करून दाखवणारे खेळकरी यांची आपण उपेक्षा करीत आहोत. त्यांच्या धंद्याला व्यवस्थित वैज्ञानिक स्वरूप दिल्यास आपल्या येथें आपल्या परंपरेंत असलेल्या रंजन-संस्थेचा उपयोग करून घेतल्यासारखें होईल.

—शेष नामले

रशियांतील बालोद्यानें

KINDERGARTENS

तीन ते सात वर्षें वयाच्या बालकांसाठीं योजिलेल्या पूर्व-प्राथमिक संस्थांना रशियांत -बालोद्यान शाळा Kindergarten Schools म्हणतात. या प्रकारच्या संस्थांची मूळ कल्पना जर्मन शिक्षणतज्ज्ञ ऑगस्टस फ्रॉबेलची. किंडर गार्टन हें नांवही त्यानेंच प्रचलित केलें. पूर्वप्राथमिक वयाच्या बालकांसाठीं फ्रॉबेलनें विशिष्ट शिक्षण साहित्याची योजना केली होती. त्याच-बरोबर शिक्षणाची विशिष्ट पद्धतिही योजिली होती. ज्या शाळेंत किंडर गार्टन पद्धतीचीं साहित्य साधनें आणि तंत्र यांचा उपयोग केला जातो त्या शाळेला 'किंडर गार्टन स्कूल' म्हणतात. रशियां-तील पूर्वप्राथमिक शाळा या तांत्रिक अर्थानें किंडर गार्टन शाळा नाहींत. कारण तेथील या प्रकारच्या शाळांतून कोठेंही किंडर गार्टन पद्धतीचीं फ्रॉबेलचीं साधनें दिसलीं नाहींत.

किंडर गार्टन स्कूल्सबरोबरच आपल्या येथें मॉन्टेसोरी स्कूल्स हें नांव प्रचलित बनलें आहे. किंबहुना एका काळीं पूर्वप्राथमिक शाळा म्हणजे ती मॉन्टेसोरी पद्धतीनें किंवा किंडर गार्टननेच असली पाहिजे अशी समजूत रूढ झालेली होती. या दोन पद्धतींतील विरोध जागृत ठेवण्यावर प्रशिक्षण संस्थांचाही भर असे. किंडर गार्टन शाळा म्हणजे फ्रॉबेलच्या कल्पनेप्रमाणें वर्गपद्धतीनें वेळापत्रकाप्रमाणें चालविण्यांत येणाऱ्या पूर्वप्राथमिक शाळा. त्याचबरोबर मॉन्टेसोरी शाळा म्हणजे व्यक्तिगत स्वयंशिक्षण पद्धतीनें चालविण्यांत येणाऱ्या शाळा. पहिल्या प्रकारच्या पूर्वप्राथमिक शाळेंत शिक्षणाची सामुहिक पद्धति, तर दुसरींत शिक्षणाची पद्धति व्यक्तिगत. एकांत शिक्षण, शिक्षक केंद्रींत, तर दुसरींत स्वयंकेंद्रीत. एकांत वेळापत्रकाप्रमाणें विषय शिक्षण, तर दुसरींत कोणताही विषय केव्हांही शिकण्याचें स्वातंत्र्य. एकांत शिक्षा-बक्षिसांना स्थान, तर दुसरींत ती वर्ज्य मानलीं जातात. अशा प्रकारचा या दोन पद्धतींत राम-रावणासारखा विरोध रंगवण्यांत येत असे.

रशियांतील पूर्वप्राथमिक संस्थांचें स्वरूप

रशियांतील पूर्वप्राथमिक शाळेंत किंडर गार्टन पद्धतीचीं किंवा मॉन्टेसोरी पद्धतीचीं कोणतीही साधनें दिसलीं नाहींत. कार्यपद्धतीच्या तंत्रांत किंडर गार्टन पद्धतीच्या सामुदायिक प्रकारच्या शिक्षकी मार्गदर्शनावर भर दिसला परंतु वयाप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचीं खेळणीं घेऊन मुलें व्यक्तिशःही खेळत होतीं. मॉन्टेसोरी शाळेप्रमाणें शिक्षक बालकांना जरूर ती मदत देऊन अवलोकनाचेंही काम करीत असे. मॉस्को येथील इन्स्टिटयूट ऑफ पेडॅगॉजिकल रिसर्चच्या डायरेक्टरशीं रशियांतील पूर्वप्राथमिक शाळेंतील शिक्षण पद्धतीविषयीं आम्ही जेव्हां चर्चा उपस्थित केली तेव्हां ते म्हणाले "किंडर गार्टन शाळेंत आमचें विशेष असें कोणतेंच तंत्र नाहीं. जगांत या शिक्षणाविषयीं ज्या सुधारणा व विचार होत आहेत त्याच गोष्टी सामान्यतः आमच्या येथील किंडर गार्टन शाळेंत आल्या आहेत. आधुनिक मानसशास्त्राच्या प्रकाशांत कुठल्याही एका पद्धतीचें स्तोम या पूर्व-प्राथमिक शिक्षणांत राहणें शक्य नाहीं.

स्वदेशीचा भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.



आमच्या येथील पूर्वप्राथमिक शाळेंत फ्रॉबेल किंवा मॉन्टेसोरींचीं साधनें नाहींत. सर्व जगांत या प्रकारच्या संस्थांचीं उद्दिष्टें स्पष्ट आहेत. प्रत्येक देशांत तीं साधण्याकरतां प्रयत्न होत आहेत. आमच्या येथें आम्ही नवीन नवीन प्रकारचीं खेळणीं योजित आहों. किंडर गार्टन शाळेंत आमच्या येथील कांहीं खेळणीं तुम्हांला दिसतील."

पूर्वप्राथमिक शिक्षणाचा उद्देश

पूर्वप्राथमिक शिक्षणाचा उद्देश सांगताना ते म्हणाले, " बालकांच्या बौद्धिक आणि कलात्मक पात्रतेच्या विकासाबरोबर त्याच्या शरीराचा समतोल विकास करणें हा या शाळांचा मुख्य उद्देश आहे. मातृभाषा शुद्ध बोलणें, चित्र, संगीत, नृत्य विषयांची आवड वाढवणें, अंक मोजणी करणें, त्याचप्रमाणें उत्तम संवयींचा पाया घालणें ह्या गोष्टी या वयांत केल्यास त्याचा पुढील शिक्षणांत फायदा मिळतो. या शाळेंत समूह-जीवनाची (Community life) आवड उत्पन्न करणें, वडील मंडळींसंबंधी आदर बाळगणें, तसेच श्रम-जीवनाविषयी प्रेम उत्पन्न करणें या गोष्टींवर आम्ही विशेष भर देतो."

सोविएत यूनियनच्या २० व्या कॉंग्रेसपुढें केलेल्या भाषणांत सोविएत प्रजासत्ताक संघाचे पंतप्रधान एन. एस. क्रुश्चेव यांनीं पूर्वप्राथमिक शिक्षणासंबंधी पुढील प्रमाणें उद्‌गार काढले आहेत-" We must also get down to solving another big educational problem that of providing the nursery and kindergarten accomodation for all children whose parents want it. It will take quite some time to solve this problem completely and we must make a large-scale beginnig in the present five years period...Our Soviet Society will continue to pay exceptional attention to the communist education of the rising generation."

१९५६-६१ च्या सहाव्या पंचवार्षिक योजनेंत केलेल्या घोषणेचें प्रत्यंतर १९५८-५९ मधें जें कांहीं प्रत्यक्ष दिसलें त्याच्या आधारेंच मी हा लेख लिहीत आहे.

किंडर गार्टन शाळांची लोकप्रियता

किंडर गार्टन शाळेंत मुलें पाठवण्याच्या बाबतींत सक्ती नाहीं सात वर्षांपर्यंतचें शिक्षण पालकांची इच्छा असेल तर ते त्यांस घरीही करतां येतें, परंतु जेथें जेथें किंडर गार्टन शाळा पोहोंचल्या आहेत त्या भागांतील सर्वच्या सर्व लोक आपल्या बालकांना या शाळेंत पाठवतात. शिशु-संगोपनाच्या बाबतींत पांच टक्के स्त्रिया पाळणा घरांचा लाभ न घेणाऱ्या आढळतात असें सांगण्यांत येतें. परंतु किंडर गार्टन शाळांच्या उपयुक्तते संबंधी कोणाचें दुमत आढळत नाहीं. त्यामुळें किंडर गार्टन शाळा व्यापक प्रमाणावर उघडल्या जात आहेत. १९४० पर्यंत सोविएत संघांत फक्त २४००० किंडर गार्टन शाळा होत्या व त्यांत ११,७३,५०० मुलें होतीं. १९५६-५७ मध्यें शाळांची संख्या ३२ हजारावर जाऊन बालकांची संख्या २० लाखांवर नेण्यांत आली.

किंडर गार्टन शाळांचे प्रकार

रशियांत पूर्वप्राथमिक संस्थांची योजना पाळणा घरांप्रमाणें मुख्यत्वें स्त्रियांना अर्थोत्पादनाच्या कार्यात निश्चितपणें पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेतां यावा म्हणूनच योजिल्या असल्यानें या शाळांचा वेळ जवळ जवळ १० ते १२ तासांचा असतो. कारखान्यांत, कचेऱ्यांत, शाळेंत अथवा दुकानांत कामावर जाणाऱ्या स्त्रिया आपापल्या बालकांना येथें सकाळीं आठ साडे-आठच्या सुमारास सोडून जातात व नंतर कामावरून परतताना सात-साडेसातच्या सुमारास संध्याकाळीं परत घरीं मुलांना घेऊन जातात. जेथें कामाच्या रात्रपाळ्या असतात किंवा कांहीं कारणानें पालकांना रात्रीं मुलांना आपल्या घरीं ठेवणें सोयीचें होत नाहीं, तेथें पालक सोमवारीं सकाळीं आपल्या मुलांना किंडर गार्टनमध्यें पोहोचवतात व नंतर दर शनिवारीं दुपारीं कामावरून सुटी मिळाली म्हणजे आपल्याबरोबर घरीं नेतात. त्यामुळें किंडर गार्टनच्या कांहीं शाळा फक्त बारा तास चालणाऱ्या, तर कांहीं वसतीगृहाच्या स्वरूपाच्या (Residential) असतात. आपल्या येथें जशा तीन तासाच्या, चार किंवा पांच तासीं चालणाऱ्या पूर्वप्राथमिक शाळा असतात अशा प्रकारच्या शाळा रशियांत आढळत नाहींत.

पूर्वप्राथमिक शाळांचा दैनिक कार्यक्रम

बारातासी पूर्वप्राथमिक शाळांचा कार्यक्रम आपल्या येथील कार्यक्रमापेक्षां फारच निराळ्या प्रकारचा असतो. अशा शाळेंत शिक्षिकांचा दुहेरी स्टाफ असतो. प्रत्येक शिक्षिकेला सहा तासाच्या वर काम देण्यांत येत नाहीं. सकाळीं येणाऱ्या शिक्षिका दुपारीं १॥-२ च्या सुमारास कामांतून मोकळ्या होतात. त्याचप्रमाणें दुपारच्या १॥-२ च्या सुमारास येणाऱ्या शिक्षिका ७॥-८ च्या सुमारास मोकळ्या होतात. वसतीगृही-शाळेंत रात्रीचा वसतिगृहाचा सेवक वर्ग शिवाय निराळा असतो. सकाळीं ७॥-८ च्या सुमारास पालकांकडून

मुलें शाळेंत पोहोंचविलीं गेलीं कीं शाळेच्या कार्यक्रमाला सामुहिक व्यायामाच्या कार्यक्रमानें सुरुवात होते. तीन वर्षांपासून सात पूर्ण वयाचीं मुलें या शाळेंत येऊं शकतात. सामान्यतः एका शाळेंत १०० ते १५० मुलें असतात. या मुलांचे वयाप्रमाणें विभाग पाडण्यांत येतात. पहिल्या विभागांत ३ ते ४ वर्षें वयाचीं मुलें असतात. दुसऱ्या किंवा मधल्या विभानांत ४ ते ५॥ व तिसऱ्या किंवा वरच्या विभागांत ५॥ ते ७ वयाचीं मुलें असतात. या प्रत्येक विभागांत २० ते २५ मुलांचा एक गट बनवून त्या गटाची जबाबदारी एका शिक्षिकेकडे असते. या शिक्षिकेला एक मदतनीस शिक्षिकाही देण्यांत येते. याप्रमाणें प्रत्येक गटावर एक वेळांत दोन शिक्षिकांची योजना असते. या रीतीनें योजलेल्या सर्व गटांना सुरुवातीला शाळेंत आल्याबरोबर सामूहिक व्यायाम करावा लागतो.

व्यायामानंतर प्रत्येक गटांतील दोन दोन मुलांना निराळ्या प्रकारचीं जबाबदारीचीं कामें सोपविण्यांत येतात. अशा जबाबदारीच्या कामांत शाळेंत पाळलेल्या प्राण्यांना (मासे, पक्षी, खारी, कोंबड्या, उंदीर, ससे आदि) खाणें देणें आपापल्या गटाच्या जेवणाच्या खोलींत, खेळाच्या खोलींत, जिन्यांत अथवा जेथें जेथें पान-फुलझाडांच्या कुंड्या असतील त्यांना पाणी घालणें, जेवणाच्या खोलींत सकाळच्या न्याहरीचीं टेबलें लावणें, खोल्यांचें सुशोभन करणें वगैरेंचा समावेश होतो. ही जबाबदारी पार पाडण्यास ठीं शिक्षिकाही जरूर तेथें मुलांना मदत करतात. या आपल्या जबाबदारीची जाणीव मुलांना व्हावी म्हणून ज्या मुलांच्या ज्या कामावर नेमणुका होतात त्यांचीं नांवें आणि चिन्हें एका फलकावर आकर्षक रीतीनें लावलेलीं असतात.

न्याहारीनंतन सामान्यतः ९ वाजतां शाळेचें काम सुरू होतें. सर्वांत छोट्या गटाला १५ ते २० मिनिटांचा एक तास खोलींत काम करावें लागतें. या तासांत केव्हां गाणें तर केव्हां चित्रकाम तर केव्हां खेळण्यांवरील खेळ अशी योजना असते.



कामिनिया हेअर ऑईल
कामिनिया स्नो
कामिनिया टॉयलेट सोप
ऑटो दिलबहार

कामिनिया शृंगार
प्रसाधनांमुळें
चमकणारा केशकलाप, अनुपम लावण्य आणि रेशमाप्रमाणें मुलायम त्वचा प्राप्त करून घ्या.

कामिनिया प्रसाधनेंच उत्तम असतात हें मला माहीत आहे. माझ्या निवडीवद्दल मला अभिमान वाटतो आणि तो योग्यच आहे.

☆

वैजयंतिमाला—
भारत नाट्यमची ही प्रतिमा असें म्हणते पहा.

अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कंपनी,
२६५ जुम्मा मशीद, पोस्ट बॉक्स नं. २०८२ मुंबई २

छोट्या गटाचा हा एक तास संपला कीं मग त्यांना बाहेर फिरायला घेऊन जाण्यांत येतें. हा फिरण्याचा कार्यक्रम रोज सकाळीं दोन अडीच तासांचा असतो. त्यासंबंधी शिक्षिकेनें आगाऊच योजना केलेली असते. मुलांचें वय लक्षांत घेऊन जवळपासचीं स्थळें निश्चित केलेलीं असतात. या प्रवासांत मुलांचें लक्ष कशाकडे वेधलें जातें हें लक्षांत घेऊन मुलांना बघायला मिळणाऱ्या इमारती वाहने, वृक्ष, पक्षी, व्यावसायिक व्यक्ति, रस्ते, नागरिक जीवनाशीं संबंधित संस्था, दुकानें, फुलें, फळें, खेळणीं वगैरे अनेक विषयांवर या प्रवासांत मुलांशीं बोलण्याची संधी शिक्षिका घेतात.

मधल्या आणि वरच्या विभागांतील गटांना एका तासाऐवजीं खोलींत दोन तासांचें काम देण्यांत येतें. या कामांत मातीकाम, हस्तव्यवसाय, भाषा, नृत्य, संगीत, सुरुवातीचे लेखन, वाचन, अंक मोजणीं, बाहुलीचा खेळ, बांधकामाचे ठोकळे वगैरे व्यवसाय योग्य साधनांच्याद्वारें देण्यांत येतात. अर्धा ते पाऊण तास या प्रकारें खोलींतील कामांत घालवला कीं मग या गटांच्या मुलांनाही दररोज सामान्यतः दोन तास बाहेर नेण्यांत येतें. या वरच्या गटांतील मुलांशीं बोलतांना पूर्वीच्या अनुभवाचें अधिक विवरण करण्यांत येतें. ऋतुमानांतील हवामानाचा फरक, आकाशांतील फेरफार, वनस्पती, प्राणी आणि मानवी सामाजिक जीवनांतील उत्सव, प्रसंग आदि अनेक गोष्टी या प्रवासांत होतात. सर्व विभाग बारा साडेबाराच्या सुमारास परत शाळेंत येतात. साडेबाराच्या सुमारास मध्यें जेवणाचा कार्यक्रम असतो. तो आटोपून नंतर विश्रांतीचा स्वाभाविक कार्यक्रम असतो, त्यासाठीं झोपण्याची सोय असलेले विशेष खंड प्रत्येक किंडर गार्टन शाळेंत असतात. झोपण्यापूर्वी गोष्टींचा किंवा लहान गीतांचा कार्यक्रमही होतो.

तीन साडेतीन वाजतां मुलें पुनः उठलीं म्हणजे पुनः उपहाराची वेळ होते. चार साडेचारपर्यंत उपाहार उरकून पुनः संध्याकाळीं दोन अडीच तासांचा प्रत्येक गटाचा फिरण्याचा किंवा खेळांचा कार्यक्रम ऋतुमानाप्रमाणें योजलेला असतो. साताच्या सुमारास सर्व गट शाळेंत परततात. साडेसातच्या सुमारास घरीं जाणारीं मुले आपापल्या पालकाबरोबर घरीं जातात. वसतिगृहाच्या मुलांचा पुनः एक वेळ खाण्याचा कार्यक्रम व त्यानंतर विश्रांति.

शाळांचा आर्थिक प्रश्न

शाळेंतील प्रत्येक बालकावर संस्थेला एकूण तीनशे ते साडेतीनशे रूबल्स (१४ आणे = १ रूबल) खर्च येतो. पालकाला त्याच्या पगाराच्या प्रमाणांत ३० ते १२५ रूबल्स पर्यंत द्यावे लागतात. बाकीचा खर्च—जेथें कारखाने असतील तेथें त्यांची कांहीं मदत असते व बाकीचा बराच मोठा भाग त्या त्या जिल्ह्याच्या प्रादेशिक कौन्सिल ऑफ पीपल्स इकॉनॉमीकडून सरकारी अनुदानाच्या रूपानें देण्यांत येतो. सामान्यतः १५० बालकांच्या शिक्षण संस्थेचा वार्षिक खर्च ६० ते ७० लाख रूबल्स असतो असें तेथें सांगण्यांत आलें.

'बालकांना सर्व कांही उत्तम दिलें पाहिजे' या लेनिनच्या आदेशानुसार प्रत्येक किंडर गार्टन शाळेंत शक्य तो सर्व गोष्टी उत्तम ठेवण्याचा प्रयत्न दिसतो. ज्या थोड्या संस्था आम्ही पाहिल्या त्यांतील फर्निचर, पडदे, गालिचे, भींतीवरील भव्य चित्रें, मधून मधून ठेवलेले शिल्पांचे नमुने, आधुनिक स्वयंपाक घर, क्रीडांगण, बाग आणि प्रत्येक प्रकारची साधन-सामुग्री यांत पंतप्रधान क्रुश्चेवनें म्हटल्याप्रमाणें 'आमचा सोविएत समाज भावी प्रजेच्या साम्यवादी शिक्षणाकडे असाधारण लक्ष घालण्याचें चालू ठेवील' या गोष्टीचा प्रत्यय आला.

शिक्षकांच्या कार्यांतील स्वास्थ्य आणि उत्साह

किंडर गार्टन शाळेंतील शिक्षकांच्या बाबतींत स्वतंत्रपणें निराळ्या लेखांत लिहीत आहे. येथें येवढाच उल्लेख करतों कीं शिक्षकांच्या कामाच्या मर्यादा स्पष्ट असल्यानें शिक्षकांच्या डोक्यावर कामाचा ताण दिसला नाहीं. आपलें कर्तव्य आपण चोखपणें बजावण्याकडे त्यांच्या वागणुकींत कटाक्ष दिसून येई. त्यांच्या कामांत एक प्रकारचें स्वास्थ्य, निश्चितपणा आणि ध्येयनिष्ठा बघायला मिळाल्यानें आनंद वाटला.

आपल्याला काय घेतां येईल ?

रशियाच्या या बालोद्यानांतून आपल्याला काय घेतां येईल असा स्वाभाविक प्रश्न मनांत सदोदित जागृत रहात असे. त्यासंबंधीं मनांत आलेले विचार व्यक्त करून हा लेख संपवतों.

(१) बालसंगोपन आणि शिक्षणाबाबत स्त्रियांना निश्चित केल्याखेरीज आर्थोत्पादनांत स्त्रिया समानतेच्या भूमिकेवर पुरुषाबरोबर सहभागी होऊं शकणार नाहींत. संगोपन-शिक्षणाचा प्रश्न या रीतीनें स्त्रियांच्या उन्नतीशीं आणि राष्ट्राच्या आर्थिक लढ्याशी संकलित आहे ही या प्रश्नाची नवी बाजू माझ्या अधिक स्पष्टपणें ध्यानांत आली.

(२) पूर्वप्राथमिक संस्थेंत आपल्या येथें आलेला लेखन-वाचनावरील भर बालकांच्या विकासाला मर्यादित करणारा आहे. बालमंदिरांत बालकांच्या आहार-विहाराच्या प्रश्नाला महत्त्व देण्याची जरूरी आपल्या देशांत रशियापेक्षांही अधीक आहे. दिवसांतील कार्यक्रमांत तेथें आजूबाजूच्या दुनियेचा प्रत्यक्ष परिचय करून देण्यावर आहे तसा भर आपल्या येथें

(पान १७ वर पहा)

लेनिनग्राडचें प्रशिक्षण विद्यालय

आगाऊ सूचना असल्यानें लेनिनग्राडच्या प्रशिक्षण विद्यालयांतील आद्य संस्थेचे मुख्याध्यापक आणि त्यांचे एक दोन सहकारी आपल्या कार्यालयांत आमची प्रतिक्षा करीत बसले होते. आमच्या दुभाषानें आमचा परिचय करून दिल्यानंतर मुख्याध्यापक श्री. विनो ग्रादोव यांनीं आपल्या सहकाऱ्याची ओळख करून दिली आणि नंतर म्हणाले, "ही प्रशिक्षण संस्था १९२३ सालीं प्राथमिक शिक्षकांच्या शिक्षणासाठीं स्थापन करण्यांत आली. गेल्या वर्षीपासून येथें पूर्वप्राथामिक प्रशिक्षणाचा विभाग सुरू झाला आहे. या विभागांत पूर्वी सातवी पास झालेल्या (शालान्त परीक्षा) विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असे. त्यांना तेथें चार वर्षांचा प्रशिक्षणक्रम करावा लागत असे. आतां प्रवेश मट्रिक पास झालेल्याना देण्यांत येतो व त्यांना नंतर तेथें दोन वर्षें शिक्षणक्रम करावा लागतो."

अभ्यासक्रमाची रूपरेखा

दोन वर्षांत एकूण चार सत्रें येथील काम चालतें. पहिल्या सत्रापासूनच विद्यार्थ्यांना प्रत्येक आठवड्यांत दोन तास पूर्वप्राथामिक शाळेच्या संचालनाचें अवलोकन करावें लागतें. अशा प्रकारच्या अवलोकनाला 'पॅसिव्ह प्रॅक्टिस' म्हणतात. यापुढील तीन सत्रांत 'ॲक्टिव्ह प्रॅक्टिस' म्हणजे मुलांना पाठ देण्याचें ते करूं शकतात. प्रत्येक विषयासंबंधींचे सामान्यतः विद्यार्थ्यांना नऊ पाठ यावे लागतात. यासंबंधीं मुख्याध्यापकाशीं बोलतांना मी म्हणालों, "येवढे सर्व पाठ रोज टर्ममध्यें घेऊन होतात!" ते म्हणाले, "येवढे पाठ तर घेतोंच याशिवाय चवथ्या सत्रांत प्रत्येक विद्यार्थिनीला तीन आठवडे वर्ग-संचालन करून दाखवावें लागतें."

"वर्गांत असतात तरी किती मुली!", मी विचारलें.

ते म्हणाले, "प्रत्येक वर्गांत सामान्यतः तीस मुली असतात."

"आणि प्रॅक्टिसिंग शाळा किती असतात!" मी पुनः विचारलें.

"किती तरी! २० पूर्वप्राथमिक शाळा तर आतांच जोडलेल्या आहेत जरूर पडल्यास ही संख्या वाढवतां येते."


मी म्हणालो, "एवढ्या सर्व शाळांवर तुम्हीं देखरेख कशी ठेवतां?"

"एक तर आमच्या पूर्वप्राथमिक शाळांचें सर्वत्र एकच धोरण आहे. या सर्व शाळेंत प्रशिक्षित अनुभवी शिक्षिका कामें करीत असतात. विद्यार्थिनींच्या एका जोडीला एक सबंध दिवस शाळेंत घालवावा लागतो. चवथ्या सत्रांत तीन आठवडे वर्गसंचालन विद्यार्थिनींस करून दाखवावें लागतें. ती ज्या शाळेंत पाठ देत असते तेथेंच तिचें वर्गसंचालन चालतें. त्यावर शाळेची मुख्यशिक्षिका देखरेख ठेवते. विद्यार्थिनींच्या कामाबाबत मुख्याशिक्षिकेने समाधानकारक शिफारसपत्र दिल्याशिवाय विद्यार्थिनी पास गणली जात नाहीं.

अध्यापन संस्थेचें वेळापत्रक व अभ्यासक्रम

सुरवातीला म्हणजे सकाळीं ९ ते १०॥ हा वेळ विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक शाळेच्या वर्गांचें अथवा विशिष्ट गटाचें अवलोकन करणें, त्यांना पाठ देणें या कामासाठीं राखून ठेवलेला असतो. नंतरच्या तीन वाजेपर्यंतच्या वेळांत चार समय (Periods) योजलेले असतात.

संगीतांत प्रत्येक विद्यार्थ्यांला व्यक्तिशः मार्गदर्शन करण्यांत येतें. त्यामुळें १५० विद्यार्थ्यांच्या या प्रशिक्षण संस्थेत संगीत विषयासाठीं दहा शिक्षक आहेत. पाठ-अवलोकने वगैरे बाबतींत मार्गदर्शन करण्यासाठीं १५ शिक्षक आहेत. तात्विक व्याख्याने देणारे नऊ शिक्षक, याशिवाय सुतारकाम, चित्रकाम,



हजारो कुटुंबांत आणि कित्येक बालकल्यांत नित्य वापरतात

छोट्या गटाचा हा एक तास संपला कीं मग त्यांना बाहेर फिरायला घेऊन जाण्यांत येतें. हा फिरण्याचा कार्यक्रम रोज सकाळीं दोन अडीच तासांचा असतो. त्यासंबंधी शिक्षिकेनें आगाऊच योजना केलेली असते. मुलांचें वय लक्षांत घेऊन जवळपासचीं स्थळें निश्चित केलेलीं असतात. या प्रवासांत मुलांचें लक्ष कशाकडे वेधलें जातें हें लक्षांत घेऊन मुलांना बघायला मिळणाऱ्या इमारती वाहने, वृक्ष, पक्षी, व्यावसायिक व्यक्ति, रस्ते, नागरिक जीवनाशीं संबंधित संस्था, दुकानें, फुलें, फळें, खेळणीं वगैरे अनेक विषयांवर या प्रवासांत मुलांशीं बोलण्याची संधी शिक्षिका घेतात.

मधल्या आणि वरच्या विभागांतील गटांना एका तासाऐवजीं खोलींत दोन तासांचें काम देण्यांत येतें. या कामांत माती-काम, हस्तव्यवसाय, भाषा, नृत्य, संगीत, सुरुवातीचे लेखन, वाचन, अंक मोजणी, बाहुलीचा खेळ, बांधकामाचे ठोकळे वगैरे व्यवसाय योग्य साधनांच्याद्वारें देण्यांत येतात. अर्धा ते पाऊण तास या प्रकारें खोलींतील कामांत घालवला कीं मग या गटांच्या मुलांनाही दररोज सामान्यतः दोन तास बाहेर नेण्यांत येतें. या वरच्या गटांतील मुलांशीं बोलतांना पूर्वीच्या अनुभवाचें अधिक विवरण करण्यांत येतें. ऋतुमानांतील हवामानाचा फरक, आकाशांतील फेरफार, वनस्पती, प्राणी आणि मानवी सामाजिक जीवनांतील उत्सव, प्रसंग आदि अनेक गोष्टी या प्रवासांत होतात. सर्व विभाग बारा साडेबाराच्या सुमारास परत शाळेंत येतात. साडेबाराच्या सुमारास मध्यें जेवणाचा कार्यक्रम असतो. तो आटोपून नंतर विश्रांतीचा स्वाभाविक कार्यक्रम असतो, त्यासाठीं झोपण्याची सोय असलेले विशेष खंड प्रत्येक किंडर गार्टन शाळेंत असतात. झोपण्यापूर्वी गोष्टींचा किंवा लहान गीतांचा कार्यक्रमही होतो.

तीन साडेतीन वाजतां मुलें पुनः उठलीं म्हणजे पुनः उपहाराची वेळ होते. चार साडेचारपर्यंत उपाहार उरकून पुनः संध्याकाळीं दोन अडीच तासांचा प्रत्येक गटाचा फिरण्याचा किंवा खेळांचा कार्यक्रम ऋतुमानाप्रमाणें योजलेला असतो. साताच्या सुमारास सर्व गट शाळेंत परततात. साडेसातच्या सुमारास घरीं जाणारीं मुले आपापल्या पालकाबरोबर घरीं जातात. वसतिगृहाच्या मुलांचा पुनः एक वेळ खाण्याचा कार्यक्रम व त्यानंतर विश्रांति.

शाळांचा आर्थिक प्रश्न

शाळेंतील प्रत्येक बालकावर संस्थेला एकूण तीनशे ते साडेतीनशे रूबल्स (१४ आणे = १ रूबल) खर्च येतो. पालकाला त्याच्या पगाराच्या प्रमाणांत ३० ते १२५ रूबल्स पर्यंत द्यावे लागतात. बाकीचा खर्च–जेथें कारखाने असतील तेथें त्यांची कांहीं मदत असते व बाकीचा बराच मोठा भाग त्या त्या जिल्ह्याच्या प्रादेशिक कौन्सिल ऑफ पीपल्स इकॉनॉमीकडून सरकारी अनुदानाच्या रूपानें देण्यांत येतो. सामान्यतः १५० बालकांच्या शिक्षण संस्थेचा वार्षिक खर्च ६० ते ७० लाख रूबल्स असतो असें तेथें सांगण्यांत आलें.

'बालकांना सर्व कांही उत्तम दिलें पाहिजे' या लेनिनच्या आदेशानुसार प्रत्येक किंडर गार्टन शाळेंत शक्य तो सर्व गोष्टी उत्तम ठेवण्याचा प्रयत्न दिसतो. ज्या थोड्या संस्था आम्ही पाहिल्या त्यांतील फर्निचर, पडदे, गालिचे, भींतीवरील भव्य चित्रें, मधून मधून ठेवलेले शिल्पांचे नमुने, आधुनिक स्वयंपाक घर, क्रीडांगण, बाग आणि प्रत्येक प्रकारची साधन–सामुग्री यांत पंतप्रधान क्रुश्चेवनें म्हटल्याप्रमाणें 'आमचा सोविएत समाज भावी प्रजेच्या साम्यवादी शिक्षणाकडे असाधारण लक्ष घालण्याचें चालूं ठेवील' या गोष्टीचा प्रत्यय आला.

शिक्षकांच्या कार्यांतील स्वास्थ्य आणि उत्साह

किंडर गार्टन शाळेंतील शिक्षकांच्या बाबतींत स्वतंत्रपणें निराळ्या लेखांत लिहीत आहे. येथें येवढाच उल्लेख करतों कीं शिक्षकांच्या कामाच्या मर्यादा स्पष्ट असल्यानें शिक्षकांच्या डोक्यावर कामाचा ताण दिसला नाहीं. आपलें कर्तव्य आपण चोखपणें बजावण्याकडे त्यांच्या वागणुकींत कटाक्ष दिसून येई. त्यांच्या कामांत एक प्रकारचें स्वास्थ्य, निश्चितपणा आणि ध्येयनिष्ठा बघायला मिळाल्यानें आनंद वाटला.

आपल्याला काय घेतां येईल ?

रशियाच्या या बालोद्यानांतून आपल्याला काय घेतां येईल असा स्वाभाविक प्रश्न मनांत सदोदित जागृत रहात असे. त्यासंबंधीं मनांत आलेले विचार व्यक्त करून हा लेख संपवतों.

(१) बालसंगोपन आणि शिक्षणाबाबत स्त्रियांना निश्चित केल्याखेरीज आर्थोत्पादनांत स्त्रिया समानतेच्या भूमिकेवर पुरुषाबरोबर सहभागी होऊं शकणार नाहीत. संगोपन–शिक्षणाचा प्रश्न या रीतीनें स्त्रियांच्या उन्नतीशीं आणि राष्ट्राच्या आर्थिक लढ्याशी संकलित आहे ही या प्रश्नाची नवी बाजू माझ्या अधिक स्पष्टपणें ध्यानांत आली.

(२) पूर्वप्राथमिक संस्थेंत आपल्या येथें आलेला लेखन–वाचनावरील भर बालकांच्या विकासाला मर्यादित करणारा आहे. बालमंदिरांत बालकांच्या आहार–विहाराच्या प्रश्नाला महत्त्व देण्याची जरूरी आपल्या देशांत रशियापेक्षांही अधीक आहे. दिवसांतील कार्यक्रमांत तेथें आजूबाजूच्या दुनियेचा प्रत्यक्ष परिचय करून देण्यावर आहे तसा भर आपल्या येथें

(पान १७ वर पहा)

लेनिनग्राडचें प्राशिक्षण विद्यालय

आगाऊ सूचना असल्यानें लेनिनग्राडच्या प्राशिक्षण विद्यालयांतील आद्य संस्थेचे मुख्याध्यापक आणि त्यांचे एक दोन सहकारी आपल्या कार्यालयांत आमची प्रतिक्षा करीत बसले होते. आमच्या दुभाषानें आमचा परिचय करून दिल्यानंतर मुख्याध्यापक श्री. विनो ग्रादोव यांनीं आपल्या सहकाऱ्याची ओळख करून दिली आणि नंतर म्हणाले, "ही प्रशिक्षण संस्था १९२३ सालीं प्राथमिक शिक्षकांच्या शिक्षणासाठीं स्थापन करण्यांत आली. गेल्या वर्षीपासून येथें पूर्वप्राथामिक प्रशिक्षणाचा विभाग सुरू झाला आहे. या विभागांत पूर्वी सातवी पास झालेल्या (शालान्त परीक्षा) विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असे. त्यांना तेथें चार वर्षांचा प्रशिक्षणक्रम करावा लागत असे. आतां प्रवेश मट्रिक पास झालेल्याना देण्यांत येतो व त्यांना नंतर तेथें दोन वर्षें शिक्षणक्रम करावा लागतो."

अभ्यासक्रमाची रूपरेखा

दोन वर्षांत एकूण चार सत्रें येथील काम चालतें. पहिल्या सत्रापासूनच विद्यार्थ्यांना प्रत्येक आठवड्यांत दोन तास पूर्वप्राथामिक शाळेच्या संचालनाचें अवलोकन करावें लागतें. अशा प्रकारच्या अवलोकनाला 'पॅसिव्ह प्रॅक्टिस' म्हणतात. यापुढील तीन सत्रांत 'ॲक्टिव्ह प्रॅक्टिस' म्हणजे मुलांना पाठ देण्याचें ते करूं शकतात. प्रत्येक विषयासंबंधींचे सामान्यतः विद्यार्थ्यांना नऊ पाठ यावे लागतात. यासंबंधीं मुख्याध्यापकाशीं बोलतांना मी म्हणालों, "येवढे सर्व पाठ रोज टर्ममध्यें घेऊन होतात!" ते म्हणाले, "येवढे पाठ तर घेतोंच याशिवाय चवथ्या सत्रांत प्रत्येक विद्यार्थिनीला तीन आठवडे वर्ग-संचालन करून दाखवावें लागतें."

"वर्गांत असतात तरी किती मुली?", मी विचारलें.

ते म्हणाले, "प्रत्येक वर्गांत सामान्यतः तीस मुली असतात."

"आणि प्रॅक्टिसिंग शाळा किती असतात?" मी पुनः विचारलें.

"किती तरी! २० पूर्वप्राथमिक शाळा तर आतांच जोडलेल्या आहेत जरूर पडल्यास ही संख्या वाढवतां येते."


मी म्हणालो, "एवढ्या सर्व शाळांवर तुम्हीं देखरेख कशी ठेवतां?"

"एक तर आमच्या पूर्वप्राथमिक शाळांचें सर्वत्र एकच धोरण आहे. या सर्व शाळेंत प्रशिक्षित अनुभवी शिक्षिका कामें करीत असतात. विद्यार्थिनींच्या एका जोडीला एक सबंध दिवस शाळेंत घालवावा लागतो. चवथ्या सत्रांत तीन आठवडे वर्गसंचालन विद्यार्थिनींस करून दाखवावें लागतें. ती ज्या शाळेंत पाठ देत असते तेथेंच तिचें वर्गसंचालन चालतें. त्यावर शाळेची मुख्यशिक्षिका देखरेख ठेवते. विद्यार्थिनींच्या कामाबाबत मुख्याशिक्षिकेने समाधानकारक शिफारसपत्र दिल्याशिवाय विद्यार्थिनी पास गणली जात नाहीं.

अध्यापन संस्थेचें वेळापत्रक व अभ्यासक्रम

सुरवातीला म्हणजे सकाळीं ९ ते १०॥ हा वेळ विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक शाळेच्या वर्गांचें अथवा विशिष्ट गटाचें अवलोकन करणें, त्यांना पाठ देणें या कामासाठीं राखून ठेवलेला असतो. नंतरच्या तीन वाजेपर्यंतच्या वेळांत चार समय (Periods) योजलेले असतात.

संगीतांत प्रत्येक विद्यार्थ्यांला व्यक्तिशः मार्गदर्शन करण्यांत येतें. त्यामुळें १५० विद्यार्थ्यांच्या या प्रशिक्षण संस्थेत संगीत विषयासाठीं दहा शिक्षक आहेत. पाठ-अवलोकने वगैरे बाबतींत मार्गदर्शन करण्यासाठीं १५ शिक्षक आहेत. तात्विक व्याख्याने देणारे नऊ शिक्षक, याशिवाय सुतारकाम, चित्रकाम,



मातीकाम, कागदकाम, नृत्य, शारीरिक व्यायाम वगैरे विषय शिकविण्यासाठीं एकूण संस्थेंत तेपन शिक्षक आहेत.

विद्यालयांत विषयाप्रमाणें विभागांची योजना आहे. १५० विद्यार्थ्यांचे एकूण पांच गट पाडले आहेत. त्या प्रत्येक गटावर दोन शिक्षकांची नेमणूक असते. त्यापैकीं एक वर्गाचा शिक्षक म्हणजे तेथील परिभाषेप्रमाणें लीडर असतो. दुसरा त्याचा मदतनीस असतो. पण या विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गटाच्या जबाबदारीबरोबरच या शिक्षकांच्याकडे एकाद्या विषयाची जबाबदारी असते. या विषायवरील व्याख्यानासाठीं एक खंड, त्याचप्रमाणें या विषयावरील पुस्तकें, शैक्षणिक साधनें यासाठीं दुसरा खंड आणि तिसरा खंड विद्यार्थ्यांनीं काम करावयाचा खंड. यांत त्या त्या विषयासंबंधीचें संग्रहालय-प्रदर्शन योजलेलें असतें. या ठिकाणी आपल्या रिकाम्या वेळांत विद्यार्थिनी अभ्यास करतात अथवा साधनें तयार करतात. विद्यालयांत या प्रकारची व्यवस्था पुढील विषयांसाठीं केलेली होती—(१) इतिहास, (२) भूगोल, (३) शरीरशास्त्र आणि जीवशास्त्र, (४) सुतार काम—पुठ्ठा काम, (५) हस्त-व्यवसाय, कागदकाम, (६) भाषा. कांहीं विषयांसाठीं एकेका खंडाचीच व्यवस्था होती. तरीपण पांच वर्गांसाठीं एकूण १८-२० मोठमोठ्या खोल्यांची व्यवस्था दिसत होती. प्रत्येक खोलींत साधनें, पुस्तकें आणि साहित्य भरपूर होतें. विद्यार्थ्यांच्या काम करावयाच्या खोल्यांची योजना आपल्या येथील अध्यापन मंदिरांतही घेण्यासारखी वाटते. प्रत्येक विषयाला तीन खोल्या न देतां आल्या तरी दोन खोल्या प्रशिक्षण विद्यालयांत प्रत्येक विषयाला मिळणें प्रशिक्षण परिणामकारक करण्याच्या दृष्टीनें जरूरीचें वाटतें. एक खोली विशिष्ट विषयाच्या शिक्षकांसाठीं आणि एक विद्यार्थ्यांसाठीं. शिक्षकाच्या खोलींत त्याचीं पुस्तकें, प्रशिक्षण साहित्य योजून तेथेंच व्याख्यानांची योजना आणि विद्यार्थ्यांच्या खोल्यांत संग्रहालय-प्रदर्शन, विद्यार्थि-पुस्तकालय, अभ्यास करण्याची सोय वगैरे असल्या येथें केल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या कामाला अनुकूल वातावरण निर्माण करण्यास अवकाश राहील.

प्रशिक्षण संस्थेचें वातावरण

संस्थेची योजना एका भव्य इमारतींत होती. तींत ऑडिटोरियम्, विषयांच्या खोल्या, अध्यापकांच्या खोल्या, स्वयंपाक घर, भोजनगृह, केन्द्रीय पुस्तकालय, वाचनालय, व्यायाम विभाग, मुख्य कार्यालय, शिक्षकांसाठीं मीलन खंड, मुख्याध्यापकाची खोली, वर्कशॉप्स वगैरे विविध विभाग होते. जिन्यांत आणि प्रत्येक खोलींत वाढणाऱ्या सावलींत वनस्पतींच्या आणि फुलझाडांच्या कुंड्या योजून विद्यालयाला जणुं उद्यानाचें आकर्षक स्वरूप दिलें होतें.

येवढ्या सर्व कुंड्यासाठीं या विद्यालयांत किती माळी ठेवलेले असतात हें विचारतांच विनोग्रादोव म्हणाले "तीन-चार माळी आहेत, परंतु या कुंड्यांच्या संगोपनाचें काम आम्हीं विद्यार्थ्यांनाच सोपवलेलें असतें. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जोडीला कांहीं कुंड्या सोपवलेल्या असतात. या कुंड्यांत योग्य खत-माती घालणें, योग्य वेळीं पाणी देणें, कुंड्यांना रंग देणें, घाण कचरा साफ करणें, जरूर तेव्हां प्रकाशांत-उनांत ठेवणें वगैरे कामें प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जोडीला करावीं लागतात. या कुंड्यांचीं आम्ही प्रदर्शनेंही मधून मधून भरवतों व या बाबतींत विद्यार्थ्यांना उत्तेजन देतों."

विद्यालयाचा माजी विद्यार्थ्यांशीं संपर्क

मी आणखी विचारलें, "तुमच्या येथून पास झालेल्या विद्यार्थ्यांना सर्वांना काम मिळतें ना?" विनोग्रादोव जरा हंसले अन् म्हणाले, "आमच्या येथें सर्व कामांत योजना असतात. प्रत्येक जिल्ह्याची शिक्षकाबाबतची गरज किती याचा अंदाज घेऊनच प्रशिक्षण संस्थेंत विद्यार्थी घेण्यांत येतात. विद्यार्थ्यांचा शिक्षणक्रम पूर्ण झाला कीं त्याबरोबरच त्याला कोठें कामावर जायचें याची ऑर्डर त्याच्या हातांत पडते. जेवढ्या शिक्षिका येथें तयार होतात त्या सर्वच्या सर्वच पुढें शिक्षक म्हणून सामान्यतः कामावर जातात. मातृत्व, आजार किंवा अशाच कांहीं कारणांमुळें कोणी कामावर न जाऊ शकलें तर गोष्ट निराळी."

"बरं जुन्या विद्यार्थ्यांशीं तुम्ही संबंध कसा ठेवता?"

"आमचे विद्यार्थि याच जिल्ह्यांतील निश्चित शाळेंत कामाला लागतात. त्यांना वेळोवेळीं त्या त्या विषयाचें आद्यतन ज्ञान देणें, शिक्षणाच्या क्षेत्रांतील प्रगतीची कल्पना देणें ही जबाबदारी देखील आमच्या संस्थेचीच असते. त्यासाठीं आमच्या स्टाफवर तज्ञ मंडळी आहेत. शिक्षकांचीं संमेलनें-चर्चा परिषदा, प्रदर्शनें, संस्कार वर्ग, व्याख्यानमालांची योजना आम्ही करतों. यामुळें विद्यार्थ्यांशीं आमचा सतत संबंध राहातो व विद्यार्थ्यांचें ज्ञान अद्यावत राहतें.

सोविएत शिक्षक

राष्ट्राच्या वैचारिक नवरचनेंत शिक्षकाचें स्थान आणि महत्त्व सोविएत सरकारनें ओळखलेलें असल्यानें शिक्षक कार्यक्षम कसे राहतील या गोष्टीकडे तेथें फार लक्ष दिलें जातें. शिक्षकाचें पगार-धोरण सामान्य डॉक्टर आणि इंजिनिअरइतकेंच असल्यानें या क्षेत्रांत योग्य व्यक्तींचीं तेथें कमतरता दिसत नाहीं. योग्य व्यक्तींची निवड झाल्यानंतर त्यांचें प्रशिक्षण शक्य तो परिणामकारक करण्यासाठीं संस्थांची कार्यक्षमता चांगली ठेवण्यांत आली आहे. शिक्षणांत अभ्यासक्रमाचें शिक्षण आणि अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिक्षणक्रम असे दोन विभाग स्वतंत्र असल्याने शिक्षकाला आपलें काम करण्यांत कोणत्याही प्रकारची दखलगिरी नसते. प्रत्येक शिक्षकाला कामाबरोबर मोकळा वेळही

त्याच्या स्वतःच्या विकासाला मिळेल एवढेच नव्हें, तर हा मोकळा वेळ शिक्षक आपल्या प्रगतीसाठीं उपयोजून घेऊं शकेल अशा प्रकारच्या संस्था व मार्गदर्शन शिक्षकाला पदोपदीं मिळण्याची सोय करण्यांत आली आहे. या सर्व योजनापूर्ण उपक्रमामुळें येथील शिक्षकांत कार्यक्षमता, उत्साह व आपल्या जबाबदारीचें भान विशेष दिसलें

पूर्वप्राथमिक संस्थेंत शिक्षिकेला एकूण सहा तास काम करावें लागतें. अधिक काम करण्याची जरूर पडल्यास तिला जास्त पगार मिळतो. प्राथमिक (चार इयत्ता) आणि पूर्वप्राथमिक शिक्षकांचा दर्जा सारखा आहे. त्यांचा पगारही सारखाच असतो. परंतु प्राथमिक शिक्षकाला काम चार तासाचें असतें. पूर्वप्राथमिक शिक्षकाचा सुरुवातीचा पगार ७४५ रुबल्स तर अध्यापकाचा ९६० रुबल्स. माध्यमिक शिक्षकाचा ९०० रुबल्स; दर पांच वर्षांनीं पगारांत पांच टक्के वाढ देण्यांत येते. खेड्यांत काम करणाऱ्या शिक्षकांना २५ टक्के पगार अधिक देण्यांत येतो. याशिवाय त्यांना घर व ½ हेक्टर जमिन सरकारकडून मिळते. विश्रामगृहांत सवलतीच्या दरानें त्यांना सुटीचा काळ घालवतां येतो.

—शेप नामले

स्वातंत्र्य आणि व्यक्तिविकास

[पान ५ वरून चालू]

शिक्षणाधिकारी जरा विचारांत पडल्यासारखा दिसला व म्हणाला, "मी याला व्यक्तीचें सामाजिक स्वातंत्र्य म्हणेन. समाजांत आपण कोणतें काम घ्यावें याची निवड करण्याचें स्वातंत्र्य. परंतु माझें नियमन कोणत्या सत्तेनें अथवा शासनानें करावें याची निवड करण्याचें स्वातंत्र्य तेथें नाहीं हें खरें आहे ना?"

"म्हणजे राजकीय मताचें स्वातंत्र्य तेथें नाहीं असेंच ना तुम्हाला म्हणायचें आहे?" अध्यापिकाबाईनीं विचारलें.

"राजकीय स्वातंत्र्य आपल्या येथें ज्या प्रमाणांत व्यक्तीला आहे तितकें स्वातंत्र्य सोविएतमधें नाहीं. एकाच एका राजकीय मतप्रणालिकेचें तेथें वर्चस्व आहे अन् तिचाच सारखा प्रचार आहे हें खरं आहे. पण राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्य अन् समता ह्या गोष्टी व्यक्तीच्या दैनंदिन जीवनांत अधिक स्पर्शी करणाऱ्या अन् व्यापक नाहींत का? तेथें राजकीय स्वातंत्र्याचा विकास नाहीं, आपल्या येथें सामाजिक स्वातंत्र्याचा विकास नाहीं. मला वाटतें तेथील जनता राजकीय स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय राहणार नाहीं. आणि आपली जनता सामाजिक स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय राहणार नाहीं. मनुष्य स्वभाव सर्वत्र सारखा आहे." चर्चेचा शेवट करतांना मी म्हणालों "वरं आतां पुनः केव्हां तरी" म्हणून आम्ही आपापल्या कामाला निघून गेलों.

—शेप नामले

रशियांतील बालोद्यानें

(पान १४ वरून चालू)

आपण आणला पाहिजे. आपल्या बालकांना खोल्यांत कोंबून शिक्षण देण्यापेक्षां तास दीड तास त्यांना दररोज बाहेर फिरवून आणण्याच्या कार्यक्रमाला आपण बिनपैशांनीं स्थान देऊ शकतों.

(३) बालशाळेंत वनस्पति व प्राणी यांच्या संगोपनाला आपण अधीक स्थान दिलें पाहिजे.

(४) बालशाळेंत पद्धतीचें स्तोम माजवण्यापेक्षां बाल जीवन विकासाच्या चालू गरजा काय आहेत त्याकडे आपण अधीक लक्ष पुरविलें पाहिजे व त्या दृष्टीनें विचार करून आपल्या संस्थांचा विकास साधला पाहिजे.

(५) जीवनाला कांहीं तरी चांगला आदर्श आणि तो प्राप्त करण्याच्या दृष्टीनें जीवनाला निश्चित उपक्रम असला पाहिजे. बालशिक्षणांत या गोष्टीला फार महत्व आहे. आपला इतिहास व संस्कृति यांच्या आधारावर आपल्या जीवनक्रमांत कांहीं तरी निश्चितपणा व त्याबद्दलचा आदरभाव आपण वाढविला पाहिजे. बालकांचा विकास गोंधळाच्या वातावरणांत होवू शकत नाहीं. आपलीं जीवनमूल्यें निश्चित ठरवून त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य आम्ही दाखवलें पाहिजे.

—शेप नामले



शैक्षणिक शासनाचें एकमांतील कार्य

सोविएतमधें शिक्षणसंस्थांच्या शासनाची जबाबदारी जिल्हा सोविएत संघाकडे असते. त्यामुळें जिल्ह्यांतील शैक्षणिक शासनासंबंधीचे बरेच प्रश्न स्थानिक सोविअेत मंडळेंच सोडवूं शकतात. जिल्हा सोविएत मंडळाच्या अधिकारकक्षेंत पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि अनेक प्रकारच्या विशेष संस्था असतात.

सहाव्या पंचवार्षिक योजनेप्रमणें सध्या तेथें सार्वत्रिक, विनामूल्य आणि सक्तीच्या शिक्षणाचा काल दहा वर्षांचा करण्यांत येत आहे. त्यामुळें माध्यमिक संस्थांची संख्या दरवर्षी वाढते आहे. मॉस्को प्रदेशासंबंधी सांगायचें झालें तर या प्रदेशांतील ८० टक्के विद्यार्थी आतां सात वर्षांच्या शाळांऐवजी दशवर्षीय शाळेंत जाऊ लागले आहेत. या प्रदेशांत एकूण ३१६८ शिक्षण-संस्था असून त्यांत ७२४००० मुलें व मुली शिक्षण घेत आहेत. अंध, बहिऱ्या आणि मुक्या मुलांसाठीं आणि मानसिक दृष्ट्या मागासलेल्या मुलांसाठीं विशेष प्रकारच्या संस्था आहेत.

शिक्षणाच्या स्वरूपाच्या दृष्टीनें दोन प्रकारच्या संस्था तेथें निरनिराळ्या ठेवण्यांत आल्या आहेत. आपल्या येथें अभ्यासक्रम करून घेणाऱ्या शिक्षण-संस्थांनाच शिक्षणक्रमातिरिक्त उपक्रमाकडे (Extra Curriculum Activities) लक्ष द्यावें लागतें. सोविएतमध्यें अभ्यासक्रम करून घेणाऱ्या शाळांचा वेळ सकाळीं ८ ते दुपारीं २ पर्यंत असतो. त्यानंतरचा वेळ मुलें आपल्या अभिरुचीप्रमाणें अतिरिक्त उपक्रमाच्या संस्थेंत घालवतात. मॉस्को प्रदेशांत अशा उपक्रमाच्या संस्थांत ३९ मुलांचे क्लब्ज, २७ टेक्निकल सेंटर्स, ८ निसर्गप्रेमी मुलांचीं केन्द्रें, २७ खेळक्रीडा मंडळें, याशिवाय मुलांसाठीं पार्क्स व स्टेडियम्स् आहेत. या सर्व अतिरिक्त उपक्रमाच्या संस्थेंत जबाबदार मार्गदर्शक अधिकारी कार्यकर्ते असतात. याच प्रदेशांत एकूण १२३२ किंडर गार्टन्स म्हणजे पूर्वप्राथमिक संस्था आहेत. त्यांत एक लक्ष मुलांचीं सोय आहे. त्याशिवाय अनाथ बालकांसाठीं अनाथगृहें आहेत. शिक्षण खात्याकडे याशिवाय प्रशिक्षण संस्था, शिक्षणविषयक संशोधन संस्था आणि लोकरंजनाच्या सांस्कृतिक संस्थांचें निरीक्षण-मार्गदर्शन करावें लागतें.

सामान्यतः ज्या खेडेगांवांत १५ मुलें मिळूं शकतात तेथें शाळा दिली जाते. मॉस्को प्रदेशांत शिक्षकांच्या शिक्षणासाठीं ८ प्रशिक्षण संस्था आहेत त्यांतून दरवर्षी एक हजार शिक्षक तयार मिळतात. सारख्या प्रकारच्या संस्थांचा कार्यक्रम सर्वत्र सारखा असतो. जिल्हा मंडळें स्थानिक मंडळाच्या कामावर देखरेख ठेवतात.

शिक्षण खात्यांत इंजिनिअर्सचें एक खातें असतें. शाळेच्या इमारती बांधणें, चालू इमारती दुरुस्त ठेवणें हें त्यांचें काम असतें.

निरीक्षण-मार्गदर्शन

या कामासाठी एकूण ३८ इन्स्पेक्टर्स आहेत. शिक्षकाच्या कामाचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव असावा लागतो. प्रत्येकाकडे विशिष्ट प्रकारच्या संस्था-तपासणीचें काम दिलेलें असतें. जिल्ह्यांतील इन्स्पेक्टरांची बदली होत नाहीं. मॉस्को प्रदेशांत एकूण ६२ जिल्हाविभाग आहेत. प्रत्येक विभागांत सामान्यतः ७० संस्था असतात. त्यांत १५ सप्तवार्षिक शाळा, ११ दशवार्षिक शाळा, १४ किंडर गार्टन आणि ३-४ अन्य प्रकारच्या संस्था असतात. तपासणीचा उद्देश शिक्षकांच्या कामांची यथार्थ कल्पना घेणें व त्यास परिणामकारक मदत पोहोंचविणें व सुचवलेल्या गोष्टी अमलात येतात कीं नाहीं हें पाहणें हा आहे.

शिक्षकासंबंधींचें कार्य

मॉस्को प्रदेशांत एकूण ३६७००० शिक्षक आहेत. अॅडव्हान्सड टीचर्स ट्रेडिंग इन्स्टिटयूटस् शिक्षकांच्या व्यवसायात्मक प्रगतीसाठीं कार्य करीत असतात. दैनंदिन शैक्षणिक प्रश्नाबाबत सल्ला देणें, चर्चा-परिषदा योजणें व उजळणीच्या अथवा नव्या शिक्षणक्रमांची योजना करणें वगैरे कामें या संस्थेकडे असतात. या संस्थेकडून प्रत्येक प्रकारच्या शाळेंत शिक्षण पद्धतिविषयक तज्ञ शिक्षक त्या त्या संस्थेंत जाऊन त्यांना मदत करतात. हे मदतनीस उच्च शिक्षण प्राप्त केलेले असतात. जी पूर्वप्राथमिक संस्था मी पाहिली तींत अशी एक तज्ञ शिक्षिका त्यावेळीं तेथें होती. ती १५ दिवस त्या संस्थेंत राहून शिक्षकाच्या कामांत त्यांना मदत करीत होती. ट्रेनिंग इन्स्टिटयूटमध्यें शिक्षणासंबंधीं जे कांहीं अद्यावत् ज्ञान नवीन उपलब्ध झालें असेल, नवीन साधनें, पुस्तकें, चित्रें, साहित्य तयार झालें असेल त्याचा परिचय सर्व शिक्षकाना करून देण्याचें कार्य देखील याच संस्था करतात. शिक्षकांचीं संमेलनें भरवून अनुभवांची देवघेव करण्यांत येते. त्यामुळें जिल्ह्यांतील शैक्षणिक प्रश्नांचा मोकळ्या मनानें खल होतो. शिक्षणाच्या कार्याला नवा उत्साह येतो. शिक्षकांना आपल्या कामाचें चीज झाल्याचें समाधान मिळतें.

'इस्कस'मधील लेखाच्या आधारें
(इस्कसच्या सौजन्यानें)

बाल-शिक्षण आणि संघ समाचार

ग्राम बाल-शिक्षा केन्द्र, कोसबाड : दिनांक ३१-१-५९ रोजीं दुपारीं संघाच्या परीक्षा समितीची एक सभा योजिली आहे. पूर्वी संघाशीं जोडून असलेलीं बहुतेक बाल अध्यापन मंदिरें आतां नवीन मुंबई राज्यांत आल्यानें या संस्थांतील परीक्षा आणि अध्यापन नियंत्रणाचें कार्य मुंबई राज्याच्या शिक्षण खात्याकडून होवूं लागलें आहे म्हणून संघानें या कार्याकरतां नेमलेल्या बाल अध्यापन नियंत्रण समितीचें विसर्जन करण्याचा निर्णय घेतला. तथापि आजपर्यंत संघाच्या परीक्षेला बसून नापास झालेल्या विद्यार्थ्यांना एक संधी द्यावी ह्या उद्देशानें संघानें १९५९ सालीं 'प्रवेश' व 'प्राविण्य' शिक्षणक्रमाच्या परीक्षा घेण्याची व्यवस्था केली आहे. ज्या विद्यार्थ्यांना या परीक्षांस बसावयाचें असेल त्यांनीं आपापल्या बाल अध्यापन संस्थेमार्फत संघाच्या मंत्र्याकडे अर्ज करावे. या अर्जांची मुदत ३०-१-५९ पर्यंत ठेविण्यांत आली आहे याची विद्यार्थिनींनीं नोंद घ्यावी.

पूर्वप्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र परीक्षेबाबत : मुंबई राज्यांतील बाल-अध्यापन संस्थांत पूर्वप्राथमिक शिक्षणक्रम या वर्षापासून बदललेला आहे हें सर्वांना माहीत आहे. तथापि जुन्या शिक्षणक्रमाप्रमाणें ज्यांनीं पूर्वी अभ्यास केला त्यांना शेवटची संधी म्हणून शिक्षण खात्यानें नवीन शिक्षणक्रमाच्या बरोबरच जुन्या शिक्षणक्रमाप्रमाणें यंदाच्या वर्षापुरती परीक्षा घेण्याचें ठरविलें आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्राथमिकचे विषय जुन्याप्रमाणें आणि पूर्वप्राथमिकचे विषय नवीन शिक्षणक्रमाप्रमाणें घ्यावयाचे असतील त्यांना तसें करतां येईल. यासाठीं अशा विद्यार्थ्यांनीं आपापल्या संस्थेच्या मुख्याध्यापकांना ताबडतोब भेटावें व परीक्षेबाबतचा सल्ला विचारावा.

ग्राम बाल शिक्षा केन्द्र, कोसबाड : नूतन बालशिक्षण संघाच्या व्यवस्थापक मंडळाची सभा दिनांक एक फेब्रुवारीला योजण्यांत आली आहे.

COMPLETE TEXTILE
ENGINEERING SERVICE

ASSOCIATED TEXTILE
ENGINEERS

☆

Bombay, Ahmedabad & Coimbtore

बालशिक्षण परिषद, अमरावती : येथील सर्व बालशाळांची परिषद दिनांक २-३-४ जानेवारी रोजी श्री. काजळे, प्राचार्य, विदर्भ महाविद्यालय ह्यांचे अध्यक्षतेखाली भरविण्यांत आली. परिषदेंत बालशाळेचें प्रात्यक्षिक, मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, प्रदर्शन, त्याचप्रमाणें विविध पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नावर परिसंवादांची योजना करण्यांत आली होती.


बालनिकेतन, खांडवा : या संस्थेचें वार्षिक स्नेहसंमेलन नूतन बालशिक्षण संघाचे चिटणीस श्री. शेष नामले यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ डिसेंबर रोजी साजरें झालें.

श्रीमती सौ. इंदिराबाई नातूंचा बाहुल्यांचा कारखाना : शिशु विहार व बालअध्यापन मंदिर पुणें या संस्थांच्या स्नेहसंमेलनासाठीं संघचिटणीस पुण्यास गेले असतांना त्यांनीं या कारखान्यास भेट दिली. बालमंदिरांतील मुक्त व्यवसायांत बाहुल्यांच्या खेळांना स्थान देण्यांत येऊं लागल्यामुळें या कारखान्यांत मुलांना खेळासाठीं योग्य असे बाहुल्यांचे सेटस तयार करण्याचें श्रीमती सौ. इंदिराबाईंनीं स्वीकारलें आहे. बालमंदिराच्या सेटमध्यें आजोबा, आजी, आईवडील, भाऊ, बहीण व बाळ अशा एकूण सात बाहुल्यांच्या सेटची किंमत २० रुपये होते. ह्या बाहुल्या कापडी असल्यानें त्या फुटण्या तुटण्याची भीति नाहीं. ज्या कोणास हा सेट पाहिजे असेल त्यांनीं खिलौना कार्यालय ह्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

बालवाडी शिबिराच्या योजनेसाठीं कार्यकर्ते पाहिजेत

मराठवाड्यांतील बीड या गांवीं मे, जून व जुलै या तीन महिन्यांसाठीं ग्रामीण विभागांतून बालवाड्या चालविणाऱ्या शिक्षकांना तयार करण्यासाठीं एक बालवाडी शिबिर चालविण्याचें मध्यवर्ती मराठवाडा महिला शिक्षण समितीनें ठरविलें आहे. शिबिरांत एकूण ३० विद्यार्थिनींना घेण्यांत येणार आहे. हें शिबिर चालविण्यासाठीं पदवीधर पूर्वप्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र धारण केलेल्या दोन कार्यकर्त्या पाहिजे आहेत. या कार्यकर्त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें मासिक २०० रुपयांपर्यंत वेतन देण्यांत येईल. हें कार्य अंगिकारण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं श्री. एस. आर. गुरुजी C/o सौ. ताराबाई परांजपे लक्ष्मी निवास, औरंगपुरा, औरंगाबाद या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

साधना-कुमार अंक १९५९ : विविध स्पर्धा : १९५७ सालापासून साने गुरुजींचें वार्षिक पुण्यस्मरण म्हणून ११ जूनला एक कुमार अंक काढण्यांत येणार असून त्यात सृजनशील वृत्तींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनें साधना साप्ताहिकानें या वर्षी दहा वर्षांखालील आणि ११ ते १६ वयोमर्यादेतील बालकांसाठी 'लेखन स्पर्धा' आणि 'चित्रस्पर्धे'ची योजना आंखली आहे. यांत सहभागी होणाऱ्या मुलांना पारितोषिकें देण्यासाठीं इंडियन कौन्सिल फॉर चाइल्ड वेलफेअर या संस्थेनें १५० रुपयांचें अनुदान मंजूर केलें आहे. चित्रें व लेख पाठविण्याची अखेरची मुदत २८ फेब्रुवारी १९५९ पर्यंत ठेवण्यांत आली आहे. स्पर्धेसंबंधींच्या अधिक माहितीसाठीं संपादक, साधना, कुमार अंक, शनिवार पेठ, पुणें २ यांजकडे पत्रव्यवहार करावा.





अद्ययावत नवसंशोधनाचे
युगान्तर आणणारे
हेअर रिसर्च

फार परिश्रमपूर्वक संशोधनानंतर
१८ औषधीयुक्त वनस्पतीपासून
तयार केलेली एकमेव आयुर्वेदीय

विको वज्रदंती


पेस्ट अगर पावडर आपल्या पसंतीप्रमाणें वापरा.

विको लेबोरेटरीज
जयेंद्र मेन्शन, लाल्बाग, परेल, मुंबई १४.


MPS



सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी



— सोल डिस्ट्रीब्युटर्स —
ए. व्ही. भार. ए. ॲन्ड कं., मुंबई २





हजारों कुटुंबांतून आतां अत्यंत खुषीनें
वापरलें जात आहे

वत्सला

* गळणारे केंस बंद करतें व केंसांची वाढ करतें.
* मदूला शीतलता आणतें व केंस तुकतुकीत बनवितें.
* यशस्वी प्रयोगांनंतरच जनतेसमोर ठेवलें गेलें आहे.

लोमा प्रॉडक्टसची एक अनमोल कृति

: सोल एजन्ट्स :

एम्. एम्. खंभातवाला, रायपूर, अहमदाबाद

एजन्ट्स : सी. नरोत्तम अँड कं.,
मंगलदास रोड, मुंबई–२.
टेलिफोन नं. ३०५७५

M. P. S



मुद्रक व प्रकाशकः—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर–मुंबई १४.
मुद्रणस्थानः—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी–निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ वें : अंक ११ वा

फेब्रुवारी १९५९



मूठमातीच दिली पाहिजे

ज्ञान आणि कर्म यांच्या फारकतीमुळें कांहीं प्रकारचे अन्याय निर्माण झाले आहेत. मानसिक अन्याय हा पहिला अन्याय होय. मानसशास्त्रदृष्ट्या कर्मापासून ज्ञानाची फारकत करतां येत नाहीं.

दुसरा अन्याय म्हणजे सामाजिक अन्याय. कर्मापासून जेव्हां ज्ञान वेगळें केलें जातें तेव्हां समाजांत दोन वर्गांची निर्मिति होते. त्यांपैकीं पहिला सुशिक्षितांचा आणि दुसरा मजुरांचा. सुशिक्षित मजुरांकडे तुच्छतेनें पाहतील. या अन्यायापाठोपाठ आर्थिक अन्यायही डोकें वर काढील. अन्याय-परंपरेच्या कचाट्यांतून सुटायचें असेल तर सध्यांच्या ज्ञान आणि कर्म यांच्या फारकत करणाऱ्या शिक्षणाला मूठमाती दिली पाहिजे.

: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक

: संपादक :


श्री. शेष नामले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई–१४.	३७ नये पैसे

वय वाढतें जातें
पंरतु केंस मात्र
पांढरे होत नाहींत



केसांना नैसर्गिकरीत्या काळेभोर करण्यासाठीं जगभर मान्यता पावलेले.



कोणत्याही अवस्थेंतील डोक्यावरील केंस कितीही, पांढरे झालेले असोत लोमा ते खात्रीनें काळे केल्याशिवाय राहणार नाहीं!

लोमा कलप नव्हे परंतु तें नैसर्गिकपणें केंस काळे करणारें असून त्याचबरोबर केसांची वाढ करणारीं नैसर्गिक द्रव्यें त्यांत असलेलें तें एक हेअर ट्रेसर आहे...त्याला अत्यंत आल्हाददायक सुवास असतो.

सोल एजंटस्: एम. एम. खंभातवाला, अहमदाबाद १.
एजंटस्: सी. नरोत्तम अॅन्ड कंपनी मंगलदास रोड, मुंबई २.

MPS-MAR

फॅन्सी नायलॉन साडी, नायलॉन जेकार्ड, दोरिया,
क्रेप, जॉर्जेट, टॉफेटा, सॅटीन, फ्लावर वगैरे

निरनिराळ्या रंगांत, तसेंच आकर्षक डिझाइन्समध्यें छापलेले मिळतात

: टेलिग्राम :
'BIPFABRIC'

: टेलिफोन :
मिल : ६०५०४
शॉप : ३९७४९

BIPIN SILK MILLS CO. PRIVATE LTD. ★ BOMBAY (INDIA) ★

क्लॉथ शॉप
गोविंद गल्ली,
मूळजी जेठा मार्केट,
मुंबई २

BIPSU FABRICS

: रीटेल शॉप :

बिपीन सिल्क मिल्स कं. प्रायव्हेट लि.,

१२ दादर रोड, मुंबई २८
(इंडिया)

A (ROHIT) GROUP OF ENTERPRISES

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल

भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई — उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक

कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी — कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे

चिटणीस : श्री. शेष नामले — उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण सस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपात पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गातून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठी संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, **नूतन बाल-शिक्षण संघ,**
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे — श्री. अनुताई वाघ

सौ. सरलाताई देवधर — श्री. भा. घो. कर्वे

सौ. मालिनीबाई परांजपे

अनुक्रमणिका

प्रौढ विभाग

संपादकीय—

समाज-कल्याणकारी संस्थांचें अर्भक संगोपन — शेष नामले

सर्वांगी विकास म्हणजे काय ? — माई

पूर्वप्राथमिक शिक्षणांत रशियापासून काय घेतां येईल ? — शेष नामले

विल्यम फ्रेड्रिक ऑगस्ट फ्रॉबेल — ना.

शिवाय नू. बालशिक्षण-संघसमाचार इ.

बाल विभाग

माझें उपवन — स्नेहलता पत्की

थंडी — परशुराम मर्ढेकर

कोंबडीचों चतुर पिलें — अनुताई

पहांटेच्या वेळीं — दादाराव जगताप

महत्वाच्या सूचना :

ग्राहकांस—

१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.

'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नावावर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारा-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नांवाचें एक सदर चालविण्यात येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्याना स्थान देण्यांत येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यानीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

लेखकांस—

१) 'शिक्षण-पत्रिकें'त लेख लिहूं इच्छिणारानीं आपलें लेखन कागदाच्या एकाच बाजूवर करावें. तें दर महिन्याच्या ता. १ च्या आत संपादन कार्यालयाकडे पाठवावें. पसंत नसलेल्या लेखांबरोबर पुरेसें पोस्टेज असल्यास लेख परत करण्यांत येतील.

२) 'शिक्षण-पत्रिका' कोणत्याहि महिन्यापासून सुरू करतां येते.

३) 'शिक्षण-पत्रिका' प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस पोस्टांत पडते. सामान्यतः ता. २५ पर्यंत ती सर्वांना मिळते. तशी न मिळाल्यास ग्राहकांनीं ता. ३० च्या आंत खालीं दिलेल्या पत्त्यावर कळवावें.

४) 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रत्येक ग्राहकाचा नंबर पत्रिकेच्या वेष्टनावर लिहिलेला असतो. व्यवस्थापक-कार्यालयाशीं पत्रव्यवहार करतांना हा नंबर ग्राहकानें अवश्य कळवावा.

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका'
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ११] मुंबई [फेब्रुवारी १९५९

संपादकीय

लोकांच्या या उत्साहाला योग्य प्रोत्साहन मिळालें पाहिजे

पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या अखिल भारतीय क्षेत्रांत मुंबई राज्य आघाडीवर आहे हें नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. सरकारी खात्यांत नोंद असलेल्या अशा सर्व भारतांतील ६३० पूर्वप्राथमिक शाळांत (१९५५-५६ च्या प्रतिवृत्ताप्रमाणें) एकूण ४६ हजाराच्या आसपास मुलें शाळेंत जात होतीं. त्यांतील ३४८ शाळा एकट्या मुंबई राज्यांत असून त्यांत २६ हजाराचेवर मुलें त्याच वर्षी शिकत होतीं. या राज्यांतील सरकारी अनुदानाचें धोरण बरेंच अवास्तविक स्वरुपाचें वाटत असल्यानें सरकारी खात्यांत आपली नोंद न करणाऱ्या संस्थांचा आंकडा यापेक्षां किती तरी पटीनें अधिक आहे.

मुंबई राज्यांतील पूर्वप्राथमिक शिक्षणाची प्रगति भारताच्या इतर राज्यांपेक्षां स्पृहणीय आहे यांत शंका नाहीं. ही प्रगति सध्यां आहे त्यापेक्षां आणखी अधिक वेगानें येथें झाली असती, परंतु लोकांनीं आपण होऊन चालवलेल्या या शिक्षणाच्या चळवळीला योग्य सरकारी प्रोत्साहन मिळालेलें दिसत नाहीं.

मुंबई राज्यांतील नोंद झालेल्या पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांच्या खर्चावर सरकारनें कसकशी कात्री लावली हें पुढील कोष्टकावरून सहज कळून येईल.

वर्ष	रजिस्टर्ड पू. प्रा. शाळांची संख्या	विद्यार्थी संख्या	अनुदानाची रक्कम रु.
१९५१-५२	१५९	११०९३	३८०७१
१९५२-५३	१८५	१३८१९	२८७२६
१९५३-५४	१९६	१५१६४	२६२००
१९५४-५५	२१९	१७१७४	१३७६६
१९५५-५६	३४८	४५८२८	३०७३६

कोष्टकांतील हे आंकडे पुरते बोलके आहेत. शेवटच्या वर्षी पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या ३४८ संस्थांवर लोकांनीं जवळ जवळ १० लक्ष रुपये खर्च केला, त्यांत सरकारी अनुदान फक्त ३०-३१ हजारांचें आहे. १९४९ सालीं पूर्वप्राथमिक संस्थांना मान्य खर्चाच्या ४० % अनुदान देण्यांत येत असे तें १९५०-५१ सालीं ३७½% आणि त्यानंतर पुढच्याच वर्षीत २५% करण्यांत आलें. त्याशिवाय अनुदान देण्यासाठीं प्रथम ग्रामीण आणि मागासलेल्या भागांतील शाळाच योग्य गणल्या जात. नंतर शेवटीं फक्त दोन रुपये फी घेणाऱ्या संस्थांनाच मान्य खर्चाच्या २५% अनुदान देण्याचें ठरविण्यांत आलें सरकारचें हें असें अनुदान-धोरण असूनही या राज्यांतील लोक-प्रयत्नांच्या उत्साहाचा प्रवाह सारखा वाढत राहिला आहे.

या प्रदेशांतील औद्योगीकरणाचा आणि नागरीकरणाचा (Urbanisation) वेग जसजसा वाढूं लागला आहे तसे जीवनमान उंचावत आहे. जीवनाच्या गरजा वाढत आहेत. त्यामुळें कुटुंबांतील पुरुषांच्याबरोबर स्त्रियाही उत्पादनाच्या व उपजीवनाच्या व्यवसायांत अधिकाधिक संख्येनें पुढे येऊ लागल्या आहेत. त्यामुळें पूर्वप्राथमिक शिक्षणाचा इतिहास जो इतर देशांत घडला त्याचेंच पुनरावर्तन येथें होवूं लागलें आहे. पूर्वप्राथमिक शाळा ही नागरी जीवनांतील एक आवश्यक गोष्ट होवू पहात आहे त्यामुळें या शाळांची संख्या सरकारचें प्रोत्साहन नसतांनादेखील वाढीस लागली आहे. काय आपलें सरकार पूर्वप्राथमिक शिक्षणाची ही अशीच उपेक्षा चालू ठेवणार आहे ! लोकांच्या उत्साहावर असेंच नेहमीं विरजण घालीत राहणार आहे !

प्रशिक्षण संस्थांपुढील प्रश्न

आज पूर्वप्राथमिक संस्थांपुढें एक नवीनच प्रश्न उपस्थित झाला आहे. १९५६-५७ पर्यंत प्रशिक्षित पूर्वप्राथमिक शिक्षकाना प्राथमिक शाळेंतील सुरुवातीचे २ । ३ वर्गांत काम करण्याबाबत सरकारनें मान्यता दिली होती. त्यामुळें पूर्व प्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंतही कोठे कोठे जागा

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल

भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई — उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक

कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी — कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे

चिटणीस : श्री. शेष नामले — उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण सस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपांत पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गांतून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठी संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, **नूतन बाल-शिक्षण संघ,**
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे — श्री. अनुताई वाघ

सौ. सरलाताई देवधर — श्री. भा. धो. कर्वे

सौ. मालिनीबाई परांजपे

अनुक्रमणिका

प्रौढ विभाग

संपादकीय— शेष नामले

समाज-कल्याणकारी संस्थांचें अर्भक संगोपन — माई

सर्वांगी विकास म्हणजे काय ! — शेष नामले

पूर्वप्राथमिक शिक्षणांत रशियापासून काय घेतां येईल ? — ना.

विल्यम फ्रेड्रिक ऑगस्ट फ्रॉबेल

शिवाय नू. बालशिक्षण-संघसमाचार इ.

बाल विभाग

माझें उपवन — स्नेहलता पत्की

थंडी — परशुराम मर्ढेकर

कोंबडीचों चतुर पिलें — अनुताई

पहांटेच्या वेळीं — दादाराव जगताप

महत्वाच्या सूचना :

ग्राहकांस—

१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.

'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नावावर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारा-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नांवाचें एक सदर चालविण्यात येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्याना स्थान देण्यांत येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यांनीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

लेखकांस—

१) 'शिक्षण-पत्रिकें'त लेख लिहूं इच्छिणारांनीं आपलें लेखन कागदाच्या एकाच बाजूवर करावें. तें दर महिन्याच्या ता. १ च्या आत संपादन कार्यालयाकडे पाठवावें. पसंत नसलेल्या लेखांबरोबर पुरेसें पोस्टेज असल्यास लेख परत करण्यांत येतील.

२) 'शिक्षण-पत्रिका' कोणत्याहि महिन्यापासून सुरू करतां येते.

३) 'शिक्षण-पत्रिका' प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस पोस्टांत पडते. सामान्यतः ता. २५ पर्यंत ती सर्वांना मिळते. तशी न मिळाल्यास ग्राहकांनी ता. ३० च्या आंत खालीं दिलेल्या पत्त्यावर कळवावें.

४) 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रत्येक ग्राहकाचा नंबर पत्रिकेच्या वेष्टनावर लिहिलेला असतो. व्यवस्थापक-कार्यालयाशीं पत्रव्यवहार करतांना हा नंबर ग्राहकानें अवश्य कळवावा.

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका'
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक ११] मुंबई [फेब्रुवारी १९५९

संपादकीय

लोकांच्या या उत्साहाला योग्य प्रोत्साहन मिळालें पाहिजे

पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या अखिल भारतीय क्षेत्रांत मुंबई राज्य आघाडीवर आहे हें नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. सरकारी खात्यांत नोंद असलेल्या अशा सर्व भारतांतील ६३० पूर्वप्राथमिक शाळांत (१९५५-५६ च्या प्रतिवृत्ताप्रमाणें) एकूण ४६ हजाराच्या आसपास मुलें शाळेंत जात होतीं. त्यांतील ३४८ शाळा एकट्या मुंबई राज्यांत असून त्यांत २६ हजाराचेवर मुलें त्याच वर्षी शिकत होतीं. या राज्यांतील सरकारी अनुदानाचें धोरण बरेंच अवास्तविक स्वरुपाचें वाटत असल्यानें सरकारी खात्यांत आपली नोंद न करणाऱ्या संस्थांचा आंकडा यापेक्षां किती तरी पटीनें अधिक आहे.

मुंबई राज्यांतील पूर्वप्राथमिक शिक्षणाची प्रगति भारताच्या इतर राज्यांपेक्षां स्पृहणीय आहे यांत शंका नाहीं. ही प्रगति सध्यां आहे त्यापेक्षां आणखी अधिक वेगानें येथें झाली असती, परंतु लोकांनीं आपण होऊन चालवलेल्या या शिक्षणाच्या चळवळीला योग्य सरकारी प्रोत्साहन मिळालेलें दिसत नाहीं.

मुंबई राज्यांतील नोंद झालेल्या पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थांच्या खर्चावर सरकारनें कसकशी कात्री लावली हें पुढील कोष्टकावरून सहज कळून येईल.

वर्ष	रजिस्टर्ड पू. प्रा. शाळांची संख्या	विद्यार्थी संख्या	अनुदानाची रक्कम रु.
१९५१-५२	१५९	११०९३	३८०७१
१९५२-५३	१८५	१३८१९	२८७२६
१९५३-५४	१९६	१५१६४	२६२००
१९५४-५५	२१९	१७१७४	१३७६६
१९५५-५६	३४८	४५८२८	३०७३६

कोष्टकांतील हे आंकडे पुरते बोलके आहेत. शेवटच्या वर्षी पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या ३४८ संस्थांवर लोकांनीं जवळ जवळ १० लक्ष रुपये खर्च केला. त्यांत सरकारी अनुदान फक्त ३०-३१ हजारांचें आहे. १९४९ सालीं पूर्वप्राथमिक संस्थांना मान्य खर्चाच्या ४० % अनुदान देण्यांत येत असे तें १९५०-५१ सालीं ३७½% आणि त्यानंतर पुढच्याच वर्षीत २५% करण्यांत आलें. त्याशिवाय अनुदान देण्यासाठीं प्रथम ग्रामीण आणि मागासलेल्या भागांतील शाळाच योग्य गणल्या जात. नंतर शेवटीं फक्त दोन रुपये फी घेणाऱ्या संस्थांनाच मान्य खर्चाच्या २५% अनुदान देण्याचें ठरविण्यांत आलें सरकारचें हें असें अनुदान-धोरण असूनही या राज्यांतील लोक-प्रयत्नांच्या उत्साहाचा प्रवाह सारखा वाढत राहिला आहे.

या प्रदेशांतील औद्योगीकरणाचा आणि नागरीकरणाचा (Urbanisation) वेग जसजसा वाढूं लागला आहे तसे जीवनमान उंचावत आहे. जीवनाच्या गरजा वाढत आहेत. त्यामुळें कुटुंबांतील पुरुषांच्याबरोबर स्त्रियाही उत्पादनाच्या व उपजीवनाच्या व्यवसायांत अधिकाधिक संख्येनें पुढे येऊ लागल्या आहेत. त्यामुळें पूर्वप्राथमिक शिक्षणाचा इतिहास जो इतर देशांत घडला त्याचेंच पुनरावर्तन येथें होवूं लागलें आहे. पूर्वप्राथमिक शाळा ही नागरी जीवनांतील एक आवश्यक गोष्ट होवू पहात आहे त्यामुळें या शाळांची संख्या सरकारचें प्रोत्साहन नसतांनादेखील वाढीस लागली आहे. काय हें आपलें सरकार पूर्वप्राथमिक शिक्षणाची ही अशीच उपेक्षा चालू ठेवणार आहे ! लोकांच्या उत्साहावर असेंच नेहमीं विरजण घालीत राहणार आहे !

प्रशिक्षण संस्थांपुढील प्रश्न

आज पूर्वप्राथमिक संस्थांपुढें एक नवीनच प्रश्न उपस्थित झाला आहे. १९५६-५७ पर्यंत प्रशिक्षित पूर्वप्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंतील सुरुवातीचे २ । ३ वर्गांत काम करण्यापुरतें सरकारनें मान्यता दिली होती. त्यामुळें पूर्व प्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंतही कोठे कोठे जागा

मिळत असत. परंतु त्यानंतर सरकारनें आपल्या नियमांत सुधारणा (?) करून, पूर्वप्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंत काम करण्याबाबत जी सवलत होती ती काढून घेतली. यामुळें पूर्वप्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंत नोकऱ्या मिळेनाशा झाल्या. अनुदानाच्या अवास्तविक घोरणानें पूर्वप्राथमिक शिक्षणाचा दर्जा खालीं आला. पूर्वप्राथमिक शाळांच्या संख्येवर परिणाम झाला आणि चांगल्या पूर्वप्राथमिक शाळांची संख्या मर्यादित झाली. त्यामुळें पूर्व-प्राथमिक शिक्षकांना योग्य काम मिळेनासें झालें. ज्यांच्या प्रशिक्षणावर सरकारनें पैसा खर्च केला अशा अनेक शिक्षिकांना योग्य कामाचे अभावीं घरीं बसून राहण्याची पाळी आली. या बेकारीचा परिणाम आतां पूर्वप्राथमिक प्रशिक्षण संस्थांवर होवूं लागला आहे. राज्यांत पंधरा पूर्वप्राथमिक प्रशिक्षण संस्था आपला संसार मांडून बसल्या आहेत त्यांपैकी जुन्या संस्थांतील विद्यार्थि–संख्येंत घट सुरू झाली आहे. त्यामुळें प्रशिक्षण संस्थांवर नवीन संकट येऊन थडकलें आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षकाला प्राथमिक शाळेंत काम मिळालें पाहिजे

सकृत् दर्शनीं शिक्षकाला पूर्वप्राथमिक शाळेसंबंधीचें शिक्षण द्यायचें व त्याला प्राथमिक शाळेंत काम द्या असें म्हणायचें हें विचित्र वाटतें; परंतु या प्रश्नाचा विचार एका निराळ्या दृष्टि-कोनांतून झाल्यास पूर्वप्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंत काम देणें हें शिक्षणाच्या दृष्टीनें प्रगतिपर ठरणार आहे.

प्राथमिक आणि पूर्वप्राथमिक असे शैक्षणिक जीवनाचे आपण दोन भाग आपल्या सोयीसाठीं पाडीत असलों, तरी जें मूल शिक्षण घेतें त्याच्या जीवनांत असे भाग नसतात. त्याचें जीवन सतत क्रमशः विकसत असतें त्याच्या शिक्षणाचे आपण व्यवस्थेसाठीं भाग केले तरी त्या भागांतही आपण संवाद निर्माण केला पाहिजे. सध्या पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणांत या प्रकारें मेळ साधण्याचा कोणताच प्रयत्न होत नाहीं. त्यामुळें पूर्वप्राथमिक शाळेचें जग व त्यांतील कामाची रीतभात आणि प्राथमिक शाळेचें जग व त्यांतील रीतभात हीं इतकी भिन्न असतात कीं त्यामुळें पूर्वप्राथमिक शाळेंतून प्राथ-मिक शाळांत जाणारी मुलें भांबावतात. बालकाच्या शैक्षणिक व मानसिक विकासाच्या दृष्टीनें असें विषम वातावरण असणें हितावह नाहीं.

पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळेच्या वातावरणांतील हा विरोध कमी करण्यांच्या दृष्टीनें दोन उपाय करता येण्या-सारखे आहेत. एकतर प्राथमिक शिक्षकाच्या शिक्षणात सुरवातीच्या मुलांसाठीं योजावयाच्या शिक्षण पद्धतीचा समावेश करून घेतला पाहिजे किंवा पूर्वप्राथमिक शिक्षकानाच प्राथ-मिकचे सुरवतीचे वर्ग चालवूं दिले पाहिजेत. या दोन उपायांत दुसरा उपाय अनुभवानें यशस्वी झालेला आहे. पूर्वप्राथमिक शिक्षिकांचें प्राथमिक शाळेंतील काम फार चांगलें होत असल्याचें अनेक सरकारी शिक्षकांचें मत आहे. पूर्वप्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंत काम देणें सकृत् दर्शनीं विचित्र वाटत असलें तरी बालकाच्या जीवन-विकासाच्या दृष्टिकोणांतून या प्रश्नाकडे पाहिल्यास ही विचित्रता वाटणार नाहीं.

प्राथमिक शाळेंतील बेसिक ओरिएंटेशनचा कार्यक्रम

बेसिक शिक्षण पद्धतीला राष्ट्रीय पद्धतीचें स्थान आपण दिल्यानें या पद्धतीचें शिक्षण चालू शाळात कसें दाखल करावें हा आपल्या राष्ट्रापुढें मोठा प्रश्न आहे. सध्याच्या आपल्या आर्थिक परिस्थितींत बेसिक शाळा आपण सार्वत्रिक करूं शकत नाहीं त्यामुळें चालू शाळांचें रूपान्तर सावकाशपणें करण्यांत यावें असा एक पर्याय काढून चालू शाळांचा बेसिक ओरिएंटेशनचा कार्यक्रम गतिमान करण्यात आला आहे. बेसिक शिक्षण आणि पूर्वप्राथमिक शिक्षण यांत एक प्रकारचा एकजिनसीपणा आहे. दोनही शिक्षण पद्धतींत बालकाच्या क्रियाशीलतेला प्राधान्य आहे. चालू प्राथमिक शाळांत जो बेसिक ओरिअेंटेशनचा कार्यक्रम सुचविला जात आहे त्यांत बालकांच्या उत्पादक हस्तव्यवसायाला प्राधान्य आहे. अशा प्रकारचा हस्तव्यवसाय सुरुवातीच्या बालकांकडून कसा करून घ्यावा याबाबतची दृष्टि पूर्वप्राथमिक शिक्षकाच्या शिक्षणांत विशेष आहे हें त्यांचा अभ्यासक्रम पाहिल्यास सहज दिसून येण्यासारखें आहे. म्हणून पूर्वप्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंतील कांहीं वर्गांत काम करूं देणें हें या ओरि-अेंटेशनच्या कार्यक्रमालाहि पोषक ठरेल असें आम्हांला वाटतें.

खर्चाचा हा अपव्यय टाळतां येईल का ?

राज्यांत प्राथमिक शिक्षण ज्या वेगानें प्रगति करीत आहे त्या वेगांत प्राथमिक प्रशिक्षण संस्थांची वाढ झालेली नाहीं; त्यामुळें चालू प्राथमिक शाळेंत अप्रशिक्षित शिक्षकांचें प्रमाण फारसें कमी करता आलें नाहीं ही हकीकत लक्षांत घेतां अप्रशिक्षित शिक्षकांचे जागीं प्रशिक्षित पूर्वप्राथमिक शिक्षकांना स्थान देणें हें आर्थिक बचाव करण्याच्या दृष्टीनेंही उपयुक्त ठरेल. पूर्वप्राथ-मिक प्रशिक्षणावर सरकारचा खर्च होत आहे. हा खर्च पूर्वप्राथमिक शिक्षकांना काम न मिळाल्यानें व्यर्थ वाया जात आहे. प्राथमिक प्रशिक्षण संस्था पुरत्या प्रमाणांत निघाल्या तरी देखील पूर्वप्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंत काम मिळाले पाहिजे असा आमचा आग्रह आहे. परंतु आज पुरते प्राथमिक प्रशिक्षित शिक्षक मिळत नसताना पूर्वप्राथमिक शिक्षकांना

काम न देणें हा सरकारी पैशाचा अपव्यय आहे हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे.

प्रशिक्षण संस्थांचा संपूर्ण उपयोग झाला पाहिजे

सध्या राज्यांत असलेल्या सर्व पूर्वप्राथमिक प्रशिक्षण संस्था दर वर्षी एक हजार शिक्षक प्रशिक्षित करूं शकतील अशी शक्यता आहे. परंतु त्यांच्या कार्यक्षमतेचा पूर्ण उपयोग करून घेतला जात नाहीं. या संस्थांचा पूर्ण उपयोग केल्यास व पूर्व-प्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शाळेंत स्थान दिल्यास प्रशिक्षित शिक्षकांचें प्रमाण अल्प खर्चांत वाढेल आणि त्यामुळें चालू असलेल्या पूर्वप्राथमिक प्रशिक्षण संस्थांनाही काम मिळेल.

लोकांच्या या उत्साहावर पाणी कां सोडतां ?


पूर्वप्राथमिक शाळांची संख्या सरकारी धोरण अनुदारपणाचें असतांही वाढत आहे हें आपण वर पाहिलें, त्याचप्रमाणें पूर्व-प्राथमिक प्रशिक्षण संस्थांची वाढही कांहीं अंशी अशाच परिस्थितींत होत आहे. या सर्व उत्साहाचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें सरकारनें प्रयत्न केल्यास काय बिघडणार आहे याची कल्पना आम्हास येत नाहीं.

सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्डानें शिक्षण खात्याचा संपर्क कां साधूं नये ?

सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्डाच्या योजनेंत ठिकठिकाणीं बालवाड्या निघत आहेत. या योजनेंत बालवाडींत कार्य करणारी व्यक्ति ही ग्रामसेविका असली पाहिजे अशी कल्पना आहे. या कल्पनेप्रमाणें ग्रामसेविकांचा शिक्षणक्रम आखण्यांत आला आहे. ह्या ग्रामशिक्षिका तयार करण्यासाठीं सें. सो. वे. बोर्ड लाखो रुपयांचा खर्च करीत आहे. ग्रामसेविका बालवाडीचें काम सांभाळून गांवाची अन्य सेवा किती प्रमाणांत करूं शकतात व बालवाडीचें काम कसें करतात यासंबंधीं जी माहिती मिळते त्यावरून बालवाडीचें काम चांगल्या प्रकारें करणाऱ्या ग्रामसेविकांना दुसरें काम करण्यास वेळच रहात नाहीं असें दिसतें. हें सर्व लक्षांत घेतां मुंबई राज्यांतील पूर्वप्राथमिक प्रशिक्षित झालेल्या स्त्रियांचा उपयोग करतां आल्यास बोर्डाचा कितीतरी खर्च वाचेल आणि शिक्षण खातें प्रशिक्षणावर जो खर्च करतें त्याचें चीज होईल. पण सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्डाचा आणि सरकारी शिक्षण खात्याचा संपर्क घडवून कोणी आणायचा ! सरकारी आणि निमसरकारी खात्यांच्या व्यवस्थेंत कांहीं अनुबंध निर्माण करून राष्ट्रीय बचत करता येणार नाहीं का ?

एकीकडे लोकांचा उत्साह आणि दुसरीकडे सरकारी निरुत्साह अननुबंध असें चित्र किती दिवस दिसत राहणार ?

बाळाची सुकुमार त्वचा...



निर्मळ आणि निरोगी राखणें बाळा सोरे सारे-दिवसभर, आंघोळ करवावर, किंवा कपांनी पुसा जातांना, बाळाच्या नाजूक शरीरावर उटी नसती पावडरचा एक हात फिरविताच ही त्वचा अधिक उल्हसित दाटल आणि त्याची त्वचा अधिक निर्मळ राहील.

ही खास बाळासाठी घनविभी अद्यत विष्णांतील अंतुम (Antiseptic) गुणें त्वचेचा त्वचेचें ६२ प्रकारचक दाह वा फायूल होण्या रक्षण करतील.

हजारो कुटुंबांत आणि कित्येक बालकाल्यांत नित्य वापरतात

उटी रिसर्च लेबोरेटरीज, मुंबई-२८

शुभ प्रसंगाच्या वेळीं मुखमाधुरीसाठीं वापरा

दिलरंजन सुवासिक सुपारी

सुमधुर, शेंकडों लोकांना आनंदित करणारी—

—: सर्वत्र विकली जाते :—

आपल्या गांवांत एजन्सीसाठीं लिहा :—

मालक : आर. के. सुपारीवाला

शांती भुवन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.

शाखा : पोस्ट ऑफिसच्या बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४

चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ, ग्रॅट रोड, मुंबई ७

समाज-कल्याणकारी संस्थांचें अर्भक-संगोपन

Care of infants by social welfare agencies

(हा विषय पूर्वप्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र परिक्षेच्या अभ्यासक्रमांत 'शिक्षणेतिहास व प्रचलित प्रश्न' या प्रश्नपत्रिकेसाठीं योजलेला आहे. या प्रश्नाचें प्रचलित स्वरूप काय आहे त्याची कल्पना देण्याच्या दृष्टीनें हा लेख लिहिलेला आहे-ना.)

कांहीं वर्षांपूर्वी 'इन्फंट' हा शब्द इंग्रजींत देखील 'शिशु' अथवा पूर्वप्राथमिक वयापर्यंतच्या (सात पूर्ण) बालकांसाठीं वापरण्यांत येत असे. परंतु आधुनिक मानसशास्त्रांत आणि समाजशास्त्रांत कित्येक लेखक हा शब्द पहिल्या दोन आठवड्यांनंतरच्या दोन वर्षांच्या कालमर्यादेंतील अर्भकासाठीं वापरूं लागले आहेत. इंग्लंडमधें आजही पांच ते सात वर्षें वयाच्या बालकांसाठीं असणाऱ्या शाळांना 'इन्फंट स्कूल्स' म्हणतात. आपल्या येथेंही त्याच अर्थानें 'इन्फंट क्लास' हा शब्द प्रचलित होवून त्याचें भाषान्तर 'शिशुवर्ग' अथवा केव्हां केव्हां 'बालवर्ग' असें करण्यांत येत असतें.

बाल्यकालांतील विविध अवस्था


बालकाच्या जन्मापासून पहिल्या बारा ते पंधरा वर्षांपर्यंतच्या कालखंडाला 'बाल्यकाल' Childhood म्हणतात. या कालांतील विकासाच्या प्रश्नांचा अभ्यास करणें सोयीचें व्हावें म्हणून मानसशास्त्रज्ञांनीं या कालांतील विकासाचें क्रमशः स्वरूप लक्षांत घेऊन त्यांत भाग पाडून त्यांस योग्य अशीं नांवें दिलीं आहेत. जन्मानंतरच्या पहिल्या दोन आठवड्यांच्या कालाला 'नवजातावस्था' (नवजात=Neonate) म्हणतात. यानंतरच्या दोन वर्षांपर्यंतच्या कालाला 'अर्भकावस्था' (Infant), त्यानंतरच्या सहासात वर्षें वयापर्यंतच्या कालाला 'पूर्वशालेयकाल' अथवा 'शैशवकाल' आणि नंतरच्या अवस्थेला 'बाल्यावस्था' असें नांव देऊन तींत 'प्राथमिक' म्हणजे नऊ वर्षांपर्यंतची आणि 'उत्तर प्राथमिक' म्हणजे नऊ ते बारा-पंधरा वर्षांपर्यंतची अवस्था अशी गणना करण्यांत येते. प्रस्तुत लेखांत अर्भक-संगोपन Care of infants म्हणजे दोन आठवडे ते दोन वर्षांपर्यंतच्या बालकांचें संगोपन या निश्चितार्थानें विचार करणार आहें.

अर्भकावस्थेच्या संगोपनाचे प्रश्न

जन्मपूर्व परिस्थिति व जन्मानंतरची परिस्थिति यांत अनुभवास येणाऱ्या भिन्नतेशीं संयोजन साधण्याचें मुख्य कार्य नवजातावस्थेंत होतें. या पंधरा दिवसांत नवीन परिस्थिति अंगवळणी पाडून घेऊन बालक वाढीस लागतें यानंतरच्या म्हणजे अर्भकावस्थेच्या कालांत त्याची शरीरिक आणि मानसिक वाढ अत्यंत वेगानें होते. सुरुवातीला सर्व दृष्टीनें असहाय्य दिसणारें मूल दोन वर्षांच्या अखेरीस आत्मविश्वासानें हिंडूं फिरूं लागतें. स्वतःच्या गरजा व्यक्त करण्याइतपत आणि दुसऱ्याची भाषा समजण्याइतपत त्याची भाषिक तयारी होते. या अत्यंत असहाय्य कालांत बालकाची जी असाधारण प्रगति होते तींत त्याच्या भावी जीवनरचनेचा पाया घालण्याचें महत्वाचें कार्य होत असतें. या कालाच्या सुरवातीला तें आपल्या पोषणासाठीं आणि जीवनाच्या इतर सर्व व्यवहारासाठीं दुसऱ्यावरच अवलंबून असतें म्हणून त्याचें संगोपन कसें करावें, कोणी

स्वदेशीचीं भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





बाल-विभाग

वर्ष २६ वें : अंक ११ वा : फेब्रुवारी १९५९

माझें उपवन

[चाल : याऽग, चांदण्यांनों]

याऽग सखयांनों उपवनीं माझ्या
उपवनीं माझ्या, गुल्हाबाचीं फुलें
पारिजातकाचा गंध दरवळे
पिवळी शेवंती बहरली छान,
जाई जुई यांचीं फुलें सान सान
हार त्यांचे गुंफूं वेणींत घालाया ॥१॥

उपवनीं माझ्या सुरेख कारंजे
इंद्रधनुष्याची शोभा ही विराजे
उपवनीं माझ्या तळें निळें निळें
लाल निळीं त्यांत डोलती कमळें
तोडूं या कमळें देवाला वहाया ॥२॥

उपवनी माझ्या हिरवा गालिचा
खेळाया टाकला हा मखमलीचा
उपवनीं माझ्या झोंपाळा रंगीत
उंच घेऊं झोंके नेऊं आकाशांत
खूप खूप खेळूं गाउंया नाचूंया ॥३॥

—स्नेहलता पत्की

———

थंडी

माघ महिन्याची
थंडी ही सुटली ।
माणसांच्या अंगी,
बंडी ही चढली ॥ १ ॥

थंडीच्या या झळा
अंगास चाटती ।
म्हणून शरीरी
कांटे हे उठती ॥ २ ॥

बंडू, सुमा, चंदू
नंदू आणि वळी ।
शेकोटी भोंवतीं
शेकती सगळीं ॥ ३ ॥

थंडीचा प्रताप
सर्वत्र गाजतो ।
दीन-दुबळ्यांच्या
मनांस जांचतो ॥ ४ ॥

—परशुराम सर्देकर

———

कोंबडीचीं चतुर पिलें

एक होती कोंबडी. तिला पिलें होती चार. एक दिवस मीनाच्या घरांतून लाडू केल्याचा वास आला. तशीं तीं पिलें आईजवळ नाचत नाचत आली आणि म्हणालीं, "आई आपल्याकडे पण कर ना ग लाडू."

आई म्हणाली, "अरे लाडवाचें सामान कुठें आहे?"

"आम्ही आणतो दुकानांतून."

आणि कॉक् कॉक् कॉक् करत तीं दुकानदाराकडे गेलीं.

"काय पाहिजे रे पिलांनो?" दुकानदारानें विचारलें.

"साखर द्या चिमूटभर
रवा द्या मूठभर
जोंडीला तूप
लाडू करू खूप."

दुकानदार हंसला आणि त्यानें सामान दिलें. पिलांनीं आणलेलें सामान आईनें स्वयंपाकघरांत ठेवून दिलें आणि ती बाकीचें काम करूं लागली. म्हणाली "माझं काम आवरतें आणि लाडू बांधते."

इतक्यांत एक उंदीर आला, त्याला लागली होती भूक. रवा खाऊन त्यानें फस्त केला आणि हळूच बाहेर पडला.

इतक्यांत एक मुंगी आपल्या मैत्रिणींसह आली आणि सारी साखर त्यांनी वारूळांत पळविली. मनीमावशी पण आसपास घुटमळत होती. तीही चोरपावलानें घरांत शिरली आणि लोण्याचा गोळा तोंडांत कोंबला.

जरा वेळानें आई आंत येऊन पाहते तर सारें सामान फस्त! पिलें आली लाडू खायला. त्यांनी एवढेसें तोंड केलें. पण पिलेंच ती!

परत आलीं दुकानदाराकडे कॉक् कॉक् करीत.
"काय रे पिलांनो काय पाहिजे?"

"साखर द्या चिमूटभर
रवा द्या मूठभर
भरीला तूप
लाडू करू खूप."

दुकानदार हंसला व सामान दिलें. पिलांनी आईकडे आणून दिलें. पण यावेळेला पण सारें फस्त झालें तशी पिलें खूप रागावली.

"आई आई या चोरांना शिक्षा करूं या ग."
आणि मनांत कांही योजून ती दुकानांत गेलीं.

"काय रे पिलांनो काय पाहिजे?"

"रांगोळी द्या मूठभर
मीठ द्या चिमूटभर
भरीला चूना
चोरांचा करूं दे फना."

दुकानदार हंसला आणि यावेळींही सारें सामान दिलें. पिलांनी गुपचूप आईकडे आणून दिलें. आईनें नेहमीप्रमाणेंच सामान ठेवलें आणि ती झोपेचें सोंग घेऊन पडून राहिली. पिलें आसपास घुटमळत खेळत राहिलीं.

उंदीरमामाला सामान आल्याची बातमी कळलीच होती. तो हळूच आला आणि रांगोळीचा एक बकणा मारला. कच् कच् कच् तोंडाला लागली तशी छीः छीः छीः करून थुंकायला लागला. पिलें खुदकन् हंसलीं. उंदीरमामा लाजला अन् बोळांत पळाला.

मुंगीबाईनी आपल्या बऱ्याच मैत्रिणी आज गोळा केल्या होत्या. भराभरा येऊन एकेकीनें साखर म्हणून मीठ कोंबले तोंडांत. खारट खारट तोंड झालें तशी थूः थूः थूः थुंकायला लागल्या. पिलें खुदकन् हंसलीं. मुंगीबाई लाजल्या आणि मैत्रिणीसह पळाल्या. मनी पण लोण्याच्या गोळ्यावर टपून होतीच. ती पळत पळत आली अन् लोणी म्हणून चुन्याचा गोळाच्या गोळा तोंडांत भरला. 'अन् हाय हाय हाय करून मनीमावशी स्वयंपाकघरभर नाचायला लागली. पिलांना हंसता हंसता पुरेवाट झाली. मनी मावशी लाजून धूम वाहेर पळाली.

तशी पिलें पण बाहेर पडली. दुकानांत गेलीं. लाडवाचें सारें सामान घेऊन आलीं.

आईनें गोड गोड लाडू केले.

पिलांनीं दिवाळी आनंदानें साजरी केली.

—अनुताई

पहांटेच्या वेळीं

(अभंग)

कोकिळा ही कशी गाते गोड गोड
पहा लावी वेड सकलांसी ॥ १ ॥

कोंबडा पहांटे पहा आरवतो
सर्वांस म्हणतो ऊठा ऊठा ॥२॥

लाल चोंचीचा तो वदतो पोपट
प्रभाकर ऊठ उजाडलं ॥ ३ ॥

घेवुनि कांवळी, पवळ्या नि राजा
निघे वळी राजा शेतावर ॥ ४ ॥

चिव चिंव चिंव चिमणी करिते
चारा आणण्यातें जाई भूर ॥ ५ ॥

पहांटेच्या वेळीं जातां फिरण्यास
होतसे मनास अत्यानंद ॥ ६ ॥

—दादाराव जगताप

करावें, कोठे करावें इत्यादि प्रश्न उपस्थित होतात. अर्भक-संगोपनाचे हे प्रश्न पुढें ठेवून त्याचें शास्त्र बनविण्यांत आलें आहे. या शास्त्रांत त्याचें 'पोषण' 'उत्सर्जन', 'थंडीवाऱ्यापासून रक्षण', 'झोप-विश्रांति', 'वस्त्रप्रावर्ण', 'भावनात्मक गरजा', 'स्नान-व्यायाम', 'संवयी', 'स्वच्छता', 'विहार', 'रोगापासून रक्षण', इत्यादि अनेक प्रश्नांचा शास्त्रीय रीत्या विचार केलेला असतो. संगोपनाच्या या प्रश्नाबाबत शास्त्रज्ञांत विशेष स्वरूपाचे मतभेद नाहींत. परंतु अर्भक-संगोपन कसें व्हावें हें जरी शास्त्रानें सुचविलें तरी त्यासंबंधीचे व्यावहारिक प्रश्न सुटतात असें नव्हे.

अर्भक-संगोपनाच्या प्रश्नांची सामाजिक बाजू

बालकाचा जन्म स्त्रियांचे पोटीं होतो आणि जन्मानंतर देखील मातेच्या दुग्धपानावर आणि प्रेमावर बालकाचें पोषण होत असतें त्यामुळें या कार्याची मुख्य जबाबदारी मातेवरच निसर्गानें सोपविलेली दिसते. मातेच्या या कार्यांत कुटुंबानें शक्यतों सहभागी बनलें पाहिजे. हें कार्य मातेकडून उत्तम प्रकारें होईल या दृष्टीनें कुटुंबानें तिला शक्यतों सर्व प्रकारचें साह्य केलें पाहिजे याविषयींही फारसें तात्विक दुमत नाहीं. परंतु मातेनें अथवा कुटुंबानें करावयाचें हें संगोपन कार्य जेव्हां मातेकडून अथवा कुटुंबाकडून शास्त्राच्या अपेक्षेप्रमाणें नीटपणें होत नाहीं तेव्हां काय करावें असा प्रश्न उपस्थित होतो. जगांतील सर्व मागासलेल्या देशांत हें कार्य मातांकडून किंवा कुटुंबांकडून नीटपणें होत नसल्यामुळें यासाठीं प्रत्येक देश आपापल्यापरी उपाययोजना करीत आहे.

अर्भक-संगोपन आणि कुटुंबस्वास्थ्य

ज्या कुटुंबांत स्वास्थ्य नाही, खाण्या-पिण्याच्या प्रश्नाचीच जेथें चिंता व्यापक बनली आहे, जिथे बेकारी, दारिद्र्य, बेबनाव यांचे भस्मासूर उभे आहेत, जिथें अज्ञान व आळस थैमान घालीत आहेत अशा कुटुंबांत अर्भक-संगोपनाबाबत कोणती अपेक्षा बाळगता येईल ? म्हणून अर्भक-संगोपन व कुटुंबस्वास्थ्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू समजून उपाययोजना झाली पाहिजे हें उघड दिसतें. कुटुंबांत स्वास्थ्य, कर्तव्यबुद्धि व प्रसन्नता निर्माण करता आल्याखेरीज अर्भक-संगोपनाचें कार्य होऊच शकणार नाहीं; कुटुंबस्वास्थ्याचे हे अनेक प्रश्न सोडवायचे म्हणजे कुटुंबाला आर्थिक स्वास्थ्य, कुटुंबाचें शिक्षण, विशेषतः मातेचें संगोपनासंबंधींचें शिक्षण, कुटुंबाचें आरोग्य, कौटुंबिक शासनव्यवस्था, व्यक्ती-व्यक्तीचे संबंध, मानसिक आरोग्याचें वातावरण इत्यादि प्रश्नांत हात घातल्याशिवाय अर्भक-संगोपनाचा प्रश्न सोडवितां येणार नाहीं. हें कार्य मातेनें किंवा कुटुंबानें करावयाचें कार्य असलें, तरी त्याला समाजाची मदत असल्याशिवाय, किंबहुना समाजानें तो प्रश्न आपला बनविल्याशिवाय अर्भक-संगोपनाचें कार्य नीटपणें होण्याची शक्यता नाहीं.

कुटुंबाच्या दारिद्र्याचा व अनुषंगिक परिस्थितीचे प्रश्न

कुटुंबाच्या स्वास्थ्याचा प्रश्न मुख्यत्वें कुटुंबाच्या आर्थिक स्थिरतवर आणि कुटुंबीय व्यक्तींच्या एकमेकांशीं वागण्याच्या पद्धतीवर अवलंबून आहे. यांपैकीं कुटुंबाची आर्थिक परिस्थिति सुधारायची म्हणजे कुटुंबांतील काम करता येण्यासारख्या व्यक्तींना काम आणि त्याचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. सध्याच्या परिस्थितींत थोडासा वरचा वर्ग सोडला तर आर्थिक बाजू सांभाळण्याकरता पुरुषाबरोबरच स्त्रियांनाही कामावर जाणें अनिवार्य होत चाललें आहे. जीवनमान उंचावत आहे, त्याबरोबर एकट्या पुरुषाची कमाई कुटुंबाला अपुरी पडूं लागली आहे. म्हणून अधिकाधिक संख्येनें स्त्रिया अर्थोपार्जनाच्या कार्यांत पुरुषांच्या सहभागी बनू लागल्या आहेत यामुळें अर्भक-संगोपनाचें कार्य कसें करावें व कोणी करावें, यांत सामाजिक संस्थांनीं कोणती जबाबदारी घ्यावी आणि मातांवर कोणती जबाबदारी असावी यासंबंधीचे अनेक प्रश्न पुढें येऊं लागले आहेत.

अनाथ आणि टाकलेल्या मुलांचा प्रश्न

याशिवाय प्रत्येक देशांत अनेक कारणांमुळें मातापित्यांनीं त्याग केलेल्या अर्भकांची आणि ज्यांना कोणी वारस उरलेला नाहीं अशा अनाथ अर्भकांची सोय करेंण हाही एक सामाजिक कल्याणकारी संस्थांचा प्रश्न होऊन बसला आहे. अशा अर्भकांसाठीं इंग्लंडमध्यें स्वतंत्र अनाथालयांची व्यवस्था असून त्यांच्या संचालनाची जबाबदारी राज्यानें घेतली आहे. अमेरिकेंत अशा अर्भकांच्या संगोपनाची व्यवस्था कल्याणकार्यकारी संस्था अथवा मंडळें यांच्या द्वारें निराळ्या पद्धतीनें करण्याचे यशस्वी प्रयोग झाले आहेत. अशा अर्भकांच्या संगोपनासाठीं स्वतंत्र अनाथालयें अथवा संगोपनगृहें न काढता या वयांतील बालकांना कौटुंबिक प्रेमाची आणि परिस्थितीची गरज असते या समजुतीनें तेथें अशा अर्भकांचें संगोपन करण्यास तयार असलेल्या कुटुंबांचींच मदत घेण्यांत येते रशियांत प्रत्येक अर्भकाच्या संगोपनाबाबतची मुख्य जबाबदारी ही माता पित्यांची असें समजण्यांत येत असलें तरी तेथें पाळणाघरांची सार्वत्रिक व्यवस्था राज्यानेंच केलेली आहे.

आपल्या येथील कल्याणकारी संस्थांचें कार्य

आपल्या येथें अर्भक-संगोपनास साह्य देणाऱ्या अनेक सार्वजनिक संस्था आहेत. कांहीं संस्था सरकारी आणि कांहीं निमसरकारी आहेत. यांत कांहीं या कार्याला वाहिलेल्या तर कांहीं संस्था दुसऱ्या सामाजिक कार्याबरोबर हेंही कार्य करणाऱ्या

(पान ९ वर पहा)

सर्वांगी विकास म्हणजे काय ?

यशोदाबाई त्या दिवशीं मुद्दाम वेळ काढून माझ्यापाशीं बोलायला आल्या होत्या. मुकुंदाला नुकतेच त्यांनीं शिशुविहारांत घातलें होतें. सुरुवातीचे दोन-तीन दिवस मुकुंदाला शिशुविहारचा आणि माझा चांगला परिचय होईपर्यंत त्या संबध वेळ शाळेंत बसत. शिशुविहारांत पालकांना बसण्यासाठीं आम्ही विशेष सोय केली आहे; तिला आम्ही पालकांचा कोपरा म्हणतो. तींत पालकांच्या टेबलावर पूर्वप्राथमिक शिक्षणासंबंधीचीं कांहीं निवडक पुस्तकें आणि मासिकें आकर्षक रीतीनें मांडून ठेवलेलीं असतात. तीं चाळीत असतांना पालकाला आपलें मूल सहज दिसावें अशी पालकांच्या जागेची व्यवस्था आहे. यशोदाबाईंना हा पालकांचा कोपरा खूप खूप आवडला. तसें त्यांनीं मला बोलूनहि दाखवलें.

'माई, असं वाटत कीं इथच बसून सर्व बालमानसशास्त्र शिकावं.'

मी म्हटलं, 'हाच तर आमचा उद्देश आहे. मुलांच्या मनाचा अभ्यास सर्वच मातांना करावासा वाटतो. पण मातांची ही स्वाभाविक इच्छा लक्षात घेऊन तशी सोय कोण करून देणार ?'

यशोदाबाई-'मला हा तुमचा पालकांचा कोपरा फार आवडला इथं पुस्तकं तर आहेतच पण इथून आपापल्या कामांत असलेलीं मुलं पाहिलीं, म्हणजे मानसशास्त्राचीं कितीतरी पानं वाचल्यासारखीं वाटतं.'

यशोदाबाई पालकांच्या या कोपऱ्यांत फार उत्साहानें येऊन बसत. मुकुंदासाठीं त्यांनीं यायलाच पाहिजे असें नव्हतें. कारण तो आला त्या दिवसापासूनच शाळेंत रमून गेला होता. यशोदाबाईंना पूर्वप्राथमिक शाळेंत मुलें शिकतात म्हणजे काय करतात हें बघायचें होतें. आज शाळेचें माहिती पत्रक हातांत घेऊन त्या मुकुंदाच्या बरोबर शाळेंत आल्या होत्या. त्या माहिती पत्रकांत 'सर्वांगी विकास' हा शब्द दोनतीन ठिकाणीं आला होता. तो त्यांनीं अधोरेखित करून ठेवला होता.

त्या म्हणाल्या, 'तुम्हाला थोडा वेळ असेल, तर मला तुमच्याशीं कांहीं बोलायचंय.'

मी म्हणालें, 'संध्याकाळीं मुलं सुटलीं कीं मी याच कामाकरता मोकळी होतें. मलाही तुमच्यासारखी जिज्ञासु पालक मंडळी भेटली म्हणजे मुलांच्या विकासासंबंधी बोलावसं वाटतं. आईला जशा मुलांच्या गोष्टी कौतुकानं दुसऱ्यांना सांगाव्याशा वाटतात तसंच शिक्षिकांनाही होऊन जातं. आम्ही शिक्षिका रोज जेव्हां मधल्या वेळीं खानपान करतो तेव्हां एकेकजणी आपापले मजेदार अनुभव सागण्यांत स्पर्धा करीत असतात.

'मला तुम्ही-'सर्वांगी विकास' कशाला म्हणता तें समजून घ्यायचं आहे.' यशोदाबाईंनीं भेटीचा हेतु सांगून टाकला.

मी म्हटलें, 'आज तुम्हाला वेळ आहे का ? या ना बसूं गप्पा करीत !' अडीच वाजतां मुकुंदाला घरीं पोहोंचवून यशोदाबाई बरोबर चार वाजतां पुनः परतल्या.

शिशुविहारांतून मोठीं मुलं घरीं जात होतीं. बाकीच्या शिक्षिका आपापल्या गटांतील बालकांची प्रगतिनोंद लिहीत होत्या. पुनः पालकांच्या कोपऱ्यांतच आपण बसू या म्हणून मी यशोदाबाईंना सुचवलें. त्यांच्या शेजारच्या ब्लॉकमधें राहात असलेल्या अनुताई पण आल्या होत्या.

मी म्हटलें, 'शिक्षणानें मुलांचा शारीरिक आणि मानसिक विकास झाला पाहिजे असें आपण नेहमीं म्हणतो, पण हा विकास म्हणजे काय तें समजून घेण्याच्या फारसें भानगडींत पडत नाहीं. शारीरिक विकास आपल्याला प्रत्यक्ष दिसतो तसा मानसिक विकास सगळ्यांनाच दिसत नाहीं.'

'आम्हां मातांना शिक्षिकांसारखा पुष्कळ मुलांचा अनुभव नसतो. मानसिक विकास समजायला व्यापक अनुभव लागतो' माझ्या विधानाला दुजोरा देत यशोदाबाई म्हणाल्या.

त्यावर अनुताई म्हणाल्या, 'आणखी शिक्षिकेची मुलांकडे बघण्याची दृष्टी देखील तटस्थ असते. आम्ही पालक मंडळी मुलांचा विकास पाहण्याऐवजी आमच्या अपेक्षाच त्यांच्यांत पहात असतों. मुलांना सर्व कांहीं लवकर लवकर याव अशी आमची उत्कट अपेक्षा असते.'

मी म्हटलं, 'तुम्हा दोघींचा शिक्षिकेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बघून मला खरोखरच फार धन्यता वाटते. समाजांतला नवा माणूस कसा घडला जातो हें आम्हाला रोज रोज बघायला मिळतें. आमचा व्यवसायच आहे तो.....'

'मुलांच्या सर्वांगी विकासासंबंधी बोलत होतें मी. विकासांत शारीरिक अन् मानसिक असे आपण भेद करतों. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं शारीरिक आणि मानसिक विकास इतका परस्पराशीं निगडित आहे कीं त्यांचा स्वतंत्रपणा हा केवळ पुस्तकांतल्या विवेचनांतच आढळतो.'

'म्हणजे काय म्हणतां ?' अनुताईंनीं मधेंच विचारलें. त्यावर यशोदाबाई म्हणाल्या, 'अहो Sound mind in a sound body' असं नाहीं का लहानपणापासून ऐकत आला ? माईना म्हणायचं आहे तें हें कीं किडकिडींत मुलं कधीं हुशार दिसतात, तीं त्यांच्या किडकिडीतपणामुळं नव्हे. त्यांच्या शरीराची काळजी घेतली गेली असतीं, तर तीं सध्या हुशार दिसतात त्यापेक्षां आणखी हुशार दिसलीं असतीं. मुलांचा सर्वांगी विकास ज्यांना प्रत्यक्ष साधायचा आहे त्यांनीं शारीरिक विकास आणि मानसिक विकास अशा दोन निराळ्या गोष्टी आहेत अशी कल्पना न करता समग्र विकासाच्या दृष्टीनें विचार केला पाहिजे.'

यशोदाबाईंचं हें माझ्या मुद्याचं विस्तरण एकून खरोखरच थक्क झालें. फारसं शिक्षण झालेलं नसलं तरी कोणताही मुद्दा

त्या किती चटकन समजतात याचं मला नवल वाटलं. माझ्या डोळ्यांनींच मी त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करीत म्हणालें, 'सर्वांगी विकासाची आणखी दुसरी बाजू पहा—व्यक्तीच्या ठिकाणीं क्रियाचापल्य असत; ती ज्ञान संपादन करते; अन् तिच्या भावनांचाही विकास होत असतो. भावना, क्रिया, ज्ञान यांच्या सुसंगत, समतोल अन् परस्परावलंबी विकासानंच व्यक्तीचा सर्वांगी विकास होत असतो.'

'आपल्या प्रचलित शिक्षणाचं विनोबांनीं मोठं मार्मिक वर्णन केलं आहे. मी वाचून दाखवूं लागलें— ज्ञान आणि कर्म (क्रिया) यांच्या फारकतीमुळें कांहीं प्रकारचे अन्याय निर्माण झालेले आहेत. मानसिक अन्याय हा त्यांपैकीं पहिला अन्याय होय. मानसशास्त्रदृष्ट्या कर्मापासून ज्ञानाची फारकत करता येत नाही. दुसरा अन्याय म्हणजे सामाजिक अन्याय. कर्मापासून ज्ञान जेव्हा वेगळें केलें जातें, तेव्हां समाजांत दोन वर्ग निर्माण होतील पहिला सुशिक्षितांचा आणि दुसरा मजुरांचा किंवा कामगारांचा. सुशिक्षित समाज कामगारांकडे तुच्छतेनें पाहील. या अन्यायापाठोपाठ आर्थिक अन्यायहि डोकें वर काढील सुशिक्षितांना जादा पगार मिळेल आणि कामगारांना थोडी मजुरी.'

पू. विनोबांचं हें अवतरण मी येवढ्यासाठीं वाचून दाखवलं कीं अगदीं लहानपणापासून शिक्षणाच्या कार्यांत ज्ञान, क्रिया अन् भावना हें जरी जीवनाचं त्रिविध रूप असलं, तरी त्यांतही आपण एकमेकांची फारकत करतां कामा नये. पू. विनोबा तर म्हणतात, 'अन्यायाच्या कचाट्यांतून सुटायचं असेल, तर सध्याच्या ज्ञान व कर्म यांच्यामधील असलेल्या फारकतीला मूठमाती दिली पाहिजे.'

'मला कांहीं विनोबांच्या पुढं जाऊन सांगायचं नाही' यशोदाबाई अभिजात विनय प्रकट करीत म्हणाल्या 'ज्ञान आणि कर्मांची जशी फारकत नसावी, तशीच भावनांचीही फारकत नसली पाहिजे.'

'हें काय म्हणतां लक्षांत आलं नाही माझ्या' मधेंच अनुताईनीं स्पष्टीकरण मागितलें.

मी म्हणालें, 'शरीर आणि मन यांच्या शिक्षणांत जशी फारकत करतां कामा नये; मानसिक शिक्षण निराळें आणि शारीरिक शिक्षण निराळें असें जसें पाहणें चुकीचें, तसेंच मुलांच्या क्रिया बंद करून पुस्तकी ज्ञान करून दोणेंहो चुकीचे. प्रचलित शिक्षणांत पुस्तकावरून मुलं ज्ञान घेतात त्यांत एकट्या ज्ञानाची प्रगति करण्याचा प्रयत्न होत आहे. शरीरासाठीं हालचालींची जरूरी आहे म्हणून व्यायाम-कसरतीची अलग व्यवस्था केली आहे आणि भावनेचा तर कुठें प्रश्नच उद्भवत नाहीं.'

लगेच यशोदाबाईनीं मुद्दा उचलला आणि म्हणाल्या, 'शिशुविहारांत मी हेंच रोज पाहतें आहे. रोज मुलं आलीं, कीं तीं मुळीं कामालाच लागतात या कामांतूनच (क्रियांतून) तीं ज्ञान मिळवतात. प्रत्येक क्रिया ही **शालेय कौटुंबिक जीवनेच्या भावनेनें येथें होते.** सर्वांगी शिक्षण करायचें तर तें असें झालें पाहिजे.' आम्ही उठायच्या तयारींत होतों.

यशोदाबाईंचा चेहरा प्रफुल्लित झाला होतां. म्हणाल्या 'मुकुंदा छान रमला आहे शिशुविहारांत, पण मी उद्याही येणारच आहे—'

—माई

समाज कल्याणकारी संस्थांचें अर्भक-संगोपन

(पान ७ वरून चालू)

आहेत. या संस्था अर्भकांसाठीं कुटुंबांना दूध पुरविणें, वैद्यकीय तपासणी करून मदत देणें, अर्भकांच्या आरोग्यासंबंधीं स्पर्धा लावणें, दायांसाठीं आणि मातांसाठीं शिक्षणक्रम योजणें, अर्भकांसाठी कपडे, पौष्टिक अन्न पुरविणें वगैरे कामें करीत असतात. कांहीं संस्थांनीं स्वतंत्र अर्भकालयें अथवा अनाथालयेंही चालविलेलीं आहेत. कामगार स्त्रियांच्या अर्भकांसाठीं मोठमोठ्या कारखान्यांना येथें पाळणाघरें काढण्याची सक्ती कायद्यानें करण्यांत आली आहे. नोकऱ्या करणाऱ्या मध्यम वर्गीय स्त्रियांच्या अर्भकांसाठीं घंदेवाईक पाळणाघरेंही आपल्या येथील कांहीं शहरांतून डोकावूं लागलीं आहेत. परंतु देशांतील व्यापक गरजेच्या मानानें या सर्व कल्याणकारी संस्थांचें कार्य अत्यंत अपुरें पडूं लागलें आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधींच्या काळांत राज्याचें या प्रश्नाकडे लक्ष नसल्यामुळें गांवोगांवीं लोकांच्या दातृत्वावर हें कार्य ज्याप्रमाणें जमेल त्याप्रमाणें करणाऱ्या लहानमोठ्या संस्थांनीं केलें आहे. या प्रकारचें कार्य करणाऱ्या संस्थांत अखिल भारतीय महिला परिषद (All India Women's Conference), श्रद्धानंद आश्रम, कस्तुरबा ट्रस्ट स्मारक समिती, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, रामकृष्ण मिशन सोसायटी वगैरेंचें कार्य प्रशंसनीय झालेलें आहे.

स्वातंत्र्योत्तर कालांत आपल्या येथें कल्याणकारी राज्याची घोषणा करण्यांत आली, तेव्हांपासून देशांतील या प्रकारचें कार्य करणाऱ्या संस्थांना उत्तेजन देऊन त्यांस विविध प्रकारें मदत पोहोंचविण्याचें कार्य करण्यासाठीं सरकारी मदतीनें 'सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्ड' व 'भारत सेवक समाज' या देशव्यापी संस्थांची स्थापना करण्यांत आली आहे. या संस्थाही कुटुंब कल्याण, अर्भक-संगोपन आणि बालकल्याण कार्याच्या आपापल्या पंचवार्षिक योजना करीत असतात. या प्रकारच्या कार्याला देशांतील समाज विकास घटकांत, त्याचप्रमाणें राष्ट्रीय विस्तरण घटकांतहीं हळू हळू स्थान मिळूं लागलें आहे. या सर्व कल्याणकारी संस्थांकडून हें कार्य कशा प्रकारें होत आहे, त्यांच्यापुढें या विषयाबाबतचे कोणते प्रश्न आहेत हें बालजीवन रसिकांनी समजून घेण्यासारखें आहे.

संदर्भ साहित्य : Child care and Growth of love. पेंग्विन बुक्स Infant care. U. S. department; Children's Bureau publication No 8, 1951, All India Directory of child welfare agencies and services published by the Indian Council for child welfare, pamphlets by the Tata Institute of Social Sciences.

—शेष नामले

पूर्वप्राथमिक शिक्षणांत

रशियापासून काय घेतां येईल ?

(१) 'जें कांहीं उत्तम असेल तें मुलांना द्या' हा लेनिनचा आदेश कुटुंबांच्या विकासासाठीं उपयोगी पडणारा आहे तसाच तो राष्ट्राच्या विकासासाठींही उपयोगी पडणारा आहे. किंवहुना राष्ट्राच्या विकासाचें पाऊल मुलांच्या विकासाच्या योजनांना राष्ट्रीय पुनर्रचनेंत अग्रेसरत्व दिल्याशिवाय पुढें पडूं शकत नाहीं हें रशियानें जसें ओळखलें तसें आपण ओळखायला पाहिजे.

(२) सक्तीचें, सार्वत्रिक आणि विनामूल्य प्राथमिक शिक्षण सात वर्षांनंतर जसें रशियांत योजण्यांत आलें आहे तें भारतीय घटनेंत आपण स्वीकारलें आहे परंतु कांहीं राज्यांनीं व कांहीं स्थानिक स्वराज्य संस्थांनीं ही मर्यादा वयाच्या सहा वर्षांवर आणि पांच वर्षांवर आणली आहे ती बालकांच्या विकासाला घातक आहे. इंग्लंडमध्यें सक्तीच्या शिक्षणाची मर्यादा पांचवें पूर्ण झाल्यावर लागू होते परंतु पांच ते सात या वयाच्या बालकांसाठीं तेथें शिशुशाळांची Infant Schools योजना आहे. ह्या शिशुशाळा प्राथमिक शिक्षणाचा भाग नाहींत. ह्या शिशुशाळा बालकांच्या त्या विशिष्ट वयाच्या गरजांचा विचार आहे. शिक्षणाची वयोमर्यादा इकडे पांच पूर्ण वर्षांवर आणायची पण त्या वयाच्या शिक्षणाचा विचारसुद्धा करावयाचा नाहीं हें शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचें धोरण म्हणजे बालकांवर क्रूरता आहे असें आपण समजले पाहिजे. घटनेंत नमूद केल्याप्रमाणें प्राथमिक शिक्षण सात पूर्ण वर्षांपासून सुरु ठेवा, नाहींतर पांच ते सात या अवस्थेन्या शिक्षणासंबंधींचा विचार तरी करा.

(३) रशियांतील पूर्वप्राथमिक संस्थांनीं बालकांच्या आरोग्याच्या प्रश्नाला ज्या प्रकारें प्राथमिक महत्व दिलें आहे ती गोष्ट आपल्या येथें आणण्याची फार गरज आहे. आपल्या येथील दर डोई उपन्न फार कमी असल्यानें हा प्रश्न व्यापक पायावर आपल्याला हातीं न घेतां आला तरी ज्या पालकांना ऐपत आहे अशा पालकांनीं बालमंदिराशीं सहकार करून शक्य तर बालमंदिरांवर सक्ती करून बालकांच्या आरोग्याच्या प्रश्नाला सर्व दृष्टीनें महत्व येईल हें पाहिलें पाहिजे. सरकारनें पूर्वप्राथमिक शिक्षणाची जबाबदारी न घेतली तर पूर्वप्राथमिक शाळांना मोकळीं मैदानें व मोठ्या इमारती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. ज्या वस्तींत बालकांना योग्य पोषण पुरविण्याची पात्रता नाहीं, निदान तेथें तरी राज्यांनीं अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांनीं बालकाच्या आहाराचा प्रश्न हातीं घेतला पाहिजे. सर्व शिक्षणाचा पाया आरोग्य आहे हें समजलें तरी तें पालकांच्या आणि सरकारच्या कृतींत उतरलें पाहिजे.

(४) रशियांतील पूर्व-प्राथमिक संस्थांतील स्वच्छता फारच प्रशंसनीय होती. पाळणा-घरांत प्रवेश करणारांना तेथें स्टरलाइज्ड कपडे घालून जाणें भाग पाडण्यांत येतें आणि आमच्या येथें प्रसूतिगृहांत देखील कोणी आरोग्याची दृष्टी किंवा जाणीव दाखवीत नाहीं. हजारों अर्भकें या आमच्या अस्वच्छतेमुळें बळी पडतात याची दखल आम्ही घेतलेली नाहीं. पूर्वप्राथमिक संस्थांची स्वच्छता सर्व प्रकारें उत्तम ठेवण्याचा आदर्श आपण घेण्यासारखा आहे.

(५) रशियांतील शाळांच्या वातावरणांतील सौंदर्यदृष्टी आपल्याला कांहीं अंशीं ठेवता येण्यासारखी आहे. भिंतीवर भव्य मौलिक चित्रें, ठिकठिकाणीं भव्य शिल्पाचे नमुने, ड्रेपरी ह्या गोष्टी आपल्याला करता न आल्या तरी फुलझाडांच्या कुंड्या, पशु-पक्ष्यांचे पिंजरे, ॲक्वेरिअमस् यासारख्या वस्तु ठेवून केवळ श्रमानें उत्पन्न करता येणारें सौंदर्य आम्ही आपल्या शाळेंत जरूर आणलें पाहिजे. बालमंदिरांत बागा, कुंड्या, फुलझाडें, पशुपक्षी यांचें वातावरण निर्माण करण्याचा आग्रह धरला पाहिजे.

(६) रशियांतील पूर्वप्राथमिक शाळांच्या शिक्षणांत प्रत्यक्ष समाज आणि परिस्थिति परिचयावर जो भर देण्यांत आला आहे ती खर्चाची बाब नसल्यानें आपल्या येथें घेण्यासारखी आहे. रशियाच्या पूर्वप्राथमिक शाळेच्या ८-१० तासांतून चार तास दररोज मुलांना बाहेर काढण्यांत येतें. आपल्या शाळा ४-५ तासांच्या असतात हें लक्षांत घेऊन निदान रोजच्या कार्यक्रमांत १-१॥ तास तरी मुलांना रोज बाहेर फिरवून आणण्याचा आणि त्याबरोबर या प्रवासांतून त्यांना योजनाबद्ध माहिती करून देण्याचा कार्यक्रम येथील शिक्षकांना करता येण्यासारखा आहे. अशा रोजच्या फिरण्यानें त्यांना आपला समाज दिसेल, समाजांतील माणसांच्या जीवनक्रमाची ओळख होईल. महागडीं साधनें वर्गाच्या खोलींत मांडून निर्जीव शिक्षण देत बसण्यापेक्षा प्रवासाच्या द्वारें शिक्षणांत जिवंतपणा अशाप्रकारें आणतां येईल.

—शेष नामंत

———

फ्रोडिन पद्धतीचा पुरस्कर्ता

विल्यम फ्रेड्रिक ऑगस्ट फ्रॉबेल

किंडर गार्टन शाळेचा निर्माता, बालप्रेमी आणि नूतन शिक्षणाचा प्रभावशाली जागतिक शिक्षणज्ञ म्हणून विल्यम फ्रेड्रिक ऑगस्ट फ्रॉबेलचें नांव सर्वतोमुखी झालेलें आहे. जर्मनींतील थुरिंजिया वन्य प्रदेशांतील ओबरविशबॅक नावाच्या खेड्यांत २१ एप्रिल १७८३ रोजी त्याचा जन्म झाला आणि वयाच्या ७० व्या वर्षानंतर २१ जून १८५२ मध्यें मरिएन्थल नांवाच्या खेड्यांत त्यांचें देहावसान झाले. थुरिंजियांतील एका डोंगरी रस्त्यावरील कड्याच्या कपारीवर फ्रॉबेलचें नांव भव्य अक्षरांत खोलवर कोरलेलें आढळतें तसें नूतन शिक्षणाच्या इतिहासांतही तें कोरलें गेलें आहे यांत शंका नाही.

बाल्यावस्था, शिक्षण आणि शैक्षणिक कार्य

जगांतील बालकांचें जीवन आनंदमय करण्यासाठी ज्यानें अपार परिश्रम घेतले, त्याच्या स्वतःच्या बाल्यावस्थेची कहाणी करुण असल्याची आढळते. वडील ओबरविशबॅक खेड्यांत धर्मगुरुचें (पास्टर) काम करीत. आजूबाजूच्या लोकांच्या धार्मिक विकासाची चिंता बाळगणाऱ्या या धर्मगुरुचें आपल्या कुटुंबियांकडे दुर्लक्ष होतें. एक वर्षाच्या आंतच फ्रॉबेलची आई वारलेली. नंतर वडिलांनी दुसरें लग्न केलें; सावत्र आईच्या तावडींत सांपडलेल्या या मुलाला शेवटी तो चार वर्षांचा असतांना त्याच्या मामांनी आपल्या घरी नेलें. शालेय जीवन फारसें यशस्वी न झाल्यानें त्याच्या दुसऱ्या भावाला कॉलेजमध्यें पाठवलें गेलें व याला त्याच्या वयाच्या १५ व्या वर्षी एका जंगल खात्याच्या अधिकाऱ्याच्या हाताखाली जंगलाचें काम शिकण्यास ठेविलें. दोन वर्षानंतर हिशोबी कारकून, खाजगी चिटणीस अशा नोकऱ्यांनंतर त्याने फ्रॅंकफर्ट येथें वास्तुशास्त्राचा शिक्षणक्रम घेतला. तेथें असतां एका आदर्श शाळेच्या नियामकानें त्याला शाळेंत शिक्षकाच्या नोकरीवर येण्याचें सुचवले. येथें 'आपण एक उत्तम शिक्षक आहोंत' असा स्वतःबाबतचा शोध फ्रॉबेलला लागला. दोन वर्षे येथें काम केल्यानंतर त्यानें एका श्रीमंत कुटुंबांतील मुलांचा खाजगी शिक्षक म्हणून, काम घेतलें. या मुलांच्या आणि स्वतःच्या शिक्षणासाठी येर्डून येथील पेस्टालॉझीच्या संस्थेंत १८०७ ते ९ पर्यंत होता. परंतु विज्ञानाकडे पेस्टालॉझीचें विशेष लक्ष नसल्याने १८११ मधें बर्लिनच्या युनिव्हर्सिटींत त्यानें अभ्यास सुरू केला. १८१६ मध्यें ग्रीशीम येथें युनिव्हर्सल जर्मन अेज्युकॅशनल इन्स्टिटयूट या नांवाची संस्था स्थापन केली. पुढील २० वर्षें त्यानें येथें आपलें कार्य चालूं ठेविलें. १८२६ मधें त्यानें Education of man हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. परंतु ग्रीशीम येथें शिक्षण कार्यासंबंधीं त्याला समाधान वाटलें नाहीं.

किंडर गार्टनची स्थापना

मनुष्य ही निसर्गाचीच निर्मिति आहे म्हणून मनुष्य आणि निसर्ग यांचें नियमन एकाच परमेश्वरी नियमनानें होत असले पाहिजे. जीवनाच्या विकासांत सातत्य आणि सुसंगती असल्यानें मानवाच्या जन्माबरोबरच त्याच्या शिक्षणाला सुरुवात होत असली पाहिजे म्हणून शिक्षणाची सुरुवात शक्य तो लहान वयांतच झाली पाहिजे अशी त्याला कल्पना येऊन शिक्षणासंबंधीच्या एका 'निश्चित सत्याचें' definite truth त्याला दर्शन झालें. लगेच १९३७ मध्यें ब्लॅंकनबर्ग येथें त्यानें आपल्या या नव्या संस्थेला 'किंडर गार्टन' म्हणजे 'छोट्यांची बाग' असें नांव देऊन तिची सुरुवात केली. आपल्या या नवीन पद्धतीच्या प्रचारार्थ १९३७ ते ४० च्या दरम्यान त्यानें एका साप्ताहिकांत अनेक लेख लिहिले. मोठमोठ्या शहरांत त्यानें आपल्या शिक्षणविषयक नवीन कल्पनांसंबंधी व्याख्यानें देऊन प्रचार केला. या सर्व गोष्टीमुळें त्याच्या शिक्षणविषयक कल्पनांचा प्रचार झाला परंतु पैशाच्या अभावामुळें संस्थेचें संचालन कठीण होऊन बसलें.

किलहौ ची शाळा व शेवट

शेवटी ब्लॅंकनबर्गची संस्था बंद करून किलहौ येथें शाळा आणि शिक्षकांसाठी प्राशिक्षण वर्ग १८४८ मध्यें सुरू केला. या पुढील त्याच्या कार्यामुळें त्याचें नांव अजरामर झालें. परंतु याच वेळी त्याच्या पुतण्याच्या प्रवृत्तीमुळें प्राशियन सरकारचा फ्रॉबेलच्या किंडर गार्टन संस्थांविषयी, तीं समाजवादाच्या प्रचाराची केंद्रें आहेत असा संशय येऊन त्या बंद करण्याचा हुकुम काढण्यांत आला. या स्वतःच्या निर्मूलनाचे दुःखांतच त्याचा वर लिहिल्याप्रमाणें १८५२ मध्यें अंत झाला.

पेस्टालॉझी आणि फ्रॉबेल

दोघांचा धर्म आणि विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोण एक होता. त्यांच्या धर्म आणि विज्ञानासंबंधीच्या कल्पनांत त्यांना विरोध वाटत नव्हता. विज्ञानाला ते परमेश्वराचाच आविष्कार मानीत. चराचर सृष्टीच्या सर्व व्यवहारांवर परमेश्वराचेंच नियमन आहे. 'In everything there works and exists one life, because to all One God has given life.'

फ्रॉबेलच्या मतें सर्व प्रकारचें सत् शिक्षण धर्मावरच आधारलें पाहिजे. शिक्षणानें मनुष्याला आत्मसाक्षात्कार झाला पाहिजे व त्यामुळें स्वतःचें जीवन सृष्टि, आणि परमेश्वर यांत तादात्म्य साधलें पाहिजे. श्रद्धावान, शुद्ध, अहिंसामय व म्हणून पवित्र अशा जीवनाची प्राप्ती हाच शिक्षणाचा हेतु आहे.

विकासासंबंधींची त्याची उपपत्ति

वृक्षाच्या बीजांतच वृक्षाचें स्वरूप सामावलेलें आहे या बीजाचा विकास त्यांतच असलेल्या आंतरिक प्रेरणांमुळें होतो, हीं जीवनशास्त्रांतील विकासाची कल्पना शिक्षण क्षेत्रांत प्रथम आणण्याचें श्रेय पेस्टालॉझीकडे जातें. त्याच्या या विचारांना पूर्ण स्वरुप देण्याचें कार्यच त्याचा महाशिष्य फ्रॉबेलनें पुढें चालविलें.

विकास म्हणजे नुसती आकारांत वाढ नव्हे. विकासांत शक्ति, कौशल्य, कार्यक्षमता यांची वाढ होऊन मनोरचना आणि व्यवहार अधिकाधिक पूर्ण होत जातात. हा विकास कितपत होईल हें आपल्या कर्माच्या परंपरागत वारशावर अंशतः अवलंबून असतें, त्याचप्रमाणें अंशतः तें व्यक्तीला मिळालेल्या संधीचा व्यक्ती ज्या रीतीनें उपयोग करून घेते त्यावर अवलंबून आहे. शक्तीच्या उपयोगानेंच शक्ती वाढते. हाताची शक्ती वाढवावयाची आहे तर हाताचा उपयोग झाला पाहिजे. याचप्रमाणें शरीर आणि मनाचा उपयोग झाला पाहिजे. पण हा उपयोग कोणत्या प्रकारें करायचा ? याला फ्रॉबेलचें उत्तर असे कीं हा उपयोग व्यक्तीच्या शक्तीच्या प्रमाणांत झाला पाहिजे एवढेंच नव्हे, तर तो व्यक्तीच्या स्वभावधर्माशीं संवादी असला पाहिजे. ज्याचा व्यक्तीच्या जीवनाशीं मेळ बसत नाहीं किंवा जें व्यक्तीच्या शक्तीबाहेर आहे तें शिक्षण होवूं शकत नाहीं.

स्वयंशिक्षणाचा पुरस्कर्ता

विकासासंबंधींची अभ्यासप्रवृत्ति ज्ञान, भावना आणि कृति या मनाच्या त्रिविध आणि समग्र स्वरूपाला कार्यान्वित करणारी असली पाहिजे. ही अभ्यास प्रवृत्ति स्वयंशोधित आणि स्वयंसंचालित आणि स्वयंनिर्भर असली तरच परिणाम चांगले दिसून येतात. प्रत्येक व्यक्तीला चैतन्याचा अथवा परमेश्वराचा आदेश आहे. हा आदेश म्हणजेच विकासांतील सत्य. हें सत्य समाजायचें कसें ? प्रकृतीच्या नियमांचें पालन करण्यानें प्रकृति किंवा हा आदेश ज्याचा त्याला समजतो. शिक्षणानें व्यक्तीमधील हा आदेश बाहेर आणला पाहिजे. शिक्षण म्हणजे आंतील बाहेर आणण्याची प्रक्रिया आहे. बाहेरून आंत टाकण्याची प्रक्रिया गौण समजली पाहिजे.

प्रत्येक व्यक्तीचा विकास स्वयंगतिक, स्वतंत्र आणि सनातन नित्य नियमानुसारी आहे. जन्मतः प्रत्येक व्यक्ति सत्-प्रवृत्त असते ही, आणि त्याचबरोबर सुरूवातीचें शिक्षण 'अभावात्मक' असावें अशी त्यांतून निघणारी दुसरी रूसोची कल्पना फ्रॉबेलनें अंगिकारली होती. परंतु मनुष्याची परिस्थिति अशी 'अभावात्मक' असूं शकत नाही. त्याचा समाज त्याला विकृत करीत असतो किंवा बिघडवीत असतो म्हणून मनुष्यांत असें कांहीं विकृत असल्यास त्यांतून मुक्त करण्यासाठीं हुकमी शिक्षणाचा कडक अंमल करण्यास फ्रॉबेल मागेंपुढें पहात नसल्याचें आढळतें.

स्वातंत्र्यासंबंधींची कल्पना

फ्रॉबेलच्या मतें स्वातंत्र्य म्हणजे नियमांचें पालन. हे नियम म्हणजे ज्यांच्यामुळें मनुष्याला स्वतःतील दिव्यत्वाचा अथवा उत्तमत्वाचा साक्षात्कार होतो तें. अशा उच्च जीवनाच्या आवश्यकतेमधूनच स्वातंत्र्य प्रगट झालें पाहिजे. थोडक्यांत उच्च जीवनादर्शाचें पालन. यांत शिक्षणाचें कार्य म्हणजे व्यक्तींतील चैतन्याला जागृत करणें. शिक्षकाचें सामान्य कार्य म्हणजे कल्याणकारी उपरी निरीक्षण Benevolent Superintendence करण्याचें असलें पाहिजे.

क्रियाशीलतेचा पुरस्कार

शिक्षकाच्या कार्याला फ्रॉबेलनें मर्यादा घातलेली असली तरी बालक क्रियाशील राहिलें पाहिजे असा त्याचा आग्रह होता. मनुष्याचें शिक्षण क्रियेंतूनच सुरु झालें पाहिजे. क्रिया-शिक्षणाचा पुरस्कार फ्रॉबेलपूर्वी अनेकांनीं केला होता, परंतु ह्या क्रियेच्या मागें व्यक्तीमधील चैतन्य, म्हणजे परमेश्वरी प्रेरणा कारणीभूत असते हें त्यानेंच सांगितलें. ही क्रियाशीलतेची प्रेरणा व्यक्तिमात्रांत व्यापून आहे. जगांतील सर्व बालकांत ती आढळते. या क्रियेचा उपयोग शिक्षणानें करून घेतला पाहिजे. तिचें दमन न करता शिक्षणानें तिचें मार्गदर्शन केलें पाहिजे.

खऱ्या शिक्षणामुळें आनंद

शिक्षणांत खरें मार्गदर्शन मिळून व्यक्ति जेव्हां स्वयंगतिमान होते तेव्हांच तिला आपल्या क्रियांचा परिणाम पाहून आनंद वाटतो. आपल्या प्रयत्नाला आलेल्या फळामुळें तिला समाधान वाटतें. अशा क्रियेंत व्यक्तीच्या आंतरिक शक्तीचा आविष्कार होतो. आंतील बाहेर येतें. शिक्षणानें व्यक्तीला हा स्वयंस्फूर्तीचा आनंद बालकांना मिळेल या प्रकारें मार्गदर्शन केलें पाहिजे. हें मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीनें त्यानें खेळाचा उपयोग करून घेण्याचें ठरविलें. खेळांत मुलांना खराखुरा आनंद होत असतो. खेळ हेंच त्यांच्या स्वाभाविक विकासाचें आणि आनंदप्राप्तीचें साधन आहे. म्हणून शिक्षणाला खेळाचें रुप दिलें पाहिजे. फ्रॉबेलनें या प्रकारें खेळाला शिक्षणाचें स्थान दिल्यानें तो कींडनपद्धतीचा पुरस्कर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. खेळासंबंधीच्या त्याच्या विचारांचा परामर्ष पुढील लेखांत घेईन.

—ना.

मुलांशीं वाग बाबत करून पहा

मुलें आपल्या खेळांत किंवा उद्योगांत तन्मय झालेलीं असली म्हणजे त्यांत शक्यतो मधे पडण्याचें टाळा. मार्गदर्शन करण्याची जरूर वाटली तर सर्व बाबतीत योग्य अशा गोष्टी-बाबतचें सूचन जरूर करा.

त्यांच्या विविध हालचालीवर आणि वर्तनावर लक्ष ठेवा पण त्यांना दुसऱ्या मुलांच्याबरोबर मोकळ्या मनानें खेळूं द्या.

खेळांसाठीं योग्य साधनें देतां येतील तेवढीं द्या. साधनांशी खेळतांना जरूर तेवढेंच मार्गदर्शन करा. तीं स्वतः होवून खेळत असतांना निराश झाली अथवा त्यांना यश न लाभलें तरी त्यांच्या मधें पडूं नका. अशा मदतीनें मुलांना कमीपणा वाटतो. ही कमीपणाची भावना वाढीला लागतां कामा नये.

प्रोत्साहन जरूर द्या. त्यांच्या चांगल्या वर्तनाच्या उपक्रमाला उत्तेजन द्यायला हवेंच. त्यांच्या चांगल्या गोष्टी तुमच्या लक्षांत येतात, त्या तुम्हांला आवडतात हें त्यांना कळू द्या.

मुलांचा दृष्टिकोण समजण्याचा प्रयत्न करीत जा. त्यांचे प्रश्न असतात ते आपण लक्षांत घेतले पाहिजेत. अशी सहानुभूति आपण दाखविली तर मुलांना ती समजते ब ती आपले उतराई होण्याचा प्रयत्न करतात.

(संग्रहित)

नूतन बालशिक्षण आणि संघ समाचार

इंदूर : दरवर्षीप्रमाणें बालनिकेतन नं. १ चा वार्षिक समारंभ आणि बालअध्यापन मंदिराच्या विद्यार्थ्यांना प्रमाण-पत्रें देण्याचा समारंभ दिनांक ७-२-५९ रोजीं अत्यंत उत्साहानें साजरा झाला.

ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर—विद्यापीठाच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ सौ. वेणुताई चव्हाण यांच्या शुभहस्तें दि. १६-२-५९ रोजी साजरा झाला. या नवीन इमारतीला 'सौ. अनुसयाबाई देवचंद शहा गृहशास्त्र आणि कलाविभाग' असें नांव देण्यांत आलें आहे. मुख्यमंत्री ना. चव्हाण यांचें या प्रसंगी उद्बोधक भाषण झालें.

बाल अध्यापन मंदिर, सांगली : संस्थेचें पहिलें वार्षिक स्नेहसंमेलन मुंबई राज्याच्या उपविद्याधिकारी श्रीमती चंद्राताई कर्नाटकी यांच्या अध्यक्षतेखाली दि. ६-२-५९ रोजीं साजरें करण्यांत आले.

के. एम्. एस. शिशु विकास मंदिर : संस्थेचें वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २४-१-५९ रोजी नू. बा. शि. संघाचे चिटणीस श्री. शेष नामले यांच्या अध्यक्षतेखाली साजरें झालें.

दत्तात्रय बालक मंदिर, पुणें : तृतीय वार्षिक स्नेहसंमेलन सौ. इंदिराबाई भाजेकर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १८ जानेवारी १९५९ रोजी झाले. मुलांचे कार्यक्रम सुटसुटीत व आकर्षक होते.

पोंच व अभिप्राय

'शब्दांची मजा' संग्राहक : अनुताई वाघ व स. आ. केळकर. पूर्व प्राथमिक प्रकाशन, लक्ष्मीबाग, जोगळेकर वाडी, सायन, मुंबई २२. पृष्ठ संख्या क्राऊन आकार २२ पानें. अक्षर—ओळखीच्या अभ्यासार्थ पुस्तकाचा उपयोग होण्यासारखा आहे. छपाई व टाईपाकडे चांगले लक्ष दिलें गेलें आहे. पुस्तकाचें मूल्य नये २५ पैसे आहे.


पुणे प्रादेशिक शाखा : स्व. गिजुभाई—जयंति—कार्यक्रम

दि. ७।१।५९ रोजी तिन्ही बालवाड्यांतून प्रात्यक्षिक झालें. त्यावेळी सर्व प्रकारचे व्यवसाय ठेवलेले होते. मुलें उत्साहानें भाग घेत होतीं. पालकांनी पण मुलांचें काम पाहून समाधान व्यक्त केले. ९, १० जानेवारी रोजी पुण्यांतील बालशाळा व बालवाड्यांचे रंजन कार्यक्रम झाले. सुमारे १४।१५ बालशाळांनी कार्यक्रमांत भाग घेतला होता. दि. १० जयंतिकार्यक्रमाचा मुख्य दिवस; ह्या दिवशी सुरवातीला नू. बा. शि. संघाच्या अध्यक्ष सौ. मालिनीबाई परांजपे यांनी अध्यक्ष सौ. यमुताई किर्लोस्कर यांची ओळख करून दिली. त्यानंतर शांताताई भागवत यांनी स्व० गिजुभाईचें चरित्र थोडक्यांत सांगितलें. पुणे प्रादेशिक शाखेच्या चिटणीस सौ. उषाताई साने यांचें अहवाल—वाचन झालें.

अध्यक्ष सौ. यमुताई किर्लोस्कर म्हणाल्या की मुलांना त्यांच्या कलाने शिकविणे फार महत्त्वाचे. पूर्व प्राथमिक शाळांतून प्राथमिक शाळेंत जाणाऱ्या मुलांमध्यें एक प्रकारचा फरक दिसतो. त्यांना एक तऱ्हेचें वळण, चांगल्या संवयी लागलेल्या दिसतात. मात्र प्रा. शाळेंत ५० मुलें आणि १ शिक्षिका यामुळें व्यक्तिगत लक्ष पुरविले जात नाही. पालकांनी आपण मुलांना कोणत्या शाळेंत घालावयाचें याचा साधकबाधक विचार करून नंतरच त्यांचें नांव दाखल करावें. मुलांचे रंजन कार्यक्रम पाहून न बुजतां त्यांनी कायें केल्याबद्दल कौतुक केलें. शेवटी शाळांशाळांतून रंजन कार्यक्रमांच्या चढाओढी ठेवण्याची सूचना केली.

सौ. शांताताई आठवले यांनी आभार मानले. ध्येयगीता-नंतर हा कार्यक्रम संपला.

बालप्रेमी मंडळींची सहल—: रविवार दि. ११ रोजी जयंति—कार्यक्रमांतील एक कार्यक्रम म्हणून कोथ्रुडला वांद्रेकरांच्या बागेंत सहल गेली. गप्पागोष्टीबरोबर विविध सामाजिक प्रश्नांवर चर्चा होऊन खेळीमेळीत, मजेंत संध्याकाळपर्यंत सर्वांनी सहलीचा आनंद लुटला.



अशुद्धीचे जंतू नष्ट करणारे औषधयुक्त

फार परिश्रमपूर्वक संशोधनानंतर

१८ औषधीयुक्त वनस्पतीपासून

तयार केलेली एकमेव आयुर्वेदीय

वि को. व ज्र दं ती


वेस्ट अगर साबण आपला पसंतीप्रमाणे वापरा.

विको लेबोरेटरीज

जयंत पालव & ब्रदर्स वी वी मुंबई १४




सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी



— मोल डिस्ट्रीब्युटर्स —

ए. व्ही. आर. ए. अँन्ड कं., मुंबई २









मुद्रक व प्रकाशकः—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर—मुंबई १४.
मुद्रणस्थानः—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

नूतन बाल-शिक्षण संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ वें : अंक १२ वा

मार्च १९५९



पूर्वप्राथमिक शाळेचें कर्तव्य

चांगल्या पूर्वप्राथमिक शाळेंत बालकाच्या केवळ बुद्धिविकासाचाच विचार होतां कामा नये. प्रत्येक बालकाला बलवर्धक जोरदार खेळाची, त्याचप्रमाणें शांतपणें खेळावयाच्या खेळांची गरज असते. अशा खेळांतून शरीर आणि बुद्धीचा सुसंगत विकास होतो. अशा खेळांतून त्यांच्यांतील सामाजिकतेचा विकास होतो, म्हणून पूर्वप्राथमिक शाळेनें बालकांच्या खेळांचें स्वरूप एकांगी होणार नाहीं हें विशेष लक्ष ठेवून पाहिलें पाहिजे.

: आद्यसंपादक :

स्वर्गवासी गिजुभाई बधेका ☆ श्री. ताराबाई मोडक

: संपादक :

श्री. शेष नामले

वार्षिक वर्गणी	: कार्यालय :	किरकोळ अंक
चार रुपये	११८, हिन्दु कॉलनी, दादर, मुंबई–१४.	३७ नये पैसे

वय वाढतें आहे
परंतु केंस मात्र
पांढरे होत नाहींत



केंसांना नैसर्गिकरीत्या काळेभोर करण्यासाठीं जगभर मान्यता पावलेले.



कोणत्याही अवस्थेंतील डोक्यावरील केंस कितीही पांढरे झालेले असोत लोमा ते खात्रीनें काळे केल्याशिवाय राहणार नाहीं!

लोमा कलप नव्हे परंतु तें नैसर्गिकपणें केंस काळे करणारें असून, त्याचबरोबर केंसांची वाढ करणारीं नैसर्गिक द्रव्यें त्यांत असलेलें तें एक हेअर ड्रेसर आहे...त्याला अत्यंत आल्हाददायक सुवास असतो.

सोल एजंटस्: एम. एम. खंभातवाला, अहमदाबाद १.
एजंटस्: सी. नरोत्तम ॲन्ड कंपनी मंगलदास रोड, मुंबई २.

MPS-MAR

माझ्या वाडवडिलांची जमीन – ही आतां तुमचीच !



ग्रामदान ही एक महान् अहिंसात्मक क्रांतिच असून तिचें सामाजिक महत्त्व फार आहे, असे या चळवळीबद्दल सांगण्यांत येतें. आणि तें अगदीं खरेच आहे. पांच वर्षापूर्वीं कोणी ही कल्पना केली होती, कीं गांवांतले जमीनदार लोक आपल्या साऱ्या जमिनी स्वखुषीने देऊन टाकावयास तयार होतील आणि त्याबद्दल आपल्या कुटुंबाच्या मर्यादेनुसार थोड्याशा जमिनी स्वीकारून त्यांतच सुखसमाधान मानूं लागतील? पण आज तेंच घडून येत आहे.

हिंदुस्तानांतील जीवनांत बदल होत आहे व त्यामुळें अनेक लोकांची राहणी सुधारली आहे. घरांतले जुने पूर्वग्रह व बुरसलेल्या समजुती यांची हकालपट्टी होत आहे. आरोग्य आणि आहार यांच्या बाबतीत अधिकाधिक लोकांना आता एक गोष्ट चांगली कळून येत आहे; ती ही कीं आहारानें पुष्टि येावयाची तर तो केवळ पोटाची भरती करण्याकरितां घ्यावयाचा नसून तो **समतोल** असाच असला पाहिजे. त्या त्या हंगामातल्या भाज्या, फळे व मासे जेवणांत समाविष्ट करावयाचे ठरविल्यास हा समतोल आहार आरोग्यदायक ठरेल व खर्चहि बेताचा होईल.

समतोल आहारांतला एक आवश्यक भाग म्हणजे स्निग्ध पदार्थ. गहूं अथवा तादूळ यापेक्षां अडीच पट शक्ति हे स्निग्ध पदार्थ देतात. शिवाय 'अ' आणि 'ड' हीं जीवनसत्त्वेंहि त्यापासून मिळतात. हीं शरीरसंवर्धक जीवनसत्त्वें वाढती मुलें व फार परिश्रम करणारे प्रौढ यांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत. यामुळेंच सुज्ञ गृहिणी स्वयंपाकासाठीं डालडा वनस्पतीचीच निवड करते. 'डालडा'मध्ये दर औंसांत ७०० आंतरराष्ट्रीय युनिट्स् इतके 'अ' जीवनसत्त्व घातलेलें असतें. शिवाय 'सूर्यप्रकाश-जीवनसत्त्व' 'ड' हेंहि त्यांत घातलेलें असल्यामुळें जादा पुष्टि देणारा असा हा स्वैंपाकाकरितां खात्रीचा वनस्पतिजन्य स्निग्ध पदार्थ उपलब्ध झाला आहे.



स्वयंपाकांतील सर्व प्रकाराकरितां 'डालडा' उपयुक्त असून वेगवेगळ्या तऱ्हेचे अन्नपदार्थ व पाककिया त्यांत तयार करता येत असल्याने स्वयंपाकघरांत नवा जमाना सुरू करण्यातहि त्याचा मोठा हातभार लागत आहे.

हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड, मुंबई

DL.471-X52 MA

नूतन बाल-शिक्षण-संघ

म्हणजे

पालक, शिक्षक आणि बालप्रेमी मंडळींची अखिल भारतीय संघटना

स्थापना १९२५

संघाचे पदाधिकारी

अध्यक्ष : श्री. मोरारजी देसाई — उपाध्यक्ष : श्री. ताराबाई मोडक

कार्याध्यक्ष : श्री. जादवजीभाई मोदी — कोषाध्यक्ष : श्री. मालिनीबाई परांजपे

चिटणीस : श्री. शेष नामले — उपचिटणीस : श्री. यशस्वतीबेन भट्ट

बालकांचे पालक आणि शिक्षकांच्या परस्पर सहकाराशिवाय बालकांच्या सर्वांगी विकासाला खरी मदत मिळूं शकत नाही. पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहकाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी प्रत्येक बालशिक्षण संस्थेत नूतन बालशिक्षण संघाच्या स्थानिक शाखेच्या रूपांत पालक-शिक्षक संघटना स्थापन करा.

कोणत्याही बालशिक्षण संस्थेच्या बालकांच्या पालक आणि शिक्षक वर्गातून पांच सभासद झाले कीं ही संघटना सुरू करतां येते. त्यासाठीं संघाची घटना, प्रवेश पत्रकें, माहिती वगैरे खालील पत्त्यावर लिहून मागवावी.

चिटणीस, **नूतन बाल-शिक्षण संघ,**
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४.

संपादक मंडळ

श्री. ताराबाई परांजपे — श्री. अनुताई वाघ

सौ. सरलाताई देवधर — श्री. भा. धों. कर्वे

सौ. मालिनीबाई परांजपे

अनुक्रमणिका

प्रौढ विभाग

—संपादकीय : २६ व्या वर्षाला निरोप देतांना

—फ्रॉबेलची बालविकाससंबंधीची उपपत्ति आणि कार्यपद्धति

—श्रीमती ताराबाई मोडकांचा संदेश

—विनामूल्य सार्वत्रिक आणि सक्तीचें प्राथमिक शिक्षण

—रेतीचा हौद

शिवाय नू. बा. शि. संघ समाचार इ.

बाल विभाग

विठू विठू पोपट — हरीश फाटक

चलारे मुंबईस जाऊं — बा. मा. हराळे

चतुर ससा — उमाबाई मुंडले

आमुचा टॉमी — लीला पिसोळकर

फडकत राहो निशाण — दत्ताराम आ. बारस्कर

पिठाची गिरणी — राम उगांवकर

फाऊ चिऊ — सुमन काळे

माझी बाग — सौ. उषा जोशी

महत्वाच्या सूचना :

ग्राहकांस—

१) 'शिक्षण-पत्रिका' हें नूतन बाल-शिक्षण संघाचें मुखपत्र आहे.

'शिक्षण-पत्रिका' हें मासिक बालजीवन-विकास आणि शिक्षणासंबंधीं बालकांच्या मातापित्यांना, शिक्षकांना आणि बाल शिक्षणतज्ञांना मार्गदर्शक व्हावें या दृष्टीनें चालविण्यांत येतें.

२) 'शिक्षण पत्रिकें'त लेखकांच्या नावावर प्रकाशित होणाऱ्या लेखांतील विचारां-बाबतची जबाबदारी संघाची नाहीं.

३) 'शिक्षण-पत्रिकें'त 'बालशिक्षण आणि संघ समाचार' या नावाचें एक सदर चाल-विण्यांत येतें. यांत बालशिक्षणविषयक महत्वाच्या स्थानिक बातम्यांना स्थान देण्यात येतें. ज्यांना या प्रकारच्या बातम्या किंवा अहवाल पाठवावयाचे असतील त्यानीं प्रत्येक महिन्याच्या १० तारखे पर्यंत या प्रकारचा मजकूर संपादन कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी.

लेखकांस—

१) 'शिक्षण-पत्रिकें'त लेख लिहूं इच्छिणारांनी आपलें लेखन कागदाच्या एकाच बाजूवर करावें. तें दर महिन्याच्या ता. १ च्या आंत संपादन कार्यालयाकडे पाठवावें. पसत नसलेल्या लेखाबरोबर पुरेसें पोस्टेज असल्यास लेख परत करण्यांत येतील.

२) 'शिक्षण-पत्रिका' कोणत्याहि महिन्यापासून सुरू करतां येते.

३) 'शिक्षण-पत्रिका' प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस पोस्टात पडते. सामान्यतः ता. २५ पर्यंत ती सर्वांना मिळते. तशी न मिळाल्यास ग्राहकांनीं ता. ३० च्या आंत खालीं दिलेल्या पत्त्यावर कळवावें.

४) 'शिक्षण-पत्रिके'च्या प्रत्येक ग्राहकाचा नंबर पत्रिकेच्या वेष्टनावर लिहिलेला असतो. व्यवस्थापक-कार्यालयाशीं पत्रव्यवहार करतांना हा नंबर ग्राहकानें अवश्य कळवावा.

व्यवस्थापक, मराठी 'शिक्षण-पत्रिका'
११८, हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

मुंबई, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या शिक्षण-खात्याकडून मंजूर झालेली
नूतन बाल-शिक्षण-संघाची

शिक्षण-पत्रिका

वर्ष २६ : अंक १२] मुंबई [मार्च १९५९

संपादकीय

२६ व्या वर्षाला निरोप देतांना

या अंकाबरोबर मराठी 'शिक्षण-पत्रिके'चें सव्विसावें वर्ष आपणा सर्वांचा निरोप घ्यायला आलें आहे. अशा वेळीं या वर्षाबरोबर शिशु शिक्षणाच्या क्षेत्रांत ज्या ज्या प्रश्नांचा विचार केला त्यांत आपलीं पावलें कितपत पुढें पडलीं वगैरे गोष्टींची आठवण होणें अगदीं स्वाभाविक आहे. राष्ट्राच्या पुनर्रचनेच्या कार्याचा जसजसा वेग वाढत आहे तसतसें 'शिक्षण-पत्रिके'नें पुरस्कारलेल्या शिशु शिक्षणाच्या प्रश्नाला अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत आहे यांत शंका नाहीं. त्यामुळें 'शिक्षण-पत्रिके'ला दिवसेंदिवस स्वतःच्या जबाबदारीची जाणीव विशेषेंकरून होत आहे.

आपल्या देशांतील पूर्वप्राथमिक शिक्षणाला योग्य स्वरूप प्राप्त करून देणें हा 'शिक्षण-पत्रिके'चा एक महत्त्वाचा उद्देश आहे. या उद्देशाकडे लक्ष ठेवून पत्रिकेनें, या वर्षाच्या पहिल्याच अंकांत 'शिक्षण स्वातंत्र्याचीं नवीं क्षितिजें' हा लेख लिहून, पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या स्वरूपासंबंधीं विचार करणारी जी चर्चा-परिषद नू. बा. शि. संघानें घडवून आणली होती तिच्या कार्याची समालोचना केली होती. नूतन बालशिक्षण संघाला मॉन्टेसोरी शिक्षण पद्धतीपासून प्रेरणा मिळाली असली, तरी मॉन्टेसोरींनंतर पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत जे विचारप्रवाह दाखल होत आहेत त्याचाही पालकांनीं आणि शिक्षकांनीं परामर्ष घेतला पाहिजे. नवीन ज्ञानाच्या अनुसंधानांत जुने अनुभव तपासले पाहिजेत. चर्चापरिषदेनें हें कार्य उत्तम प्रकारें केलें. त्यामुळें 'शिक्षण-पत्रिके'त 'इंद्रिय-शिक्षणमीमांसा' 'सर्जनात्मक कल्पकतेचा विकास' 'पूर्वप्राथमिक शिक्षणांत लेखन, वाचन आणि गणित विषयांचें स्थान' 'कार्यपद्धतीचें अध्यापन' इत्यादि पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या स्वरूपांत कराव्या लागणाऱ्या फेरफारांची आवश्यकता पटविणारे लेख प्रकाशित झाले.

पूर्वप्राथमिक शिक्षणाचें स्वरूप बदलावयाचें असेल तर पूर्वप्राथमिक शिक्षकांच्या शिक्षणांत फेरफार केले पाहिजेत, या विचारानें गेल्या वर्षी अध्यापन मंदिरांचा शिक्षणक्रम सुधारला पाहिजे असा आग्रह धरला. सद्भाग्यानें हें कार्य करण्यासाठीं मुंबई राज्यानें पाणंदीकर समिति नेमली आणि या समितीनें प्रशिक्षणविषयक जे फेरफार सुचविले ते 'शिक्षण पत्रिके'च्या विचारांशींच सुसंगत असल्याचें आढळल्यानें हा प्रशिक्षणक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीनें चालू वर्षांत 'शिक्षण-पत्रिके'नें यथाशक्य प्रयत्न केले. त्यासाठीं नू. बा. शि. संघानें अध्यापकांची एक चर्चा-परिषद जुलै महिन्यांत घेतली. या परिषदेंत राज्यांतील अध्यापन संस्थांत नवीन अभ्यासक्रमाचा अमल सुसंगत रहावा म्हणून महत्त्वाचे निर्णय सर्वानुमतें घेण्यांत आले. ते निर्णय 'चर्चा-परिषदेचे निष्कर्ष' या मथळ्याखालीं प्रकट करण्यांत आले. याच वर्षांत प्राथमिक शिक्षणाचें सुसंकलन करण्याच्या हेतूनें मुंबई राज्यानें जी समिति नेमली त्या समितीनें पूर्वप्राथमिक शिक्षणाबाबत जी प्रश्नमाला योजिली होती तिला नू. बा. शि. संघाकडून उत्तरें पाठवण्यांत आलीं याही कार्यांत पत्रिकेनें आपलें कार्य बजाविलें आहे.

चालू वर्षांत जूनमध्यें 'ग्राम बाल शिक्षण विशेषांक' ऑगस्टमध्यें 'स्वातंत्र्य दिन महोत्सवी अंक' दिपावलीच्या निमित्तानें 'दिपोत्सवी विशेषांक' आणि प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानें 'सोविअेत बालशिक्षण' विशेषांक प्रकाशित करण्यांत आले. याशिवाय पत्रिकेच्या इतर अंकांत भाषा-शिक्षणविषयक लेख, त्याचप्रमाणें बालकांच्या प्रगति नोंदीवरील लेख येऊन गेले आहेत. श्री. जयंतीलाल ओझा यांची 'क्षोभ प्रक्षोभ' ही लोकप्रिय बनलेली लेखमाला याच वर्षांत प्रकट झाली आहे.

बालविभागाकडे या वर्षी द्यायला हवें तसें लक्ष पुरवितां आलें नाहीं या गोष्टीची आम्हांला जाणीव आहे. वाचकांच्या दृष्टीनें 'पालक विभाग' यांच वर्षी सुरू करण्यांत आला आहे.

चालू वर्षाची ही समालोचना करीत असतां एक जाणीव पदोपदीं होते ती ही कीं 'शिक्षण-पत्रिके'चीं पानें फार मर्यादित असल्यानें पालक आणि शिक्षकांच्या विविध प्रश्नांचा त्यांत पुरता परामर्ष घेतां आला नाहीं. 'शिक्षण-पत्रिके'चा वाचकवर्ग जसजसा वाढेल त्यावरच 'शिक्षण-पत्रिके'ला विशेष रंगरूप देणे अवलंबून आहे सध्याच्या आर्थिक मर्यादेंत पानांची संख्या वाढवता येत नाहीं. पत्रिकेची सेवा दिवसेंदिवस अधिक कार्यक्षम व्हावी असें जर वाचकवर्गाला किंवा शिशुशिक्षणाच्या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या बालप्रेमी मंडळींना वाटत असेल तर त्यांनीं पत्रिकेच्या प्रचाराला मदत केली पाहिजे. बालमंदिरें आणि बालवाड्यांत आपलीं मुलें पाठविणाऱ्या पालकांनीं पत्रिका घेण्याचा आग्रह केला पाहिजे. आपल्या सर्वांच्या सहकारावरच पत्रिकेची प्रगति अवलंबून आहे ही गोष्ट पुनः एकदां वेळ या वर्षाचा निरोप घेताना आपल्या सर्वांच्या लक्षांत आणून देतों. आपण योग्य तें कराल च अशा आशेनें पत्रिका नवीन वर्षाच्या कार्याची आंखणी करीत आहे. नवीन वर्षाच्या कार्यक्रमांत आपण कांहीं प्रश्न सुचविल्यास पत्रिका त्यांचाही यथाशक्य समावेश करण्याचा प्रयत्न करील. आपणा सर्वांचा सहकार मिळेल या आशेनें २६ व्या वर्षाचा निरोप घेत आहों.

प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्टमधील फॉर्म नं. ४ मधील ८ व्या नियमानुसार मालकी व इतर माहिती-संबंधींचें निवेदन.

शिक्षण-पत्रिका

१ प्रकाशन स्थळ : ११८ हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

२ प्रकाशनाचा प्रसिद्धिकाळ : मासिक.

३ मुद्रकाचें नांव : शेषराव नागोजीराव नामले
राष्ट्रीयत्व : भारतीय.
पत्ता : ११८ हिंदु कॉलनी, दादर-मुंबई १४

४ प्रकाशकाचें नांव : शेषराव नागोजीराव नामले
राष्ट्रीयत्व : भारतीय.
पत्ता : ११८ हिंदु कॉलनी, दादर-मुंबई १४

५ संपादकाचें नांव : शेषराव नागोजीराव नामले

६ वृत्तपत्राची मालकी ज्यांच्याकडे आहे, अशा व्यक्ति आणि एकूण भांडवलाच्या एक टक्क्याहून अधिक हिस्सा धारण करणारे भागीदार किंवा शेअर होल्डर्स यांची नांवें व पत्ते : नूतन बाल शिक्षण संघ ११८, हिंदु कॉलनी दादर-मुंबई १४.

मी, असें जाहीर करतों कीं, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणें व समजुतीप्रमाणें खरी आहे.

२०-३-५९ —शे. ना. नामले

चुकीची दुरुस्ती

'शिक्षण पत्रिका'—फेब्रु. १९५९ मधील बालविभागांत "कोंबडीची चतुर पिलें" ह्या लेखाखालीं लेखिकेचें नांव चुकीन अनुताई असें छापलेलें आहे तें सुधा कुलकर्णी असें वाचावें. —संपादक

बाळाची सुकुमार त्वचा...



जिवंत आणि तिसरी सगळी जगतें धोके, जसे दिवसभर, भांडवळ डबघार, किंवा रेगाची साथ वातावरण, वाताच्या नाजूक शरीरावर उद्यो नर्सरी पावडरचा एक हात शिंपडताच ही त्वचा कवित उल्हसित होऊन खाली त्वचा अगदी हिंदुस्थान होते.

ही खास बाळासाठी खासियो असून विशेषतिक केलेली (Antiseptic) इचें त्वचा सगळें दोष व बाजारातल्या इतर या साधून खरेदि स्वच्छ करावि.

हजारो कुटुंबांत आणि कित्येक बालकाल्यांत नित्य वापरतात

उदी रिसर्च लेबोरेटरीज, मुंबई-२८

फ्रॉबेलची बालविकासासंबंधीची उपपत्ति आणि कार्यपद्धति

शिशुशिक्षणासंबंधीं कल्पना, तिचें जीवनाविकासांतील अनन्य महत्व यासंबंधीं कॉमिनिअस, रूसो व पेस्टॉलॉझी यांच्या शिक्षण-विचारांत साम्य आढळलें,तरी या अवस्थेच्या शिक्षणासाठीं स्वतंत्र संस्थेचीच योजना असली पाहिजे हें फ्रॉबेलनेंच प्रथम सांगितलें म्हणून तो जगातील शिशुशिक्षणाचा जनक समजला जातो. फ्रॉबेलच्या पूर्वी युरोपांत पूर्वप्राथमिक वयाच्या बालकांसाठीं शिशुशाळा होत्या; परंतु फ्रॉबेलच्या बालोद्यानाच्या kindergarten योजनेंत शिक्षणाचा हेतु, त्याचें स्वरूप, वातावरण, साधनें व त्यांचा उपयोग, शिक्षक व त्याचें कार्य वगैरे गोष्टींचा जो एक सर्वांगी विचार आढळतो, तसा विचार शिशुशाळेच्या योजनेंत नव्हता. फ्रॉबेलच्या बालोद्यानाची कल्पना डार्विन, वॉलेस आणि हार्बर्ट स्पेन्सर यांनीं पुरस्कारलेल्या उत्क्रांतिवादावर आधारलेली होती, परंतु त्यांतही फ्रॉबेलचें वैशिष्ट्य म्हणजे शिक्षणाच्या क्षेत्रांत उत्क्रांतिवादाच्या कल्पना उपयोगांत आणून दाखविल्या हें आहे. पेस्टॉलॉझीच्या शिक्षणाच्या मानसीकरणाच्या Psychologizing कल्पनेला त्यानें मूर्त स्वरूप दिलें.

'Frobel alone translates psychological principles into psychological practice.' फ्रॉबेलनें एकट्यानें मानसशास्त्रीय सिद्धान्तावर आधारलेली मानसशास्त्रीय कार्यपद्धति योजून दाखविली अशी त्याची सर्वत्र ख्याती झालेली आहे. म्हणून पूर्वप्राथमिक शिक्षणक्षेत्राचा अभ्यास करणारांनीं फ्रॉबेलच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करणें जरूरीचें आहे.

विकासाचें स्वरूप

फ्रॉबेलच्या मतें विकास म्हणजे केवळ शरीराची वाढ किंवा लहानाचें मोठें होणें नव्हे. विकासांत शरीररचनेतील गुंतागुंत वाढते, शक्तींत सुधारणा होते, कौशल्य आणि कार्यक्षमतेंत विविधता उत्पन्न होते. विकास म्हणजे आंतरिक व्यवस्थेंतील पूर्णता. मनोविकासांतील वाढ म्हणजे स्मरणशक्तीच्या भांडाराची वाढ. यांत मनोरचना अशी होते कीं ज्यामुळें ज्ञानांतील परस्पर संबंध कळत जातो, शक्ती आणि कौशल्याचा विकास होतो आणि ज्ञानाचा उपयोग करण्याची पात्रता वाढते.

विकास कसा होतो

निसर्गाच्या नवनिर्माणांत विकास-नियमांचें आपल्याला दर्शन घडतें. शक्तीचा उपयोग वारंवार करण्यानें विकास होतो. एकाद्या भागाचा उपयोग बंद झाला म्हणजे त्या भागाची कार्यक्षमता नाहींशी होते. ही अकार्यक्षमता पालकांकडून मुलांत परंपरित होते. पिढ्यानुपिढ्यात ही परंपरा उतरते तेव्हां त्याला आपण 'आनुवंशिकता' म्हणतों. आनुवंशिकतेनें एकादा अवयव अथवा भाग अकार्यक्षम होवूं शकतो. यामुळें विकासाचा कांहीं भाग अशा आनुवंशिक वारशावर अवलंबून असतो. कांहीं भागाचा विकास अर्थातच व्यक्तीला मिळणाऱ्या वातावरणावर म्हणजे वातावरणांत प्राप्त होणाऱ्या कार्यांच्या संधीवर अवलंबून असतो. हाताचा विकास करायचा असेल तर आपण हाताला कसरत दिली पाहिजे. समग्र शरीराचा विकास करायचा असेल तर समग्र शरीराला कसरत मिळाली पाहिजे मनाचा विकास घडवून आणायचा असेल तर मनालाही कसरत दिली पाहिजे. समग्र मानवी व्यक्तित्वाचा विकास करायचा असेल तर त्याप्रमाणें व्यक्तित्वाला कसरत मिळाली पाहिजे. अर्थात येथें प्रश्न उत्पन्न होईल कीं कसरत द्यायची म्हणजे काय करायचें ? कोणत्याही प्रकारचा कसरतीनें विकास होईल का ?

याला फ्रॉबेलचें उत्तर असें कीं एकतर कसरत किंवा अभ्यास पाठ हे योग्य वेळीं दिले पाहिजेत. ही कसरत किंवा अभ्यास पाठ व्यक्तीच्या स्वभावाशीं सुसगत असले पाहिजेत. ते व्यक्तीच्या शक्तीप्रमाणें मर्यादित असले पाहिजेत. तरच विकास योग्य तऱ्हेनें होईल. ज्या अभ्यासपाठांत ही काळजी घेतली जात नाहीं त्यानें व्यक्तीच्या विकासाला नुकसान पोहोंचतें. कसरत किंवा अभ्यासपाठांच्याबाबत विकासाच्या दृष्टीनें आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवायची म्हणजे त्यांत व्यक्तीचा स्वतःचा प्रयत्न असला पाहिजे. स्वतः प्रयत्नशील बनून केलेल्या अभ्यास-

शुभ प्रसंगाच्या वेळीं सुखमाधुरीसाठीं वापरा
दिलरंजन सुवासिक सुपारी
सुमधुर, शेंकडों लोकांना आनंदित करणारी—
—: सर्वत्र विकली जाते :—
आपल्या गांवांत एजन्सीसाठी लिहा :—
मालक: आर. के. सुपारीवाला
शांती भुवन, चौपाटी सी फेस, मुंबई ७.
शाखा : पोस्ट ऑफिसच्या बाजूला, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४
चंदु भुवन, सुपर सिनेमाजवळ, ग्रॅट रोड, मुंबई ७

पाठांनाच विकासाच्या दृष्टीनें महत्व आहे. उदाहरणार्थ : एकाद्या रोपट्याचा विकास साधायचा आहे. हा विकास त्या रोपट्यांतील क्रियाशीलत्वानेंच घडून येईल. ही क्रियाशीलता आपण जागृत करण्यासाठीं रोपट्याला खत-पाणी वेळचे वेळीं देऊन विकासाची गती कमीअधिक करतां येते; परिणामही कमीअधिक दाखवता येतो, पण हें केव्हां ? जर वनस्पतीलाच क्रियाशील बनवून हा प्रयत्न केला तर व्यक्तीच्या अशा प्रकारच्या क्रियांना स्वयंप्रयत्न म्हणता आलें पाहिजे.

अभ्यास-पाठानें समग्र मनाला कसरत मिळाली पाहिजे

विकासाच्या उद्देशानें योजलेला अभ्यास-पाठ Exercise हा मनाच्या ज्ञान, भावना आणि इच्छातंत्राला अनुसरून असला पाहिजे. कोणत्याहि पाठांत जेव्हां समग्रपणें मन कार्यान्वित होते तेव्हांच ती मनाची स्वयंप्रवृत्ति ठरते. असा प्रयत्न जेव्हां स्वयंसंचालित आणि स्वयंपोषित असतो तेव्हांच तें कार्य मनाचे स्वतःचें असें होतें. अशा कार्याचे परिणाम चांगले दिसतात. योजकता, पोषकता, आणि नियंत्रणक्षमता या शक्तींचा जेव्हां स्वयंउपयोग होतो तेव्हां मनाचा खरा विकास होण्याची शक्यता असते.

विकासाचें उद्दिष्ट

मनुष्यानें ज्ञानी होणें हाच विकासाचा उच्चतम हेतु आहे, असें फ्रॉबेलनें सांगितलें आहे. व्यक्ति, मनुष्य, समाज आणि सर्व चराचर सृष्टि हीं सर्व उत्क्रांत होत असतात. म्हणून खरें ज्ञान अथवा शहाणपण, अधिकाधिक सुख आणि शांति हीं, व्यक्ति जेव्हां बुद्धिपूर्वक स्वेच्छेनें उत्क्रांतीच्या नियमाच्या आधीन होते तेव्हांच ती प्राप्त करूं शकते.

विकासासंबंधीचा फ्रॉबेलचा ईश्वराविष्कारवाद (Pantheism)

मनुष्य आणि सृष्टीच्या विकासांत जो सारखेपणा दिसतो त्याचें नियंत्रण परमेश्वरी सत्तेनें होत असतें. मनुष्याच्या वर्तनावरही परमेश्वराचेंच नियंत्रण असल्यामुळें त्याच्या विकासाचा क्रम व त्याचा आविष्कार हा त्याच्या नियंत्रणामुळें व्यवस्थितपणें होत असतो. मनुष्याच्या वागणुकींत त्याच्या चुकांमुळें दोष उत्पन्न होत असतो, तरी मूलतः मनुष्य सत्प्रवृत्त असतो. जीवनाच्या सुरूवातीला तो पाप आणि असत्यापासून अलिप्त असतो. अशा वेळीं शिक्षणाची योजना अत्यंत विचारपूर्वक केली गेली पाहिजे. बालकाच्या विकासाच्या मार्गें जी इश्वरी प्रेरणा असते तिचा विरोध होता कामा नये. व्यक्तीच्या स्वाभाविक विकासाला अडथळा होता कामा नये. व्यक्ति आपल्या स्वभावानें विकसत प्रगति करीत असते त्याला शिक्षणानें मदत केली पाहिजे. ही मदत करण्यासाठीं बालकाला योग्य वातावरण दिलें पाहिजे. या वातावरणांत त्याच्या क्रियाशीलतेला पोषक आणि विकासाच्या गरजांप्रमाणें व्यवसाय व साधनें योजिलीं पाहिजेत. जीवनाच्या या सुरूवातीच्या काळांत बालकाच्या वळणाला विरोधक अशा कोणत्याही गोष्टी बालकावर लादल्या जाणार नाहींत हें शिक्षणानें पाहिलें पाहिजे. बालकाच्या स्वाभाविक विकासाला ज्या गोष्टीमुळे अडथळा निर्माण होतो अशा प्रकारचें नियंत्रण, शिक्षण आणि बालकाच्या व्यक्तित्वावर आक्रमण करणारी गोष्ट शिक्षणांत न येऊं देण्याचा प्रयत्न असला पाहिजे. यासंबंधी फ्रॉबेल म्हणतो "विकासाच्या प्रक्रियेंत परमेश्वर घिसाडघाई करीत नाहीं; जो लहान आहे त्याचा विकास नियमांना अनुसरून क्रमशः ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें, ज्याच्या त्याच्या प्रयत्नांतून तो विकास घडवून आणीत असतो."

रूसो आणि फ्रॉबेलच्या विचारांतील फरक


ईश्वरी संकेतानुसार होणाऱ्या नैसर्गिक उत्क्रांतीविषयक विचाराबाबत फ्रॉबेल आणि रूसोमध्यें साम्य आहे. परंतु फ्रॉबेल रूसोप्रमाणें बालकाच्या विकासकार्याची जबाबदारी संपूर्णपणें बालकावर सोंपवायला तयार नाहीं. बालकाच्या नैसर्गिक विकासाला वाव देण्यासाठीं बालकाला मानवी समाजापासून दूर निसर्गाच्या सान्निध्यांत ठेवण्याचें फ्रॉबेल सांगत नाहीं. बालकाच्या विकासाला सुयोजित वातावरण पाहिजे येवढेच नव्हे, तर मार्गदर्शन करण्यास लायक शिक्षक आणि बालकाला इतर बालकांशीं सहजीवनही आवश्यक आहे असे फ्रॉबेलचें म्हणणें आहे. लायक शिक्षकानें बालकाला त्याच्या आनुवंशिक दूषित वळणापासून किंवा बाहेरील वातावरणात होणाऱ्या वाईट संस्कारांपासून रक्षण दिलें पाहिजे. पण त्याबरोबरच बालक स्वतः आपल्या विकासाचें मार्गदर्शन करूं शकेल ही शिक्षकाची दृष्टी असली पाहिजे.


विकास-प्रक्रियेंतील घटक

जीवनाच्या पहिल्या श्वासाबरोबर बालकाच्या विकासावर मुख्यत्वें तीन गोष्टीचा प्रभाव पडत असतो. :- (१) निसर्ग (सजीव-निर्जीव) (२) मानवी समाज Humanity आणि (३) ईश्वरी शक्ति. बालकाच्या शरीराचा संबंध सजीव आणि निर्जीव सृष्टीशीं असतो, तसेंच त्याच्या हृदयाचा आणि मनाचा संबंध मानवी समाजाशीं येऊन तो त्याचा भाग बनत असतो. शरिराचा संबंध सृष्टीशीं असल्यानें बालकाचा विकास निसर्गाच्या सान्निध्यांत झाला तर निसर्गाचे नियम त्याला चांगले कळण्याची शक्यता अधिक आहे.

हालचाली आणि ज्ञानेन्द्रियांचा विकास

बालकाच्या विकासांत, निसर्ग शारीरिक हालचालींच्या द्वारेंच विकास घडवून आणतो. म्हणून बालकांच्या शरीराच्या अवयवांच्या हालचालीसाठीं त्यांना योग्य तालीम मिळण्याची गरज असते. बालशरीराची आणि त्यांच्या शारीरिक विकासाची





"टिनोपाल" हा जे. आर. गायगी, एस. ए. बाल, स्वित्झरलंड यांचा रजिस्टर्ड ट्रेड मार्क आहे.

"तुमची कन्या तशी फारशी सुरेख...
अं अं अं...आहे असें म्हणतां येणार नाहीं...
परंतु ती माझ्या चिरंजिवांचा संसार मात्र,
चांगला करील यांत शंका नाहीं. मोठी,
समंजस मुलगी दिसली ती...कारण आपल्या
साडीसाठीं तिनें टिनोपाल वापरलें होतें."

कारखानदार : सुहृद गायगी प्रायव्हेट लिमिटेड, वाडी वाडी, वडोदा.

एकमेव वितरक: सुहृद गायगी ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड, पो. ऑ.. बॉक्स ९६५, मुंबई

थोड्याशा टिनोपालनें सर्फेत कपडे सर्वांत जास्त चमकदार पांढरे शुभ्र होतात

SISTA:S SG-42 MAR

ज्यांना माहिती आहे अशाच व्यक्तीला बालकांच्या शारीरिक हालचालीचे मार्गदर्शन करतां येईल. बालकाच्या हालाचालींचें अत्यंत उपयोगी साधन म्हणजे बालकाचे हात. त्याचे हात आणि त्यांतील स्पर्शसंवेदन यांस चांगली तालीम मिळाली पाहिजे. या वयाच्या बालकांत रचनात्मक कार्याची आवड ही त्यांची एक विशेष गोष्ट म्हणून सांगता येईल. या वेळच्या जीवनाची ती एक उत्कट सहजप्रेरणा आहे. सुरुवातीला ही रचनात्मक प्रवृत्ति अनुकरणात्मक असते, नंतर ती कल्पनात्मक आणि मौलिक स्वरूप धारण करते. म्हणून या रचनात्मक प्रवृत्तीला उत्तेजन मिळणें त्याचप्रमाणें ती, अंगभूत होईल असें पाहणें जरूरीचें आहे. हाताच्या नंतर दृष्टि—तिला प्रथम रंगाचें आकलन होतें. त्यानंतर आकार-ज्ञानाची मौज वाटते. म्हणून दृष्टीला तालीम मिळाली पाहिजे. त्यानंतर कान—ध्वनीमुळें बालकांना आनंद होतो. त्यांच्या कानाच्या विकासासाठीं कविता आणि संगीताची योजना असली पाहिजे.

वनस्पति-प्राणी-संगोपन व खेळ


बालकांच्या विकासाला परिपोषक ठरण्याच्या दृष्टीनें वनस्पति आणि प्राणि-संगोपन या विषयालाही स्थान देणें जरूरीचें आहे. केवळ सृष्टिसौंदर्याच्या दर्शनामुळें वनस्पति-प्राणी जीवनाची कल्पना येत नाहीं. बागकामांत आणि पशुसंगोपनांत बालकाला दुसऱ्यासाठीं परिश्रम करण्याची सवय लागते. त्यांची जिज्ञासा वाढते. निसर्गाशीं या प्रकारचा संबंध निर्माण करीत असतांनाच त्याच्या मानवी समाजाशीं येणाऱ्या संबंधांचाही विचार झाला पाहिजे. बालकाच्या सामाजिक प्रेरणांना योग्य वळण लागण्यासाठीं बालकाच्या क्रीडण-वृत्तीचा उपयोग केला पाहिजे. खेळ म्हणजे बालकाच्या मानवी संबंध-विकासाचें एक प्रभावी साधन आहे. फ्रॉबेलनें खेळासाठीं स्वत साधनसामग्री योजिली आहे त्यास फ्रॉबेलचीं 'बक्षिसें' म्हणतात. या बक्षिसावर विशिष्ट प्रकारचे खेळ योजून शिक्षकानें त्याचा समन्वय ज्ञानाशीं करून दाखवायचा असतो. खेळांत मूल आपल्या शरीरावयवांचा उपयोग करण्याचें सहज शिकतें. खेळांमुळें त्याला आरोग्य आणि शक्ति प्राप्त होते. खेळाच्या द्वारें त्याला बाह्य जगाची कल्पना येते. बाह्य जगांतील वस्तूंचे गुणधर्म, त्यांची गति, पारस्परिक क्रिया-प्रक्रिया समजतात. खेळांच्या द्वारें बाह्य वस्तूंशीं आपला संबंध काय तो कळूं लागतो.


खेळांतील हालचालींत जसा वैयक्तिक विकास होतो तसाच खेळ हा दुसऱ्या मुलांबरोबर मुख्यत्वें खेळावा लागल्यामुळें मुलांच्या सामाजिकतेचाही चांगला विकास होतो. या वयांत बालकाचे बहुतेक विचार आत्मकेन्द्री असतात. खेळामुळें मुलांच्या विचारांना, दुसऱ्यांचा विचार करण्याची, दुसऱ्याशी संबंध साधून सहकार करण्याची, गरज निर्माण होते. एकट्याला ज्या गोष्टी करतां येत नाहींत त्या सहकारानें कशा सहज होऊं शकतात याची कल्पना येते. फ्रॉबेलनें खेळाचें शैशवावस्थेच्या विकासांतील महत्त्व ओळखून खेळ हेंच या वयाच्या शिक्षणाचें माध्यम बनलें पाहिजे असें ठरविलें. परंतु वाटेल ते खेळण्यानें विकास साधेल असें त्याला वाटत नव्हतें. मुलांच्या खेळांत प्रौढाचें मार्गदर्शन नसेल तर खेळांना विकृत स्वरूप येतें असें फ्रॉबेलचें म्हणणें होतें. म्हणून त्यानें खेळांची काळजीपूर्वक निवड करून त्यासाठीं निश्चित साधनें व योजना आंखली होती. खेळांत त्यानें (१) शरीरावयवांच्या हालचालींना प्राधान्य देणारे खेळ, (२) हाताला कसरत देणारे खेळ, (३) बालगीतांना महत्व देणारे खेळ, (४) रचनात्मक आणि तुलना व अनुमानाला अवकाश देणारे खेळ असे प्रकार केले होते. बालकांचें ज्ञान वाढविण्यासाठी आणि बौद्धिक शक्तीचा विकास करण्यासाठी 'बक्षीस योजना' तयार केली होती त्याच प्रमाणें क्रियाकौशल्य आणि ज्ञानाच्या उपयोगाला क्षेत्र मिळावें म्हणून त्यानें कांही 'व्यवसायां'ची Occupations योजना केली होती. खेळ, गाणीं, बक्षिसें आणि व्यवसाय यांचा शिक्षणकार्यासाठीं उपयोग म्हणजेच किंडर गार्टनची कार्यपद्धति असें म्हणतां येईल.

(बोवेनच्या पुस्तकाच्या आधारें).

—शेष नामले

स्वदेशीची भावना जागृत ठेवा आणि स्वतंत्र भारताच्या स्वदेशी वस्तूला उत्तेजन द्या.





– विठ्ठ विठ्ठ पोपट –

(चाल : उघड पावसा ऊन पडूं दे)

पोपट माझा दिसतो छान,
मना रमवि परि असतो सान ॥ धृ. ॥

पंख चिमुकले हिरवे पिवळे
नारिंगी तांबडे जांभळे
मधुनच ठिपके असती काळे
वाटे सगळे घ्यावे उचलुन,
पोपट माझा दिसतो छान ॥ १ ॥

चोंच तांबडी असे बारकी
निवडुंगाचें जणूं बोंड कीं
फळें फोडुनी खाइ सारखीं
छोटे छोटे डोळे कान,
पोपट माझा दिसतो छान ॥ २ ॥

दोन पाय परि इवले इवले
हिंदोळ्यावरि घेई झोले
मौज पाहुनी डोले हाले
मग तो जाई भुर्र उडून
पोपट माझा दिसतो छान ॥ ३ ॥

बाग बगीचा आवडे भारी
रान–जंगलें धुंडित सारीं
तळ्यानद्यांतुनि डुबकी मारी
नाहिंच त्याला थंडी ऊन,
पोपट माझा दिसतो छान ॥ ४ ॥

उंच आभाळीं उडुनी जाई
क्षणांत खालीं गिरकी घेई
अशी सारखी चाले घाई
आहे परि हो जीव लहान,
पोपट माझा दिसतो छान ॥ ५ ॥

संगडी माझा ऐसा सुंदर
रूप गोजिरें नयन मनोहर
बैसे माझ्या कधिं खांद्यावर
गाऊनि गाणें मारित तान,
पोपट माझा दिसतो छान ॥ ६ ॥

—हरीश फाटक

———

चलारे मुंबईस जाऊं

दीपोत्सव पाहूं । चलारे । मुंबईस जाऊं ॥ धृ. ॥

वाळकेश्वरीं उभें राहुनी
चौपाटीला नजर टाकुनी
झगमगतें गिरगांव पाहुनी
संतोषुन जाऊं । चलारे । मुंबईस जाऊं ॥ १ ॥

चर्चगेटच्या बोगद्यांतुनी
चमचमते ती बिजली बघुनी
नेत्रांचीं फिटतील पारणीं
धन्य मनीं होऊं । चलारे । मुंबईस जाऊं ॥ २ ॥

बोरीबंदर स्टेशनांतले
लाल, तांबडे, हिरवे, पिवळे
ग्लोब चिटुकले निळे जांभळे
नयनभरें पाहूं । चलारे । मुंबईस जाऊं ॥ ३ ॥

फोर्ट, कुलाबा वाडी बंदर
राणिबाग तो पाहूं नंतर
नायगांवच्या चाळी सुंदर
झगमगत्या पाहूं । चलारे । मुंबईस जाऊं ॥४ ॥

परेल, वरळी, शिवडी सारें
हिंदु कॉलनी, दादर न्यारें
स्वर्ग धरेवर जेथें उतरे,
स्थान तेंहि पाहूं । चलारे । मुंबईस जाऊं ॥५॥

गिरणगांवच्या गिरण्यांचीं तीं
उंच धुराडीं शोभा देती
रांगोळीचीं प्रदर्शनें तीं
कुठें कुठें पाहूं । चलारे । मुंबईस जाऊं ॥ ६ ॥

ट्राम विजेनें दूर धावती
लोकल गाड्या, तशाच पळती
व्हिक्टोरियांना लागे गळती
फिरुन सर्व पाहूं । चलारे । मुंबईस जाऊं ॥७॥

सिताफळांची अफाट गर्दी
भायखळ्याला होते अगदी
दीपोत्सव रंगीं स्वच्छंदी
रंगुनिया जाऊं । चलारे । दीपोत्सव पाहूं ॥८॥

—बा मा. ह्राळे

चतुर ससा

एका शेतकऱ्यानें एक कुत्रा व ससा पाळला होता. एक दिवस ससा अंगणांत गवत खात होता व मोत्या झोंपला होता. इतक्यांत मनी तेथें आली व सशाला म्हणूं लागली "ससेदादा, ससेदादा, तूं किती चांगला आहेस. तुझें अंग कसें कापसासारखें पांढरें शुभ्र व मऊ, डोळे तर माणकांसारखे ! तूं मला फार आवडतोस. चल आपण दोघे फिरावयास जाऊं." सशाला वाटलें आपण 'नाहीं' म्हटलें तर आतांच आपला चट्टामट्टा होईल. म्हणून ससा म्हणाला "हो हो. मनुताई आपण फिरायला जाऊं. पण माझा मित्र जवळच निजला आहे त्याला पण आपण बरोबर घेऊं." मनुताईनें मोत्याला पाहिलें मात्र अन् धूम ठोकली.

—उमाबाई मुंडले

बालगीत

आमुचा टॉमी

टॉमी कितितरी छान । आमुचा
टॉमी कितितरी छान
अनोळखी कुणी दिसतां दारीं
भो भो हा करि तयावरी
उभारुनी उंच कान ॥ १ ॥

ओळखिचे कुणी दिसतां क्षणीं
धांवत जातो त्यांना बघुनी
लोळण घेई पायांमधुनी
त्यांतुन सुटणें कठिण महान् ॥ २ ॥

लांब लांब हे केस शोभती
इवले डोळे ते लुकलुकती
छोटीं बाळें भिउनी पळती
फुगीर ही, चेपुट छान् ॥ ३ ॥

गुबगुबीत हें अंग रेशमी
बसला असतो सदा आसनीं
येतां जातां पाहे टवकारुनी
शिपाई छोटा हा छान ॥ ४ ॥

—लीला पित्रोळकर

फडकत राहो निशाण

फडकत राहो निशाण । भारतीं ।
फडकत राहो निशाण
त्याच्या खालीं आम्ही जमून
प्रणाम करुनि लववूं मान
राष्ट्र-गुणांचें गाऊं गान
ठेउनि उरिं अभिमान । आमुचें ।
फडकत राहो निशाण
देशासाठीं अर्पूं प्राण
देशाला अन् करूं बलवान
साक्ष देउनी तिरंगी निशाण
घेतों त्याचिच आन । गगनीं ।
फडकत राहो निशाण
निशाण अमुचें आम्हांस प्यारें
देशाचे आम्ही सैनिक न्यारे
जपूं निशाणा निशिदिन सारें
लावुनी पणाला प्राण । प्रभो रे ।
फडकत राहो निशाण

—दत्ताराम आ. वादेकर

पिठाची गिरणी

पक् झूक पक् झूक
पक् झूक् पक् झूक् ।।
गिरणी चाले
पक् झूक् पक् झूक् ।।
इंजिन चाले
फुस्सक फुस्सक ।
चाक फिरतें
खुस्सक खुस्सक ।
जातें फिरतें
घर्र घर्र ।
पीठ पडतें
भर्र भर्र ।
पिठाची भाकरी
गरम गरम ।
लोणी लावूं
नरम नरम ।

—राम उगांवकर

"काऊचिऊ"

एक होता काऊ अन् एक होती चिऊ
दोघें म्हणालीं "आपण गाणें गाऊं" ।।धृ०।।
काऊ बसला फांदीवर, चिऊ बसली त्याजवळ
वडाच्या झाडाला लाल लाल फळ ।। १ ।।
काऊ गाऊं लागला "का ऽ व का ऽ व का ऽ व"
चिऊनें ताना घेतल्या "आ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ"
गाणं म्हणायचं कोणतं, तें कांहीं ठरेना
दोघांचीं गाणीं दोघां आवडेना ।। २ ।।
काऊने केली गंमत—म्हणतो एक जमंत
"सुन् सुन् सुन् अरे बेटा सुन्
ह्या चिऊशीं गट्टी फूं"
चिऊ रुसून बसली, पानाआड दडली
काऊवर रागावली
"चिऊताई चिऊताई रागावूं नको
खाऊ घे दाणे घे रुसूं ग नको
चिऊ खुदकन् हंसली काऊजवळ बसली।।३।।

—सुमन काळे

माझी बाग

अंगणिं चाफा हा फुलला
सूर्यफुलाला चढे तजेला
गुलाब काथ्यामध्यें फुलला
आनंदानें मनांत डुलला
वेलीवरच्या नाजुक कलिका
सुंदर दिसती शुभ्र बालिका
पारिजातक बकुल अंगणीं
सडा घालती पहाट समयीं
सुगंध पसरला चहूंकडे
बाग अंगणीं फुलले गडे

—सौ. उषा जोशी

श्रीमती ताराबाई मोडकांचा संदेश

[बाल-अध्यापन मंदिर, सांगली, प्रथम स्नेहसम्मेलनासाठीं श्री. ताराबाई मोडक ह्यांनी पाठविलेला शुभसंदेश.]

"तुमच्या येथील अध्यापन मंदिरात ता. ६ रोजी श्री.चंद्राताई कर्नाटकी यांच्या अध्यक्षतेखालीं स्नेहसंमेलन साजरें होत आहे, हें वाचून आनंद झाला. तुम्हाला या प्रसंगाला अगदीं योग्य अशाच अध्यक्ष लाभल्या त्यांत शंका नाहीं. श्रीमती अनुताईना या सुमारास तेथें येणे अशक्य आहे. कालच श्रीमती ताराबाई परांजपे येथें येऊन गेल्या. त्यांच्याबरोबरच हें पत्र द्यावयाचें होतें पण तें राहून गेलें. हें वेळेवर पोहोचेल अशी आशा करतें.

"तुम्ही सर्व मंडळी बालशिक्षणाचें कार्य उत्साहानें व जोरानें पुढें चालवीत आहांत तें पाहून मी खूप उल्हसित आहे. माझा उल्हास कोणत्या शब्दानें व्यक्त करूं ?

"तुम्ही मंडळी जेव्हां विद्यार्थिनीं म्हणून माझ्याकडे येत होतां, तेव्हां मी एक गोष्ट विशेष आग्रहानें तुम्हांला सांगत असें कीं नूतन बाल-शिक्षणाचें क्षेत्र म्हणजे अनेक व्यवसाय (career) धंदा यांपैकीं एक नसून हें एक जीवन-कार्य म्हणून स्वीकारलें गेलें पाहिजे व या क्षेत्रांत काम करणाऱ्या तुम्ही या कार्याचे मिशनरी म्हणजे त्यास वाहून घेणारे, प्रसंगविशेषी आर्थिक नुकसान सोसूनहि याचा प्रचार करणारे असे कार्यकर्ते व्हायला हवें.

"आज तुमच्यासारख्या मंडळींचें कार्य पाहून मनाला संतोष वाटतो कीं हें कार्य पुढें चालविणारे थोडेफार तरी मिशनरी या कार्यास लाभले आहेत.

"प्रश्न उद्भवतो कीं इतर शिक्षण-क्षेत्रांपेक्षां या क्षेत्रांत असें काय विशेष आहे, कीं ज्यामुळें तें ऐक ध्येयवादाचे कार्य होऊन बसलें आहे ? खरें पाहतां शिक्षणाच्या कोणत्याही कक्षेंतील कार्य हें मानव-समाजाच्या घडणीचेंच पवित्र कार्य आहे यांत शंका नाही. तरीहि बालशिक्षणाच्या कार्याला थोडेसे अधिक महत्त्व येतें याचें एक कारण हें कीं, आपलें क्षेत्र मानव-जीवनास वळण लावण्याचें, सुरवातीचें अत्यंत नाजुक व चिरकाल संस्कार देणारें असें आहे.

"दुसरें महत्त्वाचें कारण हें की, आज मानवजीवनास स्पर्धेची व संकुचित स्वार्थाची कींड लागलेली आहे ती वेळींच काढून सहकार्यानें, सहजीवनानें, मैत्रीनें व उद्योगानें स्वतःचा व समाजाचा विकास कसा साधता येईल याचें वळण लावण्याचें हें क्षेत्र आहे.

"निर्भयतेच्या, परस्पर सन्मानाच्या व प्रेमाच्या वातावरणांत मानव-विकास अस्खलित व्हावा व त्यांत आपण मदतरूप व्हावें हेंच आपल्या बालशिक्षकांच्या जीवनाचें ध्येय आहे या सर्व गोष्टी तुम्हीं मंडळी आपल्या विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवीत असालच. त्यांत मी अधिक कांहीं सांगायला नको.

"तुम्ही मंडळी येथें आलां होतां तेव्हां मी एक गोष्ट तुमच्यापुढें मांडली होती, तिची ह्या प्रसंगीं पुन्हां तुम्हांला आठवण करून देतें. आज आपल्याकडे शाळेंत जाण्याची वयोमर्यादा वाढविली आहे. त्यामुळें बालमंदिरें आईबापांना फार जरूरीचीं वाटूं लागलीं आहेत. शक्य तितकें लवकर आपल्या मुलांनीं शिक्षण पुरे करून नोकरीची पहिली संधि साधावी असें वाटतें. सहा वर्षाच्या आंत मुलांचें लेखन, वाचन, गणिताची पहिली, दुसरी श्रेणी संपावी अशी त्यांना घाई झालेली असते. त्यामुळे आज शहरामधून बालमंदिराच्या नांवानें अक्षरें व अंक शिकवून देणाऱ्या पंतोजीशाळा गल्लोगल्ली निघूं लागल्या आहेत. आपल्या येथील विद्यार्थिनी अनेक विषयांचा गंभीरपणें अभ्यास करतात, माहिती मिळवतात त्याकशाची या पंतोजी-शाळांना जरूरी पडत नाही. जिला दोन चार तास बेताच्या पगारावर नोकरी करायला फुरसत आहे ती बाई ही बालमंदिरें चालविण्यास लायक शिक्षिका ठरते. अशा बालमंदिरांत आईबाप आपल्या मुलांना थोडीफार फी देऊन पाठवायला उत्सुक असतात. या प्रकारचीं बालमंदिरें मोठ्या शहरांत तर पावसाळ्यांतील गवताप्रमाणें उगवलीं आहेतच पण साधारण गांवांतूनहि आईबापांना त्यांची जरूरी वाटूं लागली आहे. आपल्या विद्यार्थिनींनी हें लक्षांत ठेवायला पाहिजे कीं वरवर पाहतां आपल्याच क्षेत्रांतील व आपल्यासारख्याच दिसणाऱ्या शाळांशीं आपल्याला सामना द्यावयाचा आहे व पालक वर्गाला खरें बालशिक्षण म्हणजे काय, हें पटवून द्यावयाचें आहे. त्यासाठीं आपण आपल्या स्केलचा पगार सोडण्याचीहि तयारी ठेवून हें कार्य करण्यास झटून लागलें पाहिजे, नाहीतर आपण महामेहनतीनें जेथें गुलाब उगवण्याचा प्रयत्न करतों आहोंत त्या क्षेत्रांत सगळीकडे निवडुंगाचे कांटेच उगवतील. आज आम्ही ज्या क्षेत्रांत विशेष तळमळीने व आस्थेनें झटून काम करत आहोंत तिकडे तुम्हांपैकीं कांहीं-जणींनीं तरी वळावें असें माझ्यासारखीला वाटणें अगदी साहजिक आहे. पण मी सांगितल्यानें तें एकदम होणार आहे असें मुळींच नाहीं. एका दिशेनें वाहणारा नदीचा प्रवाह एका शब्दानें बदलूं शकत नसतो. तेव्हां आज तुम्ही मंडळी आमच्यापर्यंत येतां आहांत, एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून पाहण्यास येतां व येथें येऊन वन्य सहलीचा आनंद घेऊन जातां एवढ्यावरच सध्यां मी संतोष मानीत आहें. असेंच वारंवार येत गेल्यानें कांहींच्या मनांत केव्हांतरी यालाच आपलें कार्यक्षेत्र बनविण्याची इच्छा होईल अशी मी आशा करतें.

"आम्ही सर्व येथूनहि तुमच्या आनंदोत्सवांत व स्नेहसंमेलनांत सहभागी होत आहोत."

विनामूल्य सार्वत्रिक आणि सक्तीचें प्राथमिक शिक्षण

Free universal and compulsory system of Primary Education

कोणत्याही देशांत आणि कोणत्याही समाजाला शिक्षणाची आवश्यकता आहे. कारण शिक्षणामुळें व्यक्तीला आपल्या संस्कृतीचें आणि समाजाचें विशेष ज्ञान मिळतें. समाजाच्या उत्पादनाचीं साधनें, जीवनाचा व्यवहार आणि स्वतःच्या कार्यक्षमतेची कल्पना येते. यामुळें शिकलेल्या व्यक्तींना उद्योगधंदे सुचतात, आपली आर्थिक परिस्थिति सुधारता येते आणि सभोवतालच्या परिस्थितीचा फायदा कसा करून घ्यावा हें समजतें. ज्या देशांत शिक्षणाची सोय सार्वत्रिक सक्तीची आणि विनामूल्य नसते तेथें शिकलेले आणि बिनशिकलेले असे समाजाचे दोन भाग पडतात. शिकलेल्या लोकांच्या हातांत समाजाच्या उत्पादनाचीं साधनें जातात; त्यामुळें शिकलेल्या लोकांचें जीवन अधिकाधिक चांगलें होत जातें. शिकलेले लोक बिनशिकलेल्या लोकांना आपल्या सुखासाठीं राबवूं शकतात, त्यांचें शोषण करूं शकतात, त्यांच्यावर अन्याय करूं शकतात. यामुळें शिकलेल्या लोकांचीं घरें चांगलीं, त्यांना वापरायला कपडे आणि अन्न चांगलें, आर्थिक स्थिति चांगली म्हणून त्यांच्या मुलाबाळांना शिक्षणाच्या सोयी चांगल्या मिळूं शकतात. बिनशिकलेल्या लोकांची परिस्थिति नेमकी याच्या उलट होत जाते. दिवसेंदिवस त्यांना गुलामाची स्थिति प्राप्त होते. त्यांची जीवन-परिस्थिती खालावत जाते. त्यांच्या हातांतलीं उत्पादनाचीं साधनें शिकलेल्या लोकांच्या हातांत जातात. समाजाचा व्यवहार न कळल्यानें त्यांना काय करावें तें समजत नाहीं. आर्थिक स्थिति खालावते. त्यांचें शोषण होवूं लागतें. वाईट घरें, अन्न-वस्त्राची दैना सुरु होते. मुलाबाळांचें शिक्षण करतां येत नाहीं. अशा देशांत शिकलेला समाज मूठभर आणि बिनशिकलेला समाज फार मोठ्या प्रमाणावर असतो आणि समाजांतील दोन भागांतील विषमता सारखी वाढत जाऊन एकाच्या वाट्याला सर्व सुखें, तर दुसऱ्याच्या वाट्याला सर्व दुःखें असें अन्यायाचें साम्राज्य दिसूं लागतें. अर्थात् असा अन्याय सतत चालू शकत नाहीं. ह्यांतून न्याय मिळवण्यासाठीं आणि आपलें डोकें वर काढण्यासाठीं समाजांत क्रांतिकारी संघटना निर्माण होतात. या संघटनांमुळें वर्गावर्गांत भांडणें व संघर्ष सुरू होतो. शेवटीं जाळपोळ, रक्तपात, लढाया होऊन राजसत्तेंत क्रांति घडून येते.

सक्तीचें शिक्षण कशासाठीं ?

विषमता, संघर्ष, रक्तपात, लढाया आणि क्रांत्या टाळाव्या म्हणून पुढारलेल्या सर्व राष्ट्रांत सार्वत्रिक सक्तीच्या विनामूल्य प्राथमिक शिक्षणाच्या योजना आंखल्या जातात. अशा योजनेमुळें शिक्षणाचा लाभ गरीब लोकांनाही उपलब्ध होतो. ज्यांच्याजवळ आपल्या मुलांबाळांचें शिक्षण करण्यासाठीं पैसा नसतो, अशा लोकांच्या मुलांना शिक्षण घेणें आवश्यक आणि शक्य होतें. त्यामुळें आपला विकास करून घेण्याच्या दृष्टीनें सर्वांना समान संधी मिळते.

सक्तीच्या शिक्षणाची आपल्या देशांतील योजना

आपल्या देशांतील राजकीय सत्ता आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या लोकांच्या हातीं आहे. आपल्या देशाच्या राष्ट्रपतींची आणि राज्य चालवणाऱ्या लोकसभा आणि राज्यसभा यांत काम करण्याऱ्या लोकांची निवड लोक करीत असतात. आपलीं केंद्रीय प्रधान मंडळें आणि राज्यांचीं प्रधान मंडळें अपरोक्षपणें लोकांनींच निवडलेलीं असतात. अशा प्रकारच्या राज्य व्यवस्थेला लोकशाही म्हणतात. लोकशाहीत राज्य चालवणाऱ्या लोकांची निवड लोकच करीत असल्यामुळें ही निवड योग्य तऱ्हेनें होणें जरूरीचें असतें. राज्य चालवणाऱ्या लोकांची निवड योग्य प्रकारें व्हायची म्हणजे लोक अज्ञानांत राहून चालत नाहीं. राज्यकर्त्यांची निवड चांगल्या प्रकारें करायची तर लोकांना चांगलें शिक्षण मिळालेंच पाहिजे. म्हणून आपल्या देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर येथील राज्यकारभारव्यवस्था चालविण्यासाठीं एक मोठी नियमावली तयार करण्यांत आली तिलाच **भारतीय राज्यघटना** म्हणतात. या घटनेंत आपल्या देशांतील शिक्षणाचें धोरण कशा प्रकारचें असावें यासंबंधीं कांहीं उद्दिष्टें निश्चित करण्यांत आलीं आहेत.

भारतीय गणराज्य घटनेंतील कांहीं उद्दिष्टें

भारतीय घटनेच्या ४५ व्या कलमात म्हटलें आहे-" ही राज्यघटना सुरू झाल्यापासून नंतरच्या दहा वर्षांच्या काळांत चौदा वर्षांपर्यंतच्या सर्व बालकांसाठीं विनामूल्य सार्वत्रिक आणि सक्तीच्या शिक्षणाची सोय करण्याच्या दृष्टीनें राज्य सर्व प्रकारचे प्रयत्न करीत राहील. " शिक्षणाबाबतच्या या उद्दिष्टा प्रमाणें घटनेंत राज्याच्या स्वरूपाविषयी या देशांत निर्माण करणाऱ्या समाजाविषयी, व्यक्तीच्या हक्काविषयी अनेक प्रकारचीं उद्दिष्टें नमूद करण्यांत आलीं आहेत. सर्व भारतीयांना आपापला विकास करून घेण्यासाठीं समान संधी प्राप्त करून देणें हें या घटनेचें मुख्य उद्दिष्ट आहे. हीं उद्दिष्टें प्राप्त करण्याच्या दृष्टीनें

आपल्या देशाची योजनाबद्ध प्रगति साधण्यासाठीं पंचवार्षिक योजना आंखण्यांत येत आहेत. १९५५-५६ मध्यें आपली पहिली पंचवार्षिक योजना संपून आतां दुसऱ्या योजनेचीं पहिलीं तीन वर्षें संपलीं आहेत. या योजनांतून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीला चालना देण्याच्या दृष्टीनें कार्यक्रम योजलेले आहेत.

१९५० सालची प्राथमिक शिक्षणाची स्थिति

१९५० सालीं भारतीय घटनेला शेवटचें स्वरूप देण्यांत येऊन तिचा अंमल सुरू झाला. चौदा वर्षांपर्यंतच्या वयाच्या शिक्षणाची जबाबदारी राज्यानें घटनेप्रमाणें घेतलेली असली तरी हें उद्दिष्ट गांठण्याच्या दृष्टीनें प्रथम प्राथमिक शिक्षणाचाच म्हणजे सहा ते चौदा वयाच्या शिक्षणाचाच प्रश्न सरकारनें प्रथम हातीं घ्यायचें ठरवलें. १९५०-५१ सालीं भारतांतील ६ ते ११ वयाच्या सर्व मुलांपैकीं फक्त ४२ टक्के आणि ११ ते १४ या वयाचीं १४ टक्के मुलेंच प्राथमिक शिक्षण घेत होतीं. याचा अर्थ ६ ते ११ वयाच्या ५८ टक्के मुलांना आणि ११ ते १४ वयाच्या ८६ टक्के मुलांना शिक्षण मिळत नव्हतें असा आहे.

पंचवार्षिक योजनांचीं उद्दिष्टें

१९५५-५६ सालीं पूर्ण झालेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेमुळें ६ ते ११ वयाच्या मुलांच्या शिक्षणाचें प्रमाण ४२ टक्क्यावरून ५१ वर आणि ११ तें १४ वयाच्या मुलांच्या शिक्षणाचें प्रमाण १९·२ वर नेण्यांत आलें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हें प्रमाण १९६० साल अखेर अनुक्रमें ६२·७ आणि २२·५ वर नेण्याचें ठरविण्यांत आलें आहे. याप्रमाणें भारतीय घटनेंत जरी घटना सुरु झाल्यापासूनच्या पहिल्या दहा वर्षांत (१९५०-६०) सर्व भारतीय बालकांना सक्तीचें विनामूल्य शिक्षण देण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें तरी घटनेनें जाहीर केलेलें सक्तीच्या शिक्षणाचें उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टीनें आपण अजून फार मागें पडलेले आहोंत यांत शंका नाहीं. अर्थात याला मुख्य कारण आपल्या देशाची एकूण आर्थिक स्थिति आहे.

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबतची मुंबई राज्याची प्रगति

सक्तीच्या प्राथमिक शिक्षण-योजनेची प्रगति भारताच्या सर्व राज्यांत सारखी नाहीं. राजस्थान आणि मध्यप्रदेशांत १९५५-५६ या वर्षांपर्यंत साक्षरतेचें प्रमाण ९-१० टक्क्यापर्यंत आहे. केरळ, पश्चिम बंगाल, मुंबई आणि मद्रास यांत हें प्रमाण ४०·८८, २४·०२, २१·६४ व २०·८१ आहे.

त्रावणकोर-कोचीन या राज्यांत शाळकरी मुलांच्या संख्येपैकी ९९·८ टक्के मुलें शाळांचा लाभ घेतात, मुंबईंत हें प्रमाण ६१·१ असल्याचें नमूद करण्यांत आलें आहे.

सक्तीच्या प्राथमिक शिक्षण-योजनेपुढील प्रश्न

सक्तीची प्राथमिक शिक्षण-योजना पुढें नेण्यास पैसा तर पाहिजेच परंतु त्यामुळें या शिक्षणाची प्रगति केवळ पैशावरच अवलंबून आहे असें मानणें चुकीचें होईल. विशेषतः ग्रामीण विभागांत जेथें हें शिक्षण सक्तीचें करण्यांत आलें आहे तेथील सर्वच्या सर्व मुलें शाळेंत जाऊ लागतात असें नव्हे. ६ ते ११ वयांतील मुलेंदेखील गरीब कुटुंबांत आर्थिक दृष्ट्या साह्य करीत असतात. विशेषतः ज्या कुटुंबांत लहान मुलें आहेत अशा मुलांचा सांभाळ करण्याचें काम या वयांतील मुलींवर सोंपविण्यांत येतें त्यामुळें कुटुंबांतील माता ही मजुरी करून अर्थोत्पादन करूं शकते. या वयांतील मुलांना शेतीवरच्या किंवा अन्य कामावरही पाठवून कुटुंबाच्या उत्पन्नाला थोडीफार मुलांचीही मदत होऊं शकते. त्यामुळें अत्यंत गरीब कुटुंबांचा या शिक्षण-योजनेला सहकार मिळत नाहीं. सक्तीचें शिक्षण टाळण्यासाठीं हीं कुटुंबें शक्य तो प्रयत्न करतात यामुळें या शिक्षण-योजनेचें यश आपल्या येथील कुटुंबांचे आर्थिक स्थितीवरही बरेंचसें अवलंबून आहे. अशा परिस्थितींत कुटुंबांचे बाबतींत शिक्षण नुसतें विनामूल्य केल्यानें भागत नाहीं, तर हें शिक्षण देतां यावें म्हणून या मुलांच्या खाण्यापिण्याचा, कपड्यालत्त्याचा खर्च करून त्याशिवाय या मुलांच्या लहान भावंडांना सांभाळण्याची सोयही व्हावयास हवी. मुंबई राज्यांत या दृष्टीनेंच आश्रम-शाळांची योजना करण्यांत आली आहे. या शाळांत मुलांच्या खाण्यापिण्याचा, कपड्यालत्त्याचा जवळ जवळ सर्वच खर्च मुंबई राज्य करीत आहे

याशिवाय जें शिक्षण सक्तीचें करावयाचें त्याचें स्वरूप काय असावें, या शिक्षणासाठीं शिक्षकवर्गाचें शिक्षण कसें करावें, या शाळांना इमारती कशा प्रकारच्या असाव्या, या मुलांच्या आरोग्यासाठीं काय काय करावें, मुलांच्या पालकांचा सहकार कसा मिळवावा, पालकांच्या शिक्षणाशिवाय प्राथमिक शिक्षण परिणामकारक होवूं शकत नाहीं म्हणून पालकांचें शिक्षण कोणत्या प्रकारें योजावें, शिक्षणाचीं साधनें, फर्निचर कशा प्रकारचें असावें, पाठ्यपुस्तकें कशा प्रकारचीं असावीं, शाळा सोडून जाणाऱ्या मुलांचे प्रश्न, नापास होणाऱ्या मुलांचे प्रश्न असे कितीतरी तात्कालिक महत्वाचे प्रश्न सक्तीच्या प्राथमिक शिक्षण-योजनेपुढें आहेत.

भारतीय सरकारनें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचें स्वरूप बेसिक म्हणजे मूलोद्योगी पद्धतीचें असावें असें स्वीकारलेलें आहे. परंतु मूलोद्योगी शिक्षण-पद्धति ही देखील अजून अर्भकावस्थेंतच असल्यानें तिचेंही स्वरुप घडलें जात आहे. ह्या स्वरुपाची पूर्ण कल्पना येईपर्यंत पूर्वीचें जें पुस्तकी प्राथमिक शिक्षण आहे तें थांबवणें शक्य नाहीं: म्हणून सध्या बेसिक प्रकारच्या प्राथमिक शाळा आणि जुन्या प्रकारच्या प्राथमिक शाळा यांची सारखी वाढ करण्याचा प्रयत्न चालू आहे. बेसिक शिक्षणाचें स्वरूप नवीन असल्यानें त्याला तर सुशिक्षितांकडूनही विरोध होत आहे. त्यांत कांहीं शिक्षणतज्ञ आणि शिक्षक मंडळीही आहेत. अशा स्थितींतून सक्तीच्या सार्वत्रिक विनामूल्य शिक्षण-योजनेला आपला मार्ग काढावयाचा आहे. या शिक्षणाच्या विकट प्रश्नमालेंतून आपले लोक आणि सरकार मार्ग काढतीलच अशी आशा बाळगूं या. —शेष नामले

रेतीचा हौद

काल सांगून ठेवल्याप्रमाणें अनुताईंना बरोबर घेऊन मुकुंदाच्या मागोमाग यशोदाबाई शिशुविहारांत आल्या. आज मुकुंदानें त्यांचें बोट धरलें नव्हतें. आईच्या पुढें तुरतुर पावलें टाकीत तो माझ्या जवळ आला.

'नमस्ते माई, नमस्ते—आम्ही आलों.'

'आई तुम्ही बसा इथें. मी जातों खेळायला.' असें म्हणून मुकुंद सरळ निघाला तो रेतीच्या हौदावर. कांहीं मुलें तेथें आधींच पाहोंचली होतीं अन् कामालाही लागलीं होतीं.

शिशुविहारच्या पडवीला लागूनच वेलींचा मांडव घातलेला आहे. या मांडवाच्या एका कोपऱ्यांत ८"×८" चा एक हौद आहे. मुलं त्याला 'रेतीचा खड्डा' म्हणतात. म्हटलं तर तो खड्डाही आहेच. चांगली दीड-दोन फूट त्याची खोली असेल. सीमेंटनें तो छान बांधून घेतला आहे. त्याची पाळ अगदी जमिनीबरोबर आहे. त्यांत समुद्रावरची स्वच्छ, बारीक भुसभुशीत रेती चांगली फूट-दीड फूट भरली आहे. रेतीची पातळी फरशीपेक्षां सहा इंच खोल ठेवली आहे. या रेतीच्या हौदांत सारखीं मुलं खेळत असतात. मुकुंदलाही सुरूवातीपासून या हौदाचें विशेष आकर्षण वाटलें. यशोदाबाई त्याच्या बारीक सारीक हालचालींकडे लक्ष देऊन पहात होत्या. मुकुंदचें वय नुकतेंच तीस महिन्याचें वर गेलें होतें. हौदांत चाललेल्या इतर मुलांच्या क्रीडांचेंही त्या निरीक्षण करीत होत्या. वयानुसार मुलांच्या रेतीच्या खेळांत कसा फरक पडून जातो हें त्या पहात होत्या. हौदांत दोन अडीच वर्षांपासून तों सहा सात वर्षांपर्यंतचीं मुलं होतीं. त्यांत कोणी एकेकटीं, तर कोणी एकमेकांशीं सहकार करून खेळत होतीं. एका कोपऱ्यांत तीनचार मोठ्या मुलांनीं मिळून एक मोठा डोंगर बनविला होता. त्यांतील एक मुलगा नुकतींच अजिंठ्याचीं लेणीं पाहून आला होता. त्या डोंगराच्या पायथ्याशीं चंद्राकार नदी वाहते आहे, या डोंगरांत त्यानें लेणीं कारायला सुरुवात केली होती. दुसऱ्या मुलांना तो काय करीत होता, हें कांहीं समजत नव्हतं, म्हणून आपल्या अजिंठ्याच्या प्रवासाची मधून मधून तो गोष्ट सांगत होता—'हा असा रस्ता आहे. या रस्त्यावर इथें आमची बस थांबली. इथें आम्ही उतरलों. रस्त्याच्या दोन बाजूला कडू लिंबाचीं झाडें होतीं.'

रेतीच्या हौदाला लागून त्याच्या एका बाजूला अडीच तीन फूट उंचीची तीन शेल्फं होतीं. त्यांत एका ठिकाणीं वाहनें, एका ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारचे कचकड्याचे लहान लहान प्राणी, एका ठिकाणीं पक्षी, एका कप्प्यांत टिनाचे निरनिराळ्या आकाराचे डबे, दुसऱ्या एका फळीवर जुने चमचे, लोखंडाच्या अन् लाकडाच्या सळ्या, खेळांतील झोपड्या, निरनिराळ्या प्रकारच्या वृक्षांचें नमुने, निरनिराळ्या आकाराचे दगड, लहान मोठ्या लाकडी बाहुल्या अशा कितीतरी वस्तू मांडून ठेवलेल्या होत्या. तो मोठा मुलगा यांतून भराभर वस्तूंची निवड करीत होता. जिथें त्याची बस थांबली तिथें त्यानें एक खेळांतली बस उभी केली. रस्ता दाखवण्यासाठीं बारीक दगडांची निवड करून ते दुतर्फा मांडले. रस्त्याच्या दोनही बाजूला त्यानें प्रथम कुंड्या ठेवल्या पण एक मुलगा म्हणाला—'रस्त्यावर का कुंड्या ठेवतात?' सर्व जण विचारांत पडले. शेवटीं एकाला सुचलें—मेंदीच्या लहान लहान फांद्या लावल्या तर?

'माई! माई!! आम्ही मेंदीच्या फांद्या आणतों' बस, सर्व सेना डोंगर सोडून मेंदीच्या फांद्या आणायला निघाली.

मुकुंद हें सर्व चुपचाप पहात होता. त्यांतील प्रत्येक मुलाच्या हालचालींकडे व त्यांच्या बोलण्याकडे त्याचें लक्ष होतें. मुलांची टोळी उड्या मारीत मेंदी आणायला जेव्हां बाहेर पडली तेव्हां तोही या टोळीबरोबर उड्या मारीत मांडवाच्या बाहेर पडला. मुलं मेंदीच्या फांद्या कोठून आणतात तें मी मांडवांत उभी राहून पहात होतें. यशोदाबाई म्हणाल्या, —'पाहिलंत अनुताई, आहे की नाहीं रेतीच्या हौदांत देखील शिक्षण. मुलांना ओल्या रेतींत खेळांवसं वाटतं. समुद्रावर मुकुंद आणि त्याची भावंडं गेलीं कीं शिडांत वारं भरलेल्या होड्यांसारखीं तीं नुसतीं धांवत सुटतात. ओल्या रेतींत काय काय त्यांचें खेळ चाललेले असतात. पण मुकुंद इथें तसें कांहीं करतांना दिसत नाहीं.'

'मला वाटतं' अनुताई मध्येच म्हणाल्या—'एक तर तो वयानं लहान आहे. दुसरं म्हणजे शिशुविहारांतही तो अजून 'नवाच' आहे. इतर मुलं काय खेळतात, कसं खेळतात याचं तो निरीक्षण करतो आहे. समुद्राच्या रेतीच्या पटावरचं वातावरण पुष्कळ निराळ पडतं. इथं रेतीशी खेळायला किती तरी साधनं आहेत, किती तरी खेळणी आहेत. मुलांच्या अशा प्रकारच्या खेळाच्या सामान्य गरजा ओळखून बारीक सारीक वस्तु येथें जमवून ठेवल्या आहेत.'

फॅन्सी नायलॉन साडी, नायलॉन जेकार्ड, दोरिया,
क्रेप, जॉर्जेट, टॉफेटा, सॅटीन, फ्लावर वगैरे
निरनिराळ्या रंगांत, तसेंच आकर्षक डिझाइन्समध्यें छापलेले मिळतात

: टेलिग्राम :
'BIPFABRIC'

: टेलिफोन :
मिल : ६०५०४
शॉप : ३९७४९

BIPIN SILK MILLS CO. PRIVATE LTD. BOMBAY (INDIA)

क्लॉथ शॉप
गोविंद गल्ली,
मूळजी जेठा मार्केट,
मुंबई २

BIPSU FABRICS

: रीटेल शॉप :

बिपीन सिल्क मिल्स कं. प्रायव्हेट लि.,

१२ दादर रोड, मुंबई २८
(इंडिया)

A (ROHIT) GROUP OF ENTERPRISES

यशोदाबाई म्हणाल्या–'मला प्रथम या रेतीच्या हौदाचा कांहीं अर्थच कळत नव्हता. यांत काय शिक्षण देत असतील याचा मी आपली विचारच करीत होतें. पण आज याचा खराखुरा उपयोग कसा होतो तें दिसतं आहे.

'बघुया हीं मुलं परत येऊन काय करतात–' अनुताई माळ्याशीं बोलत असलेल्या मुलांकडे नजर टाकीत म्हणाल्या. माळ्याचे शब्द ऐकूं येत होते,–'आतांच मी मेंदी कापली आहे ती चालेल कां तुम्हाला?' मुलं म्हणाली–'हो हो माळी बुवा–आम्ही मोठा डोंगर केला आहे. त्यांत लेणीं करणार आहों. आम्हाला खूप खूप मेंदी द्या.'

माळ्यानें प्रत्येकाला मेंदीच्या फांद्या दिल्या. सर्व मंडळी धावत परतली. त्यांतला मोठा मुलगा म्हणाला,– 'या डोंगरावर तुम्ही जंगल बनवा. मी रस्त्यावरचीं झाडं लावतों. चंदू, तूं आपलं लेणीं कोरायचं काम या लोखंडाच्या सळीनें कर, अन् समोरून जायला डोंगरावर देखील रस्ता ठेवायचा बरं कां! मुलं शेल्फमधील खेळण्यांकडे बघत होतीं. तीं खेळणीं पाहून त्यांना कल्पना सुचत होत्या, कीं आपल्या मनांत आलेल्या प्रवासाचीं दृष्यें निर्माण करण्यासाठीं तीं खेळण्यांचा उपयोग करीत होतीं? काय होतं होतें कुणास ठाऊक? पण जंगलांत वाघ, ससे, लांडगे, हरणं ठेवलीं गेलीं. झाडांवर पक्ष्यांना जागा मिळाली. मधेच चौकीदाराच्या झोपड्या ठेवल्या गेल्या. पांच लेण्यांच्या गुहा व त्याचा पुढचा रस्ता तयार झाला.

पण 'नदी कशी दाखवायची!' पुनः प्रश्न पडला. एकजण म्हणाला, 'खरंखुरं पाणी ओतुंया का?' दुसरा म्हणाला, 'पण पाणी ओतलं तरी दिसायचं नाहीं रेतींत. पाण्याचा रंग दिसला पाहिजेना; पाणी वाहताना दिसलं पाहिजे.'

मी सहज सुचवलं, 'रंगीत लाकडी भुसा आहे तो नाहीं का घालतां येणार?' 'पण माई, रेती खराब होईलें ना भुशानं!' त्या मोठ्या मुलानं मला उलट प्रश्न विचारला. मी म्हणालें, 'भुशापासून रेती कशी निराळी करायची तें मी दाखवीन तुम्हाला. तुम्हाला भुसा चालत असेल तर जरूर वापरा.'

मुलं म्हणालीं, 'लाकडी भुशानं नदी दाखवतां येईल अन् थोड्या थोड्या मधून मधून ठेवल्या तर अगदीं नदी सारखं दिसेल. बस! मुलांना कल्पना आवडली तीं पुढील कामाला लागलीं. मुकुंदानें हळूच हौदांतला एक कोपरा इतक्यांत हस्तगत केला. आपल्या चिमुरड्या चिमुकल्या बोटानीं रेती ओढून ओढून तोही आपला एक छोटा डोंगर बनविण्याच्या कामाला लागला होता. सर्व मुलें आपापल्या कामांत लागलेलीं पाहून मी पालकांच्या कोपऱ्याकडे वळलें. यशोदाबाई आणि अनुताई मुलांच्या खेळाकडे उत्सुकतेनें पहात होत्या. मला पाहिल्याबरोबर म्हणाल्या—

'मुलांना आपल्या मनाप्रमाणं काम करण्याची सोय करून दिली कीं तीं कशीं रमतात आणि काय काय करतात! मघापासून मी पाहतें आहे, कोणी एकमेकांशीं भांडत नाहींत. अजिंठ्याच्या लेण्यांचा त्यांच्या मनानें किती छान देखावा त्यांनीं केला!'

मी म्हणालें–'हौदांतील रेती हें असं कांहीं आकर्षक साधन आहे कीं त्याचा कधींच मुलांना कंटाळा येत नाहीं. या साधनांतली खुबी ही आहे कीं दोन अडीच वर्षांपासून तो थेट अगदी मोठ्या वयापर्यंत सर्व वयाचीं मुलें या रेतीचा उपयोग आपापल्या कल्पनेप्रमाणें करूं शकतात. त्यामुळें हौदांत या एकाच साधनावर लहान–मोठीं मुलें एकत्र किंवा सुटीं खेळूं शकतात. एकमेकांचं पाहून शिकूं शकतात. खरं सामाजिक शिक्षण होतं इथं. प्रत्येक मूल दुसऱ्याशीं सहकार कसा करायचा तें स्वाभाविकपणें इथें शिकतं.'

'काय हो, हीं येवढीं थोरलीं खेळणीं इथें ठेवलीं आहेत तीं रेतींत टाकून मुलं जात नाहींत का? त्यांतून कांहीं तीं घरीं नेत नाहींत का?' अनुताईनीं त्यांना काय वाटत होतं त्याचा खुलासा विचारला.

मी म्हणालें, 'कांहीं दिवस अशीं खेळणीं जातात, तीं सांभाळण्याची जबाबदारी मुलांच्यावरच टाकली कीं मग तसे प्रकार हळूं हळूं कमी होऊ लागतात. खेळाचीं साधनं पुनः जिथलीं तिथें ठेविलीं पाहिजेत याचा आम्ही फार आग्रह ठेवतों.'

'—आणि या आग्रहाबरोबर हीं खेळणीं जागच्या जागीं सहज ठेवतां येतील अशी सोयही तुम्ही केली आहे' यशोदाबाई मघेंच आम्ही केलेल्या व्यवस्थेची प्रशंसा करीत म्हणाल्या.

मी म्हणालें, 'प्रत्येक साधनाच्या उपयोगाचा विकास हा पुष्कळसा शिक्षकावरच अवलंबून असतो. आपली स्तुति करून घ्यायची म्हणून म्हणत नाहीं, पण अलीकडे कित्येक शाळांत रेतीच्या ट्रेजचें किंवा हौदाचें साधन ठेवूं लागले आहेत. परन्तु हें साधन म्हणजे मुलांचा वेळ घालवण्याचें साधन म्हणून स्वतः शिक्षकांचाच जेथें समज असतो तेथें याचा नीट उपयोग विकसत नाहीं. प्रत्यक्ष शिक्षकालाही याचा उपयोग कसा चांगला होवू शकतो याची कल्पना नसते म्हणून ह्या साधनाकडे त्यांचे विशेष लक्ष नसतें. अशा ठिकाणीं मुलांच्या कल्पकतेंतही कांही विशेष दिसून येत नाहीं. उलट एकमेकांच्या डोक्यात रेती घालणें, कपडे घाण करणें, किंवा

(पान १६ वर पहा)

नूतन बालशिक्षण आणि संघ समाचार

बालनिकेतन पागनिस पागा, इंदूर : दिनांक ६ व ७ फेब्रुवारीला बालनिकेतन संघाच्या जेल रोड व स्नेहलता गंज येथील बालशिक्षण संस्था व बालअध्यापन मंदिराचा वार्षिकोत्सव अत्यंत उत्साहाच्या वातावरणांत साजरा झाला पहिल्या दिवशींचे सांस्कृतिक कार्यक्रम प्रशंसनीय होते. दुसऱ्या दिवशीं अतिथिविशेष म्हणून माहिती आणि आकाशवाणी विभागाचे केन्द्रीय मंत्री डॉ. केसकर होते. अध्यापन विद्यार्थिनींना उद्देशून त्यांचें लहानसें भाषण झालें. माजी शिक्षण विद्याधिकारी डॉ. सुखठणकर यांच्या हस्तें प्रशस्तिवितरण करण्यात आलें.

या वर्षी अध्यापन विद्यार्थिनींनीं शैक्षणिक प्रवासाऐवजी अलिजापूरच्या आदिवासी वस्तीच्या भागांत शिक्षण शिबिराची योजना केली होती. त्यांत आदिवासी स्त्रियांबरोबर शेतांत कार्य करणें, घरसफाई, मनोरंजन वगैरे कार्यक्रम यशस्वी झाले. समाजसेवेचें कार्य किती विशाल आहे याची कल्पना या शिबिरामुळें विद्यार्थिनींना आली. याप्रसंगीं योजलेल्या संबंधित प्रदर्शनांत आदिवासी जीवनाची कल्पना देणारे कांहीं चार्टस् व राहणीची कल्पना देणारें द्रव्य योजलें होतें. एकूण यंदाचा कार्यक्रम सर्व दृष्टीनें उद्‌बोधक वाटला.

पदव्युत्तर पूर्वप्राथमिक प्रशिक्षण : एस. एन. डी. टी. विद्यापीठानें योजलेल्या पदव्युत्तर पूर्वप्राथमिक प्रशिक्षणक्रमांत (Batchelor of Education) मराठी भाषी Pre P. T. C. प्रशिक्षणक्रम झालेल्या पदवीवर विद्यार्थिनींसाठीं कांहीं जागा राखून ठेविल्या आहेत. त्या जागा एक वर्षाआड मराठी आणि गुजराती विद्यार्थिनींसाठीं राखून ठेवण्यांत येतात. या वर्षी फक्त मराठी विद्यार्थिनी घेण्याची पाळी आहे. नागपूर, यवतमाळ, सांगली, सोलापूर, पुणें मुंबई येथील बालअध्यापन मंदिरांतून पास झालेल्या पदवीधर विद्यार्थिनींनाच हा प्रशिक्षणक्रम करतां येईल. या प्रशिक्षणक्रमाचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनीं श्रीमती शकुंतलाबेन महेता, प्राचार्या एस. एन. डी. टी. कॉलेज प्रशिक्षण विभाग, ठाकरसी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई या पत्त्यावर अधिक माहिती एप्रिल १० चे आंत मागवावी.

शिशुविहार आणि बालअध्यापन मंदिर, दादर, मुंबई १४ : संस्थेच्या रौप्य महोत्सवासंबंधी योजना आंखण्याच्या दृष्टीनें संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचें आणि पालकांचें स्नेहसंमेलन एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यांत योजण्यांत येत आहे. या संमेलनाचीं निमंत्रणें पाठविण्यासाठीं ज्यांचे पत्ते बदललेले आहेत त्यांनीं आपापले पत्ते संस्थेच्या मुख्याध्यापकांना कळविण्याची कृपा करावी.

ट्रेंड पूर्वप्राथमिक शिक्षकांना काम पाहिजे : कोसबाड येथील ग्राम बाल शिक्षा केंद्रांत प्रशिक्षण घेतलेल्या सात शिक्षकांना बालवाडी अथवा बालमंदिरांत शिक्षक म्हणून काम पाहिजे आहे. या बाबतींत श्री. मनोहर खाशाबा जाधव, मु. निनाम (पाडळी), पो. पाडळी, जि. सातारा या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

मुंबई कामगार कल्याण मंडळ, जांबोरी मैदान, वरळी, मुंबई १८. : कामगार सभेकरतां स्त्रियांचा व मुलांचा कार्यक्रम बसविण्याकरतां साहित्य पाहिजे. लिखाण २८ मिनिटांत बसवतां येईल असें असावें. त्याबद्दल योग्य मोबदला देण्यांत येईल.

भगिनी मंडळ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर : संस्थेच्या बालमंदिराचें व बाल अध्यापन मंदिराचें स्नेहसंमेलन दिनांक २२ फेब्रुवारी रोजीं श्री. दामोदरलाल शर्मा, विशेष शिक्षणाधिकारी, विदर्भ यांच्या अध्यक्षतेखालीं साजरें झालें. विद्यार्थिनींचे खेळ, मनोरंजन कार्यक्रम, स्नेहभोजन आदि कार्यक्रम योजिले होते.

शिशु-विकास मंडळ, शीव, मुंबई २२ : संस्थेचें सातवें स्नेहसंमेलन श्री. एस. एम्. वाय. शाखी, म्यु. डे. कमिशनर यांचे अध्यक्षतेखालीं साजरें झालें.

बाल-विकास मंदिर, किर्लोस्करवाडी : संस्थेचें वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ माननीय श्री. भा. घों. कर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं दिनांक ४ मार्च रोजीं साजरा झाला.

बालमंदिर उगार खुर्द : संस्थेचा सातवा वाढदिवस २२ फेब्रुवारीला सौ. गंगूबाई कोकीळ, बी. ए. बी. टी. यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

म्युनिसिपल पूर्वप्राथमिक शाळा, पुणे २– दिनांक २१ फेब्रुवारी १९५९ रोजीं मा. रा. वि. तेलंग, मेयर, पुणें महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचें वार्षिक संमेलन साजरें झालें.

चुकीची दुरुस्ती : 'शिक्षण-पत्रिके'च्या गेल्या अंकांतील बालविभागांत प्रकाशित झालेली 'कोवडीचीं चतुर पिलें' ही गोष्ट चुकीनें श्रीमती अनुताईंच्या नावावर प्रसिद्ध झाली आहे. या गोष्टींच्या लेखिका श्रीमती सौ. सुधाताई कुलकर्णी यांची आम्ही क्षमा मागतों.

शिशुविहार मंडळ, यवतमाळ : पूर्वप्राथमिक शिक्षकांची सहावी अभ्यास-परिषद दि. २१-२२ आणि २३ मार्च रोजीं भरविण्यांत येणार आहे. बालविकासाच्या क्षेत्रांतील कार्यकर्ते आणि त्या संस्थांचे चालक बहुसंख्येनें येऊन या परिषदेचा फायदा घ्यावा अशी परिषदेच्या चालिका श्रीमती मायादेवी भालचंद्र यांनीं विनंती केली आहे.

बालविकास मंडळ, कराड : सदरहू संस्थेच्या चालकांचा बालअध्यापन मंदिर १ जून १९५९ पासून सुरू करण्याचा विचार आहे. सदर संस्थेसाठीं प्रिन्सिपॉल B. A. B. T. PreP. T. C. त्याचप्रमाणें अध्यापक नेमावयाचे आहेत. ४५९, सोमवार पेठ, कराड, जि. सातारा-या पत्त्यावर सेक्रेटरीकडे चौकशी करावी.

पंढरपूर : येथील कु. कुसुम आराध्ये यांच्या संचालकत्वाखालील शिशुविहार या संस्थेचा वार्षिकोत्सव ता. ८ मार्च रोजीं सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. वि. म. कुळकर्णी, एम. ए., पी. एच. डी., यांच्या अध्यक्षतेखालीं अरुण टॉकीजमध्यें मोठ्या उत्साहानें साजरा झाला.

रेतीचा हौद

(पान १४ वरून चालू)

नुसतेच खड्डे किंवा विहिरी करीत बसणें अथवा खुंट्या ठोकीत बसणें किंवा ढीग अन् डोंगर करीत बसणें अशीं कामें चालतात. या प्रकारच्या खेळांत मुलें फारशीं वर येत नाहींत. शिक्षकांनाही वाटत राहतं कीं याचा तसा मुलं गुंतवून ठेवण्याखेरीज उपयोग नाहीं.'

'तुम्हीं याचा उपयोग व्हावा म्हणून काय काय करता ?' अनुताईनीं विचारलें.

मी म्हणालें, 'समुद्रावरची रेती आपल्याला कां आवडते सांगाल का मला ? जेव्हां जावं तेव्हां ती रेती स्वच्छ असते. मुलांना देखील रेतींत खेळायला आवडतं.'

'पण ह्या रेतींत खेळण्याचा कांहीं शैक्षणिक उपयोग आहे का !' अनुताईनीं आपल्या मनांतली शंका संकोचानें बोळगता प्रकट केली. पण मी कांहीं उत्तर देणार तो बोलण्याचा दोर त्यांनीं आपल्या हातांत घेतला नि म्हणाल्या,

'किती तरी शिक्षण आहे यांत. एक तर अंगमेहनत किती होते. जसजसं मुलींचं वय वाढतं तसतशीं तीं आपल्या हाताचा कौशल्यपूर्ण उपयोग करतांना दिसतात. त्यांच्या हाताच्या बोटांच्या स्नायूंना सुंदर व्यायाम यांत होतो. पण हा झाला शारीरिक विकासाचा भाग. आपल्या कल्पनेप्रमाणें लहानमोठ्या कितीतरी गोष्टी तीं करूं शकतात'

'माई, मुलं तुम्हाला बोलवायला आलेलीं दिसतात.'

'माई ! माई !! चला आमची अजिंठ्याचीं लेणीं बघायला.' मी म्हटलें,- 'आपल्या येथें आलेल्या मंडळींनाही बोलवाना.' 'सर्वांनीं यायचंय' त्यांतील एकजण पुटपुटला. आम्ही तिघीजणी त्यांचीं लेणीं बघायला उठलों.

लेणी व तो देखावा पाहून झाल्याबरोबर चंदू म्हणाला, 'माई, रेती आणि लाकडी भुसा कसा निराळा करायचा तें दाखवणार म्हणाला ना ?' 'खरंच, तें तर मी विसरूनच गेलें.' म्हणून मी त्यांना सुचविलें- 'जिथें भुसा टाकला आहे तेथून तो रेतीसह चमच्यानें असा भरा' म्हणून मी दोनचार चमचे भरून दाखवले. मुलें अशा तऱ्हेनें भुसा डब्यांत भरूं लागलीं.'

मी म्हटलें-'अगदीं भुशाचा एकही कण दिसणार नाहीं असं करा. नंतर मी एक काचेचा पेला पाण्यानें अर्धवट भरून आणला. नंतर रेतीवाल्या भुशाचा एक चमचा घेऊन त्या पाण्याच्या पेल्यांत टाकला. त्यांतील मोठ्या मुलांना विचारलें--

'रेती तरंगेल कीं बुडेल ?' उत्तर आलें-'बुडेल, खालीं बसेल.' नंतर विचारलें 'भुसा तरंगेल कीं बुडेल ?' उत्तर आलें 'तरंगेल' ' भुसा पाण्यांत पडल्याबरोबर रेती अन् भुसा निरनिराळी झालीं. मुलांनीं टाळ्या वाजवल्या. नंतर चमचा घेऊन भुसा निराळा केला. मुलांना एक मोठें काम मिळालें.

यशोदाबाई म्हणाल्या, 'हा तर मॅट्रिकमध्यें आम्हीं विज्ञानाचा प्रयोग म्हणून केला होता. म्हणजे रेतीच्या हौदांतून विज्ञानही शिकवता अहां तुम्ही.'

मी म्हटलें, 'प्रत्येक प्रवासाला जाताना कसें जायचें, कोठें जायचें, कोठे काय पहायचें, याचा नकाशा आम्ही या हौदांत करतों. नंतर प्रवासांतून आल्यावर त्यांतील कांहीं गोष्टींची दृष्येंही या हौदांतच करतों. सुरूवातीच्या मुलांत तितकी कल्पकतेची वाढ झालेली नसते पण मोठ्या मुलांचें पाहून पाहून त्यांनाही कांहीं करावसं वाटतं; मग त्यांतून हळूहळू नवीन नवीन गोष्टी सुचतात. मुलांच्या कल्पकतेला आणि सौंदर्यदृष्टीला यांत वाव मिळतो.'

मुलांची जेवणाची वेळ झाल्यानें आम्ही आटोपतें घेतलें.

—ना.



अधुनिक नवयुगाची युगाचें भावाइन स्त्रीजनव्यासाठीं.

फार परिश्रमपूर्वक संशोधनानंतर

१८ औषधीयुक्त वनस्पतीपासून

तयार केलेली एकमेव आयुर्वेदीय

वि को व ज्र दं ती

खेड्या अगर पाखाड्या आपल्या फर्मांतिल्या मालें वापरा.

विको लॅबोरेटरीज


जयंत महाल, दादर बी बी., मुंबई ४



सौंदर्य
प्रसाधनांत
अग्रस्थानी


हर्बी

स्नो




— सोल डिस्ट्रीब्युटर्स —

ए. व्ही. आर. ए. पेन्ट कं., मुंबई २









मुद्रक व प्रकाशक:—श्री. शेष नामले, 'शिक्षण-पत्रिका' कार्यालय, ११८, हिन्दु कॉलनी, दादर—मुंबई १४.
मुद्रणस्थान:—रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, रुक्मिणी-निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

17829

17829

